दिल्लीत गांधीजी – भाग दुसरा

मनुबहेन गांधी

अनुवाद

ब्रिजमोहन हेडा

बिरला भवन, नवी दिल्ली,

१ - १ - '४८

नेहमीप्रमाणे ३.३० वाजता प्रार्थना, प्रार्थनेनंतर बापूजींनी टपाल लिहिला.

"माझ्या मते येथील परिस्थितीत कोणताही फरक पडलेला नाही. सध्या मी इथे आहे परंतु काय करता येईल ते मला माहीत नाही. आज शहरात जी काही शांतता आहे ती पोलिसांच्या भीतीमुळे आहे. लोकांच्या अंतःकरणात आग आहे. एक तर ही आग विझवण्यात आली पाहिजे वा या आगीने मला भस्मसात केले पाहिजे. या क्षणी तरी तिसरा कोणताही मार्ग दिसत नाही."

आज इंग्रजीतील नवीन वर्ष सुरू होत असल्यामुळे नूतन वर्षाभिनंदनाचे आणि ख्रिसमसचे अनेक कार्ड बापूजींना आले. लॉर्ड आणि लेडी माऊंटबॅटनचेसुद्धा अभिनंदन पत्र आले. राजकुमारीबहेन तर खूपच आधी प्रणाम करायला आल्या होत्या.

एका भगिनीला सांत्वनपर पत्रात -

> "तर तुझे भाऊ वारले. ते आजारी आहेत हेसुद्धा मला माहीत नव्हते. ईश्वराने त्यांची वेदनेतून सुटका केली याकरिता आपण ईश्वराचे आभार मानले पाहिजे. तुला, मला आणि आपल्या जवळच्या सर्व स्नेहीसोबत्यांना जायचे आहे. आता आपल्या देशात दररोज शेकडो लोक मरतात. अनेकांमागे अशी अनाथ मुले राहतात की ज्यांची काळजी घेण्याकरिता मागे कोणीही नसतात. अनेकांची अगदी कोवळ्या वयातील निरागस मुले मरतात. तू देशाच्या दुरावस्थेचा विचार करून स्वतःचे समाधान कर. माणसाने केवळ स्वतःच्या दुःखाचा विचार करणे हा स्वार्थीपणा आहे."

नेहमीप्रमाणे बापूजी फिरायला निघाले. तेव्हासुद्धा अनेक इंग्रज भाई बापूजींना नववर्षानिमित्त प्रणाम करायला आले होते. एका भाईने तर साक्षात येशू भगवान म्हणून बापूजींचे स्तवन केले. बापूजी म्हणाले, मी निश्चितच येशू ख्रिसत नाही, परंतु त्यांच्या मार्गावर चालण्याचा प्रयत्न करतो आहे.

अजून चांदबहेनला बरे नसल्यामुळे कर्नल भार्गवना फोन करून बोलवायला बापूजींनी सांगितले. फिरत असताना बापूजींनी डोळेसुद्धा मिटून ठेवले होते. बापूजींना थकवा तर भरपूरच आहे. खूप थंडी असल्यामुळे आज मालीश थोडी उशिरा केली.

एका लेखात बापूजींनी लिहिले,

> "जिला मी अहिंसा समजत होतो वास्तवात ती खरी अहिंसा नव्हती. तीतर अहिंसेचे नाव धारण केलेली शुद्ध दुर्बलता होती. हे सगळे सांगण्याचा हेतू हा आहे की अहिंसा कधीही निष्फळ असू शकत नाही, परंतु अहिंसक माणूस मात्र निष्फळ असू शकतो. परंतु मी इतक्यावरच थांबत नाही. 'जाग आली तेव्हाच सकाळ' या वाक्प्रचारानुसार झालेल्या चुका दुरुस्त करून माझा सिद्धांत पुढे नेण्यावर माझा विश्वास आहे. आणि माणूस अशा प्रकारेच पुढे जात असतो."

मला दुपारी दवाखान्यात जावे लागले. तिथून परतल्यानंतर तर मला एकाएकी ताप आला. खूप थंडी वाजून ताप आला आणि वाढून तो एका तासातच १०४ पर्यंत चढला. मला स्वतःला तर या तापाचा त्रास होत नव्हता परंतु माझा आजार पाहून बापूजी काळजीत पडल्यामुळे मात्र मला फार वाईट वाटत होते.

पट्टणी साहेब आले होते. बापूजींनी त्यांना रोज यायला सांगितलेले असल्यामुळे ते आले होते. इथे ज्या अमानुष हिंसेचा स्फोट झाला आहे त्यासंबंधी सियामच्या थॅनट रोमनबरोबर चर्चा झाली. बापूजींचे त्यांनी अभिनंदनसुद्धा केले. ते म्हणाले की हिंदुस्थान तुमच्या मेहनतीमुळे स्वतंत्र झाला आहे. त्याचाच परिणाम प्रत्येक प्रदेशावर पडला आहे आणि यामुळे सर्वांमध्ये स्वतंत्र होण्याची आकांक्षा जागृत झाली आहे. बापूजी म्हणाले, "आमची अहिंसा हा निष्क्रिय प्रतिकार आहे हे जर मला आधीच माहीत असते तर कदाचित असा परिणाम झाला नसता. आज या राजधानीच्या शहरात लोक केव्हाही मोकळेपणाने हिंडूफिरू शकत नाहीत, त्यांना आपल्याच देशबांधवांची भीती वाटते. असे असताना आमचा देश स्वतंत्र देशांच्या मालिकेत आला आहे असे मी कसे म्हणू शकतो? अर्थात दोष कोणाचा आहे यात मी तुम्हाला पाडू इच्छित नाही. परंतु इतके मात्र निश्चित की याकरिता विदेशी सत्ता कारणीभूत आहेत इतके सांगतल्याशिवाय मी राहू शकत नाही."

ते गेल्यानंतर ग्यानी कर्तारसिंग, सरदार दिलीपसिंगजी आले. त्यांनी पंजाब आणि काश्मीरच्या बातम्या सांगितल्या. अजूनही हे भाग धगधगत्या आगीसारखे वाटतात. हे दंगे कुठे आणि कसे भडकतील हे सांगता येणेच अशक्य आहे.

प्रार्थनासभेत सर्वात आधी बापूजींनी ख्रिश्चन बंधूंचे नवीन वर्षानिमित्त अभिनंदन केले. आजची प्रार्थनासभासुद्धा प्रमाणात खूप मोठी होती.

बापूजी म्हणाले,

"ख्रिस्ती वर्षाचा आज पहिला दिवस आहे. यामुळे मी सर्वांचे नूतन वर्षाभिनंदन करतो.

"बहिणीची बसायची व्यवस्था करण्यात ७-८ मिनिट गेले. याचा अर्थ करोडो मिनिट वाया गेले. बहिणींना नेहमी सोयीस्कर जागा मिळावी असा रीतीरिवाज आपल्या देशात नाही. परंतु इतर देशांमध्ये आहे. ज्या देशात स्त्रियांचा सन्मान मिळत असतो ते देश गौरवशाली असतात. जिथे जिथे स्त्रियांची पूजा होते तिथे तिथे देवांचा वास असतो असे आपल्या शास्त्रातसुद्धा आहे.

"लोकांनी इथे राजकारणाच्या हेतूने येऊ नये. प्रार्थना ही तर आत्म्याचे अन्न आहे. ज्याप्रमाणे अन्नाशिवाय शरीर दुर्बल होऊ लागते त्याचप्रमाणे प्रार्थनेशिवाय आत्मा दुर्बल होऊ लागतो, दिवसेंदिवस आपण असंस्कारी होत जातो.

"आज तर मला तुमच्याशी हरिजनांविषयी बोलायचे आहे. संयुक्त प्रांतात नुकताच एक हरिजन परिषद भरवण्यात आली होती. त्यात एका पुढाऱ्याने घाणेरडे न राहण्याकरिता आणि व्यसनांचा त्याग करण्याकरिता सांगितले. तेव्हा एक हरिजन या सभेत धैर्याने उठला आणि म्हणाला, "आम्ही नागडेउघडे फिरत असू, पण आम्ही घाणेरडे राहत नाही". दारू तर जहरापेक्षाही वाईट आहे. गरीब लोक जेव्हा खूप मजुरी करून घरी येतात तेव्हा ते थकलेभागलेले असतात. ते विसरण्याकरिता तसेच घरी गरिबीमुळे जे दुःख दिसत असते ते पाहू शकत नसल्यामुळे ते सर्व विसरण्याकरिता हे लोक दारू पीत असतात. दारू प्याल्यामुळे शरीराची आणि आत्म्याची असीम हानी होते. दुकानदारांनी दारूची दुकाने बंद करून या गरिबांकरिता कमी किंमतीची खाद्यपदार्थाची दुकाने लावावी. आणि त्यांनी अशा साहित्याचा विकास करावा की ज्यामुळे काही तरी नवीन माहिती मिळेल. एकीकडे अशा व्यसनात पैशांचा नाश होतो आणि दुसरीकडे घाणेरड्या सिनेमाकरिता लोक पैसे खर्च करतात. मी असे पाहिले आहे की गावकरी शेतीत मजुरी करतात, आणि उत्पन्न झालेले पीक जेव्हा ते शहरात विकायला

नेतात तेव्हा ते विकल्यानंतर सिनेमा पाहिल्याशिवाय घरी परत जात नाहीत. माझी खात्री आहे की आपण जर असे करू तर आपण शरीराचे आणि मनाचे आरोग्य राखू शकणार नाही. काँग्रेसच्या घटनेनुसार तर १९२० पासूनच दारुबंदीची चळवळ सुरू झाली होती. आणि आता तर काँग्रेसचे सरकार स्थापन आले आहे. यामुळे काँग्रेसने जनतेला जी जी आश्वासने दिली असतील त्यांच्याकडे आणि जे जे सिद्धांत आपल्या घटनेविरोधी असतील त्यांच्याकडे आपण विशेष लक्ष दिले पाहिजे. आणि अशा अपवित्र अबकारी वस्तुंच्या आयातीचा कायमचा त्याग केला पाहिजे. तुम्हांला जर माझ्या तुतारीचा आवाज ऐकू येत असेल तर तो तुम्ही तो ऐकावा अशी माझी विनंती आहे. यामुळे ना तर सरकारचे नुकसान होईल, ना जनतेचे. दोघेही परस्परांचा लाभ करतील. आणि जनतेला संस्कारी करण्याकरिता सरकारला काही तोटा जरी सहन करावा लागत असेल तर स्वातंत्र्याच्या या युगात जनतेच्या सरकारने तो सहन केला पाहिजे असे माझे मत आहे."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. मी तर प्रकृतीच्या कारणामुळे फिरायला गेले नव्हते. यामुळे फिरत असताना बापूजींजवळ कोण होते हे मला माहीत नाही.

फिरल्यानंतर बापूजींनी भाषण लिहिले. . . . शी आपसात असीम मतभेद सुरू आहेत. त्याचा चोहोकडे परिणाम होतो आहे. जनतेवर तर होईलच. आणि असेच चालले तर बापूजींचे मत आहे की शासनात मोठीच दरी निर्माण होील आणि संपूर्ण इमारत कोसळेल आणि तिचा चुरा चुरा होईल. बापूजींच्या हातातच हा डाव आहे. आणि याबाबतीत बापूजींच्या प्रयत्नांना जर यश आले नाही तर याला काही वेगळेच रूप येईल,

. . . शी एक तास चर्चा केली. काश्मीरसंबंधात बापूजी अस्वस्थ आहेत. . . . ला बापूजींनी लांब पाच पानांचे पत्र लिहिले. ते याप्रमाणे आहे -

"आंधळपणाने केलेले अनुकरण म्हणजे मेंदूला झालेला पक्षाघात. जी गोष्ट वाईट आहे तिला जशास तसेने आपण कसे उत्तर देऊ शकतो व तिची नक्कल कशी करू शकतो? यामुळे भारतात किती मुसलमान मारले गेले आणि पाकिस्तानमध्ये किती हिंदू मारले गेले या चर्चेतून आपण आपला संकुचितपणा तेवढा व्यक्त करतो. ईश्वर सर्वांना सद्बुद्धी देवो. आज मी केवळ या प्रार्थनेमुळे जगतो आहे."

साडेनऊ वाजता बापूजी उठले. कसरत करून अंथरुणावर पडण्याआधी मला माझा ताप मोजायला लावला. १०१.६ होता. या सर्व गोष्टी कळाव्या म्हणून मी अंथरुणावर जाऊन झोपले नव्हते. यामुळे बापूजी नाराज झाले. "असा तर एक महादेवच होता. अंथरुणावर पडायची जर इच्छा नसेल तर तापसुद्धा यायला नको ना? आणि जर ताप आलाच तर लगेच जाऊन अंथरुणात पडणे माणसाचा धर्म होतो. असे असूनही तू जर हा लोभ केला नाही तर कदाचित मी तुला माफ करू शकेन. परंतु ईश्वर कधीही माफ करणार नाही. त्याच्याजवळ तर न्याय करण्याचा अचूक काटा पडला आहे. तुझे शरीर असे असताना तू जर हा लोभ ठेवला तर तुला इतका काही अशक्तपणा येईल की तुला याची व्याजासह परतफेड करावी लागेल (खूप दिवस अंथरुणावर पडून राहावे लागेल). महादेवसुद्धा असाच अंथरुणावर पडला होता आणि तिथेच तो कायमचा झोपला."

बापूजींनी मला पाय दाबू दिले नाही. एवढ्यात बापूजींना महादेवकाकांची खूपच आठवण येते आहे. . . . मध्ये जो वाद सुरू झाला आहे त्यात महादेवची उणीव बापूजींना खूप जाणवते. ते जर असते तर त्यांनी अशी परिस्थितीच निर्माण होऊ दिली नसती. जवळपास दहाएक वाजता बापूजी झोपले. थंडी खूपच जास्त आहे. . . . च्या झोपण्याविषयीसुद्धा माझ्याशी बोलले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२ - १ - '४८

साडेतीन वाजता नेहमीप्रमाणे प्रार्थना. दातण करत असतानाच मला ताप मोजायला सांगितले. बापूजींनासुद्धा सर्दीसारखे झाले आहे. माझी सर्दी त्यांना लागू नये म्हणून मी तर बापूजींपासून दूरच राहत असते. तरीही आजकाल एकामागून एकावर - सर्वांवर परिणाम होऊ लागला आहे. थंडीसुद्धा असीम आहे. सुशीलाबहेनचा घसा तर पूर्णपणे बसला आहे. चांदबहेनसुद्धा अथरुण धरूनच आहे. इतक्यात तर आम्हा सर्वांच्या प्रकृतीचे असेच सुरू आहे. परंतु बापूजी तर स्पष्टपणे सांगतात की "आपण जर अंतःकरणापासून रामनाम घेत असू आणि निसर्नियमांचे पूर्णपणे पालन करत असू तर बाहेरच्या हवामानाचा आपल्या शरीरावर परिणाम व्हायलाच नको. ऋतूसुद्धा निसर्गाने आपल्या हिताकरिताच तयार केले आहेत. निसर्गाची कृपा आहे की तो पृथ्वीवरील सर्व प्राण्यांच्या हिताकरिताच सर्व काही निर्माण करत असतो. परंतु आपण त्याला ओळखू शकत नाही आणि म्हणून आपण त्याला दोष देत बसतो." मला अजूनही १०० ताप आहे. बापूजींना विषमज्वराची भीती वाटते. मीराबहेनच्या सेवेत असल्यामुळे तर कदाचित असे झाले नसेल? परंतु मला मात्र असे वाटत नव्हते. प्रार्थनेतही मला बसू दिले नाही. पडल्यापडल्या ऐक असे म्हणाले.

प्रार्थनेनंतर मी तर बापूजींजवळच झोपून गेले. असे असूनही बापूजींचे काय सुरू आहे हे मला काहीही कळत नव्हते. परंतु बापूजींनी नेहमीप्रमाणे टपाल पाहिला आणि लिहिला.

> "आज माणूस माणसाला घाबरतो आहे, शेजाऱ्याला घाबरतो आहे. राष्ट्रीय प्रश्नांची चर्चा मी कसा करू? आपण स्वतःच जाणूनबुजून दुःखी होतो, स्वतःचीच फसवणूक करतो, कोणी कोणाचेही वाईट करूच शकत नाही. माणसाच्या दुःखाचे कारण माणूसच आहे असेच माझे मत आहे. हे राजधानीचे शहर असूनही मृतांचे शहर झाले आहे असे वाटते. कोणाचाच कोणावर विश्वास नाही. जी काही शांतता आहे ती पोलिसांच्या भीतीने आहे. अहिंसेने मिळवलेल्या स्वातंत्र्याचे रक्षण हिंसेने करता येईल असे का मानले जात आहे? मी माझ्या अंतःकरणाचा शोध घेतो आहे. मला तिथे निराशा दिसते. हाही दिवस मी पाहिला पाहिजे अशीच कदाचित ईश्वराची इच्छा असेल. आता मी करायला वा मरायला पाहिजे. स्थितप्रज्ञाच्या अवस्थेत

पोहोचण्याकरिता मला अजून किती सहन करावे लागेल हे पाहू या. अखेरीस ईश्वराने मला जागे केले याकरिता मी त्याचा आभारी आहे. . .

"मनूचा आजार गंभीर आहे. पोरीत प्रचंड उर्जा आहे परंतु ती शरीराने थकली आहे. मला मान्य आहे की मी तिच्याशी कठोरपणे वागलो आणि हा त्याचा परिणाम आहे. अखेरीस तिचे गरीब बिचारे शरीर किती सहन करील? मी तिच्याकडून भरपूर शारीरिक कष्ट घेतले आहेत आणि मानसिक कामसुद्धा. परंतु तिने काहीही गमावले नाही याचे मला समाधान आहे. मी तिला चांगल्या प्रकारे प्रशिक्षित केले आहे. मी जर तिची प्रकृती पूर्ववत करू शकलो तर ! ती तिच्या प्रकृतीबद्दल निष्काळजी आहे. माझी सेवा करताना ती सर्व काही विसरते. तू काळजी करू नकोस. मला तिच्या प्रकृतीची भरपूर काळजी आहे. विषमज्वराची शंका आहे.

तुम्ही सर्व कसे आहा? बिहारचे प्रकरण कठीण आहे परंतु दिल्लीच्या परिस्थितीवर देशाची परिस्थिती अवलंबून आहे. . . ."

* * *

". . . ला,

"ज्ञानाशिवाय केलेले कर्म व्यर्थ असते असे जे गीतेत सांगितले आहे ते बरोबर आहे. मला अनेकदा याचा अनुभव आला आहे आणि इतरांनाही असाच अनुभव आला असावा. कर्म जर ज्ञानमय झाले तर त्यात भक्ती आपोआपच येते. असे करण्याकरिता माणसाला नेहमीच सत्याच्या बाजूने भूमिका घ्यावी लागत असते. सत्याचे ज्ञान झाले तर अजून काही करायचे शिल्लक राहत नाही. आरशात पाहिल्यानंतर आपल्या चेहऱ्यावर लहानसा जरी डाग असला तरी तो आपल्याला दिसतो त्याचप्रमाणे इतरांवर टीका करताना आपण आत्मनिरीक्षण केले पाहिजे. सर्वगुणसंपन्न असल्याचा दावा क्वचितच कोणी करू शकेल. यामुळे माझा सल्ला आहे की ...इतरांचे दोष पाहण्याआधी ...स्वतःचे दोष पाहावे. माझा हा सल्ला पटत असेल तरच तो पाळ, नाही तर फेकून दे."

* * *

दुसरे पत्र माझ्या मोठ्या बापूजींना -

"मला अग्निकुंडात पडल्यासारखे वाटते. काय होईल हे सांगणे कठीण आहे. शक्य आहे की लवकरच कळेल. मनू पूर्णपणे थकून गेली आहे. काळजी वाटावी अशा अवस्थेत तीची प्रकृती आता येऊन पोहोचली आहे. दोष जितका तिचा आहे तितकाच माझा आहे. मी तिला सतत अठरा तास काम करायला लावले. आणि माझ्यामुळे तिच्यावर तितकाच किंवा कदाचित जास्त मानसिक ताण आला. अखेरीस ती सोळासतरा वर्षाची कोवळी पोरगी आहे. असे असतानाही तिच्या अंतःकरणावर जर रामनाम कोरले गेले असेल तर तिला शारीरिक थकवा जाणवणार नाही. परंतु याचे मोजमाप मी कसा करू शकतो? जोपर्यंत तिच्या प्रकृतीत सुधारणा होत नाही तोपर्यंत माझ्याकरिता ती काळजीचा विषय राहील. या यज्ञात तिची भूमिका काही दुर्लक्ष करण्यासारखी नाही. माझ्याकडे अनेक मुली येतात. परंतु मनूच्या वयाचा विचार करता ती इतर सर्वांच्या पुढे आहे. आणि मी तिला बोलावले नसते तर तिच्यावर अन्याय केल्याची अपराधाची बोचणी मला लागून राहिली असती. तिची प्रकृती पूर्ववत व्हावी हीच आता माझी एकमेव इच्छा आहे.

"मला इथे किती दिवस राहावे लागेल हे मी सांगू शकत नाही. मी करायाला पाहिजे वा मरायला पाहिजे. तिसरा कोणताही मार्ग नाही.

"तुझी प्रकृती कशी आहे? तू आहाराचे प्रयोग करत नसशील अशी आशा आहे. बाकी मनू लिहील. इतक्या मानसिक ताणानंतरही माझी प्रकृती चांगली आहे ही ईश्वरी कृपा आहे.

बापूचे आशीर्वाद,"

* * *

बापूजींनी लिहिलेली पत्रे मला नकल करण्याकरिता दिली आणि ते फिरायला गेले. मला तर झोपून राहायलाच सांगितले.

. . . दिवसभर ताप राहिला. खूप अशक्तपणा वाटतो. बापूजींजवळ कोणकोण येऊन गेले याची माहिती ठेवू शकले नाही. रात्री चांदबहेनचे लग्न करण्याविषयी गोष्टी सुरू होत्या. जोपर्यंत हिंदू-मुसलमान ऐक्याची समस्या सुटत नाही तोपर्यंत कोणाच्यागी लग्नात पडायचे नाही. परंतु देप्रकाशभाई (नाय्यर)

आणि चांदबहेनचा आग्रह होता. तसेच हे ऐक्य होईपर्यंत कोणी लग्नसुद्धा करू नये. बापूजींचासुद्धा हा कौतुकास्पद गुण आहे. कोणाच्या लग्नात - लग्न तोडण्यात - कोणा निर्वासिताच्या जीवनात - तर केव्हा पंडितजी-सरदारदादांच्या राजकीय प्रश्नाच्या समस्या तसेच माझ्यासारखीच्या आजारीच्या समस्येत ते अगदी मन लावून भाग घेतात आणि त्या समस्येवरील तोडगा शोधून काढतात.

देवभाई आणि चांदबहेनला समजावण्याकरिताही त्यांना खूप वेळ द्यावा लागतो. यामुळे बापूजी आमचे नाहीत असे वाटतच नाही. खरे पाहिले तर बापूजी आमचेच आहेत असे सर्वांनाच वाटत असते.

सुशीलाबहेन तर अमेरिकेत जाण्याच्या तयारीत अव्याहत गुतलेल्या असतात. त्यांच्या प्रश्नातसुद्धा बापूजी इतक्याच चिकाटीने लक्ष घालत असतात.

आज तर पावसाचा एकसारखा वर्षाव सुरू आहे. दिवस फारच वाईट गेला. सायंकाळी कमलनयनजी आले होते. त्यांनी बापूजींना खूप हसवले. पावसामुळे प्रार्थनेकरिता जाताना बापूजींनी नोआखालीवाली हॅट घातली होती. श्रोत्यांना याचे आश्चर्यसुद्धा वाटले होते.

प्रार्थनासभेत बापूजी म्हणाले,

"हा टोप पाहून तुम्हा सर्वांना नवल वाटत असेल. परंतु माझ्याकरिता हा टोप मूल्यवान गोष्ट आहे. एक तर हा टोप नोआखालीत मला एका ग्रामीण मुसलमानाने भेट दिला आहे. आणि दुसरी गोष्ट म्हणजे या टोपामुळे छत्रीची गरज राहत नाही. आणि शिवाय छत्रीपेक्षा हा खूप स्वस्त आहे. आणि ही गावकऱ्यांची हातकारागिरी आहे. अशा प्रकारे आपण गावांमधून अनेक उपयोगी गोष्टी निर्माण करू शकतो.

"आज तुम्ही जे भजन ऐकले (दर्शन देना प्राण पियारे) ते भजन सकाळी गायचे असते. भक्त दर्शन देण्याकरिता देवाला किती कळकळीने विनंती करतो आहे ! अशा प्रकारे आर्जव करणाऱ्या दुःखी शरणार्थी बंधूंनाही आपण जर यथाशक्ती मदत केली तर? ईश्वर कधीही झोपत नसतो. तो तर अहर्निश जागाच असतो.

"एवढ्यातच अलाहाबादहून मला एक पत्र आले आहे. ते भाई स्पष्टपणे लिहितात की काही थोड्याशा मुसलमानांना वगळले तर भाग्यानेच असा कोणी मुसलमान असेल की जो हिंदुस्थानशी पूर्णपणे एकनिष्ठ असेल. आणि जर युद्ध जाहीर झाले तर एखादा लहानसा

(मुसलमान) मुलगासुद्धा (हिंदुस्थानशी) प्रामाणिक राहणार नाही. यामुळे शक्य तोवर मुसलमानांना जाऊ दिलेच पाहिजे.

"या भाईंना मला सांगायचे आहे की आपल्या मनात जर अशीच भावना असेल तर आपले स्वराज्य निश्चितच धोक्यात आहे. जोपर्यंत एखाद्यावर आरोप सिद्ध होत नाही तोपर्यंत त्याच्यावर आरोप करणे ही माणूसकी नाही. थोड्या वेळेपूर्वीच लखनौमध्ये एक लाख मुसलमान गोळा झाले होते आणि आमचा जीव जरी धोक्यात आला तरी आम्ही देशाशी प्रामाणिक राहू अशी घोषणा त्यांनी केली होती. अशा गोष्टींवर विश्वास ठेवणे एखाद्या राष्ट्राला शोभत असते काय? परंतु कल्पना करा की असा एखादा अप्रामाणिक निघालाच तर त्याला गोळी घालू शकता. ही पद्धत माझी नाही हेसुद्धा मी इथे स्पष्ट करू इच्छितो.

"अशी भावना जर कायम राहिली तर दोन्ही देशांचे हे भाग कायमचे वेगवेगळे राहील. आणि कल्पना करा की दोन्ही देशात जर लढाई जाहीर झाली तर माझी तर जिवंत राहण्याची थोडीशीही इच्छा नसेल. परंतु अजूनही सत्य आणि अहिंसेवर विश्वास असलेले मूठभर का होईना जोपर्यंत लोक पडलेले आहेत तोपर्यंत युद्ध जाहीर होणार नाही अशी माझी श्रद्धा आहे."

प्रार्थनेनंतर पंडितजी आले. काश्मीरचा प्रश्न इतका काही उग्र झाला आहे की कदाचित काश्मीरमुळे लढाई होईल. दुसरीकडे देशी राज्यांनीसुद्धा संघराज्यात लवकर सामील व्हायला पाहिजे. देशी राजे काय करतील हे सांगता येऊ शकत नाही. हैदराबाद, जुनागढ आणि काश्मीर या तीन तुकड्यांनी जर काही भयानक घटना घडवली तर नवल वाटायला नको.

सध्या तरी शेखसाहेब तर अतिशय शौर्याने काम करत आहेत. परंतु सरदारदादांच्या मनात त्यांच्याबद्दल बऱ्याच शंका आहेत आहेत याबद्दल शंका नाही. पंडितजींचा शेखसाहेबांवर अगाध विश्वास आहे. आणि काँग्रेसमध्येसुद्धा दररोज एकमेकांवर असे आक्षेप घेणे सुरू आहे की ज्यामुळे माणूस दुःखी होईल. अखेरीस विषाचे हे सर्व घोट तर बापूजींनाच प्यावे लागतात.

रात्री दहाएक वाजता बापूजी झोपले. झोपण्यापूर्वी माझ्याशी गोष्टी केल्या. बापूजी कनूभाईंना यासंबंधात लिहिणार आहेत. परंतु . . . ला आवडत नाही. एवढ्यात वातावरणात चांगलीच उदासीनता भरलेली आहे. बापूजी खूप चिडलेले आहेत. . . . या लोकांमुळे त्याना खूप त्रास होतो आहे.

मला पाहिल्यानंतर बापूजी झोपले. गरम पाणी खूप प्यायला सांगितले आहे. मला म्हणाले, "तुझ्या शरीराचा अशक्तपणा मला खूप अस्वस्थ करतो आहे. परंतु शक्य तितके पाणी पी, आराम कर आणि झोप जरी येत नसेल तरी डोळे बंद करून रामाचे नाव घेत पडून राहा. हा तुझा धर्म आहे, कर्तव्य आहे." मला तर रडूच आले - एक तर या सर्वांची सेवा घ्यायची. त्यांचे उपकाराचे कर्ज वाढत असल्याबद्दल मनातून खूप वाईट वाटते. अेसेही माझ्यावर उपकारांवर उपाकारं असे कर्ज चढतेच आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

३ - १ - '४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेआधी प्रकृती पाहिली. आता तर कदाचित मुदती तापच असेल असेच वाटू लागले आहे. उठायलाबसायला तर बापूजींनी मनाईच केली आहे. तरीही मी थोडी उठतेबसतेच. रात्री दोन वाजता आभावहिनी बापूजींवळ झोपलेल्या असतानाही बापूजींनी मलाच पाणी मागितले. अशा प्रकारे कळत नाही की कोणत्या जन्माचे बापूजींचे ऋण फेडते आहे?

नोआखालीहून . . . चे पत्र आले आहे. बापूजी म्हणाले, "माणसावर जेव्हा जबाबदारी येते, तेव्हाच त्याला प्रत्येक गोष्टीची खरी कल्पना येते. मी सध्या जितका अभ्यास करतो आहे, तितका संपूर्ण आयुष्यात कधीही केला नाही. कदाचित हा सगळा वेळ माझ्या संपणाऱ्या आयुष्याचाच एक भाग असू शकेल, नाही काय? ईश्वर मला मी कल्पनाही केली नव्हती असे उघड उघड दर्शन घडवतो आहे. आणि मला सांगतो आहे की तू येतो आहेस . . . म्हणून ही सावधगिरीची लीला आहे."

"तू पूर्णपणे चांगली व्हायला पाहिजे. तरच मला शांतता लाभेल. तू तुझी दैनंदिनी दोन दिवसांपासून दिलेली नाही. आज देशील. तूच एक खरी आहेस . . . नाही तर भलेभले लोक वेगळ्याच प्रकारे वागत आहेत. या सर्वांकडे माझे लक्ष नाही असे मुळीच नाही. परंतु कालच मी प्रार्थनेत सांगितले होते ना की मी तर विश्वास ठेवणारा माणूस आहे. विश्वास ठेवून माणूस काहीच गमावत नसतो. उलट माणूस आपले कर्तव्य पार पाडू शकतो. याचेच नाव खरे जीवन आहे."

आज दुपारी मुळीच ताप नव्हता. बापूजी खूप खुश झाले. आणि आता प्रकृतीची खूप काळजी घे असे सांगितले.

आजचा टपाल -

"अजून मी रामाच्या जवळपासही पोहोचलो नाही. तिथे पोहोचण्याचा प्रयत्न आहे. जर तिथे पोहोचलो तर माझ्या अहिंसेचा प्रकाश चोहोकडे पसरेल.

"येथील परिस्थिती भयानक आहे. काश्मीरबद्दल जे करता येईल ते माऊंटबॅटन करत आहेत. काहीही घडले तरी बंगाल आणि बिहारने या आगडोबापासून दूर राहिले पाहिजे. तिथे

थोड्याश्या जरी दंगली झाल्या तरी मी तुम्हांला जिवंत आढळणार नाही. प्रत्येकापर्यंत माझी ही गोष्ट पोहोचवून दे."

सकाळी राजेंद्रबाबूंशी गोष्टी करतानाही बापूजी खूप व्यथित झाले होते. इकडे . . . मधील संबंध बिघडत चालले आहेत. त्याचा परिणाम इतका वाईट आहे की पाकिस्तान जणू काय या परिणामांची वाटच पाहत होता ! माऊंटबॅटन जरी प्रयत्नशील असले तरी अंतर्गत बाबतीत त्यांना इतका अधिक रस का घेऊ द्यायला पाहिजे?

आणि आता तर या संस्थेच्या भिंतीतील एक-एक वीटही निखळून पडते आहे आणि ती निष्प्रभ होत चालली आहे. बापूजी म्हणाले, "जर मी दिल्ली सोडू शकलो, तर संपूर्ण हिंदुस्थानचा प्रवास करण्याचे धाडस करीन आणि आपण आधी दिलेली वचने आठवून त्यांना योग्य स्वरूप देण्याचा प्रयत्न करीन. अथवा, कबूल करीन की राज्य करणे ही एक गोष्ट आहे आणि भाषणे देणे ही वेगळी. आणि अशा बाबतीत मन दुःखी होतच असते. असे जरी असले तरी ही गोष्ट जाहीर करून आपण देशाची अधिक चांगली सेवा करू आणि यातच देशहित आहे. काश्मीरची समस्या दिवसेंदिवस गंभीर रूप धारण करते आहे आणि जर आपण यु.नो.त गेलो तर आपण चुरगळले गेलो असेच समजा. सर्वात पहिली गोष्ट तर जर तुझी तब्येत काम करील तर देशाच्या कानाकोपऱ्यात प्रवास करून सरकारचा दृष्टिकोन तटस्थ भावनेने जनतेला समजावून सांगणे तुझे कर्तव्य आहे. काँग्रेसप्रमुखाचे स्थान जर 'तटस्थपणाचे' असेल तर ही गोष्ट सरकार आणि जनता या दोघांकरिताही ही गोष्ट लाभदायक होईल अशी माझी मान्यता आहे."

फार थंडी असल्यामुळे बापूजी मालीशकरिता उशिरा गेले. टपाल पाहिला. . . . खूप गरमागरम पत्र आहे. बापूजींनी त्यांना लिहिले -

"मला तुझे रागाने भरलेले पत्र मिळाले. तू इतकी संतापशील हे कसे सहन करता येईल? लोखंड जास्त तापते तेव्हा त्यातून ठिणग्या निघू लागतात. परंतु त्याला घणाने कितीही मारले तरी घण तापून लाल होत नाही. तू जर अशा घणाप्रमाणे होशील तर सर्व काही तुझ्या मनाप्रमाणे होईल. परंतु जेव्हा समुद्रालाच आग लागते तेव्हा कोणाला काय म्हणता येऊ शकते?"

* * *

"येथून बाहेर पडता येईल असे मला वाटत नाही. मी करायला वा मरायला पाहिजे. तुम्हांला वाटत असेल की दिल्लीत शांतता आहे. परंतु ही शांतता अंतःकरणातील शांतता नाही. ती शस्त्रांनी लादलेली आहे. मी आतल्या आवाजाची वाट पाहतो आहे. इथे तीन वा चार मुली माझी सेवा करत आहेत. मी राजवाड्यासारख्या बिर्ला भवनमध्ये राहतो आहे. परंतु मला किंचितही विसावा नाही. सध्या तरी माझ्या सेवेकरिता तुला बोलावण्याची माझी इच्छा नाही. अर्थातच माझ्या परवानगीने मुली केव्हाही जाऊ शकतात. या यज्ञात केवळ मनूचा सहभाग आहे. इतर मुली इथे केवळ योगायोगाने आहेत. त्या जशा आल्या तशा जाऊ शकतात. या यज्ञातील मनूच्या सेवेला विशेष महत्त्व आहे. ती आपल्या शरीराकडे खूपच दुर्लक्ष करते आहे.

"तुम्ही सर्व कसे आहा? खादी प्रतिष्ठानचे काम कसे सुरू आहे? आश्रमात किती लोक आहेत? आश्रमाने बाहेरच्या मदतीवर अवलंबून राहू नये. सेवाग्रामने एक तर आपल्या पायावर उभे राहिले पाहिजे वा तो आश्रम बंद केला पाहिजे या निर्णयावर मी आलो आहे. आश्रम एखाद्या पांजरपोळासारखा झाला आहे."

* * *

. . . जो निश्चय करायचा असेल तो खूप विचारपूर्वक केला पाहिजे. भर सागरात गेल्यानंतर जर वेगळा विचार केला तर त्याचा एकच परिणाम होईल आणि तो म्हणजे मृत्यू.

* * *

बापूजींची अनेक पत्रे तर साडेतीन ओळींचीच असतात. परंतु काही अतिशय काव्यमय असतात.

मालीश आणि आंघोळीत बापूजींचा एक तास गेला. बापूजी आंघोळ करत असतानाच मी त्यांची हजामत केली. मला म्हणाले, "मी आता जर काही वेगळ्या प्रकारचे जीवन जगायला सुरुवात केली तर त्याचे नवल वाटायला नको. या सर्वांमध्ये तू तर असशीलच, परंतु इतर इथे असावे अशी माझी इच्छा नाही. एकेक करता सर्व एक वा दुसरे निमित्त करून परतत आहेत. हे सर्व मला आवडत नाही. . . . हेसुद्धा . . . ला विचारपूर्वक लिहून टाकायला पाहिजे. परंतु ते स्वतःच्या विचारावर स्थिर नाहीत. आणि सुटका करून घेत आहेत. जर मी इथेच मेलो तर दुसरे काही करायला शिल्लक राहणार नाही. परंतु

थोडीशी जरी शांतता स्थापित झाली तरी ती माझ्या नवजीवनाची सुरुवात होईल. आणि या वेळेची कसोटी अजूनच विपत्तीपूर्ण असेल. माझा आतला आवाज ऐकायला कान लावून बसलो आहे. हुकुमाची वाट पाहतो आहे. आभा, सुशीला तर आपली थोडीशीही सुटका करून घेतील अशा नाहीत आणि या थंडीगरमीशीही त्यांचे काही घेणेदेणे नाही. आणि आतापर्यंत जे बंधुभगिनी तुझ्यावर तुटून पडत होते, तुझ्यासारख्या १६ - १७ वर्षाच्या पोरीवर अशक्यप्राय आणि नको ते आक्षेप घेत होते तेव्हाच खरे म्हणजे त्यांनी तुझी पूजा करायला पाहिजे होती. आणि माझ्यातील दांभिकपणा दाखवणारे स्वतःच स्वतःच्या लोकांना घेऊन दूर निघून गेले. अहिंसा आणि प्रेमानेच दांभिकांना दूर करता येते आणि सर्वांनी यासंबंधात आत्मनिरीक्षण केले केले तर या लोकांनी जगाची फार मोठी सेवा केली असे म्हणायला पाहिजे. आणि जर माझा मृत्यू झाला तर माझ्या रोमारोमात किडे खदखदावे. इतकी कठोर शिक्षा तर ईश्वराने मला केलीच पाहिजे. अथवा मी जर तुझी पवित्र आणि खरी आई असेन, तोंडाने रामनामाचा जप करताकरता आणि अगदी स्वाभाविकपणे तुझ्याशी गोष्टी करताकरता तुझ्या मांडीवर मी झोपून जाईन. परंतु तू आजारी असतेस यामुळे मी खूप व्यथित होत असतो. एक गोष्ट खरी आहे की तू तुझ्या शक्तीपलीकडे टिकाव धरू शकतेस. तू साधी, सरळ आणि भोळी आहेस. यामुळे ईश्वर तुला इतका धीर देत असतो. परंतु दिल्लीची परिस्थिती दिवसेंदिवस चिघळत चालली आहे. मंत्रिमंडळाचा एकसूर नाही. या सर्व गोष्टी तुला इतक्याकरिता सांगतो आहे की आता देहाने कदाचित मी तुझ्याजवळ नसेनही. आत्म्याने तर मी आहेच. नंतर तुला त्रास न होवो. तू प्रकृतीने अगदी अशक्त झाली आहेस याची मला अपार काळजी आहे. हे समजून घेऊ शकत असशील तर समजावून सांगण्याचा माझा प्रयत्न आहे. . . . आजच्या गोष्टी एका कागदावर लिहून तू मला देशील. मी दुरुस्ती करून तो कागद तुला परत देईन. यामुळे तू तो तुझ्या भाईला (मनुबहेन वडिलांना भाई म्हणत असत.) पाठवू शकशील. एवढ्यात तुझी नोंदवहीसुद्धा मी नियमितपणे पाहू शकलो नाही हे मला पसंत नाही."

हे सर्व ऐकून माझ्या डोळ्यातून पाण्याच्या धाराच वाहू लागल्या. बापूजी मला अतिशय प्रेमाने थोपटून म्हणाले, "असे वाईट वाटून घेऊन चालणार नाही." मी विचारले, "म्हणजे तुमचा उपवास करायचा विचार आहे?"

बापूजी - "अजून कोणत्याही निर्णयावर आलेलो नाही. परंतु निर्णय तर घ्यावाच लागेल. तू घाबरून जाऊ नये म्हणूनच आतापासून तुला तयार करायचा प्रयत्न आहे."

बापूजी आंघोळ करून बाहेर निघाले तेव्हा पंडितजी आलेले होते. त्यांनासुद्धा माझ्याशी झालेल्या गोष्टींचा थोडक्यात सार सांगितला. जेवणाच्या वेळी स्थानिक मौलाना आले. त्यांनासुद्धा बापूजी म्हणाले, "आता तुम्हा लोकांच्या धैर्याची कसोटी आहे. खुदा माझ्याकडून काय करवतो ते पाहू या?"

मी सांगितलेल्या गोष्टींची तू कोणाशीही चर्चा करू नकोस असे बापूजींनी मला सांगितलेले असल्यामुळे मी कोणालाही सांगितले नव्हते. परंतु बापूजी आमरण उपवास तर करणार नाहीत ना अशी भीती मात्र मला वाटत होती. कलकत्त्यातसुद्धा बापूजींनी असेच केले होते.

आराम केल्यानंतर राष्ट्रभाषेबद्दलच्या काही प्रश्नांचे उत्तर लिहिले. (हे प्रश्न आणि त्यांच्या उत्तराकरिता पाहा ११-१-१९४८च्या 'हरिजनबंधु'मधील 'प्रश्नोत्तरे' हा लेख.)

बाकी बापूजींचे जेवण, कताई, मालीश वगैरे सर्व नेहमीप्रमाणे चालले. दुपारच्या वेळी राजकुमारीबहेन आल्या. त्यांच्याबरोबरही काश्मीरसंबंधीच गोष्टी झाल्या. पाकिस्तान आणि हिंदुस्थानमध्ये काश्मीर प्रश्नावर युद्ध होते की काय हे कोणाला माहीत? बापूजी म्हणाले, "मी तर हे पाहायला जिवंतच राहणार नाही. स्वातंत्र्याचा परिणाम इतका भयंकर आणि करुण होईल असेच लिहिलेले असेल काय?"

आज तर बापूजींना भेटायला जे जे लोक आले त्यांच्याशी बापूजी एकच गोष्ट बोलले आणि ती म्हणजे आता दिल्लीतील माझ्या मुक्कामाचा परिणाम लोकांना लवकर दिसून आल्याशिवाय राहणार नाही. सकाळी माझ्याशीही ते हेच बोलले होते. मला तर असे वाटते की बापूजी सांप्रदायिक भांडणाकरिता कौटुंबिक (काँग्रेसच्या मोठ्या लोकात, पुढाऱ्यात असलेला अविश्वास) करुण परिस्थितीमुळे खूपच अस्वस्थ झालेले आहेत. आणि कधी उपवास सुरू करतील हे सांगवत नाही. या वेळी जर बापूजींनी उपवास केला तर बापूजींकरिता ही भयंकर गोष्ट होईल. कलकत्त्याच्या उपवासाला अजून पूर्ण सहा महिनेही झालेले नसल्यामुळे मी असे म्हणते आहे. त्या वेळी झालेला शक्तीलोप अजून भरून निघायचा आहे.

सायंकाळी भाईसाहेबांशीही मी याच गोष्टी केल्या. आजची प्रार्थना वेव्हेल कँटीनमध्ये होती. या छावणीत व्यवस्था फारच चांगली होती. छावणीमध्ये राहणारा वर्गही समंजस होता. लोक जरी दुःखी

होते तरी ते हसतमुखाने आणि बहादुरीने परिस्थितिचा सामना करत होते. आजच्या प्रार्थनासभेत बापूजी म्हणाले,

"तुमच्या छावणीत येऊन तुमच्याशी बोलायची संधी मला मिळाली हे मी माझे सद्भाग्यच समजतो. किती तरी दिवसांपासून तुमच्यामध्ये येण्याची माझी फार इच्छा होती. आज ती पूर्ण होऊ शकली. इथे हजारोच्या संख्येत जे बंधुभगिनी आपले सर्वस्व गमावून आले आहेत त्यांना मी विनंती करतो की आपल्या देशात परत आपल्याला शांतता आणि ऐक्य स्थापण्याकरिता ईश्वराने आपल्याला सन्मती द्यावी. याकरिता या पोरीने केलेल्या प्रार्थनेला तुम्ही अंतःकरणापासून प्रतिसाद द्यावा.

"माणसाजवळ हवे तितके धन आणि सुखसाधन जरी असेल परंतु अंतरीची शांतता जर नसेल तर त्याला काहीही अर्थ नसतो. सर्वच धर्मांनी सत्याला खूप महत्त्व दिले आहे. ते जर मिळाले तर माणूस कुठेही जरी असला तरी तो अपार सुख अनुभवेल. त्याला भविष्याची चिंता असणारच नाही. भवितव्य ठरवणारा एक परमेश्वरच आहे. श्री रामचंद्रजींनासुद्धा कल्पना नव्हती की त्यांना राज्यारोहणाच्या दिवशी वनवासात जावे लागेल, राजाच्या पोषाखाऐवजी वल्कले धारण करावी लागतील. परंतु रामचंद्रजी बाह्य सुखात शांतता अनुभवू शकत नव्हते. ते हृदयाची शांतता अनुभवत होते. यामुळे त्यांच्या मनाला वन आणि राजगादी हे सारखेच वाटत होते. आपणा हिंदू आणि शिखांवर, तसेच आपल्यापैकी प्रत्येकावर हे जे संकट येऊन कोसळले आहे त्यातून आपण शांततेचा शोध घेतला पाहिजे. आपण जर आपल्या जीवनात रामचंद्रजींचे उदाहरण समोर ठेवले तर या वेडाकडे आपण निश्चितच धावत गेलो नसतो.

"सर्वात आधी तर माझ्या असे लक्षात आले आहे की ज्या काही छावण्या आहेत त्या छावण्यांमध्ये या छावणीत राहणारे बंधुभगिनी अधिक व्यवस्थित आहे. मला हे दिसूनसुद्धा राहिले आहे. छावणी जीवनाचा अनुभव हा एक आनंदाचा प्रसंग आहे. मी तर छावण्यांमध्ये खूप राहिलेलो आहे, आणि त्यात कसे राहायचे याचा मी तज्ज्ञ आहे असे जर मी म्हणालो तर ते अस्थानी होणार नाही. असे असतानाही तुम्हांला इथे खूप अडीअडचणींचा सामना करावा लागतो याची मला कल्पना नाही असे नाही. तुमच्यातील अनेक लोकांनी तर उन्हाच्या झळा सहन केलेल्या नाहीत. असे असतानाही हे जे संकट तुमच्यामाथी येऊन पडले आहे त्याला

संपत्ती समजून प्राप्त परिस्थितीशी जर तुम्ही जुळवून घ्याल तर तुम्ही तुमचे सुखाचे दिवस विसरून जाल. १८८९ साली बोअर युद्ध झाले होते. तेव्हा इंग्रज ट्रान्सवाल सोडून नातालमध्ये निघून गेले होते. परंतु त्यांना कसे काम घ्यायचे हे चांगले माहीत होते. आणि ते सर्व लोक एकाच दर्जाचे असल्याप्रमाणे राहत होते. एक इंग्रज एंजिनिअर तर माझ्याबरोबर सुतारी काम करत होता. अशाच प्रकारे या छावणीत राहणाऱ्या सर्व बंधुभगिनींनी समान दर्जानुसार राहावे आणि त्यांनी या छावणीला अशी आदर्श छावणी करावी की हिंदुस्थानातीलच काय तर जगभरातील लोकांनी ही छावणी पाहायला यायला पाहिजे. आताच तुम्ही 'इशावास्य' हा श्लोक ऐकला. या मंत्राचा अर्थ 'आपल्याजवळ जे काही आहे ते सर्व ईश्वराला समर्पित करून आपल्या स्वतःकरिता खरोखर जितके आवश्यक असेल तितकेच घेतले पाहिजे' हाच आहे. आपण जर या मंत्राचे अनुसरण केले तर या छावणीतच नाही तर शरणार्थ्यांची जिथे बदनामी होत ते दिल्ली शहरही नवीन तेजाने झगमगेल. आणि दिल्लीद्वारा हा हिंदुस्थानभरात दंग्याचा जो विस्तार होऊ लागला आहे त्यातूनही आपल्याला खऱ्या सुखाचे दर्शन होईल."

प्रवचनानंतर किती तरी बंधुभगिनींनी बापूजींच्या स्वाक्षऱ्या घेतल्या. किती तरी वृद्ध स्त्रीपुरुष बापूजींच्या चरणस्पर्शाकरिता अधीर झालेले होते. या छावणीतील अन्न वगैरेसुद्धा बापूजींना दाखवले.

इतक्या सगळ्या शरणार्थ्यांच्या छावणीत बापूजी गेले होते, परंतु त्या सगळ्या छावण्यांमध्ये या छावणीत दुःखानंतरही शांतता आणि भक्ती अधिक जाणवत होती. छावणीच्या व्यवस्थापकांबद्दलसुद्धा छावणीतील लोकांना अपार आदर वाटत होता.

रस्त्यात बापूजी म्हणाले, "प्रत्येक छावणीत भक्तिभावना असलेले आणि व्यवस्थित लोक असतातच. परंतु इतक्या मोठ्या दुःखाचा अनुभव घेऊन आल्यानंतर छावणीच्या व्यवस्थापकांबद्दल लोकांच्या मनात जर समाधान नसेल तर लोक संतापत असतात. येथील व्यवस्थापकच भावनाशील आहेत. यामुळेच शरणार्थ्यांच्या दुःखातसुद्धा ते पूर्णपणे सहभागी होत आहेत. व्यवस्थापिका भगिनीसुद्धा किती साध्या होत्या ! या गोष्टींचा इतर छावण्यांमध्ये अभाव होता. या दुःखी शरणार्थ्यांकडे जात असताना संचालकांनी खूप मर्यादेने राहायला पाहिजे. इतर छावण्यामध्ये तर संचालिका भगिनींची वेषभूषा पाहूनच मी थक्क होतो. यामुळे त्यांचा तिथे प्रभावच पडत नाही."

तिथून आल्यानंतर बापूजी फिरले. नेहमीप्रमाणे पंडितजी आले. बापूजींनी प्रार्थनाप्रवचन लिहून टाकले होते. आता ९।। वाजले आहेत. थोड्याच वेळात पंडितजी उठणार आहेत. सर्वांनाच काश्मीरची समस्या भेडसावते आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

४-१-'४८

नेहमीप्रमाणे ३.३० वाजता प्रार्थना. दातण करत असताना . . . शी गोष्टी . . . च्या विषयी कनूभाईंना पत्र. आता कदाचित सर्वांना कळेल. आता इथेच फिरल्यानंतर सर्व एकत्रित झाले आहेत. यामुळे बापूजी स्वतःच या आठवड्यात निर्णय घ्यायचा विचार करत आहेत. दातण करता करता म्हणाले, "आजकाल मनोमंथन सुरू आहे. योग्य प्रकाश मिळून राहिलेला नाही. परंतु प्रकाशाच्या मार्गावर आहे असे वाटते खरे. आता तुझी प्रकृती जर थोडीशीही बिघडली नाही तर बाकी सर्वांना मी सांभाळीन. शरीरामधील ताप निघून जायलाच पाहिजे."

देवभाई आणि चांदबहेनचे वातावरण खूपच डळमळीत आहे. सुशीलाबहेन अमेरिकेत जाण्याच्या तयारीला लागलेल्या आहेत. त्यांची स्थितीसुद्धा विचित्र आहे. आजकाल बापूजी अनेकदा जे बोलतात त्यावरून असे वाटते की ते कदाचित बिरलाभवन सोडतील आणि एखाद्या मुसलमानांच्या मोहल्ल्यात राहायला जातील. आणि कदाचित एकट्यानेच राहायचा निर्णय घेतील. स्पष्ट काही कळत नाही. एकूण सर्व पाहता माझ्यावर ईश्वराची कृपाच आहे असे वाटते. ज्यांच्याबरोबर बोलत असतात (पंडितजी आणि राजेंद्रबाबूजींसारखे सहकारी) त्यांना ते असेच सांगत असतात की मी किती तरी विचार करतो आहे. त्यात केवळ एकटी मनूचीच सोबत असेल. इतर कोणाचीही आवश्यकता नाही. अखेरीस काय होते ते पाहायचे.

प्रार्थनेनंतर परीक्षितलालभाईच्या छात्रालयात हिरिजनांना प्रवेश देण्यासंबंधीचे पत्र वाचले. त्याखाली पुढील नोंद लिहिली. (पाहा ११- १- १९४८ च्या 'हरिजनबंधु'तील 'छात्रालयोमां हरिजनो' हा लेख.)

एका मुलीला -

> "मुलांनी पेन्सिलने लिहू नये. त्यांनी फौन्टनपेनही वापरू नये. बोरूच्या टाकाने लिहिल्याने अक्षर चांगले होते. तू तुझ्या आईला घरगुती कामात मदत करत असशील व दररोज अर्धा तास कताई करत असशील अशी आशा आहे. तू व्यायाम केला पाहिजे व शरीर काटक

केले पाहिजे. तुला पोळ्या व भाज्या करता येत असतील अशी आशा आहे. ते असू दे, आपण कधी भेटणार आहो ते मला सांग. आनंदात आणि मजेत राहा. बाकीचे मनू लिहील.

बापूचे आशीर्वाद"

एका भगिनीला,

"उद्या काय होईल हे कोणाला माहीत आहे? माझ्याबद्दल सर्व काही अनिश्चित आहे. परंतु मी प्रकाशाकडे जातो आहे. तुझा प्रदर दुरुस्त झालाच पाहिजे. तू मीठ बंद कर. या रोगात डाळी विषाप्रमाणे असतात. हीच गोष्ट मसाल्यासंबंधीही आहे. कटिस्नान आणि पोटावर मातीच्या लेपाच्या पट्ट्या आणि विश्रांती आवश्यक आहे. तू इथे असतीस तर मी तुला उपवास करायला लावला असता. परंतु माला खात्री आहे की जर तू हे बाह्य उपचार करशील आणि अंतःकरणपूर्वक रामनामाचा जप करशील तर तुझा हा आजार निश्चितच बरा होईल. भारतात ७५ टक्के स्त्रियांना हा विकार होत असतो. याचे मुख्य कारण या रोगाबद्दल वाटणारी लाज, रोगाबद्दलचे पूर्ण अज्ञान आणि अनैसर्गिक आहार आणि राहणी हे आहे. हा आजार किती भयानक आणि वेदनादायक असतो हे आपल्या भगिनींना माहीतच नसते असे जर मी म्हणालो तर ते चूक होणार नाही. सध्या ज्या कामात मी गुंतलो आहे त्यांतून जर मुक्त झालो तर निसर्गोपचाराच्या उपचाराने स्त्रियांचे सर्व रोग दूर करण्याचा प्रयत्न करायचा असे मी मनाशी ठरवले आहे. परंतु आज तर ही गोष्ट आकाशकुसुमासारखी आहे.

"चांद अजून पूर्णपणे दुरुस्त झालेली नाही. तिच्या शरीराच्या रोगापेक्षा मनाचा रोग मोठा आहे. आभा, मनू चांगल्या आहेत. आज सुशीला मुंबईहून येत आहे. हे मी सकाळच्या पहिल्या प्रहरी लिहीत आहे. मी जरी पत्र लिहिण्यात उशीर केला तरी तू नियमितपणे मला पत्र लिहीत जा. बाकी मनूकरिता.

बापूचे आशार्वाद"

फिरायच्या वेळी राजेंद्रबाबूजी आले. त्यांना काश्मीरचे गांभीर्य समजावून सांगितले. भाईसाहेबांनी बातमी सांगितली की काल रात्री दिल्लीत परत सांप्रदायिक आगीचा भडका झाला. मुसलमान मोहल्ल्यातील एका मुसलमानांच्या घरात स्त्रिया आणि लहान मुले घुसली. पोलिसांना

अश्रुधूर सोडावा लागला. आजच्या वर्तमानपत्रात हिंदुस्थान-पाकिस्तानच्या लढाईच्या अफवासुद्धा आहेत. काही लोक म्हणतात की यात माऊंटबॅटनचा किती हात आहे याचा विचार केला पाहिजे. आतून इंग्रजांचा हात असेल तर नवल नाही. बापू म्हणाले, "असे जेव्हा असेल तेव्हा तर कळल्याशिवाय राहणार नाही. इंग्रजांचा यात सरळ हात असेल हे मला मान्य नाही. आणि माऊंटबॅटन आपले महाराज्यपाल असल्यामुळे आपण एक प्रकारे सुरक्षित आहो." दिवसेंदिवस प्रकरण चिघळत चालले आहे. जुनागढमधील मध्यंतरकालीन सरकारची गैरव्यवस्थासुद्धा एक वेगळेच रूप धारण करते आहे. आता तर थोड्याच दिवसात भावनगर जनतेला जबाबदार सरकार सोपवणार आहे. बापूजी म्हणाले, "दिल्ली सोडली तर राजांचा घोडा हसतखेळत चालला आहे."

आज तर ढगाळ वातावरण आहे. रात्री पाऊससुद्धा आला होता. उन्ह नसल्यामुळे मालीश थोडी उशिरा केली. मालीश करत असताना झोपू शकले नाही. काश्मीरसंबंधी दिल्ली आणि पाकिस्तानमधून आज निघालेल्या निवेदनामुळे बापूजी अस्वस्थ आहेत. बंगालीचा पाठ नेहमीप्रमाणे चालला.

जेवत असताना नेहमीप्रमाणे स्थानिक मुसलमानभाई आले. ते बातमी सांगत म्हणाले की, "आमच्याकरिता तर संकटच आहे. रोज काही ना काही शहरात घडतेच आहे. तुमच्याशिवाय आम्हांला आता कोणाचाही आधार राहिलेला नाही. पोलीससुद्धा बेफिकीर आहेत."

बापूजी म्हणाले, "तुमचे म्हणणे तर खरे आहे. आपण तर नीती आणि धोरणच असे तयार केले आहे की त्यातून दुसरे काय निघू शकेल? आपले पोलीस आणि इंग्लंडच्या पोलिसांत फार मोठे अंतर आहे. त्यांचे पोलीस 'कर्तव्य' समजूनच नोकरी करत असतात, जेव्हा की येथील पोलीस पोटभरण्याचे साधन म्हणून नोकरी करत असतात. इतके अंतर आहे. आपणा सगळ्यांना जेव्हा हा देश आपला आहे असे वाटेल तेव्हाच या परिस्थितीत सुधारणा होईल. आणि या देशात जेव्हा अशी भावना जागृत होईल तेव्हाच जगभरात या देशाच्या स्वातंत्र्याची प्रसिद्धी होईल. मग ना तर 'साम्यवादा'ची आवश्यकता असेल ना 'समाजावादाची' वा 'भांडवलशाही'ची. 'मानवतावादा'शिवाय कशाचीही आवश्यकता नाही. आज आपण माणुसकी गमावली आहे. त्याचाच हा परिणाम आहे. परंतु याचबरोबर तुम्हांला एक दुसरीही गोष्ट सांगायची इच्छा होते. तुम्ही तुमच्या प्रभावाचा उपयोग करून शक्य तोपर्यंत तुमच्या बंधुभगिनींना गोळा करून त्यांना संयमात राहायला सांगाल तर हिंदू आणि शीख आपोआपच ठिकाणावर येतील. आणि आता तर तुम्हांला कदाचित जो मार्ग दिसत असेल तो मार्ग मला दिसत नाही.

एकीकडे पाकिस्तानसुद्धा लढाईची गोष्ट करत असल्यामुळे तुम्हीसुद्धा त्या गोष्टीचा गंभीरपणे विचार केला पाहिजे. तुम्ही जर त्यांच्याशी सहमत होत असाल तर मला काही सांगायचे नाही. परंतु जर असहमत असाल तर तुम्ही तसे जाहीर निवेदन काढले पाहिजे. आणि तुम्ही जर असे कराल तर तुम्ही हिंदुस्थानातील मुसलमानांची फार मोठी सेवा कराल."

ते गेल्यानंतर बापूजींनी थोडा वेळ आराम केला. परंतु आजची दिल्लीतील अशांतता पाहून बापूजी खूपच विचारात पडले आहेत असे वाटते. पंडित सुंदरलालजीसुद्धा बापूंच्या अस्वस्थतेविषयी बोलले. बऱ्याच वेळेपासून वरच्यावर वाईट बातम्या येतच आहेत. यामुळे बापूजींना तर असे वाटू लागले आहे की एखादे जबरदस्त वादळ येऊ घातले आहे. सुंदरलालजींनी सांगितलेल्या बातमीनंतर ना तर आम्ही काही बोलू शकलो आणि ना काही ते बोलू शकले. जी बातमीच वाईट होती ती एकल्यानंतर बापूजी तिचे महत्त्व कमी करूच शकत नव्हते.

आज तर दिवसभर खूपच ढगाळ आहे. चारेक वाजल्यानंतर पाऊसही सुरू झाला. असे असतानाही थोडेसे लोक प्रार्थनेत आले होते. आधी तर प्रार्थना आतच करायचा विचार होता. परंतु बापूजी म्हणाले, "इतक्या अडचणीतूनही लोक जर बाहेरून आले असतील तर मग मीसुद्धा त्यांच्यापर्यंत का जाऊ नये?"

प्रार्थनेकरिता येणारांचे अभिनंदन करत बापूजी म्हणाले, "तुम्ही लोक केवळ कुतुहलाच्या दृष्टीने आला नाही तर ईश्वरभजनाकरिता इथे आला आहा असे मी समजतो.

> "मला तर आज तुम्हांला काही वेगळीच गोष्ट सांगायची आहे. आजच्या वर्तमानपत्रांमध्ये आणि इतरत्रही हिंदुस्थान आणि पाकिस्तानमध्ये युद्ध सुरू झाल्याची चर्चा सुरू आहे. स्वतंत्र होऊन अजून आपल्याला सहा महिनेही झाले नाहीत तर आपण युद्ध सुरू झाल्याच्या गोष्टी करू लागलो आहो ही किती दुर्दैवी गोष्ट आहे? पाकिस्तानने आज असे निवेदन प्रकाशित केले आहे की युद्ध सुरू करण्यात आल्याबद्दल संघराज्याने यु.नो.कडे धाव घेतली आहे. अशा प्रकारच्या युद्धाच्या अफवा पसरवण्यात येत असल्याबद्दल मला तर अपार आश्चर्य वाटते. ही तर चोरानेच कोतवालाला पकडण्याची गोष्ट झाली. अर्थात तुम्ही मला विचारू शकता की संघराज्याने यु.नो.कडे न्यायाकरिता धाव घेणे कितपत वाजवी आहे? माझे उत्तर दोन्ही प्रकारे

आहे. न्याय मागण्याकरिता यु.नो.कडे धाव घेणे हे चांगलेही आहे आणि वाईटही आहे. चांगले याकरिता की काश्मीरवर या ना त्या प्रकारे हल्ले सुरूच आहेत, आणि त्यात पाकिस्तानचाही हात असल्याच्या अफवासुद्धा आहेत. आणि ही गोष्ट खरी नाही असे जरी पाकिस्तान म्हणत असेल तर एवढ्याने माझे समाधान होईल असे नाही. काश्मीर जर संघराज्याकडे मदत मागत असेल तर शेजारधर्म आणि मित्रधर्म म्हणूनही संघराज्याने काश्मीरला मदत केली पाहिजे. आणि यात जर संघराज्य चूक करत असेल तर ईश्वर त्याचा न्याय करीलच. कोणी शेजारी जर मदत मागत असेल तर त्याला मदत करणे आपले कर्तव्य आहे असे संघराज्याचे मत आहे. परंतु पाकिस्तानने जे निवेदन काढले आहे त्यात तर त्याने गंभीर चूक केली आहे असे माझे मत आहे. असे गंभीर निवेदन करण्यापूर्वी येथील सरकारशी त्याने विचारविनिमय करायला पाहिजे होता. एकीकडे तर पाकिस्तानचे म्हणणे आहे की संघराज्याबरोबर राहून आम्हांला सर्व काही करायचे आहे. परंतु वास्तवात जे होत आहे ते त्यांच्या विरोधात जाते. धर्माच्या नावाने पाकिस्तानची स्थापना झाली आहे. असे जर असेल तर पाकिस्तान सर्व प्रकारे 'पाक' म्हणजे संपूर्ण शुद्ध असला पाहिजे. माझे तर मत आहे की चुका तर दोन्ही बाजूंनी सारख्याच झाल्या आहेत. यामुळे काय आपण चुकांची परंपरा सुरू ठेवली पाहिजे? दोन्ही देशांत जर युद्ध सुरू होईल तर तिसरी कोणती तरी प्रबळ शक्ती आपल्यावर चढून अशी काही बसेल की १५० वर्षांच्या अपार विपत्तीनंतर, हजारोंच्या वा लाखोंच्या बलिदानानंतर मिळवण्यात आलेले इतके मूल्यवान स्वातंत्र्य आपण गमावून बसू. ही तर आपल्या मूर्खपणाची परिसीमा होईल. अजूनही काही बिघडले नाही. दोन्ही देशांच्या पुढाऱ्यांनी ईश्वराला मध्ये ठेवून परस्परांवर विश्वास ठेवावा आणि यु.नो.त जी तक्रार करण्यात आली आहे ती जर परत घेण्यात आली तर ते लोकही खुश होतील. माझी तर ईश्वराला अंतःकरणापासून प्रार्थना आहे की त्याने आपल्याला या युद्धापासून वाचवावे. आणि जर युद्ध होणारच असेल तर कमीतकमी मला तरी या गोष्टीचा साक्षीदार होण्याची इच्छा नाही. परंतु एक गोष्ट इथेच स्पष्ट करणे आवश्यक आहे असे मी समजतो मनातल्या मनात शत्रुत्व ठेवण्याऐवजी वा एकमेकांशी कपटकारस्थान करण्यापेक्षा तर पोटभर लढून घेणे चांगले.

"दिल्लीत अजूनही अंतःकरणापासूनची शांतता स्थापित झालेली नाही. काल रात्री काही भगिनींना आणि लहान मुलांना पुढे करून काही हिंदू पुरुष मुसलमानांच्या घरात घुसले.

आणि त्या वेळी दंग्याचा स्फोट झाल्यामुळे अश्रुधूराचा वापर करणे पोलिसांचे कर्तव्य झाले. दुःखी (शरणार्थी) तर खरोखरच दुःखी आहेत, परंतु अशा संकटाच्या वेळीही मर्यादांचे भान ठेवले नाही तर दुःख वाढत जात असते. सरकारला मदत करण्याऐवजी अशा प्रकारे जर ते दंगेधोपे करतील तर सरकारकरिता ते त्रासरूप होतील. आणि स्वतंत्र भारतात जगभराचे जे प्रतिनिधी आहेत ते सर्व आपले भांडण जगभरातील लोकांना सांगून आपल्या अहिंसेला लाजवतील. एकीकडे म्हणायचे की हिंदुस्थानने रक्ताचा थेंबही सांडवल्याशिवाय स्वातंत्र्य मिळवले आहे आणि दुसरीकडे आपणच आपल्या भावंडांचा कत्लेआम करत आहो. हे आपण काय करत आहो? लहान मुलांना तसेच भगिनींना पुढे करून सामना करण्यात बहाद्दुरीही नाही. हिंदूंनी प्रतिहल्ला करू नये म्हणून जुन्या काळी मुसलमान गायींना पुढे करून हिंदूंची कत्तल करत असत. अशा प्रकारे आपण दुरुपयोग करून आपल्या बहिणींना लाजवत असतो आणि आपल्या स्वतःला लाज वाटेल असे वर्तन करत असतो. ईश्वर आपणा सर्वांना सन्मती देवो.

प्रार्थनेनंतर घरामधील खोल्यांमधील बोळीतूनच बापूजी फिरले. नियंत्रणे काढल्यामुळे भाव खूप उतरले आहेत आणि जनता फार खुश आहे ही गोष्ट भाईसाहेबांनी बापूजींना सांगितली. आणि बापूजींनी त्यांना उद्या सर्व भाव लिहून आणण्याची सूचना केली.

झाकीर साहेबांशी शिक्षण आणि नई तालीमविषयी चर्चा करत असताना बापूजी म्हणाले, "नई तालीममध्ये प्रत्येक विद्यार्थी पूर्णपणे स्वावलंबी व्हायलाच पाहिजे. जर असे होऊ शकत नसेल तर हे नई तालीमचे अपयश आहे असे मी समजणार नाही तर आपणा सर्वांचे (शिकवणारांचे) हे अपयश आहे असे मी समजेन. आपल्याकडे शिकलेले लोक शेकड्यात किती असतील? मोठ्या मुश्किलीने पाच निघतील. मग त्यांना अक्कल नाही की काय? अक्कल तर सर्वांनाच आहे, परंतु गरिबीमुळे ते अक्षरज्ञानापासून वंचित झाले आहेत. यामुळे जशी देशाची आर्थिक परिस्थिती तसेच शिक्षण. ही गोष्ट दोन सख्ख्या भावांसारखीच आहे. एक समस्या सोडवली तर दुसरी आपोआपच सुटते. माझे चालत असेल आणि कोणी मला नोकरीत ठेवत असेल तर मी शिक्षक होणेच पसंत करीन. जोपर्यंत पोटाचा खड्डा भरत नाही तोपर्यंत देश कधीही उंच चढू शकत नाही. आणि तो खड्डा भरण्याची जी कला आहे ती नई तालीम आहे. तिला आपण व्यापक करायला पाहिजे. तसे केले तरच प्रत्येक विद्यार्थी शिकता शिकताच आपल्याला लागणारे अन्न, कपडे आणि राहण्याचे ठिकाण या सर्वांकरिता लागणारे उत्पन्न

स्वतः मिळवू शकेल. या देशाकरिता ही गोष्ट फार साधी आहे. परंतु माझा तर तुणतुण्याचा आवाज आहे. कुठपर्यंत पोहोचेल हे तर खुदालाच माहीत."

चांदवाणींनी माझ्या हिंदी प्रवचनाचा इंग्रजीत अनुवाद केला. बापूजींनी त्यात खूपच सुधारणा केली. रात्री नेहमीप्रमाणे पंडितजी आले. तासभर बसून गेले. कसरत करून साडेनऊ वाजता बापूजींनी झोपायची तयारी केली. झोपले. मी नेहमीप्रमाणे तेल चोळले आणि आजारी असो की धडधाकट, सर्वांच्या प्रकृतीचा बापूजी हालहवाल घेतातच. दिवसभर तऱ्हेतऱ्हेचे डोकेदुखीचे इतके सगळे काम केल्यानंतरही बापूजी एकसुद्धा गोष्ट विसरत नाहीत. कोणाला किती वेळा परसाकड झाली? किती खाल्ले? किती वेळा आंघोळ केली? सगळे काही अगदी बारकाईने विचारले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

५ - १ - '४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. मौनवार असल्यामुळे बापूजी स्वतःच लिहिण्यात मग्न होते. मी तर प्रार्थनेनंतर बापूजींना आत आणले आणि परत झोपून गेले.

बापूजींनी आज हिंदीत खादीवर लेख लिहिला. (पाहा ११ - १ - '४८च्या 'हरिजनसेवक'मध्ये 'प्रमाणित अप्रमाणितचा अर्थ' हा लेख.)

आज सेवाग्रामहून मुन्नाभाई आले. त्यांनी वर्ध्याच्या आश्रमातील आणि इतर नव्याजुन्या हकिगती सांगितल्या. बापूजींचे तर आता स्पष्ट मत आहे की आता आश्रमाने स्वतःच्या पायावरच उभे राहायला पाहिजे. दवाखाना आश्रमाबाहेर गेला आहे. दवाखाना तर एकूण चांगला सुरू आहे. बापूजींनी एका चिठ्ठीवर लिहिले, "सेवाग्राम जर रचनात्मक कामाने स्वावलंबी होणार नाही तर आश्रमवासी झोपले आहेत असे मी समजेन. रचनात्मक कार्याचा काटेकोर आणि पूर्ण अंमल म्हणजेच पूर्ण स्वराज्य. ही माझी व्याख्या आहे."

मी स्वतः अजून कोणत्याही निश्चित निर्णयावर आलेलो नाही. सेवाग्रामला येण्याची गोष्ट तर हवेतील किल्लेच समजायला पाहिजे. हवाई जहाज तर दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत ना? मी आकाशाखाली बसलेलो आहे आणि डोक्यावरून झुळझुळ आवाज करत वारा वाहतो आहे इतकेच मला पाहिजे. मी जेव्हा हे सर्व पाहतो तेव्हा मला प्रश्न पडतो की जगात इतकी सगळी धावपळ का आहे? जगात मी एक एकटाच रिकामा आहे असे वाटते. (विनोद आणि गांभिर्य दोन्ही प्रकारचे वातावरण तयार झाले.)

नोआखालीत कनूभाईंना लांब पत्र लिहिले, पण ते आवडले नाही. कदाचित ते पाठवणार नाहीत. . . . परंतु खूप द्विधा मनःस्थितीत आहेत. सुशिलाबहेन या महिन्यात अमेरिकेला जाणार होत्या, पण आता मे महिन्यात जाण्याचे निश्चित झाले आहे. बोपूजींना सोडून जाण्याची त्यांना थोडीशीही इच्छा होत नाही.

आज बापूजींची मालीश सुशीलाबहेनने केली. मालीश सुरू असताना रोजप्रमाणे बंगालीचा पाठ केला. थंडी तर इतकी काही पडली आहे की ती शरीरातून जातच नाही. असे असतानाही बापूजी

बर्फासारख्या थंड पाण्यात आंघोळीकरिता बसतात. दातण करण्याकरिता आणि हाततोंड धुण्याकरिताही थंड पाणीच वापरत असतात.

आंघोळ करत असताना हजामतीच्या दरम्यान बापूजी दहा मिनिट झोपले. पंडितजी आले आहेत. थोडा वेळ गोष्टी करून गेले. इंदिराबहेनसुद्धा लहान बाळाला घेऊन आल्या होत्या. बापूजींनी त्याला संत्रे दिले. तो तर खुश खुश झाला आणि बापूजींच्या मांडीवर खूप खेळला.

बापूजींना लवकरच सर्दी होण्याची लक्षणे दिसू लागली आहेत. आहारातसुद्धा फेरबदल केला आहे.

नेहमीप्रमाणे मौलाना आले. हिंदूंच्या मोहल्ल्यात हिंदू मुसलमानांना त्रास देऊन राहिलेच आहेत, त्यांच्याजवळ शस्त्रेही आहेत अशासुद्धा माझ्याकड तक्रारी येणे अजूनही सुरूच आहे. बापूजींनी लिहून त्यांना सांगितले की "याचा पुरावा दिला तर पुढे काही करता येणे शक्य होईल. आणि मुसलमानांजवळही भरपूर शस्त्रे आहेत अशासुद्धा माझ्याकडे आल्या आहेत. यामुळे तुमचे पहिले कर्तव्य मुसलमान भाईंजवळ जी शस्त्रे आहेत ती परत करायची त्यांना विनंती करा आणि ती तुम्ही मला आणून द्या आणि सरकार जर मुसलमानांचे पूर्ण संरक्षण करणार नाही तर आधी मी मरेन आणि मग मुसलमानांना मरू देईन." बाकी तर रोजप्रमाणे मुलाखती सुरू होत्या. सुभद्राबहेननीसुद्धा मुसलमानांना त्रास देण्यात येत असल्याची गोष्ट सांगितली. बापूजींनी लिहिले, "तुझ्यासारखी एखादी मुलगी माझ्याकडे तक्रार करायला न येता मुसलमानांना वाचवण्याच्या प्रयत्नात हिंदूंच्या हातून खून होऊन मेली असल्याचे जर मी ऐकले असते तर मी आनंदाने नाचलो असतो. हिंदू बंधुभगिनी जेव्हा अशा प्रकारे बलिदान करतील तेव्हाच भांडणाचा अंत होईल असे मला वाटते."

माती, कताई, टपाल नेहमीप्रमाणे राहिले. आज हरिजन फंडाचे आणि इतर हिशेबसुद्धा बापूजींनी तपासले. जास्तीची खादी हरिजन कॉलनीतील मुलांना वाटण्याची सूचना त्यांनी केली. त्यांचे म्हणणे होते की "भेट आलेल्या खादीतून आपल्याजवळ रुमालाएवढा जास्तीचा एक लहानसा तुकडासुद्धा राहायला नको."

सायंकाळी प्रवचन लिहिले. आजच्या प्रवचनात नियंत्रणांकडे वळले. धान्याचे आधीचे आणि भाव सांगितले.

प्रवचनात बापूजी म्हणाले, -

"मला अनेक पत्रे आणि तारा येत आहेत आणि त्यांत बहुतेक गोष्टींवरील नियंत्रण काढल्याबद्दल लोक माझे अभिनंदन करत आहेत आणि ज्या गोष्टींवरील नियंत्रणे अजून कायम आहेत तेही उठवण्यात आले पाहिजे अशी मागणी ते करत आहेत. एका यशस्वी व्यापारी बंधूंने मला इंग्रजीत लिहिलेले पत्र खाली देत आहे -

"तुम्ही सांगितले त्याप्रमाणे मी पांढरी साखर, गुळ, पिवळी साखर आणि इतर वस्तूंचे नियंत्रण असतानाचे आणि नियंत्रण उठवण्यात आल्यानंतरचे भाव देत आहे.

नियंत्रण असताना	नोव्हेंबर महिन्यातील भाव	आजचे भाव
साखर	८० ते ८५रुपये मण	३७ रु. ८ आणे
गुळ	३० - ३२रुपये मण	१३ - १५ रुपये मण
पिवळी साखर	३७ - ४५ रुपये मण	१४ - १८ रुपये मण
खडीसाखरेचे पुडे	दीड ते दोन रुपये	अकरा आणे
साखर देशी	३७ - ४५ रुपये मण	१४-१८रुपये मण

तुमच्या लक्षात येईल की साखरेचे भाव पन्नास टक्क्यांनी पडले आहेत

गहू	४०-५०रुपये मण	१८-२० रुपये मण
तांदुळ बासमती	४०-४५ रुपये मण	१८-२० रुपये
मका	३०-३५ रुपये मण	१८-२० रुपये
चणे	३८-४० रुपये मण	१६-१८रुपये
मूंग	३५-३८रुपये मण	२३ रुपये
उडीद	३४-३७ रुपये मण	२३ रुपये
तूर	३२ रुपये	२२ रुपये
डाळी		
हरभऱ्याची डाळ	३० रुपये मण	२० रुपये
मुग डाळ	३९ रुपये मण	२६ रुपये

उडीद डाळ	३७ रुपये मण	२६ रुपये
तूर डाळ	३२ रुपये मण	२२ रुपये
तेल		
सरसोचे तेल	७५ रुपये	६५ रुपये

"नियंत्रण उठल्यानंतर बाजारात भरपूर लोकरी आणि रेशमी कापड आले आहे आणि त्यांचे भाव ५० टक्क्यांनी उतरले आहेत व काही ठिकाणी तर ६६ टक्क्यांनी उतरले आहेत.

"सुती कपडे आणि सूत यांच्यावरील नियंत्रणही लवकरच उठेल या आशेने किंमती हळूहळू कमी होत आहेत. यामुळे विविध गिरण्यांमधील स्पर्धा वाढेल व कापड सहजपणे उपलब्ध होऊन त्याचे भाव अजूनच उतरतील व चांगले कापडसुद्धा मिळू लागेल. परंतु रेशमी कापडावरील नियंत्रण उठल्यानंतर ते यशस्वी करण्याकरिता रेशमी कापडाच्या निर्यातीवर कमीतकमी तीन वर्षांकरिता बंदी घातली पाहिजे. शासकीय कार्यालयातील आकडे जादूच्या खेळासारखे असतात. खाद्यान्न आणि कापडावरील नियंत्रणाच्या आड ते आकडे यायला नको.

"पेट्रोलवर नियंत्रण तर युद्धामुळे लावण्यात आले होते. आता त्याची आवश्यकता नाही. खरी गोष्ट ही आहे की या नियंत्रणामुळे मालवाहतूक करणाऱ्या कंपन्यांचा काही फायदा होतो आहे आणि यामुळे हे नियंत्रण दूर होऊ नये असा त्यांचा प्रयत्न आहे. करोडो लोकांचा तर पेट्रोलच्या नियंत्रणाशी काहीही संबंध नाही. एका बसचा वा ट्रकचा मालक, ज्याच्याजवळ केवळ एकाच रस्त्यावर वाहन चालवण्याचा अधिकार आहे, महिन्याला १५,००० रपये कमावतो. परंतु अशा प्रकारे निर्बंध नसते तर एका वाहनधारकाला महिन्याचे ३०० रुपयांपेक्षा जास्त फायदा झाला नसता. एका लॉरीच्या पेट्रोलचा परवाना आज महिन्याला १०,००० रुपयांपर्यंत विकला जाऊ शकतो. जर हे नियंत्रण काढून टाकण्यात आले तर देशासमोरील खाद्य पदार्थ, घरे, वगैरेसारख्या अनेक समस्या आपोआपच सुटतील. स्वतंत्र भारताला नियंत्रणांचा काहीही उपयोग नाही. सर्वसामान्य जनतेकरिता ही गोष्ट आशीर्वादरूपच होईल.

"हे आकडे पाहिले की सांगण्याकरिता फारसे काही शिल्लक राहत नाही असे दिसते. शक्य आहे की मला कळत नसेल. तसे असेल तर अधिक कळणारांनी मला दुरुस्त केले पाहिजे.

"असे म्हणतात की जगात जितके पेट्रोल निर्माण होते त्यातील भारतात केवळ १ टक्का पेट्रोलचा उपयोग होत असतो. यामध्ये निराश होण्याचे कारण नाही. अखेरीस रस्त्याने होणारी आपली वाहतून सुरू आहे. परंतु याचा अर्थ असा आहे की आपण युद्धखोर जमात नसल्यामुळे आपल्याला अधिक पेट्रोलची गरज नाही? वा आपल्याला जास्त पेट्रोल लागले तर जगात पेट्रोलचा तुडवडा होणार आहे? विद्वान लोकांनी माझ्या अडाणीपणावर हसू नये. मला प्रकाश हवा आहे. मी जर माझा काळोख लपवून ठेवला तर मला प्रकाश मिळणार नाही. प्रश्न आहे - इतके कमी पेट्रोल आपल्या वाट्यावर येत असेल तर मग काळ्याबाजारात पेट्रोलचा इतका प्रचंड साठा कसा?

"पत्रलेखकाने सांगितलेली परिस्थिती जर खरोखरच अशी असेल तर ही गोष्ट धक्कादायक आहे. याचा अर्थ नियंत्रणे श्रीमंतांकरिता वरदान आहेत तर गरिबांकरिता शाप. आणि तरीही गरिबांच्या नावावर नियंत्रणे लादण्यात आली आहेत ! एकाधिकारपद्धत जर अशा प्रकारे काम करत असेल तर क्षणाचाही विचार न करता ती बंद करण्यात आली पाहिजे.

"कापडाबद्दल बोलायचे तर पंडित नेहरू जिला स्वातंत्र्याचा गणवेष म्हणतात त्या खादीला आपण विसरता कामा नये. (पाहा "लेटर टू जवाहरलाल नेहरू", जुलै ३०, १९३७ आणि परिशिष्ट "स्वातंत्र्याचा गणवेष" जुलै ३१, १९३७) कापडावर नियंत्रण राहण्याची मुळीच शक्यता नाही. आपल्याजवळ भरपूर कापूस आहे आणि असंख्य हात आहेत. ते लोक खेडेगावातही चरखा आणि माग चालवू शकतात. अशा प्रकारे कोणत्याही अडचणीशिवाय आपण स्वतः भरपूर कापड निर्माण करू शकतो. याकरिता ना तर शहरातील गोंगाटाची आवश्यकता असते ना मोटारीद्वारे दळणवळणाची. पूर्वीच्या काळी रेल्वे सैन्याच्या गरजा भागवायची. तिचे दुसरे काम बंदरांवर कापूस पोहोचवणे आणि बंदरापासून अंतर्गत भागात कापड आणणे हे असायचे. आता खादी आपली मलमल आहे. ती खेड्यात तयार होते आणि खेड्यातच तिचा उपयोग घेतला जायचा. यामुळे या गोष्टीचे केंद्रिकरण करण्याची गरज नाही. आपल्या आळशीपणामुळे वा अडाणीपणापायी आपण खेड्यांचा विनाश करू नये. त्यांची विनाकारण बदनामी करू नये."

आजचे प्रवचन खूप लांब होते. परंतु मौनदिवसाची बापूजींची प्रवचने नेहमीच लांब असतात. मौन सुटले तेव्हा तर बिरलाजी आणि घरातील सर्व तसेच मुलाखतीकरिता आलेलेही हजर होते. बापूजींचे मौन असते तेव्हा सर्व काही शांत असते. मौन सुटले की परत एकदा गजबज सुरू होते.

जवळपास सर्व दिवस लिहिण्यात, वाचण्यात आणि आरामात गेलेला असतानाही बापूजींना थकवा जाणवतच होता. सर्दी होण्याची तयारी होते आहे. कदाचित हे त्याचेही कारण असू शकेल. मुन्नालाल भाईसुद्धा गोष्टी सांगू लागले आहेत. परंतु त्यांना अजून थांबवून ठेवण्यात आले आहे. यामुळे त्यांकरिता वेगळा वेळ ठेवते.

जवळपास दहा वाजता कसरत करून बापूजींची झोपायची तयारी. पाकिस्तानने काश्मीरसंबंधी जे निवेदन 'नॅशनल हेरॉल्ड'मध्ये प्रकाशित केले आहे त्याबद्दल पंडितजींशी चर्चा झाली. बापूजींची तर अशीही मान्यता आहे की संघराज्यातील राष्ट्रीय मुसलमानांचे जे मत असेल तेसुद्धा प्रकाशित केले पाहिजे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

६-१-'४८

बापूजींना प्रार्थनेच्या दहा मिनिट आधीच जाग आली. आज रात्री असह्य थंडीसुद्धा होती. कनूभाईंना लिहिलेल्या लांब पत्राविषयी . . . शी चर्चा केली. बापूजी एकदा बोलत असताना म्हणाले, "मला अजून बराच विचार करावा लागेल असे वाटते. कारण काहीही जरी असले तरी एका ठिकाणी बसून मी निवांतपणे काम करू शकत नाही. सर्वांना वाटते की कामाचे काय, ते तर दिल्लीत होऊनच जाते. लोकांचा शहरांचा मोह अजून सुटतच नाही. असंख्य गावांमुळे आज दिल्ली, कलकत्ता वा मुंबईसारखी शहरे झाली आहेत. त्यांचीसुद्धा काळजी नाही. परंतु आज लोकांचे नैतिक जीवन उन्नत होण्याऐवजी त्याचा ऱ्हास होतो आहे. परिणामी दंगे आणि अराजक वाढले आहे. यामुळे या दुखाचे मूळ जोपर्यंत काढून टाकले जात नाही तोपर्यंत जीवनाच्या तत्त्वज्ञानाबद्दल लांब म्हणा की लहान म्हणा भाषणे देऊन आता भागू शकेल असे नाही. आपल्या लोकांना काम दिले पाहिजे आणि त्यांना काम करावे लागेल. यातच आश्रमवासीयांची कसोटी आहे. या कसोटीतून तुम्ही सर्व पार पडाल तर चांगलेच आहे, नाही तर यातही माझे अपयश जाहीर करून मला नवीन मार्ग स्वीकारावा लागेल. आज मला जे खरे आणि सत्य वाटते त्यावरच मी तर विसंबून असतो. काल जे झाले ते स्वीकारीन, नाही तर ते फेकून द्यायला मला क्षणाचाही वेळ लागणार नाही. यामुळे या सर्व बाबींचा तुम्ही विचार केला पाहिजे. मी तर जसा आहे तसाच आहे. मला जर स्वतःला माझ्या यज्ञात काही उणीव दिसली तर ती जी काही असेल आणि ज्या स्वरूपात असेल त्या स्वरूपात मी ती जगासमोर मांडेन कारण सर्व गोष्टी जनतेसमोर मांडण्यावर माझा असीम विश्वास आहे. माझ्याकडून त्यांचा विश्वासघात तर होऊच शकत नाही. मी जनतेचा आहे, जनता माझी आहे. यामुळे माझे स्वतःचे वैयक्तिक वा खाजगी जीवन काहीही नाही. हे सर्व विचार पूर्णपणे समजून घेतले पाहिजे."

आज तर बापूजींनी आलेला टपालच वाचला. दिल्लीत जर बापूजींना यश मिळाले तर ते बहुतेक काश्मीरलाही जाण्याचा विचार करत आहेत.

स्थानिक मुसलमानांनी तक्रार केली की शरणार्थ्यांना तर मुसलमानांचीच घरे पाहिजे. आणि जरी दुसरी काही व्यवस्था करण्यात आली तरी ती त्यांना मान्य नाही. बापूजी म्हणाले, "ही बहादुरी

इथेच दाखवण्याची काय आवश्यकता? जर असेच असेल तर या लोकांनी आपला देश सोडायची आवश्यकता नव्हती. आणि त्या परिस्थितीचा सामना केला असता तर मला कशाची फिकीर नसती."

बापूजी आंघोळ करत असताना मी त्यांची हजामत केली. माझा कुर्ता फाटला होता. माझे लक्ष नव्हते. तो जोडायला सांगितले. परंतु तो इतका काही झिजला होता की त्याला सरळ शिवता येणे शक्य नाही याची तर बापूजींनाही कल्पना होती. मला म्हणाले, "या खिशाच्या भागाचे कापड काढ. तो थोडा रूंद आहे. यामुळे त्याचा जोड चांगला बसेल. आणि आपल्याला नाही तरी खिशाचे काय काम आहे? असे खिसे ठेवल्यामुळेच आपल्या जीवनाच्या गरजा वाढत गेल्या. खिसा असला की त्यात काही ना काही ठेवण्याची इच्छा होते. परंतु खिसाच नसला तर जास्तीचा संग्रह करण्याची इच्छाच होणार नाही."

बापूजीसुद्धा लहानसहान गोष्टीतही कसे तर 'तत्त्वनान' ओढून आणतात! आपली तर अक्कलच काम करत नाही.

बापूजींना खूप सर्दी झाली आहे. आवाजसुद्धा बसला आहे. गरम पाण्याची नेती करत असतात. थंडी, ढगाळ हवामान आणि त्यातही पाऊस यामुळे असे झाले आहे.

खुरशेदबहेन आल्या आहेत आणि त्या बापूजींना खूप हसवत असतात. म्हणाल्या "पानीपतला गेला नाही हे चांगले झाले, नाही तर पानीपतला जाऊन तुम्ही महाभारतातील युद्ध होऊ नये म्हणून उपवास करत बसला असता. याचीच मला फार काळजी होती."

बापूजी म्हणाले, "ही समस्या तर अूनही कायमच आहे. करायचे वा मरायचे या दिशांमधून एका दिशेकडे लवकरच वळावे लागेल असे तर मला वाटते आहेच."

बापूजी आणि इतरांच्या विनोदात भरपूर गांभीर्य असते. बापूजी काय करतील कोणाला माहीत?

आज . . . ला विदेशात जायचे असल्यामुळे त्यांच्याकरिता रेशमी कपडे आले. त्यांनी खादीचे कपडे नेले असते तर पेटीत जागा फार कमी राहिली असती, आणि धुण्यातही अडचण गेली असती.

बापूजींना दुःख झाले. "हे सर्व निमित्त आहे. कमी कपडे नेले तर काय हरकत आहे. . . . ला जायचे असेल आणि खादी घातली नाही तर त्याचा आपल्या देशावर काय परिणाम होईल? हे सर्व मी सांगायला पाहिजे काय? ही तर माझ्या कल्पनेपलीकडील गोष्ट आहे. आभार ! ईश्वराने मला किती लवकर जागे केले? आतापर्यंत आंधळाच होतो ना? . . . ला सांग की 'बापू म्हणतात म्हणून वा बापूंना

आवडते म्हणून काहीही करू नकोस. तुला जे शोभेल, आवडेल आणि आनंद मिळेल तेच कर.' आता मला कळले की न समजून घेता किती गोष्टी चालत असतात? शिकलेसवरलेले आणि माझे लोक असे करतात ही किती दुःखाची गोष्ट आहे? हिने आतापर्यंत जे केले ते करत असताना काटेकोरपणे प्रामाणिक होती काय? अशा तर मला अनेक भगिनी मिळाल्या आहेत की ज्यांना आजच्या काळाप्रमाणे तर अशिक्षितच म्हणावे लागेल. शकरीबहेन, दुर्गा, गोमती या आश्रमातील सर्व भगिनींसमोर तर मी नतमस्तकच होत असतो. त्यांच्यात पुढे येण्याची वा वर्तमानपत्रात नावगाव येण्याची वृत्ती नव्हती. असे असूनही मी कबूल केले पाहिजे की स्वातंत्र्याच्या लढ्यातील त्यांचा सहभाग अपूर्व होता." अशा प्रकारे या हकिगतीमुळे बापूजींचे मन खूप दुखावले. मला कुठे माहीत होते की यातून असे होईल? मी तर जे पार्सल आले होते ते सही करून घेतले आणि बापूजींना दिले. बापू म्हणाले, "हे उघड आणि आत काय आहे ते पाहा. आणि तुला विचारले तर सांग की मी उघडले आहे. अशा प्रकारे बिचाऱ्या खादीचा निभाव कसा लागेल? या म्हाताऱ्याचे जसे हाल या स्वातंत्र्यात होत आहेत तसेच हाल स्वातंत्र्यात खादीचे होणार असतील तर स्वातंत्र्य कदाचित टिकून राहीलही परंतु जनता टिकाव धरू शकणार नाही. हे पाहायला तू तर जिवंत राहशीलच, तू हे पाहशील , मग बापूजींची आठवण करशील आणि म्हणशील 'या म्हाताऱ्याची गोष्ट मुळीच खोटी नव्हती.'"

कृष्णनभाई नाय्यर आले. त्यांनी तर खूपच मदतकार्य केले आहे. ते बापूजींना त्रास देण्याकरिता येत नसतात. बापूजींच्या दर्शनाकरिता येत असतात. भाईसाहेबांशी वा आमच्याशी गोष्टी करून चालले जातात.

मंडीचे राजा आणि राणी आले. त्यांनी बापूजींना १०१ रुपये दिले तर राणीने बापूजींना हिऱ्याची अंगठी दिली. बापूजी विनोदात म्हणाले, "आता तर मला दोघांचाही उपयोग नाही. आता तर मला तुम्हा दोघांशीच काम आहे." ते दोघेही म्हणाले, "आम्ही दोघेही तर तुमच्या हुकुमाच्या आधीन आहो."

हकीम अजमलखां आले. बापूजींना ते म्हणाले, "आता मुसलमानांकरिता तर तुम्हीच आहा. तुम्ही नसता तर आमचे काय झाले असते ते माहीत नाही?" वगैरे.

बापूजी म्हणाले, "आपणा सर्वांचा एक खुदाच आहे. माणूस माणसांचे काय रक्षण करणार आहे? परंतु तुम्ही आता मुसलमान कुटुंबांना विश्वासात घ्या आणि त्यांच्याजवळ जी काही शस्त्रे असतील ती सर्व आणण्याचा प्रयत्न करा."

रामेश्वरी बहेन आणि ब्रजलाल नेहरू आले. ब्रजलालजींनी सर्दी घालवण्याकरिता आसनांचे काही विशिष्ट प्रयोग सांगितले. बापूजी माझ्याकडे बोट करून म्हणाले, "या पोरीला जर तुम्ही "पहेलवानासारखी कराल तर हिला मी तुमच्या हाती सोपवीन. बाकी तर ज्याच्या अंतःकरणात रामनाम वसलेले असते त्याला काहीही होऊ शकत नाही."

विनोदात ब्रजलालजी मला म्हणाले, आता तर तू छाती फाडून दाखवून दे की तुझ्या हृदयात रामनाम वसलेले आहे की नाही ते? हो तितकी ताकत तर आसन वगैरेंनीही येऊ शकते.

आजच्या प्रार्थनेत बापूजी म्हणाले,

"अजूनही माझ्याकडे तक्रारी येत आहेत की निर्वासित मुसलमानांवर घर खाली करण्याकरिता दडपण आणत आहेत. आणि या कारणामुळे मुसलमानांना घर रिकामे करून उघड्या आकाशाखाली राहावे लागत आहे. अशा असह्य थंडीत उघड्यावर राहावे लागणे हा काही खेळ नाही. आणि थंडीत आता वरून पडणाऱ्या पावसाचीही भर पडली आहे. मुसलमान जिथे राहतात तेच घर घ्यायचे असा शरणार्थ्यांचा आग्रह का? ते जर इतरांच्याही घरांचा ताबा घ्यायला गेले असते तर घरांच्या टंचाईची गोष्ट मी समजू शकलो असतो. या बिरला भवनातून मला आणि माझ्याबरोबर राहणाऱ्या एका रुग्णाला काढून टाकण्याचा प्रयत्न झाला तर ती गोष्ट मी समजू शकतो. परंतु निर्दोष मुसलमान कुटुंबाला काढणे ही गोष्ट आपल्या संस्कृतीकरिता लांछनात्मक आहे असे समजले जाईल. मुसलमानांना राजधानीच्या शहरातून हाकलून लावण्याच्या प्रयत्नाचे फळ अतिशय अशुभ असतील हे तुम्ही सर्वांनी समजून घेतले पाहिजे. आताच मला बातमी कळली आहे की मुंबईच्या गोदीतून माल काढणाऱ्या मजुरांनी संप केला आहे. काँग्रेसचे पुढारी अथवा सदस्यांना तसेच साम्यवादी आणि समाजवादी या सर्व पक्षाच्या लोकांना मी विनंती करतो की अशा प्रकारे संप करू नका. आपला ज्या गोष्टीला विरोध असेल त्या गोष्टींच्या विरोधात अर्थातच लढा उभारला पाहिजे आणि त्याकरिता एखाद्या विशिष्ट पुढाऱ्याला निवडून त्याच्या अंतर्गत एक समिती नेमून समंजसपणे काम केले पाहिजे. आपण गुलाम असताना ज्या पद्धतीने काम करत होतो त्या पद्धतीने आता स्वातंत्र्याच्या काळात काम करून चालणार नाही. नेहमी व्यावहारिक दृष्टिकोन समोर ठेवला पाहिजे. काळवेळ, समाज

आणि वस्तुस्थिती समजून घेऊन त्याप्रमाणे काम करायला पाहिजे. ही वेळ संप करायची नाही. आता जर संप केला तर त्यामुळे जनतेचे आणि संप करणारांचेही विनाकारण नुकसान होईल.

"आज तर मला खऱ्या लोकशाहीबद्दलही थोडे बोलायचे आहे. तुम्हा सर्वांना माहीतच असेल की औंधच्या राजाने वर्षांपूर्वी आपल्या जनतेला जबाबदार शासनपद्धती सोपवली होती. आणि आप्पासाहेबांनीसुद्धा आपले जीवन जनतेच्या सेवेकरिता वाहून टाकले होते. आता राजेसाहेबांनी आणि पुढाऱ्यांनी आपले राज्य संघराज्यात सामील करायचे जवळपास ठरवले आहे. आणि अशा प्रकारे जे राज्य संघराज्यात सामील होतील त्यांचे वार्षिक तनखे ठरवण्यात येणार आहेत. परंतु औंधचे राजेसाहेब तर असे आहेत की ते स्वतःचे किंचितही ओझे जनतेवर टाकू इच्छित नाहीत. ते तर प्रजेची सेवा कल्याबद्दल जे पारिश्रमिक मिळेल केवळ तेच घ्यायला तयार झाले आहेत. त्यांनी मला एक पत्र पाठवले आहे. त्यात ते विचारतात की त्यांनी आपल्या राज्यात जी पंचायत तयार केली आहे ती सुरू ठेवण्यात येणार आहे की नाही? याचे उत्तर तर सत्ताधारी म्हणून मी देऊ शकत नाही. परंतु माझ्या बुद्धीप्रमाणे मी असे म्हणेन की संघराज्यात सामील झाल्यानंतर संपूर्ण हिंदुस्थानात जी राज्यव्यवस्था असेल तशीच औंधमध्येही असेल. आणि लोकांना पंचायत राखून ठेवायची असेल तर त्या प्रकारे राज्यकारभार चालवण्याला मनाई करण्याची तरतूद आपल्या घटनेत नाही.

"औंधचे राज्य मिटेल, परंतु औंध म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गावांचे विशिष्ट स्वरूप मिटणार नाही. उलट हे स्वरूप कायम राहील. हिंदुस्थानात पंचायतराज सुरू होवो वा न होवो, परंतु समूहाचा एक भाग म्हणून तो जर सेवा करत असेल आणि आपले कर्तव्य पार पाडत असेल तर हा अधिकार कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. औंधमध्ये पंचायतपद्धती लोकांच्या सेवेकरिताच सुरू करण्यात आली आहे. खऱ्या लोकशाहीचा शोध एखाद्याला मुख्यमंत्री म्हणून खुर्चीवर बसवल्यानेच लागत नसतो. ती तर एकेका गावाच्या आणि शहराच्या मदतीनेच तयार होत असते.

"एका भाईने मला आयातनिर्यातीत समतोल निर्माण करण्यासंबंधी लिहिले आहे. हिंदुस्थानात मालाची आयात निर्यातीपेक्षा कमीच असली पाहिजे. आज जशा प्रकारे सुरू आहे तसाच प्रकार जर कायम कायम राहिला तर हिंदुस्थानची साधनसामुग्री फार कमी वेळात संपून

जाईल. मौजमजेच्या तसेच आपल्याला ज्या वस्तुंची गरज नाही त्या गोष्टी बाहेरून मागवणे सोडून दिले पाहिजे. आज हिंदुस्थानातून कच्चा माल बाहेर जातो आणि तयार झालेला माल आपण मागवतो. यामुळे हिंदुस्थान पूर्णपणे कंगाल होईल. या भाईच्या विचारसरणीचे मी समर्थन करतो. हिंदुस्थानने अधिकात अधिक स्वावलंबी व्हायला पाहिजे. असे झाले तर या सर्व भांडणांचासुद्धा आपोआप अंत होईल. हिंदुस्थानने आणि दुसऱ्या कोणत्याही देशाने कोणाचेही शोषण करू नये, उलट त्यांनी परस्परांना मदत करण्याच्या भावनेने एकमेकांच्या वस्तू घ्याव्या."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. डोळे बंद करून फिरले. फिरल्यानंतर प्रवचन पाहिले. लगेच पंडितजी आले. काश्मीरमध्ये परत खूप दंगे सुरू झाले आहेत. एक तास गोष्टी झाल्या. पंडितजी गेल्यानंतर पाय धुतले, कसरत केली आणि झोपायची तयारी. मी रोजप्रमाणे पाय दाबले, तेल चोळले. बापूजींनी प्रत्येकाच्या प्रकृतीची चौकशी केली. चांदबहेनला अजूनही खूप अशक्तपणा आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

७ - १ - '४८

३.३० वाजता नेहमीप्रमाणे प्रार्थनेकरिता उठलो. बापूजींची सर्दी आणि खोकला वाढणार आहे असे वाटते. बापूजींना आत नेऊन टपालाकरिता कागद दिले. टपालात आलेले थोडेसे लिफाफे असेच पडलेले होते. बापूजींनी ते घेतले आणि स्वतःच कातरीने ते चांगल्या प्रकारे कापले आणि त्यांचा 'पॅड' तयार केला. मी विचारले, "थंडीत हात कापत नाहीत?" बापूजी म्हणाले, "नैसर्गिक थंडी तर माणसाकरिता फार उपयोगी असते. मी तर आपल्या गरिबीमुळे, आपल्या गरिबीचा अंत केव्हा होईल या विचारानेच थरथरतो आहे. परंतु महालात तुला थंडी जाणवत नसेलच ना? यामुळेच हे लिफाफे आणि कागद गोळा केले आहेत. यामुळे ज्यांना गरिबीत शिकावे लागते त्यांना या कोऱ्या कागदांची किती किंमत आहे हे कळते. आणि ते ते इतस्ततः पडून राहू देऊ शकत नाहीत. यांचा तर रोजच्या कामात उपयोग घ्यायलाच पाहिजे."

मी तर काही वेळ थक्क होऊन पाहतच राहिले. बापूजींचे लक्ष तर बिसेनभाईंच्या टेबलकडे आणि त्यावर कायकाय पडले आहे याकडे गेले. आणि कोणालाही न सांगता त्यांनी स्वतःच तो टेबल आवरला.

यानंतर टपाल वाचला, थोडा लिहिला -

"सिंधमधून आलेल्या बातमीमुळे काळजी वाटते. मला अर्थातच सिंधमध्ये जाण्याची इच्छा आहे परंतु कोणत्या तोंडाने जाऊ? माझ्या स्वतःच्या घराला आग लागलेली असताना मी इतरत्र आग विझवायला गेलो तर ही आग अजूनच उग्र होऊन तिचा तीव्र भडका उडण्याची शक्यता आहे. चांगली गोष्ट ही आहे की आधी आपल्या घरातील आग विझवली पाहिजे. जर यात यश आले तर इतरत्रही तसे होण्याला मदत होईल."

* * *

"सागरात राहत असताना शार्कशी वैर करण्यात शौर्य नाही तर मूर्खपणा आहे. यामुळे तू जर आश्रमाच्या नियमांचे पालन करू शकत नसशील तर आश्रमाबाहेर राहून जनसेवेचे विविध काम करू शकशील. जास्त लिहायला मला वेळ नाही."

* * *

"... आज मला अगदीच झोप आली नाही. थोडा वेळ मनूडीचे काम केले आणि डाक पाहिली. इथे इतके काम असते की सकाळी प्रार्थनेनंतर जी डाक पाहतो केवळ तिचेच उत्तर देऊ शकतो. नंतर तर भेटायला येणारांची रीघ लागलेली असते. इथे तर करण्या वा मरण्याकरिता थांबलो आहे. काय होईल ते मी सांगू शकत नाही. मी प्रकाशाच्या शोधात आहे. या काळोखातही मला प्रकाशाचा लहानसा कवडसा दिसतो आहे. जर संपूर्ण प्रकाश दिसला तर दिल्लीत अंतःकरणापासूनची मैत्री होईल. चला, इतके तर कसेबसे लिहू शकलो. तुम्ही सर्व कसे आहा? तुझी प्रकृती कशी आहे? चि. मनूडीला तू लिहीत राहा. बाकी सर्व ती लिहील. तिच्या शरीरात सुधारणा करणे शक्य होत नाही. नोआखालीत माझी सेवा करण्यात ती फार रोड झाली आहे. ती जर पूर्ववत झाली तर मला फार मोकळे वाटेल. तिने जर माझा सल्ला ऐकला, काही महिने विश्रांती घेतली आणि प्रसन्न राहिली तर बाकी सर्व बाह्य उपचार मी तिच्याकडून करवून घेईन. आज हे शक्य नाही. मी तिच्याकडे आज पूर्ण लक्ष देऊ शकत नाही. इथे काही परिणाम निघू शकला तर दुसरे काम मनूडीला पहेलवान बनवण्याचे असेल. नाही तर ती मरू शकते. आपण कोणता मार्ग धरला पाहिजे ते ईश्वर दाखवील. हे मी अर्थातच थट्टेत लिहीत आहे."

* * *

"इथे काही दिवसात आपण काही तरी साध्य करू शकू अशी मला आशा आहे. सध्या तर इथे आग लागलेली आहे. आज आपण आपली माणुसकी ठोकरून देतो आहो. ईश्वराला जो मार्ग मान्य असेल तो मार्ग तो दाखवेल. आपण आपला पुरुषार्थ सोडता कामा नये."

* * *

"... आज तर झोपल्यानंतरच सुटका झाली. बरेच काम तर चि. मनुडीने केले आणि टपालही तिनेच पाहिला. इथे काम इतके जास्त आहे की सकाळी जितका टपाल पाहिला तितका पाहिला आणि लिहिला तितका लिहिला. नंतर तर मुलाखतीकरिता येणारेच सतत सुरू असतात. इथे तर करायला वा मरायला पडलो आहे. काय होईल हे कसे सांगू शकतो?

प्रकाशाच्या शोधात आहे. किरणांचा थोडासा कवडसा दिसतो आहे. दिल्लीत जेव्हा 'दिली' म्हणजे अंतःकरणापासूनची मैत्री होईल तेव्हाच संपूर्ण प्रकाश दिसला असे म्हणता येईल. चल, इतके तर मोठ्या मुश्किलीने लिहिले आहे. तुझी तब्येत कशी आहे? चि. मनुडीला तर लिहितच जा. तिला अजून हे लिहिशील. तिला शरीरात सुधारणा करता येऊन राहिलेली नाही. माझ्या सेवेत नोआखालीत तिने आपले शरीर पूर्णपणे झिजवून टाकले आहे. परत तिने ते पूर्वपदावर आणले तर माझ्या समधानाला पारावार राहणार नाही. माझे ऐकले आणि दोन महिने आराम केला आणि प्रफुल्लित राहिली तर बाकीचे सर्व बाह्य उपचार मी करीन. आज हे शक्य होऊन राहिलेले नाही. मी तर पूर्ण लक्ष देऊ शकत नाही. इथे जर काही परिणाम मिळाले तर दुसरे काम मनुडीला पहेलवानसारखी करण्याचे आहे. नाही तर मरायचे असेल तर मरेल . . . हे तर मी विनोदात लिहितो आहे."

* * *

टपालानंतर फिरायला निघालो. फिरत असताना तडजोडीविषयी गोष्टी झाल्या. आज बातमी मिळाली की गोपालस्वामी अय्यंगार काश्मीरच्या प्रकरणाकरिता युनोकरिता रवाना होणार आहेत.

फिरून आल्यानंतर बापूजींनी पाय धुतले. मी मालीशची तयारी केली. मालीश करत असताना बापूजींनी बंगालीचा पाठ केला, आणि नंतर वर्तमानपत्रे वाचता वाचता झोपून गेले.

आंघोळ करत असताना मला प्रकृतीविषयी एक व्याख्यान ऐकायला मिळाले. मी म्हणाले, "तुमची तब्येतसुद्धा कुठे चांगली आहे?" बापूजी म्हणाले, "मी ७८ वर्षाचा म्हातारा आहे आणि तू तर केवळ १७ वर्षाची आहेस ना? ७८ वर्षाची हो मग माझ्याशी स्पर्धा करून दाखवशील. परंतु मी विनोद करून राहिलेलो नाही. मला वेळ नाही, पण इथेच करायचे नाही तर मरायचे असा संकल्प मी केला आहे. तसेच आता असाही संकल्प करावा लागेल की तुला चांगला करीन वा मरेन. आज मी तुझ्या बहिणीच्या पत्रात लिहिले आहे. ते जर पाहिले नसशील तर पाहशील."

हजामत करत असताना साबू वापरणे बापूजींनी सोडून दिले. यावर बापूजींना मी म्हणाले की साबणाशिवाय लवकर हजामत होत नाही. बापूजी म्हणाले, "मूर्ख पोरी ! तू गोष्ट बदलवते आहेस ना?" मला तर इतक्या जोरात हसू फुटले की बापूजीही हसू लागले. बापूजी जरी प्रत्येक गोष्ट वा प्रसंग

गंभीरपणे घेत नसत. तरी आज मात्र ते माझ्या प्रकृतीबद्दल गंभीरपणे काळजी करत होते. मला वाटते की दर दुसऱ्या दिवशी एक तर माझा ताप वाढायचा वा सर्दी वगैरे काही तरी व्हायचे. आणि कधी आठवण झाली नाही असे होऊ नये म्हणून त्यांनी वजनाचा काटा ड्रेसिंगरूमध्ये ठेवायला लावला आणि त्यावर मला चढायला लावत असतात. पण माहीत नाही कसे, वजन प्रत्येक वेळी कमीकमीच होत चालले आहे. अथवा एखाद्या वेळी तितकेच राहायचे. परंतु एक अंससुद्धा वाढले मात्र नाहीच. यामुळे ते काळजी करत असतात. माझ्याकरिता तर या गोष्टी रोजच्याच झाल्या होत्या. ताप, सर्दी तर मला काही भयंकर वाटतच नव्हते. मग काळजी का करायची? परंतु अखेरीस बापूजी खूप भावनाशील होऊन मला थोपटत म्हणाले, "तू तर मूल आहेस. उगवत्या रोपाला जर मी पाणी पाजले नाही तर तो माझा भयंकर अपराध होईल. परंतु हे सर्व तुला सांगणे व्यर्थ आहे. तुला सांगत बसण्यापेक्षा तर मीच सर्व गोष्टींकडे लक्ष ठेवणे चागले होईल. तुझ्या या प्रकृतीकरिता मीच जबाबदार आहे." वगैरे. माझ्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. बापूजींचे हे प्रेम काही आगळेवेगळेच आहे!

जेवणाच्या वेळी माझ्या नोंदी पाहून बापूजींनी सही केली. घरून आलेली पत्रे त्यांनी वाचायला लावली. खप दिवसाेंनी कुटुंबाची माहिती विचारली.

अय्यंगार भेटायला आले होते. बापूजींची तर मान्यता आहे की "आपण स्वतःच आपल्यामधील भांडणे निपटवणे शिकायला पाहिजे. परंतु आता माझी पद्धत वेगळी आहे आणि तुमची पद्धत वेगळी आहे. मी तर इतकेच म्हणेन की 'अतोभ्रष्ट ततोभ्रष्ट' असे करू नका. एक तर तुमच्या पद्धतीने राज्य चालवा आणि योग्य निर्णय आणा, अथवा संपूर्ण सत्य आणि अहिंसेद्वारा. आता मधला कोणताही मार्ग नाही."

ते गेल्यानंतर माधवराव अणेसाहेब आले. दर्यागंजच्या मुसलमानांमधील अबदुल गनीसाहेब, मौलाना हबीब उल रहमानसाहेब हे प्रमुख होते. त्यांनी रोजप्रमाणे मुसलमानांना त्रास होत असल्याची तक्रार केली. बापूजीसुद्धा खूप अस्वस्थ आहेत. डॉ. सूर्यकांत आणि शन्नादेवी आले. आपल्या भगिनींचे हरण करण्यात आल्याबद्दलची लाहोरमध्ये एक परिषद भरवण्यात आली होती आणि मृदुलाबहेन आणि रामेश्वरीबहेन त्या परिषदेकरिता गेल्या होत्या. त्या तेथील धक्कादायक गोष्टी सांगत होत्या. त्यांनी तर सदुसष्ट भगिनींना परत आणण्याचा खूप प्रयत्न केला. हिंदू भगिनींना अशीसुद्धा भीती वाटत होती की आता समाज आपल्याला परत घेणार नाही. आपण जिथे आहो तिथेच बऱ्या आहो. या लोकांची खूप

समजूत घालावी लागली. आजच्या प्रवचनात भगिनींसंबंधी जनतेचा धर्म काय असायला पाहिजे यासंबंधीसुद्धा बापूजींनी बरेच काही सांगितले. श्रीनगरमध्ये आम्ही जिथे उतरलो होतो त्या शेठीसाहेबांनी काश्मीर सोडले. त्यांना खाण्यापिण्याची खूप ददात सहन करावी लागते आहे. खूप दुःखद गोष्ट आहे.

बापूजींची कताई, माती, भोजन, वगैरे रोजप्रमाणेच सुरू आहे. आजच्या प्रार्थनाप्रवचनात चिठ्या तर खूप आल्या होत्या, परंतु रेडिओवर ध्वनीमुद्रण पंधरा मिनिटांपेक्षा जास्त करता येत नसल्यामुळे प्रवचन पंधरा मिनिटातच आटोपते घ्यावे लागले.

एका चिठ्ठीत एका निर्वासित भाईने येथून मुसलमानांना काढून टाकण्यात यावे म्हणून उपवास करण्यासंबंधी लिहिले होते. त्याच्या उत्तरात बापूजी म्हणाले,

> "यांच्या उपवासात शुद्ध अधर्म आहे. परंतु ज्याला अधर्मच करायचा असेल त्याला कोण अडवू शकतो? कोणत्याही व्यक्तीपेक्षा उपवासाबद्दलचे माझे ज्ञान जास्त आहे असे मी समजतो. याचे कारण या शस्त्राचा शोध लावणारा मीच आहे. यामुळे जाहीर उपवास कशासाठी करायचा याचा संपूर्ण विचार केला पाहिजे.
>
> "दुसरी बातमी अशी कळली आहे की विद्यार्थी संप करून जे ठरवतात तेच करणार आहेत. अशा प्रकारे संप करताच येत नाही. मी या बाबीचासुद्धा तज्ज्ञ आहे आणि इतकेच नाही तर अनेकदा मी संपांचे संचालनही केले आहे. प्रत्येक उपवास वा संप योग्य नसतो.
>
> "दिवसा माझ्याकडे बरेच शरणार्थी आले होते. त्यांच्यावर जे अनन्वित अत्याचार झाले त्याची दुःखद हकिगत त्यांनी सांगितली. त्यांनी मला असेसुद्धा सांगितले की मी त्यांच्याकडे मुळीच लक्ष देऊन राहिलेलो नाही. ही हकिगत मुळीच खरी नाही. मी त्यांच्या कल्याणाकरिताच इथे पडलेलो आहे, नाही तर मला इथे काय काम होते? परंतु माझी अवस्था एक तर मला स्वतःलाच कळू शकते वा त्या एका ईश्वराला. आज माझे कोण ऐकतो? एक काळ असा होता की मी एक शब्द जरी उच्चारला तरी लोक तो ऐकायला तयार असायचे. ही गोष्ट खरी आहे की त्या वेळी मी अहिंसक सेनेचा सेनापती होतो. आज तर माझे अरण्यरूदन सुरू आहे. तुम्ही तुमच्या सर्व तक्रारी करता. घरांची आणि खाण्यापिण्याची व्यवस्था करण्याचे सांगता. असे

करण्याचा तुम्हांला पूर्ण हक्क आहे. परंतु याचबरोबर तुम्हांला जी कोणती कामे सोपवण्यात येतात ती सुद्धा तुम्ही पूर्ण प्रामाणिकपणे करायचा प्रयत्न केला पाहिजे. आज राज्यकारभार चालवणारे माझे मित्र आहेत. परंतु याचा अर्थ असा नाही की मी म्हणतो तसेच चालते. आणि का चालायला पाहिजे? मित्र म्हणून ते माझे बोलणे ऐकून घेतात. त्यावर अंमल करायचा की नाही हे त्यांच्या इच्छेवर अवलंबून आहे. मी काही परमेश्वर तर नाहीच. यामुळे मी गर्वाने काहीही सांगू शकत नाही. परंतु मला वाटते की माझे म्हणणे कोणी थोडे जरी ऐकले असते तरी अशा अवदशेची वेळ आली नसती. परंतु मी चूक करतो आहे असे यांना वाटत असेल.

"कराची आणि सिंधमध्ये आज हिंदू आणि शीख राहू शकत नाहीत. सिंधमधून इथे येण्यापूर्वी ते सर्व गुरुद्वारात एकत्रित झाले होते. त्या वेळी त्यांच्यावर तिथे हल्ला झाला होता. त्यांचे सरकार म्हणाले होते की आणि आम्ही लाचार आहो, आमचे काही चालत नाही. जे झाले आणि होत आहे ते अडवण्याकरिता आम्ही असमर्थ आहो. असे कोणतेही सरकार म्हणू शकते काय? मी तर दोन्ही सरकारांना म्हणेन की तुम्ही जर असहाय असाल, तुमच्यात जर काही करण्याची शक्ती नसेल तर हा मार्ग मोकळा करणेच चांगले होईल. मग जनता जरी लुटारू झाली तरी हरकत नाही. कोणतेही जरी सरकार असले तरी ते जनतेला मरू देऊ शकत नाही. जनतेला मरू देण्यापेक्षा तर आधी त्यांनी स्वतःचे अस्तित्व मिटवायला पाहिजे."

आज बापूजींनी सरकारला जे सुनावले त्याचा जनतेवर फार चांगला परिणाम झाला आहे. प्रार्थनेनंतर फिरत असताना रामेश्वरीबहेन होत्या. मृदुलाबहेनसुद्धा आल्या होत्या. सिंधपेक्षा पंजाबमध्ये जास्त रक्तपात झाल्याची बातमी त्यांनी सांगितली.

बापूजींनी प्रवचन तपासले आणि लिहून काढले. तेवढ्यात पंडितजी आले. ते ३५ मिनिट बापूजींबरोबर एकटे बसले. पंडितजी येतात तेव्हा तर त्यांचा चेहरा अतिशय उतरलेला असतो. परंतु जाताना निरोप घेतात तेव्हा त्यांचा चेहरा तितकाच प्रफुल्लित आणि हळवा झालेला असतो. आणि ते गेल्यानंतर बापूजी तितकेच चिंतनात गढलेले असल्यासारखे दिसत असतात. दिवसभर लोकांच्या विविध प्रकारच्या समस्या सोडवण्यात, रक्तपाताच्या त्रासदायक गोष्टी एकण्यात आणि रात्री पंडितजींनी सांगितलेल्या दिवसभरात झालेल्या गंभीर तसेच दुःखाने भरलेल्या गोष्टी ऐकून त्यावरील उपाययोजना सुचवण्यातच बापूजींचा वेळ जात असतो. या सगळ्या मोठ्या लोकांच्या गोष्टींचा त्रास सर्वसामान्य

जनतेलाच भोगावा लागत असतो. यामुळे राजकारणी लोकांचा अंतर्गत विचारविनिमयच भयंकर असतो. वडील ज्याप्रमाणे मुलाच्या अप्रिय जबाबदाऱ्या स्वीकारतात त्याप्रमाणे पंडितजींच्या डोक्यावरील हे ओझे बापूजी बरेचसे हलके करत असतात.रात्री तर बापूंमध्ये धैर्याचा आणि शौर्याचा अपूर्व संगम दिसून येत असतो आणि त्याआधारे तेआपला मार्ग काढत असतात.

बिरला भवन, नवी दिल्ली,

८ - १ - '४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. काकासाहेब कालपासून इथे आलेले आहेत. यामुळे आज ते प्रार्थनेत होते. प्रार्थनेनंतर काकासाहेब आत बसले. बापूंनी त्यांना विचारले, "तुम्हाला वेळ हवा असेल ना?" काकासाहेब म्हणाले, "मिळाला तर ठीक, नाही तर नाही."

बापूजी म्हणाले, "असे म्हणाल तर राहूनच जाल. माझ्यावर तर आता कामाचे जितके ओझे आहे तितके कधीही नव्हते. हे पाहून मला असे वाटते की आता माझी अखेरची वेळ आली आहे. हे सर्व काम पाहून मला वेड कसे लागत नाही? वा ईश्वर मला कसा काय निभवून घेतो हेच आश्चर्य आहे. माझी स्थिती ही अशी आहे."

बापूजींची गोष्टसुद्धा खरी आहे. बापूजींकडे मुलाखतींकरिता येणारांची अगदी रीघ लागलेली असते, कागदपत्रे तर इतकी काही पाहावी लागत असतात की त्यांना काही सीमाच नसते. त्यात त्यांची प्रकृतीही चांगली नाही.

काकासाहेबांशी गोष्टी करत असताना बापूजी थोडा वेळ आडवे झाले. दहाएक मिनिट डोळे मिटलेले होते. दरम्यान फिरायची वेळ झाल्याने मध आणि गरम पाणी घेऊन फिरण्याकरिता उठले. मी बापूजींजवळ हाताने लिहिण्याकरिता कागद दिले.

फिरत असतानाही काकासाहेब होते. भाईसाहेबांनी भावलपूरच्या दंग्याची गोष्ट केली. रोज काही ना काही नवीनच सुरू असते. कठूनही शांततेची बातमी येतच नाही. बापूजीसुद्धा खूपच अस्वस्थ झाले आहेत. मी मालीशची तयारी केली. मालीश सुरू असताना बापूजी बंगाली पाठ करत होते. तेव्हाच मी म्हणाले, "बापूजी आज तुम्ही आरामच करा ना. किती वेळेपासून वाचत आहा?" बापूजी म्हणाले, "आता तर मलाही वाटते की आराम करायची वेळ जवळ आली आहे. मग तर खदखद हलवून जरी तू जागे करण्याचा प्रयत्न केला तरी मी उठणार नाही. तू पाहा तर खरे की पत्रांचा किती मोठा ढीग झाला आहे? दुसरीकडे दररोज भयंकर अशांततेच्या बातम्या येतच असतात. आपण कोणत्या कसोटीतून जात आहो याचा विचार तर तू आणि मीच करायचा आहे. आपण जागे आहो की या बिरला भवनात आल्यानंतर आपल्याला झोप लागली आहे? तू याचा खूप विचार केला पाहिजे."

मी तर एक शब्दही बोलले नाही आणि गुपचूप माझे काम करत राहिले. आंघोळ करत असताना आज बापूजींची हजामत करायचा दिवस होता. पत्रे लिहायला वेळ मिळत नसल्यामुळे त्यांनी हजामत करायचा रेझर हाती घेतला आणि मला पेन आणि कागद आणायला सांगितले. आणि स्वतःच हजामत करत करता हे पत्र लिहवून घेतले -

"गेल्या दोन दिवसांपासून काकासाहेब इथे आहेत. मोठ्या मुश्किलीने मी जेव्हा वेळात वेळ काढला तेव्हा कुठे मला त्यांच्याशी हिंदुस्तानी आणि इतर गोष्टींसंबंधी बोलता आले. ते जर स्वतःहोऊन बोलले नसते तर ते इथे कितीही आठवडे थांबले असते तरी मला त्यांच्याशी बोलण्याकरिता वेळ मिळाला नसता. दिवसा मला अनेक स्त्री-पुरुष भेटायला येत असतात. किती तरी पत्रांचा ढीग लागलेला आहे. 'हरिजन'शी संबंधित काम करायचे राहिलेले आहे. क्षणाचासुद्धा वेळ नाही. सामान्यपणे मनू माझी दाढी करत असते. परंतु आज हे काम मी तिच्याकडून काढून घेतले. मी आंघोळीच्या टबात पडून गालावरून वस्तरा फिरवतो आहे व मनूला पत्राचा मजकूर सांगतो आहे.

"पाहिजे तशी माझी प्रकृती चांगली नाही. याचा अर्थ रामनामावरील माझी श्रद्धा कमी पडते. . . . ने राजकोटला जायला पाहिजे. इथे राहून तो स्वतःची आणि इतरांची फसवणूक करील. माणूस स्वतःचाच शत्रू असतो. दुसरा कोणीही त्याचा शत्रू असू शकत नाही. याचप्रमाणे जगातील दुसरा कोणीही आपल्याला हानी पोहोचवू शकत नाही.

"आश्रमात राहण्याचा मोह तू सोडून दिला पाहिजे. अजूनही तिथे जे थोडेसे लोक राहिले आहेत त्यांना मी सांगितले की तुम्हांला तुमच्या पायावर उभे राहता येत असेल तरच आश्रमात राहा.

"नियंत्रण काढल्यामुळे जो फायदा झाला तो होणार असल्याबद्दल मला कधीही शंका नव्हती. सरकार घाबरत होते कारण हितसंबंधांना धक्का लावायला ते घाबरत होते. परंतु सरकार अशा प्रकारे चालू शकते काय?

"माझ्याबद्दल काहीही निश्चित नाही. अजूनही इथे बरीच आग धुमसते आहे. तिचा केव्हा भडका उडेल हे कोणीही सांगू शकत नाही."

* * *

"तुमचे इंग्रजीत लिहिलेले पत्र मिळाले. पहिली गोष्ट म्हणजे त्याला उत्तर देण्याकरिता उशीर झाला याकरिता माफी मागतो. मला क्षणाचासुद्धा वेळ नाही. आतासुद्धा टबात पडून दाढी करताकरता मनूला मी या पत्राचा मजकूर सांगतो आहे. माझी अवस्था ही अशी आहे.

"भावलपूरची परिस्थिती हाताबाहेर गेली आहे (पाहा "विलयाचा सिद्धांत", डिसेंबर १३, १९४७). बिघडलेल्या परिस्थितीत कोण सुधारणा करील? मला फार काळजी वाटते. पंडितजी (जवाहरलाल नेहरू) दिवसातून एकदा तरी येतात. मी त्यांच्याशी बोलेन. मी तिथे गेल्याने काहीही फायदा होणार नाही. मी जर इथे काही साध्य करू शकलो तर त्याचा संपूर्ण भारतावर परिणाम होईल. एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी पळत राहिल्याने काहीही साध्य करता येणार नाही. मला इथेच करायला वा मरायला पाहिजे. शूराप्रमाणे मेलो तरी त्याचा बराच फायदा होईल. ईश्वरेच्छा काय आहे ते पाहू या. आपण सर्व त्याच्या हातात आहो.

"तेथील लोकांना सोडून तुम्ही इथे धावपळ करत येऊ नका. तुम्ही तिथे शूराप्रमाणे मेला तरी ती गोष्ट भावलपूरकरिता हितावह होईल."

* * *

आंघोळ करत असताना इतके लिहवून घेतले आणि बाहेर सुचेताबहेन कृपलानीजी वगैरे आलेले असल्यामुळे अजून लिहवून घेतले नाही. कीकीबहेनने सिंधच्या परिस्थितीविषयी सांगितले. बापूजींनी उत्तर दिले, "त्यांचे वर्णन तर मी खूप खूप ऐकले आहे. परंतु काँग्रेसचा सक्रिय पुढारी मेला आहे असे काही माझ्या ऐकिवात आले नाही. तुम्ही हे जे वर्णन केले आहे त्याऐवजी 'किकीबहेन तेथील भगिनींची सेवा करत असताना त्यांच्यावर हल्ला झाला आणि त्यात त्या मरण पावल्या' असे जर मी ऐकले असते तर किती चांगले झाले असते? दोनच दिवसात असे काही शौर्य निर्माण झाले असते की त्याच क्षणी आपोआप शांतता स्थापित झाली असती. आता वेळ गोष्टी करायची, उपदेश करायची वा वर्णन करायची नाही. काम संपल्यानंतरच आराम करण्याची आहे."

रोजप्रमाणे स्थानिक मुसलमानभाई आले. दुपारच्या वेळी कातले आणि थोडा टपाल पाहिला. रुक्मिणीबहेन एरुळकर आल्या.

दुपारी सरदारदादा आले. बापूजींची सर्दी आज तर चांगलीच वाढली आहे असे वाटते. बापूजींनी विनोद केला की, "तुम्हाला तर शंभर वर्षे जगायचे आहे ना? आणि जगायलाच पाहिजे." लगेच सरदारदादांनी उत्तर दिले, "अट इतकीच आहे की तुमचे १२५ तर माझे १००. नाही तर नाही. "

पट्टणीसाहेबसुद्धा भेटायला आले होते. ठक्करबापा आणि हरिजी तर भेटण्यापुरतेच आले होते. मीरपूरच्या निर्वासितांनी बापूजींना खूपच रडतभेकत आपल्याला कशा हालअपेष्टा सहन कराव्या लागल्या होत्या ते सांगितले. हे ऐकून तर काही काळ ऐकणारांचाही थरकाप झाला. प्यारेलालजी एका निर्वासित भगिनीला घेऊन आज ढाक्याहून आले. त्यांना सर्व 'दीदी' म्हणतात. हिंदी कळते असे वाटत नाही. परंतु चेहऱ्यावरून हुशार वाटतात. जवळपास चाळीसेक वर्षाच्या असतील. भटियालपूरमध्ये प्यारेलालजी जिथे काम करत होते, त्या गावातीलच या भगिनी आहेत.

पंडितजीसुद्धा धावती भेट घेऊन गेले. रात्री शेख साहेबांबरोबर परत येणार आहेत. विशेषेकरून तर बापूजींची तब्येत पाहायलाच आले होते.

आजच्या प्रवचनात बापूजी म्हणाले -

> "एका बंधूने अशी तक्रार केली आहे की काल दुपारी साडेतीन वाजता त्यांनी मला पत्र लिहिले होते, परंतु मी त्याचे उत्तर दिले नाही. मला असंख्य पत्रे येत असतात, आणि काही वेळा तर मला कळत नसलेल्या भाषेत ती लिहिलेले असतात. असे असेल तर त्या भाषेतील माहीतगार त्या पत्रात काय आहे हे जोपर्यंत मला समजावून सांगत नाही तोपर्यंत मी उत्तर लिहू शकत नाही. परंतु फार महत्त्वाची हकिगत असेल तर ती सांगितली जाते.
>
> "दुसरा एक असा प्रश्न उपस्थित झाला आहे की 'हरिजनांनी दारू सोडावी म्हणून तुम्ही बोलता, मग इतरांनाही असे का सांगत नाही? पैसेवाल्यांनी आणि शिकल्यासवरलेल्या लोकांनी दारू सोडण्याची आवश्यकता नाही काय?' हा प्रश्न अस्थानी आहे. एक व्यक्ती पाप करत असेल तर दुसऱ्यानेही पाप केले पाहिजे काय? आणि जो शिक्षित वर्ग आहे, लष्करात काम करणारा आहे त्यांना काय समजावून सांगायचे? गरीब आणि मजूरवर्ग तर दिवसभर खूप मजुरी करून येत असतो आणि

त्याला दुसरे कोणताही मानसिक वा शारीरिक आराम मिळत नाही. यामुळे ते लोक दारू पीत असतात. परंतु पैसेवाल्या लोकांकरिता तर हे कारण असू शकत नाही. आणि मला लष्करच मान्य नसल्यामुळे लष्करातील लोकांच्या दारू पिण्याबद्दल मी कसा बोलू शकतो? परंतु हिंदुस्थानात असे अनेक इंग्रज आणि हिंदू आहेत की जे दारूच्या व्यसनात अडकलेले नाहीत.

"विद्यार्थ्यांच्या संपाविषयी मला असे पत्र मिळाले आहे की त्यात काँग्रेसी विद्यार्थी नाहीत, साम्यवादी विद्यार्थी आहेत. साम्यवाद्यांचा म्हणा की समाजवाद्यांचा म्हणा देशसेवाच करायचाच हेतू आहे हे कळल्याने मला आनंद झाला. परंतु जोपर्यंत विद्यार्थी शिकतात तोपर्यंत त्यांचा एकच पक्ष असला पाहिजे आणि तो म्हणजे विद्या मिळवण्याचा. हिंदुस्थान जेव्हा स्वतंत्र नव्हता तेव्हा संप करण्यात आणि संप करवण्यात मी भाग घेतला होता. परंतु सर्वच संप अहिंसक असतात आणि सत्याधारित असतात असे मानण्याचे काही कारण नाही. आज देश भयंकर आणीबाणीच्या परिस्थितीतून जात असताना देशाला खऱ्या विद्यार्थ्यांची गरज असते. अशा परिस्थितीत जर असे संप केले तर आपण देशावरील संकटात भर घालू ही गोष्ट समजून घेतली पाहिजे.

"दुसऱ्या एका भाईने मला लिहिले आहे की तुम्ही पाकिस्तानमध्ये जाऊन तेथील भयानकतेचा सामना का करत नाही? तिथे जाऊन तुम्ही अत्याचाराविरुद्ध सत्याग्रह का करत नाही?

"मी तिथे कोणत्या तोंडाने जाऊ? इथेच आपण पाकिस्तानची जर पुनरावृत्ती करतो आहो तर तिथे जाऊन कोणाला काय सांगू? हिंदुस्थानात जर शांतता स्थापित झाली तर आजच आणि आताच मी पाकिस्तानकरिता रवाना होईन. इथेच राजधानीच्या शहरात हिंदू आणि शीख पागल झालेले आहेत आणि येथील सर्वच मुसलमानांना हाकलून लावले पाहिजे अशी त्यांची इच्छा आहे. आपण जर असे करू तर आपल्याकरिता ही फार लाजिरवाणी गोष्ट होईल. शिवाय पाकिस्तानमध्ये तर हिंदूंना आणि शिखांना राहण्याचीच इच्छा नाही तर सत्याग्रह कोण करील? आणि कोणासमोर? आज सत्याग्रह वा अहिंसा कुठे राहिली आहे? आज तर प्रत्येकाला

लष्कराचे संरक्षण पाहिजे. लष्कराला आपण ईश्वराचे स्थान दिले आहे असे वाटते. अजूनही मी म्हणेन की जर माझे ऐकाल तर संपूर्ण देशाचा चेहरामोहरा बदलून जाईल. सत्याग्रह तर प्रत्येक परिस्थितीत प्रत्येक प्रकारच्या वेळप्रसंगी उपयोगात येण्यासारखी गोष्ट आहे. परंतु याचे संचालन करणारा पाहिजे ना?

"आज माझ्याकडे काश्मीरचे, मीरपूरचे आणि भावलपूरचे लोक आले होते. हे सर्व इतके रंजले-गांजले असूनही विवेकपूर्ण गोष्टी करत होते. आणि पंडितजीबरोबरसुद्धा त्यांचे बोलणे झाले आहे आणि माझ्याकडून होईल ते सर्व मी करीन असे पंडितजींनी त्यांना सांगितले आहे. तिथे जरी युद्ध सुरू नसेल तरी एक प्रकारची लढाई तर सुरू असतेच ना? आणि अशा परिस्थितीत मार्ग काढून सर्वांना काढून आणणे कठीण गोष्ट असते. आपल्याजवळ तर पुरेशा गाड्यांची पण व्यवस्था नाही.

"भावलपूरमध्येसुद्धा भयंकर अत्याचार सुरू आहे. एका माणसाकडून जितके जास्तीतजास्त होऊ शकते तितके मी करण्याचा प्रयत्न करतो आहे. त्यांची अजून अशी तक्रार आहे की परप्रांतातून जर कोणी आला तर त्याला लगेच नोकरी मिळते, जे राज्यातून येतात त्यांना नोकरी मिळत नाही. मी सरदारसाहेबांना ही गोष्ट विचारली. तर ते म्हणाले की असा भेदभाव होऊच शकत नाही. असे असतानाही जर कोणावर अन्याय झालाच असेल तर तो ते सांगू शकतो."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले, किचलूसाहेब आणि शेखसाहेब आले. काश्मीरच्या गोष्टी सुरू होत्या. परंतु आज आम्ही बाहेर फिरायला गेलो. सरदारदादांच्या घरापर्यंत गेलो. आम्हांला पाहून सरदारदादांनी विचारले, "आता म्हणाल की आम्हांला करमत नव्हते म्हणून आम्ही बिरलाभवनबाहेर फिरायला निघालो." मणिबहेन आणि सरदारदादा दोघेही ऑफिसमध्ये काम करत होते. आमचे उत्तर ऐकून मणिबहेन म्हणाल्या, "ही पोरगी तर खेळण्याच्या पेटीशी खेळावे तशी खेळते आहे."

मणिबहेनने आम्हांला मुरमुऱ्याचे लाडू आणि बंगालमधून आणलेला फणसाचा मुरब्बा होता तो खाऊ घातला. परतलो तेव्हा बापूजींची तर झोपायची वेळ होऊन गेली होती. परंतु बापूजी तर इतके काही थकलेले होते की सायंकाळी ७-७.३० वाजताच झोपून गेले होते. उठून प्रवचन पाहिले.

. . . आजकाल फार दुःखी असतात. प्यारेलालजींबरोबर आलेली बंगाली बहेन तर खोलीबाहेरच पडत नाही. बापूजी मला म्हणाले, "तू यांच्याशी मिळूनमिसळून वागायला पाहिजे. परंतु या तर प्यारेलालजीशिवाय इतर कोणाशीही बोलतच नाहीत."

आजकाल बापूजींचा आहार असा आहे - सकाळच्या प्रार्थनेनंतर गरम पाणी आणि मध. परत ५.३० वाजता दोन चमचे मध आणि गरम पाणी. ९.३० वाजता जेवणात एक दिवस तीन पातळ खाकरे, कच्चीभाजी, दूध सोळा अंस, दोन संत्री, आणि एक सफरचंद. आणि दुसऱ्या दिवशी तीन केळी, सोळा अंस दूध (शिकरण करून) (केळी असतात तेव्हा गहू नाही.) त्याबरोबर संत्री आणि ग्रेपफ्रूट. मग आराम करून १२ वाजता दोन चमचे मध आणि गरम पाणी. थोडा सोडा. परत ३.३० वाजता माती घेतल्यानंतर गरम पाणी आणि मध. दर वेळी गरम पाणी एक पेला आणि मध दोन चमचे. ४ वाजता वाफाळलेली भाजी, संत्री वा रसाळ फळ आणि सोळा अंस दूध. आणि सायंकाळी सात वाजता गरम पाणी आणि मध. असे चालत असते.

रात्री रोजप्रमाणे पाय धुऊन कसरत केली आणि अंथरुणावर पडल्या पडल्या म्हणाले की "आज दिवशभर भेटायला येणारे खूप असल्यामुळे थकवा वाटतो. काश्मिरसंबंधी काही सरळपणे होईल असे वाटत नाही. शेखसाहेबांचा मेहुणा तर सर्वांना घेऊन इंदोरमध्ये बसला आहे अशीसुद्धा एक तक्रार आहे. जे होईल ते खरे." बापूजी काही खोल विचारात मग्न आहेत असे वाटते. आधीसारखे प्रफुल्लित वाटत नाहीत. ते काहीही असले तरी त्यांचा विनोद, काम नेहमीप्रमाणे सुरू असतात.

दररोज भेटायला येणारात ४-५ लोक तरी विदेशी असतातच. त्यांनासुद्धा बापूजी सांगत असतात की सध्या आमच्याकडे जी अशांतता आहे ती आमच्याकरिता भयंकर लाजेची गोष्ट आहे.

नातलगात एक लग्न होते. त्यासंबंधात नाराणदासकाकांचे एक पत्र होते. . . . ला बापूजींनी जे लिहिले त्यातूनसुद्धा आणीबाणीच्या या अशा वेळी जे काही सुरू त्यामुळे बापूजींना मुळीच उत्साह वाटत नसण्याचेच प्रतिबिंब दिसते -

> चिरंजीव विषयी आश्रमाला आणि (मला) दुःख होते. जे काही घडते त्यांचे मला मूक दर्शक राहावे लागते. प्रत्येकजण आपल्या स्वभावाप्रमाणे वागत असतो. नवीन त्याला अपवाद कसा असेल? या लग्नाबद्दल मी अगदीच उदासीन आहे. मला लिहिण्यामागे तुझा काय उद्देश

आहे? माझ्याकडून आशीर्वाद कसे मिळू शकतात? तू प्रवासाला सुरुवात केली याचा मला आनंद होतो.

बापूचे आशीर्वाद,

(हे पत्र नऊ तारखेला पोस्टात टाकले.)

बिरला भवन, नवी दिल्ली,

९-१-'४८

आज बापूजी प्रार्थनेच्या दहा मिनिटआधीच उठले. बापूजींनी . . . ला जे पत्र लिहिले त्यात काही सुधारणा करायची आहे काय असे मी बापूजींना विचारले. ते म्हणाले, "ज्या गोष्टींवर माझा विश्वास आहे त्या गोष्टींवर कनूचा तसेच नाराणदासचाही विश्वास असेल असे मी समजतो. अहिसला वा सत्याला कोणीही घाबरण्याचे कारण नाही आणि यांच्यात लपवण्यासारखेही काही नाही. माझा तर पूर्वीच्या काळातील श्लोकावरच विश्वास आहे - 'अक्रोधेन जयेत् क्रोधम्, असाधुं साधुना जयेत' (अक्रोधाने क्रोधाला जिंका आणि असाधुत्वाला सादुत्वाने जिंका.) यामुळे या श्लोकावर विश्वास असणारा आणि श्रद्धा ठेवणारा माणूस दुसरे काय म्हणू वा लिहू शकतो? आपण जर थोडेसेही नमते घेतले तर ते चालेल असे नाही. कोणाला काय वाटेल याची फिकीर करण्याची ही वेळ नाही. हा तर असा महायज्ञ आहे की ज्यात सर्वांग शुद्धीचाच निभाव लागू शकतो. इतर दांभिक एकानंतर एक खाली पडत जातील हे निश्चित आहे."

आपल्यासारख्या अनेकांचा जरी नाश झाला तरी सत्य आणि अहिंसेचा मापदंड तसुभरानेही कमी करता येऊ शकत नाही. मी स्वतः चुकांनी भरलेलो आहे. चूक करणार नाही अथवा होणार नाही असा अहं असू नये. परंतु ज्या चुका जाणीवपूर्वक होत नाहीत त्या क्षमेकरिता पात्र असतात.

"आज हे पाटनगर एक प्रकारची कैद भोगते आहे. हिंदुस्थान स्वतंत्र असूनही हिंदुस्थानच्या या राजधानीचे रक्षण पोलीस आणि सैन्य करत आहे. या सर्वांमध्ये मी बसलो आहे आणि पाहतो आहे. अहिंसेवर विश्वास असणाऱ्या व्यक्तींना आज हिंसक शस्त्रांचा आधार घ्यावा लागत आहे. यात माझी किती मोठी परीक्षा आहे? ईश्वराच्या या विचित्र इच्छेत किती मोठे रहस्य सामावलेले असू शकेल? परंतु मला तर करायचे वा मरायचे आहे. दिल्लीला शस्त्राच्या बळावर वाचवता येऊ शकते असे मानणारे फार मोठी चूक करत आहेत. दिलीलाच काय, संपूर्ण जगालासुद्धा एकच गोष्ट वाचवू शकते - ती आहे अंतःकरणापासूनची, हृदयापासूनची मैत्री."

"थोडासाही वेळ नाही. कागदांच्या ढिगाखाली पडलो आहे. आज इतकेच पुरे.

बापूजींची काही पत्रे केव्हाकेव्हा काव्यमय होऊन जात असतात. हे पत्र लिहिले नाही, एक पान लिहिले आहे. आणि या पानात अहिंसेवर जो महानिबंध - थिसीस - लिहिला आहे त्यातील शब्दप्रयोगात गूढ ज्ञान सामावलेले आहे.

फिरत असताना आज काही विशेष चर्चा झाली नव्हती. सद्यस्थितीबद्दलच गोष्टी झाल्या होत्या. बापूजी म्हणाले, "आपले पाप (देशाच्या पुढाऱ्यांनी घेतलेल्या निर्णयाचे) गावकऱ्यांना, निर्दोषांना भोगावे लागत आहे. आणि आपण तर आलेशान बंगल्यात मौजमजा करत आहो. प्रसंगोपात लोक उत्सवात वा मेजवान्यातही भाग घ्यायला चुकत नाहीत. यामुळेच दुःखी जनतेला स्वराज्य आले असल्याचे जाणवतच नाही. ज्याप्रमाणे आपल्या घरात कोणाचा मृत्यू झाला तर अशी पद्धत आहे की संपूर्ण कुटुंब थोडा थोडा वेळ शोकाचे पालन करते. यामुळे ज्या व्यक्तीवर संकट कोसळून पडत असते त्याला आपली सहानुभूती जाणवते. अशाच प्रकारे आपण सर्व लोकांनी दुःखी प्रजेला सहानुभूती दाखवण्याकरिता कोणता ना कोणता जर त्याग केला तर दुःखी लोकांना दुःख असतानाही आनंद झाला असता. परंतु आपण तोंडाने गोष्टी करतो, भाषण करतो की मला तुमच्याबद्दल सहानुभूती आहे, परंतु आचरणात मात्र आपण शून्य असतो. माझ्या स्वतःच्या मनात विचार येतो की मी एवढ्या मोठ्या महालात का राहतो आहे? माझ्या आवश्यकतेपेक्षा मला एक इंचसुद्धा जास्त जागा वापरण्याचा अधिकार नसायला पाहिजे. अशा प्रकारे प्रत्येक पुढारी, प्रत्येक बंगलापती विचार करून आपले आचरण करील तर देशावर संकट कोसळलेले असतानाही आपल्या मनात एक गौरवाची भावना राहील आणि या कडाक्याच्या थंडीत जे निर्दोष लोक - लहान मुलांना आणि भगिनींना जाणवणाऱ्या भयंकरतेमुळे निघणाऱ्या वेदनेच्या चित्कारांची तीव्रता थोडी शांत होऊ शकेल. परंतु हे सर्व मी कुठे सांगू? कोणाला सांगू? कोणाला ऐकायची फुरसत आहे? फुरसत असेलही तर ती केवळ मला आहे, इतर कोणालाही नाही असे म्हटले तरी चालेल."

बापूजींच्या मनोवेदना खरोखर बापूजीच समजू शकतात आणि सर्वांच्या ऐकू शकतात. दुसऱ्या कोणाचा तर 'हार्टफेल'च झाला असता. परंतु बापूजी दिल्ली, भावलपूर, सिंध आणि पंजाबची परिस्थिती ऐकून खूपच अस्वस्थ झालेले आहेत आणि त्याकरिता ते स्वतःलाच गुन्हेगार समजत आहेत. ते म्हणतात, "माझ्या अहिंसेचा आणि सत्याचा सूक्ष्मपणे विचार करण्यात, आचरणात मी निश्चितच काही चूक केली आहे आणि जे घडते आहे ते त्याचे प्रतिबिंब आहे. मी आचरत असलेलेल्या सत्य आणि

अहिंसेचे सिद्धांत शूरांच्या सत्य आणि अहिंसेचे आहेत असे मी समजलो होतो. शक्य आहे की ईश्वराने त्या वेळी मला आंधळे केले असेल. बरे झाले की जीवनाच्या समाप्तीच्या वेळी तरी मला जाग आली आणि तितक्याच बहाद्दुरीने मला मृत्यू व्हावा अशी ईश्वराला माझी प्रार्थना आहे. मला माझ्यापुरते इतके जरी करता आले तरी त्यात माझा विजयच आहे."

मालीश करत असताना बापूजींनी वर्तमानपत्रे पाहिली. बंगाली पाठ केला. आंघोळ करताना 'टर्कीश आंघोळीबद्दल' सांगितले त्या आंघोळीत "आधी कोमट, मग थोडे जास्त गरम आणि नंतर इतके गरम की ते सहन होऊ नये घ्यायचे असते. त्याचे शुल्कही भरपूर असते, पण गुणसुद्धा खूप आहेत."

सरदारदादा भेटण्यापुरतेच आले होते. आणि भावनगरचे मंत्रिमंडळसुद्धा जवळपास निश्चित झाले आहे. आज ते लोक येऊन बापूजींना भेटून जाणार आहेत. एवढ्याने आज हे प्रकरण संपेल.

उर्दू 'हरिजन'चा खप विशेष होत नसल्यामुळे फार तोटा येत असल्याबद्दल जीवणजीभाई बरेच काही सांगत होते. बापूजी त्यासंबंधात 'हरिजन'मध्ये लिहिणार आहेत. भावलपूरचे लोकसुद्धा आले आहेत. त्यांची इच्छा आहे की बापूजींनी स्वतः भावलपूरमध्ये येऊन तेथील परिस्थिती पाहावी. पंडितजी, मॅकडोनाल्ड आणि इतर काही लोक केवळ भेटण्यापुरते आले होते.

गोहिलवाडच्या प्रतिनिधीमंडळात बळवंतभाई, मोहनभाई मोतीचंद (गढवालवाले) वगैरे होते. नानाभाई भट्ट यांना भावनगरच्या जबाबदार राज्याचे प्रधानमंत्री करावे असे एक आवेदन आले होते. बापूजी म्हणाले, "माझी तर इच्छा आहे की रामराज्यात ज्याप्रमाणे वशिष्ठ ऋषी सल्लागार होते तसेच तुम्ही भावनगरच्या राज्याचे सल्लागार म्हणून नानाभाईंना नेमावे, इथे प्रधानमंत्री होण्यात त्यांची शोभा नाही. प्रजा आणि राज्यात संघर्ष झाला तर त्यांनी त्यांना जोडणाऱ्या साखळीसारखे व्हावे. त्यांनी आपले तंत्र शहरातही बदलायला नको. याला नानाभाई नाही म्हणतील असे मला वाटत नाही. सत्तास्थानी ते फार शोभून दिसणार नाहीत. त्यांचे स्थान शिक्षणातच असू शकते. हे सर्व मंत्री होतील तर प्रजा कोण राहील? जनता जर सूज्ञ असेल तर मंत्र्यांना ती जागे ठेवू शकते. जसे मंत्री सुशिक्षित पाहिजे तशीच जनतासुद्धा सुशिक्षित असली पाहिजे. आणि बळवंतरावांना पंतप्रधान बनवले पाहिजे असा माझा मनापासून सल्ला आहे. ते वर्षांपासून भावनगरचे मुरब्बी सेवक आहेत. आणि बळवंतरावांमध्ये प्रधानमत्री बनण्याची जी पात्रता आहे ती नानाभाईंमध्ये नाही. आणि नानाभाईंमध्ये जे गुण आहेत ते

बळवंतरावमध्ये नाहीत. संपूर्ण काठियावाडचे ओझे या काळात एकट्या ढेबरवर लादण्याला काही अर्थ नाही." एका गोष्टीची काळजी घेत अजून एक विशेष सल्ला देत बापूजी म्हणाले, "या उत्सवात पट्टणींना सन्मानाने समोर ठेवले पाहिजे. हा माझा व्यक्तिगत सल्ला आहे. परंतु त्यांना बोलावून त्यांच्यावर जर तुम्हाला टीका करायची असेल तर मात्र न बोलावलेले बरे. आता जर कोणत्याही प्रकारचा पूर्वग्रह ठेवाल तर सद्यस्थितीत तुमची परागतीच होईल. त्यांच्याजवळ खूप खूप शिकण्यासारखे आहे. अनेकदा तर त्यांच्या अनुभवानेच या राज्याचे नाव उज्ज्वल करता येईल. परंतु हा तर मी न मागता दिलेला सल्ला आहे. हा जर तुमच्या गळी उतरत नसेल तर पूर्णपणे फेकून द्या. असे म्हणू नका वा समजू नका की बापूला हे आवडते म्हणून असे केलेच पाहिजे, इतके तर करावेच लागेल. मला खुश करायला काही जरी कराल तरी मला खुश करणारांची आणि माझीही परागतीच होईल."

आज तर अनेक निर्वासितही इथे आले आहेत. काही निर्वासितांचे येथील मुसलमानांशी संबंध असल्याने त्यांनी अशा अटी ठेवल्या आहेत की येथील मुसलमानांनी आपले घर त्यांना द्यावे आणि त्यांना तेथील हिंदूंचे घरे मिळावे. अशा व्यक्तिगत संबंधांमुळेच आतल्या आत देवाणघेवाणी झाल्या आहेत. परंतु, सरकार विदेशी राजदूतांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी घरे रिकामी करायला लावत आहे, हे बापूंना अजिबात आवडले नाही. सरदार, जनता आणि पुढारी एकामागोमाग एक अशा चुका करत आहेत की एकाचा अंत होतो न होतो, तोच काही तरी नवीन समस्या उभी राहते.

आजच्या प्रार्थनाप्रवचनात बापूजी म्हणाले,

"भावलपूरमध्ये एक मंदिर होते आणि आजही आहे. आता ते हिंदूंच्या ताब्यात नाही. त्याचे प्रमुख माझ्याकडे आले. मुले अतिशय कठीण परिस्थितीत आहेत. थोड्याशा भगिनींना वाचवू शकले परंतु बऱ्याचशा भगिनींना वाचवू शकले नाही. आता तिथे ज्या राहिल्या आहेत त्याचे काही तर करायलाच पाहिजे. एक माणूस म्हणून जितके करू शकत असेल तितके तर मी करतोच आहे. बाकी तर पण एकमेकांच्या राज्यांमध्ये हस्तक्षेप तर करता येऊ शकत नाही, यामुळे मी आणखी काय करू शकतो याची हमी मी देऊ शकत नाही. मी तर म्हणेन की ईश्वराशिवाय इतर कोणावरही विश्वास ठेवणे मूर्खपणाच होईल.

"आज माझ्याकडे काही विशिष्ट बंधुभगिनी आले होते. दुसऱ्या देशाच्या वकिलांची राहण्याची व्यवस्था व्हावी म्हणून त्यांना सरकारने घर सोडण्याची सूचना दिली आहे. यात खरे

किती आहे हे मी सांगू शकत नाही. या लोकांचा दावा आहे की त्या घरांमध्ये जे मुसलमान राहत होते त्यांच्याशी त्यांनी घरांची अदलाबदल केली आहे. परंतु त्यांच्याजवळ कोणताही पुरावा नाही. असे जरी असले तरी या हकिगतीसंबंधात मी एक गोष्ट म्हणेन की एखाद्या घरात जर एखादा माणूस राहत असेल तर त्याला घर खाली करून तुम्ही रस्त्यावर जाऊन राहा वा तुम्ही वाटेल तिथे राहा पण हे घर तुम्हांला खाली करावेच लागेल असे सरकार म्हणू शकत नाही. विदेशातील राज्याच्या वकिलाकरिता सरकार निश्चितच घर खाली करून मागू शकते, पण त्यात राहणाऱ्या माणसांचे समाधान झाल्यानंतरच ते असे करू शकते. असे जरी असले तरी मी काही सरकारी माणूस नाही. सरकारमध्ये माझे कोण ऐकतो? आणि या लोकांनाही मी म्हणेन की तुमच्याजवळ कोणताही पुरावा नाही. यामुळे लुटारूंप्रमाणे तुम्ही या घरात घुसलेला तर नाही ना असेही सरकारला वाटू शकते. ते काही जरी असले तरी सरकारने काही व्यवस्था केल्यानंतरच तुम्ही घर सोडायला पाहिजे.

"एका भाईने मला सांगितले आहे की तुम्ही बिरला भवनमध्ये राहता. तिथे गरीब लोक येऊ शकत नाहीत. भंगी कॉलनीऐवजी तिथे का?

"मी दिल्लीत आलो तेव्हा दिल्लीत मारामाऱ्या आणि कत्तली सुरू होत्या. आणि भंगीनिवास शरणार्थ्यांनी भरलेला होता. यामुळे मी इथे राहिलो. मला काही या महालात राहण्याची हौस नाही. आणि सरकारने भंगीनिवास शरणार्थ्यांच्या सत्कार्याकरिता वापरेला असल्यामुळे ते रिकामे करून घेणे मला पटले नाही. ज्यांना यायचे असेल ते इथेही येऊ शकतात. मी तर इथे पडल्यापडल्याच जितक्या लोकांना आश्वासित करता येऊ शकते तितक्यांना तर मी करतोच आहे."

बाकी तर रोज जसा बापूजींचा कार्यक्रम राहत असतो तसेच. प्रार्थनेनंतर फिरत असताना श्रीमन्नारायणची होते. नंतर ब्रिटनच्या हवाई विभागाचे अंमलदार आर्थर आले. विमान कसे तयार होते, किती तासात कुठे पोहोचते वगैरेची बापूजी त्यांच्याकडे बारीकसारीक चौकशी करत होते. काही विनोदही सुरू होता. तेवढ्यात बापूजी म्हणाले, "आता वर जाण्याशिवाय माझ्याजवळ काही दुसरा मार्ग आहे असे दिसत नाही. मला तर 'करायचे वा मरायचे आहे'. . . . हो, अनेकदा आकाशात मी विमानाचे हिरवे, लाल दिवे पाहत असतो. तेव्हा ते आकाशातील चांदण्यांसारखेच दिसतात. माणसाच्या बुद्धीने

एकीकडे असे अजब शोध लावले आणि दुसरीकडे माणून आपल्या पागलपणाच्या आणि दुर्बुद्धीच्या आहारी जाऊन मारामारी आणि कापाकापी करतो आहे. हे पाहून आपण स्तब्ध होतो आणि विचार करू लागतो. माणसाची ही अल्पशी बुद्धी काय करू शकते? परंतु बापूजी त्यांनी सांगितलेल्या गोष्टीत इतका रस घेत होते की अखेरीस मी म्हणाले, “बापूजी आता तुम्ही हवाई जहाज चालवणे शिकायला पाहिजे. नाही काय?” बापूजी म्हणाले, "हो, आपण जसे एकमेकांशी गप्पा मारत असतो तसेच हा विमानाचा गोळाही दररोज आपल्या सगळ्यांबरोबर गप्पा मारत नसतो काय? या अशा गोष्टीमुळे विमानाचा कॅप्टनही खुलला.”

परत दुसऱ्यादा पडितजी आले. त्यांच्याबरोबर एँडरसनसुद्धा होते. ते बसलेले असतानाच रामेश्वरीबहेन नेहरू आल्या. यामुळे प्रवचन पाहायला थोडा वेळ झाला. बापूजींनी गरम पाणी घेतले, पाय धुतले, कसरत केली आणि साडेनऊ वाजता झोपायची तयारी. डोक्याला रोज तेल तर मीच चोळत असते. तेवढ्या वेळेत बापूजी सर्वांचे हालहवाल विचारून घेत असतात. काठियावाडसंबंधी बोलत असताना बापूजी मला म्हणाले, “मला वाटते की भावनगर राज्याचे मुख्यमंत्री म्हणून बळवंतरावमध्ये जास्त पात्रता आहे. असे जरी असले तरी उद्या जेव्हा अनंतराय येतील तेव्हा त्यांची इच्छा काय आहे हेही तू समजून घेशील. आपण राजा, जनता आणि दिवाण या सर्वांना मनातून काय वाटते हेही समजून घेतले पाहिजे. काही गोष्टी जरी माझ्यापर्यंत येऊ शकत नसल्या तरी तुझ्यापर्यंत येऊ शकतात. कोणाला दुखवून आपल्याला काहीही करायचे नाही, विशेषकरून महाराजांना आणि अनंतरायना. आता ही जबाबदारी तुझ्यावर.”

बापूजी तर संपूर्ण हिंदुस्थानकडे लक्ष देत असताना लहानशा भावनगरलाही विसरत नाहीत. त्याच्यावर अन्याय होऊ नये म्हणून ते असीम काळजी घेत आहेत. मला तर रोज विचार पडत असतो की बापू कसे आहेत ! आणि देवाने यांना कशाकरिता पाठवले आहे !

बिरला भवन, नवी दिल्ली,

१०-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजींना आलेला टपाल मी व्यवस्थित केला. फाडण्यासारखी पत्रे फाडली. आणि लिहिण्याच्या उपयोगी पडतील असे कागद बाजूला ठेवले. ज्यांची तिकिटे आली होती त्यांना मीच उत्तर लिहून टाकले आणि ती पत्रे बापूजींना वाचायला दिली. आज बापूजींतर्फे सहाएक पत्रे तर मीच लिहिली. सर्वांच्या वेगवेगळ्या तक्रारी होत्या. कोणी मुसलममान हिंदूंना त्रास देत असल्याची तक्रार करत होता तर कोणी हिंदू मुसमानांना त्रास देत असल्याची तक्रार करत होता. सर्वांना पोच दिली की सध्या बापूजी खूप कामात आहेत, आणि तुम्हा सर्वांच्या त्रासनिवारणार्थ इथे बसलेले आहेत. 'करायचे अथवा मरायचे' असा त्यांनी निश्चयच केला आहे. बाकी तर त्यांची जी प्रार्थनाप्रवचने रेडिओवर वा वृत्तपत्रांध्ये येत असतात त्यांचा जर तुम्ही अभ्यास केला तर तुम्हांला प्रकाश मिळेलच." हे पाहून बापूजी खुशसुद्धा झाले. जेव्हापासून मी बापूजींजवळ आले आहे तेव्हापासून अनेकदा तर अशा प्रकारचे उत्तरे दिले जात असतात. परंतु या आणीबाणीच्या काळात बापूजींना अशी पत्रे जर दाखवली नाही तर बापूजींना ते आवडत नाही. बापूजी म्हणतात, "लिहिणारा वर्ग किती आशेने लिहीत असतो? आणि मी उत्तर देऊ शकत नाही हेही ठीक. परंतु माझ्याबद्दल वाटणाऱ्या दयेमुळे ही पत्रे मला न दाखवण्याचा तुमच्यापैकी कोणालाही हक्क नाही. ज्यांना माझी गरज असेल तर तेच माझ्यावर दया करतील. नाही तर नाही." अशाच प्रकारे बापूजींची व्याख्यानेसुद्धा एकदा तरी चांगल्या प्रकारे ऐकली पाहिजे. यामुळे आलेला सर्व टपाल तर दाखवावाच लागत असतो.

थोडा वेळ बापूजींचा डोळा लागला होता. फिरत असताना आज तर कोणी विशेष नव्हता. आम्ही घरातील लोकच होतो. अनेक प्रकारे बापूजी किती तरी जास्त गंभीरच वाटत असतात. आम्ही मुले तर मिळूनमिसळून हसतखेळत असतो. परंतु मला स्वतःला मात्र बापूजी दिल्लीच्या वातावरणात दुःखी असल्याचे, त्यातून काही मार्ग काढण्याच्या विचारात असल्याचे जाणवत असते. ते काहीही जरी असले तरी बापूजींना वातावरण बदलत चालल्याची जाणीव होते आहे असे वाटते. राजकोटला जाण्याची इच्छा आहे असे वाटते. . . . ला म्हणाले, "माझे मन इतके काही अस्वस्थ आहे की आता मला हे सर्व पाहण्याची इच्छा नाही. कोणते पाऊल कशाने भरेल याची मला कल्पना नाही."

आंघोळ करताना बापूजींनी एक लहानशी डुलकी घेतली. बापूजी खूप थकलेले आहेत हे तेव्हासुद्धा जाणवत होतेच. बापूजी म्हणत असतात की मी कामाने थकत नाही. परंतु लोक गोलगोल गोष्टी करतात, आपल्या स्वतःच्या निश्चयावर ठाम राहत नाहीत आणि मला खुश करण्याकरिता एक गोष्ट सांगतात आणि या बिरला भवनच्या फाटकाबाहेर पडत नाही तोच कोणाबरोबर कशी चाल चालायची याचे आराखडे ते आखू लागतात. शिवाय . . . मधील मतभेद दिवसेंदिवस उग्र होत चालले आहेत. कोणाला समजावून सांगू शकत नाही. पाकिस्तान मान्य करत असताना आपण ५५ कोटी रुपये देण्याचे कबूल केले होते. त्याबद्दलही मतभेद झाले आहेत. आपण जर असे शब्द फिरवू लागलो तर आपली काय किंमत? ज्याला आपल्या शब्दाची किंमत नसते तो माणूस कुचकामाचा असतो.

आंघोळ करत असताना बापूजींनी मला हे सांगितले. बापूजी काही तरी गंभीर विचारात आहेत असा जो माझा अंदाज होता तो बरोबर आहे असे यामुळे मला वाटू लागले. ते या अतिशय गंभीर समस्येमुळे आणि आतील दावानलामुळे खूप अस्वस्थ आहेत.

स्थानिक मुसलमानभाई आले. त्यांनी बापूजींना रोजचीच हकिगत सांगितली. बापूजी म्हणाले, "आतापर्यंत तुम्ही जितके दिवस वाट पाहत होता तितके दिवस आता यापुढे वाट पाहावी लागणार नाही. तुम्ही इतके महिने धीर ठेवला तर आता हा आठवडाभर जर धीर ठेवाल तर काही फरक पडणार नाही."

बापूजी पट्टणीसाहेबांशी संस्थानिकांच्या तनख्यासंबंधी बोलले आणि महाराजांचे किती उत्पन्न आहे ते विचारले. भावनगरच्या महाराजांनी तर बापू जे किमान गरजेपुरते ठरवतील तेच घ्यायचे ठरवले आहे.

गाडगीळ साहेबांबरोबर काल जे निर्वासित आले होते, त्यांना काढून टाकू नये असा सल्ला त्यांनी दिला. गाडगीळसाहेब म्हणाले, "तिथे तर आम्ही पाहुण्यांना ठेवणार आहो." यावर बापूजी संतापले आणि म्हणाले, "मलासुद्धा काढून टाकण्याची नोटीस द्या. या बिरला भवनचाच ताबा घ्या. अशाच प्रकारे तुम्ही सर्व मंत्री जे मोठे मोठे बंगले घेऊन बसला आहा त्यांतील तुम्हांला आवश्यक असतील तितक्या दोनचार खोल्या ठेवा आणि बाकीचा सगळा भाग रिकामा करून घेऊन त्यांचा ताबा द्या. जे आश्रित तिथे बसले आहेत त्यांना का काढायचे? यासंबंधी मी जवाहरलाललाही सांगितले आहे. ते तर लगेच समजले आणि तुमचे म्हणणे खरे आहे असे म्हणाले. जवाहरलालमध्ये हा एक मोठा गुण

आहे. आपली चूक मान्य करून ती तो लगेच दुरुस्त करतो." गाडगीळ साहेबांनीसुद्धा बाजूचा बंगला रिकामा करून घ्यायचा नाही असे ठरवले. आता ते सरकारी पाहुण्यांना अजून कुठे तरी ठेवण्याची व्यवस्था करतील. बापूजींसमोर सर्वांचाच थरथराट होतो हे तर खरेच आहे. बापूजींसमोर ढिलेपणा मुळीच चालत नाही. दिल्लीचे चीफ कमिश्नरसाहेबसुद्धा आले. त्याच्याशी बोलत असताना बापूजी म्हणाले, "आता तर तुम्ही परवानगी द्या अथवा ईश्वर परवानगी देईल तेव्हाच आराम घेणार ना?" दिल्लीची परिस्थिती तर खूपच चिघळली आहे. राजकुमारीबहेनने तर . . . शी गोष्टी केल्या. डॉ. कर्नल भार्गवसाहेब, ज्यांनी माझी आंत्रपुच्छाची शस्त्रक्रिया केली होती, आम्हांला जेवायचे आमंत्रण द्यायला आले. बापूजी हो म्हणाले. पण मला ताप येत असल्यामुळे उद्या मला बापूजी तपासतील आणि मग माझ्या जेवणाबद्दल सांगतील. मी म्हणाले, "बापूजी ! हा तुमचा चांगला धंदा आहे. बाकी डॉक्टर तर तपासायची फी घेतात आणि तुम्ही तपासून जेवू घालता."

बापूजी म्हणाले, "मी जेवायला जायची परवानगी देतो आहे त्याची फी नाही?" असा थोडा वेळ विनोद चालला.

इराणचे राजदूत बापूजींना भेटायला आले होते. ते म्हणाले की "इराण आणि भारतात तसेच गोड संबंध आहेत. परंतु त्याचबरोबर इराणच्या मुसलमानांना इथे शत्रू समजून येथील हिंदुस्थानी त्यांना त्रास देतात. असे असले तरी मुंबई सरकार वा हिंदुस्थानी सरकारबद्दल आमची कोणतीही तक्रार नाही. तसेच इराणमध्ये जे हिंदुस्थानी आहेत त्यांचे रक्षण करण्याची आम्ही पूर्ण काळजी घेत आहो आणि घेत राहू. परंतु इराणी लोकांना हिंदुस्थानी जर त्रास देत राहतील तर इराणमध्ये इराणी हिंदुस्थानींना सुरक्षित राहू देतील की नाही याबद्दल मला शंका आहे". बापूजी म्हणाले, "इराण, अफगाणीस्तान, चीन, जपान वा हिंदुस्थान अथवा पाकिस्तान या सर्व देशांना मी तर एक आशियाखंडच मानतो. जर आपला आशियाखंड एक मजबूत, एकमेकांकडे अविश्वासाच्या भावनेने न पाहता पूर्णपणे मित्रभावनेने राहील आणि तसे वर्तन करील तर जगातील स्वर्ग इथेच निर्माण होईल. प्रेम, सत्य, अहिंसा यांच्या आधारावर रचना झालेला हा आर्यावर्त संपूर्ण जगाचे विश्रांतिस्थळ होईल.येथील सरकार जागृत आहे, तरी पण इराणींना भीती तर वाटणारच. असे असले तर इराणमधील हिंदुस्थानींशी तुम्ही जितक्या अधिक प्रेमाने वागाल तर त्याचा परिणाम येथील हिंदुस्थानींच्या मनावर झाल्याशिवाय राहणार नाही."

आजच्या प्रवचनाची सुरुवात होणार तोच साधूसारखा दिसणारा एक माणूस आरडाओरड करू लागला. त्याला शांत केल्यानंतर विचारले तर म्हणाला, "मला स्वतःलाच माझे पत्र बापूजींना वाचून दाखवायचे आहे." बापूजी म्हणाले,

"आमचे किती अधःपतन झाले आहे ही पाहण्यासारखी गोष्ट आहे. हे साधुपुरुष असण्याचा दावा करतात. गीतागायत्री करतात. पण अशा प्रकारे वाद घालू नये हे समजण्याइतकेही सौजन्य यांच्यात नाही."

"तो साधू मोठ्या मुश्किलीने शांत झाला. नंतर भावलपूरविषयी बोलताना बापूजी म्हणाले, "माझ्या असे ऐकण्यात आले आहे की प्रार्थनासभेत गोंधळ करून सभेवर दगडफेक करण्याचा आणि सभा भंग करण्याचा भावलपूरच्या लोकांचा उद्देश आहे. परंतु मी नाही म्हणालो. त्या लोकांनी हे कबूल केले. आपण सर्वांनी हा आदर्श आत्मसात केला पाहिजे. त्यांना सहन कराव्या लागलेल्या दुःखाचा मी साक्षी आहे. तेथील सर्व हिंदूंना, शिखांना इथे पोहोचवले जाईल असे आश्वासन तेथील नबाबसाहेबांनी दिले आहे. त्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. आणि नबाबसाहेब असेसुद्धा सांगत आहेत की यानंतर भावलपूरचे लोक मुळीच गोंधळ घालणार नाहीत आणि त्यांनी असे करू नये म्हणून पूर्ण सावधगिरी बाळगली जाईल. अशी चूक परत होऊ दिली जा्णार नाही. तसेच येथील सरकारलाही या सर्व गोष्टींची कल्पना नाही असे नाही. परंतु असे असतानाही चिन्हे निश्चितच चांगली दिसत नाहीत. आपला देश एक होता. आता त्याचे दोन भाग झाले आहेत. आणि अशा प्रकारे तयार झालेले राज्य एकमेकांचे शत्रू झाले आहेत. आपल्याच देशात ते एकमेकांचे शत्रू झाले आहेत. सिंधमध्ये तर परिस्थिती याहूनही भयानक आहे. आता तर परिस्थिती इतकी काही नाजूक झाली आहे की अखेरीस त्याचा हिंदुस्थानवर काय परिणाम होईल याची कल्पना करता येऊ शकत नाही. अशा वेळी क्रोध तर मुळीच करू नये. क्रोध केल्याने काहीही मिळत नाही. ही परिस्थिती नियंत्रणात आणून शांतता कशी स्थापित करता येईल याचाच आपण शांत चित्ताने विचार केला पाहिजे आणि त्यानुसार वर्तन केले पाहिजे. यावर हाच सुंदर उपाय आहे."

"इराणचे राजदूत माझ्याकडे आले होते. ते मुंबईत राहणाऱ्या इराणींबद्दल - आणि मोठ्या प्रमाणात त्या इराणीबद्दल ज्यांचे हॉटेल आहेत - त्यांना त्रास देण्याला सुरुवात झाली

आहे. इराण्यांच्या चहाची विशेषेकरून प्रशंसा करण्यात येत असते. परंतु तिथे आपसात भांडणे झाली आणि त्यात काही इराणी मारले गेले. परंतु त्यांनी मुंबई आणि दिल्ली सरकारांनी केलेल्या सहकार्याची तारीफ केली. परंतु इराणी आणि हिंदुस्थानी एका दृष्टीने आर्यच आहेत. 'झेंद अवस्ता' पाहाल तर त्यात अनेक संस्कृत शब्द आढळतील. आणि या दोघांचे गोड संबंध तर खूप जुने आहेत. ते जर बिघडले तर ही गोष्ट सर्वांकरिता लाजिरवाणी होईल.

"धान्यावर नियंत्रणे काढल्याबद्दल अनेक लोक मला धन्यवाद देत आहेत. परंतु फायदा होईल की नाही हे आधीच सांगायला मी काही ईश्वर नाही. मला कोणत्याही प्रकारचे दिव्यचक्षूसुद्धा नाहीत. माझे तर डोळे, कान, पाय जे म्हणाल ते जनताच आहे. अखेरीस तर तुम्हांलाच तुमचे भवितव्य ठरवायचे आहे. मी सांगतो म्हणून कोणी माझे ऐकलेच पाहिजे अशी आवश्यकता नाही. आणि माझ्यासारखे सांगणारे वीस-वीस महात्मा जरी मिळाले तरी ते म्हणतात ते खरेच असेल असे मान्य करण्याची आवश्यकता नाही. प्रत्येकाने आपापल्या बुद्धीनेच विचार करणें शिकायला पाहिजे, तरच सुखी व्हाल."

फिरत असताना बापूजींना खूपच थकवा होता. त्यांच्या मनावरही काळजीचे खूपच मोठे ओझे होते. रोजप्रमाणे दहा वाजता कसरत करून झोपायची तयारी. प्रार्थनाप्रवचन पाहिले. पंडितजींसोबत गोष्टी केल्या. सकाळी लिहिण्याकरिताचे साहित्य वेगळे काढून ठेवले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

११-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेआधी बापूजी म्हणाले, "आपली नैतिक अधोगती इतकी वेगात सुरू आहे की त्यामुळेच आपला सत्याग्रह वा आपले लढे दुर्बलांचे का होते हे माझ्या लक्षात येते. अशा परिस्थितीत काँग्रेसचे प्रमुख जर ठाम आणि दृढनिश्चयी राहिले नाही तर या संस्थेचा चुराडा होईल. या संस्थेचे ध्येय तर स्वराज्य मिळवण्यापुरतेच सीमीत होते. या संस्थेच्या अशुभ दिवसाची पूर्वकल्पना मला आजच येते आहे. मंत्र्यांच्या आणि संस्थेच्या कर्मचाऱ्यांच्या कामातील बेपर्वाई हेच दाखवते. आंध्रमधून काल आलेल्या पत्रामुळे मी फार अस्वस्थ झालो आहे. चांगल्या भावनांनी भरलेले आणि केंद्रात बसलेले ... यांच्यासारख्यांचे पुत्रही पैसा कमावण्याच्या गोंधळात गुंतले आहेत. हे सर्व काय दाखवते? आपल्याला जर असेच व्हायचे होते तर आपण गुलामीच्याच लायक होतो असे म्हणावे लागेल. . . . सारख्या आणि मुंबईसारख्या जागृत शहरात राहणारे तसेच समजूनउमजून स्वतःहून संपत्ती मिळवण्याच्या आकांक्षेचा ज्यांनी त्याग केला आहे, ते लोक आता हव्या त्या मार्गाचा प्रयोग करून काँग्रेस संस्थेचे आणि खादीधारी असल्याचा देखावा करून चोहोकडून वाटेल तेवढी संपत्ती गोळा करत आहेत. जर असेच सुरू राहिले, तर अखेरीस याची परिणती कुणीकडे जाईल? मी तर हे सर्व पाहून स्तब्ध झालो आहे. आता तर गजेंद्र संकटात सापडला असता ईश्वराने ज्याप्रमाणे त्याची लाज राखली होती तशी त्याने आपलीही लाज राखावी. इतके जर झाले तर मी ईश्वराचे अपार उपकार मानेन.

अगदी पहाटेपहाटेच बापूजींनी अतिशय दुःखाने भरलेल्या आवाजात मला . . . च्या विषयीची हकिगत अस्वस्थ होत वरीलप्रमाणे सांगितली. बापूजी काही तरी गंभीर विचारात आहेत असे कालपासूनच मला वाटत होते. परंतु कारण काही कळत नव्हते. आणि असे जरी ते गंभीर वाटत असले तरी त्यांचा विनोद, मुलाखतीसाठी येणारांशी वार्तालाप, इतर कामकाज, जेवण वगैरे रोजप्रमाणेच सुरू होते. यामुळे बाहेरच्या माणसाला काहीही कळू शकत नव्हते. परंतु बापूजींसारख्याच्या गांभिर्याचा परिणाम या खोलीवर तर झाल्याशिवाय राहू शकतच नाही. आता हे खरे आहे की मुंबईच्या . . . अशा प्रख्यात व्यक्तीविषयीच्या या खोट्या गोष्टी पसरवण्यात आलेल्याही असू शकतील, परंतु अशा खोट्या गोष्टी का पसरल्या जाव्या? आणि जर का या व्यक्तीच्या हकिगतीत असे काही तथ्य असेल की ज्याची आपण कल्पनाही करू शकत नसू, मान्य करू शकत नसू तर असा काही योगायोग निर्माण होईल की

ज्यामुळे बापूजींना हृदयाचे पाणीपाणी करणारे किती दुःख होईल हे समजू शकते. प्रार्थनेनंतर भावनगरचे ग्रामदक्षिणामूर्तीवाले हरिलालभाईनी पाप कशा प्रकारे वाढत आहे यासंबंधीच्या घटना सांगितल्या आणि बापूजींच्या नोंदीसह ते 'हरिजनबंधु'मध्ये छापण्यात आले आहे. (पाहा 'हरिजनबंधु' १८-१-१९४८, 'पाप केम वधे छे'.)

यानंतर तोतारामजींच्या मृत्यूसंबंधीची नोंद लिहिली. (पाहा 'हरिजनबंधु' १८-१-१९४८, पृष्ठ ४७७.)

बापूजी दहाएक मिनिट झोपले. मीसुद्धा झोपले होते. साडेसहा वाजता उठले. नाश्ता केला. सरलासुद्धा सोबत होती. ७.४५ वाजता बापूजींचे पाय धुतले आणि मालीशची तयारी केली. धिरेनभाई आणि इंदिराच्या (रंगूनवाली, प्राणजीवन मेहतांची नात.) सोयरिकीबद्दल सरला आणि त्यांच्या कुटुंबियांना समाधान नसल्याबद्दल गोष्टी सुरू होत्या. बापूजीसुद्धा प्रत्येकाच्या प्रत्येक गोष्टीकडे खूप लक्ष ठेवत असतात. सकाळी काँग्रेसच्या या सडणीमुळे दुःखी होते तर दोनचार तासात आपल्या जुन्या मित्राच्या नातीच्या लग्नात इतका अधिक रस घेत होते.

याशिवाय आंघोळीच्या वेळी बापूजी मला तिसरीच गोष्ट सांगत होते. "तू बोलत का नाहीस?... च्या सर्व गोष्टी मला माहीत आहेत. परंतु तू दुःखी राहतेस हे मला आवडत नाही. तुझा चेहरा थोडासाही गंभीर झालेला मला पाहवत नाही. तू तर तुझ्या मनावर कोणत्याही प्रकारचे ओझे ठेवायला नको. अर्थात मनातून तू मला आई आणि वडील मानत असशील तर . . ."

साडेबारा वाजता मी डॉ. भार्गवकडे जेवायला गेले. बापूजींनी माती लावून मी गेले होते. आल्यानंतर मी रोज जिथे संगीत शिकायला जात असते तिथे गेले. यामुळे साडेबारा ते साडेतीन वाजेपर्यंत जे लोक मुलाखतीकरिता आले होते त्यांची मी नोंद करू शकले नाही. दुपारच्या बापूजींच्या जेवणाच्या वेळी शंकरराव आणि राजेंद्रबाबूजी आले होते. त्यांच्याशी भावलपूर आणि ५५ कोटीसंबंधी चर्चा झाली. भीमसेन साचरनीसुद्धा भावलपूरमध्ये घडलेल्या गोष्टी सांगितल्या. आजपासून हे प्रकरण बरेचसे नियंत्रणात आले आहे असे वाटते. मौलाना हबिबुलरहमान आणि इतर मुसलमान भाईंची तक्रार होती की आता जर आम्हांला इंग्लंडचे तिकिट काढून दिले तर चांगले होईल. आजपर्यंत आम्ही कॉंग्रेसमध्ये पापड लाटले. बलीदान केले वगैरे. आजपर्यंत काँग्रेस आमची काळजी घेत होती. यामुळे आता पाकिस्तानमध्ये आम्हांला कोणते स्थान असू शकते?

बापूजींना ही गोष्ट फारच लागली. थोडे नाराज होऊन म्हणाले, "तुम्हांला तुमचे देशबंधू त्रास देत आहेत हे मला माहीत आहे. यामुळेच मी इथे पडलो आहे. कदाचित आपले देशबंधू पागल झाले असतील. म्हणूनच ते तुम्हांला ते सुखासमाधानाने इथे बसू देत नाहीत. परंतु असे किती दिवस चालेल? आणि किती दिवसांपासून सुरू आहे? या गेल्या काही दिवसात तुमच्यावर संकट आले म्हणून तुम्हांला गुलामगिरी चांगली वाटते? आणि या एवढ्या घाणीकरिता तर त्यांचे धोरणच जबाबदार आहे. असे असूनही तुम्हांला आणि तुमच्या भावांना देशबांधवांच्या हातून मरण्यापेक्षा गुलामगिरी चांगली वाटते? हेच तुमचे स्वराज्य आणि स्वाभिमान आहे काय? जिवंत राहण्याकरिता गुलामगिरी चांगली आहे असे म्हणता? खूप छान ! परंतु बापूजी तर हे इतक्या काही वेदनापूर्ण आवाजात बोलत होते की त्या वेदनांमधील आग बापूजीच सहन करू शकत होते. याचा साक्षीदार तर बापूजींचा इश्वरच असेल ना." बापूजींचा रक्तदाबसुद्धा वाढला. ही सर्व चिन्हे चांगली नव्हती. मलासुद्धा का माहीत नाही, पण करमतच नव्हते. तुझा उदास चेहरा मुळीच राहायला नको अशी सूचना बापूजींनी सकाळीच मला दिली होती. परंतु काही केल्या मन ऐकतच नाही. बऱ्याच दिवसांपासून घरून बहिणींची आणि भावांची बातमी कळली नाही. ते काहीही असले तरी आता बापूजी काय करतील ते आजच्या आणि दोनचार दिवसांच्या वातावरणावरून कळू शकत नाही असे माझे मन सांगते.

कताई करत असताना बापूजींनी दक्षिण आफ्रिकेतील त्यांचे सहकारी श्री सोराबजीभाई रुस्तमजी आणि प्राणजीभाईंशी दक्षिण आफ्रिकेच्या गोष्टी केल्या. पाच वाजता पट्टणीसाहेब आणि मां (यशोमतीबहेन पट्टणी) आले. भावनगरचे दिवाण म्हणून अखेरचा प्रणाम करायला ते आले होते. ते भावनगरला जाणार आहेत. साठसाठ वर्षांची पितापुत्राची दिवाणगिरी - अथवा राज्याची सेवा करण्यात हे कुटुंब सर्वात पुढे होते असेही म्हणता येईल. आणि आज हे राज्य प्रजेला सोपवले जात आहे. पट्टणीसाहेबांच्या डोळ्यातून झरझर अश्रुधारा वाहू लागल्या. मला म्हणाले, "तुझ्यावर तर माझा फार जास्त हक्क आहे." बापूजी विनोदात म्हणाले, "मग हिला भावनगर राज्याची दिवाण करून टाका !"

पट्टणी साहेब - येथील तुमच्या 'दरबारातील दिवाणगिरी सोडून' ही काय येते?

मी म्हणाले, "बापूजींना दिवाण करा आणि मग पट्टेवाल्याचा लाल पट्टा आणि गरम कोट मिळाला तर चालेल." अशा गोष्टी सुरू होत्या. तेवढ्यात प्रार्थनेची वेळ झाली.

दररोज रेडिओवर बापूजींचे जे प्रवचन येत असते त्यात भगिनींचा आणि मुलांचाही आवाज पकडला जातो. यामुळे बापूजींचे प्रवचन लोक स्पष्टपणे ऐकू शकत नव्हते. आजच्या प्रवचनात बापूजी म्हणाले -

"आज तुम्ही सर्व गडबड करून राहिला नाही याकरिता मी तुमचे अभिनंदन करतो. तुम्ही आपसात गोष्टी करता आणि मुले रडतात. असे जर करायचे असेल तर प्रार्थनेकरिता येण्याचा लोभ सोडायला पाहिजे. या म्हाताऱ्याला केवळ पाहून काय लाभ? या म्हाताऱ्याने सांगितलेले थोडेसे जरी करू शकाल तर त्यामुळे किती तरी फायदा होईल. केवळ ऐकून काय मिळणार आहे?

"आज तर मला तुम्हांला एक दुःखद गोष्ट सांगायची आहे. ती रोजसारखीच आहे. आंध्रमधून आज मला एक फार करुण आणि डोळे उघडवणारे पत्र आले आहे. हे लिहिणाऱ्या बुजूर्ग गृहस्थांना मी ओळखतो. त्यांनी लिहिले आहे की पंधरा ऑगस्टला आपल्याला स्वातंत्र्य मिळाल्यानंतर आपण पाहिजे तसे वागू शकतो अशी मान्यता आपल्यामध्ये निर्माण झाली आहे. स्वातंत्र्य मिळवण्याकरिता काँग्रेसने आणि जनतेने असीम बलिदान केले आहे. परंतु त्याच्या परिणामी काँग्रेस इतकी खाली कशी घसरली? ती उन्नत व्हायला पाहिजे होती. कोणी एक दिवस जरी तुरुंगात गेला असेल, खादी वापरत असेल तर तो नेता होण्याकरिता खूप मेहनत करतो आणि कटकारस्थान रचतो. एम. एल. ए. अथवा एम. एल. सी. अथवा लोकसभेचे सदस्य चोहोकडे घाण पसरवण्याचे काम करत असतात. अशा प्रकारे कसे चालेल? यामुळे विधिमंडळाच्या आणि लोकसभेच्या सदस्यांची संख्या कमी केली तर चांगले होईल. या बंधूंचे पत्र हे असे आहे.

"या प्रांताला मी चांगल्या प्रकारे ओळखतो. माझ्याकरिता तर इथे राहिलो काय आणि अजून कुठे जाऊन राहिलो काय काहीही फरक पडत नाही. संपूर्ण देश माझा आहे आणि मी देशाचा आहे. पाकिस्तान परदेश आहे असे मला किंचितही वाटत नाही. या प्रांतात साम्यवादी तसेच समाजवादी भाई आहेत. या सर्वांना वाटते की शक्य त्या मार्गाने काँग्रेसला तोडून टाकावे. परंतु अशा प्रकारे ते जर संपूर्ण हिंदुस्थानचा ताबा घेऊ पाहत असतील तर हिंदुस्थानचे काय हाल होतील? माझा तर सर्वांना सल्ला आहे की आपण हिंदुस्थानचे व्हायला पाहिजे आणि

हिंदुस्थानला आपले केले पाहिजे. हा काळ इतका कठीण आहे की हिंदू-मुसलमान एकमेकांचे गळे कापत आहेत आणि त्यातही अशा प्रकारे भांडणे सुरू राहतील तर आपली भयंकर अवस्था होईल. आपण जर केवळ आपल्या नातलगांना सरकारी नोकरीत लावण्याचा आणि त्यांच्या मापाने व्यवस्था निर्माण करण्याचा प्रयत्न करू तर ईश्वर माफ करणार नाही.

"आज माझ्याकडे थोडेसे मुसलमानभाई आले होते. त्यांची रोजप्रमाणे तक्रार तर आहेच. परंतु आता ते म्हणतात की हा असा जुलूम आम्ही किती दिवस सहन करायचा? यापेक्षा आम्ही इथून निघून जातो. असे केले तर आम्हाला मार तर खावा लागणार नाही? पाकिस्तानमध्ये तर आमच्याकरिता जागा नाही. आता तर इंग्लंडमध्ये जाण्याचाच मार्ग आमच्याकरिता राहिला आहे. दुसरे काही सुचत नाही . . .

"या भाईंना मी नेहमी एकच गोष्ट सांगत आलो आहे, आणि सांगत राहीन. थोडी शांतता ठेवा, शांत राहा. सरकार शक्य तितका सर्व प्रयत्न करते आहे. तरीही काही अडचण आली तर मग काय करायचे ते आपण पाहू. आज तर संघराज्यात जे लोक बसले आहेत त्यांनी आपण हिंदू आहो की मुसलमान आहो की शीख आहो की ज्यू आहो की पारसी हे विसरून जायला पाहिजे. आपण सगळे हिंदुस्थानी आहो केवळ इतकेच लक्षात ठेवायला पाहिजे. धर्म तर सर्वांची अंतर्गत बाब आहे. याला आपण राजकारणाच्या क्षेत्रात आणायला नको. आपण जितके इतरांना दाबायचा प्रयत्न करू तितकेच आपण स्वतः दबू. जो खड्डा खोदतो तोच पडतो. हा निसर्गनियम आहे. आपण सर्व हिंदुस्थानी आहो आणि हिंदुस्थानचे आणि हिंदुस्थानींचे रक्षण करता करता जर आपल्याला मृत्यू आला तर त्याहून चांगला मृत्यू कोणता असेल? मानवमात्राकरिता हाच एकमेव खरा मार्ग आहे. जन्माशी मृत्यू जुळलेला आहे. मग त्याची भीती का?"

प्रार्थनेनंतर लगेच बापूजींनी मौन घेतले. मी आणि चांदवाणीजींनी मिळून प्रवचन तयार केले आणि ते बापूजींना पाहायला दिले. फिरत असताना बापूजी किती तरी उत्साही होते. आम्हा दोघांच्या खांद्यावर टेकून आम्हांला खूप पळायला लावत होते. आम्हांला थंडी वाजत होती. ती उडवून लावण्याकरिता ते असे करत होते.

रात्री देवदासकाका, काकी, गोपू आले. गोपूबरोबर सर्व खेळले. गोपू आला की की त्याच्या खेळण्याने आणि हसण्याखिदळण्याने घरात जे अतिशय गंभीर वातावरण होते ते हलकेफुलके होऊन जाते. ही राजकीय वातावरणाची खोली जणू बालभवनचे रूप घेते.

आता तर बापूजींचे मौन असल्यामुळे जवळपास सर्व शांत आहे. दुसरे तर काही विशेष झाले नाही. सर्व क्रम रोजप्रमाणेच चालत असतो. सायंकाळनंतर बापूजी प्रफुल्लित वाटत असल्यामुळे यामुळे बाकी वातावरणही चांगले झाले आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१२-१-'४८

साडेतीन वाजता प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजी आत आले. बापूजींचा आज मौनवार असल्यामुळे बरेचसे काम ते स्वतःच करतात. बापूजींवर पाघरूण टाकून मीसुद्धा झोपून गेले. मी ६.१५ ला उठले. नाश्ता तयार केला. ६.४५ ते काम आटोपले. दरम्यान बापूजींनी 'हरिजन'करिता लिहिले. ६ वाजता बापूजीसुद्धा झोपले. सातेक वाजता उठले. आज बापूजी सकाळी १ तास झोपले. मालीश, आंघोळ नेहमीप्रमाणे. आज बापूजी खूप प्रफुल्लित वाटत होते. थकव्यामुळेसुद्धा त्यांच्यावर ओझे असू शकेल. सकाळी एक तास झोपले हे खूपच चांगले झाले. जेवायच्या वेळी जमनादासकाका आले होते. ९.४५ वाजता जेवण आटोपले. तेवढ्यातच सरदारदादा आले. काश्मीरच्या अवस्थेबद्दल गोष्टी केल्या. काश्मीरमधील राजासाहेबांना काढून टाकण्याची मागणी शेखसाहेब करत आहेत. राजा अतिशय अस्वस्थ आहे. राजाने सल्लासुद्धा मागितला आहे. इंदोरमध्ये शेख साहेबांचे (शेख अब्दुल्ला) मेहुणे स्वतःच बरेच काही करून बसले आहेत. बापूंचे आज मौन असल्यामुळे कोणालाही तोंडी उत्तर तर द्यायचे नव्हते. बापूंचे पाय चेपले आणि त्यांना माती दिली. दुपारी संगीत शिकायला गेलो. तिथून साडेतीन वाजता परतलो. दरम्यान बापूजींनी इंग्रजीत भाषण लिहिले आणि मला म्हणाले, "चल आपण अनुवाद करून टाकू". दर सोमवारी बापूजींच्या भाषणाचा हिंदीत अनुवाद सुशीलाबहेन करत असतात आणि माझ्याकडून तो अनुवाद लिहवून घेतात. यामुळे सर्वांचा वेळ वाचतो.

बापूजींची मालीश करायची आहे आणि आजकाल प्यारेलालजी आणि त्यांच्याबरोबर आलेल्या बंगाली भगिनी ज्या खोलीत राहायच्या ती रिकामी झाल्यामुळे मी आणि सुशीलाबहेन तिथे अनुवाद करायला बसलो. सुशीलाबहेन एकदम किंचाळून म्हणाल्या, "अरे मनू ! बापूजी तर उद्यापासून उपवास करणार आहेत !" अचानक आलेल्या अडथळ्यामुळे आणि जोरदार आवाज ऐकल्यामुळे मी तर स्तब्धच होऊन गेले. "काय?" माझ्या तोडून एकदम शब्द निघाला. आम्ही बापूंजवळ पळत गेलो. बापूजींनी कोणाबरोबर चर्चा करायलाच नकार दिला. एका चिठ्ठीवर त्यांनी लिहून दिले, "मौन सुटेल तेव्हा बोलू, आता तर जो अनुवाद करायचा आहे तो करा." आम्ही घनश्यामदासजींकडे गेलो. पंडितजी आणि सरदारदादांना ही बातमी कळवायला सांगितले. आमच्याजवळसुद्धा क्षणाचाही वेळ नव्हता. आज प्रवचनाचा अनुवाद करायला शेवटच्या क्षणी बसलो. यामुळे सुशीलाबहेनला मी म्हणाले, "आता आपण

गोष्टीत वेळ घालवला आणि अनुवाद वेळेवर तयार झाला नाही तर बापूजी नाराज होतील.” यामुळे आम्ही परत अनुवाद करायला बसलो. या वेळी बापूजींनी विचित्र निर्णय घेतला. दुपारी सरदारदादा, पंडितजी सगळे आले होते. असे असतानासुद्धा आम्ही सर्व हजर असतानाही बापूजींनी या निर्णयाची कल्पना आपल्या अंतरात्म्याशिवाय इतर कोणालाही येऊ दिली नाही.

परंतु गेल्या आठवड्यातील गोष्टींवरून, वागण्याबोलण्याच्या पद्धतीवरून, मुलाखतीकरिता आलेल्यांशी झालेल्या वार्तालापावरून आणि प्रश्नोत्तरांवरून बापूजी काही तरी गूढ विचारात आहेत असे मला स्वतःला मात्र जाणवत होते. मला स्वतःलाही रुखरुख वाटत होती. तू उदास का राहतेस असे बापूजी अनेकदा म्हणाले होते. परंतु अखेरीस माझा अंदाज खरा निघाला. बापूजींना काही होणार असले तर मला कसे माहीत नाही पण आपोआपच अस्वस्थ वाटू लागत असते. अनेकदा तर ताप यायचा आणि कशातही मन लागत नसे. काही अशुभ व्हायचे असले तर ईश्वर मला त्याची पूर्वकल्पना अशा प्रकारे देत असतो. बापूजींना सांगितले तर बापूजी म्हणायचे हा तुझ्या मनातील संशय आहे. तुला एकाच प्रकाराची सवय झाली आहे. परंतु ही गोष्ट तर माझ्या अनेक अनुभवातील एका प्रत्यक्ष अनुभवाची आहे. परवाची आणि कालची माझी रोजनिशी पाहत असताना ते मला टोकत म्हणाले, “तू परत आजारी पडणार आहेस असे दिसते. तू खूश नसली की त्याचा परिणाम तुझ्या दैनंदिनीवर होत असतो. तुझा आजार आणि तुला येणारा ताप हे बहुतांश तुझ्या स्वभावावरच अवलंबून आहेत. तू जेव्हा खुश आणि प्रफुल्लित असतेस तेव्हा खूप चांगली वाटतेस. आणि उदास असतेस तेव्हा तुला १०२ पर्यंत ताप येऊन जात असतो. हीसुद्धा विचित्र गोष्ट आहे!” असे असल्यामुळे या उपवासात काय होते ते खरे. आताआता सहा महिन्यांपूर्वी कलकत्त्यात बापूजींनी भयंकर उपवास केला होता. परंतु त्याची जबाबदारी सुऱ्हावर्दीसाहेबांनी घेतली होती. इथे तर पंचरंगी प्रजा आहे. कोणी कोणाचा पुढारी नाही. कोण जबाबदारी घेणार? खरे म्हणजे बापूजींचा हा उपवास सर्वसामान्य जनतेच्या अपराधाकरिता नाहीच. राजकारणी लोकांचे ज्या घाणेरड्या पद्धतीने आपसात घोटाळे सुरू आहेत त्याविरुद्ध आहेत. या अग्निपरीक्षेत काय होईल? आजचे प्रवचन शब्दशः असे होते -

> “प्रकृतीत सुधारणा व्हावी म्हणून काही लोक आरोग्याच्या नियमाप्रमाणे उपवास करत असतात. जेव्हा एखादी चूक वा पातक होते व त्याची जाणीव माणसाला होते तेव्हा प्रायश्चित्त म्हणूनही तो उपवास करत असतो. असा उपवास करणाराचा अहिंसेवर विश्वास असलाच

पाहिजे याची आवश्यकता नाही. परंतु असाही प्रसंग येत असतो की समाजाने केलेल्या एखाद्या अन्यायाच्या विरोधात अहिंसेच्या पुजाऱ्यालाही उपवास करणे भाग पडत असते. असे तो तेव्हाच करतो जेव्हा त्याच्यासमोर आपला विरोध व्यक्त करण्याचा दुसरा कोणताही मार्ग शिल्लक राहत नाही. असा प्रसंग माझ्या जीवनात आला आहे.

"९ सप्टेंबरला मी कलकत्त्याहून दिल्लीला आलो तेव्हा मी खरे म्हणजे पश्चिम पंजाबमध्ये जात होतो. परंतु तसे घडायचे नव्हते. प्रसन्नचित्त असणारी दिल्ली मृतांचे शहर दिसत होती. मी गाडीमधून उतरत असतानाच मला सर्वांचे चेहरे चिंताक्रांत असलेले दिसले. हास्यविनोद करून नेहमी खूष राहणाऱ्या सरदारचा चेहरासुद्धा औदासिन्याने झाकोळलेला होता. त्या वेळी मला याचे कारण माहीत नव्हते. मला घेण्याकरिता ते प्लॅटफॉर्मवर आले होते. संघराज्याच्या राजधानीत दंगल झाल्याची दुःखद बातमी त्यांनी मला लगेचच दिली. मला लगेच जाणवले की मला करण्याकरिता वा मरण्याकरिता दिल्लीतच राहायला पाहिजे. सैन्य आणि पोलिसांच्या मदतीने आज शहरात वरवरची शांतता प्रस्थापित करण्यात आली आहे. परंतु आपल्या अंतःकरणात वादळी वारे वाहत आहेत. या वादळाचा केव्हाही स्फोट होऊ शकतो. याला मी माझ्या "करण्याच्या" प्रतिज्ञेची परिपूर्ती समजत नाही. ही परिपूर्तीच मला मृत्यूपासून दूर ठेवू शकते. त्याच्यासारखा दुसरा कोणीही मित्र नाही. हिंदू, शीख आणि मुसलमान यांच्यात अंतःकरणापासूनची मैत्री व्हावी याकरिता मी तळमळतो आहे. पूर्वी अशी मैत्री होती परंतु आज ती अस्तित्वात नाही. ही अशी अवस्था आहे की देशभक्त या नावाला पात्र असलेला कोणताही भारतीय ती शांतपणे सहन करू शकत नाही.

"मला आतला आवाज तर किती तरी दिवसांपासून ऐकू येत होता, परंतु मी माझे कान बंद करून ठेवले होते. हा आवाज सैतानाचा म्हणजे माझ्या दुबळेपणाचा तर नाही ना अशी मला शंका येत होती. मला लाचारीची भावना कधीही पसंत पडत नसते, आणि कोणत्याही सत्याग्रहीला ती पसंत पडायलासुद्धा नको. उपवास तर त्याचे अखेरचे शस्त्र असते. त्याच्या वा इतरांच्या तलवारीची जागा ते घेत असते. माझ्याकडे दररोज भेटायला येणारे मुसलमान मित्र आता "आम्ही काय करावे" असा प्रश्न विचारत असत. काही दिवसांपासून माझी लाचारी मला खाऊ लागली होती. उपवास सुरू होताच ही लाचारी ताबडतोब निघून जाईल. तीन

दिवसांपासून मी यावर विचार करतो आहे. आणि अखेरीस हा निर्णय डोळ्यासमोर लखलखला. आता मी खुष आहे. (गांधीजींच्या मनात काय सुरू आहे याची त्यांनी जवळच्या सहकाऱ्यांनाही कल्पना दिली नव्हती, वल्लभभाई पटेल आणि जवाहरलाल नेहरू यांनासुद्धा नाही. प्रार्थना सभेतील या घोषणेच्या थोड्या वेळेपूर्वीच गांधींजींना ते भेटले होते. गांधीजींचे हे पंधरावे उपोषण होते.) कोणत्याही माणसाजवळ, जर तो पवित्र असेल, तर आपला जीव देण्यापेक्षा अधिक मूल्यवान काहीही नसते. हे पाऊल उचलणे समर्थनीय ठरण्याइतके पावित्र्य माझ्यात असावे अशी मला आशा आहे आणि त्याकरिता मी ईश्वराजवळ प्रार्थनाही करतो. या माझ्या प्रयत्नाकरिता तुम्ही सर्वांनी मला आशीर्वाद द्यावा व माझ्याकरिता आणि माझ्याबरोबर सर्वांनी प्रार्थना करावी अशी विनंती आहे.

"हा उपवास उद्या (मंगळवारी) पहिल्या जेवणाच्या वेळेपासून सुरू होईल. हे उपोषण अनिश्चित काळापर्यंत सुरू राहील आणि मीठ घातलेले वा न घातलेले पाणी आणि लिंबाचा रस घातलेले वा न घातलेले पाणी पिण्याची या उपवासात मला सूट राहील. कोणत्याही बाह्य दडपणाने नाही तर कर्तव्याची जाणीव झाल्यामुळे सर्व जमातींचे मनोमीलन झाले आहे असे जेव्हा माझे समाधान होईल तेव्हाच माझे हे उपोषण सुटेल.

"आज जगात भारताचा मान सर्वत्र कमी होत आहे. आशिया आणि संपूर्ण जगाच्या हृदयावरही भारतातील रामराज्याचे जे चित्र रेखाटले गेले होते ते वेगात पुसट होऊ लागले आहे. या उपवासाच्या निमित्ताने जर आपले डोळे उघडले तर तो सर्व सन्मान परत येऊ शकतो. भारताचा आत्मा जर हरवला तर उपाशी जगाच्या आशेचाही लोप होईल असे मला वाटते. मित्रांनी वा जर कोणी शत्रू असेल तर त्याने याकरिता माझ्यावर रागावू नये. असे अनेक मित्र आहेत की ज्यांना मानवी स्वभावात सुधारणा घडवून आणण्याकरिता उपवास करण्याची पद्धत योग्य वाटत नाही. ते मला सहन करतील आणि जे स्वातंत्र्य ते स्वतःकरिता घेतात ते मलाही देतील अशी अपेक्षा आहे. ईश्वर माझा सर्वोच्च आणि एकमेव सल्लागार आहे व इतर कोणाचाही सल्ला न घेता हे उपोषण मी केले पाहिजे असे मला वाटले. हा निर्णय घेण्यात माझी चूक झाली असे जर माझ्या लक्षात आले तर तशी जाहीर घोषणा करण्यात व हे पाऊल मागे घेण्यात मला संकोच वाटणार नाही. असे काही होण्याची फार कमी शक्यता आहे. मी दावा करतो त्याप्रमाणे जर माझा आतला आवाज स्पष्ट असेल तर मी त्याच्या विरोधात जाऊ शकत नाही. माझी विनंती

आहे की माझ्याशी याबद्दल वाद घालण्यात येऊ नये आणि जो निर्णय बदलता येऊ शकत नाही त्यात सर्वांनी मला सहकार्य करावे. संपूर्ण भारताने अथवा कमीतकमी दिल्लीने या बाबतीत मला सहकार्य दिले तर हा उपवास लवकर सुटू शकतो. परंतु लवकर सुटतो की उशिरा सुटतो की कधीही सुटत नाही याची काळजी कोणीही करू नये. अशा नाजूक प्रसंगी कोणीही दुबळेपणा दाखवू नये.

"जीवनात मी अनेक उपवास केले आहेत. माझ्या पूर्वीच्या उपोषणांवर टीकाकारांनी टीका करत म्हटले होते की माझ्या उपोषणामुळे दडपण आले होते. मी उपवास केला नसता तर ज्या कारणाकरिता मी ते उपोषण केले होते त्याचे गुणदोष दिसून पडले असते. परंतु मी उपोषण केल्यामुळे तसे होऊ शकले नाही. हेतू चांगला आहे हे सिद्ध करता आले तर निर्णय विरोधात गेला तरी त्यामुळे काय फरक पडू शकतो? शुद्ध उपोषण हे शुद्ध कर्तव्यपालनासराखे असते. त्याचे फळ त्यातच असते. ते केल्यामुळे कोणते परिणाम होतील याचा मी विचार करत नसतो. मी उपवास करतो कारण मला तसे करावेच लागते.

"यामुळे माझी सर्वांना विनंती आहे की त्यांनी भावनावश न होता यामागील हेतूचा विचार करावा आणि मी मरणारच असेन तर मला शांतपणे मरू द्यावे कारण शांतता तर मला मिळणारच आहे. भारताचा, हिंदू धर्माचा, शीख धर्माचा आणि इस्लामचा नाश मी असहाय होऊन पाहू शकत नाही. पाकिस्तानमध्ये जगातील सर्व धर्माच्या लोकांना समान अधिकार मिळाला नाही, त्यांच्या जीवाच्या आणि मालमत्तेच्या सुरक्षिततेची हमी मिळाली नाही व भारताने त्याची भ्रष्ट नक्कल केली तर दोन्ही देशांचा विनाश अटळ आहे. तसे झाले तर इस्लामचा केवळ या दोन देशातच मृत्यू होईल, परंतु संपूर्ण जगात नाही. परंतु हिंदू धर्म आणि शीख धर्म यांना भारताबाहेर जगात कुठेही अस्तित्व नाही.

"ज्यांचा या बाबतीत माझ्याशी मतभेद आहे त्यांनी मला कितीही प्रखर विरोध केला तरी मी त्यांचा आदरच करीन. माझा उपवास लोकांचा आत्मा जागृत करण्याकरिता आहे, त्याला मारून टाकण्याकरिता नाही. आज आपल्या प्रिय भारतात किती घाण निर्माण झाली आहे याचा थोडा विचार तर करा. आणि ही घाण दूर करण्याकरिता भारताचा एका नम्र पुत्र हे पाऊल उचलण्याचे साहस करतो आहे, त्याच्यात हे पाऊल उचलण्याइतकी शक्ती आहे आणि

कदाचित पावित्र्यही असेल तर तो उचलत असलेल्या या आनंददायी पावलाबद्दल तुम्हाला आनंद व्हायला पाहिजे. आणि तो यापैकी काहीही नसेल तर तो या धरेवर ओझे मात्र आहे. तो जितक्या लवकर निघून जाईल आणि या भूमातेवरील ओझे कमी करून येथील वातावरण शुद्ध करील तितके त्याच्याकरिता आणि इतर सर्व संबंधितांकरिताही चांगलेच असेल.

"या उपोषणापासून मला परावृत्त करण्याकरिता वा माझ्याबद्दल वाटणाऱ्या काळजीमुळे माझ्या मित्रांनी बिरलाभवनकडे धाव घेऊ नये. उलट आजूबाजूच्या वातावरणात दुरुस्ती करण्याचा त्यांनी प्रयत्न करावा.

"आंध्र प्रदेशातून मला दोन पत्रे आली असल्याचे काल मी तुम्हांला सांगितले होते. त्यांतील एक देशभक्त कोंडा वेंकटपैय्या या माझ्या वयोवृद्ध मित्राचे आहे. त्यांतील काही उतारे मी तुम्हांला सांगतो :

"राजकीय आणि आर्थिक प्रश्न बाजूला ठेवले तरी कॉंग्रेसच्या लोकांचे झालेले नैतिक पतन ही मोठीच क्लिष्ट समस्या आहे. मी इतर प्रांतांबद्दल विशेष काही सांगू शकत नाही परंतु माझ्या प्रांतातील परिस्थिती अतिशय चिंतनीय आहे. राजकीय सत्तेने त्यांचे डोके फिरले आहे. विधानसभेचे आणि विधानपरिषदेचे अनेक आमदार या संधीचा पुरेपूर लाभ उठवण्याचा प्रयत्न करत आहेत.

"ते आपल्या प्रभावाचा, ओळखीपाळखीचा पुरेपूर उपयोग करून पैसा मिळवण्याचा प्रयत्न करत आहेत. इतकेच नाही तर गुन्हेगारी खटले चालणाऱ्या न्यायालयात जाऊन न्यायालयातील कामकाजाच्या प्रक्रियेत अडथळा आणण्याचा प्रयत्न करत आहेत. इतकेच नाही तर या आमदारांच्या सतत होणाऱ्या पक्षपाती हस्तक्षेपामुळे जिल्ह्याचे कलेक्टर आणि महसूल खात्यातील इतर अधिकाऱ्यांनाही मोकळेपणाने आपले काम करता येत नाही. कोणताही प्रामाणिक अधिकारी दीर्घकाळ आपल्या पदावर राहू शकत नाही. त्याच्या विरोधात मंत्र्यांकडे खोटी तक्रार केली जाते व मंत्री या तत्त्वहीन स्वार्थी लोकांचे ऐकतात. स्वराज्याची ओढ ही अशी गोष्ट होती की जिच्यामुळे सर्व स्त्री-पुरुष तुमचे नेतृत्व मान्य करू लागले होते. परंतु आता ते ध्येय साध्य झालेले असल्यामुळे बहुतांश कॉंग्रेसच्या लढाऊ कार्यकर्त्यांवर जे नैतिक बंधन

होते ते नाहीसे झाले आहे. इतकेच नाही तर आपल्या स्वातंत्र्य संग्रामात कट्टर विरोधक असलेल्या लोकांशीही ते हात मिळवू लागलेले आहेत आणि स्वतःच्या स्वार्थाकरिता ते त्यांचे नाव कॉंग्रेसचे सदस्य म्हणून नोंदवू लागलेले आहेत. परिस्थिती दिवसेंदिवस असह्य होत चालली आहे आणि त्यामुळे कॉंग्रेस सरकार तसेच कॉंग्रेसबद्दलही लोकांना आदर वाटेनासा झाला आहे. आंध्र प्रदेशमध्ये नुकताच झालेल्या नगरपालिकेच्या निवडणुकांवरून कॉंग्रेसची जनतेवरील पकड किती वेगात कमी होते आहे ते दिसून येते. गुंटूरमधील नगरपालिकेच्या निवडणुकांची पूर्ण तयारी झाल्यानंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या मंत्र्याच्या (मद्रास) आदेशावरून तेथील निवडणुका एकाएकी थांबवण्यात आल्या.

"मला असे वाटते की गत दहा वर्षांपासून केवळ नामित परिषदच अस्तित्वात आहे आणि नगरपालिकेचे प्रशासन आयुक्तांच्या हातात आहे. आता असे ऐकिवात आहे की या शहरातील नगरपालिकेचे प्रशासन हातात घेण्याकरिता सरकार लवकरच सदस्य नामित करणार आहे.

"मी म्हातारा आहे. पाय मोडलेला आहे. काठीच्या आधाराने लंगडत लंगडत घरात मी थोडाफार हिंडू शकतो. मला माझा कोणताही स्वार्थ साध्य करायचा नाही. यात काही शंका नाही की जिल्ह्याची कॉंग्रेस पार्टी आणि प्रांताची कॉंग्रेस कमेटी ज्या दोन गटात विभाजित झाली आहे तिच्या प्रमुखांसमोर मी माझे विचार कठोर शब्दांत ठेवत असतो. मी माझे विचार कधीही लपवून ठेवले नाही, आणि माझे विचार सर्वांना माहीत आहेत. कॉंग्रेसमधील गटबाजी, अनेक आमदारांचा पैशामागे लागण्याचा प्रयत्न आणि मंत्र्यांचा दुबळेपणा यामुळे जनतेमध्ये बंडखोरीची भावना निर्माण होत आहे. लोक म्हणतात की यापेक्षा तर इंग्रजांचे राज्य चांगले होते. ते कॉंग्रेसला शिव्याशापसुद्धा देत आहेत.

"आंध्र आणि इतर प्रांतांमधील लोकांनी या स्वार्थत्यागी देशभक्ताच्या शब्दांचा विचार करावा. ज्या अप्रामाणिकपणाचा त्यांनी उल्लेख केला तो केवळ आंध्रमध्येच नाही. परंतु ते आंध्रबद्दलचाच आपला स्वतःचा अनुभव सांगू शकतात. आम्ही सर्वांनी सावध राहिलो पाहिजे!.

"माझ्या बहावलपूरच्या मित्रांनी धीर धरावा अशी माझी विनंती आहे. सरदार साहेब मला आज दुपारीच भेटले होते. माझे मौन असल्यामुळे आणि आधीच्या कामात व्यस्त असल्यामुळे मी काहीही सांगू शकलो नाही. श्री शंकरसुद्धा (वल्लभभाई पटेल यांचे स्वीय सचिव) त्यांच्या कार्यालयात इतके व्यग्र होते की तेसुद्धा तुमचे प्रकरण त्यांच्यासमोर मांडू शकले नाही. तसे करून त्यांनी बहुधा सरदारांचा अमूल्य वेळ वाचवला असावा."

प्रार्थनेनंतर गांधीजी सरळ लॉर्ड माऊंटबॅटन यांना भेटायला गेले. आमच्या बिरलाभवनमधील वातावरण तर फार गंभीर झाले आहे, केवळ बापूजी तेवढे प्रफुल्लित आहेत.

भाईसाहेब, सुशीलाबहेन, प्यारेलालजी या सर्वांना माऊंटबॅटननी पार्टीत जेवायला बोलावले. भाईसाहेबांची पार्टीत जाण्याची अगदीच इच्छा नाही. त्यांनी बापूजींना विचारले. बापूजी म्हणाले, "तुम्ही जायला पाहिजे. तिथे गेल्यानंतर पाहा की दारू वाढली जाते की काय? शिवाय तिथेसुद्धा उपवासाच्याच गोष्टी होतील. आणि त्या निमित्ताने तुम्ही त्यांना माझे विचार समजावून सांगू शकाल."

आपल्या उपवासासंबंधी एका मित्राला बापूजी म्हणाले, "माझी जर आणि जेव्हा खात्री पटेल की सर्व समुदायांचे कोणत्याही बाह्य दडपणामुळे नाही, तर जागृत कर्तव्यभावनेतून आणि ईश्वरच आपला सर्वोच्च आणि एकमेव मार्गदर्शक आहे या भावनेतून खऱ्या अर्थाने अंतःकरणाचे ऐक्य झाले आहे असे आढळेल तेव्हा मला इतर कोणत्याही सल्लागाराचा सल्ला घेतल्याशिवाय निर्णय घ्यावाच लागेल."

३।। वाजता बापूजी माऊंटबॅटनसाहेबांना भेटायला गेले होते. तिथून ते ७।।। वाजता परतले. तेव्हा तर लोकांनी त्यांची खोली चिक्कार भरून गेलेली होती. बापूजी सर्वांना संबोधत म्हणाले, "कोणीही घाबरू नका. प्रत्येकाने आपापल्या ठिकाणी राहावे आणि आपापले काम करावे." देवभाईंना पटण्याला जाण्याकरिता सांगितले. सुऱ्हावर्दीसाहेब आले. मी म्हणाले, "बापूजी तुमच्या उपवासाशी सुऱ्हावर्दीसाहेबांचे काही देणेघेणे आहे असे वाटते." बापूजी त्यांना म्हणाले, "देखो, यह लडकी क्या कह रही है?"

एवढ्यात जवाहरलालजी आले. यामुळे सर्व बाहेर निघून गेले. सुशीलाबहेन सरदारदादांजवळ गेल्या. सरदारदादा अतिशय काळजी करत होते आणि नाराजही होते.

शीख आणि हिंदू असलेली एक ट्रेन पेशावरहून आली. तिच्यावर भयानक हल्ला झाला.

बापूजींनी कोणाशीही सल्लामसलत न करता उपवास करायचा निर्णय घेतल्याबद्दल . . . फार नाराज आहेत.

बापूजी म्हणाले, "मी गेल्या सेप्टेंबरपासून इथे आहे. माझ्यासमोर एक गोष्ट करतात आणि मनात असते दुसरेच. परिणामी मी त्यांच्या विश्वासात राहतो आणि जनता माझ्या विश्वासात. आणि . . . मधील गंभीर वैचारिक मतभेदाचे परिणाम सर्वसामान्य जनतेला भोगावे लागतात. . . . मध्ये भयंकर सडण वाढत चालली आहे. या उपवासात कोणतीही एक व्यक्ती दृष्टीसमोर नाही. माऊंटबॅटननीसुद्धा हे कबूल केले आहे. आणि याचे शुभ परिणामच होतील हे माझे म्हणणे त्यांनाही पटले आहे. आणि यामुळे हिंदुस्थानात जर सुधारणा झाली तर इतरामध्येही आपोआपोच सुधारणा होईल."

दहा वाजता बापूजी खूपच प्रसन्न मनोवस्थेत अंथरुणावर पडले. मी बापूजींच्या डोक्याला तेल चोळले. देवदासकाका आणि जनमादासकाका आले. त्यांनी बापूजींच्या प्रवचनात बऱ्याच सुधारणा केल्या. देवदासकाका उपवासाच्या विरोधात तर काही म्हणाले नाही, परंतु हा उपवास पाकिस्तानच्याही विरोधात आहे काय असे त्यांनी विचारले.

बापूजी म्हणाले, "एका दृष्टीने बरोबर आहे. माझा उपवास सर्वांच्या विरोधात आहे. प्रत्येकाने आत्मशुद्धी करावी म्हणून आहे."

जमनादासकाका बापूजींना विनोदात म्हणाले, "अहो तुम्ही तर मला उपवास करायला लावण्याच्या मागे पडला आहा? नाही?"

जमनादासकाका म्हणाले, "कावळा बसणे आणि ताड पडणे एकाच वेळी झाले इतकेच मला म्हणायचे आहे."

बापूजींनी प्रवचन वगैरेंचे काम आटोपले आणि ते १२।। च्या सुमारास झोपले. सर्वच १२।। वाजता निघाले.जातांना देवदासकाकांनी मला बापूजींकरिता एक पत्र लिहून दिले. आणि ते उद्या सकाली वाचायला सांगितले.

मला तर रात्री बापूजींची खूप काळजी वाटत होती. बापूजींची मनोवेदना आजकाल जवळपास गेल्या आठवड्यासारखीच असह्य आहे. राजकारणातील आणि सामाजिक सडण तर ठीक आहे, परंतु

या लहानशा बिरलाभवनमध्येसुद्धा त्यांना शांतता वाटत नव्हती. ते म्हणाले, "आदर्श हिंदुस्थानचे माझे स्वप्न भंग पावू लागले आहे याची मला फिकीर नाही. परंतु आता तू तुझे काम कर असा आदेश माझा अंतरात्मा मला देतो आहे असे मला वाटते."

. . . एक बंगाली भगिनी आल्या आहेत. कदाचित त्यांना त्यांच्याशी लग्न करायची इच्छा असेल. बापूजी म्हणाले, "माझ्याबरोबर २५-२५ वर्ष काढल्यानंतरही अशा प्रकारे माझी फसवणूक केली जाते आणि ईश्वर मला आंधळे करून टाकतो, परंतु प्रभू विजेचा झटका दिल्यासारखे करून मला जागेही करून टाकतो. यामुळे मला मुळीच पश्चात्ताप नाही. . . . " मला तर विचार पडतो की बापूजी अशा भयंकर वेदनेतून आणि परिस्थितीतून जात असताना ५० वर्षाच्या वयात असा विचार वा स्वप्न मनात येतातच कसे? यांना यांचे नशीब लखलाभ होवो ! मला तर या विचारांनी तीनचे टोले पडेपर्यंत झोपच आली नाही. बापूजींच्या उपवासाच्या कारणात याही कारणाची भर पडली आहे. परंतु मला वाटू लागले आहे की आता बापूजींकरिता हिंदुस्थान नाहीच. आता बापू फार दिवस काढतील असे वाटत नाही. खूप नाराज आहे. पण मी काय करू? यांची समजूत घालण्याच्या दृष्टीने मी फार लहान आहे. सांगतांना संकोच वाटतो, पण मनात फार चीड भरली आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१३-१-'४८

अग्निपरीक्षा

पू. बापूजींच्या जीवनात हा पंधरावा उपवास आहे.

साडेतीन वाजता नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेत 'हरिने मारग छे शूरानो, नहीं कायरनुं काम जेने' हे भजन आम्ही गाईलो. प्रार्थनेनंतर बापूजी मला . . . च्या गोष्टी सांगताना म्हणाले, "कालपासून तू माझी काळजी करते आहेस. असे न करता तुझ्यात जी कला आहे तिचा धैर्याने उपयोग कर, तू . . . ला विचार, समजूत घाल. तुझ्याकरिता प्रश्न लहान असो की मोठा याला मुळीच महत्त्व नाही. या वेळी कलकत्त्यापेक्षा समस्येचे स्वरूप अगदी वेगळेच आहे. माझ्या काळजीचा विषय तू ईश्वरावर सोपव, आणि त्याऐवजी कोणाला कशा प्रकारे खरी गोष्ट समजावून सांगायची याचा जर तू विचार केला तर समाजाचा तसेच माझा आणि सगळ्यांचा लाभ होईल. हे कौशल्य तुझ्यातच आहे, परंतु हिंमत नाही. तू एकदा आत्मविश्वास ठेवायला शिकलीस की बाकी सगळे आपोआप येईल. त्यांची जर लग्न करायची इच्छा असेल तर त्यांनी लग्न करायला पाहिजे. असे झालेले दिसेल तेव्हा सर्वांचा खूप लाभ होईल. या वेळेचा हा उपवास केवळ हिंदू-मुसलमानांकरिताच नाही. सर्व लोक जसे आहेत तसे दिसत नाहीत. ते स्वतःला, आपल्या आत्म्याला, तसेच मला फसवत आहेत. याविरुद्ध हा उपवास आहे. अशी सडण झाल्यामुळेच भाऊभावाची कापाकापी करण्याचा रोग पसरला आहे. यामुळे तुझ्यावर माझ्या खूप आशा केंद्रित झालेल्या आहेत. तू एकदा हिंमत केली तर तुला सर्व काही येईल. जर तू अशा प्रकारे दडपणाखाली येत राहशील तर दडपणाखालीच राहशील. मला जरी सोडून गेले, मी जरी एकटाच राहिलो तरी मला त्याची फिकीर नाही. या महायज्ञाच्या खूप पातळ्या आहेत. तुला तर खूप सहन करायचे आहे. तुला असा ढिलेपणा परवडणार नाही."

मी तर हुंदके देत देत रडतच होते. ना असे बोलत होते, ना तसे. बापूजींची व्यथित अंतःकरणाची ही वाणी एखाद्या शत्रूने जर ऐकली असती तर त्याचेसुद्धा हृदय हेलावले असते. बापूजींना आपल्याच माणसांच्या अप्रामाणिकपणाकरिता आपले बलिदान करावे लागत आहे. असे असले तरी त्या सर्वांचा गांधीजींची माणसे म्हणून उद्धार होतो आहे. ईश्वराचे गूढ हेच नाही काय? . . . नोआखालीत बसले

आहेत, आणि आता विशेष काही करतही नाहीत. ना राजकोटचा काही विरोध. अशा माणसाने बापूच्या नावाने आपला बचाव करावा आणि असे करूनही अंहकाराने मिरवावे. परंतु बापूजींमध्ये ही सहनशीलता वा काळजी घेणे त्यांच्या शांततेचा परिणाम आहे की काय हे देवाला माहीत. ईश्वराची माझ्यावर खरोखर अपार कृपा आहे. माझ्यामुळे बापूजींचे समाधान होऊ नये असे कोणतेही कारण नाही. मी असे विशेषेकरून विचारले, तर बापूजी मला म्हणाले, "मला फक्त तुझ्या प्रकृतीबद्दलच असमाधान आहे. या उपवासात रामजी जर मला उचलून नेऊ लागले तर मी तुझी प्रकृती ताळ्यावर आणू शकलो नाही हे असमाधान माझ्या मनात राहीलच. तुझी प्रकृती इतकी नाजूक झाली आहे की त्याकरिता मीसुद्धा दोषी ठरतो हे खरे आहे ना? तू तर १६-१७ वर्षाची पोर आहेस आणि तुझ्याकडून मी काम घेतले १८-२० तास. अशा प्रकारे मी तुझी आई झालेलो असल्यामुळे मी तुझा गुन्हेगार आहे. तू जर या बाबतीत थोडी सावध झाली तर या अपराधातून तू मला बाहेर काढू शकते."

मी स्वतःच या वेळी इतकी काही गर्भगळित झाले आहे की ईश्वराने बापूजींना ठेवावे आणि मला घेऊन जावे असे मला वाटू लागले ! बापूजींचे माझ्यावरील प्रेम आणि विश्वास मात्र दिवसेंदिवस वाढतच चालले आहेत. आधी माझी दैनंदिनी वाचली. गेल्या ऑगस्टमध्ये कलकत्त्यात बापूजींनी जो उपवास केला तो माझ्या जीवनात मी एकदा पाहिलेला असल्यामुळे या वेळी माझ्याकरिता तो इतका धक्कादायक झाला नव्हता. या वेळी मला काही चित्रविचित्र अनुभव आले खरे. ईश्वराजवळ मी इतकेच मागते आहे की हे प्रभू ! माझ्याकडून इतर काही जरी होऊ शकले नाही तरी काही हरकत नाही, परंतु नकळत का होईना माझ्याकडून बापूजींशी अप्रामाणिकपणाचे वर्तन होऊ देऊ नकोस आणि माझ्याकडून बापूजींच्या या इतक्या मोठ्या दुःखात अजून भर पडणार नाही इतकी शक्ती मात्र मला दे. बापूजींच्या वेदनांना सीमाच नाही. आज खरोखर महादेवकाकांची आठवण येते. बापूजी आणि या पुढाऱ्यांना जोडेल अशा साखळीसारखा आज कोणीही नाही. बापूजी आणि बापूजींच्या अगदी जवळच्या मित्रांना आणि लोकांना जोडेल अशा साखळीसारखाही आज कोणी नाही. प्रभूने काय इच्छिले आहे हे तर त्याचे त्यालाच माहीत. माझ्याकडून असे कोणतेही अनुचित वर्तन वा काम होऊ नये इतकीच माझी इच्छा आहे.

सकाळी बापूजींची गांभिर्याने तसेच प्रेमाने आणि वात्सल्याने भरलेल्या वाणीतून माझ्याबद्दल जो विश्वास व्यक्त केला होता तो ऐकल्यानंतर देवदासकाकांनी बापूजींना देण्याकरिता मला दिलेले पत्र

त्यांना देण्याची मला हिंमतच होत नव्हती. इतके काही रडू येत होते की कधी काळीसुद्धा इतके रडल्याचे मला आठवत नाही. ही रोजनिशी रात्री साडेबारा वाजता लिहिते आहे. परंतु माझ्या पाठीवरून बापूजींचा गोड प्रेमळ हात फिरत असताना आणि ते जे मला म्हणत होते त्याने माझ्या मनात वेगळीच पूर्वानुभूती निर्माण होते आहे. तो आवाज अजूनही माझ्या कानात गुंजन करतो आहे.

झोपण्यापूर्वी बापूजींनी मला एक चिठ्ठी दिली.

चि. मनूडी,

तू जर धीर धरशील तर तुझ्या एकूण देहात सुधारणा होईल. तुझ्यामध्ये भरपूर क्षमता आहे परंतु तुझ्या संकोची स्वभावामुळे तिचा विकास होऊ शकलेला नाही. यावर विचार कर. तुझा लाजाळूपणाच तुला मारतो आहे. खाणे हे तुझे कर्तव्य आहे आणि माझ्या आईवडिलांनी मला असेच शिकवल्यामुळे खाणे माझे कर्तव्य आहे असे तुला कोणालाही धैर्याने सांगता आले पाहिजे. तुझ्यात मनाचा धीटपणा नसल्यामुळे इतर कुणाकडे खाण्याची वेळ आली तर ते देतील ते आणि तितकेच तू खाशील. मला याची हळूहळू सवय होईल असे तू सांगायला पाहिजे. तू ही गोष्ट कोणालाही न घाबरता सांगितली पाहिजे. असे केले तर तुझी क्षमता अभिव्यक्त होईल व तिचा विकास होईल. तू आजारी पडलेली पाहून मला किती वेदना होतात हे तुला माहीत नाही. जयसुखलालने माझ्यावर किती विश्वास टाकला आहे याचा विचार कर. यामुळे तुझ्यात शारीरिक आणि मानसिक सुधारणा झाली नाही तर मला फार दुःख होईल.

बापूचे आशीर्वाद

१३-१-'४८

ही चिठ्ठी वाचल्यानंतर कोणाला दिसणार नाही अशा प्रकारे मी एका कोपऱ्यात बसले आणि खूप रडले. वात्सल्याने भरलेल्या या शब्दांचे ऋण मी कसे चुकवीन? इतक्या कसोटीच्या काळातही बापूजी मला चिठ्ठी लिहायला विसरले नव्हते !

पूज्य बापूजींच्या जीवनातील हा पंधरावा उपवास होता.

(१) सर्वात पहिला - १९१३ साली दक्षिण आफ्रिकेत फिनिक्स आश्रमात . . . च्या नैतिक अधःपतनाकरिता सात दिवसांचा उपवास केला.

(२) १९१४ साली दुसऱ्यांदा . . . ने बापूजींनी दिलेल्या वचनाचा भंग केल्याबद्दल आणि त्यांचा विश्वासघात केल्याबद्दल चौदा दिवसांचा उपवास.

(३) १९१८ साली अहमदाबाद येथील गिरणी मजुरांच्या संपाच्या वेळी तीन दिवसांचा उपवास.

(४) १९२१ साली प्रिन्स ऑफ वेल्स यांचे हिंदुस्थानात आगमन होत असताना त्यांच्या स्वागताला आणि बहिष्काराला सहकार्य करायचा की असकार करायचा हे भांडण थांबवण्याकरिता चार दिवसांचा उपवास.

(५) १९२४ साली हिंदू-मुसलमानांमधील संघर्ष आणि प्रायश्चित्त आणि आत्मशांततेकरिता एकवीस दिवसांचा दिल्लीत उपवास.

(६) १९२४ साली साबरमती आश्रमात विद्यार्थिनींच्या चारित्र्यातील दोषाकरिता एका आठवड्याचा उपवास.

(७) १९३२ साली आप्पासाहेब पटवर्धननी येरवडा तुरुंगात भंग्याचे काम करण्याची मागणी केली होती. तुरुंगाधिकाऱ्यांनी त्या बाबतीत विरोध केला. यामुळे आप्पासाहेबांनी आमरण उपवास केला होता. याच्या सहानुभूतीप्रित्यर्थ गांधीजींनी दोन दिवस उपवास केला होता.

(८) १९३२ साली हरिजनांकरिता आमरण उपोषणाचा संकल्प केला. परंतु एका आठवड्यातच याचा निर्णय झाल्यामुळे हे उपोषण थांबवले.

(९) १९३३ साली एकवीस दिवस येरवडा तुरुंगात हरिजन आंदोलन आणि सहकाऱ्यांच्या आत्मशुद्धीकरिता उपवास केला होता. परंतु बापूजींची तुरुगातून सुटका करण्यात आल्यामुळे पुणे येथील पर्णकुटी बंगल्यात राहिलेले दिवस उपवास करून एकवीस दिवसांची मुदत पूर्ण केली होती.

(१०) गांधीजींनी व्यक्तिगत सत्याग्रह करायला लावल्याच्या कारणाने त्यांना अटक करण्यात आली. तिथे त्यांनी हरिजन कार्य करण्याची परवानगी मागितली होती, परंतु ती नाकारण्यात आली. यामुळे बापूजींनी उपवास केला. परिणामी बापूजींना सातव्या दिवशीच सोडण्यात आले.

(११) १९३४ साली हरिजन यात्रेच्या दरम्यान अजमेरयेथे एका सनातनी माणसाने हरिजनाला मारले. याचे प्रायश्चित्त म्हणून सेवाग्राम आश्रमात सात दिवस उपवास केला.

(१२) १९३६ राजकोटच्या सत्याग्रहाच्या वेळी उपवास. परंतु व्हाईसरायच्या यशस्वी मध्यस्तीमुळे हा उपवास चार दिवसातच संपला.

(१३) १९४२ साली आगाखान महालात 'हिंद छोडो' आंदोलनात योग्य न्याय मिळवण्याकरिता एकवीस दिवस उपवास केला.

(१४) १९४७ साली बेलियाघाट, कलकत्ता येथे हिंदू मुसलमानऐक्याकरिता ७३ तासांचा उपवास

(१५) १९४८ साली दिल्लीत अंतःकरणापासूनची मैत्री घडवून आणण्याच्या वा मरण्याच्या संकल्पनेने उपवास.

फिरायच्या वेळी आफ्रिकावाले सोराबजी रुस्तमजी, जोहानिसबर्गचे प्रागजीभाई आणि मोहनलाल अमरथी सोबत होते. त्याआधी रोमा रोला यांच्या एका पुस्तकाची प्रस्तावना बापूजींनी लिहून टाकली होती.

फिरत असताना एक जण म्हणाला की तुमचा जर मृत्यू झाला तर संघराज्यात एकही मुसलमान जिवंत राहणार नाही.

बापूजी म्हणाले, "तुम्हापैकी कोणाचाही सल्ला वा बुद्धी उपयोगाची नाही. असे का? याचे उत्तर मी देऊ शकणार नाही. जवाहरलालवर तर मी फिदा आहे. त्यांनी याबद्दल माझ्याशी किंचितही वाद

घातला नाही. परंतु आता सरदार कबूल करतील तर काम झाले समजायचे. जवाहरला तर ना हर्ष आहे ना शोक."

आंघोळ करत असताना राजकुमारीबहेन आल्या. त्या म्हणाल्या की बापूजींनी हे जे पाऊल उचलले आहे ते योग्य वाटते. आणि त्या असेसुद्धा म्हणाल्या की यामुळे देशाचा लाभच होईल. पाकिस्तानला ५५ कोटी देण्यासंबंधी चर्चा झाली. सरदारदादांची समजूत घालावी लागली. मध्यंतरी तर बाहेर वार्ताहर, छायाचित्रकार, काकी, डॉ. जीवराजकाका आणि इतर अनेक जण आले होते. बापूजींनी उपवासाआधीचे शेवटचे जेवण असे घेतले - अडीच खाकरे, सोळा अंस दूध, ग्रेपफ्रूटच्या तीन फोडी. बरोबर अकरा वाजता बापूजींनी शेवटचे जेवण संपवले आणि प्रार्थना सुरू झाली.

'नम्यो हो रंगे क्यो!' या बौद्ध मंत्रानंतर 'औझबिल्लाह' ही मुसलमानांची प्रार्थना, नंतर 'इशावास्य', 'यं ब्रह्मा' आणि शेवटी 'ॐ असतो मा सद्गमय; तमसो मा ज्योतिर्गमय, मृत्योर्माऽमृतं गमय' आणि सर्वात शेवटी भजन 'वंडरस क्रॉस' गायला लावले.

सर्व विचारत होते आता तर विशेष काहीही झाले नाही, मग बापूजींचा हा उपवास कशासाठी?

बापूजी - एखादा माणूस असाध्य रोगाने जर आजारी पडला असेल तर हालहाल होऊन त्याला जिवंत ठेवण्यापेक्षा तर त्याला मरू देणे चांगले ना? चीनमध्ये फासावर चढवण्याची शिक्षा खूप चांगल्या प्रकारे देण्यात येत असते. बटन दाबतात आणि माणूस लगेच असल्याचा नसला होतो. मी किती दिवसांपासून धीर ठेवला. आज मौलाना साहेब वा सुऱ्हावर्दीसाहेब मोकळेपणाने हिंदूंच्या मोहल्ल्यातून जाऊ शकतात? ते जाऊ शकत नाहीत म्हणून मी ही शांतता खरी शांतता आहे असे समजत नाही.

हकीम अजमलखांचा मुलगा बापूजींना म्हणाला की तुम्ही उपवास तोडा. सध्या तर काहीही झाले नाही. मौलानासाहेब मध्येच म्हणाले, "यांनी जो निश्चय केला तो आपण डोकेफोड करून जरी मेलो तरी हे बदलणार नाहीत. आता तर त्यांचा उपवास कसा सुटेल याचा विचार करून तो सुटावा म्हणून आपण प्रयत्न केला पाहिजे."

येथील जिल्हा पोलीस अधिक्षक आले. त्यांनी बापूजींना कलकत्त्याची पूर्ण हकिगत सांगितली. त्यांनी बापूजींना आश्वस्त करत सांगितले की मी माझ्याकडून होईल ते सर्व करीन.

सरदार आणि मणिबहेनला - "सर्व काही जरी सोडावे लागले तरी आपण आपला सत्याचा मार्ग सोडायला नको. तसेच आपण जर दिलेल्या वचनाचे पालन केले नाही तर आपल्यात आणि इतरांमध्ये फरक काय?" देशबंधू गुप्ताजी, हंसराज यांचे बिनतारी संदेशाचे प्रयोग बापूजींनी पाहिले. ध्रांगध्राचे महाराजसाहेब आले. पुरुषोत्तमदास त्रिकमजीसुद्धा आले. त्यांनी मुंबईतील (खळबळजनक अंतर्गत भांडणाची, आणि काँग्रेसचे पुढारी लाग्याबांध्याचा उपयोग कसा करतात याची) आणि कान टवकारतील अशी गोष्ट सांगितली.

कातल्यानंतर पट्टणीसाहेब आले. एका ऐतिहासिक फोटोंच्या नकलांवर बापूजींची सही घ्यावी म्हणून ते ते फोटो मला देऊन गेले. त्या फोटोंमधील प्रत्येक फोटोवर बापूजींचे आशीर्वाद आणि सही घ्यायची होती. कोणाचेही नाव न लावण्याच्या अटीवर आणि बापूजींना इच्छा असेल तसा उपयोग करण्याकरिता त्यांनी ते मला दिले. परंतु त्यांच्यासमोरच मी ते बापूजींना दिले. बापूजी मला म्हणाले, "तुझ्यावर माझा हक्क नाही, पण तुझा माझ्यावर हक्क आहेच". ही भाषा समजायला जरी मला वेळ लागला तरी मला हसू आलेच. पट्टणीसाहेब उद्या भावनगरला जाणार आहेत. या उत्सवात हजर राहण्याचा सल्ला बापूजींनीच त्यांना दिला आहे. आणि आजच बापूजींचा उपवास सुरू होतो आहे. वातावरणात उदासीनता भरलेली आहे. केव्हा काय होईल हे सांगता येत नाही. अशा वातावरणात त्यांना जावेसे वाटत नव्हते असे मला वाटते. शिवाय बापूजींनी या प्रसंगाला उपस्थित राहावे अशी भावनगरच्या महाराजसाहेबांची आणि दिवाणसाहेबांची प्रबळ इच्छा होती. पट्टणीसाहेब खूप भावनाशील झाले आहेत. बापूजींना ते म्हणाले, "तुमच्याकरिता सोयीचे होईल तेव्हा तुम्ही जर ५ मानसिंग रोडवरील माझ्या घरी येऊ शकला तर मला फार आनंद होईल."

बापूजी म्हणाले, "मला आठवण आहे. याकरिताच मला तिकडे यायचे आहे. परंतु आता तर दिल्लीत 'करायचे वा मरायचे' आहे. जर कुठे जायचे असेल तर इथून तर सुटका झाली पाहिजे ना? मग तर भावनगरमध्ये तुमच्याकडेच येईन. जर इथे काही झाले आणि शांतता स्थापित झाली तर या प्रसंगी मी निश्चित येईन. परंतु आपल्या सर्वच इच्छा कुठे पूर्ण होत असतात? आता मला वाटते आहे की याचा काही तरी परिणाम होईलच. ईश्वराला जर माझ्याकडून काम घ्यायचे असेल तर तो लोकांना सन्मती देईल. आणि माझे कार्य पूर्ण झाले असेल तर तो मला उचलून घेईल. असे जरी झाले तरी ते माझ्याकरिता श्रेयस्करच होईल. मध्यंतरी तुमच्याकडून मला फार काम घ्यायचे आहे, आणि त्यात तुम्ही तुमचे कौशल्य दाखवा. भावनगरचे राज्य जनतेला सोपवल्यानंतर काठियावाडच्या इतर राजांना या

मार्गावर आणण्याच्या कामात तुमचे कौशल्य दाखवा. काठियावाडमधील राजांना तुम्ही चांगल्या प्रकारे ओळखता. आणि काठियावाडमधील राजा आणि दिवाण यांचे कसे कौटुंबिक संबंध असतात हे जगाला दाखवून द्या. मला ते दिवस पाहायची उत्कंठा आहे की जेव्हा भावनगरच्या महाराजांनी ज्याप्रमाणे जनतेला आपले सर्व काही सोपवले आणि स्वतः जनतेच्या सेवेकरिता उभे झाले, आणि रामराज्याची माझी जी कल्पना आहे ती हिंदुस्थानच्या या कोपऱ्यात साकार करण्याचा प्रयत्न करत आहेत. मग मला तुम्ही काठियावाडमध्ये आणि तुमच्या घरी घेऊन जा. इतर कोणत्याही अवस्थेत माझे येणे होऊ शकणार नाही. तिथे समुद्रकिनाऱ्यावर एक सुंदर गाव आहे. तुमच्या वडिलांच्या वेळी मी तिथे गेलो होतो. तिथे नरसिंह महेतांना साक्षात्कार झाला असे म्हणतात." बापूंना नाव आठवत नसल्यामुळे ते थोडे अडखळले. पट्टणीसाहेब म्हणाले, "गोपनाथ ना?" बापूजी म्हणाले, "हो, ते मला खूपच आवडले होते. आणि त्या वेळी माझ्याबरोबर महादेवसुद्धा होता. तुमच्या वडिलांनी चरख्यावर कताई करत असताना भजनसुद्धा ऐकवले होते." मी मध्येच म्हणाले, "मग तर बापूजी माझे महुवा तिथून अगदीच जवळ आहे." पट्टणीसाहेब म्हणाले, "ही पोरगी मला भुलवते आहे, आणि महुवा, महुवा करते आहे. अगदीच घाणेरडे गाव." मी म्हणाले, "तुमच्यामुळेच ना?" "आम्ही तर ते सुधारण्याकरिता जनतेला सोपवले आहे. जनता जर त्याच्यात सुधारणा करू शकत नसेल तर आम्ही काय करू शकतो? परंतु भावनगरची गोष्ट निघाली की तुझा महुवा उभा राहिलाच पाहिजे. अग वेडूबाई, भावनगर पाहायला येऊ दे, मग तिथून तुझ्या महुवाला बापूंना घेऊन जाशील." पट्टणीसाहेब आपल्या लाक्षणिक शैलीत म्हणाले. बापूजींना हसू आले. परंतु ते जेव्हा बापूंना प्रणाम करून निरोप घेण्याकरिता उठले आणि हात झोडून नतमस्तक झाले तेव्हा त्यांच्या डोळ्यातून झरझर अश्रुधारा वाहू लागल्या. माझे डोळेही पाणावले.

ते गेल्यानंतर बापूजी म्हणाले, "उपवासामुळे हे थोडे निराश झाले आहेत. तुझी इच्छा असेल तर एक दिवसाकरिता जा. चांगले वाटेल." मी नाही म्हणाले. उपवास सुरू नसता तर थोडा विचार केला असता.

बापूजी म्हणाले, "माझा सल्ला जर तुला पटत असेल आणि तू जर एकटी गेलीस तर माझ्याऐवजी तुला पाहून ते खुश होतील खरे. बाकी त्यांच्या स्वभावात जिद्द कमी नाही. परंतु माझे खूप ऐकतात. तू माझी सेवा करत असल्यामुळे ते तुझ्यावर सख्ख्या मुलीपेक्षा जास्त प्रेम करतात असे तुझ्या

लक्षात येईल. ते माझा शब्द झेलतात. माझ्यावर त्यांची पूर्ण श्रद्धा आहे. बापूंच्या सल्ल्यात माझे हित आहे अशी त्यांची मान्यता असल्यामुळे ते माझा सल्ला मान्य करत असतात."

मी विचारले, "ते दिवाणपद सोडतील, तर मग काय करतील?"

बापूजी - "या तपश्चर्येतून तर तुझ्याकडून मी खूप काम घेणार आहे. यांच्यात तर खूप काम करण्याचे कौशल्य आहे. हे तर खूप काम केल्यामुळेच इतके कुशल झाले आहेत. केवळ त्यांच्यापासून काम घेता आले पाहिजे. आणि ज्या माणसाला काम घेण्याची कला माहीत असते त्याचेच हे काम करत असतात, दुसऱ्याचे नाही. यामुळेच मी यांच्या अनुभवांचा उपयोग करू शकतो. आणि माझी तर मान्यता आहे की पूर्वग्रहामुळे अशा अनुभवी माणसाच्या जर उपयोग केला नाही तर आपल्याला ठोकरा खाव्याच लागतील. तू पाहिले नाही काय की मी बळवंतरावांना विशेषेकरून सूचना केली होती आणि मनुभाईंनासुद्धा सांगितले होते की यांच्या अनुभवाचा लाभ न घेण्याची चूक करू नका. आणि इतका नम्रपणा ठेवला पाहिजे. आता काय होते ते पाहू या."

अजून तरी बापूजींना थकवा वा अशक्तपणा जाणवून राहिला असेल असे वाटत नाही. म्हणाले, "मानसिक ओझे कमी झाल्यामुळे रोजपेक्षा तर मला आज जास्त स्फूर्ती वाटते आहे."

प्रार्थनासभेत तर आज खूपच स्फूर्तीने गेले. बापूजी सुरुवातीलाच म्हणाले,

"मला जे काही सांगायचे आहे ते पंधरा मिनिटात सांगता येईल अशी मी आशा करतो. परंतु आज सांगण्यासारखे इतके काही जास्त आहे की कदाचित काही मिनिट जास्त लागू शकतील."

आज तर उपवासाचा पहिलाच दिवस आहे. आणि सकाळी तर मी जेवलोसुद्धा आहे. साडेनऊ वाजता जेवायला सुरुवात केली होती. परंतु मध्यंतरी इतके अधिक लोक येत गेले की मी जेवण अकरा वाजताच पूर्ण करू शकलो. परंतु उद्यापासून शक्य आहे की माझ्याकडून प्रार्थनेपर्यंत येणे होणारही नाही. प्रार्थना झालीच पाहिजे अशी जर तुम्हा सर्वांची इच्छा असेल तर तुम्ही सर्व येऊ शकता. आणि या पोरींमधील सर्व वा एखादी मुलगी प्रार्थना करवून घेऊ शकेल.

काल मी तुम्हांला भावलपूरच्या शरणार्थ्यांसंबंधी सांगितले होते आणि सरदारांचे सचिव कामामुळे येऊ न शकल्यामुळे थोडा गैरसमजही झाला होता. मणिबहेन त्यासंबंधात असे म्हणाल्या की त्या दोन वाजता येऊ शकणार नाहीत. तेव्हा मला नीट कळले नव्हते. घोटाळा झाला. परंतु ही काही फार महत्त्वाची गोष्ट नाही. सरकारी नोकर खाजगी व्यक्ती मागे घेऱ्या घालत राहील अशी अपेक्षा मी तर केलीच नव्हती. परंतु या लोकांना माझी हकिगत आवडली नसल्यामुळे तिचा खुलासा मी आज करतो आहे.

आता मुख्य मुद्द्यावर येतो. आज दिवसभार माझ्याकडे अगणित लोक येऊन गेले. सर्व एकच प्रश्न विचारत होते की उपवास कशाकरिता आहे? हा आरोप कोणावर आहे? आणि कल्पना करा की या उपवासामधून मी जिवंत उठलो नाही तर हा आरोप माझ्यावरच आहे असे समजा. मी जर नालायक सिद्ध झालो तर ईश्वराने मला जिवंत राहू द्यायलाच नको. आज हिंदू आपल्या धर्माचे पालन करत नाहीत याचे मला अतिशय दुःख आहे. याचे कारण मी एक आदर्श हिंदू आहे. एकेका मुसलमानाला काढीन टाकायची वृत्ती हिंदूंमध्ये तसेच शिखांमध्ये निर्माण झाली आहे. परंतु ही वृत्ती चांगली नाही. अशाने आपण आपापल्या धर्माला आणि जमातीला अधर्मी बनवतो. ही गोष्ट खरी आहे की मी अल्पसंख्याकांची बाजू घेतो आहे. परंतु पुढाऱ्यांच्या आणि काही विशिष्ट लोकांच्या निर्णयाचे परिणाम निरागस लोकांवर होत असेल आणि त्यांना निराधार करण्यात येत असेल तर त्यांना मदत करणे मानवमात्रांचे कर्तव्य आहे. यामुळे खरोखर कशासाठी असे विचाराल तर आत्मशुद्धीकरिताच आहे. आणि ईश्वराने सर्वांना शुद्ध करावे. असे काही नाही की हिंदू आणि शिखांनीच शुद्ध व्हायचे आहे आणि मुसलमानांनी नाही. मुसलमानांनीसुद्धा सर्वांग शुद्ध व्हायला पाहिजे. आणि इथे जे मुसलमान आहेत तेसुद्धा गुन्हेगार नाहीत असे नाही. अशा प्रकारे सर्वांनी आपापला अपराध कबूल करायलाच पाहिजे. मी काही कोणाला खुश करणासाठी उपवास करून राहिलेलो नाही. मी तर केवळ ईश्वराला खुश करण्याचा प्रयत्न करत असतो.

हिंदुस्थानची फाळणी झालेली नव्हती तेव्हाही फाळणी व्हावी म्हणून फाळणीच्या प्रश्नावर जनतेच्या हृदयाची फाळणी करण्याच्या प्रयत्नात मुस्लिम लीगचा काही कमी सहभाग नव्हता. मुस्लिम लीगसारख्या संस्थेकडे अशा अमानुषी कृत्याची जबाबदारी जाते हे मी

गंभीरपणे सांगतो. परंतु इतर मुसलमान, हिंदू आणि शिखांनीही चुका तर केलेल्याच आहेत. आता या तिघांना अंतःकरणापासून जर मैत्री करायची असेल तर सगळ्यांनी आपापली अंतःकरणे शुद्ध केली पाहिजे.

आता दोन शब्द मुसलमानभाईंना आदरपूर्वक सांगू इच्छितो. हा उपवास त्यांच्या नावाने सुरु झालेला असल्यामुळे त्यांची जबाबदारी वाढली आहे. हिंदू आणि शिखांचे मित्र होऊनच राहायचे इतका तर त्यांनी कमीतकमी निश्चय केलाच पाहिजे. ज्यांची संघराज्यात राहायची इच्छा असेल त्यांची संघराज्यावर निष्ठा असली पाहिजे. हे लोक म्हणतात की आम्ही संघराज्याशी निष्ठावंत आहो, पण त्यांचे आचरण तसे नाही. माझे तर म्हणणे असते की बोला कमी, पण करून जास्त दाखवा.

पुष्कळ मुसलमान भाई मला सांगतात की जवाहरलालजी चांगले आहेत, परंतु सरदारांना मुसलमानांबद्दल सहानुभूती वाटत नाही. हे ऐकून तर मी स्तब्धच होऊन जातो. मुसलमान जर अशा गोष्टी करत असतील तर ते कसे चालेल? सरदार आणि जवाहरलाल मिळूनच हे सर्व शासन चालते आहे. हे सर्व तुमचे सेवक आहेत. आणि सर्वांची, संपूर्ण मंत्रिमंडळाची समान जबाबदारी आहे. सरदार जर अशी कोणतीही चूक करत असतील तर निश्चितच न घाबरता तुम्ही मला ते सांगा. मी माझ्याकडून शक्य ते सगळे प्रयत्न करीन. परंतु केवळ अशा प्रकारच्या अफवांना आणि पूर्वग्रहांना बांधून राहू नका. परंतु मी माझा न्याय वेगळ्या प्रकारे करीन. मी तर म्हणेन की सरदार, जवाहर, गांधी वा मुस्लिम लीग अशा कोणावरही विश्वास न ठेवता केवळ ईश्वरावर विश्वास ठेवणेच हितावह होईल. मला माहीत आहे की सरदारच्या जिभेला कदाचित काटे असतील, कडवटपणा असेल, परंतु त्यांच्या हृदयात मात्र काटे वा कडवटपणा नाही. हं, ते खरी गोष्ट कोणालाही सांगायला ते कचरत नाहीत. लखनौमध्ये त्यांनी सांगितले की मुसलमानांना जर हिंदुस्थानात राहायचे असेल तर ते आनंदाने राहू शकतात. परंतु लीगी मुसलमानांवर मात्र त्यांचा विश्वास नाहीच. यात ते काही चुकीचे बोलले असे मी समजत नाही. माणसाला जसे वाटते तसेच त्याने सांगायलाच पाहिजे. आणि शंका घेण्याचा त्यांना अधिकार आहे. परंतु या शंकेच्या आधारे ते अन्याय करू शकत नाही. मी

तर मनात शंका ठेवूच नये आणि जो गुन्हेगार ठरेल त्याला शिक्षा केली पाहिजे या मताचा आहे. परंतु सरदार तर सरदार आहेत. त्यांच्या शिरावर ही जबाबदारी आहे.

आज आताच मी 'एकला जाने रे' हे भजन गायला लावले होते. हे भजन मला फार प्रिय आहे आणि नोआखालीच्या माझ्या यात्रेदरम्यान हे भजन रोज गाईले जात असे. यात सांगण्यात आले आहे की 'तुझ्याबरोबर कोणीही जरी येत नसेल तरी तू तुझ्या मार्गाने एकटाच चालत राहा. ईश्वर तुझ्याबरोबर आहेच'. यामुळे हिंदू, शीख येथील अल्पसंख्याकांना जर वाचवू शकत नसतील तर मग मी जिवंत राहून काय करू? मी तर म्हणेन की पाकिस्तानमध्ये कितीही जरी हिंदू, शीख कापले जाऊन मेले तरी इथे एका लहानशा मुस्लिम मुलालासुद्धा पूर्ण सुरक्षितता जाणवली पाहिजे. जो दुर्बल आहे, निराधार आहे त्याला मारणे हा भेकडपणा आहे.

दिल्लीची आता परीक्षाच आहे. माझी अट हीच आहे की हिंदुस्थानचे वाटेल तितके तुकडे झाले वा पाकिस्तानमध्ये हवा तितका रक्तपात जरी झाला तरी दिल्लीने आपल्या कर्तव्यात चूक करू नये. दिल्लीतील शांतता जशीच्या तशीच कायम राहिली पाहिजे. सुऱ्हावर्दीसाहेबांसारख्या माणसालाही, ज्याला आपण गुंडांचा सरदार म्हणण्यात येत असते, कोणताही धोका न पत्करता मोकळेपणाने फिरता आले पाहिजे. आत तर सुऱ्हावर्दीसारख्यांना इथे प्रार्थनेकरिता आणताना जोखीम जाणवते. मग इतरांची काय गोष्ट राहिली? त्यांचा अपमान झाला तर तो माझाच अपमान झाला असे मी समजतो. यामुळे मी त्यांना इथे आणू शकत नाही. परंतु मी इतके तर सांगायलाच पाहिजे की ते कसेही जरी असले तरी कलकत्त्यात त्यांनी मला पूर्ण सहकार्य केले होते. आणि तिथे जे मुसलमान हिंदूंची घरे बळकावून बसले होते त्या सर्वांना त्यांनी बाहेर काढले. हिंदूंना त्यांची घरे परत केली. अशा प्रकारे आपण सर्व हिंदुस्थानींनी अंतर्मुख होऊन खरे हिंदुस्थानी व्हायला पाहिजे. हैवान व्हायला नको, माणूस व्हायला पाहिजे. आणि असे जर होत नसेल तर किमान मी इतके सांगतो की माझे जगणे व्यर्थ आहे.

आजपासून फिरणे बंद केले. प्रवचन पाहिल्यानंतर पंडितजींशी खूप गोष्टी केल्या.

बापूजींचे वजन १११ पौंड होते.

दुपारी ११। वाजता साधे गरम पाणी. नंतर संडासला गेले. मग १२ अंस माती घेऊन झोपले. २ वाजता ८।। अंस साधे गरम पाणी. ४ वाजता ८ अंस पाणी, रात्री १० वाजता झोपायची तयारी. १०।।।

वाजता सर्व मोकळे झाले. आज तर भेटायला येणारांचा काही सुमारच नव्हता - मग शिकले-सवरलेले असो अशिक्षित अडाणी असो.

प्रार्थनेनंतर आम्ही बिरलामंदिरात गेलो. आज एकूण ३६।। अंस ते ४० अंस पाणी पोटात गेले. परंतु फारसे बाहेर निघाले नाही. गेल्या वेळेच्या उपवासापासूनच किडनी खराब आहे. या वेळी काय होते ते खरे. माझ्या मते याच कारणामुळे वजन जवळपास तेवढेच राहिले. रात्री झोपायच्या वेळी आवाजात आणि शरीरातही चांगलाच अशक्तपण दिसून पडत होता. आज श्रमसुद्धा बरेच केले होते. आता ही रोजनिशी पूर्ण करून झोपायला जाते आहे. परंतु त्याआधी ईश्वराला अंतःकरणापासून प्रार्थना करते आहे की हे ईश्वरा! आमच्या बापूंचा करोडो लोकाना आधार आहे, मुले, स्त्रीपुरुष. तरुण, गरीबश्रीमंत, रंकापासून तर राजापर्यंत सर्वांना मूठभर हाडे असलेल्या या ८० वर्षाच्या म्हाताऱ्याचा आधार आहे. या सर्वांचे आश्रयस्थान आहे. हे प्रभू! या कसोटीतून यांना पार कर.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१४-१-'४८

उपवासाचा दुसरा दिवस

रात्री मला दोनदा जाग आली. खरे म्हणजे मी फार झोपलेच नव्हते, आणि झोपेतही तर बापूजींचीच काळजी असते. थंडी खूप आहे, यामुळे काळजीत अजूनच भर पडली आहे. एकूण पाहता रात्र चांगली गेली असे म्हणता येईल. बापूजी स्वतःच रोजप्रमाणे उभे राहिले, दातण केले. मी विचारले, "बापूजी, अशक्तपणा वाटतो ना? मी उपवास करतो आहे असे आज वाटत नाही." सरलाबरोबर गोष्टी केल्या. म्हणाले, "तुझा कार्यक्रम तूच तयार केला पाहिजे. मी तुझ्यावर मुग्ध होईन असे अजून तू काहीही केले नाही". प्रार्थनेनंतर बापूजींना मी आत घेऊन गेले. देवदासकाकांनी रात्री दिलेले पत्र बापूजींनी परत वाचले. उत्तर लिहिले. देवदासकाकांचे पत्र आणि बापूजींचे उत्तर दोन्ही अद्भुत आहेत.

१३-१-'४८

सकाळी ३.३० वाजता

पू. पिताश्रींच्या पवित्र सेवेत,

तुम्ही निवेदन देण्यात फार घाई केली आहे. अजून बऱ्याच सुधारणा करता येऊ शकल्या असत्या. उपवासाच्या योग्यतेबद्दल मला बरेच काही सांगायचे होते. परंतु मला तर काही कल्पनाच नव्हती. आणि मला कळवण्याचा कोणी त्रासही घेतला नाही. मी बऱ्याच आधी येऊ शकलो असतो आणि जे सांगायचे आहे ते सांगू शकलो असतो. परंतु चि. मनुने नुकताच मला ही बातमी सांगितली. माझी मुख्य काळजी आणि युक्तिवाद असा आहे की अखेरीस तुम्ही अधिरपणाला वश झाला. हे काम धैर्याचे होते. दिल्लीत आल्यानंतर धैर्याने मेहनत करून तुम्ही किती मोठे यश मिळवले आहे याची तुम्हाला कल्पना नाही. तुमच्या मेहनतीमुळे लाखो वाचले आहेत आणि अजून लाखो वाचले असते. परंतु तुम्ही अकस्मात धीर सोडला. या बाबतीत जिवंत राहून तुम्ही जे करू शकला असता ते मरून करू शकणार नाही. असा विचार करून वेळ राहताच उपवास सोडावा ही प्रार्थना.

चि. देवदासचे प्रणाम

पूज्य बापूंचे उत्तर -

१४-१-'४८

मकर संक्रांती

चि. देवदास,

सकाळच्या प्रार्थनेनंतर मी तुझे पत्र वाचले. काल तुझ्याशी जी चर्चा झाली होती तीही मी समजू शकतो. मी घाईघाईने वक्तव्य दिले असे तू ज्या अर्थाने म्हणतोस त्या अर्थाने मी ते देताना घाई केलेली नाही. परंतु एका अर्थाने तसे म्हणता येईल कारण सामान्यपणे असे वक्तव्य तयार करण्याकरिता मी जितका वेळ लावतो तितका या वेळी मी लावला नाही. याचे कारण याआधी त्यावर मी चार दिवस केलेले आत्मचिंतन आणि प्रार्थना आहे. ते वक्तव्य मी केलेले आत्मचिंतनाचे आणि प्रार्थनचे फळ आहे. यामुळे तो घाईघाईत घेतलेला निर्णय आहे असे ना तर माझ्या भाषेत म्हणता येऊ शकते ना ज्यांना याची माहिती आहे त्यांच्या भाषेत.

अभिव्यक्ती चांगली करण्याच्या दृष्टीने या वक्तव्याच्या भाषेत काही दुरुस्ती करण्याची आवश्यकता होती व तुझ्या सूचनेप्रमाणे मी ती केलीसुद्धा. माझ्या उपोषणाच्या योग्यायोग्यतेविषयी तुझ्याकडून वा इतर कोणाकडूनसुद्धा माझी काहीही ऐकण्याची इच्छा नाही. आतापर्यंत उपोषणासंबंधीचे मी तुझे म्हणणे जे ऐकून घेतले ते माझ्या धैर्याचे आणि विवेकाचे चिन्ह आहे. त्यासंबंधी विचार झाल्याबरोबर मी तुला त्याची सूचना दिली. तुझी मुख्य काळजी आणि तुझा युक्तिवाद निरर्थक आहे. हे खरे आहे की तू माझा मित्र आहेस. हेही खरे आहे की तुझी प्रगतीही झाली आहे. परंतु तू नेहमीच माझा मुलगा राहशील व त्यामुळे तुला काळजी वाटणे स्वाभाविक आहे. ते काहीही असले तरी तुझ्या युक्तिवादातून तुझे उथळ विचार आणि तुझा अधीरपणाच दिसतो. हे कार्य माझ्या धीराची परिसीमा आहे असे मी समजतो. ज्या धीरामुळे धीरामागील उद्दिष्टच नष्ट होत असेल त्याला धीर म्हणावे की मूर्खपणा? मी दिल्लीत आलो तेव्हापा ून जे काही साध्य झाले असेल त्याचे श्रेय मी घेऊ शकत नाही. असे केले तर ती माझी अहंमन्यता होईल. माझ्या प्रयत्नांनी जरी एकादोघांचा जीव वाचला असेलही तरी त्याला या जगात काहीही किंमत नाही. केवळ सर्वज्ञ ईश्वरालाच त्याचे मूल्य कळू शकेल. "जो माणूस सेप्टेबर महिन्याच्या सुरुवातीपासून धीराने वागत होता तो आता एकाएकी अधीर झाला

असे म्हणणे हे अज्ञानाचे नाही तर अजून कशाचे चिन्ह असू शकते?" व्यावहारिक दृष्टीने विचार केला तर माणूस करू शकेल असे सर्व प्रयत्न करून झाल्यानंतर मी जेव्हा असहाय झालो तेव्हाच मी ईश्वराच्या मांडीवर डोके ठेवले. माझ्या उपोषणाचा अर्थ हा असा आहे. गजेंद्रमोक्ष वाच आणि त्यावर विचार कर. ते फार मोठे महाकाव्य आहे. त्यानंतरच मी उचललेल्या पावलाचे महत्त्व तुला कळू शकेल. तुझ्या पत्रातील शेवटचे वाक्य तुझ्या प्रेमाची सुंदर अभिव्यक्ती आहे. त्या प्रेमाचे मूळ अज्ञानात वा मोहात आहे. हा मोह सार्वत्रिक आहे म्हणून काही ते ज्ञानाचे स्थान घेऊ शकत नाही. जीवनमृत्यूचा प्रश्न जोपर्यंत आपण बाजूला ठेवू शकत नाही तोपर्यंत आपण जिवंत राहिलो तरच एखादे विशिष्ट काम होईल असे समजणे हा भ्रम आहे. जोपर्यंत जिवंत आहो तोपर्यंत प्रयत्न करत राहा असे म्हणायला चांगले वाटते परंतु प्रयत्न अनासक्त भावाने केले पाहिजे हे लक्षात ठेव. मी तुझी विनंती का मान्य केली नाही हे आता तुला कळेल. ज्या रामाने मला उपोषणाची प्रेरणा दिली त्या रामाची इच्छा असेल तर तोच मला उपोषण सोडण्याकरिताही सांगेल. मध्यंतरीच्या काळात तू, मी आणि आपण सर्वांनी हे लक्षात ठेवले पाहिजे की राम मारेल तरी ते चांगले आहे, जिवंत ठेवील तरी ते तितकेच चांगले आहे. रामच मला जिवंत ठेवील वा मारेल. माझी केवळ एकच प्रार्थना आहे : 'हे रामा, जिवंत राहण्याच्या मोहाने मी वेळेआधीच उपोषण सोडण्याची इच्छा होऊ नये अशी शक्ती मला दे. मनूला सांगून लिहून घेतलेले हे पत्र जपून ठेव आणि त्यावर वेळेवेळी चिंतन कर.

आशीर्वाद,

बापू

यानंतर बापूजींनी 'गुजरातनां भाईबहेनो' या लेखाचे श्रुतलेखन करवून घतले. (पाहा 'हरिजनबंधु' १८ - १ - १९४८)

८ वाजता बापूजी चालत मालीशच्या टेबलपर्यंत आले. आंघाळ करत असताना देशविदेशातून आलेल्या तारा वाचून दाखवल्या. सुऱ्हावर्दींबद्दलची गोष्ट करत असताना गांधीजी म्हणाले, "हा माणूस चांगलाच बुद्धिमान आहे. जिनासाहेबांनी यांना मंत्रिमंडळात वा वेगवेगळे सन्माननीय पद देऊ केले होते. यांनी मला विचारले. मी उत्तर दिले की तुम्ही हिंदूंसंबंधात जो अन्याय आणि पाप केले आहे त्याचे जर

तुम्हाला प्रायश्चित्त घ्यायचे असेल तर हिंदूंचे प्रामाणिक मित्र होऊन राहायला पाहिजे, आणि हा मोह सोडायला पाहिजे. आणि यांनी तो मोह सोडून दिला. आता मी यांना पूर्व बंगालमध्ये पाठवीन."

आंघोळीच्या वेळी. . . वर बापूजी नाराज झाले. ते बापूजींना एखादी गोष्ट वेगळ्याच प्रकारे सांगायचे. याचे बापूजींना फार वाईट वाटले. बापूजींमध्ये अशक्तपणा तर खूप आला आहे. थंडीसुद्धा कडाक्याची आहे. एका गोष्टीसंबंधात बापूजी म्हणाले, ". . . या पोरीलासुद्धा मी तपासत असतो. या अग्निपरीक्षेत हिच्यातील अहंकार वा खोटेपणे आपोआप भस्मसात होतील. ते दोन्हीही निर्माण होतील असे मला वाटले नव्हते. महादेवने मला सावध तर केले होते परंतु आता तो इथे कुठेही नाही. ईश्वर जे काही दाखवतो आहे ते पाहायला पाहिजे. युधिष्ठिर अखेरीस तर चक्रवर्ती राजा होता. असे असूनही जेव्हा तो स्वर्गारोहण करू लागला तेव्हा त्याला त्याच्या आईचा, पत्नीचा आणि चारचार भावांचा मृत्यू पाहावा लागला होता ना?" अशा प्रकारे समजावून सांगत असताना बापूजींना थकवा आला. मी बापूजींना म्हणाले, "आघोळीच्या वेळी तुम्ही आज फार जास्त बोलत आहा, आता अजून बोलला नाही तर?" बापूजी म्हणाले, "फार काळ जगायचा माझा प्रयत्नच नसायला पाहिजे. पण मी जे काही बोलतो तेसुद्धा माझ्या अग्निपरीक्षेचा आणि या यज्ञाचा भाग म्हणूनच बोलत असतो आहे. तुझ्याद्वारे सर्व मंडळीला आणि बिरला भवनला, दिल्लीला, आणि दिल्लीच्या माध्यमातून हिंदुस्थानला आणि अंतिमतः संपूर्ण जनतेला समजावण्याचा प्रयत्न करतो आहे. असे झाले तर कदाचित या अमानुष कृत्यांना आळा घातला जाईल." आज तर बापूजींचा आवाज खूपच हळू झाला आहे. त्यांच्या तोंडाजवळ कान न्यावे लागतात. उपवासाच्या दरम्यान बापूजी हजामत करवून घेत नसतात. यामुळे हजामत सुरू असताना ते जी ५-१० मिनिट डुलकी घ्यायचे तीही बंद झाली.

आंघोळ केल्यानंतर बापूजी उन्हात बसले. सरलाला गीता शिकवायला त्यांनी मला सांगितले. १० ते १२ जवाहरलालजी, मथाई, शण्मुखम चेट्टी आणि सरदारदादांबरोबर गोष्टी केल्या. मी मणिबहेनजवळ बसले. त्यांनी माझ्याजवळ बापूजींबद्दलचे व्यथित हृदय मोकळे केले. सरदारदादा खूपच काळजीत आहेत. भावनगरच्या मुक्कामातही दररोजच्या टपालात बापूजींच्या प्रकृतीविषयी मला कळवायला सांगितले आहे. कराचीत तर खूपच दंगेधोपे सुरू आहेत. काल १५०० माणसांची कत्तल झाली. असे असूनही एकसुद्धा राष्ट्रवादी मुसलमान यासंबंधात काहीही कसा बोलत नाही?

१२।। वाजता दिल्लीतील मौलाना आले. त्यांच्याबरोबर एक हबीब-उर-रेहमानही आले होते. आम्हांला इंग्लंडमध्ये पाठवायची व्यवस्था करा असे ११ तारखेला बापूजींना ते म्हणाले होते, बापूजी सौम्यपणे त्यांना टोचत म्हणाले, "आता तुमचे समाधान झाले ना?" मी तुमच्याकरिता विमानाच्या तिकिटाची व्यवस्था केली आहे. आता मी कबूल करतो की हिंदुस्थानबद्दल निष्ठा नसलेल्या मुसलमानांना विलायतेत जायचे आहे.

ते बंधू बापूजींच्या या कटाक्षासमोर काय बोलणार होते?

त्यांच्यातील एक बंधू म्हणाले, "तुम्ही माझ्या शब्दांनी दुखावला असाल तर मी माझे शब्द परत घेतो".

बापूजी म्हणाले, "तुम्ही तर इंग्रजांची चाल चालून राहिला आहा. आधी चूक करायची आणि मग माफी मागायची. इंग्रजांचे शासन चांगले होते, आम्ही गुलाम होतो हे याहून चांगले होते, यामुळे आमच्या भावांपासून आमचे रक्षण करा अशी इंग्रजांना भीक मागताना तुम्हांला लाज नाही वाटली? किती विचित्र गोष्ट आहे?"

तुमच्या मनात जे भरलेले आहे ते आता बाहेर पडले आहे.

तुम्ही विचार करा आणि तुमची अंतःकरणे शुद्ध करा. सत्यवादी व्हा. असेच राहाल तर हिंदुस्थान तुम्हांला किती काळ सहन करील? बापूजींनी अगदी योग्य शब्दांत सुनावले होते.

पाऊण वाजता माती घेतली. मृदुलाबहेनला पाकिस्तानच्या मुसलमानांची याच वेळी तार आली की बापूजींनी उपवास सोडावा म्हणून आम्ही काय केले पाहिजे?

बापूजी मला म्हणाले, "कोणाचाही असा फोन आला तर सांग की बापूजी याचे उत्तर प्रार्थनासभेत देतील. परंतु मी जे म्हणालो ते येथील मुसलमानांनाच लागू पडते."

दुसऱ्या विषयावर बोलत असताना बापूजी म्हणाले, "मी तर ईश्वराचा कैदी आहे. त्याने करायला लावलेला उपवास मी केला आहे. तो सोडायला लावील तेव्हाच हा सुटेल. या तुरुंगवासातून जर मी जिवंत राहिलो तर मला नवजीवन मिळेल. तसे झाले तर मी पाकिस्तानमध्ये जाईन. नाही तर मृत्यूला मी माझा मित्र समजतोच आहे." उपवास सुरू आहे हे पाहता आज बापूजी आनंदातच आहेत आणि चांगल्या प्रकारे काम करत आहेत असे म्हणता येईल. मुलाखतीकरिता येणारांना सीमाच नाही.

सायंकाळी बापूजी चालत प्रार्थनास्थळी गेले. प्रार्थनेत बोललेही. आत येऊन पडल्यानंतर म्हणाले, "आज तर फार ताजातवाना आहे." सुशीलाबहेनने चालायला आणि बोलायला मनाई केली आहे. त्याच्या उत्तरात म्हणाले, "मी तर ईश्वराच्या हातात आहे. इतर कोणाच्याही नाही."

रात्री येथील किती तरी शीख, पंजाबी आरडाओरड करत आले. बापूजींना शिव्या देत होते. दिल्ली सोडली तर ते अजून कुठे जाऊ शकणार होते? हे तर महाभारतासारखे प्रचंड काम होते.

प्रार्थना प्रवचनात बापूजी म्हणाले -

हिंदुस्थानातून आणि परदेशातून मला तारांचा ढीग येतो आहे. काहींनी उपवासाच्या माझ्या या निर्णयाचे स्वागत केले आहे आणि मला ईश्वराला सोपवले आहे. काही थोड्याशा लोकांनी मी उपवास सोडावा म्हणून अतिशय प्रेमाने युक्तिवाद केला आहे. आणि या तारांचा ढीग तर दर अर्ध्या वा एक तासाने वाढतच चालला आहे. प्रत्येक जमातीकडून आणि प्रत्येक देशाकडून तारा येत आहेत. या सर्व बंधुभगिनींना माझ्या प्रकृतीची जी काळजी वाटते आहे त्याकरिता मी फार ऋणी आहे. पाकिस्तानमधील लाहोर येथील पाकिस्तानी म्हणवल्या जाणाऱ्या मुसलमान मित्रांनाही माझ्या प्रकृतीची काळजी वाटत असल्यामुळे ते मला विचारत आहेत की 'आता आम्ही कशा प्रकारे मदत करू शकतो?' अशा सूचनांमुळे मला आनंद होतो. माझा हा उपवास तर मी आधीच सांगितल्याप्रमाणे आत्मशुद्धीकरिता आहे. यामुळे ज्या लोकांना या उपवासाबद्दल सहानुभूती वाटत असेल त्यांनी आपली स्वतःची आत्मशुद्धी करावी ही एकच माझी विनंती आहे.

आज तर पाकिस्तानला नम्रपणे मी दोन शब्द सांगू इछितो. पाकिस्तानला मी माझा मित्रच समजतो. यामुळे मित्र म्हणून मला जे खरे वाटते ते मी सांगायलाच पाहिजे. पाकिस्तानमधील मुसलमानांनी गुन्हा केला आहे आणि अजूनही त्यांची हाणामारी सुरूच आहे. हजारो हिंदू आणि शिख लुटले जात आहेत. मुलींनासुद्धा उचलून नेत आहेत. पंजाबमधील गुजरात स्थानकावर गाडीसुद्धा लुटण्यात आली. पाकिस्तानमध्ये जर असेच सुरू राहील तर संघराज्यसुद्धा कसे सहन करील? आणि यानंतर माझ्यासारखा एक माणूस वा शंभर साधू जरी उपवास करतील तरी त्यामुळे निर्माण होणाऱ्या क्रोधावर नियंत्रण मिळवता येणे शक्य होणार नाही ही निश्चित गोष्ट आहे. यामुळे पाकिस्तानमधील मुसलमानांनी आता तरी विचार करून त्यांना जे सदाचरण वाटत असेल ते त्यांनी केले पाहिजे आणि

हिंदू आणि शिखांना विश्वासात घेऊन त्यांनी धीर धरून 'आम्ही तुम्हांला जाऊ देणार नाही' असे सांगितले पाहिजे. आमच्या जीवाला वा संपत्तीला जरी धोका असला तरी आम्ही तुमचे रक्षण करू. तुम्ही जर असे कराल तर पाकिस्तान खरोखरच पाक आणि पवित्र होईल. पाकिस्तान इतका पवित्र झाला पाहिजे की जीनासाहेबाचा जीव वा संपत्ती जितकी सुरक्षित आहे तितकीच सुरक्षित पाकिस्तानमध्ये राहणाऱ्या प्रत्येक माणसाचे जीवन आणि वित्त सुरक्षित असले पाहिजे. असा पाकिस्तान कधीही मरणार नाही. आणि पाकिस्तानला मी 'एक पाप' म्हणून जे संबोधले आहे ते शब्द मी सखेद परत घेईन. मला पाकिस्तानच्या पुढाऱ्याची भाषणे वा लेखन पाहण्याची इच्छा नाही. माझी इच्छा तर त्यांचे सदाचरण, सत्कार्य पाहण्याची आहे. असे जर झाले तर संघराज्यातील लोक आपोआपच सुधारतील. आज तर मला सांगताना लाज वाटते की आम्ही खरे पाहता पाकिस्तानच्या वाईटपणाचीच नकल करत आहो. आणि या वाईटपणाच्या खोलात जर आपण उतरलो तर भविष्यात संघराज्याचे स्वरूप कसे राहील याची कल्पना करता येणे कठीण आहे.

माझ्या बालपणापासूनच हिंदू-मुसलमानांमध्ये ऐक्य घडवून आणणे हा माझ्या जीवनाचा अनुपम शौक राहिलेला आहे. आणि माझ्या जीवनउषेतील ही उत्कंठा जीवनसंध्येच्या वेळी जरी पूर्ण झाली तरी मी एखाद्या लहान मुलाप्रमाणे नाचेन आणि आनंदी होईन. आणि माझी जी १२५ वर्ष जगण्याची आकांक्षा एवढ्यात मेली होती ती परत जागृत होईल. माझे हे स्वप्न पूर्ण झाल्यानेच आपल्याला खरे स्वराज्य प्राप्त होणार आहे. मग पाकिस्तान आणि हिंदुस्थान भौगोलिक दृष्टीने जरी वेगवेगळे झालेले असतील तरी काही हरकत नाही. परंतु या दोन देशात जर हृदयैक्य झाले तर तुमच्या आणि माझ्याकरिता हे ध्येय खूपच आदर्श आणि भव्य असेल. हे जोपर्यंत वास्तवात येत नाही तोपर्यंत एखाद्या प्रसिद्ध चित्रकाराच्या प्रसिद्ध चित्रातील लहान मुलाला पाहून जसे माझे समाधान होणार नाही तसेच हे. आणि इतक्या लहानशा सिद्धीकरिता मला जिवंत राहण्याची इच्छा नाही. आणि सध्या जरी मी जिवंत असलो तरी मला मृतच समजा. यामुळे पाकिस्तानमधील जे मित्र माझा सल्ला मागत आहेत त्यांना मी म्हणेन की माझ्या या ध्येयसिद्धीकरिता मला मदत करावी.

१८९६ साली मी एकदा दिल्लीचा आणि आग्र्याचा किल्ला पाहायला गेलो होतो. तेथील एका दारावर मी एक अशी कविता वाचली - 'जगात जर कुठे स्वर्ग असेल तर तो इथेच आहे, इथेच आहे, इथेच आहे.' या किल्ल्याचा इतका नावलौकिक असतानाही हा किल्ला मला तरी स्वर्गासारखा वाटला

नव्हता. आणि पाकिस्तान जर याकरिता पात्र ठरला आणि त्याच्या प्रत्येक दारावर जर अशी कविता कोरण्यात आली तर मला खरोखरच फार आनंद होईल. पाकिस्तान जर असा स्वर्ग असेल तर मग तो संघ राज्यात असो वा पाकिस्तानमध्ये असो काही फरक पडत नाही. अशा स्वर्गात कोणीही गरीब नसेल, कोणी श्रीमंत नसेल, कोणी कारखानदार वा करोडपती नसेल आणि अर्धपोटी काम करणारा मजूर नसेल. सर्वांना सारख्याच आणि आपापल्या श्रमाने कमावलेली भाकरी खायला मिळेल. स्त्री आणि पुरुषाला समान हक्क असतील, सर्वांची समान राहणी असेल आणि वयाप्रमाणे प्रत्येक व्यक्तीच्या पत्नीशिवाय सर्व स्त्रिया आई, बहीण वा मुलीप्रमाणे असतील. अशा देशात अस्पृश्यता नसेल. सर्वधर्मसमभाव भरपूर प्रमाणात असेल. जो कोणी माझी ही कल्पना वाचेल वा ऐकेल तो तर माझ्या या काल्पनिक आनंदाने भरलेल्या कल्पनेत ओढून आणल्याबद्दल मला माफच करील. परंतु असे कधी काळी होऊ शकेल की नाही अशी शंका ज्या लोकांच्या मनात असेल त्या सर्वांना मी खात्रीपूर्वक सांगू इच्छितो की माझा उपवास लवकर सुटावा अशी मला किंचितही उत्कंठा नाही. माझ्यासारख्या मूर्ख आणि लहरी माणसाला दिसणाऱ्या या हिरव्या बागा कधीकाळी फळ देतील की नाही या शंकेने मी मुळीच घाबरून गेलेलो नाही. काळ परिपक्व होईपर्यंत वाट पाहण्याचे धैर्य माझ्यात आहे. परंतु मला वाचवण्याकरिता जर कोणी माझी फसवणूक करत असेल तर त्यामुळे माझे दुःख खूपच वाढेल. ईश्वराच्या इच्छेनेच मी या उपवासाला सुरुवात केली आहे आणि त्याच्या इच्छेनेच हा सुटेल. त्याच्या इच्छेशिवाय एक पानही हालू शकत नाही. त्याची इच्छा कोणी टाळू शकत नाही, आणि भविष्यातही कोणी टाळू शकणार नाही.

उपवासाच्या दुसऱ्या दिवशी पूज्यनीय बापूजींची शारीरिक स्थिती आणि त्यांचा वेळेप्रमाणे कार्यक्रम -

३।। वाजता उठले. दातण, १५ मिनिट गोष्टी. पडल्या पडल्या देवदासकाकांचे पत्र वाचले. ३।।। वाजता प्रार्थना अर्धा तास. ४। वाजता साधे गरम पाणी सात अंस. ५.२५ अर्धा तास झोपले. अर्धा तास पत्र लिहिले आणि इतर लेखन केले. ७.४५ वाजता साधे गरम पाणी सहा अंस. ८ वाजता मालीशकरिता गेले. त्याआधी गरण पाण्यात पाय ठेवून ते शेकले. ४० मिनिट मालीशच्या टेबलवर मालीश. त्या दरम्यान वर्तमानपत्रे ऐकली. ८.४५ वाजता आंघोळीच्या टबात. वर्तमानपत्रे ऐकली.

राजकुमारीबहेन आणि माझ्याशी गोष्टी. ९.४५ वाजता आंघोळीकरिता न्हाणीघरात आले. ९.५५ गरम पाणी साधे आठ अंस. १० ते १२ मंत्रिमंडळाची बैठक. ११ वाजता आठ अंस साधे गरम पाणी. १२.१० साधे गरम पाणी आठ अंस. पडल्या पडल्या वर्तमानपत्रे वाचली. पायाला तूप चोळले. १.५५ वाजता श्री व्ही. पी. मेनन. १.२० वाजता माती घेतली. २.०५ वाजता माती काढली. २.२५ वाजता उठले. २.५० वाजता आठ अंस साधे गरम पाणी. ३.४५ पतियाळाच्या महाराजांसोबत. ४.२५ वाजता गुरू बचनसिंहजी. ४.२५ वाजता आठ अंस साधे गरम पाणी. ४.३४ सुचेताबहेनबरोबर. ४.३५ सरदार भगतसिंगजींबरोबर. ४.४६ सुऱ्हावर्दीसाहेबांबरोबर. ५ वाजता प्रार्थना. ५.४५ मेहरचंदजी खन्ना, पेशावरहून प्रतिनिधीमंडळ, १५ मिनिट गोष्टी केल्या, जयरामदासजी आणि मणिबहेन. ६.२० सरदार मोहनसिंव्हजी. ६.४० गुलाम मोहम्मद बक्षीसाहेब. ७.०५ सुचेताबहेन. ७.२० मौलाना साहेब, जवाहरलालजी आणि सरदारदादा. ८.०५ पडल्या पडल्या गोष्टी केल्या. ९.१० सर्व गेले. राजकुमारीबहेन. ९.४० न्हाणीघरात गेले. पाय चेपले. १० वाजता अंथरुणावर पडले. रात्री १० वाजता वजन घेतले, १०९ पौंड होते. दोन पौंडांनी कमी झाले.रक्तदाब वाढला आहे. सुशिलाबहेनचे म्हणणे आहे की यामुळेच बापूजींना शक्ती वाटत असेल.

हातपाय खूपच थंड राहतात. आवाज हळूहळू अजूनच हळू होत चालला आहे. या वेळी तर मानसिक परिस्थितीसुद्धा खूप चांगली आहे. आम्ही सेप्टेंबरमध्ये आलो होतो. तेव्हापासून बापूजी प्रफुल्लित आणि चिंतामुक्त कालच वाटले. आज तर ते अजूनच आनंदित आहेत कारण काहीही जरी असले तरी दोनेक दिवसात काही तरी परिणाम येईलच असे त्यांना वाटते. हे प्रभू ! सर्वांना सन्मती दे हीच प्रार्थना.

आता हे सर्व लिहीत असताना पूज्य बापूजींच्या प्रकृतीसंबंधीचे परिपत्रक रात्री प्रसृत केले जाईल. त्यासंबंधी चर्चेत वेळ गेल्यामुळे मला झोपायला सहजच १२-१२।। होऊन जात असतात. माऊंटबॅटन साहेबांचा बिकानेरचा कार्यक्रम बऱ्याच दिवसापूर्वीपासून ठरलेला होता. परंतु बापूजींच्या उपवासामुळे तिथे जाण्याची त्यांची इच्छा नव्हती. परंतु ठरलेला हा कार्यक्रम जर रद्द केला तर बापूजींना दुःख झाले असते. यामुळे जायचे ठरले. त्यांच्या सन्मानार्थ मानपत्र दिले जाण्याचा जो समारंभ होणार होता तो रद्द करण्यात आला असल्याची बातमी रात्री राजभवनातून आली.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१५-१-'४८

उपवासाचा तिसरा दिवस

रात्र चांगली गेली. दोन वाजता बापूजी जागे झाले होते. आणि रात्री ज्या प्रश्नांसंबंधी निवेदन काढायचे होते ते निवेदन तयार करायला सुरुवात केली. भाईसाहेबांना दिवा लावायला सांगितले. मला झोपून राहायला आणि प्रार्थनेच्या वेळी उठवायला सांगितले.आश्रमातील मुन्नालालभाई आले तोपर्यंत बापूजी झोपलेलेच होते. साडेतीन वाजता प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजींना आत घेऊन आले. बापूजींजवळ बसले. त्यांचे पाय दाबले. रात्री अडीच वाजता जे निवेदन तयार करायला सुरूवात केली होती ते परत सुरू केले. परंतु अशक्तपणामुळे बापूजींनी मध्येच डोळे मिटले होते.

सात वाजता बापूजी अंथरुणावर पडले. बिरलाजींबरोबर गोष्टी करताना म्हणाले, "मी रामाने सांगितल्याप्रमाणे उपवास करतो आहे. तुम्हा सर्वांबरोबर चर्चा करताना माझे मन मला विचारते की अरे जिवा, तू कशासाठी हा सगळा युक्तिवाद करतो आहेस? ईश्वरावर तुझी श्रद्धा नाही काय? माझा जर मृत्यू झाला आणि त्यामुळे जगात जर अशांतता निर्माण झाली तर तेसुद्धा श्रेयस्करच होईल. यामुळे माझी काळजी न करता तुम्ही सर्व आपापले काम करा. सरदारनी दुःखी होण्याचे काहीही कारण नाही. त्यांनी भावनगरला जायला पाहिजे असा माझाच आग्रह होता आणि ते तर कुठेही जरी असतील तरी तिथे ते माझेच काम करत असतील ना?"

बिरलाजी अखेरीस म्हणाले, "तुम्ही तर कोणाचेही ऐकणार नाही. तुम्ही ईश्वराच्या हाती आहा हे तर आम्हीसुद्धा मान्य करतो." ८।। वाजता बापूजी मालीशकरिता गेले. ८.४५ वाजता बापूजींचे गरम पाण्याने पाय धुतले.

. . . नी बापूजींना कडक पत्र लिहिले आहे, त्यातून त्यांनी आपल्या हृदयातील व्यथा बापूजींसमोर मांडली. आणि मी बाजूला झाल्यामुळे जर शासनव्यवस्थेत सुधारणा होत असेल तर माझी या मंत्रिमंडळात राहण्याची अगदीच इच्छा नाही असेही त्यात लिहिले. एका प्रकारे हे पत्र हृदयद्रावकच होते.

बापूजी आंघोळीकरिता येऊन गरम पाण्याने आंघोळ करत असताना सुशीलाबहेनने त्यांना काही कात्रणे वाचून दाखवली. आणि मग प्रार्थनेत ज्या प्रश्नाचे उत्तर द्यायचे होती त्यांचे प. प्यारेलालजी श्रुतलेखन करू लागले. बापूजी जे बोलत होते ते पकडणे प्यारेलालजींकरितासुद्धा कठीण होत होते. आज तर आवाज अजूनच हळू झाला होता. आंघोळ करत असताना चक्करसुद्धा येत होते. यामुळे अगदी घट्ट धरून थंड पाण्यात बसवले. आणि मग खुर्चीवर बसवून बाहेर उन्हात घेऊन गेलो. आज तर बापूजी आंघोळ करत असताना मी एकटीच होते आणि बापूजींना चक्कर येत होते. यामुळे खूप भीती वाटत होती. सुशीलाबहेनने इशारा करून थांबवले. यामुळे त्यांनी आणि मी बापूजींचे शरीर पुसले.

दोन वाजता एनिमा तयार केला. एनिमा तयार करायला १५-२० मिनिट तर सहजच लागतात. बापूजी नाराज झाले. परंतु ताबडतोबच "ही माझी चूक होती" असेही ते म्हणाले, आणि पुढे म्हणाले, "मी इतका अधीर कसा होऊ शकतो? अजून माझ्यात उणिवा राहिलेल्या आहेत. या उणिवा जेव्हा जातील तेव्हाच हिंदुस्थानच्या माणसांकडून मी आत्मशुद्धीची अपेक्षा करू शकतो. तोपर्यंत तो मला कसा ठेवील? हेसुद्धा या परीक्षेच्या (उपवासाच्या) परिणमांवरूनच कळेल." इतके बोलल्यानंतर बापूजी थकून गेले. मी म्हणाले, "बापूजी माझीच चूक होतीना की तुमचा उपवास सुरू झालेला असल्यामुळे निदान दररोज गरम पाणी तर मी तयार करून ठेवायला पाहिजे होते." यावर बापूजी म्हणाले, "नाही, नाही, अशा प्रकारे विनाकारण इंधन जाळल्यामुळे तर मलाच दुःख झाले असते. ही तुझी चूक मुळीच नाही. मीच तुला अर्ध्या तासाआधी गरम पाण्याकरिता सांगायला पाहिजे होते. आणि जरी सांगितले नसले तरी ते तयार होईपर्यंत मी धीर धरायला पाहिजे होता." मी पुढे काहीही म्हणाले नाही कारण आपण एक वाक्य बोललो की बापूजींना चार वाक्ये बोलावी लागतात. तितकाच त्यांचा शक्तिपात होतो.

एनीमात भरपूर कचरा निघाला. बापूजींना बरेही वाटले. परंतु थकवा मात्र खूपच आला आहे. बापूजींना पाहिले तर दगडी हृदयाच्या माणसाच्या डोळ्यातसुद्धा पाणी येईल. त्यात शिवाय आंघोळ, एनिमा अशा थकवा आणणाऱ्या गोष्टी विशेषेकरून माझ्याकडूनच करवून घेत असतात. त्यात या वेळी बापूजींना पांढऱ्या पेळूसारखी परसाकड झाली. यामुळे मी घाबरले आणि मला जर रडू आले तर आफतच आफत. कलकत्त्यामधील उपवासापेक्षा इथे खूप काही घडते आहे, यामुळे या कठीण परीक्षेसाठी मला तयार केले जात होते की काय, कोण जाणे ! तरीही या शेवटच्या कसोटीत, का कुणास

ठाऊक, पण मला स्वतःलाच भीती वाटते आहे. अनेकदा विचार येतो - माझ्या नशिबात काही काळा डाग तर नाही? बापूजी जेव्हा अंथरुणावर पडलेले असतात तेव्हा काम करणे फार सोपे असते. परंतु ते कामात असले की त्यांना चक्कर येऊ लागतात, थकवा येतो, आणि पांढरेफटक पडतात. आणि शिवाय मला ते कोणाला बोलावूसुद्धा देत नाहीत. ते तर असेच म्हणत असतात की "रामाला माझी गरज असेल तर तो ठेवील, मी तर त्याने करायला लावला आहे म्हणूनच उपवास करतो आहे. या यज्ञात तुझ्याशिवाय अजून कोणीही भागीदार नाही" वगैरे. हे ईश्वरा, या काळ्याशार पाण्याच्या भोवऱ्यातून नाव पलीकडे नेशील तर तितके पुरे, अजून काहीही नको.

बस्तीनंतर बिधानबाबू आणि डॉ. गिल्डरसाहेब आले. बापूजी म्हणाले, "एनिमी नंबर एक आणि एनिमी नंबर दोन आले."

आजपासून बापूजींच्या प्रकृतीविषयीचे बुलेटीन प्रकाशित होणार आहे. साडेचार वाजता प्रार्थनेच्या वेळी जे लिहायला लावले होते त्याचाच अनुवाद केला. आम्ही सर्वच प्रार्थन करायला गेलो. बापूजी प्रार्थनासभेत आले नव्हते. परंतु घरात खाटेवर पडल्या पडल्या खूपच थकलेल्या आवाजात रेडिओच्या माईकवर रेकॉर्ड करण्याकरिता असे म्हणाले, -

"बंधूंनो आणि भगिनींनो,

"माझ्याकरिता हा एक नवीन अनुभव आहे. अशा प्रकारे लोकांना काही सांगण्याची संधी कधी मिळाली नव्हती, आणि ना तशी माझी इच्छा होती. मी प्रार्थना करायच्या मैदानापर्यंत पोहोचू शकत नव्हतो आणि येथून माझा आवाज तुमच्यापर्यंत पोहोचू शकत नव्हता. असे असतानाही माझा आवाज जर तुमच्यापर्यंत पोहोचू शकला तर तुमचे समाधान होईल असे मला वाटले. मला जे म्हणायचे आहे त्याचा मजकूर मी आधीच लिहवून घेतला आहे. ही अवस्था किती दिवस राहील हे मला माहीत नाही.

"तुम्हा लोकांना माझी इतकीच विनंती आहे की इतर लोक काय करतात हे न पाहता स्वतःमध्ये जितकी शुद्धी करता येईल तितकी करा. माझी खात्री आहे की जनता जितक्या जास्त प्रमाणात आत्मशुद्धी करील तितकेच तुमचे आणि माझेही हित होईल. यामुळे भारताचेही हित होईल आणि हा उपवासही मी शक्य तितक्या लवकर सोडू शकेन. माझी काळजी कोणीही करू

नये. प्रत्येकाने आपली काळजी घ्यावी. देशाच्या प्रगतीचा आणि तुमच्या कल्याणाचा विचार तुम्ही केला पाहिजे. अखेरीस आपणा सर्वांना मरायचेच आहे. जो कोणी जन्माला आला त्याची मृत्यूपासून सुटका नाही. मग आपण मृत्यूला का घाबरावे वा तो आल्याबद्दल दुःख का करावे? माझे मत आहे की मृत्यू हा आपला आनंददायी मित्र आहे, आपल्या नशिबी आलेल्या विविध व्याधी तो दूर करत असल्यामुळे तो नेहमीच धन्यवादाकरिता पात्र असतो."

इतके शब्द बोलल्यानंतर बापूजींनी जे लिहिले होते आणि सुशीलाबहेननी त्याचा जो अनुवाद केला होता तो त्यांनी वाचून दाखवला.

"वर्तमानपत्रवाल्यांना काही शंका असल्यामुळे त्यांचे निरसन करून घेण्याकरिता काल सायंकाळच्या प्रार्थनाप्रवचनानंतर दोन तासांनी वर्तमानपत्रवाल्यांनी मला भेटण्याची इच्छा व्यक्त करणारा निरोप पाठवला होता. परंतु मी दिवसभर काम केले होते. प्रार्थनेनंतरही कामात गुंतलेलो होतो यामुळे त्यांना भेटण्याची इच्छा नव्हती. यामुळे त्यांना जे काही विचारायचे असेल ते त्यांनी मला उद्या सकाळी ९ वाजल्यानंतर लिहून द्यावे असा निरोप देण्याकरिता मी प्यारेलालला सांगितले. त्यांनी असेच केले."

त्यांचा पहिला प्रश्न असा आहे - प्रश्न - भारतीय संघराज्याच्या कोणत्याही भागात कोणत्याही प्रकारच्या दंगली सुरू नसतानाही तुम्ही उपोषणाला सुरुवात का केली आहे?

"मुसलमानांच्या घरांचा बळजबरीने ताबा घेण्याकरिता लोकांनी निर्धाराने संघटित होण्याचा प्रयत्न करणे ही दंगल नाही तर अजून काय आहे? (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी ४, १९४८) या दंगलीचे प्रमाण इतके मोठे होते की अखेरीस सैन्याला नाईलाजाने अश्रुधूराचा वापर करावा लागला आणि जमावाला पांगवण्याकरिता हवेत का होईना थोडासा गोळीबार करावा लागला. तेव्हा कुठे लोक पांगले. शेवटचा मुसलमान घालवून लावेपर्यंत जर मी वाट पाहिली असती तर तो माझ्याकरिता मूर्खपणा झाला असता. दिसून न पडणाऱ्या मारण्याच्या अशा पद्धतीला मी छळ करून करून मारणे म्हणतो."

प्रश्न - तुम्ही म्हणाला होता की जे मुसलमान बांधव आपल्या भीतीची आणि असुरक्षिततेची भावना व्यक्त करायला तुमच्याजवळ आले होते. त्यांना तुम्ही उत्तर देण्याकरिता असमर्थ होता. तसेच

गृहमंत्री सरदार पटेलांबद्दलही. ते मुसलमानविरोधक आहेत अशीही मुसलमानांची तक्रार होती. त्यावर सरदार पूर्वीप्रमाणे आता माझे होयबा राहिले नाहीत असे तुम्ही म्हणाला होता. (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी१३, १९४८) यामुळे सरदार पटेल यांचे हृयपरिवर्तन घडवून आणणे व गृहमंत्रालयाच्या धोरणाचा निषेध करणे आहे हा या उपोषणामागील प्रमुख हेतू आहे असा समज होतो. याबद्दल तुम्ही तुमची भूमिका स्पष्ट केली तर मदत होईल.

"मला वाटते की मी या गोष्टीचे स्पष्ट उत्तर दिले आहे. मी जो अर्थ लावला आहे तोच त्याचा अर्थ होतो आणि जो अर्थ लावण्यात आला आहे तो तर माझ्या कल्पनेतही आला नव्हता. मला जर वाटले असते की माझ्या वक्तव्याचा असाही अर्थ लावला जाऊ शकतो तर संशय दूर करण्याकरिता ते विधान मी अजून स्पष्ट केले असते.

"अनेक मुसलमान बांधवांनी सरदारच्या तथाकथित मुसलमानविरोधी वृत्तीबद्दल तक्रार केली आहे. ते ऐकत असताना मला दुःख दाबून ठेवावे लागत होते परंतु कोणतेही प्रत्युत्तर न देता मी त्यांचे म्हणणे ऐकून घेत असे. या उपोषणामुळे मी स्वतःवर घातलेल्या निर्बंधातून मोकळा झालो. यामुळे मी टीकाकारांना सांगितले की मला आणि पंडित नेहरूंना हरभऱ्याच्या झाडावर चढवण्याचा व आमच्यापासून सरदार पटेलना दूर करण्याचा तुम्ही जो प्रयत्न करत आहा तो चुकीचा आहे. या एकटे पाडण्याच्या प्रयत्नाने तुमचा काहीही लाभ होणार नाही. सरदारच्या बोलण्यात एक प्रकारचा रोखठोकपणा आहे. त्यांचे हृदय जरी सर्वांना सामावून घेण्याइतके विशाल असले तरी यामुळे अनेकदा हेतू नसतानाही लोक दुखवले जातात. यामुळे जीवनभराच्या आपल्या सहकाऱ्यावर होणाऱ्या एका अशोभनीय आरोपातून त्याला मुक्त करावे असा मी विचार केला. (आपली व्यथा व्यक्त करत वल्लभभाई पटेल यांनी १३ जानेवारीला गांधीजींना लिहिले, "...तुम्हाला वारंवार माझ्या बाजूने भांडावे लागते. ही गोष्ट... मला असह्य होते." परत १६ जानेवारीला ते मुंबईत म्हणाले की "काही मुसलमान गांधीजींकडे गेले आणि माझ्या लखनौ येथील भाषणाबद्दल तक्रार केली आणि गांधीजींना माझी बाजू घेणे भाग पडले. यामुळेसुद्धा मला दुःख झाले. अखेरीस इतरांना माझी बाजू घ्यावी लागावी इतका काही मी दुबळा माणूस नाही.") सरदारांना मी माझा "होयबा" समजतो असे ऐकणारांना वाटेल की काय अशीही भीती मला वाटत होती. सरदारांना प्रेमाने माझा "होयबा" म्हटले जात असे. यामुळे त्यांची तारीफ करताना मी म्हणालो की ते इतके शक्तिशाली आणि करारी आहेत की ते कोणाचेही "होयबा" होऊच शकत नाही. ते जेव्हा माझे होयबा होते तेव्हा मी जे काही म्हणत असे ते सगळे

त्यांच्या गळी एकदम उतरायचे आणि म्हणून ते तसे म्हणू देत असत. ते त्यांच्या क्षेत्रात फार मोठे आहेत.

"अहमदाबाद नगरपालिकेचा कारभार चालवताना त्यांनी फार कार्यक्षमता दाखवली होती. परंतु ते इतके नम्र होते की त्यांनी आपले राजकीय शिक्षण माझ्याअंतर्गत घ्यायला सुरुवात केली. त्यांनी याचे कारण मला सांगितले होते. मी जेव्हा भारतात आलो होतो तेव्हा इथे ज्या प्रकारे राजकारण चालत होते त्यात भाग घेण्याची त्यांना इच्छा होत नसे. परंतु आता सत्ता त्यांच्या गळ्यात येऊन पडल्यानंतर त्यांच्या लक्षात आले की ज्या अहिंसेनुरूप आपण यशस्वीपणे काम करत होतो तिने आता काम करता येऊ शकत नाही. माझ्या लक्षात आले की मी आणि माझे सहकारी ज्या अहिंसेनुसार काम करत होते ती खरी अहिंसाच नव्हती. ती नकली गोष्ट होती आणि तिचे नाव आहे निष्क्रिय प्रतिरोध. निष्क्रिय प्रतिकार राज्यकर्त्याच्या काय उपयोगाचा? थोडा विचार तर करा की एक दुबळा माणूस जनतेचा प्रतिनिधी झाला तर तो आपल्या मालकाची हास्यास्पद अवस्थाच करील आणि त्यांची कोणतीही प्रतिष्ठा राहणार नाही. सरदारांवर एखादी जबाबदारी सोपवली तर तिच्यावर ते कधीही अन्याय होऊ देणार नाही हे मला माहीत आहे. ते त्या जबाबदारीची किंमत कधीही कमी होऊ देणार नाही.

"हे सर्व ऐकल्यानंतर माझे वक्तव्य गृहविभागाची निंदा करण्याकरिता होते असे कोणीही म्हणणार नाही असे मला वाटते. जर कोणी असा विचार करत असेल तर तो स्वतःचेच अधःपतन करील व स्वतःचीच हानी करून घेईल असे मी समजेन. माझे वा सरदारांचे त्यामुळे कोणतेही नुकसान होणार नाही. मी आधीच ठामपणे सांगितले नव्हते काय की कोणतीही बाह्य शक्ती माणसाचे अधःपतन घडवून आणू शकत नसते? माणूस स्वतःच स्वतःला अधःपतीत करत असतो. मला माहीत आहे की माझ्या उत्तराशी या वाक्याचा काहीही संबंध नाही. परंतु हे असे एक सत्य आहे की जे केव्हाही उद्धृत करता येऊ शकते.

"मी स्पष्ट शब्दांत सांगितले आहे की माझा उपवास संघराज्यातील अल्पसंख्याक मुसलमानांकरिता आहे. आणि यामुळे तो निश्चितपणे संघराज्यातील हिंदू आणि शिखांच्या विरोधात आहे आणि पाकिस्तानमधील मुसलमानांच्याही विरोधात आहे. तसेच ज्याप्रमाणे संघराज्यातील अल्पसंख्याकांच्या बाजूने आहे तसेच तो पाकिस्तानमधील अल्पसंख्याकांच्या

बाजूने आहे. अशाप्रकारे हा उपवास पाकिस्तानच्या जनतेकरिताही आहे. जो विचार मी आधीच समजावून सांगितला होता त्याचीच पुनरावृत्ती करण्याचा मी प्रयत्न करतो आहे.

"माझ्यासारख्या अपूर्ण आणि दुर्बल माणसाच्या उपोषणामुळे दोन्ही उपनिवेशातील जनतेला वाचवता येऊ शकेल. हे उपोषण सर्वांच्या आत्मशुद्धीकरिता आहे. त्याच्या पावित्र्याबद्दल कोणीही शंका घेण्याचे कारण नाही."

प्रश्न - संयुक्त राष्ट्र संघाच्या सुरक्षा समितीची सभा सुरू होत असताना (युनोमधील भारतीय प्रतिनिधीमंडळाचे नेते गोपालस्वामी अय्यंगार यांनी जानेवारी १५, १९४८ला काश्मीरच्या प्रकरणावर आपली बाजू मांडून सुरक्षासमितीत या वादविवादाची सुरुवात केली.) कराची व गुजरातमधील कत्तलीनंतर तुम्ही हे उपोषण सुरू केले आहे. विदेशी वृत्तपत्रसृष्टीत याला किती प्रसिद्धी मिळाली हे माहीत नाही. परंतु तुमच्या उपोषणामुळे हे सर्व विषय मागे पडले आहेत. पाकिस्तानचे प्रतिनिधी याचा लाभ घेण्याचा प्रयत्न करतील हे त्यांच्या मागील वर्तनावरून आपल्याला कळू शकते. ते म्हणू शकतील की भारतातील तुमच्या हिंदू अनुयायांना, ज्यांनी तेथील मुसलमानांना जगणे कठीण केलेले आहे, जे वेडाने झपाटलेले आहे त्यांच्याकडे लक्ष जाऊ नये म्हणून महात्म्याने हा उपवास सुरू केला आहे. जगात चोहोकडे सत्य पोहोचण्याकरिता वेळ लागत असतो. परंतु मध्यंतरीच्या काळात तुमच्या उपोषणाचा संयुक्त राष्ट्रसंघावर चुकीचा परिणाम होण्याची शक्यता आहे.

"उत्तर - या प्रश्नाचे लांबलचक उत्तर देण्याची आवश्यकता नाही. जगातील देश आणि जनता यांच्याबद्दल मला जी काही माहिती आहे त्यावरून मी सांगायचे साहस करू शकतो की या उपवासाचा चांगलाच परिणाम झाला आहे. बाहेरचे जे लोक भारतातील घटनाक्रमाकडे निष्पक्षपणे पाहू शकतात ते माझ्या उपोषणाचा चुकीचा अर्थ लावू शकणार नाही. हे उपोषण संघराज्यातील आणि पाकिस्तामधील लोकांचे वेड दूर करण्याकरिता आहे.

"पाकिस्तानमधील बहुसंख्य मुसलमान सरळ चालणार नाहीत, तेथील स्त्री-पुरुष सौजन्यशील होणार नाहीत तर संघराज्यातील मुसलमानांना वाचवता येऊ शकणार नाही. परंतु मृदुलाबेनच्या कालच्या प्रश्नावरून असे वाटते की पाकिस्तानच्या मुसलमानांचे डोळे उघडले आहेत व आपले कर्तव्य काय आहे ते त्यांना कळू लागले आहे. हे पाहून मला आनंद होतो.

"संयुक्त राष्ट्रसंघाला माहीत आहे की माझ्या उपोषणामुळे त्यांना निर्णय घेणे सोपे होईल व ते पाकिस्तान आणि संघराज्याला योग्य मार्गदर्शन करू शकतील."

प्रार्थनेनंतर लोकांना बापूंचे दर्शन घेण्याची उत्कट इच्छा असणे स्वाभाविक होते. यामुळे लोकांच्या मागणीमुळे बापूजींची खाट बाहेर ओसरीत ठेवण्यात आली. आधी भगिनी आणि नंतर पुरुष त्यांच्या जवळून जात होते. या वेळी बापूजींचा डोळा लागलेला होता. त्यांचा चेहरा शांत, तेजस्वी आणि दयार्द्र वाटत होता. मूठभर हाडे असलेला हा माणूस केवळ मानवतेच्या सुखाकरिता ऐक्य व्हावे या आकांक्षेने झुंझत होता ! असे असले तरी माणसाला हे कुठे कळत होते?

थोड्या वेळात बापूजींना जाग आली. सर्वांसमोर हात जोडून ते पडून होते. हे दृश्यसुद्धा अद्भुत होते. सुशीलाबहेन म्हणाल्या, "'वंडरस क्रॉस' म्हणायची इच्छा होते आहे."

मी काकीबरोबर जमिनीवर बसले. थोडा वेळ विणकाम केले. काही सुचतच नव्हते. बापूजींच्या प्रकृतीसंबंधात रोज एक पत्र लिहीत जा असे सर्व लिहीत आहेत. परंतु मनच घेत नाही. आणि सध्या तर जणू काहीच झाले नाही असे दिल्लीत सुरू आहे. कलकत्त्याला तर उपवासाच्या आधीच जाग आली होती. काय होते ते खरे.

पूज्य बापूजींनी आजची शारीरिक स्थिती आणि कामकाज -

रात्री २.३० वाजता लघ्वी केली. पडल्या पडल्या लिहिले. ३।। वाजता दातण.प्रार्थनेची तयारी. ४। प्रार्थना. साधे गरम पाणी आठ अंस; प्यारेलालजींकडून श्रुतलेखन करवून घेतले. ६।। वाजता झोपले. ७। वाजता जागे झाले. ७.३५ वाजता तक्याच्या आधाराने बसले. ७.४० वाजता लघ्वी. ७.४२ गरम पाणी आठ अंस, वर्तमानपत्रे ऐकली. ७.५५ घनश्यामदासजी बिरलाशी उपवासासंबंधी गोष्टी ८.०५ पर्यंत. ८.३५ वाजता परत उठून बसले. उठत असताना आधार द्यावा लागतो. ८.४० लघ्वी. ८.४५ मालीशची तयारी. मालीशच्या टेबलवर बसल्या बसल्या आठ अंस गरम पाणी प्याले. आणि 'फूटबाथ' घेतला. राजकुमारीबहेन आल्या. डॉ. जीवराजकाका, डॉ. बिधानबाबू, आणि डॉ. सुशीलाबहेनने बापूंना तपासले. ९.३५ चालत न्हाणीघरात गेले. (मालीशकरिताही चालतच गेले होते.) संडास वा लघ्वी झाली नाही. न्हाणीघरात चक्कर येऊ लागले होते. खुर्चीवर बसले. १०.४० न्हाणीघरातून बाहेर आले. वजन १०७ पौंड. रक्तदाब ९८/१००. या वेळी पंडितजीसुद्धा होते. बापूजींचे वजन पंडितजींनीच घेतले. १०.४५

साधे गरम पाणी. ११.१५ जवाहरलालजी गेले. स्थानिक मौलाना आले. मौलाना हिफझल रहमान, मौलाना हबिबूर रहमान, डॉ. जाफर - १८ मिनिट थांबले, ११.३३ ला गेले. ११.३५ पंडित सुंदरलालजींबरोबर गोष्टी. १२.१५ गोस्वामी गणेश दत्त. पडल्या पडल्या तारा ऐकल्या. दरम्यान तूप चोळायला लावले. १२.२५ उठून बसले. सुशीलाबहेनकडून भाषणाचे श्रुतलेखन करवून घेतले, तेवढ्यात व्ही. टी. कृष्णम्माचारी, कस्तुरभाई लालभाई, घनश्यामदासजी, ब्रिमोहनजी बिरला आले. हे सर्व तर बापूजींना केवळ पाहायलाच आले होते. १२.४५ वाजता झोपले, १.१० वाजता उठले. १.३५ गरम पाणी आठ अंस. २.४५ एनिमा, माझ्याशी गोष्टी. ३ वाजता माती घेतली. ४ वाजता काढली. ४ वाजता साधे गरम पाणी आठ अंस. डॉ. बिधानबाबू, शंकररावजी, आचार्य जुगलकिशोरजी, खेरसाहेब, महाराज देवास, राजेंद्रबाबूजी, त्यांची पत्नी आणि मुले, खुरशेदबहेन, रॉजर, त्यांची पत्नी. स्वित्झरलंडचे मंत्री, तोकिले आणि डॉ. गिल्डरसाहेब गेले. डॉ. जीवराजकाकांचा मजबूत पहारा आहे. त्यांच्या परवानगीशिवाय कोणीही आत येऊ शकत नाही, आणि तेही गोष्टी करायच्या नाही या अटीवर.

पाच वाजता प्रार्थना. प्रार्थनेत जाऊ शकले नाही. पडल्या पडल्या रेडिओवर बोलले. सुशीलाबहेनने बापूजींचा संदेश वाचून ऐकवला. मग सर्व बंधुभगिनी ओळीत शांतपणे दर्शन घेत घेत गेले. १५ मिनिट झोपले. ५.५० गरम पाणी आठ अंस, शाहनवाझसाहेब. ६.१५ ला झोपले ते ७,५५ पर्यंत. ७ वाजता देवदासकाका, काकी आले. जयरामदासजी, राजकुमारीबहेन, जवाहरलालजी, नियोगी, शण्मुखम चेट्टी. ९.१० पर्यंत मिटिंग. ८ वाजता गरम साधे पाणी चार अंस. ९.४५ लघ्वीला गेले आणि तिथून चालत परत अंथरुणावर येऊन पडले.

एकून पाणी ६८ अंस, लघ्वी २८ अंस. बापूजींची परिस्थिती ही अशी आहे. पाण्याच्या प्रमाणात लघ्वी होत नाही याची सर्वांना खूप काळजी आहे. बापूजींचे वजन जवळपास १०८ पौंड राहत असे. परंतु कलकत्त्यातील उपवासानंतर ते १११ - १२ पौंड राहू लागले कारण किडनीच्या दोषामुळे पोटात पाणी भरून राहते.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१६-१-'४८

उपवासाचा चौथा दिवस

३.३० वाजता रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेकरिता बापूजी एकदम स्वतःहोऊनच उठले. प्रार्थनेनंतर बापूजी रोजप्रमाणे आतल्या खोलीत चालत गेले. बापूजींवर पांघरूण टाकून आम्ही सर्व तिथेच बसलो. बापूजी म्हणाले, "आज मुन्नालाल (आश्रमात राहणारा) प्रार्थनेत कसा नाही?" इथे झोपला नाही काय? कल्याणमसुद्धा (टंकलेखक) नाही? मग काय हे दोघेही उशिरा झोपले?

. . . म्हणाले, "हे तर नेहमीच उशिरा झोपत असतात. काही काम नसेल तर अखेरीस बसून गुजराती लिहितात."

बापूजी - मला माहीत नव्हते की हासुद्धा जवाहरसारखा मोठा माणूस झाला आहे. कलकत्त्यात तर हा पोरींबरोबर माझ्याजवळच झोपत होता. आणि हे मलासुद्धा आवडत असे. ३.३० वाजता जर उठून जात असेल तर हा प्रार्थनेत कसा आला नाही? मी तर विचार करत होतो की माझ्यातच काही दोष असेल. नाही तर तो इतक्या तीव्र इच्छेने आलेला असूनही प्रार्थनेसारख्या कामात तल्लीन कसा होऊन गेला नसता?" इतके बोलल्यानंतर बापूजींना थकवा आला. दोन मिनिट मौन राहिले. मग आमच्याकडे पाहत म्हणाले, "तुम्ही सर्व झोपा. . . ." अशा प्रकारे बापूजी सगळ्यांची काळजी घेत असतात.

सात वाजता बापूजी उठले. उठून वर्तमानपत्रे ऐकली. जवळपास एक तास झोपले. वर्तमानपत्रांकडे एक तार पाठवायची होती. यामुळे बापूजी नाराज झाले. खूप दुःखी होत १५ मिनिट बोलत म्हणाले, "यात मला सूक्ष्म असत्य दिसते. परंतु तुम्ही एकटेच असे करता असे मला म्हणायचे नाही. सर्व जग असेच करत असते. तुमचा दोष सांगण्याकरिता मी बोलून राहिलो नाही. मीसुद्धा असे निमित्त सांगितलेले आहे. लहानपणी आणि इंग्लंडमध्ये." मग त्यांच्याआईने त्यांच्याकडून एकपत्नीव्रताचे आणि मांसाहार न करण्याचे जे वचन घेतले होते त्यासंबंधी बापूजी बोलले. शेवटी म्हणाले, "मला अजून ताजेपणा वाटतो. म्हणूनच मी इतके सगळे बोलू शकलो. ईश्वरकृपेने जर मी असाच राहू शकलो, तर बरेच दिवस काढू शकेन. दरम्यान, लोक लढले तर मरतील आणि शिकले तर खातील. शिकतील म्हणजे इतके की पाकिस्तानमध्ये गेलेले मुसलमान परत इथे येऊ लागतील. तरीही, भारताने जे

मूर्खपणाचे कृत्य (दंगे) केले होते, ते अखेरीस सगळे विसरतील. लोक म्हणतील, 'फाळणी तर झाली, पण फाळणीसारखे काहीही दिसत नाही'"

मालीशकरिता खुर्चीवरच गेले. पाय धुवायला लावले नाही. बापूंना तपासले. अशक्तपणा तर वाढतच चालला आहे. ९।।। वाजता न्हाणीघरात आले. गरम पाण्याच्या टबात पडले तेव्हा डोक्यावर थंड पाण्याचा टॉवेल ठेवायला लावला. आता आंघोळ करत असताना तिथे दोनदोन लोक राहतात. आधी मी आणि भाईसाहेब असायचो. मग सुशीलाबहेन आल्या. बापूजी म्हणत होते की आज कालसारखे चक्कर येत नाहीत. डोके थंड ठेवले होते यामुळे असेल. वजन केले, १०७ पौंड होते. याचा अर्थ उरलेले पाणी पोटातच राहते आहे. स्थानिक मुसलमानभाई म्हणाले शहराच्या परिस्थितीत सुधारणा होऊ लागली आहे. बापूजी म्हणाले, "जे करायचे ते विचारपूर्वक करा आणि फूस लावल्यामुळे काहीही करू नका." ते पुढे म्हणाले, "मला कालपेक्षा आज पुष्कळ चांगले वाटते." मंत्रिमंडळाने ५५ कोटी द्यायचे कबूल केले अशीसुद्धा बातमी आली.

बापूजी जेव्हा म्हणतील तेव्हा देता यावा म्हणून आज तर बस्ती देण्याची तयारी आधीपासूनच करून ठेवली आहे. आणि दोन वाजता एनिमा घ्यायचे म्हणालेसुद्धा. बापूजींच्या आजूबाजूला राहण्यातच जवळपास दिवस गेला. बिरलाजी म्हणाले, "आजचे बापूजींचे भाषण लाजबाब होते. जे काही केले जात आहे ते बापूंना खुश करण्याकरिताच केले जात आहे. मी तर बापूजींना सांगत असतो की मी जी खादी वापरतो ती तुम्हाला खुश करण्यासाठीच. माझा खादीवर विश्वास नाही. माझा जर खादीवर विश्वास असता तर मी गिरणी का चालवली असती?"

शहरातील वेगवेगळ्या ठिकाणी आणि मोहल्ल्यात सभा सुरू आहेत. आज मी आणि सुशीलाबहेन प्रवचनाचा अनुवाद करत होतो. यामुळे प्रार्थनेकरिता पाच मिनिट उशिरा पोहोचलो. इतरांनी मात्र प्रार्थना सुरू करून टाकलेली होती.

प्रार्थनेनंतर बापूजी अंथरुणात पडल्या पडल्या बोलले. प्रार्थनास्थळापर्यंत ऐकू जात होते.

बंधूंनो आणि भगिनींनो,

"आज तुमच्याशी बोलता येईल अशी मला आशा नव्हती. परंतु ईश्वर कृपेने आज कालपेक्षा माझ्या आवाजातील जोम वाढला आहे. उपवासाच्या चौथ्या दिवशी

आज मला जितकी शक्ती वाटते आहे तितकी माझ्या मागच्या कोणत्याही उपवासात मला वाटली नव्हती. आत्मशुद्धीचा यज्ञ तुम्ही करत राहाल तर तुम्हांला संबोधण्याची माझ्यातील शक्ती शेवटपर्यंत कायम राहील अशी मला आशा आहे. मी तुम्हांला सांगतो की मला मुळीच घाई नाही. घाई केल्यामुळे आपल्याला कामाला मदत होणार नाही. मला अवर्णनीय शांतता जाणवते आहे. कोणीही थोडेसे काही तरी करावे आणि सर्व काही ठीकठाक आहे असे मला सांगावे अशी माझी इच्छा नाही. दिल्लीत जेव्हा परिपूर्ण शांतता स्थापित होईल तेव्हा संपूर्ण भारतातही शांतता स्थापित होईल. माझ्या चोहोकडे शांतता पसरणार नसेल म्हणजे भारत आणि पाकिस्तानमध्येही शांतता स्थापित होणार नसेल तर मला जिवंत राहण्याची इच्छा नाही असा या यज्ञाचा अर्थ आहे."

बापूजी इतके बोलले. आवाज फारच क्षीण होता आणि शब्दाशब्दाला श्वास चढत असल्याचे जाणवत होते.

नंतरचे भाषण बापूजींनी इंग्रजीत लिहिले होते आणि त्याचा जो अनुवाद सुशीलाबहेनने केला होता तो त्यांनीच वाचून दाखवला.

"कोणत्याही जबाबदार सरकारकरिता आधी घेतलेला निर्णय बदलवणे इतके सोपे नसते. तरीही आमच्या सरकारने, जे प्रत्येक बाबतीत एक जबाबदार सरकार आहे. त्याने जो निर्णय समजूनउमजून घेतला होता तोही चूक लक्षात येताच त्याने अतिशय वेगात बदलून टाकला. (सरकारच्या आधीच्या भूमिकेप्रमाणे पाकिस्तानला ५५ कोटी रुपये देण्याविषयी वल्लभभाई पटेल यांनी जी घोषणा केली होती तिच्याकरिता पाहा शासकीय परिपत्रक, जानेवारी १६, १९४८). याकरिता काश्मीरपासून तर कन्याकुमारीपर्यंतच्या आणि कराचीपासून तर आसामच्या सीमेपर्यंतच्या संपूर्ण देशाने सरकारला अंतःकरणापासून धन्यवाद दिले पाहिजे. आणि मला माहीत आहे की जगातील सर्व लोक म्हणतील की असे काम आपल्या सरकारसारखे मोठ्या मनाचे सरकारच करू शकते.

"मुसलमानांची खुशामत करण्याचे हे धोरण नाही. हे तर आत्मसमाधानाचे धोरण आहे. विशाल बहुमताचे प्रतिनिधित्व करणारे कोणतेही सरकार अडाणी जनतेकडून टाळ्या मिळवण्याकरिता असे कृत्य करू शकत नाही. चोहोकडे वेड लागल्याचे वातावरण पसरलेले

असताना धीर धरून आणि डोके शांत ठेवून जहाज चालवणाऱ्या मोठ्यात मोठ्या पुढाऱ्यांनी त्या जहाजाला वाचवण्याचा प्रयत्न करायला नको काय? असे करण्यामागील उद्दिष्ट कोणते? त्याला कारण माझे उपोषण होते. उपवासाने त्यांचा संपूर्ण दृष्टिकोनच बदलला. या उपवासाशिवाय कायद्याच्या सीमेत जितके शक्य होते तितकेच त्यांनी केले असते. परंतु भारत सरकारने उचललेले हे पाऊल खऱ्या अर्थाने मैत्री वाढवणारे आणि गोडवा निर्माण करणारे आहे. यामुळे पाकिस्तानचीही परीक्षा होईल. यामुळे केवळ काश्मीरचाच नाही तर भारत आणि पाकिस्तानमधील सर्व वादग्रस्त प्रश्नांचा निर्णय सन्मानपूर्वक व्हायला पाहिजे. आजच्या शत्रुत्वाची जागा मैत्रीने घेतली पाहिजे. समतेच्या मागणीला कायद्यातील अक्षरांपेक्षा जास्त महत्त्व मिळाले पाहिजे. इंग्रजीत एक घरगुती वाक्प्रचार आहे. तो अनेक शतकांपासून चालत आला आहे. जिथे सामान्य कायदा काम करू शकत नाही तिथे निःपक्षपातीपणा मदतीकरिता धावून येतो. कायद्याकरिता आणि निःपक्षपातीपणाकरिता तिथे वेगवेगळी न्यायालये होती. हे सर्व पाहता भारत सरकारने जे काही केले आहे ते सर्व प्रकारे योग्य आहे. उदाहरणाची आवश्यकता असेल तर मॅकडोनाल्ड निवाडा आपल्यासमोर आहे. (सांप्रदायिक निवाडा, हा ऑगस्ट ८, १९४८ला प्रकाशित झाला होता.) तो निवाडा काही केवळ मॅकडोनाल्डचा नव्हता. तो तर संपूर्ण ब्रिटिश मंत्रिमंडळाचा आणि गोलमेज परिषदेच्या बहुतेक सदस्यांचा होता. परंतु तो निवाडा येरवडा तुरुंगात मी केलेल्या उपोषणामुळे रात्रीतून बदलवण्यात आला. (पददलित वर्गांकरिता वेगळे मतदार संघ निर्माण करण्याच्या विरोधात गांधीजींनी सप्टेंबर १९३२ला उपोषण सुरू केले होते. पुणे करारानंतर सव्वीस सप्टेंबरला त्यांनी आपला उपवास सोडला होता.) भारत सरकारने केलेल्या महान कृत्यामुळे मी आता उपवास सोडला पाहिजे असे मला सांगण्यात येत असते. याकरिता मला स्वतःची समजूत घालता आली पाहिजे अशी माझीही इच्छा आहे.

"मला त्या डॉक्टर लोकांच्या काळजीची कल्पना आहे की जे बराच त्याग करून मला दररोज तपासतात आणि माझी काळजी घेत असतात. माझा उपवास जसजसा लांबत चालला आहे तसतशी त्यांची काळजी वाढत चालली आहे. मी आजच मरेन अशी भीती त्यांना वाटत नाही. परंतु हा उपवास जितका लांबत जाईल तितके माझे मूत्रपिंड चागले काम करू शकणार नाही आणि उपवासामुळे त्यांच्यात निर्माण झालेला दोष कदाचित पुढे कधीही दुरुस्त होणार

नाही अशी त्यांना भीती वाटते हे मला माहीत आहे. वैद्यकीय क्षेत्रातील लोक कितीही जरी सक्षम असले तरी मी उपोषणाची सुरुवात त्यांना विचारून केली नव्हती. माझा मार्गदर्शक, इतकेच नाही तर हुकूमशहा हा कधीही न चुकणारा एकमेव सर्वशक्तिमान ईश्वर आहे. त्याला माझ्या या काटकुळ्या शरीराचा जर यापुढेही उपयोग असेल तर वैद्यकीय क्षेत्रातील लोकांनी केलेल्या भाकितानंतरही तो हा देह राखून ठेवील. मी त्याच्या हातात आहे. यामुळे मला मृत्यूची वा अपंग होऊन जगण्याची भीती का वाटत नाही यावर तुम्ही विश्वास ठेवाल अशी मला आशा आहे. परंतु मला वाटते की देशाला माझा काही उपयोग असेल तर डॉक्टरांच्या या सावधगिरीच्या सूचनेमुळे लोकांनी एक होऊन त्वरित कृती केली पाहिजे. इतक्या मेहनतीने स्वातंत्र्य मिळवल्यानंतर आपण शूर तर व्हायलाच पाहिजे. जे लोक शत्रू आहेत अशी शंका असते त्यांच्यावरही शूर लोक विश्वास ठेवत असतात. शूर लोकांना अविश्वासाची घृणा वाटत असते, तसे करणे त्यांना आपल्या प्रतिष्ठेविरुद्ध वाटत असते. भारत आणि पाकिस्तान यांच्या भागात दंगलीचा आगडोंब जरी उसळला तरी दिल्लीतील हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यावर कोणताही परिणाम होणार नाही असे ऐक्य जर दिल्लीत निर्माण झाले व दिल्ली शांत राहिली तर माझी प्रतिज्ञा पूर्ण होईल. सुदैव हे आहे की भारत आणि पाकिस्तानमधील लोकांना आपोआप समंजसपणा आला आहे असे दिसते आणि आता दोन्ही उपनिवेशात अशी मैत्री झाली पाहिजे की जी कोणत्याही धर्माचे लोक दोन्ही उपनिवेशात कोणत्याही अडथळ्याशिवाय इकडेतिकडे सुरक्षितपणे येऊजाऊ शकले पाहिजे व राहू शकले पाहिजे. असे झाले तर हेच माझ्या उपवासाला सर्वात चांगले उत्तर राहील. यापेक्षा आत्मशुद्धीची मागणी कमी असू शकत नाही.

"दोन्ही उपनिवेशांनी दिल्लीवर फार मोठे ओझे टाकणे योग्य नाही. अखेरीस संघराज्यात राहणारे लोकही तर माणूसच आहेत. आमच्या सरकारने जनतेच्या नावाने एक फार मोठे पाऊल उचलले आहे. आणि ते उचलत असताना त्याकरिता द्याव्या लागणाऱ्या मूल्याचा विचारसुद्धा केला नाही. पाकिस्तान याचे उत्तर कोणते देणार आहे? इच्छा असेल तर अनेक मार्ग आहेत. परंतु इच्छा आहे काय?"

प्रार्थनेनंतर बापूजी अंथरुणावर पडलेले होते व कालप्रमाणेच स्त्री-पुरुष रांगेत येऊन त्यांचे दर्शन घेत होते. बापूजी सी. एच भाभांबरोबर बोलत होते.

बापूजींचे मुत्रपिंड चांगल्या प्रकारे काम करत नव्हते. यामुळे अबुल कलाम आझाद मोठी हिंमत करून बापूजींना म्हणाले - "मोसंबीचा रस पाणी मिसळून तो घेऊन तर पाहा?"

बापूजींनी लिंबाचे रस मिसळलेल्या पाण्याशिवाय इतर काहीही घेण्याला नकार दिला. ते म्हणाले याऐवजी मी सोमल घेतले तर? आंबट लिंबाशिवाय मी दुसरे काहीही घेऊ शकत नाही. माझ्या शरीरात कोणता बिघाड झाला आहे हे मला माहीत आहे. त्याचे कारण रामनामातील माझ्या श्रद्धेतील उणीव आहे.

बिरलाजी म्हणाले, "इतर उपवासांच्या तुलनेत या वेळी तुमची तब्येत तुलनात्मक दृष्टीने जास्त चांगली आहे. याचे कारण तर दिल्ली आहे."

बापूजी - "नाही, रामनाम आहे."

आज पाणी धकत नव्हते. काळजी वाटावी अशी बापूजींची आज प्रकृती झाली आहे. हिंदू, शीख बापूजींकडे येत होते, परंतु त्याचा विशेष परिणाम बापूजींवर दिसून येत नव्हता. जवाहरलालजी, जयप्रकाशजी, सुचेताबहेन हे सर्व म्हणत होते की आता वातावरणात बदल झाला आहे. भरपूर सभा होत आहेत. लोहियाजींना बापूजी म्हणाले, "सर्व अंतःकरणपूर्वक काम करा. मी काही असाच मरणार नाही. परंतु जे काम कराल ते चोख असले पाहिजे."

रात्री ९ वाजता बापूजी अंथरुणापर्यंत चालत गेले. बापूजींच्या लघ्वीची परीक्षा दर तासाला करा असे डॉक्टरांनी सांगितले आहे.

बापूजींची शारीरिक परिस्थिती -

मोठ्या पहाटे सकाळी साडेतीन वाजता बापूजींना जाग आली. दातण, प्रार्थना. ३.३५ ला लघ्वी. ४। वाजता साधे गरम पाणी आठ अंस. ५.४५ वाजता झोपले. . . . ला पत्र लिहायला लावले. ७ वाजता झोपले आणि ७। वाजता जाग आली, ७। वाजता परत झोपले आणि ८.१० वाजता जाग आली. गोष्टी केल्या, बंगाली लिहिले. ८.४५ वाजता मालीशकरिता गेले. डॉक्टरने तपासले, रक्तदाब १७०/१०० आहे. ९.४० आंघोळीकरिता न्हाणीघरात गेले. परसाकड झाली नाही. लघ्वी झाली. गरम पाण्याने आंघोळ

केली, तेव्हा डोक्यावर थंड पाण्याचे कापड ठेवले. थंड पाण्यात बसले. चक्कर येत नव्हते. १०.३० न्हाणीघरातून बाहेर आले. वजन घेतले १०७ पौंड होते. १०.३५ आठ अंस साधे गरम पाणी. घनश्यामदासजी बिरलांबरोबर १० मिनिट गोष्टी. १०.४० देशबंधू गुप्ताजी. १०.५५ राजेंद्रबाबूजी आले. ११ वर्तमानपत्रे वाचली. ११.५ गोस्वामी गणेशदत्तजी, महाराज घोलपूर, नाभा आणि पन्ना दर्शनाकरिता आले. दरम्यान पायांना तूप चोळायला लावले. १२ ते १२.२० कार्डिओग्रॅम. डॉ. ढढ्ढा ांनी घेतला. १२.२५ साधे गरम पाणी आठ अंस. १२.३५ मौलाना हिफजुल रहमान एहमद सैय्यद. डॉ. जफरी आणि एस. एस. अब्दुल्ला. १.४० माती १.५५ काढली. २ वाजता आठ अंस साधे गरम पाणी. १.२० जवाहरलालजी आले, १.५५ परत गेले. २ वाजता मृदुलाबहेन १० मिनिट. २.२० एनिमा घेतला. परसाकड चांगली झाली. २.५० मौलानासाहेब, जयप्रकाशजी, प्रभावतीबहेन, होशियारीबहेन (एक आश्रमवासी भगिनी), ३.४५ साधे गरम पाणी. ३.५५ पडल्यापडल्या सुशीलाबहेनकडून श्रुतलेखन करवून घेतले. ४.४० गरम पाणी. गरम थंड पाण्याचा शेक किडनी आणि पोटावर. लघ्वी व्हावी म्हणून शंकरनजींनी प्रयत्न केला, परंतु यश आले नाही. पाच वाजता प्रार्थना. मग बापूजी बाहेरून आत आले. पडल्या पडल्या प्रार्थना ऐकता येईल अशी व्यवस्था करण्यात आली होती. ५.५० भाभांबरोबर १० मिनिट. ६ वाजता आठ अंस साधे गरम पाणी. ६.५ परत गौस्वामी गणेश दत्तजी, जयरामदासजी, राजकुमारीबहेन - १५ मिनिट. जवाहरलालजींबरोबर १० मिनिट. राजकुमारी, त्यानंतर खेरसाहेब आणि महाराजा फरीदकोट, ७.१० आडवे झाले. ८.१० साधे गरम पाणी आठ अंस. साईस्ट्रेनची १० ग्रॅमची पुडी घेतली. ८ वाजता शंकररावजी, राममनोहर लोहिया. ८.१० सुचेताबहेन, शाहनवाझसाहेब. ९ वाजता अंथरुणावर पडले. तेल चोळायला लावले. अशा प्रकारे दिवस गेला.

परंतु प्रकृती चांगली नाहीच. हृदयसुद्धा बिघडले आहे असे वाटते. आज रात्री तर खूप काळजी करण्यासारखी स्थिती राहील की काय असे वाटते. ईश्वराला जे काही मान्य आहे तसे होईल.

सायंकाळी सहा वाजता गौस्वामी गणेशदत्तजी शिखांचे प्रतिनिधीमंडळ घेऊन आले होते. त्यांच्याशी झालेली चर्चा पुढीलप्रमाणे -

गौस्वामीजी, "दोन दिवसात वातावरणात फरक पडला आहे तो तर केवळ तुमच्या तपश्चर्येमुळे आहे. हे सर्व तुमच्या सेवेत याकरिता हजर झाले आहेत. या सर्वांचे म्हणणे आहे की आम्ही वाणी आणि कर्माने ईश्वराला साक्षी ठेवून सांगतो की आम्ही मिळूनमिसळून राहू, कोणत्याही प्रकारची अशांतता

निर्माण होऊ देणार नाही. करोलबागचे आर. एस. एस.चे पुढारीही आलेले आहेत. आता तुम्ही तुमचे व्रत सोडा.”

बापू - तुम्ही जे काही सांगत आहा ते लिहून द्या इतकेच मी म्हणेन.

आत्मसिंहजी शीख - आमचे भाग्य आहे की तुमचा जन्म आमच्या इथे झाला. आमच्या देशात जर काहीही झाले आणि त्याकरिता आम्हांला जीवही द्यावा लागला तरी आम्ही हा कलंक आमच्या माथी लागू देणार नाही. तुम्ही ज्या कोणत्या सेवेची मागणी कराल ती आम्ही करू.

बापू - मला सांगता की उपवास सोडा, परंतु एकाएकी हे व्रत सोडणार नाही. वाद घालू इच्छित नाही. अशा प्रकारे लोक येतच असतात. पाहतो. तुम्ही धीर ठेवायला पाहिजे. ईश्वराची जर मला वाचवायची इच्छा असेल तर कोणीही उचलू शकणार नाही. आताच उपवास सोडावा असा परिणाम माझ्यावर होऊन राहिलेला नाही. पाणी तर खातच असतो. पाण्याची इतकी व्यवस्था केली तर पाणी फार मोठा आहार आहे. मी शांततेत पडलो आहे. आता जास्त वाद घालण्याची इच्छा नाही.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१७-१-'४८

उपवासाचा पाचवा दिवस

३.३० वाजता नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेपूर्वी नेहमीप्रमाणे दातण वगैरे झाले. प्रार्थनेनंतर आत चालत चालतच आले. म्हणाले, "आज तर कालपेक्षाही जास्त शक्ती जाणवते आहे. तुमच्याकरिता मी किती जास्त खातो आहे? पाणीसुद्धा एक प्रकारचा तर आहारच असतो."

आत शंकरनजी, होशियारीबहेन आणि मुन्नालालभाई (आश्रमवासी) बसलेले होते. यामुळे बापूजी म्हणाले, "आज असे वाटते की तीन महर्षी बसलेले आहेत." होशियारीबहेन म्हणाल्या, "कधीही बेकार बसू नये. अखेरीस हात तर हालवावेच लागत असतात."

रात्री आम्हांला जागावे लागत असल्यामुळे बापूजींनी झोपायला सांगितले. सकाळी प्रसन्न मनःस्थितीत होते. रिचर्डला पत्र लिहवून घेऊन झोपून गेले. नंतर आठ वाजता घनश्यामदासजी आले. त्यांच्याशी स्फूर्तिदायक गोष्टी केल्या.

घनश्यामदासजी-मला मुंबईला जायचे आहे, परंतु ज्याप्रमाणे यमराजाने सावित्रीला 'पुत्रवतीभव' असा आशीर्वाद दिला होता तसेच तुम्हीसुद्धा मला 'तुझी वाणी खरी होवो' असा आशीर्वाद द्या.

बापूजी - पूर्णपणे निर्दोष तर ईश्वरच असू शकतो. प्रत्येक उपवासात आता हा केव्हा सुटतो असे वाटत होते. कलकत्त्यातही काहीसे असेच होते. तरीही मी निश्चिंत माणूस आहे. एखादा माणूस आला तर वाटायचे याने काही बातमी आणली असेल आणि आता उपवास सुटेल. असे जरी मी करत नव्हतो तरी मला असेच वाटायचे खरे. उपवास सुटला असता तर बरे वाटले असते. उपवास करण्यात काही मजा नाही. पण मनात असायचे की चला, घनश्याम आला आहे, उपवास सुटायची काही गोष्ट तर नाही? वा पंजाबमध्ये काय करू? तिथून सर्वांना सांगा की अशा प्रकारे उपवास सुटू शकत नाही आणि सर्वांना समजावून सांगा की आम्ही चांगले राहू तर बाकी सर्व चांगले होईल. दिल्लीने साफ होणे फार आवश्यक आहे. दिल्लीत जर काही करावे लागले नाही (पोलीस बंदोबस्त) तर काम फार सुलभ होईल. आज हिंदुस्थानचा कारभार

खूप भावनाशून्य झाला आहे. माझ्यात असीम धैर्य आहे. कामही बरेच करून टाकत असतो. 'हरिजन'करिता लिहवून घेत असतो.

घनश्यामदासजी - काल मी रंधवाशी (पोलीस अधीक्षक) बोललो होतो. तो म्हणाला की शहरातील वातावरणात बराच फरक पडला आहे.

बापू - रंधवाला सांगा की त्याने पक्षपात न करता काम करावे. असे जर त्याने केले तर त्याची फार उन्नती होईल. तो कामात पक्षपात करतो अशी शंका सर्वांच्या मनात आहे. ही गोष्ट खरी आहे की नाही हे मला माहीत नाही.

बिरलाजी - आज कोणालाही 'निष्पक्ष' म्हणणे कठीण आहे. माझ्या मनातही निष्पक्षता नाही. इतक्या वेदना होतात, पाकिस्तानवाले इतक्या शिव्या देतात की कानातून किडे बाहेर पडावे. त्या लोकांवरील आमचा विश्वासच उडाला आहे. संतापामुळे विचारही करू शकत नाही.

बापू - मग पंजाबमध्ये जे सुरू आहे ते 'निष्पक्ष' आहे काय?

बिरलाजी - . . . आजचे कुरबानअलीचे 'निष्पक्षपाती' आहे. आपल्या भल्याकरिताही ज्ञातिवाद वाईट आहे. विचार केल्यानंतर सर्व काही लक्षात येते, संतापात नाही.

बापू - तर ठीक आहे. तुम्हीही करायला पाहिजे. उपवास वाईट आहे, पण परिणाम चांगला येतो आहे. मी सोडून दिले तर हा परिणाम इथेच थांबेल.

बिरलाजी - मी तर माझ्या मनातील गोष्टीप्रमाणे करत असतो. ही आजारी मनाची एक अवस्था आहे. असे जर आम्ही चालत राहिलो तर यशस्वीही होऊ. ही सफाई आपल्याला पुढे नेते.

बापू - ही तर तेव्हा होऊ शकते जेव्हा माझी स्वतःची बरीच सफाई झालेली असेल.

बिरलाजी - हेसुद्धा तेव्हाच शक्य आहे जेव्हा शरीर असेल.

बापू - असे वाटते की अजून शरीराला राहायाचे आहे. अजून जगण्याची इच्छा सुटली नाही. इथे इच्छाशक्तीला ईश्वर मदत करत असतो. डॉक्टरांच्या दृष्टीने लघ्वी कमी होते आहे, झोप वाढली आहे. हे चांगले नाही. आणि मी अगदीच झोपलो नाही तर तेसुद्धा त्यांना चांगले

वाटत नाही. परंतु माझा ईश्वरावर किती विश्वास आहे ! मी जर हृदयापासून ईश्वराचे नाव घेत असेन तर किडनीने चांगले काम करायला सुरुवात केलीच पाहिजे.

बिरलाजी - माझे अंतःकरण तर इथेच पडलेले आहे, इथेच राहायला पाहिजे. काल श्यामाप्रसाद म्हणाला तर वाटले की जावे. कबूल केले होते म्हणून आणि सरदारचा चेहरा - त्या दगडी पुरुषाचा चेहरा दीन झाला आहे. तेही म्हणाले (फोनवरून) येऊ शकत असाल तर या. दुःख तर भरलेलेच होते. म्हणाले, "अजूनही उपवास का सुरू आहे?"

मी सरदारना म्हणालो, 'उपवास लांब चालणार नाही असे वाटते, पण तरीही इथे राहणे बरे वाटते'.

बापू - हीच एक अशी गोष्ट आहे की जिच्याआधारे पाकिस्तान सौदेबाजी करू शकतो लाभ घेऊ शकतो. पंचावन करोड दिल्याने संघराज्याची प्रतिष्ठा फार वाढली आहे. त्यांना जेव्हा लढायचे असेल तेव्हा संघराज्याच्या मुलालासुद्धा समजेल की हे संघराज्याच्या पैशाने लढत आहेत. किती दिवस लढतील?

तुम्ही जा. इथे ब्रिजमोहन तर आहेच. काम चालत राहील. जिथे जाल तिथे शुद्धीचे काम तर होतच राहील. नाही तर विचार करण्याची गोष्ट तर आहेच. विचारशुद्धी हेसुद्धा मोठेच काम आहे.

बिरलाजी - काम तर ईश्वर करत असतो. ते आपोआप होत असते. परंतु माणसाला वाटत असते की मीसुद्धा काही करतो आहे. नचिकेताची गोष्ट बिरलाजींनी सांगितली. नचिकेता दारात उपवास करत होता, त्यामुळे यमराज घाबरून गेला. एक महात्मा त्याच्याकडे उपवास करत असल्यामुळे त्याला किती काळजी वाटू लागली होती? अशा गोष्टी चालल्या. तेवढ्यात राजकुमारीबहेन आल्यामुळे वरील गोष्टी थांबल्या. मसाज सुरू असताना डॉ. बिधानबाबू, डॉ. जिवराजकाका आणि डॉ. कर्नल ढड्ढा यांनी बापूजींना तपासले. त्यांचे म्हणणे होते की "दोन अंस संत्र्याचा रस जरी घ्याल तरी तेवढे पुरेसे होईल. आता शहाराच्या परिस्थितीत तर सुधारणा झालेलीच आहे".

असे करीन तर मला २१ दिवसांचा उपवास करण्याची इच्छा आहे. सुशीलाबहेन याकरिता नाही म्हणाल्या. बापूंनी जर रस घेतला आणि परिणामी जनता जर ढिली पडली तर बापू आमरण उपोषणच करतील असे त्यांचे म्हणणे होते. १०.३० वाजता बापूजी न्हाणीघरात आंघोळीकरिता आले. मी आणि भाईसाहेबांनी मिळून आंघोळ घातली. आंघोळ करत असताना रिचर्ड नावाच्या एका युरोपिअन आजाऱ्याला बिरला भवनमध्ये ज्या खोलीत सुश्रूषेकरिता ठेवले होती ती खोली बिरलाजींना मागण्याची परवानगी सुशीलाबहेनने बापूजींना मागितली. बापूजी म्हणाले, "आपण इतक्या भागाच्या पुढे जायला नको." १०.४० वाजता बापूजी उन्हात आले. सुशीलाबहेन केव्हा तरी लघ्वी मोजण्याचे आणि तपासण्याचे काम विसरून गेल्या होत्या. परंतु बापूजींना मात्र बरोबर आठवण होती.

स्थानिक मौलाना आले. ते म्हणाले की आता शहरातील परिस्थितीत भरपूर सुधारणा झाली आहे आणि जे मुसलमान कराचीला गेलेले आहेत त्यांची तार आली आहे की तुम्ही यशस्वी व्हाल अशी आम्ही प्रार्थना करतो आणि आम्ही परतण्याकरिता आतुर झालेले आहो. केव्हा यायचे?

बापूजी म्हणाले, "हे फार चांगले चिन्ह म्हणता येईल. हे लोक जर परत येऊन दिल्लीत राहिले तर ती माझी खरीखुरी परीक्षा झाली असे मी समजेन".

१२ वाजता माती घेतली. नंतर मी बस्तीची तयारी केली. आजसुद्धा बापूजींनी बस्ती घेतली. आज कचरा काही फार निघाला नाही. गरमथंड पाण्याचा शेक घेतला. मौलाना साहेब आले. ते म्हणाले की आज सायंकाळी बापूजींना उपवास सोडायला लावायला पाहिजे. शहरातील परिस्थितीत भरपूर सुधारणा झाली आहे. बापूजींनी सात अटी ठेवल्या आहेत. यावर सर्व प्रतिनिधींनी सह्या केल्या तरच उपवास सुटेल. बापूजी आज फारच अस्वस्थ आहेत.

सब्जीमंडीचे व्यापारी आले. ते म्हणाले की आम्ही आमच्या दुकानात मुसलमानांना फळे विकायला मनाई केली होती. आजपासून आम्ही ती सर्वांकरिता खुली केली आहेत.

या वेळी एक अद्भुत घटना घडली होती. याच वेळी जवाहरलालजी आले. बापूंची मानसिक आणि शारीरिक अस्वस्थता पाहून त्यांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. त्यांनी

गुपचूप दुसरीकडे तोंड वळवले आणि आपले अश्रू पुसले. परंतु ज्यांच्या छत्रछायेत हे स्वातंत्र्य आले होते त्यांची या स्वातंत्र्यकाळात अशी अवस्था व्हावी ही किती असहनीय गोष्ट होती? मी चित्रकार वा छायाचित्रकार असते तर किती बरे झाले असते असे वाटून मला स्वतःलाच माझी किती घृणा वाटू लागली. हे लिहायला माझ्याजवळ शब्दच नाहीत. . . . "काटेरी ताज" असे जे म्हणतात ते किती यथार्थ आहे?

चार वाजता बापूजींनी भाषण लिहवून घ्यायला सुरुवात केली. ४.३० वाजता आत आले. राजेंद्रबाबूजी आले. त्यांच्यासोबत चर्चा झाली. "जितके प्रतिनिधी आहेत, मग ते कितीही असो, त्या सर्वांनी मला सही करून द्यावी. मी ते प्रकाशित करीन तोंडी गोष्टीला मी निरर्थक समजतो. मी केवळ लेखी गोष्टच मान्य करतो. मान्य की तेथील आश्रित येत असताना त्यांना मध्येच मारून टाकण्यात आले तर? दिल्लीत येऊ शकतात तर ते बाहेर कुठे जाऊ शकत नाहीत काय? आज मुसलमानांना तिकिट देत नाहीत. याहून जास्त मी काय समजू? पाकिस्तानमध्ये पागलपणा सुरू आहे म्हणून काय आम्ही सर्वांनीही पागल व्हायला पाहिजे? मरायचे असेल तर मरेन. डॉक्टर काही संपूर्ण मन पाहू शकत नाहीत. मन सर्वोपरी आहे. माझी कोणीही काळजी करू नये. आम्ही बरोबर करतो की नाही इतकेच पाहायचे आहे. आम्ही शुद्धी करत आहो की नाही? उपवासाचा अर्थ आपण जागे राहिलो पाहिजे हाच आहे. डॉ, बिधान आता घाबरला आहे, काळजीत पडला आहे हे खरे आहे. त्याने मौलानांना सांगितले. परंतु कोणी फसवणूक करून मला उपवास सोडायला लावावा अशी माझी इच्छा नाही. जर असे झाले तर परिस्थिती अजूनच चिघळेल."

यानंतर मी प्रार्थनासंदेशाचा अनुवाद केला.

पाच वाजता प्रार्थना झाली. मध्यंतरी अनेक पुढारी वेगवेगळ्या पुढाऱ्यांची समजूत घालत आहेत. सभा सुरू आहेत. बिचारे राजेंद्रबाबू काँग्रेसचे प्रमुख आहेत. यामुळे त्यांना तर इतके काही काम आणि काळजी आहे की त्यामुळेच त्यांची प्रकृती बिघडू लागली आहे. परंतु ते पूज्य बापूजींचे अनन्य भक्त आहेत. बापूजींनी कोणताही युक्तिवाद करायला नकार दिलेला असल्यामुळे ते आता काम करून दाखवूनच स्वस्थ बसणार आहेत. पाच वाजता बापूजींनी अंथरुणात पडूनच प्रार्थना केली. ते स्वतः दुर्बल आवाजात तीन मिनिट असे बोलले -

"बंधूंनो आणि भगिनींनो,

"ईश्वराची कृपा आहे की उपोषणाच्या या पाचव्या दिवशीही थकवा न जाणवता मी दोन शब्द बोलू शकतो. (जानेवारी १७ १९४८ला आरोग्यविषयक जे परिपत्रक काढण्यात आले होते त्यात लिहिले होते: "गांधीजींचा अशक्तपणा निश्चितच वाढला आहे आणि त्यांच्या डोक्यात भणभणू लागले आहे. त्यांचे मूत्रपिंड नीट काम करत नाही हे पाहता हे लक्षण चिंतनीय आहे. आमच्या मते हे उपोषण अजून पुढे सुरू राहू देणे मुळीच वांछनीय नाही. यामुळे हे उपोषण लवकरात लवकर संपेल अशी पावले उचलणे सर्व समुदायांकरिता आवश्यक आहे हे सांगणे आमचे कर्तव्य आहे.) आजचा संदेश मी लिहून काढला आहे आणि सुशीलाबेन तो तुम्हांला वाचून दाखवतील.

"तुम्ही जे काही कराल त्यामागे पूर्णपणे तुमचे मन आणि हृदय असले पाहिजे, नाही तर त्यातून काहीही साध्य होणार नाही. कसेही करून मला जिवंत ठेवावे इतकाच जर तुम्ही विचार करणार असाल तर तुम्ही फार मोठी चूक कराल. मला जिवंत ठेवणे वा मारणे हे कोणत्याही मानवी हातात नाही. ते ईश्वराच्या हातात आहे. याबद्दल मला मुळीच शंका नाही आणि यामुळे इतरांनीही त्याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही.

"या उपोषणाचा अर्थ आमची हृदये शद्ध करणे आणि जागे होणे आहे. कृपा करून माझी कीव करू नका. मला शक्य होईल तितके दिवस मी उपवास करणार आहे आणि त्यानंतर मला मारायचे अशी जर ईश्वराची इच्छा असेल तर मी मरेन.

मला माहीत आहे की माझे अनेक मित्र दुःखी आहेत आणि मी हे उपोषण ताबडतोब थांबवावे अशी त्यांची इच्छा आहे. आज तसे करावे याकरिता कोणतेही कारण नाही. जेव्हा तसे कारण निर्माण होईल तेव्हा मी उपोषणाचा आग्रह धरणार नाही. आपल्या मर्यादा ओळखणे आणि त्याबद्दल अभिमान न बाळगणे ही अहिंसेची मागणी असते. अहिंसा नम्रतेची मागणी करत असते. मी जे काही म्हणतो त्यात अहंकार नाही. त्यात केवळ प्रेम आहे."

लाऊडस्पिकरमधून गांधीजी वरील हिंदीत बोलले. असे बोलत असतानाही त्यांच्या आवाजातील अशक्तपणा स्पष्टपणे जाणवत होता. यानंतरचा लेखी संदेश पुढीलप्रमाणे होता -

मी आधी काय सांगितले होते ते परत सांगतो - उपोषणाच्या दडपणाखाली काहीही करण्यात येऊ नये. ज्या गोष्टी उपोषणाच्या दडपणाखाली केल्या जातात त्या उपोषण संपल्यानंतर परत फिरवल्या जातात याचा अनुभव मी आधीही घेतला आहे. जर असे काही घडले तर त्याचे फारच भयंकर

परिणाम होतील. असे काही व्हायला नको. आध्यात्मिक उपोषण अंतःकरणाच्या शुद्धीकरिता असते. प्रामाणिकपणे जर अंतःकरण शुद्ध करण्यात आले तर ज्या कारणाने ते शुद्ध करण्यात आले ते कारण संपल्यानंतरही ती शुद्धी नाहीशी होत नाही. एखादा जवळचा माणूस यायचा असला तर आपण जर घराला रंगरंगोटी केली तर तो माणूस येऊन परत गेल्यानंतरही ती रंगरंगोटी तशीच कायम राहत असते. भौतिक स्वच्छता केल्यानंतरही काही काळाने परत रंगरंगोटी करावी लागत असते. अंतःकरण स्वच्छ केले तर ते मात्र मरेपर्यंत तसेच राहते. याशिवाय उपोषणाकरिता दुसरे कोणतेही समर्थनीय कारण असू शकत नाही.

राजे, महाराजे, सामान्य लोक यांच्याकडून येणाऱ्या तारांची संख्या सारखी वाढते आहे. पाकिस्तानमधूनही तारा येत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. परंतु जे लोक पाकिस्तानमध्ये राहतात आणि जे पाकिस्तानचे भविष्य घडवणार आहेत त्यांना एक मित्र आणि शुभचिंतक म्हणून मी सांगितलेच पाहिजे की जोपर्यंत तुमची सद्सद्विवेकबुद्धी जागृत होत नाही व तुम्ही जे अपराध केले त्याची कबुली देत नाही तोपर्यंत तुम्ही नेहमीकरिता पाकिस्तान टिकवून ठेवू शकणार नाही. याचा अर्थ असा नाही की हे दोन देश स्वतःहोऊन एक झाले तर ते मला नको आहे. परंतु शस्त्रबळाने पाकिस्तानला परत विलीन करून टाकावे या कल्पनेला माझा विरोध आहे आणि लोकांच्या मनातून मी ती काढून टाकू इच्छितो. मी आशा करतो की मृत्यूशैय्येवर पडून मी हे जे शब्द बोलतो आहे त्यामुळे कोणाचाही गैरसमज होणार नाही आणि ते कोणाला खुपणार पण नाहीत.

मी जर दुबळेपणाने वा लोकांचे अंतःकरण दुखवण्याच्या भीतीने माझ्या मनात खरोखर काय सुरू आहे हे सांगू शकलो नाही तर मी माझी आणि पाकिस्तानच्या लोकांचीही प्रतारणा करीन ही गोष्ट सर्व पाकिस्तानी समजून घेतील अशी मी आशा करतो. माझ्या हिशेबात काही चूक होत असेल तर तुम्ही ती मला दाखवली पाहिजे आणि मला जर ती चूक आहे अशी खात्री पटली तर मी इथे जे म्हणालो ते मागे घेईन. माझ्या माहितीप्रमाणे अजून तरी या मुद्द्याबद्दलचा प्रश्न उपस्थित झालेला नाही.

माझे उपोषण कोणत्याही अर्थाने राजकीय आहे असे समजण्यात येऊ नये. आतील आवाजाच्या हाकेप्रमाणे कर्तव्य म्हणून हे उपोषण करण्यात आले आहे. अतिशय यातना सहन केल्यानंतर मी उपोषण करण्याचा निर्णय घेतला. दिल्लीचे मुसलमान बांधव याचे साक्षी आहेत. दैनंदिन हालचालीचा अहवाल देण्याकरिता त्यांचे प्रतिनिधी मला दररोज भेटत असतात. या पवित्र प्रसंगी राजे, महाराजे, हिंदू,

शीख आणि इतर लोक माझी फसवणूक करून माझे उपोषण सोडवण्याकरिता प्रयत्न करतील तर ना तर ते स्वतःचे हित करू शकतील ना भारताचे. त्यांना सांगा की आत्म्याकरिता उपोषण करताना मला जितके प्रसन्न वाटते तितके प्रसन्न मला कधीही वाटत नव्हते. या उपोषणामुळे नेहमीपेक्षा अधिक प्रसन्नता जाणवत असल्यामुळे त्यात कोणीही विघ्न आणण्याची आवश्यकता नाही. तुम्ही विचारपूर्वक सैतानाकडे पाठ फिरवली आहे आणि ईश्वराकडे जाऊ लागला आहा असे जर तुम्ही निश्चितपणे मला सांगू शकाल तर मात्र तुम्ही मला हा उपवास सोडायला लावू शकता.

प्रार्थना संपल्यानंतर भगिनी तर बापूजींचे दर्शन घेऊन शांतपणे जात होत्या. परंतु पुरुषांनी गोंधळ करायला सुरुवात केली. वरचेवर माणसे पडत होती. आज तर तुफान गर्दी होती. सर्वांनी स्वयंसेवकांचे काम केले. बहिणी हाताची साखळी करून उभ्या राहिल्या.

शांतता झाल्यानंतर बापूजी आतल्या खोलीतून ओसरीत आले. बापूजींना लघ्वी होत नसल्यामुळे सुशीलाबहेननी 'कपिंग' करायची सूचना केली. बापूजींना हे पटले नाही. ते म्हणाले, "तुझे प्रेम मी समजू शकतो. जे होणार असेल ते होईल. मला पडून राहू दे." सुशीलाबहेन म्हणाल्या, "पण हा तर एक प्रकारचा शेकच आहे."

बापूजी - "असे करता करता माणूस घसरत जात असतो. मला तर माती, आंघोळ हेच जास्त वाटत असतात. माझी तर हेसुद्धा सोडण्याची इच्छा आहे."

प्रार्थना संपल्याबरोबर सायंकाळी दिल्लीवासीयांची जवळपास एक मैल लांब मिरवणूक शांततेच्या घोषणा करत आली. ते 'हिंदू-मुसलमान भाई भाई', 'गांधीजी जिंदाबाद' अशा घोषणा करत होते. ते पाहायला आम्ही बाहेर निघालो. त्यात दोन पक्ष झालेले होते. एक भाईभाई म्हणत होते तर दुसऱ्यांचे मारोकाटो सुरू होते. भांडण झाले, आम्ही ओसरीत उभे राहिलो. पंडितजींनी त्यांच्यासमोर लाक्षणिक शैलीत अतिशय सुंदर भावपूर्ण भाषण केले.

सात वाजता लॉर्ड माऊंटबॅटन आणि लेडी माऊंटबॅटन आले. बापूजींना चांगलाच त्रास असूनही त्यांना पाहताच बापूजींनी त्यांना हात जोडून नमस्कार केला आणि अगदी मंद आवाजात म्हणाले, "माझ्याकडे येण्याकरिता तुम्हाला उपवासाची गरज होती !"

त्यांच्या आणि बापूजींच्या गप्पा रंगात आल्या. परंतु बापूजींनी उपवास सोडण्यासाठी ज्या सात अटी सांगितल्या होत्या त्या जर मान्य असतील तरच त्यांची उपवास सोडण्याची इच्छा होती.

आज तर अस्वस्थता वाढतच चालली होती. भजन म्हणायला सांगितले. 'श्रीरामचंद्र कृपालू भजमन' हे भजन आणि गीतेचा १२ वा अध्याय ऐकण्याची इच्छा त्यांनी व्यक्त केली. यामुळे तो अध्यायसुद्धा म्हणालो. नंतर जयरामदासजींशी दोन मिनिट बोलले.

नऊ वाजता अंथरुणावर पडले. तेल चोळले. आज तर राजेंद्रबाबू खूप मेहनत घेऊन लोकांची समजूत घालत आहेत. बापूजींना आम्हांला सूचना दिली होती की राजंद्रबाबू केव्हाही जरी आले तरी मला उठवायचे. प्यारेलालजी आले तेव्हा बापूजी भर झोपेत होते. ते म्हणाले, "सर्वांनी सात अटींवर सही करायचे कबूल केले आहे, आणि जर काही झाले तर आम्ही जीव देऊ." परंतु बापूजींनी अजून धीर धरायला सांगितले आणि ते झोपून गेले. आजच्या वातावरणावरून बापूजींचा उपवास फार दिवस लांबणार नाही असे वाटते. कदाचित उद्या सकाळी उपवास सुटेल. परंतु आता तर घटकाभर वेळसुद्धा असह्य होतो आहे. रात्री झोपेतही अस्वस्थ होते. म्हणाले, "चला आता अंथरुणात." रात्री थुंकीसुद्धा वारंवार येत होती.

पू. बापूजींची स्थिती आणि हालचाल -

३.३० जागे झाले. दातण केले आणि लघ्वी केली. प्रार्थनेनंतर सुशीलाबहेनकडून लिहवून घेतले. आश्रमातील पत्रे वाचली. ४.३० वाजता साधे गरम पाणी आठ अंस. ५.२४ झोपले. ६.५५ जागे झाले. पडल्या पडल्या मृदुलाबहेनशी गोष्टी केव्या. ७.२० उठले. नाक साफ केले. ७.२५ साधे गरम पाणी आठ अंस. मग बिसेनभाईंकडून श्रुतलेखन करवून घेऊ लागले. ७.४५ नंतर झोपले. ८.३५ जागे झाले. घनश्यामदासजी, ब्रिजमोहनजी बिरलांबरोबर गोष्टी. ८.५५राजकुमारीबहेन. ९ वाजता आठ अंस साधे गरम पाणी. नंतर मालीशकरिता उठले. ९.१५ डॉक्टर बिधानबाबू, डॉक्टर जीवराजकाका, डॉ. कर्नल ढड्ढा आणि सुशीलाबहेनने तपासले. रक्तदाब १८४/१०४. १०.३५ मालीशनंतर बाहेर आले. न्हाणीघरात. ११.०५ आंघोळ आटोपून बाहेर. वजन १०७ पौंड. ११.०७ साधे गरम पाणी आठ अंस. ११.२६ नबाब सह्यमिन, नबाब सिदाकत अलीखान. ११.३८ सर पद्मसिंहजी. ११.४५ माती. तूप चोळायला लावले. १२.५० माती काढली. भावलपूरच्या भगिनी, राम मनोहर लोहिया, वासुदेव खन्ना एक हजार सह्या घेऊन

आले. १.४५ साधे गरम पाणी आठ अंस. २.२८ लघ्वी केली. २.४५ रक्त घेतले. २.५० मौलानासाहेब, बारडोलाई, वीरांदेवी. ३ वाजता गरम पाणी आठ अंस, सायट्रिकच्या पुडीसह. ३.०५ जवाहरलालजी आले. ३.३० लघ्वीकरिता उठले. ४.४० आत येऊन झोपले. ४.५० साधे गरम पाणी आठ अंस. ५ पडल्या पडल्या बोलले. आवाजात अशक्तपणा होता. ५.५० आठ अंस साधे गरम पाणी. निंबाचे चारपाच थेंब. त्यानंतर राजेंद्रबाबूजी, शंकरराव, सत्यनारायण सिन्हा. लघ्वी केली. निंबाच्या थेंबांसह आठ अंस गरम पाणी. त्यापूर्वी ऑर्थर मूर, किडवाई, त्यांची वहिनी, मुली वगैरे आले.६.५५ रंधवा. ६.५० जवाहरलालजी. ७.०५ लॉर्ड आणि लेडी माऊंटबॅटन. ८.३५ भजन गायला लावले आणि गीतेचा बारावा अध्याय. ९ वाजता अंथरुणावर पडले, तेल चोळायला लावले. अस्वस्थता वाठत चालली आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१८-१-'४८

उपवासाचा सहावा दिवस

साडेतीन वाजता रोजप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजी अंथरुणापासून खोलीपर्यंत चालतच गेले. आत येऊन गरम पाणी घेतले आणि लिहवून घ्यायला सुरुवात केली. मधूनमधून बापूजी थकत होते. तेव्हा डोळे मिटून पडून राहत. शीर्षक होते, 'क्रोध नाही, मोह नाही.' (पाहा हरिजनसेवक आणि हरिजनबंधु २५-१-'४८) ५.४५ वाजता पुढीलप्रमाणे लिहायला लावले.

बापूजींनी उपवास सोडण्याकरिता अटी ठेवल्या होत्या -

(१) महरौलीत ख्वाजा कुतुबुद्दिन बख्तियारची जी मजार आहे ती मुसलमानांकरिता पूर्ण सुरक्षित असली पाहिजे. दरबारची सेवा करणाऱ्यांचा जीवाला कोणताही धोका नसला पाहिजे. सात आठ दिवसात तिथे मुसलमानांचा उर्सचा मेळा भरणार आहे. त्यात येणारांना पूर्ण मोकळीक असली पाहिले. आमच्याकडून मुसलमानांना कोणताही धोका नसेल असे महरौलीचे हिंदू आणि शीख खात्रीपूर्वक आश्वासन देतात.

(२) दिल्ली शहरात अशा ११७ मशिदी आहेत की ज्यांचा सध्याच्या उपद्रवात हिंदूंनी आणि शिखांनी ताबा घेतला आहे वा ज्यांचे मंदिरात रूपांतर केले आहे. त्या लोकांनी स्वतःहोऊन त्या मशिदी रिकाम्या केल्या पाहिजे, आणि मुसलमानांना त्यात इबादत करता आली पाहिजे. ज्या ज्या भागात या मशिदी आहेत त्या दंग्याच्या आधी ज्या स्वरूपात होत्या त्याच स्वरूपात राहतील असा विश्वास हिंदूंनी आणि शिखांनी मुसलमानांना दिला पाहिजे.

(३) करौलबाग, सब्जीमंडी आणि पहाडगंजमध्ये मुसलमानांना मुक्तपणे हिंडताफिरता आले पाहिजे, आणि त्यांच्या जीवाला कोणताही धोका नसला पाहिजे.

(४) दिल्लीतील मुसलमान त्रस्त होऊन पाकिस्तानमध्ये निघून गेले आहेत. त्यांना जर परतण्याची आणि इथे येऊन वास्तव्य करण्याची इच्छा असेल तर हिंदू आणि शिखांनी त्यांच्या मार्गात अडथळा आणू नये.

(५) आगगाडीतून मुसलमानांना पूर्ण संरक्षिततेने प्रवास करताना करता आला पाहिजे.

(६) मुसलमान दुकानदारांचा आर्थिक बहिष्कार करण्यात येऊ नये.

(७) शहरातील ज्या भागात मुसलमान राहत होते त्या भागात मुसलमानेतरांना राहू देण्याचा प्रश्न मुसलमानांवर सोडून देण्यात यावा.

या सात अटी मौलाना साहेबांनी तीनेक लाखांच्या विराट जनसमूहासमोर जाहीर केल्या. आणि राजेंद्रबापूजी या सभेचे प्रमुख होते. या सभेचा फार चांगला परिणाम झालो आहेत. सकाळपासूनच याचे शुभशकून दिसून पडत आहेत. असे वाटते की दुपारपर्यंत कदाचित उपवास सुटेल. साडेआठ वाजता बापूजी मसाजसाठी गेले. तिथे डॉ. बिधानबाबू, डॉ. जीवराजजी काका, डॉ.कर्नल ढढ्ढा आणि सुशीलाबहेनने त्यांना तपासले. बापूजी आज पोटात दुखत असल्याची तक्रार करत होते. तसेच त्यांना डोके जड वाटत होते. बिधानबाबूंनी रस घेण्यासंबंधीचा आपला युक्तिवाद परत सुरू केला. तर बापूजींनी संत्र्याचा रस घेतला तर शांतता स्थापित होवो वा न होवो एकवीस दिवस उपवास करण्याबद्दल सांगितले. ही कडक अट मान्य करायला कोणीही तयार झाला नाही. आजचा दिवस पाहिल्यानंतर असे कोण कबूल करील?

हे सर्व तर ठीक आहे, पण जीनासाहेब या विषयावर एक शब्दही बोलले नाही ही आश्चर्याची गोष्ट आहे.

सुशीलाबहेन आज मालीशमध्ये नव्हत्या. राजेंद्रबाबूजींनी बोलावलेल्या सभेत त्या गेल्या होत्या. त्यांनी स्पष्टपणे सांगितले की आज जर गांधीजींचा उपवास सुटला नाही तर परिस्थिती गंभीर आहे. आंघोळीच्या वेळी बापूजी खूपच अस्वस्थ होते. एक तास ते न्हाणीघरात होते. वजन १०७ पौंड होते. वजन अगदीच कमी होत नसल्यामुळे सर्व काळजीत पडले आहेत. आज वजन घेत असताना पंडितजी येऊन पोहोचले. पंडितजींनीच वजन केले. ते तर वजन पाहून इतके काही दुःखी आणि नाराज झाले आहेत की जितकी मी स्वतःही दुःखी झाले नव्हते.

आज तर येणारेजाणारे सारखे सुरूच आहेत. त्याला काही सीमाच नाही. न्हाणीघरसुद्धा रिकामे सापडत नव्हते. मी तर वरच्या न्हाणीत आंघोळ करायला निघून गेले. खाली आले तर बापूजींच्या खोलीत १०० हून अधिक माणसे होती. जवाहरलालजी, राजेंद्रबाबूजी, हिंदू, शीख, मुसलमान, रंधवा,

छायाचित्रकार हे सर्व त्या खोलीत भरलेले होते आणि वातावरण इतके काही उत्साहाने भरलेले होते की सांगता सोयच नाही. मला तर उभे राहायलासुद्धा जागा मिळत नव्हती. परंतु लिहायचे राहून गेले असते म्हणून मी हळूहळू सरकत जाऊन बापूजींच्या बाजूला जाऊन बसून गेले.

प्रमुख लोकांमध्ये जवाहरलालजी, शंकरराव, पकवासा वगैरे मंत्रीमंडळातील लोक तसेच हिंदूमहासभा आणि रा, स्व. संघाचे लाला हरिचंद, अनेक हिंदू, मुसलमानबंधू, पाकिस्तानचे उच्चायुक्त जनाब झहीद हुसेन हेसुद्धा होते.

सभेची कार्यवाही सुरू करत राजेंद्रबाबू म्हणाले -

"काल रात्री सर्व लोक जेव्हा माझ्या घरी गोळा झाले आणि संपूर्ण चर्चेनंतर तेव्हाच आणि तिथेच प्रतिज्ञापत्रावर सही करावी असे सर्वांनी ठरवले. परंतु काही संस्थांचे प्रतिनिधी तिथे हजर नसल्यामुळे सह्या केलेले प्रतिज्ञापत्र घेऊन आताच तुमच्याकडे येऊ नये इतकेच नाही तर सर्व सह्या होईपर्यंत तुमच्याकडे येऊ नये असे आम्ही ठरवले. याप्रमाणे आज सकाळी परत आमची सभा झाली व मागील रात्री जे लोक सभेत हजर नव्हते तेही तिथे आले आणि त्यांनी प्रतिज्ञापत्रावर सह्या केल्या." डॉ. राजेंद्र प्रसाद पुढे म्हणाले की "ज्या लोकांच्या मनात काल थोडी शंका होती तेसुद्धा म्हणू लागले आहेत की गांधीजींनी उपवास सोडण्याकरिता आपण आता संपूर्ण आत्मविश्वासाने सांगू शकतो. त्या लोकांनी एकत्रित आणि वेगवेगळी जी ग्वाही दिली आहे ती लक्षात घेऊन मी काँग्रेसचा सभापती म्हणून या दस्तावेजावर सही केली आहे. ते पुढे म्हणाले की यानंतर तिथे हजर असलेले दिल्लीचे मुख्यायुक्त खुर्शिद आणि दिल्लीचे उपायुक्त रंधवा यांनी या दस्तावेजावर प्रशासनातर्फे सह्या केल्या. या शपथपूर्तीकरिता काही समित्यांची स्थापना करण्यात यावी असे ठरवण्यात आले आहे. मला आशा आहे की तुम्ही तुमचे उपोषण सोडाल."

त्यानंतर लाला देशबंधू म्हणाले -

"सकाळी मुसलमानभाईंची मिरवणूक हिंदू वस्तीतून जात होती. त्या वेळी मिरवणुकीतील लोकांना हिंदू अतिशय प्रेमाने फळे आणि नाश्ता देत होते. यावरून असे वाटते की लोकांचे हृदयपरिवर्तन झाले आहे. आणि तुम्ही हिंदुस्थानातील चाळीस कोटी लोकांचे नाथ आहा. यामुळे तुम्ही उपवास सोडावा ही प्रार्थना."

अशा प्रकारे वेगवेगळे प्रतिनिधी बोलल्यानंतर बापूजी अतिशय क्षीण आवाजात बोलत होते. प्यारेलालजी ते लिहून घेत आणि मग ते लोकांना मोठ्या आवाजात वाचून दाखवत. परंतु बापूंचा आवाज मोठ्या मुश्किलीने पकडता येऊ शकत होता. मी तर बापूजींच्या तोंडाजवळ कान ठेवूनच लिहीत होते. यामुळे नीट लिहून घेऊ शकत असे आणि ते प्यारेलालजींना देत असे. मग ते ते सर्वांना सांगत होते. हे सर्व साडेअकरा वाजता सुरू झाले.

बापूजी म्हणाले -

"हे सर्व मला चांगले तर वाटते. परंतु हे सर्व जर तुमच्या अंतःकरणात नसेल तर हे सर्व व्यर्थ समजा. या घोषणेचा जर अर्थ असा असेल की तुम्ही दिल्लीचे तर रक्षण कराल पण दिल्लीबाहेर जे काही घडते त्याचा आमच्याशी काहीही संबंध नाही असे म्हणाल तर तुम्ही फार मोठी चूक कराल. असे असेल तर मी माझा उपवास सोडणे ही घोडचूक होईल. अलाहाबादमध्ये काय झाले ते तुम्ही वृत्तपत्रांत वाचलेच असेल. जर वाचले नसेल तर ते वाचा. या घोषणेवर सही करणारांमध्ये राष्ट्रीय स्वयंसेवक संघ आणि हिंदूमहासभावालेसुद्धा आहेत असे मी समजतो. ते जर इथल्या त[डजोडीत सामील असतील व इतर ठिकाणच्या नाही तर तीही फसवणूक होईल. भारतात आज अशी फसवणूक मोठ्या प्रमाणात चालते हे मला माहीत आहे.

"दिल्ली भारताचे हृदय आहे, पायतख्त आहे. संपूर्ण भारतातील पुढारी इथे गोळा झालेले आहेत. माणूस पशू झाला आहे. परंतु इथे जे आहेत ते दुधातील सायीसारखे आहेत. ते जर इतकेही समजावून सांगू शकत नसतील की हिंदू, मुसलमान आणि इतर धर्माचे सर्व लोक भाऊभाऊ आहेत तर ही गोष्ट दोन्ही उपनिवेशांच्या भविष्याकरिता वाईट असेल. आपण जर आपसात भांडत राहिलो तर भारताचे काय होईल?"

इतके बोलताबोलता गांधीजी अतिशय थकले आणि या मानवी दुःखाच्या वेदनांनी त्यांचा आवाज कापू लागला, हृदय रडू लागले. प्यारेलालजीसुद्धा बोलू शकले नाही, यामुळे सुशीलाबहेनने बाजू सांभाळली. दोन मिनिटानंतर परत बोलायला सुरुवात करत बापूजी म्हणाले –

"माझा जीव घाबरला होता. मी अतिशय थकलो आहे. यामुळे मी माझे बोलणे पूर्ण करू शकलो नाही. आपण असे कोणतेही पाऊल उचलायला नको की ज्याबद्दल नंतर पश्चात्ताप करावा लागेल. आम्ही सर्वोच्च प्रतीचे शौर्य दाखवले पाहिजे. हे आपण कसे करू शकतो, करू शकतो की नाही हे पाहायचे आहे. आपण जर हे करू शकणार नसू तर मला उपवास सोडायला सांगू नका. तुम्हांला आणि संपूर्ण भारताला हे करायचे आहे. याचा अर्थ असा नाही की आजच्या आज हे होईल. माझ्यात ती शक्ती नाही. इतकेच सांगतो की आपले तोंड आतापर्यंत जे सैतानाकडे होते ते आता ईश्वराकडे वळलेले राहील. मी जे काही तुम्हांला सांगितले त्याचा प्रतिध्वनी जर तुमच्या अंतःकरणातून उठत नसेल वा हे तुमच्या शक्तीपलीकडील आहे अशी तुमची खात्री पटली असेल तर तसे मला तुम्ही स्पष्टपणे सांगायला पाहिजे.

"हिंदुस्थान केवळ हिंदूंकरिता आहे आणि पाकिस्तान केवळ मुसलमानांकरिता आहे असे समजणे याहून मोठा मूर्खपणा कोणता असू शकतो? येथील उदाहरणाने पाकिस्तानमध्येही सर्व काही ठीक होईल हे येथील निर्वासितांनी लक्षात ठेवावे.

"उपोषणांची भीती वाटणारांपैकी मी नाही. वेळोवेळी मी उपवास केला आहे आणि गरज पडली तर परतही करीन. यामुळे तुम्ही जे काही करणार असाल ते काळजीपूर्वक आणि पूर्ण विचारांती करा.

"मला मुसलमान भाईसुद्धा भेटत असतात आणि दिल्लीत मैत्रीपूर्ण वातावरण निर्माण झाले आहे व दिल्लीत हिंदू-मुसलमान एकोप्याने राहू शकण्यासारखे वातावरण निर्माण झाले आहे असे मला आश्वस्त करत सांगत असतात. या मित्रांच्या अंतःकरणात काही गैरसमज असतील व इतरत्र कुठेही जायला जागा नसल्यामुळे आज आपल्याला इथे राहणे भाग पडत आहे व अखेरीस आपल्याला देश सोडावा लागेल असे जर त्यांना वाटत असेल तर ते त्यांनी तसे मला स्पष्टपणे सांगितले पाहिजे. भारत आणि पाकिस्तानमध्ये सर्व काही ठीकठाक करणे ही काही सोपी गोष्ट नाही हे मला माहीत आहे. परंतु मी आशावादी आहे. एकदा मी काही करायचे ठरवले तर मी पराभव मान्य करायला तयार नसतो. हिंदू आणि मुसलमान एक झाले आहेत असे आश्वासन तुम्ही मला आज देताहात, परंतु मुसलमानांना हिंदू जर यवन आणि असुर समजत

असतील व त्यांना ईश्वरप्राप्ती अशक्य आहे असे हिंदूंना वाटत असेल आणि मुलमनांनाही तसेच वाटत असेल तर याहून वाईट पाखंडीपणा कोणताही असू शकत नाही.

"पटण्यात मुसलमान बंधूंनी अतिशय प्रेमाने मला एक पुस्तक भेट दिले होते. त्याचे लेखक एक प्रख्यात मुसलमान आहेत. ते पुस्तक म्हणते "ईश्वर म्हणतो की काफीर, आणि हिंदू काफीर आहेत - विषारी प्राण्यापेक्षाही भयानक असतात, त्याचा समूळ नाश केला पाहिजे. त्याची फसवणूक करणे आपले कर्तव्य असते. त्याच्याशी सौजन्याने वागायचे कारण काय?" मुसलमानांच्या अंतःकरणात अजूनही असे विचार असतील तर मग हिंदूंबरोबर आम्ही चांगले राहू असे म्हणणे धोकेबाजी होईल. तुम्ही जर एकाची फसवणूक कराल तर तुम्ही सर्वांची फसवणूक कराल.

"मी जर खरोखर दगडाच्या मूर्तीची पूजा करत असेन तर तसे करताना मी कोणाचीही फसवणूक करत नाही. माझ्याकरिता ईश्वर त्या दगडाच्या मूर्तीत राहतो. हिंदू आणि मुसलमानांची अंतःकरणे जर खोटेपणाने आणि फसवणुकीने पूर्णपणे भरलेली असतील तर मी जिवंत राहण्याचे कारण काय?

"आज मला मिळालेल्या तारांमध्ये काही प्रख्यात मुसलमानांच्या तारांचा समावेश आहे. त्यांमुळे मला आनंद झाला. आतापर्यंत त्यांनी अवलंबिलेली पद्धत ही शासन चालवण्याकरिता योग्य नाही असे त्यांच्या लक्षात आले आहे असे वाटते.

"मी हे जे काही बोललो ते सर्व ऐकल्यानंतरही तुम्ही मला उपवास सोडण्याकरिता सांगत असाल तर मी उपवास सोडेन. यानंतर तुम्ही मला मोकळे सोडले पाहिजे. आजपर्यंत तर मी दिल्लीतच करायची वा मरायची गोष्ट होती. इथे जर काम झाले असेल तर मी पाकिस्तानमध्ये निघून जाईन व तेथील मुसलमानांना त्यांची चूक समजावून सांगेन. इतरत्र काहीही झाले तरी दिल्लीतील लोकांनी शांत राहिले पाहिजे. पाकिस्तानमधून परतलेल्या मुसलमानांचे आपण भावाप्रमाणे स्वागत करायचे आहे हे इथे असलेल्या निर्वासितांना कळले पाहिजे. पाकिस्तानमधील मुसलमानेतरांना तिथे अपार कष्ट सहन करावे लागत आहेत आणि हीच गोष्ट येथील मुसलमानांसंबंधी आहे. मुसलमान कारागिरांचे सर्व हस्तोद्योग हिंदू शिकले

नाहीत. यामुळे त्यांनी भारतात येणे चांगले आहे. सर्व जमातींमध्ये चांगली तसेच वाईट माणसेही असतात. या सर्व गोष्टी समजून उमजून तुम्ही मला उपवास सोडायला सांगत असाल तर मी तुमच्या इच्छेचे पालन करीन. भारतात जर सध्याची परिस्थितीच कायम राहिली तर हा तर एखादा खेळच होऊन जाईल. असे होणार असेल तर तुम्ही मला माझे उपोषण सुरू ठेऊ द्यावे आणि ईश्वराची इच्छा असेल तर तो मला घेऊन जाईल."

बापूजींनंतर मौलानासाहेब बोलले -

"महात्माजींनी जे विचारले आहे त्याचा सांप्रदायिक शांततेशी काहीही संबंध नाही. ती दिल्ली शहरातील प्रतिनिधीच देऊ शकतात. पुस्तकाबद्दल मी म्हणेन की ते इस्लामच्या नावावर कलंक आहे. इस्लामला बदनाम करणारे ते पुस्तक आहे. इस्लामच्या पैगंबर साहेबांनी कुरान शरीफमधील एका सुंदर आयतीत लिहिले आहे की सर्व इस्लाम भाऊभाऊ आहेत. मग तो कोणत्याही जातीचा वा धर्माचा का असे ना ! महात्माजींनी या मुसलमान मित्रांच्या ज्या विचाराची चर्चा केली आहे ते इस्लामच्या शिकवणुकीच्या अगदी विरुद्ध आहेत. काही काळापूर्वी लोकांना ज्या वेडाने झपाटले होते केवळ त्या विचारांचे यातून दर्शन होते."

यानंतर स्थानिक मुसलमान भाई हिफझुर्रहमान (अहमद सईद आणि हिफझुर्रहमान हे दिल्लीतील मुसलमानांचे प्रतिनिधित्व करत होते.) बोलले.

"दोनच गोष्टी अशा आहेत की ज्यांच्या आधारे मी सांगू शकतो की माझे धर्मबांधव भारताला आपले घर समजत नाहीत असे समजणे अगदी चूक आहे. आम्ही इथे पाच जण येत असतो. तीस वर्षांपासून आम्ही काँग्रेसच्या झेंड्याखाली काम करत आहोत. आम्हांला जेव्हा हिंदुस्थानशी प्रामाणिक असल्याचे परत सिद्ध करण्याकरिता सांगितले जाते तेव्हा ही गोष्ट आम्हांला आमच्या राष्ट्रीयत्वाची अपमान करणारी वाटते. मला आठवते की इतक्यातच झालेल्या दंग्यांच्या एका प्रसंगी आमच्या काँग्रेसी मित्रांनी आणि सहकाऱ्यांना दिल्लीबाहेर आम्हांला एक सुरक्षित जागा देऊ केली होती कारण आम्हांला दंगेखोरांपासून सुरक्षित ठेवता येईल अशी त्यांना खात्री वाटत नव्हती. परंतु आम्ही तो प्रस्ताव फेटाळला आणि अल्लावर विश्वास ठेवून शहरातच राहणे आणि फिरणे पसंत केले. जोपर्यंत जमियत उलेमाचा संबंध आहे मी खात्रीपूर्वक सांगू शकतो की या संस्थेचे सदस्य मौलाना आझाद आणि गांधीजी यांचे पक्के

अनुयायी आहेत. ते जे पाकिस्तानमध्ये निघून गेले आहेत ते केवळ आपला जीव वाचवण्याकरिता आणि इतर खूपच वाईट गोष्टींपासून आपला बचाव करण्याकरिता गेले आहेत. आम्हा सर्वांना भारताचे नागरिक म्हणून आत्मसन्मानाने आणि प्रतिष्ठेने भारतात राहायचे आहे, इतरांच्या दयेवर आणि कृपेवर अवलंबून नाही. मी खात्रीपूर्वक सांगतो की भारतावर जर हल्ला झाला तर आम्ही सर्व आमच्या देशाचे आमच्या अखेरच्या माणसापर्यंत रक्षण करू. वारंवार स्पष्ट शब्दांत आम्ही म्हणालो आहो की ज्यांची असे करण्याची तयारी नाही त्यांनी भारत सोडून पाकिस्तानमध्ये निघून जावे. आज जो परिस्थितीत बदल झाला आहे तो फार मोठा शुभ शकून आहे असे आम्ही समजतो. प्रवाहाची दिशा बदलली आणि तो सांप्रदायिकतेकडून मिळूनमिसळून वागण्याकडे आणि शांततेकडे वळला आहे याचा आम्हांला आनंद होतो. आधी मात्र परस्परांमधील कटुत्व आणि घृणा यांच्यामुळे दंगे होत होते. आता ज्याअर्थी जनप्रतिनिधींनी दिलेल्या आश्वासनांवर सरकारी सह्या झालेल्या आहेत त्याअर्थी त्यांची अंमलबजावणी होईल याचे आम्हांला समाधान वाटते. आणि आता आमच्या पू. महात्माजींनी आपले उपोषण सोडावे अशी मी विनंती करतो."

यानंतर गौस्वामी गणेश दत्तजी असे म्हणाले -

"श्री महाराजांनी इतकी तपश्चर्या केली आहे की त्यामुळे फार परिवर्तन झाले आहे. रात्री ७५% परिवर्तन होते ते आता सकाळी ९०% झाले आहे. तर आम्ही तुमच्या आज्ञेचे पूर्ण पालन करू."

रा. स्व. संघाचे श्री हरिश्चंद्रजी -

"आम्ही सर्व तुमच्यासमोर शपथ घेतो की आम्ही तुमच्या आज्ञेचे पूर्णपणे पालन करू. तुमच्या उपवासामुळे लोक घरोघरी रडत आहेत. पूर्ण शांतता राहील आणि आम्ही ना तर घरांची मागणी करू ना नोकरीची ईश्वर ठेवील तसे राहू अशी शपथ आम्ही घेतो."

पाकिस्तानचे उच्चायुक्त झहीद हुसेनसाहेब –

मी हजर झालो आहे कारण की पाकिस्तानचे लोक तुमच्याकरिता फार चिंतित आहेत. तुमची प्रकृती कशी आहे याची सर्व चौकशी करत असतात. यासंबंधात जी काही मदत करता येत असेल ती करण्याकरिता आम्ही तयार आहो.

शिखांचे प्रतिनिधी दिल्लीनिवासी सरदार हरबंससिंग असे म्हणाले -

आज गुरू गोविंदसिंह यांचा जन्मदिवस आहे. मी गुरुद्वारातून येतो आहे. तिथे तुमच्यासाठी प्रार्थना करण्यात आली आहे. तिथे सर्वांना तुमचा संदेश सांगितला. मला असा एकही शीख आढळला नाही की ज्याला मुसलमानाला मारण्याची इच्छा आहे. उलट आम्हांला गांधीजींचे प्राण वाचवायचे आहेत असेच सर्व म्हणत आहेत. तुम्ही व्रत सोडा. इथे जे शीख आहेत ते सर्व तुमच्या आज्ञेचे पालन करतील.

सहाय्यक उच्चायुक्त रंधवा -

"टाऊन हॉलमध्ये सभा झाली होती. मी प्रार्थना केली होती की शक्य तितक्या लवकर आम्ही महात्माजींना वाचवण्याचा प्रयत्न केला पाहिजे. तीन चार दिवसांपूर्वी दिल्लीची जी परिस्थिती होती ती आज नाही याचा मला आनंद होतो. तुमच्या ज्या सात अटी आहेत त्यांचे आम्ही आमच्याकडून (सरकारतर्फे) पूर्णपणे पालन करू. आम्ही सर्व प्रेमाने राहू."

राजेंद्रबाबूजी परत म्हणाले :

"मी जनतेतर्फे सही केलेली आहे. कृपा करून उपवास सोडा."

हे सर्व ऐकल्यानंतर बापूजी म्हणाले -

"मी उपवास सोडेन. ईश्वराची इच्छा असेल तसे होईल. तुम्ही सर्व साक्षीदार होत असाल तर व्हा."

आधी प्रार्थना करायला सांगितले. आणि वातावरणात एक आगळावेगळाच उत्साह टवटवीतपणा आला. आमच्या प्रार्थनेत सर्व सामील झाले.

आधी 'नम्यो हो रेगे' हा बौद्धमंत्र, नतर दोन मिनिट शांतता, मग उर्दू प्रार्थना 'अऊझबिल्लाह', झरतुष्ट्राची 'मझदा', मग 'इशावास्य' आणि नंतर 'वंडरस क्रॉस'. आणि शेवटी -

असतो मा सद्गमय, तमसो मा ज्योतिर्गमयमृत्योर्माऽमृतं गमय.

आणि

हे गोविंद, हे गोपाल, अब तो जीवन हारे.
नीर पीवन हेतू गयो, सिंधु के किनारे
सिधु जीव बसत ग्राह चरण धरी पछारे.
हे गोविंद राखो शरण.
चार प्रहर जुद्ध भयो, ले गयो मझधारे,
नाक, कान डुबन लगे, कृष्णको पुकारे.
द्वारकामे शब्द गयो, शोर भयो भारे,
शंख चक्र गदा पद्म गरुड ले सिधारे.
सूर कहे श्याम सुनो सरन है तिहारे.
अबकी बार पार करो, नंदके दुलारे.

हे भजन म्हणत असताना तर प्रत्येकाचा गळा अवरुद्ध झालेला होता आणि डोळ्यातून आनंदाश्रू येत होते. जणू काय भगवान कृष्णच सागराच्या मध्यभागी आलेल्या वादळाच्या वेळी हजर झाले आहेत ! शब्दांत या दृश्याचे वर्णन करता येणेच कठीण आहे. बापूजींचे डोळे मिटलेले होते. चेहऱ्यावर अनुपम तपःश्चर्येचे तेज होते. वाटेल तितका मोठा पापी जरी असला तरी त्याने जर या वेळी बापूजींचे दर्शन घेतले असते तर खरोखर त्याचे सर्व पाप धुतले गेले असते. हा प्रसंग इतका पवित्र होता. कलकत्त्याच्या उपवासाच्या वेळेपेक्षा या वेळेचे बापूजींचे वेगळेच दर्शन होत होते.

यानंतर रामधून आणि मग सर्वांत शेवटी बारा अंस ग्लुकोज घातलेला पाण्याचा पेला मौलाना साहेबांनी बापूजींच्या हाती दिला आणि छायाचित्रकार फटाफट आपल्या कॅमेऱ्याचे कळ दाबून फोटो घेऊ लागले. १२.१५ वाजता बापूजींचा उपवास सुटला. संपूर्ण बिरला भवन आनंदाने भरून गेला. जवाहरलालजींच्या चेहऱ्याचे वर्णन करता येणे अशक्य आहे. त्यांना आनंद होणे स्वाभाविक होते. प्रधानमंत्र्याच्या पदामुळे त्यांच्या चेहऱ्यावर जे तेज आले होते ते तर त्यांची जी कसोटी होत होती त्यात एका महिन्यातच उडून गेले होते ! असे वाटते की या सर्व प्रकरणाकरिता ते स्वतःलाच जबाबदार समजत होते. त्यांच्या चेहऱ्यावरील भावनांचा जणू काय विसरच पडू शकत नव्हता. यानंतर बापूजींनी सर्वांना केळी आणि आणि संत्र्यांचा प्रसाद वाटला. रस घेतल्यानंतर गुरुद्वारात गुरू गोविंदसिंहच्या जन्मोत्सवानिमित्त जी मोठी सभा होती तिच्याकरिता एक संदेश शिखांनी मागितला होता.

"शीख बांधवांनी आपल्या रागावर विजय मिळवून फार मोठे शौर्य दाखवले आहे. हे खरे शौर्य आहे. गुरू महाराजांची ही खरी शिकवण आहे. एक शीख सव्वा लाखांच्या बरोबरीचा असतो याचा अर्थ हाच आहे. शिखांचा जयजयकार असो."

शंभरेक बुरखाधारी महिला बापूजींना उपवास सोडायला लावण्याकरिता आल्या होत्या. परंतु बापूजींची खोली चिक्कार भरलेली असल्यामुळे त्या सर्व आत येऊ शकल्या नाही.

बापूजी खूप थकलेले होते. सर्वांना हात जोडून म्हणाले -

"माझ्यासमोर कोणीही पडदा ठेवू शकत नाही. मी तर तुमचा भाऊ आहे, वडील आहे, मग माझ्यासमोर हा पडदा का? पडदा हृदयाचा असला पाहिजे. मग त्या भगिनींनी लगेच बुरखा काढून टाकला.

"कोणताही हिंदू अथवा शीख तुम्हाला त्रास तर देत नाही ना? मला जर तुम्हा सर्व स्त्रियांचे आशीर्वाद असतील तर माझी प्रकृती पूर्ववत होईल. तुमच्या आशीर्वादाचे उत्तर ईश्वर देईल."

नंतर पंडितजीसुद्धा उपवास करत आहेत अशी बातमी इंदिराबहेनने सांगितली. बापूजींकरिता आतासुद्धा शांतता कुठे? खूप बोलले होते, ऐकले होते आणि दर्शनार्थींच्या गर्दीला पारावार नव्हता. बापूजी लगेच उभे राहिले. पडितजींना सुंदर पत्र लिहून पाठवले.

"चि. जवाहरलाल,

"उपोषण सोड. सोबत पश्चिम पंजाबच्या विधिमंडळाच्या अध्यक्षांचे पत्र जोडत आहे. मी जे बोललो होतो तेच नेमके झहीद हुसेन बोलले होते हे मी तुला सांगितले होते. तुला दीर्घायुष्य मिळो आणि भारताचा जवाहर होऊन राहा.

बापूचे आशीर्वाद"

सर्व गेल्यानंतर बापूजींना प्रणाम करण्याकरिता आम्ही गोळा झालो.

ऑर्थर मूरसुद्धा उपवास करत होते. बापूजींच्या प्रकृतीची चौकशी करण्याकरिता आले होते. त्यांनी आपला उपावास अडीच वाजता सोडला. बापूजी म्हणाले, "माझ्या शरीराला विशेषेकरून ग्लुकोजची गरज होती. ते मिळाले आहे. आता सर्व ठीक आहे."

वेव्हेल कॅन्टीनच्या निर्वासितांनी उपवास सुरू केला होता. बापूजींचे दर्शन घेऊनच जेवायचे असा त्यांनी निर्धार केलेला होता.

आज तर बापूजी खूप थकलेले आहेत. आमचाही वेळ विशेषेकरून येणाराजाणारांमध्येच गेला होता. प्रार्थनेत भरपूर वेळ गेला होता. वरून झिमझिम मेघवर्षाव होत होता. मानवी हृदयातील आनंद पाहून निसर्गसुद्धा बापूजींना सहानुभूतीपूर्वक मानवंदना देत होता. आज गोंगाटही जास्त होता. बापूजींचे प्रवचन जवळपास वीस मिनिट चालले. रोजप्रमाणे अंथरुणावरून माईक घेऊन बोलले आणि बाकीचे तर रोजप्रमाणे लिहवून घेतले होते.

> माझ्याकरिता हा दिवस शुभ दिवस आहे आणि तुमच्याकरिताही असला पाहिजे. गुरू गोविंदसिंगजींची जयंतीसुद्धा आजच आहे ही किती चांगली गोष्ट आहे. याच दिवशी तुम्हा लोकांच्या कृपेने मी उपवास सोडत आहे. जी दया तुम्हा लोकांकडून, दिल्लीच्या लोकांकडून, दिल्लीत जे निर्वासित आहेत त्यांच्याकडून, येथील शासनाच्या सर्व कर्मचाऱ्यांकडून मला मिळाली ती मी जन्मभर विसरू शकणार नाही. कलकत्त्यातही मला हाच अनुभव आला होता. कलकत्त्यात शहीद साहेबांनी जे महान काम केले होते ते या वेळी मी कसा विसरू शकतो? (पाहा, 'प्रार्थना प्रवचन', नोव्हेंबर १३, १९४७) ते तिथे नसते तर दीर्घ काळ मी टिकू शकलो नसतो. आपल्या मनात शहीद साहेबांबद्दल काही शंका होत्या व अजूनही आहेत. परंतु त्याचा इथे काही संबंध नाही. माणूस कितीही वाईट असला तरी आपण त्याला मित्राप्रमाणे वागवले पाहिजे आणि त्याच्याबरोबर काम करणे आपण शिकायला पाहिजे. कोणत्याही परिस्थितीत कोणाशीही आपण शत्रुत्व करू नये, मैत्रीच केली पाहिजे. शहीद साहेबही आहेत आणि चार कोटी मुसलमानही आहेत. सर्व हिंदू आणि शीख देवदूत नाहीत. त्याचप्रमाणे सर्व मुसलमानही देवदूत नाहीत. आपल्यामध्ये जशी चांगली माणसे आहेत तशीच त्यांच्यातही चांगली माणसे आहेत. वाईट माणसे मात्र कुठेही कमी असतात. आपल्या देशातसुद्धा ज्यांना गुन्हेगारी जमात म्हणतात त्या जमाती आहेत. आपल्यामध्ये आदिवासीसुद्धा आहेत. या सर्वांशी आपण मिळूनमिसळून राहिलो पाहिजे. मुसलमानांचा समाज फार मोठा आहे. ते केवळ याच देशात नाहीत तर जगभर पसरलेले आहेत. आपल्याला जर सर्व जगाशी मैत्री करायची असेल तर इथे असलेल्या मुसलमानांशी आपले शत्रुत्व असायचे काहीही कारण नाही. मी भविष्यवेत्ता नाही. तरीही

ईश्वराने मला विवेक दिला आहे, अंतःकरण दिले आहे. त्या दोघांचा मी शोध घेतो आणि तुम्हांला भविष्य सांगतो. कोणत्या ना कोणत्या कारणामुळे आपण मुसलमानांशी जर मैत्री करू शकलो नाही आणि इथल्याच नाही तर पाकिस्तानमधील आणि सर्व जगातील मुसलमानांशी मैत्री करू शकलो नाही तर भारत आपला राहणार नाही, इतरांचा होईल, गुलाम होईल ही गोष्ट लक्षात ठेवा. आणि जे स्वातंत्र्य आपल्याला मिळाले ते आपण गमावून बसू.

आज इतक्या लोकांनी मला आशीर्वाद दिला आहे. त्यांनी मला आश्वासन दिले आहे की यापुढे हिंदू, शीख, मुसलमान हे सर्व भावाभावासारखे राहतील आणि कितीही चिथावणी मिळाली तरी निर्वासितांसह दिल्लीत राहणारे लोक एकमेकांचे शत्रू होणार नाही. ही काही लहानसहान गोष्ट नाही. याचा अर्थ यापुढे भारत आणि पाकिस्तानमधील लोक मित्र होतील याकरिता आपण प्रयत्न केले पाहिजे. आपल्या दुबळेपणामुळे जरी भारताची फाळणी झालेली असली तरी आपण आपली अंतःकरणे एक केली पाहिजे. माझे उपोषण सोडण्याचा जर हा अर्थ नसेल तर तुम्ही मला उपवास सोडायला लावला हे योग्य केले नाही, किंबहुना काहीच काम केले नाही असे मी अतिशय नम्रपणे म्हणेन. उपोषणाचा जो आत्मा आहे त्याचे चांगल्या प्रकारे पालन झाले पाहिजे. जे दिल्लीत घडते ते संपूर्ण भारतात होईल. आणि आणि जे भारतात होते ते पाकिस्तानमध्ये होईल. अंतर कसे राहील? याबद्दल मला काहीही शंका नाही. तुम्ही घाबरू नका. कोणीही घाबरू नये. एखाद्या मुलानेही घाबरू नये. माझ्या मते आजपर्यंत आपण सैतानाकडे चाललो होतो. आजपासून आपण ईश्वराकडे जाण्याची सुरुवात करू आणि त्याच्याकडून कधीही तोंड फिरवणार नाही अशी मी आशा करतो. असे झाले तर संपूर्ण भारत आणि पाकिस्तान मिळून जगाची सेवा करू शकतील आणि जग अधिक उदात्त होईल. इतर कोणत्याही कारणाकरिता मला जगण्याची इच्छा नाही. मानवतेचा दर्जा वाढावा म्हणूनच माणूस जगत असतो. माणसाचे एकमेव कर्तव्य ईश्वराकडे जाणे आहे. आपण त्याला कोणत्याही नावाने बोलावू शकतो. ईश्वर, खुदा, सतश्री अकाल. परंतु तो जर आपल्या हृदयात स्थापित झालेला नसेल तर हा सर्व भ्रम आहे. असे असेल तर त्याला विसरून आपण एकमेकांचे शत्रू का झालो पाहिजे?

मला फार लांब भाषण करायचे नाही. आम्ही कधीही भांडणार नाही अशी आज हिंदूंनी शपथ घ्यावी. हिंदू ज्याप्रमाणे भग्वद्गीता वाचतात त्याचप्रमाणे त्यांनी कुराणही वाचावा. शिखांनीसुद्धा असेच करावे. मुसलमान बंधूभगिनींनीसुद्धा कुराणाप्रमाणेच आपल्या घरात ग्रंथसाहेब ठेवावा व त्याच्या अर्थाचे अनुसरण करण्याचा प्रयत्न करावा. ज्याप्रमाणे आपण आपल्या धर्माचा आदर करतो त्याचप्रमाणे आपण इतरांच्या धर्माचा आदर करावा. चांगली गोष्ट कोणत्याही भाषेत लिहिलेली असली तरी ती चांगलीच असते. गीता वा कुराणसाहेब हे धर्मग्रंथ माझ्याकरिता जसे आहेत तसेच कुराणही आहे. तुम्ही विश्वास ठेवा अथवा ठेवू नका परंतु माझ्या जीवनाचे तत्त्व हेच आहे आणि त्याचेच मी अनुसरण करत आलो आहे. मी तुम्हांला स्पष्टपणे सांगतो की मी दगडाची पूजा करत नसतो, परंतु मी सनातनी हिंदू आहे. जे दगडाची पूजा करतात त्यांचा मी द्वेष करत नाही. जो माणूस दगडाची पूजा करतो त्याला दगडात दगड दिसत नसतो तर ईश्वर दिसत असतो. तुम्हांला जर तसे दिसत नसेल तर कुराण ईश्वराने दिलेला धर्मग्रंथ आहे असे तुम्ही कसे म्हणू शकाल? ही मूर्तीपूजा नाही काय? तुम्ही जर हे समजून घेतले तर हिंदू, मुसलमान, शीख हे सर्व भाऊ आहेत आणि त्यांनी सोबत राहिले पाहिजे हेही तुम्हांला कळेल. मग स्त्री-पुरुषांना चालत्या गाडीतून फेकून देणे अशा सारखी पशुत्वाची जी कृत्ये आज होत आहेत ती थांबतील. मग सर्व लोक कुठेही कोणाचीही भीती न बाळगता सुरक्षित राहू शकतील. पाकिस्तानमधून जे निर्वासित इथे आले आहेत ते जोपर्यंत आपल्या घरी परत जात नाहीत आणि ज्या मुसलमानांना आपण घालवून लावले आहे आणि ज्यांना परतायची इच्छा आहे ते जोपर्यंत परत येऊन शांततेत राहू शकत नाहीत तोपर्यंत मला कधीही शांतता मिळू शकणार नाही.

मला इतकेच सांगायचे होते. ईश्वर आपल्याला आणि जगातील सर्वांना सद्बुद्धी देवो. त्याने आपल्याला जागे करावे व आपल्याकडे ओढावे व सर्व जग सुखाने भरावे. (यानंतरचे डॉ. सुशिला नाय्यर यांनी वाचून दाखवले.)

मी हा उपवास सत्याच्या - म्हणजे ज्याचे परिचित नाव ईश्वर आहे - नावावर केला होता. जिवंत श्रद्धा नसेल तर ईश्वर कुठेही नसतो. ईश्वराच्या नावावर आपण खोटे बोलतो, समोरचा निरपराध आहे की अपराधी, स्त्री आहे की पुरुष, मूल आहे की शिशू याचा विचार न करता

आपण लोकांची कत्तल करतो. आपण अपहरण, बळजबरीचे धर्मांतर वगैरे गोष्टी केल्या आहेत आणि त्याही निर्लज्जपणे. असे कोणी सत्याच्या नावावर केले असल्याचे मला माहीत नाही. याच सत्याचे नाव ओठांवर घेऊन मी उपोषण सोडले आहे. मला लोकांचे दुःख असह्य होते. हिंदू, शीख, मुसलमान, हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांचे प्रतिनिधी, पंजाब, सरहद्द प्रांत आणि सिंध येथील निर्वासितांचे प्रतिनिधी असे मिळून शंभरहून अधिक लोक राष्ट्रपती राजेंद्र प्रसाद यांनी आणले होते. अशा प्रकारच्या सर्वांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या लोकांमध्ये पाकिस्तानचे उच्चायुक्त झहीद हुसेन, दिल्लीचे मुख्य आयुक्त आणि उपायुक्त, आझाद हिंद फौजेचे प्रतिनिधित्व करणारे जनरल शाहनवाझ खान, एखाद्या पुतळ्याप्रमाणे बसलेले पंडित नेहरू आणि अर्थातच मौलाना साहेब यांचाही समावेश होता. या लोकांनी सही केलेला दस्तावेज डॉ. राजेंद्रबाबूंनी हिंदुस्तानीत वाचून दाखवला आणि त्यांच्यावर अधिक ताण न टाकता मी उपवास सोडावा अशी त्यांनी विनंती केली. उपवास सोडण्याकरिता पाकिस्तान आणि संघराज्यातून तारावर तारा येत होत्या. या सर्व मित्रांचा सल्ला मी फेटाळू शकलो नाही. काहीही झाले तरी यापुढे हिंदू, मुसलमान, शीख, ख्रिश्चन, पारसी आणि ज्यू या सर्व लोकांमध्ये मैत्री राहील या त्यांच्या शपथेवर मी अविश्वास करू शकत नव्हतो. ही मैत्री मोडणे म्हणजे देशाचे तुकडे करणे.

मी हे लिहवून घेत असताना माझ्या आरोग्याकरिता आणि दीर्घायुष्याकरिता शुभेच्छा देणाऱ्या असंख्य तारांचा ढीग लागला आहे. मानवतेची सेवा करण्यायोग्य ईश्वराने मला आरोग्य आणि विवेक द्यावा अशी माझी किती इच्छा आहे ! आज जी पवित्र शपथ घेण्यात आली आहे तिची जर परिपूर्ती झाली तर ईश्वराने मला संपूर्ण जीवन द्यावे व त्याद्वारे मला मानवतेची सेवा करता यावी अशी मी दुप्पट शक्तीने ईश्वराची प्रार्थना करीन हे मी तुम्हांला खात्रीपूर्वक सांगतो. विद्वान लोकांचे मत आहे की माणसाचे पूर्ण आयुष्य १२५ वर्ष आहे आणि काहींच्या मते ते १३३ वर्षांपर्यंत जाऊ शकते. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ यांच्यासह दिल्लीच्या नागरिकांच्या शुभेच्छांमुळे माझ्या शपथेची परिपूर्ती होण्याकरिता जितका वेळ लागेल असा अंदाज होता त्यापेक्षाही ती लवकर पूर्ण होत आहे. कालपासून हजारो निर्वासित आणि इतर लोक उपवास करत असल्याचे मला कळले तेव्हा दुसरा कोणताही परिणाम होणे शक्यच

नव्हते. अंतःकरणापासून मैत्री करण्याचे लेखी आश्वासन देणाऱ्या हजारो लोकांकडून तारांचा पूर येतो आहे. संपूर्ण जगातून शुभेच्छांच्या तारा येत आहेत. माझ्या या कृतीत ईश्वराचा हात होता हे दाखवणारा अजून कोणता पुरावा पाहिजे? परंतु माझ्या शपथेच्या शब्दांच्या पलीकडेही तिचा आत्मा आहे आणि त्याची परिपूर्ती झाली नाही तर या शब्दांना काहीही अर्थ राहणार नाही. माझ्या प्रतिज्ञेचे उद्दिष्ट संघराज्य आणि पाकिस्तानमधील हिंदू, मुसलमान आणि शीख यांच्यात खरी मैत्री घडवून आणणे आहे. संघराज्यात जर असे झाले तर रात्रीनंतर दिवस येतो त्याप्रमाणे पाकिस्तानमध्येही असे झाल्याशिवाय राहणार नाही. परंतु संघराज्यातील काळोखी रात्र जर संपली नाही तर पाकिस्तानमध्ये वेगळे काही घडेल अशी आशा करणे मूर्खपणा आहे. जर संघराज्यातील रात्रीचा काळोख पूर्णपणे गेला तर पाकिस्तानमध्येही असेच घडेल याबद्दल संशय घेण्याला जागा नाही. पाकिस्तानमधून मला किती तरी तारा आल्या आहेत आणि त्यांतील एकाही तारेत याला विरोध करण्यात आलेला नाही. ज्याप्रमाणे मागील सहा दिवसात ईश्वराने आपल्याला मार्गदर्शन केल्याचे स्पष्ट दिसते त्याचप्रमाणे सत्यस्वरूपी ईश्वर आपल्याला मार्गदर्शन करत राहो.

बापूजींना अशक्तपणा तर खूप आला आहे. हे प्रवचन पूर्ण झाले आणि जणू काय पिंजऱ्यात कोंडलेली माणसे मोकळी झाल्याबरोबर जसे ते धाव घेतात तशी लोकांनी बापूजींच्या दर्शनाकरिता धाव घेतली. बापूजींना ओसरीत खुर्चीवर बसवले आणि ती इतकी उंचावर ठेवली की लहानात लहान मुलालाही बापूजींचे सहज दर्शन व्हावे. हे दृश्य तर इतके अद्भुत, आनंददायी आणि भव्य होते की मला रामायणातील उत्तरकांडातील एक छंद आठवतो. प्रभू श्रीराम जेव्हा चौदा वर्षांच्या वनवासानंतर विरहात बुडालेल्या अयोध्येत परत आले, तेव्हा आनंदोत्सवानंतर आणि प्रायश्चित्त घेतल्यानंतर लोकांनी जसे त्यांच्याकडून भक्तीचे वरदान मागितले, तसेच अनेक अडचणी सहन करून आणि प्रायश्चित्त घेऊन बापूजी या तपश्चर्येतून वर आले आहेत. ही संध्याकाळ मी कधीही विसरणार नाही. मी मनातल्या मनात हा छंद म्हणत होते -

जय राम, रमारमनं रामनं भवतापयाकुल पाहि जनम्,
अवधेस, सुरेस, रमेस, विभो शरणांत मांगत पाही प्रभो
दस सीस बिनासन बीस भुजा , कृत दूरि महा महि भुरि रुजा,

रजनीचर वृंद पतंग रहे, सर पावक तेज प्रचंड दहे.
महि मंडल मॅडन चारुतरं, घृत सायक चाप निषंग वरं,
मद मोह महा ममता रजनी, तम पुंज दिवाकर तेज अनी.
मन जात किरात निपात किये, मृग लोग कुभोग सरेन हिये.
इति नाथ अनाथन्हि पाहि हरे, बिशयावन पांवर भूली परे.

बहु रोग बियोगन्हि लोग हये, भवदंघ्रि निरादरके फल ये,
भवसिंधु अगाध परे नर ते, पद पंकज प्रेम न जे करते.
अतिदीन, मलिन दुःखी नित ही, जिन्हके पद पंकज प्रीति नहिं,
अवलंब भवंत कथा जिन्हके, प्रिय संत अनंत सदा तिन्हके.

नहिं राग, न, लोभ न मान मदा, तिन्हके सम बैभव वा बिपदा,
एहि ते तव सेवक होत मुदा, मुनी त्यागत जोग भरोसा सदा.
करि प्रेम निरंतर नेम लिए, पद पंकज सेवित सुद्ध हिये,
सम मानि निरादर आदर ही, सब संत सुखी बिचरंत मही.

मुनि मानस पंकजभृंग भजे, रघुबीर महा रनधीर अजे,
तव नाम जपामी, मपामि हरि, भवरोग महामद मान अरी.
गुन सील कृपा परमायतनं, प्रनमामि निरंतर श्रीरमनं,
रघुनंद निकंदय द्वंद्वधनं, महिपाल विलोक्य दीन जनं.

अशा प्रकारे तर असे वाटत होते बापूजींच्या कृत्याची स्तुती प्रजा करत नव्हती ! आणि मागत होती की -

बार बार बर मांगऊ हरशी देहु श्रीरंग,
पद सरोज अनपायनी भगति सदा सतसंग.

रामदासकाका आले. डॉ. महेता, जहांगीरजी, आणि जमशेदजी आले. या सर्वांनी बापूजींशी गोष्टी केल्या. बापूजींनी कताई सुरू केली आहे. आजच्या दिवस कातू नका असे खूप समजावले. परंतु बापूजी

म्हणाले, “यज्ञ केल्याशिवाय खाईन तर ती चोरी म्हणवली जाईल. आता मी खायला सुरुवात केलेली असल्यामुळे मी यज्ञ केलाच पाहिजे.”

दहा वाजता बापूजी अंथरुणावर आडवे झाले.

आजची परिस्थिती - ३।। वाजता जाग. दातण. लघ्वी सहा अंस. ४.४५प्रार्थना. ५.१५ वाजता गरम पाणी, एक चमचा निंबाचा रस आणि मीठ. ५.४५ ‘हरिजन’करिता लिहायला सुरुवात केली. झोपले ८.५०. उठले ९.०५, लध्वी केली. ९.१५ मालीशकरिता गेले. १०.२० न्हाणीघरात. वजन १०७ पौंड. ११ गरम पाणी आठ अंस.

नंतर तर असंख्य लोकांचे येणे जाणे. त्यांच्याशी गोष्टी. १२.२५ उपवास सोडला.

उपवासानंतरचा आहार - आठ अंस संत्र्याचा रस. दोन टेबलस्पून ग्लुकोजबरोबर. १ वाजता काळ्याद्राक्षाचा रस चार अंस. ३.३० गरम पाणी मधाबरोबर, आणि निंबू. ८ वाजता आठ अंस दूध, चार अंस गरम पाणी हे मिसळले आणि चार संत्री. ८.३० गरम पाणी मधासह.

आजच्या संपूर्ण दिवसाच्या कार्यक्रम हा अशा प्रकारे पूर्ण केला. आता रात्रीचे चार वाजले आहेत. हे सर्व लिहिले. सर्वांना घडलेल्या घटनांची माहिती लिहिली आणि आता झोपायला जाते आहे.

बिरला भवन, नवी दिल्ली,

१९-१-'४८

नेहमीप्रमाणे ३।। वाजता प्रार्थना. प्रार्थनेनंतर रोजप्रमाणे आत बसले आणि आणि काम केले. आज तर मौनवार आहे. यामुळे इतर कोणतेही विशेष कामकाज राहणार नाही. मालीश, आंघोळ नेहमीप्रमाणे चालली. आंघोळ सुरू असताना दीनशांनी हजामत केली. मी बापूजींना आंघोळ घातली. बापूजींचे वजन १०६ पौंड होते. एक पौंड कमी झाले. नंतर जमशेदजी, जहांगिरजी पटेल आणि दीनशाजींशी गोष्टी केल्या. ते जे बोलत होते त्याच्या उत्तरपुरतेच बापूजी चिठ्ठ्यांवर लिहीत होते. जमशेदजी महेता (कराची) सिंधविषयी करूण कथा सांगत होते. ते तर कपडे न बदलताच तिथे राहिले होते आणि पुढेही त्यांना तिथेच वास्तव्य करायचे होते. शेवटी, या लोकांनी बापूजींना पाकिस्तानमध्ये येण्याची विनंती केली. त्यावर बापूजींनी चिठ्ठीवर लिहिले, "माझी पाकिस्तानमध्ये येण्याची इच्छा आहे, पण तुम्ही सांगितलेल्या सर्व गोष्टी लिहा, म्हणजे मी त्यावर काम करू शकेन." हे लोक गेल्यानंतर बापूजी झोपले. आमचा जवळपास सगळा वेळ बापूजींजवळच गेला. बापूजींनी एरंडीचे तेल घेतले होते. तरीही शौच्याला झाली नव्हती. अजून जेवण तर घेतलेच नाही. द्राक्षाचे पाणी, मोसंबीचा रस, बार्ली, आणि प्रत्येक वेळी ग्लुकोजच घेत होते. लघ्वी चांगली व्हायला सुरुवात झाली आहे. आज प्रार्थनेत खुर्चीवर आले. आजच्या प्रवचनाकरिता लेखी संदेशात लिहिले -

> देशातून आणि विदेशातून माझ्या प्रकृतीबद्दल चौकशी करणाऱ्या तसेच उपवास सुटल्यामुळे सुखरूप असाल अशा शुभेच्छादर्शक तारांचा ढीग आला आहे. आणि या तारा येतच आहेत. या सर्व बंधू-भगिनींचे व्यक्तिगत आभार मानणे तर अशक्यच आहे. यामुळे तुम्हा सर्वांचे मी इथेच अंतःकरणपूर्वक आभार मानतो. या तारांवरून मी उचललेले पाऊल बरोबर होते असे दिसून येते.
>
> तारेच्या या ढिगामधील दोन तारा देतो. एक पश्चिम पंजाबच्या मुख्यमंत्र्यांची आहे तर दुसरी भोपाळच्या नबाब साहेबांची आहे. या लोकांबद्दल लोकांच्या मनात आज फार अविश्वासाची भावना आहे. यामुळे तुम्हांला तार वाचून दाखवतो. कोणी जर काही म्हणत असेल तर त्यावर आपण विश्वास ठेवला पाहिजे. त्यांच्या मनात जर वेगळे काही असते तर त्यांनी या तारा का पाठवल्या असत्या?

या तारा अशा आहेत -

भोपाळचे नबाब साहेब लिहितात -

"सर्व समुदायातील लोकांचे अंतःकरणापासून ऐक्य व्हावे असे जे तुम्ही आवाहन केले आहे त्याला हिदुस्थानच्या दोन्ही भागातील शांतताप्रिय लोक निश्चितच प्रतिसाद देतील. याचप्रमाणे हिंदुस्थानच्या दोन्ही भागातील लोकांमध्ये मैत्री व्हावी अशी जी तुम्ही विनंती केली आहे तीही दोन्ही देशातील लोक ऐकतील. आमच्या संस्थानाला मागील वर्षी जेव्हा अडचणींना तोंड द्यावे लागले होते तेव्हा आम्ही सर्व संप्रदायाच्या लोकांमध्ये सामंजस्य, प्रेम आणि मनोमीलन घडवून आणूनच शांतता निर्माण करू शकलो होतो ही सुदैवाची गोष्ट आहे. परिणामी या रियासतीत शांतता भंग व्हावी असा एकही प्रसंग घडला नाही. ही मैत्री आणि प्रेमभाव वाढावा म्हणून आम्ही सर्वशक्ती लावून प्रयत्न करू."

पश्चिम पंजाबच्या मुख्यमंत्र्यांच्या तारेतील संपूर्ण मजकूर असा आहे -

"अेक उदात्त काम करण्याकरिता तुम्ही उचललेल्या पावलाबद्दल पश्चिम पंजाबचे मंत्रिमंडळ अंतःकरणापासून तुमची तारीफ करते. अल्पसंख्याकांचे जीवन, वित्त आणि अब्रू यांचे रक्षण करण्याकरिता व त्यांना नागरिकत्वाचे समान अधिकार देण्याकरिता पश्चिम पंजाबचे मंत्रिमंडळ सर्व काही करत आले आहे. हे मंत्रिमंडळ या धोरणाचा यापुढेही दुप्पट जोमाने अनुसरण करील असे मी तुम्हाला आश्वासन देतो. तुमचे उपोषण सुटण्याकरिता भारतातील परिस्थितीत लवकरात लवकर सुधारणा व्हावी असे आम्हांला वाटते. तुमच्या सारख्याचे अमूल्य जीवन वाचवण्यासाठी या प्रांतातील आमच्या प्रयत्नात आम्ही काहीही कमी ठेवणार नाही."

मला तुम्हा सर्वांना एक सावधगिरीची सूचना द्यायची आहे. आजकाल विचार न करता आणि इच्छा होईल तो माणूस उपवास करू लागला आहे. थोड्याशा वेळात परिणाम मिळावे म्हणून जर कोणी असे करत असेल तर त्याने कदाचित आपली घोर निराशा तर होणार नाही ना हे पाहायला पाहिजे. आणि अशाने उपवासासारख्या या अचूक उपायाचा दुरुपयोग होईल आणि त्याचा परिणाम तर होणारच नाही. उपवास करणाराने खूप विचार केला पाहिजे. ईश्वरावर

संपूर्ण श्रद्धा नसेल आणि त्यात व्यक्तिगत स्वार्थ असेल तर त्या उपवासाला काहीही किंमत राहत नसते. त्याकरिता ईश्वराचा आदेश मजबूत असायला पाहिजे.

आता दिल्लीच्या नागरिकांवर आणि निर्वासितांवर असीम जबाबदारी आली आहे. सर्वांनी परस्परांबद्दल पूर्ण विश्वास बाळगून आपसात भेटीगाठी होतील अशा संधीच्या शोधात असायला पाहिजे. लहानसहान चुका विसरायला पाहिजे.

काल अनेक मुसलमान भगिनी माझी भेट घ्यायला आल्या होत्या. त्यांच्यातील बहुतेक स्त्रिया बुरख्यात होत्या. परंतु एकाही अपवादाशिवाय सर्वांनी माझ्यासमोर पडद्याचा त्याग केला. या सर्व भगिनींना भेटून मला आनंद झाला. आपण कायदा हातात घेऊ नये ही गोष्ट आता आपण समजून घ्यायला पाहिजे. अन्यायाचा बदला आपण घ्यायला नको, ते काम सरकारकडे सोपवले पाहिजे. आणि शांतता समितीने जागृत राहायला पाहिजे.

प्रार्थनेनंतर सायंकाळी साडेसहा वाजता जमशेदजी, जहांगीरजी आणि दीनशाजींशी गोष्टी.

. . . बापूजी म्हणाले, "माझ्यावर पाकिस्तानचा कोणता परिणाम झाला आहे ते सांगतो. जिनासाहेबांच्या मानसिकतेत काही बदल झाला आहे असे तुम्ही सांगता, पण ते सिद्ध कसे करणार? आणि सरदारबद्दल तर ते अजूनही बोलतच आहेत. त्यांचा युक्तिवाद खोटा आहे. आपल्यात म्हणच आहे ना की 'नाचता येईना, अंगण वाकडे'. या लोकांना माहीत आहे की मी 'अथॉरिटी'शिवाय जाणार नाही."

जहांगीरजी आपले मुद्दा स्पष्ट करत म्हणाले, "मुंबईतील 'गांधी-जिना' वाटाघाटीच्या वेळी जी परिस्थिती होती त्यापेक्षा आता परिस्थिती वेगळी आहे."

बापूजी - माझ्या दृष्टीने मुळीच वेगळी नाही. आणि मला तर कामच कळत असते. गोष्टी नाही. ते जसे म्हणतात तसे जर झाले असते तर सरदारविरोधी या सर्व गोष्टी का उडवण्यात आल्या असत्या?

जहांगीर पटेल - या लोकांना वाटते की तुमचा फार मोठा गैरसमज आहे. गुलाम महमदचे निवेदन वाचले?

बापू - मला ते आवडले नाही.

जहांगीरजी - त्यांचे म्हणणे आहे की मी तर मंत्री म्हणूनच उत्तर दिले पाहिजे.

बापूजी - यावरून सरदार आणि शण्मुखम यांच्यात प्रश्नोत्तरे झाली. आणि त्यात तर जवाहरलालजीही होते. भाषेत दोष काढायचा असेल तर तो कितीही काढता येईल. याशिवाय आता ही बाब कोर्टाला सोपवण्याचा प्रश्न आहे. पंचावन कोटी तर झाले, आता इतर पाचदहा कोटींची गोष्ट करत आहेत. रिझर्व बँकेने आम्हांला सांगितले होते असे म्हणतात. अशा गोष्टी करतात. मी एखाद्या दिवशी जर गुलाम महंमदला भेटलो तर पहिला प्रश्न हाच विचारीन.

जहांगीरजी - ते तुम्हांला सत्याचे पुजारी समजतात. ते स्वतःही साधूसारखे आहेत. तुमच्याबद्दल त्यांना हार्दिक सहानुभूती वाटते.

बापूजी - अशी माणसे मी खूप पाहिली आहेत. पण आचरणात आणि कामात ती साधू नसतात. तुमच्या उपवासाच्या वेळी 'मी तार करू काय?' असे जिनासाहबांनी मला विचारले होते. मी म्हणालो की अंतःकरणापासून जर तुम्हाला वाटत असेल तरच तार करा. गांधींजींची अवस्था तर वाईट आहेच, केवळ पाणीच घेत असतात.

बापूजी - त्याचा तर मला काही उपयोग नाही. आणि मला त्याची पर्वाही नाही.

जहांगीरजी - आता त्यांच्यात खूप सुधारणा झाली आहे. अब्दुल निश्तर त्याचे वकील आहेत. ते म्हणाले की 'अथॉरिटीशिवाय आले तर काहीही होणार नाही'.

बापूजी - त्यांना शांती हवी आहे, पण त्यांच्या अटीवर.

जहांगीरजी - असे म्हणण्यापूर्वी त्यांना समजून घेतले पाहिले आणि हिंदुस्थान सरकार त्यांना आर्थिक दृष्टीने चिरडून टाकू पाहते आहे. तुम्ही जर त्यांच्याशी बरोबरीच्या नात्याने बोलाल तर ते प्रामाणिकपणे वागतील आणि माराल तर मारतील. ही मुसलमानांची आणि पाकिस्तानची मानसिकता आहे.

बापूजी - याहून मोठे असत्य दुसरे कोणते असू शकते? तुम्ही पाहा तर खरे की हिंदुस्थानातील लोक - हिंदू आणि शीख किती नमले आहेत? विशेषतः निर्वासित आणि शीखांमध्ये अद्भुत धैर्य असतानाही त्यांनी इतक्या दुःखांनंतरही समता जाणवेल असे वागण्याचे

वचन दिले आहे. याला कोणत्याही दृष्टीने पाहिले तरी दुःखच म्हणावे लागणार नाही काय? सात दिवसात जे इतके कमालीचे परिवर्तन झाले आहे ती काय तुम्हांला लहानसहान गोष्ट वाटते?

मला वाटते की डॉ. दिनशा आणि जहांगीरजींवर सरदारदादा जे नाराज आहेत ते अगदीच योग्य आहे. बापूजी इतके थकलेले असताना कोणतेही विशेष कारण नसताना इतका वाद घालत होते. चांगले झाले की या गोष्टी सुरू असतानाच जवाहरलालजी आले. बापूजींनी त्यांना या गोष्टी सांगितल्या. ते म्हणाले -

'त्याचे मला काही वाटत नाही. मी कितीदा तरी भेटलो आहे. गोष्ट तर तीच आहे. जिनासाहेब आता कोणताही निर्णय घेऊ शकत नाहीत. आता तिथे कोणीही जायलाच नको. मी स्वतःही जायला नको. इथे लियाकत येईल तेव्हा मी जाईन की नाही हे माहीत नाही. मी थकलो आहे. आपल्या प्रत्येक गोष्टीचा ते लाभ घेत असतात. आणि मला त्यांच्याबद्दल मुळीच विश्वास वाटत नाही.

पंडितजींच्या संतापाला तर पारावार नव्हता. डॉ. दीनशा आणि जहांगीरजींना ते म्हणाले, "तुम्ही जे काही म्हणता ते जर खरे असेल तर इतक्या सगळ्या गोष्टींचे कामच काय? आज तिथे एकही हिंदू वा शीख सुरक्षित नाही. या लोकांना गुंडगिरी आणि धोकेबाजीच करायची आहे". . . . खूप नाराज झाले. बापूजी मध्येच म्हणाले, "तुम्ही सर्व जा. मला जवाहरलालला वेळ द्यायचा आहे." . . . ते लोक उठले. पंडितजींनी ही समस्या इतक्या लवकर सोडवल्यामुळे मी तर खूपच खूश झाले.

बापूजींना कराचीतील शारदा मंदिराची खूप काळजी होती. कलकत्त्याहून सुऱ्हावर्दीसाहेब आले. त्यांच्याशी चर्चा केली, "पाकिस्तानवाले जसे बोलतात तसे जर चालत असतील तर आज तेथील शारदामंदिरसारख्या वर्षापासूनच्या जुन्या संस्थेची अतिशय वाईट अवस्था झाली आहे त्याबद्दल काय समजायचे? संपूर्ण हिंदुस्थानात ज्या थोड्याशा सुसंस्कारी संस्था आहेत त्यात एक शारदामंदिर आहे. हिला काहीही करून वाचवायलाच पाहिजे. नाही तर ही पोरगी मरायला मोकळी होईल. (मी तिथे शिकलेले असल्यामुळे शारदामंदिर माझी मातृसंस्था होती असे म्हणता येईल. या संस्थेबद्दल माझ्या मनात अतिशय सन्मान, प्रेम आणि पूज्यभाव असल्यामुळे.) मी तर या संस्थेत अतिशय रस घेतो आहे. जमशेदजी महेता इथे आले आहेत, त्यांना विचारा. ते या संस्थेचे प्राण आहेत, आणि ती संस्था यांचे प्राण आहे. ता एक भव्य शाळा आहे यात काही शंका नाही."

जमशेदजी म्हणाले, "जयंतीभाई, रवजी झवेरचंद या प्रख्यात पेढीचे तसेच सिंधचे एक अनमोल तरुण सेवक आहेत. त्यांना तर पूर्णपणे लुटण्यात आले आहे. असे असले तरी हा माणूस अजूनही तेथील सर्वांना वाचवण्यासाठी तिथेच थांबला आहे. जिनासाहेबांचा उद्देश तर हिंदू धर्म पूर्णपणे नष्ट करायचा आहे. यामुळे तुम्ही जर तिथे याल तर त्याचा तिथे खूपच परिणाम होईल." सुऱ्हावर्दीसाहेबही मान्य करत होते की ही वर्तणूक मुसलमानांकरिता मुळीच हितकारक नाही. ते म्हणाले की कलकत्त्यात मला महात्माजींची जर मदत मिळाली नसती तर बंगालमध्ये आज एकही मुसलमान अस्तित्वात नसता.

रात्री नऊनंतर बापूजी झोपायला गेले. या वेळी बापूजींचे यकृत बिघडलेले आहेत. मुत्रपिंडांनी काम करणे बंद केले आहे. बिधानबाबूंनी पंडितजींच्या उपस्थितीतच ते तपासले होते. सुऱ्हावर्दीसाहेब आणि बिधानबाबू भेटतात तेव्हा ते बंगालीतच बोलत असतात. खूपच गोड वाटते.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२०-१-'४८

नेहमीप्रमाणे साडेतीन वाजता प्रार्थना. प्रार्थनेत जमशेदजी महेतासुद्धा उपस्थित होते. त्यांना माझ्याबरोबर गीतेचे श्लोक म्हणताना पाहून बापूजींनी त्यांना गीतेसंबंधीची प्रार्थना विचारली. त्यांच्याशी गोष्टी केल्या. आलेला टपाल पाहिला. सध्या तर टपालात बापूजींनी उपवास सोडल्याबद्दल त्यांचे अभिनंदन करणारी पत्रेच येत असतात. डॉ. दीनशाजींना बोलायचे होते. यामुळे मालीश आणि आंघोळीची जबाबदारी त्यांच्यावरच टाकली. आज बापूजींचे वजन १०७ पौंड होते. ते अजून एक पौंडाने वाढले. बाकी सर्व कालप्रमाणेच. खाण्यापिण्यात द्रवपदार्थच घेतले. माती आणि कताई, मुलाखती वगैरे नेहमीप्रमाणे सुरू होते. चार वाजता बस्ती घेतल्यानंतर अशक्तपणा आला होता. अजूनही चालत असताना पाय सरळ राहत नाहीत. अशक्तपणा तर खूपच आहे. संपूर्ण दिवस तर बापूजींच्या जवळपासच जातो. आणि जो कोणी बापूजींच्या प्रकृतीविषयी चौकशी करतो त्याला टपालाने उत्तर पाठवावे लागते. असंख्य लिफाफे आणि पोस्टकार्ड (जसे आहे तसे) असे येतात की ज्यांच्याबरोबर तिकिटेही जोडलेली असतात. उत्तर देण्याचे काम माझ्याकडे आहे.

अशी बातमी मिळाली आहे की भावनगरमध्ये जबाबदार सरकार स्थापन झाल्यानंतर काठियावाडमधील सर्व राजे एकत्र आले आणि त्यांनी संपूर्ण काठेवाड एक करायचा निर्णय घेतला आहे. भावनगरमध्ये जबाबदार सरकार स्थापन झाल्यानंतर उपवासामुळे बापूजी त्यांना कोणताही संदेश पाठवू शकले नव्हते. यामुळे प्रार्थनेत बोलण्याकरिता बापूजींनी त्यासंबंधीची नोंद माझ्याकडून लिहवून घेतली.

प्रार्थनेकरिता जात असताना ग्वाल्हेरहून बापूजींना तार आली की तेथील मुसलमानांना लुटण्याचा आणि मारून टाकण्याचा प्रयत्न सुरू आहे. यावरून देशात अजूनही आग धुमसते आहे असे मला वाटते

आज बापूजी प्रार्थनासभेत खुर्चीवरच गेले होते. प्रवचन सुरू असताना तिथे अकस्मात असा जोरदार धमाका झाला की माणसाचे कानच फाटून जावे. बापूजींचा आवाज अतिशय हळू झालेला असल्यामुळे मी तर सध्या त्यांच्याजवळ बसूनच प्रवचन लिहून घेत असते. त्याप्रमाणे आजही लिहीत

होते. परंतु या धमाक्याने घाबरून माझा असा काही थरकाप झाला की मी बापूजींचे पायच धरले. प्रार्थनेमधील गर्दीतील लोकसुद्धा इकडेतिकडे धावपळ करू लागले. बापूजी लोकांना शांत करण्याकरिता प्रवचन करू लागले. हाताने बसून जायच्या खुणा करून लागले. परंतु ऐकतो कोण? मला म्हणाले, "काय, घाबरलीस? कोणी लष्करी माणूस सराव करत असेल. हे तर ठीक आहे, पण कोणी तुला आणि मला गोळी मारायला येत असेल तर काय करशील?" लोकांनासुद्धा बापूजी 'कोणी लष्करी माणूस प्रशिक्षण घेत असेल' असेच म्हणाले. आणि प्रवचन सुरू ठेवले. आजच्या प्रवचनात बापूजी म्हणाले,

> "आता दिल्लीत चांगल्या प्रकारे शांतता स्थापित झाली आहे. यामुळे माझ्या अपेक्षेप्रमाणेच हे सुंदर परिणाम आले आहेत. परंतु कलकत्त्याहून मला सावधगिरीची सूचना आली होती की यामागे कदाचित एखादे रहस्य असेल ! (रा. स्व. संघाच्या प्रतिनिधीतर्फे एखादे रहस्य तर नसेलना?) इथे आलेल्या हजारो बंधुभगिनींच्या दुःखाला सीमा नसूनही तेसुद्धा शांततेच्या आवाहनात सामील झालेले आहेत. यामुळे ही सुंदर दिल्ली संपूर्ण हिंदुस्थानचा आणि पाकिस्तानचा उद्धार करू शकते आणि त्यांच्या अंतःकरणापासूनची मैत्री घडवून आणण्यात अतुलनीय पुढाकार घेऊ शकते. आपले पुढारी सरदार आणि जवाहर वेगळे नाहीत, आणि वेगळे होऊही शकत नाहीत. दोघेही एकच गोष्ट सांगत असतात. परंतु त्यांची सांगण्याची पद्धत वेगवेगळी असू शकेल. सरदार काही मुसलमानांचे शत्रू नाहीत. हं त्यांच्यात कोणी फूट पाडण्याचा प्रयत्न करणार असेल तर तो टिकू शकणार नाही. तुम्ही सर्वांनी लक्षात ठेवले पाहिजे की जे मुसलमानांचे शत्रू आहेत ते संपूर्ण हिंदुस्थानचे शत्रू आहेत. अमेरिकेत अजूनही हब्शींना गुलाम करून मारून टाकण्यात येते. आणि वरून ते न्यायाच्या मोठमोठ्या गप्पा मारत असतात. यामुळे त्याना त्यांचे कोणतेही काम अयोग्य वाटत नसते. परंतु त्यांचे हे दुष्कृत्य आहे असे आपण समजायला पाहिजे. आपली वर्तमानपत्रेसुद्धा या दुष्कृत्याची सर्व प्रकारे निंदा करतात. यामुळे ईश्वराला साक्षी ठेवून आपण जो निर्णय घेतला आहे त्याला जर आपण बिलगून राहिलो तर आपली खूपच उन्नती होईल.
>
> (बापूजी इतके बोलल्यानंतर खूप जोराचा धमाका झाला, खूप अशांतता पसरली, आणि त्यात दहा मिनिट गेले. परत शांतता स्थापित झाल्यानंतर प्रवचन सरू करत बापूजी म्हणाले -)

"आधीच मी सांगितल्याप्रमाणे आता मी कदाचित पाकिस्तानमध्ये जायला निघेन. त्याकरिता सरकारने आणि डॉक्टरांनी जर मला परवानगी दिली तर मी ताबडतोब निघेन. अजून मी धान्य सुरू केलेले नाही. ते सुरू करायला कदाचित पंधरा दिवस लागतील.

"आपले सद्भाग्य की आपले प्रधानमंत्री नावाप्रमाणे खरोखरच अनमोल रत्न आहेत. हिंदुस्थानच्या या सुंदर भूमीला तर जवाहरलाल हे एक सुंदर रत्न मिळाले आहे. यांचे घर तर पाहुण्यांनी भरगच्च भरलेले असते. असे असूनही त्यांनी निर्वासितांकरिता स्वतःच्या काही खोल्या बाजूला काढल्या आहेत. त्यांना निर्वासितांची इतकी काळजी आहे की त्यांच्याजवळ जे अंथरुणपांघरूण आहे त्यातील काही ओले होते तर काही वाळलेले. त्यानी ओले स्वतःकरिता ठेवले आणि कोरडे निर्वासिंतांना दिले. ते व्यायाम करून आपले शरीर गरम ठेवत असतात. त्यांचे अनुकरण जर देशातील समजदार वर्ग, श्रीमंत वर्ग करील तर देशाच्या अनेक समस्या आपोआप सुटतील.

शिवाय मला अशी बातमी कळली आहे की माझ्या उपवासाचा फायदा काही आळशी लोकांनी घेऊन चलनी नोटा छापायला सुरुवात केली आहे. मला विचारायचे आहे की अशी फसवणूक करून पोट भरण्याची आवश्यकता काय? पोटाचा खळगा भरायचा दुसरा कोणताही चांगला मार्ग नाही काय?

"लाहोर येथील 'काश्मीर फ्रिडम लीग'च्या प्रमुखाचे मला एक पत्र आले आहे. ते लिहितात की जोपर्यंत काश्मीरची समस्या सुटत नाही तोपर्यंत तुम्हाला तुमच्या कोणत्याही कमात यश मिळू शकत नाही. हिंदुस्थान सरकारने काश्मीरमधून लष्कर काढून घेऊन तो ज्यांचा आहे त्यांना सोपवला पाहिजे.

"मला त्यांना विचारायचे आहे की जोपर्यंत काश्मीरच्या जनतेचा निर्णय होत नाही तोपर्यंत हिंदू-मुसलमानांनी एकमेकांचे शत्रू होऊनच राहायला पाहिजे काय? आणि काश्मीरच्या महाराजांनी आणि शेख अब्दुल्लांनी हिंदुस्थानकडे लष्कराची मागणी केलेली असल्यामुळे लष्कर तिथे गेलेले आहे. हे खरे आहे की काश्मीर ज्याचा असेल त्याच्याकडे गेला पाहिजे. पण ते कोणाला सोपवले पाहिजे? तिथे जे लोक बाहेरून घुसले आहेत त्यांनी आधी बाहेर निघून

जायला पाहिजे. मग काश्मीर ज्याचे असेल त्याला सोपवण्यावर कोणता आक्षेप असू शकतो? मी तर नुकताच उपवासातून उठलो आहे. मी कोणाचाही शत्रू नाही. तसेच कोणालाही मी माझा शत्रू समजत नाही. यामुळे तार पाठवणाऱ्या बंधूंना माझी विनंती आहे की त्यांनी इथे येऊन आपले म्हणणे समजावून सांगावे.

"मी इथे येत असताना ग्वाल्हेरच्या मुसलमानांचा मला असा निरोप मिळाला की त्यांना तिथे खूपच त्रास देण्यात येतो आहे. तुमच्या माध्यमाने मी त्यांना सांगू इच्छितो की तुम्ही जर असे कराल तर आपण इथे जे काम केले आहे ते अपूर्ण राहील, त्यावर पाणी फिरेल.

"मला अशी बातमी कळली आहे की काठियावाडमध्ये जवळपास २०२ रजवाडे आहेत. या सर्व राजांनी एकत्र व्हायचा आणि सर्वांचे मिळून एक राज्य तयार करायचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय जर खरा असेल तर तो स्वागतार्ह आहे, आणि ते असे करून फार भव्य गोष्ट करतील. भावनगरच्या राजाने स्वतः होऊन त्याग करत आपले राज्य जनतेला सोपवले आहे. मी तुमच्याद्वारे त्यांना अंतःकरणापासून धन्यवाद देतो आणि अभिनंदनही करतो."

प्रार्थना करून आम्ही आत आलो तर कळले की हा तर बापूजींना मारण्याचा एक कट होता. मदनलाल नावाचा एक निर्वासित बापूजींना मारायच्या प्रयत्नात होता. आम्ही बसत होतो त्याच्या मागे बिरलाजींचा एक नोकर राहत होता. तिथून बॉम्ब फेकून अनेक माणसांना मारायचा त्याचा विचार होता. परंतु भाग्य की बिरलाजींच्या नोकराने त्याला स्पष्ट सांगितले की "जिथे सर्व बसतात तिथेच प्रार्थनासभेत बसा !" यामुळे या माणसाने अशा प्रकारे बॉम्ब फेकला. तो फेकून तो पळत असतानाच त्याला एका शूर पंजाबी भगनीने (सुलोचनादेवीने) पकडले आणि पोलिसांच्या हवाली केले. ही हकिगत क्षणात संपूर्ण दिल्लीत पसरली आणि अभिनंदन करणारांचे तर फोनवर फोन येऊ लागले. आम्ही फोन घेऊन थकून गेलो. अखेरीस 'रिसिव्हर' खालीच ठेवून दिला. या बातमीनंतर लेडी माऊंटबॅटनसुद्धा बापूजींकडे धावपळ करत आल्या. वाचल्याबद्दल बापूजींचे अभिनंदन केले. परंतु त्या अभिनंदनाला बापूजींनी इतकेच उत्तर दिले - "Military manoeuvres must have been taken place somewhere in the vicinity (लगतच्या कोणत्या तरी भागात सैनिकांचा सराव सुरू असेल.)" आणि बहादुरीविषयी तर बापूजी म्हणाले, "यात माझे कोणतेही शौर्य नाही. जेव्हा कोणी खरोखरच मला मारण्यासाठी समोर येईल आणि मी त्यांचे आघात हसतमुखाने सहन करून मनात रामाचा जप करीन,

तेव्हाच मी अभिनंदनास पात्र ठरेन." आम्ही तर या माणसाची एका खोलीत जी चोकशी सुरू होती तिथेच होतो. बापूजी बसले होते तिथून ७५ फूट अंतरावर हा बॉम्बस्फोट करण्यात आला होता. हा बॉम्ब फेकणाराचे नाव मदनलाल आहे. त्याचे वय जवळपास २५ वर्षे असावे. तो मोठ्या हिंमतीने आपले म्हणणे मांडत होता आणि सांगत होता की महात्मा गांधींना मारण्याकरिताच मी बॉम्ब फेकला होता. त्याच्या खिशातून हाताने बनवलेल्या बॉम्बचा दुसरा गोळाही निघाला. बापूजींनी जमशेदजींना सायंकाळी ७।। ची वेळ दिलेली होती. त्यांना तर काही कल्पनाच नव्हती. बिरला भवनमध्ये खूप गर्दी आणि धावपळ सुरू होती. यामुळे ते मोठ्या मुश्किलीने आत येऊ शकले. जमशेदजी म्हणाले, "कराचीत अशा मुलांचाच अशा कामासाठी उपयोग करण्यात येतो. मी तर असे पुष्कळ प्रकार पाहिले आहेत. या लोकांचा सरावच सुरू असू शकेल. पकडले गेले तर कोणत्याही प्रकारचे उत्तर देत नाहीत. केवळ हसत असतात." मदनलालने तर एकच उत्तर दिले की, "मला गांधीजींची शांततेचे वा तडजोडीचे धोरण पसंत नसल्यामुळे मी हे केले आहे."

रात्री जवाहरलालजी, राजकुमारीबहेन वगैरे सर्वांचे एकामागून असे येणेजाणे सुरूच होते. खुरो बापूजींना सिंधमध्ये बोलवण्याकरिता तयार आहे, परंतु पंडितजींना खुरोच्या म्हणण्यात विशेष तथ्य वाटत नाही. . . . १० वाजता बापूजी झोपले. . . . चे मन अजूनही डळमळीत आहे. . . . ला बापूजी म्हणाले, "असे करण्यात मला मोठे पाप दिसते. असे करायचे असेल तर मला सोड अथवा राजकोटला चालली जा. कनू आणि नाराणदासचे विचार एकच असल्यामुळे तेथील राष्ट्रीय शाळेत तू संगीतसुद्धा शिकशील. परंतु नाराणदास वा कनूसारखे अजूनही निर्णयावर का येत नाहीत याचे मला आश्चर्य वाटते ! यामुळे जे व्हायला हवे ते होत नाही."

बिरला भवन, नवी दिल्ली,

२१-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. रात्री तर बापूजींना मारायचा मदनलालने जो कट केला होता त्याचेच विचार माझ्या मनात सारखे येत होते. या अशुभ घटनेचे चित्रच दृष्टीसमोर तरळत होते. काही झाले असते तर काय अवस्था झाली असती? 'राम वाचवतो त्याला कोण काय करू शकतो?' हा वाक्प्रचार अगदी खरा आहे. या लोकांनी किती मोठे कारस्थान केले होते? बापूजींनी तर सर्वांना एकच उत्तर दिले - देवाला माझा उपयोग असेल तोपर्यंत तो मला ठेवील, आणि काम नसेल तेव्हा उचलून घेईल. मी तर त्याचा दास आहे, सेवक आहे. मी काळजी का करू?

काल सायंकाळीच बिरला हाऊसमध्ये लष्कराची व्यवस्था करण्यात आली. एक विचार तर असाही आला होता की प्रार्थनेत येणाराची झडती घेतली पाहिजे. परंतु बापूजींनी त्याकरिता नकार दिला. आणि बऱ्याच चर्चेनंतर सरदारदादांच्या समाधानासाठी इथे पहारा राहू दिला.

प्रार्थनेनंतर बिरलाजी म्हणालेसुद्धा, "मला तर हीच भीती वाटत होती की तुम्ही इतक्या पोलिसांना राहू द्याल की नाही?"

बापूजी म्हणाले, "तुम्हाला जसे हे धक्कादायक वाटते तसे मला वाटत नाही. (गांधीजी कदाचित इतक्या अधिक पोलिसांना बिर्ला भवनमध्ये ठेवण्याची परवानगी देणार नाहीत अशी घनश्याम दास बिर्ला यांना भीती वाटत होती.) सरदार आणि जवाहरलाल यांना आधीच इतक्या काळज्या आहेत की मी जर नाही म्हणालो असतो तर त्यांच्या काळजीत माझ्या सुरक्षिततेच्या काळजीची अजून भर पडली असती. या मित्रांवर आधीच फार मोठी जबाबदारी आहे. माझे व्यक्तिगत मत तर हेच आहे की माझे रक्षण करणारा रामच आहे. जर त्याला मला घेऊन जायचे असेल तर दहा हजार लोकही मला वाचवू शकणार नाहीत. परंतु सरकारमध्ये असलेल्या लोकांची माझ्या अहिंसेवर श्रद्धा नाही आणि हे पोलीस माझे रक्षण करू शकतील तर ठीक आहे. हे पोलीस माझे रक्षण करू शकतील यावरच त्यांची श्रद्धा आहे. आज कदाचित मी असा एकटाच शिल्लक असेन की ज्याची अहिंसेवर श्रद्धा आहे. ईश्वराला माझी प्रार्थना आहे की मला एकट्यालाच त्याने अशी अहिंसक शक्ती द्यावी की जिचे मी जगाला दर्शन घडवू शकेन. यामुळे माझ्या संरक्षणाकरिता पोलीस आणि सैनिक इथे ठेवलेले आहेत की नाहीत यामुळे काहीही फरक पडत नाही. रामच माझे रक्षण करत असतो आणि इतर सर्व व्यर्थ आहे याबद्दलची दिवसेंदिवस माझी अधिकच खात्री पटत

चालली आहे. (२० जानेवारीला बॉम्बच्या स्फोट झाल्यानंतर आणि मुंबई सरकारकडून वल्लभभाई पटेल यांनी बिर्लाभवनमधील गांधीजींच्या सुरक्षाव्यवस्थेत अजून वाढ केली. गांधीजींच्या खुनाचा कट रचण्यात येत असलेली माहिती आल्यानंतर त्यांनी पोलीस आणि साध्या कपड्यातील गुप्तहेर यांची तिथे नेमणूक केली. सुरक्षेचा उपाय म्हणून बिर्लाभवनच्या आवारात येणाऱ्या प्रत्येकाची तपासणी करण्याची उपाययोजना करण्यात आली. वल्लभभाई पटेल यांनी संसदेत ६ फेब्रुवारीला दिलेल्या वक्तव्यानुसार उपपोलीस निदेशक गांधीजींना भेटले होते आणि तुमच्या जीवाला धोका आहे अशी त्यांनी गांधीजींना धोक्याची सूचना दिली होती. गांधीजींच्या रक्षणाकरिता त्यांनी काही सोयीसवलतीही मागितल्या होत्या. असे केले नाही आणि काही विपरीत घडले तर आमची बदनामी होईल असेही त्यांनी गांधीजींना सांगितले, परंतु गांधीजींनी ते कबूल केले नाही. ते म्हणाले की माझे जीवन ईश्वराच्या हातात आहे. मी जर मरणार असेन तर कितीही काळजी घेतली तरी मला कोणी वाचवू शकणार नाही. प्रार्थनेला येणाऱ्या कोणत्याही व्यक्तीला अडवणे त्यांना मान्य नव्हते. तसेच श्रोते आणि त्यांच्यामध्ये कोणीही असणेसुद्धा त्यांना मान्य नव्हते. पोलिसांना आपले कर्तव्य पार पाडू द्यावे असे मी स्वतःसुद्धा गांधीजींशी बोललो होतो परंतु त्याचा काहीही फायदा झाला नव्हता.)"

बापूजींचा रोजप्रमाणे नियमबद्ध जीवनक्रम सुरू आहे. अजून अशक्तपणा तर आहेच. परंतु मालीशकरिता त्यांनी हळूहळू पायीच चालत जायचे ठरवले आहे. या बॉम्बस्फोटानंतर बापूजी स्वतःबद्दल जास्तच बेफिकीर झाले आहेत. जर ते अजूनच असे बेफिकीर झाले नसते तर प्रत्येक बाबतीत आणि प्रत्येक प्रसंगी ते असे का म्हणाले असते की "माझे काय? ईश्वराला अजूनही माझ्याकडून काम घ्यायचे असेल तरच तो मला वाचवील. बाकी तर जो कोणी जन्मला आहे त्याच्यासोबत मृत्यूही आलाच आहे. त्याची काळजी आपण का करावी?"

एवढ्यातच झालेल्या एका वार्तालापात - . . . यांच्यात काही विशिष्ट बाबीसंबंधात मतभेद आहेत. . . . बापूजींना म्हणाले, "बापूजी! तुम्ही असा का विचार करत नाही की कोणात एखाधी शक्ती कमी असते तर एखाद्यात विपुल? कोणत्या साखरेत गोडवा कमी असतो तर कोणतीत जास्त. तुम्ही जेव्हा शुद्ध धर्माबद्दल बोलता तेव्हा इतर आपद्धर्मासंबंधी बोलत असतात. युधिष्ठिराचे जेव्हा स्वर्गारोहण झाले तेव्हा तो तर पुढेपुढे जात केला आणि तेव्हाच त्याचे सख्खे भाऊ एकामागून एक पडत गेले." तेव्हा मध्येच एक जण म्हणाला, "युधिष्ठिराबरोबर कुत्राही होता ना! आणि तुमच्या दृष्टांताप्रमाणे स्वर्गात पोहोचणारात आज एक कुत्रासुद्धा होता असे का? आणि तो तर पशू होता,आणि मी तर आता माणसासंबंधी बोलतो आहे, तो माणूस नाही!" यामुळे बापूजी म्हणाले, "आणि हे युधिष्ठिर आहेत काय?" सर्व हसू लागले.

एका शीख प्रतिनिधीमंडळाशी वार्तालाप सुरू असताना ज्ञानी कर्तारसिंग शिखांना सहन कराव्या लागलेल्या जुलमासंबंधी काही बोलले.

तेव्हा बापूजी म्हणाले -

"तिथे काय सुरू आहे ते मला माहीत आहे. (पाकिस्तानमध्ये शिखांवर झालेल्या अत्याचारांची माहिती ग्यानी करतार सिंग यांनी दिली.) परंतु आपल्या घाबरटपणाचे दर्शन घडवून आपण काहीही साध्य करू शकणार नाही. कोणी तरी मला सांगितले की शिखांसारखे शूर व्हावे म्हणून संयुक्त प्रांतातील हिंदूंनी दाढी वाढवायला सुरुवात केली आहे. परंतु शूर होण्याचा हा मार्ग नाही. मी तुमचा ग्रंथसाहेब वाचतो. परंतु मी असे तुम्हांला खुष करण्याकरिता करत नसतो. आणि असे करण्याकरिता मी तुम्हांला परवानगीही मागणार नाही. परंतु तुम्ही दाढी वाढवली पाहिजे, किरपाण ठेवली पाहिजे आणि अशाच इतर गोष्टी करायला गुरूंनी कुठेही सांगितले नाही. मुसलमान हिंदूंना जर विष समजत असतील तर तुम्ही मला उपवास सोडण्याकरिता सांगायला नको होते. असे जर असेल तर माझ्याकरिता अन्न विषासमान होईल. ही सर्व फसवणूक होती असे जर मला कळले तर सर्व प्रयत्न व्यर्थ ठरतील हे मी मुसलमानांना स्पष्टपणे सांगितलेले आहे.

आजचे दृश्य संपूर्ण शौर्याचे आहे. आता यापुढे आपण शत्रुत्वाचा बदला घेऊ खरा, परंतु तो मैत्री करून घेऊ. तुमचे म्हणणे मी मान्य केले आहे. तुम्ही सर्व काही स्पष्ट केले हे फार चांगले केले आहे. आता दिल्लीत शांतता आहे. मग मला कोणत्या संरक्षणाची आवश्यकता आहे? परंतु यात जर फसवणूक असेल तर या कपातील मोसंबीचा रस माझ्याकरिता विष होईल. आज केवळ तिसरा दिवस आहे. माझ्यात थोडी ताकद आली की तुम्हांला काय हवे आहे ते तुम्ही मला सांगू शकता.

करतार सिंग - दुःखी माणसाचे डोके ठिकाणावर नसते. प्रत्येकजण महात्मा गांधी नसतो.

गांधीजी - महात्मा गांधी देवदूतही नाही आणि सैतानही नाही. तो तुमच्यासारखाच माणूस आहे.

शीख भाई - आमचे महात्मा गांधी तर एकच आहेत.

बापूजी - तुम्ही दोन आहा काय?

शीख भाई - जगाच्या कानाकोपऱ्यात तुमचा आवाज पोहोचतो.

बापूजी - ठगसुद्धा जगात बरेच आहेत ना ! (हास्यकल्लोळ)

शेखापुरात झालेली कत्तल ही तर नादीरशहाने केलेल्या कत्तलीपेक्षाही मोठी होती. (पर्शियाच्या शहाने १७३९ साली भारतावर आक्रमण करून मुहम्मद शहाला पराभूत केले होते व दिल्लीत कत्तल करण्याचा हुकूम त्याने सोडला होता.) रावळपिंडीतील वाह छावणीतही असेच दृश्य आहे. कोणी आणि कुठे जास्त लोक मारले यावर चर्चा करून काहीही फायदा नाही. शिखांनी आज फार मोठे शौर्य दाखवले आहे आणि त्याकरिता मी आभारी आहे. त्यांना इतके काही सहन करावे लागलेले असूनही मी उपवास सोडावा म्हणून त्यांनी माझ्या सर्व अटी मान्य केल्या. ही काही लहान गोष्ट नाही. मी तेच करतो आहे जे कोणताही माणूस करील.

माझ्याकडे तीन पारसी लोक लोक आले आहेत. (जमशेटजी मेहता, जहांगिर पटेल आणि दिनशा मेहता) ते जिना आणि इतर पाकिस्तानी पुढाऱ्यांची भेट घेतल्यानंतर आले होते. ते म्हणाले की मुसलमानेतरांना कराचीत किती तरी कष्ट सहन करावे लागले यात काही संशय नाही, परंतु त्यांना (आपल्या वर्तनाची) लाजही वाटते. आमचे चुकले नाही असे कोणीही म्हणाला नाही. कोणी गुन्हेगारी स्वरुपाचा अपराध करताना आढळला तर त्याला कठोर शिक्षा केली जाईल असे जिनांनी आता घोषित केले आहे. अधिकाऱ्यांच्या घरात लुटीचा किती तरी माल आढळला आहे. मला जितके काही करता येईल तितके मी करीन असे तुम्हांला मी आश्वासन देतो कारण मी 'करायला तरी पाहिजे वा मरायला तरी पाहिजे'. काल काय झाले ते तुम्ही पाहिलेच असेल. परंतु ईश्वराला माझ्याकडून काही काम करून घ्यायचे असेल तर ते मी केलेच पाहिजे.

अजूनही तारांचा आणि टपालांचा इतका काही ढीग जमा होत असतो की त्यातून माणसाला डोके वर करणे शक्यच होत नाही.

प्रार्थना प्रवचनाला जायला दहा मिनिट उशीर झाला. बापूजींनी सर्वांची माफी मागितली आणि याप्रमाणे प्रवचन सुरू केले –

काल जो स्फोट झाला होता आणि तो स्फोट झाल्यानंतरही मी शांतता ठेवली होती त्याकरिता अनेक लोक मला शाबासकी देत आहेत. माझे अभिनंदन करणारे फोन करत आहेत. तारा, पत्रे पाठवत आहेत. परंतु वास्तव दृष्टीने पाहिले तर यात मी कोणतेही शौर्याचे काम केले असे म्हणता येत नाही. जेव्हा बाँबचा धमाका झाला तेव्हा मला आजूबाजूला सैन्याचे लोक सराव करत असावे असेच वाटले होते. परंतु नंतर कळले की हे तर मला मारायचे कारस्थान होते. खरे शौर्य तर तेव्हाच म्हणता येईल की जेव्हा माझ्या समोरच बॉम्बचा स्फोट होईल आणि तरीही मी घाबरणार नाही. आणि तुम्ही जर पाहू शकला तर हसत हसत मी तुमचा निरोप घेईन! या सुदैवाची तर मी वाट पाहतो आहे.परंतु लोक आज माझी जी प्रशंसा करत आहेत तिच्याकरिता मी पात्र नाही.

"तुम्हा सर्वांना माझी एक नम्र विनंती आहे की ज्या भाईने हे काम केले आहे त्याच्याकडे तिरस्काराच्या वा घृणेच्या दृष्टीने पाहू नका. त्याच्या विचाराप्रमाणे मी त्याला हिंदू धर्माचा वैरी वाटत असेन. या तरुणाबद्दल मला दयाच वाटते. आणि असे असतानाही पोलिसांनी त्याला फार शौर्याने प्रत्युत्तर दिले आहे, आपण ज्याला दुष्ट समजतो त्याला शिक्षा करायचा आपल्याला अधिकार नाही. जे खरोखर दुष्ट आहेत त्यांना शिक्षा करणारा ईश्वर आहे. परंतु असा प्रकारे हिंदू धर्म वाचवता येऊ शकत नाही. यामुळेच माझ्यात तर माझ्या बालपणापासून 'सर्व धर्म समभावाची' भावना रुजलेली आहे. हिंदू धर्माच्या रक्षणाचे मी निमित्त व्हावे अशी जर ईश्वराची इच्छा असेल तर तो समादराची ही भावना सर्वांच्या अंतःकरणातून अभिव्यक्त करवील.

काल शीखभाई मला सांगून गेले की या कृत्यात आमच्यापैकी कोणीही नाही. असे करणारा जरी शीख असला वा मुसलमान असला तरी काय फरक पडतो? ईश्वराने त्याला सन्मती द्यावी म्हणूनच मी ही प्रार्थना करतो आहे. आणि मी तर पोलीस अधिक्षकांनाही सांगितले आहे की त्याला कोणी त्रास देऊ नये. त्याची काळजी घ्यावी. पंतु त्याला प्रेमाने जिंकण्याचा प्रयत्न केला पाहिजे. परंतु तुमच्या मनात खोलवर जर असा असा विचार असेल की या म्हाताऱ्याने केलेला उपवास व्यर्थ होता, परंतु हा जर उपवासात मेला तर आपल्याला कलंक लागेल या भीतीने जर तुम्ही मला जगवण्याचा प्रयत्न कराल तर तुम्ही सर्व गुन्हेगार आहा. परंतु तुम्हांला जर असे वाटत असेल की दील्लीत अशांतता झाल्यामुळे आपली बदनामीच झाली

असती तर या वातावरणाचा परिणाम निश्चितच आधीच्या गोष्टींवरसुद्धा झाला असता. पापाला कोणताही आधार नसतो.

या प्रार्थनासभेतच तुम्ही सर्व देवाचे नाव घेण्याकरिता आणि त्याचे काम समजून घेण्याकरिता गोळा झाला आहा. चोहोकडे फिरणारे हे पोलीसवाले आपल्याला जर मदत मिळू शकत नसाrल, धडाधड गोळीबार होत असेल आणि तरीही मी मुक्त मनाने आणि मुक्त कंठाने रामनाम घेत असेन आणि घ्यायला लावत असेन अशी शक्ती जेव्हा ईश्वर मला देईल तेव्हा मी अभिनंदनाकरिता पात्र ठरेन.

आणि मला तर हे कळल्याने आनंद झाला की या बॉम्ब फेकणाराला एका अशिक्षित भगिनीने धैर्याने पकडून दिले. माझी मान्यता आहे की माणूस शिकलेला असो की अशिक्षित, गरीब असो की श्रीमंत, त्याचे मन जर साफ असेल तर त्याच्याजवळ सर्व काही असते. तुम्ही कोणीही असा, परंतु तुमच्या मनात माझ्यावद्दल जे प्रेम आहे त्याकरिता मी पात्र झालो पाहिजे हीच प्रार्थना.

भावलपूरचे भाई खूपच घाबरलेले आहेत. आजच मला तेथील नबाबसाहेबांची तार आली आहे की त्यांनी त्यांच्याकरिता खूप मेहनत केली आहे. मुंबईच्या शीख भाईंची तार आहे की सिंधमधील दहापंधरा हजार शिखांच्या जीवाला आणि संपत्तीला धोका आहे. मी येथूनच पाकिस्तान सरकारला विनंती करतो की त्याने शिखांना आश्वस्त करावे की तुम्ही जर इथेच राहाल तर आम्ही तुमचे रक्षण करू. आणि नाही तर सर्व शिखांना एका ठिकाणी गोळा करून भारतात पाठवण्यासाठी त्यांच्या पूर्ण संरक्षणाची व्यवस्था करण्यात यावी. शिखासारख्या शूर प्रजेवर आणि त्यांच्या अब्रूवर हात टाकायची कोणात ताकद आहे आहे असे मला मुळीच वाटत नाही. शिखांनी धीर ठेवावा. त्याची परिस्थिती समजून घ्यायला मी आजच माझ्या तीन पारसी बंधूंना पाठवतो आहे.

एका भाईने माझ्या १९४२ च्या उपवासाशी माझ्या आताच्या उपवासाशी तुलना केली आहे आणि लिहिले आहे की तुमचा देह जेव्हा पडेल तेव्हा हिंसेचा स्फोट झाल्याशिवाय राहणार नाही.

१९४२ साली मी तुरुंगात गेल्यानंतर हिंसेचा स्फोट झाला होता ही गोष्ट खरी आहे. आणि आज आपण तिचेच परिणाम भोगत आहो. त्या वेळी जर संपूर्ण देश अंहिंसक राहिला असता तर आज आपली ही अवस्था झाली नसती. मला वाचवायचे असेल तर ईश्वरच वाचवील. अहिसेने ओतप्रोत असलेला माणूस जर मेला तर त्याने नुकसान होत नाही. मी तर गरीब माणूस आहे. माझी क्षमता ती काय? आणि ईश्वर तर काहीही क्षमता नसलेल्या गरीब माणसाला निमित्त करून त्याच्याकडून हवे ते करवून घेण्याकरिता समर्थ आहे.

दिल्लीत आता हिंदू-मुसलमानातील भांडणे सुरू नाहीत याचा आणि मुसलमान भगिनी आता मोकळेपणाने हिंडूफिरू शकतात याचा मला आनंद होतो. आपल्या हृदयाला, आपल्या अंतःकरणाला ईश्वराचे मंदिर बनवा.

प्रार्थनेनंतर बापूजी खुर्चीवरच आत आले. मुलाखतीला येणारांची रीघच लागलेली होती. येऊन प्रार्थनाप्रवचन पाहिले. सिंधची ही असह्य कहाणी सर्वांच्या हृदयाला पाझर फोडील अशी आहे. बापूजी नवीन पाऊल कोणते उचलतात हे पाहायला पाहिजे.

रात्री पंडितजींबरोबर एक तास गोष्टी केल्या. या उपवासाची आणि बॉम्बची घटना जरी भयानक असली तरी असे वाटत होते की बापूजींवर आता हल्ला होणार नाही! असे असले तरी बापूजींच्या लेखनात, विचारात, कामकाजात अजून कोणतीही गर्भित वा जनतेला चकित करील असे कृत्य करायला लावण्याकरिताची कोणतीही नवीन हालचाल दिसत नाही असे वाटते ! दोन दिवसात कार्यकारिणीचीसुद्धा सभा होणार आहे. तिच्यात आता काय होते ते पाहू या. अजून अग्नी धुमसतो आहे असेच वाटते. शांततेचा कोणताही परिणाम जाणवत नाही.

९।। वाजता झोपायची तयारी. मी भाईसाहेबांशी गोष्टी करण्याकरिता आणि लिहिण्याकरिता थांबले. आताच सर्वांच्या लक्षात येते आहे, आणि सर्वच म्हणतात की बापूंशी कोण किती प्रामाणिक आहे हे आताच कळेल. स्वस्तात किर्ती म्हणून लोक बापूंकडे येतात. बापू इतके विशाल हृदयी आहेत की ते सर्वांचे सारख्याच प्रेमाने स्वागत करतात. माझ्या मनात विचार आला की नाराणदासकाकासारख्यांनी आणि त्यांच्यासारख्या इतरांनी उपदेशात्मक पत्रे लिहिली पण ती प्रभावी ठरली नाहीत, ही वेगळी गोष्ट आहे. परंतु आता सर्वांची मला कींव वाटते. त्यात एक बंगाली भगिनी

आहे. ती नोआखालीहून आली आहे. तीसुद्धा चर्चेचा विषय झाली आहे. यामुळे तिने लग्न करण्यातच सर्वांची शोभा आहे असे वाटते. बापूजी मला म्हणाले, "सर्व जेव्हा पाहतात तेव्हा आपोआप दिसते, आणि ते पाहण्यात जेव्हा कोणी निमित्त होत नाही तेव्हाच लाभ असतो. मी आजच प्रार्थनेत म्हणालो होतो ना की पापाला कोणाचाही आधार नसतो. आणि इथेच सर्वांना बसवून इतक्या सगळ्या विरोधाभासात तुला तार करून महुवाहून थेट नोआखालीला बोलावण्यामागे हाच उद्देश होता. त्यांच्या दृष्टीत . . . हे सर्व पडू द्यायचे होते. आपल्याला काय पाहिजे, आपण काय होतो आणि आपल्याला काय व्हायचे आहे?" पाय धूत असताना बापूजींनी वरील शब्द उच्चारले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२२-१-'४८

आज पू. मोटीबाच्या मासिक मृत्यूदिनानिमित्त गीतापारायण. अर्धे पारायण होत नाही तोच बापूजींचा डोळा लागला. अजून अशक्तपणा तर आहेच.

प्रार्थनेनंतर बापूजींनी रात्रीच्याच सगळ्या गोष्टी केल्या. "मला वाटते की ज्या लोकांनी धिक्कार केला आहे त्यांना इच्छा होईल तेव्हा आपोआप आपले हृदय उघडावेच लागेल. . . नोआखालीहून . . . आपल्या सोबत अणलेल्या 'दीदी'संबंधी बोलत असताना बापूजी म्हणाले, ही गोष्टसुद्धा माझ्या नजरेबाहेर नाहीच. परंतु मी आता कोणाचा काजी का होऊ? सर्वांनी आपापला काजी व्हायला पाहिजे आणि समाजात त्यांना ज्या प्रकारे उभे राहायचे असेल त्या प्रकारे त्यांनी उभे राहावे. माझे हेच धोरण काँग्रेससंबंधी आहे, पाकिस्तानसंबंधी आहे आणि हिंदुस्थानविषयीही आहे. उद्याचे कोणाला माहीत? परंतु आता, आपल्या जीवनाचा शेवटचा श्वास सुरू असताना आपण पूर्णपणे तेजस्वी होऊन राहायला पाहिजे. मला खात्री आहे की, मी जरी एकटाच असलो तरी कोणताही फेरबदल आता होणार नाही. जसजसा मी विचार करत जातो तसतसा मी माझ्या विचारात अपार दृढ होत जातो. परंतु ज्यांचा माझ्या विचारांवर हल्ला करण्याकरिता विरोध आहे त्यांनी आपल्या हृदयावर हात ठेवून शोध घ्यायला पाहिजे. मी मान्य करतो की बॉम्बचा स्फोट अपरिहार्य होता. माझ्या जागेपणी ईश्वराने हे सुचिन्ह ईश्वराने पाठवले आहे आणि आज कदाचित तुला या यज्ञात अतिशय कठीण कसोटीत उत्तीर्ण होऊन अतिशय पवित्र अंतःकरणाने तू उभी राहिली आहेस आणि अशाच प्रकारे तू टिकशीलही. याचे कारण माझ्याकडे तू स्वेच्छेने आणि निःस्वार्थपणे आली आहेस. इतर जे आले त्या सर्वांची इतकी कठीण परीक्षा मी घेतलीच नाही आणि ती घ्यायची माझी इच्छाही नाही. आणि त्यातच समाजाचे आणि सहकाऱ्यांचे श्रेय सामावलेले आहे. मला तुझ्याशी हे बोलायचेच होते. आज बाच्या तिथीच्या निमित्ताने गीतापाठ सुरू होता तेव्हा मी खूप विचारात होतो की . . . यांच्या सारख्याचे हे हाल? या बंगाली भाईंबद्दल ही भावना? . . . ना च्यासारखा इतके खोटे बोलू शकतो? नोआखालीचे म्हण की राजकोटचे म्हण हे दोघेही चुप का बसले आहेत? परंतु ईश्वर सांगतो आहे की तुला मी एकामागून एकाचे - सर्वांचे स्वरूप दाखवून देईन आणि म्हणून हा स्फोटसुद्धा झाला. या स्फोटानंतर वातावरण खूप गंभीर झाले आहे आणि हे कोणाच्या लक्षात येईल असे नाही. परंतु आता या चर्चेत तुला पाडण्यात अर्थ नाही. माझ्या डोक्यात खूप काही

भरलेले आहे आणि त्या पद्धतीने तू मला समजून घेतले पाहिजे. तुझे तर गंगेत घोडे न्हाले असे समज. आणि काल मी प्रार्थनासभेत म्हणालो त्याप्रमाणे तोंडी रामाचे नाव असेल, तुझ्या मांडीवर असेन आणि हसतमुखाने कोणाच्या छऱ्याचा वा बंदुकीच्या गोळीचा घाव झेलत असेन - यामुळे जग काही म्हणो वा न म्हणो, कारण जग तर सरड्यासारखे रंग बदलवणारे आहे - परंतु मी मात्र तुला सांगतो आणि तुही कबूल करशील की मी तुझी खरोखरीची आई आहे, खरा महात्मा आहे. आणि असे काही जरी झाले तरी मला त्याचे नवल वाटणार नाही. आता पळ आणि बिसेनला मोकळे कर. 'हरिजन'ची तयारी करायची आहे."

खूप दिवसांनंतर बापूजी माझ्याशी अशा प्रकारे बोलले होते. मी हे लगेच लिहिते आहे. बापूजी टापाल पाहत आहेत. जवळ हिटर पडले आहे.

काही वेळ बापूंनी सांगितलेल्या गोष्टीच्या चित्राची कल्पना केली. परंतु बापूजी तर सांगत असतातच आणि मलाही पटते की बापूजींचा घात होण्याची वेळ आता गेली आहे आणि ते १२५ वर्ष जगतीलच. परंतु बापूजी 'दीदी'ची जी गोष्ट सांगत होते त्यावरून त्यांच्या हृदयात आपले सहकारी आपली फसवणूक करत असल्याबद्दलची वेदना कदाचित भरलेली असावी ! हे सर्व ते अतिशय गंभीर हृदयाने आणि चेहऱ्याने ते सांगत होते. सकाळच्या वेळी बापूजींचा वेळ वाया घालवणे मला मान्य नव्हते तसेच बोलल्यामुळेही त्यांना थकवा येत असतो. शिवाय त्यांच्याशी फार बोलत बसले तर लोकांची नाराजीही पत्करावी लागते, यामुळे मी यावर काहीही बोलले नाही. परंतु बापूजींना कोणाची किंमत किती हे पूर्णपणे माहीत होते आणि हे सर्व त्यांनी मला विशेषेकरून लिहून घ्यायला सांगितले. यामागे काही गर्भित हेतू असला पाहिजे. जे पेरतो तेच उगवते. बापूजींचे इतके सगळे सहकारी आणि विद्वान असतानाही, बापूजींजवळ माझे स्थान सध्या इतके पुढे आहे की, आणि ते मला इतक्या उच्च दृष्टीने पाहतात आणि शिकवतात की, यामुळे कुठेतरी खोल विवरात पडायची वेळ तर येणार नाही ना, अशी भीती मला क्षणोक्षणी वाटत असते ! यामुळे बापूजी जेव्हा केव्हा माझ्याबद्दल लोकांशी बोलत असतात वा लिहित असतात तेव्हा मला ते आवडत नाही. माणसाला फार उंच चढवले तर त्याच्यावर पडायची वेळही येत असतेच ना? यामुळे आपली मधली स्थितीच बरी.

रामदासकाका बारा वाजता आले. आज परत नागपूरला जाणार आहेत. सुशीलाबहेनला बापूजी भावलपूरला पाठवणार आहेत. या संबंधात बापूजी म्हणाले, ". . . ची जवाहरलालशी तुलना होऊच

शकत नाही. या कुटुंबाची शिकवणूकच काही वेगळी आहे. हिंदुस्थानात बॅरिस्टरांची वा पैसेवाल्यांची उणीव नाही. हिंदुस्थानात दुसरा जवाहर आहे काय ते मला सांग तर खरे?

बाकी तर बापूजींचे सर्व काही वक्तशीरपणे चालतच असते. जेवणात अजून धान्य सुरू केले नाही. वजन १०९ पौंडावर स्थिर आहे. आता तर मुसलमान विशेष अशी कोणतीही तक्रार करून राहिलेले नाहीत आणि दिल्लीत सर्व काही चांगले शांततापूर्वक सुरू असल्याचे जाणवते."

आज बापूजी प्रार्थनास्थळापर्यंत हळूहळू चालतच गेले. बापूजींच्या पायात अजून शक्ती आलेली नाही. ते जेव्हा खांद्यावर हात ठेवायचे तेव्हा सामान्यपणे त्यांच्या शरीराचे वजन जाणवत नसे. परंतु आज त्यांनी जेव्हा खांद्यावर हात ठेवले तेव्हा त्यांचे वजन जाणवले. यावरून बापूजींमध्ये अशक्तपणा असल्याचे तर जाणवतेच. परंतु त्यांना चालत जाताना पाहून सगळ्यांना खूप आनंद झाला हे मात्र खरे.

आजच्या प्रवचनात बापूजी म्हणाले,

> "तुम्ही पाहतच आहा की ईश्वर हळहळू माझ्या शरीरात शक्ती भरतो आहे. आणि मी आशा करतो की मी लवकरच आधीसारखा होईन. परंतु अखेरीस तर हे सर्व ईश्वराधीनच आहे आहे ना?
>
> "एका भाईचा आताच मला लेखी संदेश मिळाला आहे की जवाहरलालने आणि इतर मंत्र्यांनी आणि अंमलदारांनी आपापल्या घरात निर्वासितांना राहता येईल अशी व्यवस्था तर केली आहे. परंतु यात किती लोकांचा समावेश होऊ शकेल? आणि मोठ्या प्रमाणात लोक तर केवळ गोष्टीच करत असतात.
>
> "लोक म्हणतात की आधी एक लाख रपये गोळा करायला किती तरी कष्ट घ्यावे लागत असत. लोक द्यायचे परंतु आम्ही भिकारी होतो. आज आपल्या हातात करोडो रुपये आले आहेत. परंतु इतका पैसा गोळा करायची जर आपल्यात शक्ती आली तर काळजीचे काही कारण राहणार नाही. खर्च तर इंग्रजांच्या काळाप्रमाणेच सुरू आहे. इंग्लंडशी जर आपल्याला बरोबरी करायची असेल तर आपण करू शकतो. या नाजूक काळात मौजमजेकरिता तर पैसा काही खर्च करता येऊ शकत नाही. आपण तर असा विचार करायला पाहिजे की काही विशिष्ट बाबतीत आपल्याला जर इंग्रजांशी

स्पर्धा करायची तर आपण करू शकतो. याकरिता आपल्याला कोणीही अडवू शकत नाही. परंतु तिथे एका माणसाचे जितके उत्पन्न आहे त्यापेक्षा इथे पुष्कळ कमी उत्पन्न आहे. आपल्यासारखा एक गरीब देश पैशासंबंधी इतर देशांशी जर स्पर्धा करू लागला तर तो मरून जाईल. इतर देशांतील प्रतिनिधींनाही ही गोष्ट लागू होते. आपण कॉंग्रेसीच असे म्हणत होतो की आमचे राज्य जेव्हा येईल तेव्हा आम्ही हे सर्व बदलून टाकू. तर आता अमेरिकेशी स्पर्धा करून खाण्यापिण्यात वा पार्ट्या करण्यात व्यर्थ पैसा खर्च करण्याचा मूर्खपणा थांबवला पाहिजे. परंतु आज मला खेदपूर्वक सांगावे लागते की आपण अजून तसे करू शकलेलो नाही. माणसाने आत्मशुद्धीचा प्रयत्न केला पाहिजे. पैशाने वा पैसा मुर्खपणाने खर्च केल्याने माणसाची मुळीच किंमत वाढत नसते.

"ग्वाल्हेरमधील काही मुसलमानांची दुरावस्था व्यक्त करणारी तार मी तुम्हांला काल वाचून दाखवली होती. (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी २०, १९४८) परंतु आज मला तुम्हांला आनंदाची बातमी सांगायची आहे की ग्वाल्हेरच्या महाराजांनी जनतेच्या हातात सत्ता सोपवण्याचे निश्चितपणे ठरवले आहे. प्रजामंडळवाले या राज्यकारभाराचा स्वीकार करू शकतात. ही तर खुश होण्याची गोष्ट आहे. परंतु याचबरोबर तिथे हिंदू-मुसलमान वैमनस्य जर शिरले तर ही कठीण गोष्ट होईल. महाराजांनी तर प्रजेचा सेवक होऊन राहायचे असते. आणि आजच्या आत्मशुद्धीच्या या यज्ञात राजा काय वा प्रजा काय सर्वांना समान भोग अर्पायला पाहिजे. असे झाले तरच आजच्या या कठिण जगात उच्च पातळीवर परिस्थिती नेता येईल."

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले नाही. हळूहळू आले. आल्यानंतर मुलाखतीकरिता येणारे, डॉक्टर वगैरे जितका वेळ होते तितका वेळ त्यांच्याशी बोलतच होते. कार्यकारिणीत मांडावयाच्या मुद्द्यांची चर्चा केली. पंडितजी आले. नंतर प्रवचन तपासले. आणि मग झोपायची तयारी.

मी मालीश करत असताना परत मला म्हणाले, "मी सकाळी तुला ज्या गोष्टी सांगितल्या होत्या त्यांची नोंद तू मला उद्या दाखवशील. आणि त्याबद्दल कोणाशीही चर्चा करण्याची आवश्यकता नाही. तुला तर मी हे सांगायला पाहिजेच होते. हे जर मी तुला सांगितले नसते तर मी माझ्या धर्माला चुकलो असतो. म्हणून सांगितले. तू सुखी आणि स्वस्थ राहिलीस की मी जिंकलो."

बापूजींच्या वात्सल्याला तर सीमाच नाही. इतक्या सगळ्या गहन प्रश्नातही यांच्या चौकसपणाला आणि कर्तव्यदक्षतेला क्वचितच काही उपमा देता येईल. काही तरी विचित्र घेणे वसूल करते आहे.

मीसुद्धा गप्पागोष्टी करत माझे कामकाज आटोपून अकरा वाजता झोपले. आज बापूजींकरिता दातणचा कुंचा करता करता चांगलाच वेळ झाला. आणि तो कुंचा अशा प्रकारे करावा लागत होता की बिरला भवनात झोपलेल्यांची झोपमोड होणार नाही. शेवटी दाराबाहेर जाऊन कुंचा केला. पोलिसांचा पहारा असल्यामुळे कुंपण आणि बंगला खूपच जागृत आहेत.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२३-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर नोंदच मागितली. ती पाहिली आणि तिच्यासंबंधी बापूजींनी असे लिहायला लावले -

"चि. मनूडी,

"काही दिवसांपासून मी तुझी रोजनिशी पाहतो आहे. मला फार आनंद झाला. तू परीक्षा पास झाली. तू माझी सेवा फार भक्तिभावाने केली आहे. कुटुंबात वा बाहेरही तुझ्यासारखी पवित्र मुलगी मला दिसली नाही. यामुळेच इतर कोणाचीही आई न होता मी केवळ तुझीच आई झालो. तुझ्या रोजनिशीतून तुझ्या अस्वस्थ मनाचे दर्शन होते. आणि हे तू मला का सांगितले नव्हते? तू. . . . (इथे नाव वगळलेले आहे.) बद्दल वा इतर कोणाबद्दल काळजी करण्याचे कारण काय? ती मुलगी मला फसवत आहे. परंतु खरे म्हणजे जे मला फसवण्याचा प्रयत्न करत असतात ते स्वतःच स्वतःला फसवत असतात. तू या यज्ञात जी सेवा केली आहे ती माझ्याकरिता अमूल्य आहे. परंतु तू तुझ्या सर्व शरीराची नासाडी केली हा तुझा गुन्हा आहे. तुझ्या शारीरिक मेहनतीपेक्षा तुझा संकोच तुला खाऊन टाकतो हे याचे कारण आहे हे तुझ्या लक्षातच येत नाही. कोणी सांगावे अजून एखादा बॉम्बस्फोट होईल आणि माझ्या ओठांवर रामनाम असताना तो मला तुझ्याजवळून घेऊन जाईल? जर तसे झाले तर तुझा संपूर्ण विजय होईल, परंतु ते पाहायला मी हजर नसेन. परंतु खरडलेले हे शब्द राहतील आणि तूही राहशील. तू आज जशी सत्तर वर्षांची दिसतेस तरी तशी न दिसता १७ वर्षांची फुललेली तरुणी दिसशील तेव्हाच माझा विजय झाला असे मला वाटेल. ईश्वर आपल्याला कशी मदत करतो ते पाहा. प्रत्येकजण आपला रंग दाखवतो आहे. कॉंग्रेसमध्येसुद्धा भरपूर संभ्रम आहे.

"आज मी तुला हे लांब पत्र लिहिले आहे. याची प्रत जयसुखलालला पाठव.

"तुझ्या सेवेला फळ येवो.

बापूचे आशीर्वाद"

"बापूजींनी अशक्तपणामुळे या पत्राचा मजकूर माझ्याकडूनच लिहवून घेतला आणि नंतर शेवटचे वाक्य "तुझ्या सेवेला फळ येवो" असे स्वतः लिहून त्यावर सही केली - बिर्ला भवन, नवी दिल्ली, सकाळी ६ वाजता, जानेवारी २३, १९४८

"यानंतर दुसऱ्या एका लेखनात . . . चे जे पत्र आले होते त्याचे उत्तर लिहिले. मध्ये पंतजी येऊन गेले. त्यांची प्रकृती विशेष चांगली वाटली नव्हती.

मालीश, बांगाली पाठ आणि आंघोळ नेहमीप्रमाणे चालले. आंघोळ करत असताना मी त्यांची हजामत करत होते. पण ती करत असतानाच त्यांचा डोळा लागला.

". . . ला

उपवास सोडल्यामुळे जबाबदारी कमी होत नसते तर ती वाढत असते. हळूहळू माझी शक्ती परत येत आहे. दिल्लीत काही करू शकलो तर माझी शक्ती खरोखरच परत येऊ लागली आहे असे समजता येईल आणि २० तारखेला तर मी मेलोच असतो. परंतु ईश्वराने मला वाचवले कारण त्याला माझ्याकडून काही काम करून घ्यायचे होते. परंतु माझ्या ओठावर हसू असताना मी जर मरण पावलो तर ती ईश्वराची महान कृपाच समजायची. अशा कृपेकरिता मी पात्र आहे काय? अशा प्रकारच्या मृत्यूकरिता पात्र ठरण्याचा माझा प्रयत्न सुरू आहे. दिवसेंदिवस माझा हा प्रयत्न प्रखर होत आहे. आज सकाळी मी मनूशी मोकळेपणाने बराच वेळ बोललो. मी रामाचा सेवक आहे. मी तोपर्यंत काम करेन जोपर्यंत मी काम करावे अशी त्याची इच्छा असेल. मी दोन्ही गोष्टींकरिता तयार आहे. मला अहिंसा पूर्णपणे कळावी आणि इतरांनाही ती समजून सांगता यावी इतकीच माझी प्रार्थना आहे. या प्रार्थनेत तूही सहभागी हो.

बापूचे आशीर्वाद"

बापूजी जेवण द्रव पदार्थांचेच करत असतात. दुपारी चांगले झोपले. अजूनही खूपच थंडी आहे. दिवसासुद्धा पाहिजे तसे उन्ह पडले नव्हते. बापूजी नोआखालीवाला टोप घालूनच असतात.

जुनागढ आता शांत आहे असे वाटते. बापूजी तर म्हणतही असतात की नबाबसाहेब जर पळून गेले नसते तर त्यांचा योग्य सन्मान तर करण्यात आला असताच. आणि त्यांना आर्थिक दृष्टीने त्रास तर झाला नसता. परंतु त्यांना हुसकावण्यात आल्यामुळेच असे झाले आहे. हे . . . मध्येच इथे येत आहेत

यामागे काही रहस्य आहे असे बापूजींना वाटते. कदाचित शिकवून पाठवण्यात आले असावे. बळवंतभाई आले की त्यांच्याकडे चौकशी कर असे बापूजींनी मला सांगितले आहे. कार्यकारिणीची सभा असल्यामुळे आता येतीलच.

पंडितजी, सुचेताबहेन, कृपलानीजी आणि इतर स्थानिक पुढारी तर येऊन जातच असतात. लॉर्ड आणि लेडी माऊंटबॅटन अधूनमधून बापूंची चोकशी करत असतातच. शैलेनभाई म्हणाले की आज नेताजींचा जन्मदिवस आहे आणि यामुळे त्यासंबंधात बापूंनी प्रार्थनाप्रवचनात काही सांगायला पाहिजे.

प्रार्थनेत आज भगिनी फार गोंगाट करत होत्या. इथे लिहिताना तर चांगले वाटत नाही. भाषणाच्या रेकॉर्डमध्येही त्यांचा आवाज आल्याशिवाय राहत नाही.

बापूजी म्हणाले,

"आज सुभाष बोसची जन्मतिथी आहे. मला तर कोणाचीही जन्मतारीख क्वचितच आठवत असते. परंतु आज मला आठवण करून देण्यात आली याचा मला आनंद होतो.

"सुभाषबाबू हिंसेचे पुजारी होते, मी अहिंसेचा आहे. परंतु याचे काय? संत तुलसीदास रामायणात म्हणाले आहेत की 'संत हंस गुण गहीहि पय परिहरि वारि विकार' हंस ज्याप्रमाणे पाणी टाकून देऊन दूध पितो तसेच माणासच्या गुणदोषाचे असते. तसेच आपण गुणाचे पुजारी असायला पाहिजे. सुभाषबाबू किती मोठे देशभक्त होते हे इथे सांगत बसणे अस्थानी होईल. ते देशासीठी आपल्या जीवनाचा जुगार खेळले. किती मोठे सैन्य तयार केले? किती मोठी सेवा केली? आणि तेही कोणत्याही जातिजमातीच्या भेदभावाशिवाय! त्यांच्या सैन्यात जसा प्रांतभेद नव्हता तसाच रंगभेदही नव्हता. ते स्वतः सेनापती असूनही त्यांची काही अतिरिक्त व्यवस्था करण्यात आली होती आणि इतरांची कमी असे काही नव्हते. सुभाषबाबूंच्या मनात सर्वधर्मसमभाव होता. आणि यामुळेच त्यांनी संपूर्ण देशातील बंधुभगिनींचे मन जिंकले होते. त्यांनी ठरवलेले काम पार पाडले. त्यांचे या सद्गुणांची आपण आठवण ठेवली पाहिजे ते सद्गुण आपण आपल्या जीवनात उतरवण्याचा प्रयत्न करणे हीच त्यांना दिलेली कायम टिकणारी श्रद्धांजली असेल.

"ग्वाल्हेरहून मला अशी तार मिळाली आहे की तिथे एका गावात आपसात भांडण झाले. त्यात हिंदू-मुसलमानांचे भाडण असा काहीच प्रश्न नव्हता. यामुळे मला आनंद झाला. मुसलमान भाईंनाही मला सांगायचे आहे की माझ्याकडे कोणतीही गोष्ट आली तर मी ती जनतेला सांगून टाकत असतो. आणि रेडिओद्वारे ती लगेल सगळीकडे पोहोचते. परंतु मुसलमानभाई जर मला असे खोटेनाटे सांगणार असतील वा पूर्वग्रह मनात ठेवून काहीही कल्पना करतील तर त्यांच्याबद्दलचा मान वा प्रेम तर कायम राहणारच नाही उलट गैरसमज निर्माण होतील. यामुळे कोणतीही गोष्ट वाढवून सांगण्यात येऊ नये. माणसाने नेहमीच स्वतःची चूक पहाडासारखी करून दाखवली पाहिजे, आणि इतरांच्या चुका जर तो राईएवढ्या करून पाहील तरच त्याची प्रगती होईल.

"म्हैसूरसंबंधी तर तेथील सरकारला मी सांगूनच टाकले आहे की खरी हकिगत असेल तरच प्रसारित करा. जुनागढच्या मुसलमानांच्या तारा आल्या आहेत की सरदारसाहेबांच्या देखरेखीत राज्यकारभार सुरू झाल्यापासून आम्हांला न्याय मिळू लागला असून जुनागढमध्ये आता कोणीही फूट पाडू शकत नाही. हे कळल्याने मला खूप आनंद झाला.

"मेरठचे मुसलमानसुद्धा सांगत आहेत की माझ्या उपवासाची चांगली फलप्राप्ती होते आहे आणि आम्हांला जसे सरकार पाहिजे तसेच हे आहे.

"सरकार बदलण्याचा प्रश्न कुठून निर्माण होतो हे तर ईश्वरालाच माहीत. परंतु तुम्हांला जर हे लोक पसंत नसतील तर यांना काढून टाकणे तुमच्या हाती आहे. परंतु मी तुम्हांला सांगायलाच पाहिजे की आजच्या परिस्थितीत त्यांच्याशिवाय इतक्या गुंतागुंतीच्या परिस्थितीत राज्य चालवणे फार कठीण गोष्ट आहे. सध्याच्या राज्यकारभाराकडे अविश्वासाने पाहून चालणार नाही. न्याय करायचे काम सरकारचे आहे. ते त्याला सोपवले पाहिजे.

"माझ्या प्रकृतीची चौकशी करणाऱ्या अनेक तारा येत आहेत. प्रत्येकाला व्यक्तिगत उत्तर देणे अशक्य आहे. परंतु या संर्वांच्या आशीर्वादाला येश यावे हीच प्रार्थना.

प्रार्थनेनंतर एक फेरी मारली. अजूनही पूर्ण शक्ती आलेली नाही.

प्रार्थननेंतर भाषण लिहिले. पंडितजींशी गोष्टी केल्या. बापूजी म्हणाले की मीसुद्धा काँग्रेसच्या धोरणासंबंधी एक वक्तव्य देणार आहे.

९.१५ ला झोपायची तयारी. कदाचित आम्हांला वर्ध्याला जावे लागेल. जमनालालजींच्या तिथीच्या निमित्ताने तिथे कार्यकर्त्यांची एक सभा ठेवायचा विचार करत आहेत. सेवाग्राम आश्रमात स्थिरावण्याचा बापूजींचा विचार नाही. यामुळे या सर्व संस्था कशा चालवायच्या याबद्लही विचार करायचा आहे. आणि बापूजींच्या अनुपस्थितीत दिल्लीतील शांतता कितपत टिकते याचीसुद्धा परीक्षा होईल. आणि जर तसे असेल तर बापूजींचा पाकिस्तानमध्येही जायचा विचार आहे. तेल चोळत असताना बापूजी मला म्हणाले,"माझी इच्छा आहे की आपण पाकिस्तानात जाण्यापूर्वी जयसुखलाला भेटून जाण्याकरिता तू लिही." मी म्हणाले, "मी नाही लिहिणार, तुम्हाला लिहायचे असेल तर लिहा." उद्या सकाळी लिहिण्याची आठवण दे असे म्हणाले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२४-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर बापूजींनी आत जाऊन आधी माझ्या वडिलांना पत्र लिहवून घेतले. मला आठवण द्यावी लागली नाही.

"चि. जयसुखलाल,

"पुष्कळ दिवसांनंतर तुला पत्र लिहीत आहे. परंतु मनू तुला लिहीत असते आणि तूही तिला लिहीत असतोस. यामुळे तुला आणि मला एकमेकांच्या बातम्या कळत असतात.

"दिल्लीत काही तरी साध्य करण्यात आले असे कोणी म्हणू शकेल. ते किती दिवस टिकते हे पाहावे लागेल. उपवासानंतर आलेला अशक्तपणा अजून कायम आहे. परंतु ईश्वर हळूहळू मला परत शक्ती देतो आहे. मुत्रपिंड आणि यकृत अजून पूर्वीप्रमाणे काम करत नाहीत.

"मी हे मनूबद्दल लिहीत आहे. गत एक वर्षापासून चि. मनूडीला तू या महान यज्ञाकरिता मला अर्पण केले होते. तिची परीक्षा घेण्याकरिता काही वेळा मला तिच्याशी कठोरपणे वागावे लागते असे म्हटले तर चूक होणार नाही. परंतु जितका मी तिच्याशी क्रूरपणे वागतो तितके ते तिच्याकरिता आशीर्वादस्वरूप असते. या सर्व सत्त्वपरीक्षेत ती न घाबरता शिरली आणि सुखरूप बाहेर पडली. मी श्रीरामपूरमध्ये म्हणालो होतो त्याप्रमाणे या यज्ञात आपल्याला करायचे वा मरायचे आहे. इथे या दोन्ही गोष्टी पूर्ण होतात. २० तारखेला जेव्हा बॉम्बस्फोट झाला तेव्हा इतरांबरोबर मनू माझ्या मागेच बसलेली होती. यामुळे आम्ही दोघेही मरू शकलो असतो. परंतु राम ज्यांचे रक्षण करतो त्याला कोण मारू शकतो ! काल मनूशी मी बराच वेळ बोलत होतो. तू जर तिथून मोकळा होऊ शकत असशील तर दिल्लीला वा वर्धेला ये असे मी तिला तुला लिहायला सांगितले होते. शक्य आहे की जमनालालच्या पुण्यतिथीकरिता (ही फेब्रुवारी ११ला येत असते.) मी वर्धेला जाईन. परंतु हे अनिश्चित आहे. दिल्लीतून मी निघू शकेन असे मला वाटत नाही. मनू म्हणाली की या यज्ञातील सहभागाकरिता मीच अटी घातलेल्या असल्यामुळे मी स्वतःच तुला लिहायला पाहिजे. माझा काय कार्यक्रम आहे ते तू वृत्तपत्रातून पाहिले आणि मी जिथेकुठे असेन तिथे तू आलास तर मला खरोखर आनंद होईल. मी माझ्यावरील कर्ज फेडले

असल्याचे तुझ्या लक्षात येईल. तुला मनू रोजनिशी पाठवतच असते. तिने रोजनिशी लिहिण्यात बरीच प्रगती केली आहे. टिपण लिहिण्यात ती बराच रस घेत असते आणि जेव्हा मी ते पाहतो तेव्हा महादेवचा चेहरा माझ्यासमोर येतो.

"प्रार्थनेनंतर लगेच मी या पत्राचा मजकूर सांगत आहे. इथे पत्रांचा ढीग लागलेला आहे व त्याच्याकडे लक्ष देणे आवश्यक आहे. ईश्वराची इच्छा असेल तर आपण लवकरच भेटू व मग आपण बाकीच्या विषयावर बोलू.

"चि. मनूडी मजेत आहे. तिला लठ्ठ करता येईल अशी काही जादू तुझ्याजवळ असेल तर मला सांग. मुली आपल्या सासरी खुष असतील.

आशीर्वाद,

बापू"

* * *

"... ला,

"इथे सर्व काही ठीक आहे परंतु इतरत्र मात्र निश्चितच गोंधळ सुरू आहे. सिंध आणि वायव्य सरहद्द प्रांतातील परिस्थिती अजूनच बिघडत चालली आहे. जिना, लियाकत अली आणि इतरांशी बोलण्याकरिता मी जहांगीर पटेल आणि दिनशा मेहतांना पाठवले आहे. माझ्या प्रायोजित पाकिस्तान भेटीत मला सुऱ्हावर्दींची चांगलीच मदत होईल असे वाटते. परंतु हे सर्व दिवास्वप्न आहे.

"ईश्वरकृपेने हळूहळू माझी शक्ती परत येते आहे. मी रामाचा सेवक आहे. जोपर्यंत त्याची इच्छा असेल तोपर्यंत मी त्याचे काम करीन. सत्य आणि अहिंसेचे दर्शन घडवता येईल असा मृत्यू मला आला तर मी जिंकलो असे मी समजेन. २० तारखेला जे काही घडले त्यात मी कोणतेही धैर्य दाखवले नाही. तो सैनिकांचा सरावातील भाग असावा असे मला वाटले होते. ती माझ्या मृत्यूची सूचना आहे असे मला कळले असते तर मी कसा वागलो असतो हे मी सांगू शकत नाही. यामुळे मी महात्मा नाही. लोक मला महात्मा म्हणतात म्हणून काय झाले? मी सामान्य मर्त्य माणूस आहे. हो, मी जर सत्य, अहिंसा, अचौर्य, ब्रह्मचर्य आणि अशाच गुणांचे

प्रामाणिकपणे अनुसरण केले असते व हे सर्व मी ईश्वरसाक्षीने केले असते तर मला निश्चितच हवा तसा मृत्यू मिळाला असता. प्रार्थना प्रवचनात (पाहा प्रार्थना प्रवचन, जानेवारी २१, १९४८) मी इच्छा व्यक्त केली होती की जरी कोणी मला मारेल तरी माझ्या अंतःकरणात त्याच्याबद्दल दुर्भावना नसावी व माझ्या ओठावर रामनाम असताना मला मृत्यू आला पाहिजे. आज प्रार्थनेनंतर मी मनूच्या वडिलांना पत्र लिहिले. हे दुसरे. उत्तराची वाट पाहत पत्रांचा ढीग पडला आहे. आजपासून कार्यकारिणीची सभासुद्धा सुरू होणार आहे. यामुळे सकाळच्या प्रार्थनेनंतरच डाक पाहता येऊ शकते.

"तेथील परिस्थितीबद्दल तू मला कळवत जा. सेवाग्रामला जाण्याबद्दल माझे काहीही निश्चित नाही."

* * *

ही दोन पत्रे लिहिल्यानंतर बापूजी थोडेसे झोपले. मालीश, आंघोळ नेहमीप्रमाणे चालले. आज जास्तच थकवा वाटत होता. यामुळे सकाळी मौन घेतले. दुपारी कार्यकारिणी सुरू होती, परंतु तिथेही असेच केले. अजून आहार तर द्रव पदार्थांचाच आहे. सुशीलाबहेन तर भावलपूरला जात आहेत. प्रवचनाचा इंग्रजी अनुवाद तर मी हिंदीत केलेल्या नोंदीवरून चांदवानीजीच करत असतात. परंतु बापूजींना ते चांगल्या प्रकारे तपासावे लागत असते.

चांदबहेनच्या गालावर किती तरी काळे डाग पडलेले असल्यामुळे त्यांच्यावर एक लहानशी शस्त्रक्रिया करावी लागली. त्यांनासुद्धा अशक्तपणा तर आहेच. त्यांना आगगाडीतून फेकून दिल्याचा परिणाम तर अजूनही आहे. दुपारी चहा घेतल्यामुळे त्यांना उलटी झाली. बापूजी त्यांची खूपच काळजी घेतात. आणि शक्य ती उपाययोजना करत असतात. अशाही परिस्थितीत उपवासामुळे त्यांना आलेला अशक्तपणा कायम असतानाही त्यांच्यावर कामाचे असह्य ओझे आहे. तशात त्याना देशातील आणि विदेशातील लोकांना मुलाखतीही द्याव्या लागत असतात. या अशा परिस्थितीत बापूजी जी सर्वांची काळजी घेतात त्यात काहीही कमी झालेले नाही. दुपारी तर कार्यकारिणीची बैठक झाली होती. तिथून सरळ प्रार्थनेकरिता गेलो.

आज प्रार्थनेत गर्दी आणि गडबडगोंधळ हे दोन्हीही चांगलेच होते. काश्मीरची समस्यासुद्धा उग्र झाली आहे.

आजच्या संदेशात बापूजी म्हणाले,

> "या दोन्ही प्रदेशांमध्ये (भारत आणि पाकिस्तानमध्ये) कैद्यांची देवाणघेवाण करावी आणि दोन्ही प्रदेशांमधून पळवण्यात आलेल्या स्त्रियांना परत पाठवावे. परंतु सध्या यावरील अंमलबजावणी अडकली आहे. त्यामागचे कारण असे सांगितले जाते की पूर्व पंजाबमधील देशी संस्थानांमधील सर्व कैद्यांना सोडण्याच्या मागणीसोबत इतर कैद्यांच्या देवाणघेवाणीची मागणीही जोडावी, अशी सूचना पश्चिम पंजाब सरकारने मांडली आहे. यावर पूर्व पंजाब सरकारचे म्हणणे आहे की तडजोडीच्या वेळी अशी कोणतीही स्पष्ट मागणी पश्चिम सरकारने केली नव्हती. आता हे लोक नवीन नवीन अटी घुसवत आहेत. ही गोष्ट बरोबर आहे असे म्हणता येऊ शकत नाही. मी तर वैयक्तिक पातळीवर असा सल्ला देईन की पश्चिम पंजाब जरी आपल्याला दहाच मुली परत करत असेल तरी आपण दहाच मुली परत केल्या पाहिजे आणि अकरावी नाही असे कोणी सांगितले आहे? अशाही बाबतीत अटी घातल्या पाहिजे काय? पश्चिम पंजाब सरकारपर्यंत जर माझा आवाज पोहोचू शकत असेल तर त्यांना मी म्हणेन की काय लहान गुन्हा आणि काय मोठा गुन्हा ! आपला हेतू जर सौजन्यपूर्ण असेल तर दोघांचेही अपराध सारखेच असतील. असे जर असेल तर अदलाबदलीच्या या सुंदर कामाला इतका विलंब होण्याकरिता जे कारण सांगण्यात येत आहे ते शोभण्यासारखे नाही, त्याच्यात जोरही नाही. लोक तोंडाने एक गोष्ट सांगतात आणि काम मात्र वेगळे करतात. यामुळे मला वाटते की मी माझा उपवास कदाचित मी लवकर सोडला असेल. माझे शब्द पालन करण्याचे हे काम नाही, त्यांचा मर्म समजून घेतला पाहिजे."

भगिनींचा गोंगाट इतका होता की बापूजींना बोलण्याचा आणि श्रोत्यांना ऐकण्याचा सारखाच त्रास होत होता. प्रार्थनेनंतर पंडितजी आले. ते बराच वेळ बसले. २७ तारखेला उरूसचा मेळावा शांततापूर्वक भरवण्यासारखे वातावरण झाले आहे. दिल्लीचे कामकाम तर जवळपास व्यवस्थित सुरू आहे. परंतु सिंध सतावतो आहे आणि त्याचा इथे परिणाम झाला नाही तर चांगले होईल.

कताई, मालीश वगैरे नेहमीप्रमाणे चालले. ९। वाजता झोपायची तयारी.

. . . (बहुधा प्यारेलालजी अनुवादक) ने ज्या भगिनीला नोआखालीहून आणले त्या भगिनीशी त्यांची लग्न करायची इच्छा आहे असे दिसते. परंतु सुशीलाबहेनला ते मान्य नाही. परंतु बापूंच्या विशाल शक्तीचे खरे दर्शन तर बापूच्या अशा विशाल दरबारातूनच होते. या दरबारात राहण्यात तर कसोटी असते. ज्याच्यावर ईश्वरी कृपा असेल तोच तिथे टिकाव धरू शकतो. अनेकांना असे वाटत असते की महापुरुषाजवळ असा माणूस कसा राहू शकतो? पण यातच महापुरुषाची कसोटी नसते काय?

बिरला भवन, नवी दिल्ली,

२५-१-'४८

३।। वाजता प्रार्थना. दातण करत असताना बापूजी म्हणाले, "मला दिसते आहे की काँग्रेस, देश, दिल्ली, आपण - कोणाचेही वातावरण स्वच्छ नाही. या सर्वांवर मला संकटच दिसते आहे. माझ्या उपवासानंतर मला केवळ सांप्रदायिक शुद्धीच नको आहे. आपण सर्व समंजस लोकांनी मानवसमाजाची शुद्धी केली पाहिजे. नोआखालीत मी कच्चे खायचे ठरवले होते. हे . . . ला आणि . . . ला स्पष्टपणे कळायला पाहिजे. इथे आलेल्या या बंगाली भगिनीला काय हवे आहे यासंबंधात मनःपूर्वक चौकशी केली पाहिजे. काँग्रेस मला फसवते आहे, जिनासाहेब मला फसवताहेत असे लोक म्हणत असतील, पण खरे सांगायचे तर मला फसवायचा धंदा खरे म्हणजे तुझ्यासारखे माझ्या जवळचे लोक करत असतात. आणि म्हणूनच मी म्हणत असतो की तुम्ही माझा त्याग करून तुम्हांला योग्य वाटेल त्या मार्गाने जा आणि मला एकट्याला राहू द्या. यात माझे, तुमचे आणि समाजाचेही जास्त श्रेय आहे. मी विचार करतो की . . . त्याला काय करायचे आहे हे स्पष्ट करावेच लागेल. आणि नाही तर त्याला जे करायचे असेल ते त्याने करणे हे जास्त चांगले. . . .ची नाराजी पत्करून त्याने काही करावे अशी माझी इच्छा नाही. आणि हा काही माझ्या सेवेचा भाग नाही. मनू . . . आणि माझे मन किंचितही वेगळे नाही. परंतु मनूची थोडीशी जबाबदारी . . . च्या वर वा . . . च्या वर नव्हती आणि नाही. असे असूनही त्या लोकांनी ती जबाबदारी घेतली. पण हा ना तर सासरा आहे, ना तिचा पती आहे. असे असूनही सर्व चूप का आहेत याचेच मला आश्चर्य वाटते. तसेच . . . आहे. माझ्या मनात मनूच माझी नात आहे आणि दुसरी कोणी नाही असे नाही. परंतु याचा साक्षीदार मात्र ईश्वरच आहे. अनेक मुली माझ्या नातीसारख्या आहेत, मनूने या यज्ञकुंडात जाणीवपूर्वक झेप घेतलेली असल्यामुळे ती या सर्वांपेक्षा जास्त आहे हेही खरे आहे. याकरिता हिने अनेक हालअपेष्टा सहन केल्या आहेत. मी जर जिवंत राहिलो, प्रकृती चांगली राहिली, लोकांमध्ये सन्मती असेल तर तुम्ही सर्व पाहाल की या यज्ञाचा इतिहास भावी पिढ्यांना एक नवीनच प्रेरणा दिल्याशिवाय राहणार नाही. मी आज मरो की जगो, परंतु मला जर माझ्या सिद्धांताचा आणि माझ्या जीवनाचा हिशेब करण्याची संधी मिळाली तर हा माझा शेवटचाच यज्ञ आहे. या यज्ञाची किंमत कदाचित कोणालाही नसेल, आणि मनूलाही नसू शकेल कारण ती इतकी लहान आहे की ती आशेवर

निर्धास्तपणे बसून राहू शकत नाही. परंतु माझ्या जीवनाचे ध्येय - इतके की संपूर्ण स्थितप्रज्ञ होण्याचे मी जवळपास पूर्ण केले आहे असा खोलवर विचार केला असता मला प्रकाशाचा भास होतो."

दातण करता करता अतिशय गंभीपणे बापूजींनी वरील गोष्ट सांगितली.

प्रार्थनेनंतर आत येऊन बापूजी मला परत म्हणाले, "अजूनही वातावरण निवळल्याचा मला अनुभव येत नाही. बापू विशिष्ट गोष्ट करतात म्हणून ती आपणही केली पाहिजे ही गोष्टच मुळात मला पसंत नाही. आज कार्यकारिणीतसुद्धा हेच सुरू होते. यात मला माझी हिंसाच दिसते. बापूला पसंत नाही म्हणून करायचे नाही अशा गोष्टीने ना तर बापूचा लाभ होतो ना देशाचा की ना स्वतःचा. आपले स्वतःचे काय कर्तव्य आहे याचा विचार केला पाहिजे. सूक्ष्म दृष्टीने माझ्या उपवासाचा हेतू माझे हृदय तपासणे हेच होते आणि आहे. आज मी जे जे बोललो त्यात माझ्या हृदयाची संपूर्ण वेदना आहे. मी दिवसेंदिवस आता निस्पृह होत चाललो आहे असे म्हटले तरी चालेल. यामुळेच ब्रजकिशोर मला सांगत असतो की अमुक गोष्ट जवाहरलालने मला सांगितली, सरदारने सांगितलेले अमुक काम करवून घ्यायचे आहे तेव्हा मी पूर्ण शक्तीने सांगत असतो की तुला स्वतःला काही सांगायचे असेल तर सांग नाही तर नाही."

आज अगदी सकाळपासूनच वातावरण गंभीर आहे. बापूजींचे कामकाज जरी नेहमीप्रमाणेच सुरू होते तरी परंतु बापूजी काही तरी गंभीर विचारात असल्याचे जाणवत होते. दुपारी बापूंबरोबर एक लहानसा प्रसंग घडला. कार्यकारीणीची बैठक सुरू असताना, मी उशीवर विणकाम करत होते. तेवढ्यात बापूजी म्हणाले. . . 'ला सांग की, जर तो इथे सुखाने राहू शकत असेल, तर त्याने राहावे, पण इतका संताप करून त्याने माझी चाकरी करू नये. बापूजी हे दुःखाने आणि नाराजीने सांगत होते. तेवढ्यात बळवंतभाई महेता आले. ते बापूजींच्या पाया पडायलाच आले होते. यामुळे ही गोष्ट इथेच राहिली. मला वाटले की मी विनाकारण धर्मसंकटात सापडले आहे. परंतु बापूजी म्हणाले, "सर्वांना सत्य काय आहे ते सांगायची तुझ्यात जर आताही हिंमत नसले तर मग केव्हा येईल?" परंतु अखेरीस बापूजींचा संदेश मला योग्य ठिकाणी पोहोचवावाच लागला. २ ते ५ कार्यकारिणी चालली. काठियावाडमधील सर्व संस्थानांचे एकीकरण करायचे जवळपास निश्चित झाले आहे. तेथील राजाना कळून चुकले आहे की आता आपण पूर्वीसारखे राहू शकत नाही. यामुळे ते सर्व काही समजूनउमजून सोपवणार आहेत. त्यात परस्परांचे संबंधही असू शकणार आहेत.

काँग्रेसच्या आजच्या परिस्थितीसंबंधी 'हरिजन'मध्ये काही लिहायची आणि जनतेला मार्गदर्शन करायची सूचना बापूजींनी स्वीकारली आहे. बापूजींनी दिल्ली सोडायची इच्छासुद्धा व्यक्त केली आहे. परंतु बापूजींची अजूनही इथे गरज आहे असे पुढाऱ्यांना वाटते. काश्मीरसंबंधात तर आता मुळीच वाकायचे नाही असे धोरण आता स्पष्ट झाले आहे. जनतेच्या अदलाबदलीसंबंधीच्या धोरणाबद्दल पाकिस्तानच्या बाजूने काहीही सुधारणा दिसत नाही. भाषेसंबंधात बापूजी दुधातून माशी काढायचा प्रयत्न करत आहेत. भाषावारसंबंधीसुद्धा चर्चा झाली.

माझ्या रोजनिशीबरोबर . . .ची रोजनिशीसुद्धा लिहित असते कारण ला गुजरातीत लिहिणे फारसे जमत नाही.

रात्री ९।। बापूजी अंथरुणावर पडले. मौन घेतले आहे. आज मी फार विचारात होते. मला तर नवनवीन अनुभव मिळत आहेत यामुळे माझा तर अपार लाभ होतो आहे. परंतु एखाद्याला वाईट वाटेल असा बापंचा संदेश पोहोचवायचा असला तर तेव्हा मात्र थरकाम होतो. हे ईश्वरा तू मला कोणाच्याही दुःखाचे निमित्त करू नकोस अशी मी ईश्वराला प्रार्थना करत असते.

आजच्या प्रवचनसंदेशात बापूजी म्हणाले -

"माझ्याकडे जे हिंदू आणि मुसलमान येत असतात ते मला एकच गोष्ट सांगत असतात की आता दिल्लीत पूर्ण शांतता आहे आणि आपसात लढत राहण्यात काही फायदा नाही हे आम्हांला आता कळले आहे. यामुळे या बाबतीत तुम्ही निश्चिंत राहा.

"महरौलीत जो दर्गा आहे तिथे उद्यापासून उर्सचा मेळावा भरणार आहे. इतकी सुंदर कारागिरी असलेल्या या दर्ग्याची आपण तोडफोड केली आहे. परंतु आता तिथे काही दुरुस्तीचे काम झाले आहे. तिथे दरवर्षाप्रमाणे या वर्षीही मेळा भरणार आहे. या मेळाव्यात दरवर्षी हिंदू-मुसलमान जात होते तसेच यावर्षीही जाणे सुरू ठेवायला पाहिजे. परंतु हिंदूंना विनंती करतो की तुम्ही तिथे जाल तर मुसलमानांना भीती वाटेल असे वातावरण निर्माण करू नका. पोलीसांनी रक्षक होण्याऐवजी तुम्हीच रक्षक व्हा.

"आता दुसरी एक गोष्ट सांगतो. फेब्रुवारी महिन्यात मला बहुधा वर्ध्याला जावे लागेल. राजेंद्रबाबूसुद्धा माझ्याबरोबर येणारच आहेत. तिथून मी शक्य तितक्या लवकर परतेन. परंतु हे

जाणे तर तेव्हाच शक्य आहे जेव्हा तुम्ही सर्व मला आशीर्वाद देत म्हणाल की तुम्हाला जिथे जायचे असेल तिथे तुम्ही निश्चिंतपणे जाऊ शकता. आणि त्यानंतर पाकिस्तानमध्ये जावे अशी माझी इच्छा आहे. तिथे जाण्यापूर्वी पाकिस्तान सरकारनेच मला सांगायला पाहिजे की 'तुम्ही इथे या आणि तुमचे काम आनंदाने करा'.

"जेव्हा जेव्हा इथे कार्यकारिणीची सभा होत असते तेव्हा तेव्हा मला तुम्हांला सांगण्यासारख्या बातम्या मिळत असतात. त्याप्रमाणे आज कार्यकारिणीच्या सभेत भाषावार प्रांतरचनेविषयी चर्चा झाली होती. काँग्रेसचा हा ठराव काही आजचा नाही. वीस वर्षांपासून हा ठराव येतच असतो. आज देशात नऊ की दहा प्रांत आहेत. आणि हे सर्व प्रांत केंद्राच्या ताब्यात आहेत. आता जर अजून प्रांत झाले आणि तेही दिल्लीच्या राज्यकारभाराअंतर्गत राहिले तर काही वाद निर्माण होण्याचे कारण नाही. परंतु सर्व प्रांत जर स्वतंत्र राहायची मागणी करतील आणि कोणीही कोणालाही जर जबाबदार नसेल तर असे प्रांत तयार करणे चूक होईल. वेगवेगळे प्रांत तयार केल्यानंतर मुंबईला असे वाटायला नको की आता महाराष्ट्राशी माझे काहीही देणेघेणे नाही. आणि महाराष्ट्राला असे वाटायला नको की कर्नाटकशी माझा काहीही संबंध नाही. असे जर होईल तर आपले काम बिघडेल. सर्व एकमेकांशी पूरक होऊनच जर भाषावार प्रांतरचना होत असेल तर प्रांतिक भाषांची प्रगती होईल. लोक अजूनही असे सांगतात प्रांतात शिक्षणाचे माध्यम हिंदुस्तानी असायला पाहिजे. ही गोष्टसुद्धा अगदीच मुर्खपणाची आहे. आणि इंग्रजी माध्यमसुद्धा वाईटच आहे. सीमाआयोग नेमण्याची गोष्टही माझ्या गळी उतरत नाही. प्रत्येक प्रांताच्या लोकांनी शेजारच्या प्रांताच्या लोकांशी मिळूनमिसळून राहावे अशा प्रकारे नकाशा तयार करण्यात यावा आणि तो पंडितजींना सोपवावा. याचे नाव खरी लोकशाही. सर्व काही सरकारच करेल तर लोक पांगळे होतील."

प्रार्थनेनंतर आज मौन घेतले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२६-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. आज बापूजींचा मौनदिवस असल्यामुळे प्रार्थनेनंतर मी बापूजींना आत आणून परत झोपून गेले.

बापूजींनी आज 'हरिजन'करिता लेखनाच्या कामकाजाला सुरुवात केली आहे. हरिजनांच्या मंदिरप्रवेशासंबंधी भगवानभाईंचे एक पत्र वढवाणहून आले आहे. त्यांनी लिहिले आहे की "हरिजनांचा हवेलीप्रवेश विश्वस्तांच्या इच्छेविरुद्ध करण्यात येतो आहे. परंतु इतर मंदिरांमध्ये उदाहरणार्थ जैन मंदिर, स्वामी नारायण मंदिर वगैरे संप्रदायांच्या मंदिरात, ज्यांना हरिजन फारसे मानत नाहीत, बळजबरीने प्रवेश करायला लावण्यात काही अर्थ नाही." याचे उत्तर बापूजींनी लिहवून घेतले. (पाहा "हरिजनबंधु" १-२-१९४८ "हरिजनो अने मंदिर प्रवेश" हा लेख, पृष्ठ ४)

दुसऱ्या एका निनावी पत्रात, ज्यातील अक्षरांची घडण आणि भाषा वेगळीच आहे, लिहिले आहे की त्यांना संक्रांतीला स्वामीनारायणच्या मंदिरात दर्शन करायला जायचे होते. परंतु सकाळी आठ वाजता त्या मंदिराला कुलूप लागलेले होते. आणि स्वातंत्र्यातही मंदिरात जाण्याची संधी जर आम्हांला मिळणार नसेल तर मग केव्हा मिळेल? शिवाय काँग्रेसीसुद्धा पाचदहा मिनिट येऊन चालले जातात. ते काहीही प्रयत्न करत नाहीत. हरिजन बिचारे टळटळीत उन्हात सत्याग्रह करत बसलेले आहेत. तर तुम्ही या संबंधात काय करणार आहा? याचेही उत्तर बापूजींनी याच लेखात दिले आहे.

सकाळी आराम केल्यानंतर इतर टपालही पाहिला.

आज स्वातंत्र्यदिवस असल्यामुळे बापूजींकडे सारखी येजा सुरू आहे. दिल्लीतील सर्व पुढारी तर आलेच शिवाय गोपीचंद भार्गव, प्रफुल्लबाबू, अन्नदाबाबूसुद्धा आले. आज पंडितजींकडेसुद्धा स्वातंत्र्यदिनानिमित्त मेजवानी होती. बापूजींचे वजन १०९ पौंड आहे. अजूनही भाजी, दूध, फळे, सूप आणि गूळ हे पदार्थ आलटूनपालटून जेवणात घेत असतात. उपवासाआधी मुलाखती वगैरेंचे जितके कामकाज करत होते तेवढेच आता परत करायला सुरुवात केली आहे. आज दुपारी अडीच ते पाच वाजता कार्यकारिणी चालली. सरदारदादांची आज सूचक अनुपस्थिती होती. . . . म्हणाले की मी मंत्रिमंडळातून बाहेर पडतो. बापूजी त्यांची समजूत घालायचा प्रयत्न करत आहेत.

लाचलुचपतीच्या गोष्टीसुद्धा बापूजींकडे बऱ्याच प्रमाणात येत असतात. मुंबई काँग्रेसचा पुढारी म्हणवल्या जाणाऱ्या गृहस्थाच्या मुलाने आपल्या वडिलांच्या वा इतर कोणाच्या लग्ग्याने केलेल्या कमाईच्या प्रकरणामुळे बापूजींना खूप दुःख होते आहे. जिकडे पाहवे तिकडे काही तरी नवीनच निर्माण झालेले असते. आज कदाचित महुआत पू. भाईला बापूजींचे पत्र पोहोचले असेल. आणि कदाचित माझे पिताश्री (भाई) ताबडतोब निघाले असतील.

बापूजींच्या प्रार्थनासंदेशाचा अनुवाद आज तर प्यारेलालनेच केला होता आणि तो प्रार्थनासभेत वाचून दाखवला होता -

"आज स्वातंत्र्यदिन आहे. आपण जेव्हा गुलाम होतो तेव्हापासून आपण हा दिवस पाळत होतो आणि तसे करणे आवश्यकही होते. आज आपण स्वतंत्रसुद्धा झालो आहो. परंतु स्वातंत्र्याचा स्वाद घेतल्यानंतर आपली जी स्वातंत्र्याची कल्पना होती ती केवळ भ्रम होती असे आपल्याला वाटू लागले आहे. असे असेल तर आपण हा स्वातंत्र्योत्सव का पाळायला पाहिजे? की आपल्याला हा जो भ्रम झाला होता तो खोटा होता? आपल्या अनेक नवनवीन आशांची आज जर परिपूर्ती होत असेल तरच आपल्याला हा उत्सव साजरा करायचा अधिकार असेल. आता हिंदुस्थानची सात लाख खेडी स्वतंत्र होत असताना, खरे सोने आणि खरी शक्ती आम्हीच आहोत असे आढळून येते. ही जाणीवच खरे स्वातंत्र्य आहे आणि तीच जगाला दाखवता येऊ शकते.

"आपणा सर्वांना या भूमीत सर्वधर्मसमत्वाची भावना रुजावी म्हणून संपूर्ण जनतेला या मार्गाने नेण्याकरिता आपणा सर्वांना जास्तीजास्त मेहनत करावी लागेल. परंतु मला तर आता उलट्याच परिस्थितीचा अनुभव येतो आहे. आपण लहानसहान गोष्टीकरिता संप करतो, शोभत नाही असे काम आपण करतो. यावरून आपली आशापूर्ती व्हावी म्हणून आपल्याला खूप मेहनत करावी लागेल असे दिसते. विशेषेकरून मजूर वर्गाने आता आपले गौरवास्पद स्थान ओळखायला पाहिजे. मजूर वर्गाची शक्ती आणि गौरव हे दोन्ही गुण आपल्या जनतेमध्ये भरलेले आहेत, हे पाहून भांडवलदार अचंबित होतील. परंतु, जर मजूर वर्गाने स्वतःची खरी ओळख पटली, तर सुव्यवस्थित आणि सुसंस्कृत समाजात अन्याय झाल्यास योग्य तो न्याय मिळवण्यासाठी संपूर्ण संधी त्याला उपलब्ध असेल. आज कोळशाच्या खाणीत आणि जीवनावश्यक उत्पादन करणाऱ्या कारखान्यात हरताळ पुकारण्यात आलेला पाहून मला दुःख

होते. यामुळे संपूर्ण समाजाचे तसेच संप करणाऱ्यांचेही आर्थिक नुकसान होते. संप करणारे असे म्हणत असतात की तुम्ही स्वतःच मोठमोठे संप करायला लावलेले असताना तुम्ही आम्हांला कसे काय संप करण्याविरुद्ध व्याख्यान देता? यामुळे इथे मी ही गोष्ट स्पष्ट करतो. त्या वेळी आपण गुलाम होतो ही एक गोष्ट आणि त्या वेळी न्याय मिळवण्याच्या सोयी उपलब्ध नव्हत्या. परंतु हे सर्व पाहता मला खरोखरच असे वाटते की पूर्वेकडील आणि पश्चिमेकडील देशात सत्तेवर ताबा मिळवण्यासाठी जे डावपेच खेळले जातात, मुत्सद्दीपणाचा भाग म्हणून कटकारस्थान रचले जातात ते आपल्याला दुर्गुणाकडे ओढतात. असे होत असतानाही मी आशा करतो की भौगोलिक दृष्टीने जरी आपली फाळणी झालेली असली तरी आपल्या अंतःकरणाची फाळणी व्हायला नको आणि जगासमोर आपण एक होऊन उभे राहायला पाहिजे.

"नियंत्रणे काढल्यानंतर चोहोकडून त्याचे खूपच स्वागत करण्यात येत आहे. परंतु ज्या देशात भरपूर कापूस पिकतो, ज्या देशात इतक्या मोठ्या प्रमाणात विणकर, कताई करणारे असतील त्या देशात कापडाची टंचाई असूच शकत नाही असे मला खात्रीपूर्वक वाटत होते. याशिवाय इंधनावरील नियंत्रणे गेल्यामुळे लोकांना फार मदत झाली आहे. बाजारात पाहिले तर आता गूळसुद्धा भरपूर पडलेला आहे. परंतु एक भाई आपल्या पत्रात लिहितात की मालाची टंचाई त्याच्या आणण्यानेण्याच्या अव्यवस्थेमुळेच जाणवते.

". . . अप्रामाणिकपणा आणि लाचलुचपत हा विषय काही नवीन नाही. परंतु यांच्या निर्मूलनाकरिता उच्च प्रतीच्या राज्यकारभाराची आवश्यकता असते. प्रत्येक माणूस असे समजत असतो की आपण देशाकरिता काम करत असूनही आपल्या पात्रतेइतके आपण वर चढू शकलेलो नाही. जे लोक स्वतः जरी लाचलुचपतीच्या वा लाग्याबांध्याच्या प्रकरणात फसलेले नसतात, परंतु ज्यांना अशा फसलेल्या लोकांची माहिती असते परंतु त्यांच्याबद्दल जे उदासीन असतात तेसुद्धा तितकेच गुन्हेगार असतात."

आजच्या प्रार्थनासभेत . . . ची मुंबईच्या . . . च्या पुढाऱ्याची जी गोष्ट बापूजींच्या कानावर आली होती त्यावरूनच बापूजी या संदेशात म्हणाले होते. . . . ते समजून जातील तर बरे होईल. नाही तर बापूजी जर का या प्रकरणी खोलात उतरले आणि जर त्यांनी ती जाहीर केली तर . . . चे तर खूप हाल होतील तसेच ते समाजातील एक निंदेचे पात्र होतील. बापूजी आता कोणाचीही फिकीर करण्याच्या

मनःस्थितीत नाहीत. प्रार्थनेनंतर . . . शी खूप गोष्टी केल्या. बापूजींनी . . . ला नोआखालीला परत जाण्याकरितासुद्धा सांगितले.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२७-१-'४८

नेहमीप्रमाणे प्रार्थना. प्रार्थनेनंतर लगेच आजच्या कॉंग्रेसच्या परिस्थितीबद्दल स्वतः लिहिले आणि मग श्रुतलेखनही करवून घेतले. त्याचा मथळा होता 'कॉंग्रेस पोझीशन' ('पाहा, 'हरिजन' आणि 'हरिजनबंधु' १-२-१९४८)

. . . ला लिहिले,

" '...जानामि धर्म नच मे प्रवृत्तिः, जानाम्यधर्म नच मे निवृत्तीः' म्हणजे मला धर्म काय आहे हे माहीत आहे परंतु मी त्याचे अनुसरण करत नाही आणि मला अधर्म काय आहे हे माहीत आहे परंतु मी त्याचा तिरस्कार करत नाही.

"ही उक्ती मी माझ्याकरिता खोटी ठरवू शकलो तर फार झाले असे मी समजेन. परंतु हे तेव्हाच शक्य होईल जेव्हा मी गोळ्यांचा वर्षावसुद्धा आनंदात सहन करू शकेन. २० तारखेला जे घडले त्याकरिता मी अभिनंदनास पात्र आहे असे मला वाटत नाही. ती केवळ ईश्वराची कृपा होती. परंतु बोलावणे येईल तेव्हा जाण्याची माझी पूर्ण तयारी आहे. बाकी वर्धेला जाण्याचा माझा विचार आहे परंतु वर्ध्याला मी जाऊ शकेन असे मला वाटत नाही. उद्या काय होणार आहे हे कोणाला माहीत?"

* * *

आज सकाळीच मी कॉंग्रेसच्या धोरणासंबंधी लिहिले होते. ते तू पाहशीलच. मी त्यांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतो परंतु ते म्हणतात की मी ...शिवाय काम करू शकत नाही आणि ...शिवाय मी काम करू शकत नाही. जर कोणी राजीनाम्यासंबंधी बोलत असेल ...तर राजीनामा देण्याकरिता तयार आहे. (स्पष्ट आहे की हे जवाहरलाल नेहरू आणि वल्लभभाई पटेल यांच्या मतभेदासंबंधी आहे. दोघांनीही गांधीजींना सविस्तर टिपण लिहून दिले होते. प्रत्येकाने एकमेकांकरिता राजीनामा देण्याची तयारी दाखवली होती.) काश्मीरबद्दल मला वाटते की आपण लेक सक्सेसपर्यंत (संयुक्त राष्ट्रसंघ) जाण्याची आवश्यकता नाही. तरीही काय होते ते आपण पाहू या.

मी इथे 'करायचे वा मरायचे' ठरवले आहे. असे दिसते की काही तरी साध्य करण्यात आले आहे. परंतु तरीही अजून बरेच काही करण्यासारखे राहिले आहे.

आज मी महरौलीला जात आहे.

* * *

बापूजी कातत असताना धाग्याचे जे तुकडे, पेळूचा वाया गेलेला रू वगैरे निघाले ते सर्व बापूजींनी एका हातरुमालात गोळा केले आणि त्यांच्यापासून त्यांनी टाचण्या ठेवायचा एक चांगला 'पिन कुशन' तयार केला.

दहा वाजता आम्ही कुतुबुद्दिन औलियाच्या दर्ग्यात भरणारा उर्स पाहायला गेलो. त्यात हिंदू, शीख, मुसलमान वगैरे हजारोंच्या संख्येत आले होते. इथे इतका सुंदर मेळा भरू शकेल अशी कोणालाही आशा नव्हती. मोतीमशिदीतील संगमरवरच्या जाळ्या तोडून टाकण्यात आल्या आहेत. कबरीजवळ कुराणशरीफमधील आयत वाचली. आणि मग मौलवीसाहेबांनी बापूजींचे खूपच आभार मानले. बापूजींच्या स्वास्थ्याकरिता आणि दीर्घायुकरिता दुआ मागितली. आणि मग बापूजींना दोन शब्द बोलायची विनंती केली. बापूजी म्हणाले -

"बंधूंनो आणि भगिनींनो,

"भगिनींनी शांत राहावे आणि मला काही मिनिटे द्यावी अशी माझी विनंती आहे. मला इथे बोलावे लागेल अशी मी मुळीच कल्पना केली नव्हती. इथे मी तीर्थयात्रेकरिता आलो होतो. काही दिवसांपूर्वी मी असे ऐकले होते की मागील वर्षाप्रमाणे या वर्षी कदाचित मेहरौलीला उर्स भरवणे शक्य होणार नाही. असे झाले असते तर मला फार दुःख झाले असते. शुद्ध अंतःकरणाने जे हिंदू, शीख, मुसलमान इत्यादी आले आहेत त्या सर्वांना माझी विनंती आहे की तुम्ही तुमच्या मनात हा संघर्ष येऊ देऊ नका. आणि तुम्ही भावाभावाप्रमाणे वा मित्राप्रमाणे राहण्याची शपथ घ्या. असे झाले तर आपण जरी दोन भावांप्रमाणे भांडलो असू तरी आमच्यात शत्रूंप्रमाणे हाडवैर निर्माण झाले नव्हते असे जगाला वाटेल. आपण बाह्यतः वेगळे असू शकतो परंतु अखेरीस आपण एकाच झाडाच्या शाखा आहो. सैतानाचा गुलाम कोण आहे यासंबंधी बोलण्याची माझी इच्छा नाही. मी जीवन पाहिलेले आहे. हे काही नवीन नाही. आतासुद्धा कुठे ना कुठे मारामाऱ्या सुरू आहेत. वायव्य सरहद्द प्रांतात हिंदू मारले गेले असल्याचे आजच मला कळले. (पारचिनार येथील शिबिरात जानेवारी २२ तारखेला मुसलमानेतर स्थलांतर करण्याकरिता वाट पाहत असताना टोळीवाल्यांनी त्यांच्यावर हल्ला केला .स्थानिक अधिकाऱ्यांच्या सांगण्यानुसार त्यात १३० लोक मरण पावले, ५० जखमी झाले आणि

५० लोकांचे अपहरण करण्यात आले.) येथील मुसलमानांना त्याची लाज वाटली पाहिजे. आपली अंतःकरणे स्वच्छ करण्याचा आपण निर्धार केला पाहिजे. ज्या लोकांची तिथे कत्तल करण्यात आली ते परत येऊ शकत नाहीत. परंतु त्याचा बदला आम्ही अजून इथल्या लोकांची कत्तल करून घेणार नाही असे आपण घोषित केले पाहिजे. आपण स्वतःला शुद्ध करू आणि विरोधकाशी प्रेमाने भेटू. हिंदू जर हे समजून घेतील व पचवतील तर त्यांचे कल्याण होईल. दिल्लीतील हिंदू आणि मुसलमान आपली अंतःकरणे पूर्णपणे शुद्ध करतील या अटीवर मी उपवास सोडला होता. मी जिवंत राहावे म्हणून केवळ तुम्ही मला तसे आश्वासन दिले असेल तर ती तुमची चूक आहे."

आम्ही तिथून बारा वाजता परतलो. बापूजी म्हणाले, "इथे हा उरूस इतका मोठा भरला, पण मला खात्री आहे की पाकिस्तानमध्ये हा याहूनही मोठा भरला असेल. निदान कमी तर निश्चितच नाही. आज पेशावरमध्ये १३० लोक कापले गेले. हा तर तेथील सरकारी आकडा आहे. पण मला खात्री आहे की जास्त कापले गेले असतील. परंतु हे सर्व बंद व्हायलाच पाहिजे असे येथील एकही मुसलमान म्हणत नाही. शिखांकडून जितकी शौर्याची अपेक्षा होती त्याहून त्यांनी किती तरी शौर्य दाखवले हे तर कबूल करायलाच पाहिजे. आणि पेशावरमध्ये जे झाले त्याकरिता तर काही कारण नव्हते असेच म्हणावे लागेल. आणि युनोवाल्यांजवळ तर धडधडीत खोटेपणा सुरू आहे. जवाहरचे नाक कापायची तयारी करत आहेत. जवाहरने जर कौशल्याने काम केले नाही तर त्याच्या संपूर्ण मेहनतीवर पाणी फिरेल."

बापूजी थकले आहेत. आल्यानंतर पाय धुवायला लावले. माती घेतली. आल्यानंतर आम्हीसुद्धा जेवलो.

संपूर्ण दुपार मुलाखतींमध्ये गेली - मौलानासाहेब, पंतजी, विजयनगरचे महाराज, जस्टिस रामलालजी, महेरचंद खन्ना, पंडितजी, रामेश्वरीबहेन वगैरे होते. सरहद्द प्रांतांची गोष्ट करता करता मेहरचंद खन्नां आपले असह्य दुःख व्यक्त करत होते.

आजच्या प्रार्थनासभेत बापूजी म्हणाले,

आज किती मुसलमान बंधुभगिनी आहेत? जितके असतील तितक्यांनी हात वर करावे. (केवळ एक हात उंच झाला.)

(परत महरौलीसंबंधी बोलले) आणि तिथे हिंदू आणि शीखही खूप होते. परंतु इथे एका गोष्टीचा खूप दुःखाने उल्लेख करावा लागतो. हा दर्गा आणि प्रामुख्याने त्यातील नक्षीकाम अत्यंत सुंदर होते. इतक्या सुंदर आणि प्राचीन नक्षीकामाची तोडफोड करणे हा मूर्खपणा आहे. या औलिया पुरुषाची कबर तोडलेली जेव्हा मी पाहिली तेव्हा माझ्या मनात प्रश्न निर्माण झाला की का बरे आपण इतके खाली घसरलो? समजू या की पाकिस्तानने यापेक्षाही भयंकर आणि वाईट काम केले असतील. परंतु वाईट कामातही कुठे चढाओढ आणि स्पर्धा करायची असते? दुसरी गोष्ट. आज मला अशी बतमी कळली आहे की सरहद्द प्रांतात आणि पाकिस्तानमध्ये एका ठिकाणी १३० हिंदू आणि शीख कापले गेले. लूटमार झाली ती तर नफ्यात. मला विचारायचे आहे की यांना कोणी मारले? तसेच मरणाऱ्या लोकांचा काही अपराध होता असेही कोणी सांगत नाही. तिथे इतका भयंकरपणा झाला म्हणून त्याचा बदला जर कोणी घेऊ पाहील तर तो जंगलीपणाच होईल ना? यामुळे आजच्या शांततापूर्ण वातावरणात असे जंगलीपणाचे अयोग्य कृत्य कोणीही करणार नाही याची काळजी घ्यावी लागेल. पाकिस्तानमध्ये जे काही विनाशक कृत्य सुरू आहे त्याकडे आपल्या सरकारचे लक्ष आहेच.

राजकुमारी अमृत कौर अजमेरला जाऊन नुकताच माझ्याकडे परत आल्या आहेत. त्या म्हणाल्या की तिथे हरिजनांकडून जे काम करवून घेण्यात येत आहे ते तर सर्वच लोक करत असतात. परंतु ते जिथे राहतात त्या ठिकाणाच्या घाणीला सीमा नाही. तिथे तर आपल्याच सरकारचे शासन आहे. इतके की तेथील अंमलदारही हिंदू आणि शीख आहेत. ते जर एक दिवस तिथे गेले आणि तेथील दृश्य पाहिले तर त्यांना कळेल. ते बिचार हरिजन आहेत एवढ्याच कारणाकरिता त्यांना अशा घाणीत ठेवण्यात येत आहे. दिल्लीतसुद्धा भंगी वस्तीत असताना त्यांचे हे हाल मी पाहिले आहेत. परंतु अजमेर त्याही पुढे आहे. आपण स्वातंत्र्य मिळवले खरे, परंतु या लोकांच्या परिस्थितीत जर आपण सुधारणा केली नाही तर हे स्वातंत्र्य कौडी किंमतीचेही नाही असेच म्हणावे लागेल. आपण आज ईश्वराला विसरलो आहो आणि त्याला बाजूला टाकून दिले आहे. एकमेकांचे दोष पाहण्यापासूनच आपल्याला फुरसद नाही.

आज माझ्याकडे मीरपूरचे लोक आले. ते बिचारे हल्लेखोरांच्या तावडीत सापडले होते. हल्लेखोरांच्या ते हातापाया पडले होते. आपल्या बहिणींना म्हाताऱ्या स्त्रियांना हल्लेखोर उचलून नेतात आणि त्यांची अब्रू लुटतात.

मी हे कोणाला काय सांगू? इतकेच सांगतो अशा दुष्कृत्यांनाही काही मर्यादा तर असते की नाही? आणि असे असतानाही म्हणतात की आझाद काश्मीरकरिता आम्ही असे काम केले आहे ! खायलाप्यायला मिळाले नाही तर लूटमार केली हे मी एकदा समजू शकतो. परंतु लहान लहान मुलींची अब्रू घ्यायची, त्यांना खायला न देणे, कपडे द्यायचे नाही हे काय इस्लाम सांगतो? कुरणशरीफमध्ये काय असे लिहिले आहे?

मीरपूरचे लोक बिचारे माझ्याकडे आले होते. धष्टपुष्ट होते, पण बिचारे लाजत होते. जवाहरलालजींना याबद्दल खूपच वेदना होत आहेत आणि ते प्रयत्नही खूप करत आहेत. परंतु ज्या लोकांनी तिथे आपला जीव वा मालमत्ता गमावली आहे त्यांचे यामुळे कसे समाधान होईल. आज माझ्याकडे जे भाई आले त्यांच्यातील जवळपास पंधराएक माणसे त्या हल्लेखोरोंच्या हाती सापडली आहेत. संपूर्ण जगाच्या नावाने आणि ईश्वराच्या नावाने मी त्या हल्लेखोरांना आणि त्यांच्या पाठीशी असलेल्या पाकिस्तान सरकारला विनंती करतो की कोणीही काही विनंती करण्याआधी अब्रू गमावलेल्या न गमावलेल्या या भगिनींना तुम्ही सोडून द्या. इस्लाम धर्माचा मीसुद्धा अभ्यासू आहे. मीसुद्धा इस्लाम धर्माविषयी खूप खपू वाचले आहे. इस्लाम धर्म वा जगातील कोणताही धर्म कोणत्याही परिस्थितीत असे करा असे शिकवत नाही. यात ईश्वराची वा खुदाची भक्ती नाही. सैतानाची आहे. त्यांना सोडाल तर तुमचे आणि सर्वांचे भले होईल.

प्रार्थनेनंतर बापूजी फिरले. फिरत असताना मि. शीन सोबत होते. शाहनवाझसाहेबसुद्धा होते. ते काश्मीरला जायला तयार आहेत. शेवटी पंडितजी आले. त्यांनीसुद्धा आज मीरपूरसंबंधीच गोष्टी केल्या. उद्या ते माऊंटबॅटन साहेबांशी सल्लामसलत करणार आहेत.

९।।। वाजता झोपायची तयारी.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२८-१-'४८

नेहमीप्रमाणे ३।। वाजता प्रार्थना. प्रार्थनेनंतर टपाल पाहिला. . . .ला लिहायला लावले -

"आता इथे काही प्रमाणात गोष्टी स्थिरावल्या आहेत तर वायव्य सरहद्द प्रांतात दंगलींना सुरुवात झाली आहे. अशा प्रकारे मी अजूनही काळोखात भटकतो आहे. परंतु आता अधिक काळ इथे राहण्याचा माझा हेतू नाही. जो काही निर्णय घ्यायचा असेल तो येत्या चारपाच दिवसात घ्यावा लागेल.

"काश्मीरच्या बाबतीत आपण जर थोडासाही ढिलेपणा दाखवला तर हैद्राबाद, जुनागढ यांचीही तीच अवस्था होईल याबद्दल मला मुळीच संशय नाही. शेख अब्दुल्ला शूर पुरुष आहेत. परंतु अखेरीस त्यांनी धोका दिला तर आश्चर्य वाटायला नको. माझा विश्वास आहे की कोणताही माणूस दुसऱ्याला धोका देऊ शकत नाही कारण खरे सांगायचे म्हणजे माणूस स्वतःच स्वतःची फसवणूक करत असतो. यामुळे याविषयी मला काळजी वाटत नाही.

"माझी प्रकृती समाधानकारक आहे. अजूनही मी द्रव आहारावर आहे. ते मला मानवते."

* * *

"या बोचऱ्या थंडीपेक्षाही वायव्य सरहद्द प्रांतात जी भयानक कृत्ये सुरू आहेत त्यांनी काल मी निस्तब्ध झालो. मानवी स्वभाव इतका अधःपतीत कसा होऊ शकतो! सर्व राष्ट्रवादी मुसलमानांनी, खरे म्हणजे सर्व मुसलमानांनी संयुक्त निवेदन काढले पाहिजे वा या फार मोठ्या पापाचे प्रायश्चित्त घेतले पाहिजे."

* * *

मालीश, आंघोळीनंतर घनश्यामदासजींशी यासंबंधीच गोष्टी केल्या. "मौलानासाहेबांनी सर्व मुसलमानांना बोलावून जबरदस्त संघटना करावी आणि अशा दुष्कृत्यांचा पाळामुळापासून नायनाट करण्याकरिता निवेदन काढले पाहिजे असे ते म्हणाले. या संबंधात मुसलमान जर जागे झाले तर असे वागण्याची पाकिस्तानची काय हिंमत आहे? परंतु हे सर्व मनातून उपजले पाहिजे. बापू म्हणतात म्हणून नाही. यात ब्रिटिशांचा आणि अमेरिकी लोकांचासुद्धा हात आहे." किंग्जले मार्टीनचा बापूजींशी जो

वार्तालाप झाला त्याची नोंदच मी ठिकाणी उद्धृत करते. यावरून बापूजींचे अंतःकरण वेदनांनी किती भरलेले आहे ते लक्षात यावे. ते समजावून सांगत असे म्हणाले -

"स्वातंत्र्याकरिता सुरू असलेले आंदोलन अहिंसेच्या उच्चतम अर्थाप्रमाणे अहिंसक नव्हते. ती जर शूरांची अहिंसा असती तर नुकताच या ज्या कत्तली झाल्या त्या झाल्या नसत्या. मी जेव्हा नोआखालीच्या यात्रेकरिता गेलो होतो तेव्हा मला याचा शोध लागला. आणि जेव्हापासून हा शोध लागला तेव्हापासून मी ही गोष्ट प्रत्येकाच्या मनावर ठसवण्याचा प्रयत्न करतो आहे. मला वाटते की स्वातंत्र्यसंघर्षादरम्यान आम्ही आमच्या तात्कालिक सोयीकरिता अहिंसेचा स्वीकार केला होता. आमच्याजवळ गोऱ्यांशी लढण्याकरिता सैनिकशक्ती नसल्यामुळे आम्ही गोऱ्यांचा विरोध अहिंसेने केला होता. मग त्यांनी दक्षिण आफ्रिकेसंबंधी विचारले. तेव्हा ते म्हणाले "अखरीस येशू ख्रिस्तालासुद्धा शांततामय प्रतिकारकांचा राजा म्हणतात. त्याला कोणत्याही अर्थाने दुर्बल माणूस म्हणता येऊ शकते काय? लोक विसरतात की अहिंसक माणसाचे एकमेव शस्त्र आत्मशक्ती असते व ते सबळांचे शस्त्र आहे."

"याच्या उत्तरात श्री मार्टीननी विचारले की अनेक लोक अहिंसेकडे राजकीय विरोधाचे चांगले शस्त्र म्हणून पाहतात. परंतु आज काश्मीरमध्ये वा आपल्या सर्व विरोधकांना मारून त्यांना संपवून टाकणाऱ्या हिटलरसारख्या माणसाच्या विरोधात अहिंसेचा यशस्वीपणे कसा उपयोग करावा? बापूंनी हसत उत्तर दिले की माझ्या हातात सरकारची सूत्रे नाहीत आणि यामुळे मी त्यांच्या धोरणाची दिशा ठरवू शकत नाही. तसेच आजच्या सरकारमधील लोकांचा अहिंसेवर विश्वास आहे असेही मला वाटत नाही. "आपल्या हातात सत्ता येईल तेव्हा अहिंसक पद्धतीने ती आपल्याला आपल्या हाती ठेवता येणार नाही." हे मौलाना साहेबांचे शब्द मला आठवतात. गांधीजी म्हणाले की त्या वेळी मला मनातल्या मनात हसू आले. आणि ते म्हणाले की "इव्हान द फूल" या टॉलस्टॉयच्या गोष्टीचा सार मी नेहमी लक्षात ठेवत असतो. मी तर म्हणेन की खरा अहिंसक माणूस आपल्या हाती सत्ता ठेवूच शकत नाही. तो ज्यांची सेवा करतो त्यांच्याकडून त्याला सत्ता मिळत असते. असा माणूस वा सरकार आपल्या रक्षणाकरिता अहिंसक सैन्य ठेवू शकण्याची शक्यता आहे. अहिंसक सैन्य सर्व प्रकारच्या अन्यायाविरुद्ध वा आक्रमणाविरुद्ध लढेल, परंतु शुद्ध शस्त्रांनी लढेल. शत्रूच्या विरोधात लढायचे नाही असा

अहिंसेचा अर्थ नाही. परंतु तिथे शत्रूचा अर्थ "माणूस जे शत्रुत्वपूर्ण वर्तन करतो ते" असा असतो, शत्रूत्व करणारा माणूस नाही. मी जर शेख अब्दुल्लांप्रमाणे काश्मीरचा नेता असतो तर मी अहिंसक सैन्य ठेवले असते. परंतु याबाबतीत माझे मत वेगळे आहे असे शेख अब्दुल्ला यांनी अतिशय प्रामाणिकपणे आणि नम्रतापूर्वक सांगितले.

"पुंछसारखा भाग, जिथे पाकिस्तानला पाठिंबा देणारे बहुसंख्य आहेत, पाकिस्तानमध्ये जावा आणि काश्मीरची घाटी भारतात राहावी म्हणजे काश्मीरची फाळणी करून काश्मीरची समस्या सोडवता येणार नाही काय? यावर बापू दृढपणे 'नाही' म्हणाले. ते ठामपणे म्हणाले की भारत वा भारताच्या कोणत्याही भागाची अशा प्रकारे फाळणी होऊ शकत नाही. ही एक वाईट गोष्ट आहे आणि ती बंद झाली पाहिजे.

"हैदराबादचेच उदाहरण घ्या. हैदराबाद शहराला तुम्ही उरलेल्या प्रांतापासून वेगळे कराल काय? अशा प्रकारचे भाग संपूर्ण भारतभर पसरलेले आहेत आणि त्यांची फाळणी करत राहिलो तर ही प्रक्रिया अविरत सुरू राहील. त्यामुळे भारताचा विनाश होईल.

"यावर मुलाखत घेणाराचे म्हणणे होते की हैदराबादची परिस्थिती समान नाही. सीमेवरील कोणत्याही प्रांताची स्थिती वेगळी असते. परंतु गांधीजींचे म्हणणे होते की सीमेवरील प्रांतांचेसुद्धा तुकडे करता येत नाही वा त्यांना वेगळे करता येत नाही वा ...ते स्वतःला स्वतंत्र घोषित करू शकत नाहीत. आणि जेव्हा मुखाखत घेणाराने गिलगिटचा प्रश्न उपस्थित केला तेव्हा गांधीजी म्हणाले की मी जेव्हा काश्मीरमध्ये होतो (ऑगस्ट १ ते ४, १९४७) तेव्हा श्रीनगर शहरात रोषणाई करण्यात आली होती. ही रोषणाई कशाकरिता असे जेव्हा मी विचारले तेव्हा गिलगिटचे काश्मीरमध्ये सामिलीकरण झाले याकरिता ही रोषणाई आहे असे मला सांगण्यात आले. मी जेव्हा हे ऐकले तेव्हा मला दुःख झाले. काश्मीर गिलगिटला किती काळ आपल्या ताब्यात ठेवू शकेल असा मला प्रश्न पडला. इंग्लंडकरिताही ही फार कठीण गोष्ट झाली होती. भारताच्या अधिकृत क्षेत्रात इतर प्रदेश जोडण्याचे ब्रिटिशांचे धोरण ना तर सुज्ञपणाचे होते ना योग्य होते. काश्मीर जर भारतात सामील होईल तर तो काश्मीरच्या एकूण जनतेच्या इच्छेमुळे होईल आणि असे करताना गिलगिट आज भारतीय संघराज्याचा भाग नाही हे लक्षात घेऊन तसे केले जाईल. आम्ही परत गिलगिट जिंकू असे म्हणणारे लोक तिथे आहेत. असे झाले

तर किती तरी प्रकारच्या गुंतागुंती निर्माण होतील? गांधीजी म्हणाले की ब्रिटिशांनी भारताला राजकीय दृष्टीने एक केले आहे व भारत तसाच राहिला पाहिजे.

"टोळीवाल्या लोकांबरोबर पाकिस्तान काय करू शकतो असे विचारल्यानंतर बापू उत्तर देत म्हणाले की टोळीवाल्यांवर विजय मिळवण्याचे आव्हान मी स्वीकारीन परंतु ते अहिंसक माणूस म्हणून. मी त्यांना लाचही देणार नाही आणि मारणारही नाही. मी त्यांची सेवा करीन. मिशनरी लोकांनी नरभक्षी लोकांच्या हातून मरण पत्करले नव्हते काय? तेव्हा मुलाखतकार म्हणाला, पॅलेस्टाईन, रशिया वा अमेरिकेत गांधी नाहीत याचे मला दुःख होते

"यावर हसत गांधीजींनी उत्तर दिले - हे त्यांचे दुर्दैव आहे."

"पुंछ पाकिस्तानमध्ये जाणे व्यावहारिक का नाही आणि भारतीय सीमेवर सतत युद्ध सुरू राहील काय असे विचारण्यात आले असता बापू म्हणाले, 'असे झाले तर इतरांकरिता हे फार वाईट उदाहरण होईल. अनेक ठिकाणी अशा वस्त्या (मुसलमान बहुसंख्य असलेल्या) आहेत. उदाहरणार्थ पश्चिम बंगालमधील मुर्शिदाबाद. भारतीय संघराज्य आणि पाकिस्तान यांच्यामध्ये मुख्य अंतर हे आहे की भारताचा देशाचे विभाजन करण्यावर कधीही विश्वास नव्हता, उलट पाकिस्तानच्या नेत्यांचा तसा विश्वास आहे.' बापूंनी काठेवाडचे उदाहरण दिले. पाकिस्तानला काठेवाडची फाळणी करून जुनागढ आपल्या उपनिवेशात जोडायचा होता. अविभाज्य काठेवाडचे तुकडे करण्याची कल्पनाही करता येत नव्हती. माझ्या मते फाळणीची पूर्ण कल्पनाच चुकीची होती. बापूंनी कबूल केले की दोन मान्यवर व्यक्तींनी काश्मीरच्या फाळणीचा विचार माझ्यासमोर मांडला होता परंतु वर सांगितलेल्या कारणांकरिता मी ठामपणे नाही म्हणालो होतो.

"अखेरीस बापू वार्ताहराला म्हणाले की तुम्ही या गोष्टीचा वरवर नाही तर खोलवर जाऊन अभ्यास करा. मी स्वतः केवळ भारतातीलच नाही तर पाकिस्तामधीलही हिंदू आणि मुसलमान यांची मैत्री व्हावी म्हणून प्रयत्न करतो आहे आणि त्या दिशेने प्रयत्न करत राहीन."

मालीशच्या वेळी बापूजींनी बंगालीचा पाठ केला. आंघोळीच्या वेळी टबमध्ये बापूजी डोळे बंद करूनच पडले होते. मी भाईंचे पत्र डाकेत टाकले की नाही आणि ते केव्हा येणार आहेत याबद्दल बापूंनी

चौकशी केली.दक्षिण आफ्रिकेचा प्रश्न परत उपस्थित झाल्यामुळे त्यासंबंधात आलेल्या तारा आणि वर्तमानपत्रातील बातम्या बापूंनी ऐकल्या.

आंघोळीनंतर जवळपास एक तास राजेंद्रबाबूजींशी गोष्टी केल्या. . . .च्या लाचलुचपतीसंबंधी बापूजी आज प्रार्थनेत सावधगिरीची सूचना तर देणारच आहेत.

. . . ला असे वाटते की बापूजी माझ्यात आणि . . . मध्ये पक्षपात करतात. बापूजी म्हणाले, "मी तर कोणामध्येही पक्षपात करत नसतो. आणि अशा पक्षपाताचा प्रश्न का निर्माण व्हावा? परंतु शक्य आहे की मला माझे दोष दिसत नसतील. आणि माझ्यात जे दोष दिसतात ते फेकून द्या, आणि माझ्यात जर काही गुण असतील तर ते ग्रहण करा."

बापूजीसुद्धा जेव्हा अशा प्रकारे एखाद्या लहान मुलाप्रमाणे उत्तर देतात तेव्हा नवल वाटते. खुरशेदबहेन आलेल्या असल्यामुळे त्यांच्याशी पाकिस्तानसंबंधी गोष्टी केल्या. सर सुलतान अहमत साहेबांशीही सरहद्दीसंबंधी गोष्टी केल्या.

दोन वाजता केंद्रीय मदत समिती भेटायला आली. आल्यानंतर त्यांनी आहारासंबंधी चर्चा केली. आणि या संबंधात लक्ष घालायला सरकारला सांगा अशी त्यांनी बापूंना विनंती केली. बापूजी म्हणाले, "माझ्या हाती सरकार नाही, मी तर तुमच्याप्रमाणे विनंतीच करू शकतो." भावनगरचे बंसीधरजी भुईमुगासंबंधी गोष्टी करून गेले. या हंगामानंतर भुईमुगावरील नियंत्रणसुद्धा सरकारने काढून टाकले पाहिजे, तसेच धान्यावरील नियंत्रणही काढून टाकणेही सरकारचे कर्तव्य आहे असे बापूजींचे मत आहे.

आज कोणी तरी दोन आण्याच्या लिफाफ्यात हजारो रुपये पाठवले आहेत. कोणाकडून आले हे कोणालाही माहीत नाही. दोन आण्याच्या लिफाफ्यात जर अशा प्रकारे दोन दोन हजार रुपयांच्या नोटा पाठवल्या तर त्या हरवण्याची शक्यता असल्यामुळे र्यासंबंधी प्रार्थनासभेत काही तरी सांगा असे बिसेनभाई बापूजींना म्हणाले.

हैदराबादचे नबाब सादीकअली खानसाहेब आले. ते तर म्हणतात की आम्ही तर तुमच्याच छत्रछायेखाली आहो. बापूजी म्हणाले, "मला तुम्ही हे लिहून द्या आणि करून दाखवा. सरहद, भावलपूर आणि सिंध वगैरे ज्या ज्या ठिकाणी हिंदूंवर हल्ला झाला आहे त्याचा हैदराबदच्या जनतेने आणि विशेषेकरून मुसलमानांनी निषेध केला पाहिजे."

पंडितजी आलेले असल्यामुळ भावलपूरच्या बंधूंना बापूजी भेटू शकले नव्हते. त्यांना काय म्हणायचे आहे हे समजून घेण्याकरिता बापूजींनी भाईसाहेबांना सांगितले. आणि त्यासंबंधात प्रार्थनेतही म्हणाले. बापूजी खरोखरच सर्व दुःखी लोकांचा आधार आहेत. मुलाखतींकरिता भरपूर वेळ असेल आणि तरीही दुःखी लोकांना न भेटणे बापूजींना आवडत नसायचे. "मी दिल्लीत एवढ्याकरिताच आहे ना? यांचे दुःख दूर करणारे लोक तर वेगळेच आहेत. परंतु त्यांचे दुःख शांततापूर्वक ऐकून जर मी त्यांचे सांत्वन करू शकलो नाही तर मी काय कामाचा?"

यामुळे प्रार्थना प्रवचनात बापूजी सुरुवातीलाच म्हणाले -

"भावलपूरच्या बंधूंना वेळ देऊ शकलो नाही याकरिता मी दिलगीर आहे. मी तुमच्याकरिता वेळ काढीन असे वचन मी त्या बंधूंना दिले आहे. त्यांना शक्य ती मदत करवण्याचा मी प्रयत्न करणार आहे. आणि त्याकरिताच मी सुशीलाबहेन नाय्यर यांना भावलपूरला पाठवले आहे.

"ईश्वरकृपेने तिन्ही जमातींमध्ये इथे जे ऐक्य स्थापित करण्यात आले होते ते अजूनही कायम आहे. आणि याकरिता सहकार्य केल्याबद्दल मी तुम्हा सर्वांचा आभारी आहे.

"आज मला तुमच्याशी दक्षिण आफ्रिकेसंबंधी काही गोष्टी करायच्या आहेत. आपल्याकडे हव्या त्या जमातीचे लोक येऊन राहू शकतात. हवे त्या ठिकाणी जमीन घेऊन वास्तव्य करू शकतात. हा हक्क कोणीही हिरावून घेऊ शकत नाही. असे जरी असले तरी हरिजनांशी आपण दुर्व्यवहार करतो हे खरे आहे.

"परंतु दक्षिण आफ्रिकेत तर काळ्या माणसाला काही विशिष्ट रस्त्यांवर चालूसुद्धा देत नाहीत. मग इतर हक्कांची तर गोष्टच काय करायची? या गोष्टीचा मी साक्षीदार मी आहे. आणि तिथे या हक्कांकरिता तेथील लोक लढा देत आहेत. लढायचे तर अनेक मार्ग आहेत, पण तेथील लोकांनी या लढ्याला सत्याग्रह हेच नाव दिले आहे. तेथील सरकार त्यांना एका शहरातून दुसऱ्या शहरात जाऊ देत नाहीत. उदाहरणार्थ नाताळ, ट्रान्सवाल, हिलस्टेट, केप कॉलनी. आफ्रिका खंड तर खूप मोठा खंड आहे. आणि त्या लोकांना एका भागातून दुसऱ्या भागात जायचे असेल तर त्याकरिता परवानगी घ्यावी लागते. ही दुर्दैवी गोष्ट आहे. यामुळे फार थोडे

लोक कूच करून ट्रान्सवालमध्ये पोहोचले. परंतु मी हे कबूल केले पाहिजे की असे करणारांना तेथील सरकारने अजून पकडले नाही. आणि या कूचचे स्वागतही तिथे फार चांगल्या प्रकारे झाले आहे. हे काम खूप शौर्याचे आहे हे मान्य करावे लागेल. आणि शिवाय या लोकांमध्ये हिंदू, मुसलमान सर्व आहेत. ते सर्व मिळूनमिसळूनच काम करत असतात. आणि जोपर्यंत त्यांना पकडत नाहीत तोपर्यंत त्यांचा हा कूच पुढे जात राहील. पुढे जाऊन कदाचित त्यांच्या या कूचकरिता आपण त्यांचे आभार मानू. हिंदुस्थानी आपल्या जबाबदारीवर जर राहू शकत असेल तर त्यावर गोऱ्यांना त्याचे दुःख होण्याचे कारण काय? हे लोक जेव्हा स्वतत्र होतील तेव्हाच आपण स्वतंत्र होऊ. यामुळे, दक्षिण आफ्रिकेच्या सरकारलाही येथूनच मी माझा संदेश पाठवू इच्छितो की, जो कोणी जिथे राहतो त्या ठिकाणाला जर तो आपले मानून राहील तर त्याच्या मनात ते स्थळ त्याचेच असते. मी दक्षिण आफ्रिकेत वीस वर्षे राहिलो आहे. यामुळे, हिंदुस्थानप्रमाणेच दक्षिण आफ्रिकेलाही मी माझाच देश मानतो.

"म्हैसूरच्या मुसलमानांनी तार करून त्यात त्यांनी दिल्या जात असलेल्या त्रासाचे वर्णन केले आहे. त्यासंबंधात मला कायदा आणि सुव्यवस्था खात्याच्या मंत्र्याची तार आली आहे. ते सांगतात की म्हैसूरच्या मुसलमानांची पूर्ण काळजी घेतली जाते आहे. यासंबंधात तेथील मुसलमानांना मला सांगायचे आहे की तुम्ही जर तुमचे हित व्हावे असे इच्छित असाल तर थोडीशीही अतिशयोक्ती करू नका.

"आता आपल्या भोळेपणासंबंधी. किती तरी लोक मला दानात पैसे पाठवत असतात. त्या बिचाऱ्यांना पैसे कसे पाठवावे हे कळत नसते. यामुळे ते दोन आण्याच्या लिफाफ्यात पैसे पाठवतात आणि त्यांना वाटत असते की लिफाफा कोण उघडून पाहतो? इथे मला माझ्या लहानपणाची गोष्ट आठवते. माझ्या वडिलांजवळ काही किंमती दागिने होते, आणि त्यांनी ते अशाच प्रकारे पाठवले होते. ते वेळेवर पोहोचल्याचा निरोप न आल्यामुळे त्यांच्या काळजीला पारावार राहिला नाही. आणि त्यांना शोधाशोध करण्याकरिता तारा कराव्या लागल्या होत्या. यामुळे कोणाच्या हातात टपाल गेला, रुपये गैरव्यक्तीला मिळाले तर दात्याचे दानसुद्धा जाते आणि दरिद्रनारायणचा पैसासुद्धा जातो. यामुळे अशी चूक कोणीही करू नये."

प्रार्थनेनंतर राजकुमारीबहेनबरोबर गोष्टी केल्या. त्यांनी विचारले, “बापू, तुमच्या प्रार्थनासभेत आजही काही गोंगाट होता काय?” बापू म्हणाले, “नाही. परंतु या प्रश्नाचा अर्थ तू माझी काळजी करते आहेस असा आहे काय? मी जर एखाद्या वेडपटाच्या गोळीने मरणार असेन तर मी तसे हसतमुखाने करायला पाहिजे. माझ्या आत त्यासंबंधी कोणताही क्रोध असू नये. माझ्या अंतःकरणात आणि ओठांवर ईश्वराचे अस्तित्व असले पाहिजे. आणि जरी काही झालेही तरी तू एक अश्रूही ढाळायचा नाही. . . .”

त्यानंतर मंत्रिमंडळासंबंधी काही गोष्टी झाल्या. पाय धुतले, कसरत केली आणि झोपायची तयारी केली. सायंकाळी भाईंची तार आली की ते ३१ तारखेला इथे पोहोचतील. बापूजी म्हणाले, ”चांगले आहे, इथेच येतो आहे. कारण वर्ध्याला जाणे अजूनही अनिश्चितच आहे. आणि जर जायचेच असेल तर आपल्याबरोबर येऊ शकेल. आणि तिथून तुला महुवाला जायचे असेल तर तू जाऊ शकशील. वर्ध्याला जाण्याची आशा असताना तो इथे येतो आहे हा त्याचा सुज्ञपणाच आहे”. मालीश केली. आज तर सर्वच लहान लहान लेखन आहे.

९।।। वाजता झोपायची तयारी. मी सर्व आटोपून १०।। वाजता झोपायला गेले. थंडी तर काही कमी होतच नाही.

बिरला भवन, नवी दिल्ली,

२९-१-'४८

आज नेहमीप्रमाणे ३.३० वाजता प्रार्थना. प्रार्थनेकरिता . . . उठले नव्हते. बापूजींनी मला उठवू नको असे असे सांगितले होते. ते म्हणाले "आता मला कोणाचाही काजी व्हायचे नाही. प्रत्येकाने आपापल्या धर्माचे पालन आपल्या स्वतःच्या इच्छेनुसार केले तरच त्यात प्रत्येकाचे हित आहे. तू आता . . . ला काहीही म्हणू नकोस."

मग चंदवाणीजींनी लिहिलेली कागदपत्रे दुरुस्त केली. त्यांना बिचाऱ्यांना हिंदी कळत नव्हते आणि बापूजींची इंग्रजी ते पकडू शकत नव्हते. बापूजी तर असे काही लिहितात की दोन ओळीतूनच बरेच काही समजावून सांगतात. इतके संक्षेपात लिहितात. आणि चंदवाणीजी लांब. कालच चंदवाणीजी मला सांगत होते, "बापूंजवळ राहणे हे तलवारीच्या धारेवर उभे राहण्यासारखे आहे."

मग सेवाग्राममध्ये सुलोचनाबहेनच्या मृत्यू संबंधात तिच्या वडिलांना पत्र लिहिले -

भाई शंकरन (हिंदुस्तानी तालिमी संघात वर्धा येथे शिक्षक),

चि. किशोरीलालने तुमची मुलगी सुलोचना हिच्या मृत्यूची बातमी सांगितली. मला त्याची काहीही कल्पना नव्हती. मी तुम्हाला काय लिहू शकतो? मी तुमचे समाधान कसे करू शकतो? मृत्यू हा खरा मित्र आहे. आपल्या अज्ञानामुळे आपल्याला दुःख होते. सुलोचनाचा आत्मा काल होता, आज आहे आणि उद्या राहील. शरीराला अर्थातच मरावे लागत असते. सुलोचना आपले दोष घेऊन निघून गेली आणि तिने चांगल्या गोष्टी मागे ठेवल्या. आपण हेही विसरू नये आणि तिलाही विसरू नये. तुमचे कर्तव्य पार पाडत असताना अजून सावध राहा.

बापूचे आशीर्वाद,

* * *

चि. किशोरीलाल,

आज प्रार्थनेनंतरचा वेळ पत्रे लिहिण्याकरिता राखून ठेवला आहे. तू मला शंकरनच्या मुलीच्या मृत्यूबद्दल लिहिले हे फार चांगले केले. मी त्यांना लिहिले आहे. माझी तेथील भेट अजून हवेतच आहे. सेवाग्रामला ३ ते १२ तारखेपर्यंत राहण्याचा माझा विचार आहे. दिल्लीतील माझे काम झाले असे जर

समजण्यात येत असेल तर प्रतिज्ञापालनाकरिता मी अजून दिल्लीत राहण्याची आवश्यकता नाही. ते काम झाले की नाही हे माझे येथील सहकारी ठरवू शकतात. बहुधा उद्या यासंबंधी आपल्याला निर्णय घेता येईल. तिथे येण्याचा माझा उद्देश रचनात्मक कार्य कारणाऱ्या विविध संस्थांना एक करता येईल काय याचा विचार करणे आणि जमनाललजींच्या पुण्यतिथीला हजर राहणे आहे. माझ्यात परत बऱ्याच चागल्या पद्धतीने शक्ती येते आहे. या वेळी दोन्ही मुत्रपिंडावर आणि यकृतावर परिणाम झाला आहे. याचा अर्थ रामनामावर माझी पुरेशी श्रद्धा नव्हती असा होतो.

बापूचे आशीर्वाद,

(हे पत्र २९ तारखेला डाकेत टाकता आले नाही. आपण दोन तारखेला वर्ध्याकरिता निघत असल्याचे कळवणाऱ्या दोन ओळी या पत्रात लिहू काय असे दुसऱ्या दिवशी मनूने गांधीजींना विचारले. त्यावर गांधीजी उद्गारले : "उद्याचे कोणी पाहिले? माझे जाणे निश्चित झाले तर मी तसे आजच्या प्रार्थनेनंतर सांगेन व ते रात्री प्रक्षेपित केले जाईल. परंतु पत्र तसेच राहू देता येत नव्हते. हे पत्र टाकण्याची जरी बिसेनची जबाबदारी होती तरी तुला माझ्या कामातून सुट्टी नाही. ही अजून कोणाची चूक असू शकेल परंतु मी ही तुझी चूक समजतो.")

* * *

५.४० वाजता टपालाचे कामकाज संपवून झोपले. जयप्रकाशजी, प्रभावतीबहेन दिल्ली सोडण्यापूर्वी बापूजींना भेटायला आले होते. बापूजींनी त्यांना आपले दुःख सांगितले. बापूजींची इच्छा होती की स्वातंत्र्यापूर्वी ज्याप्रमाणे एक होऊन आपण ब्रिटिशांशी लढलो होतो तसेच समाजवादी पक्षाने आताही सहकार्य केले पाहिजे. तेव्हाच समाजवाद खऱ्या अर्थाने पुढे जाईल. त्यांनीसुद्धा वचन दिले की जोपर्यंत बापूजी आहेत तोपर्यंत त्यांचा आदेश शिरसावंद्य असेल. बापूजी 'आदेश' मान्य करत नाहीत. त्यांचा कर्तव्यावर विश्वास आहे. तरीसुद्धा जयप्रकाशसारखे प्रामाणिक आणि बुद्धिमान माणसे कुठे सापडतात? बापूजी तर गुणपूजक आहेत. यामुळेच ते इतका संग्रह करून बसले आहेत.

बापूजींना आंघोळ घातली तेव्हाच बापूजींनी आम्हा सगळ्यांबद्दल गोष्टी केल्या. मी म्हणाले, ". . . मी वयाने सर्वांपेक्षा लहान आहे. यामुळे तुम्ही मला यांच्याबद्दल काही जरी सांगत असाल तरी . . .मला ते आवडत नाही. . . . शी एकट्याने बोलण्याकरिता तुम्ही वेळ काढायला पाहिजे." बापूजी म्हणाले, "मी लहान मोठे वय पाहतच नसतो. . . . कडून काम घेणे फार कठीण आहे. परंतु आज . . . ला वेळ दिला. हे तू स्वतः का सांगत नाहीस?"

जेवणाच्या वेळी पाऊणेक तास . . . शी एकट्यानेच गोष्टी केल्या. १०.३० वाजता पद्मजाबहेन, कृष्णाबहेन हठिसिंग, इंदिराबहेन गांधी आणि ताराबहेन (विजयालक्ष्मी पंडित यांची मुलगी) आले. यांच्याशी विनोद करत बापूजी म्हणाले, (नेहरू कुटुंबातील स्त्रिया गोळा झाल्यामुळे) "या, मला राण्या भेटायला आल्या आहेत काय?" सगळ्या खळखळून हसल्या. तुमची इच्छा असेल तिथे बसा असे बापूजींनी त्यांना सांगितले. थंडीमुळे बापूजी नोआखालीवाला टोप घालून बसले होते. बापूजींनी या चारही बहिणींच्या कुटुंबाचा हालहवाल विचारला. तेव्हा पद्माबहेन म्हणाली, "बापू, हा बर्मी टोप आहे काय?" बापूजी, "सुंदर बर्मी टोप अजून यायचा आहे. मग मी सुंदर दिसेन, नाही?" सर्वांनी खूप खूप विनोद केला. अखेरीस बापूजी म्हणाले, "तुम्ही पोरी आता पळा. नाही तर बाहेर जे लोक उभे आहेत ते तुम्हांला शिव्या देतील." खूप लोक असले की बरे वाटत नसल्यामुळे . . . नी बापूजींना एकट्याने भटण्याकरिता वेळ मागितला होता. बापूजी म्हणाले, "प्रत्येक वेळी तुम्हाला एकट्याने भेटणे कठीणच आहे. आता तर लोकांच्या घोळक्यातच भेटता येणे शक्य होत जाणार आहे."

त्यांच्यानंतर स्थानिक मौलाना आले. त्यांच्याशी सरहद्द आणि सिंधसंबंधीच गोष्टी झाल्या. दिल्लीत तर खूप शांतता आहे.

माती, कताई वगैरे सर्व नेहमीप्रमाणे चालत असतात. सुधीर दासनी 'लंडन टाईम्स'मध्ये पंडितजी आणि सरदारदादा यांच्यातील मतभेदाची जी हकिगत आली होती ती बापूजींना सांगितली. बापूजींचे मत होते की दुसरा कोणी आपल्यामध्ये फूट पाडायचा प्रयत्न जरी करत असेल तरी आपण का आपली मने दुभंगू द्यावी? बापूजी तर या दोघांनाही ही गोष्ट सांगणार आहेत. नंतर ग्वाल्हेरचे दिवाण आणि श्रीनिवास आले. श्रीनिवासजींनी मद्रासमधील खाद्यपदार्थांच्या टंचाईविषयी चर्चा केली.

श्रीमती राजेन नेहरू अमेरिकेला जाणार असल्यामुळे प्रणाम करायलाच आल्या आहेत. अडीच वाजता मिस मागरिटआल्या. त्यांनी स्वतःची ओळख एक 'टॉर्चरर', एक सतावणारी म्हणून करून दिली. त्या वार्ताहर आहेत. त्या मला ओळखतात कारण त्या नोआखालीला आलेल्या आहेत. बापूजींना त्यांनी 'तुमचे विश्वस्ततेसंबंधी काय विचार आहेत?' असे विचारले. उत्तरात बापूजी म्हणाले - "विश्वस्त तो असतो जो विश्वस्त संस्थेच्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडतो. व ती संस्था ज्यांच्याकरिता आहे त्यांचे हित जपतो."

मग त्यांनी विचारले, "हिंदुस्थानात अशा आदर्शाचे पालन करणारा कोणी उद्योगपती तुम्हाला माहीत आहे काय?"

"नाही. परंतु हे खरे आहे की काही लोक या दिशेने प्रयत्न करत आहेत. उदाहरणार्थ माझे यजमान श्री. घ. दा. बिर्ला, ते मला फसवत नाहीत अशी मी आशा करतो. ते जर असे करताना मला आढळले तर मी त्यांच्या छताखाली राहणार नाही."

त्यांनी बापूजींना दुसरा प्रश्न विचारला, "तुम्हाला १२५ वर्ष जगण्याची इच्छा का आहे?"

बापू म्हणाले, "आज चोहोकडे भयानक घटना घडत असल्यामुळे मी ही इच्छा सोडून दिली आहे. मला काळोखात जगण्याची इच्छा नाही".

त्यांनी बापूजींना केवळ दोन मिनिटांचा वेळ मागितला होता. आज तर भरगच्च कार्यक्रम होता. परंतु त्यांनी बापूजींचा फोटो काढण्याचा आणि त्यावर सही करण्याचा आग्रह केला. आणि त्याचबरोबर आपला मुद्दा पूर्ण करण्याकरिता फोटो घेता घेता बापूजींना विचारले, "तुम्ही अमेरिकेला अण्वस्त्र तयार करू नये असा सल्ला द्याल काय?

बापूजींनी जोर देत उत्तर दिले, "निश्चितच. मागील युद्धाचा शेवट फार वाईट झाला आणि विजयी राष्ट्र सत्तेची हाव आणि मत्सर यांना बळी पडले. आतापासून तिसऱ्या युद्धाची चर्चा होऊ लागली आहे. आणि हे युद्ध कदाचित मागील दोन युद्धांपैक्षाही अधिक विनाशकारी असल्याचे सिद्ध होईल. अहिंसा अण्वस्त्रापेक्षा किती तरी शक्तिशाली शस्त्र आहे. हिरोशिमाचे लोक हजारोच्या संख्येत प्रार्थना करत आणि अंतःकरणात सद्भावना ठेवून मेले असते तर परिस्थितीत चमत्कार वाटावा इतका बदल झाला असता".

बापूजींना वाटले की या भगिनींचा लोभ संपणार नाही. यामुळे शेवटच्या फोटोवर सही करत घड्याळात पाहत बापूजी म्हणाले, "तुमचे दोन मिनिट तर केव्हाच पूर्ण झाले आहेत. पाहा दोन मिनिट पूर्ण होऊन वर किती सेकंद झाले?"

त्यानंतर लगेचच दुसऱ्या एक अमेरिकी भगिनी आल्या. त्या जागतिक वाय. डब्ल्यू. सी. ए.च्या महासचिव आहेत. स्वित्झरलंडच्या आहेत. त्यांना हिंदुस्थानच्या सामाजिक, आर्थिक तसेच नैतिक

प्रश्नात खूपच रस आहे. हिंदुस्थानची चांगल्यातचांगली सेवा कशी करावी आणि हिंदुस्थानला कशा प्रकारे पाहिले पाहिजे यासंबंधी बापूजींचे मार्गदर्शन मागितले.

बापूजी म्हणाले, "भारताला भेट देण्याकरिता येणाऱ्या अमेरिकी लोकांनी भारतीयांच्या दृष्टिकोनाने भारताकडे पाहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. देशात फिरून मैत्रीपूर्ण पद्धतीने ते रचनात्मक टीका करू शकतात. परंतु इथल्या घाणेरड्या ठिकाणांना भारत म्हणणे हे भारताची चेष्टा करणे आहे. इथे बापूंनी एमिली किनार्डचे (त्या २० जुलै १९४०ला आणि १५ जानेवारी १९४१ला सेवाग्राम आश्रमात राहून गांधीजींना भेटून गेल्या होत्या. पाहा एमिली किनार्ड यांच्याशी चर्चा, जुलै २०, १९४०) उदाहरण दिले. त्या स्वतःच मुंबईत (इथे सेवाग्राम पाहिजे. ही स्पष्टपणे चूक आहे.) बापूंच्या पाहुण्या होऊन राहिल्या होत्या. त्यांचे म्हणणे होते की त्यांना जे काही शाकाहारी जेवण उपलब्ध होते आणि जो काही थोडासा आराम मिळत होता त्यावर त्या संतुष्ट होत्या आणि बापूजींबरोबर प्रार्थनेच्या ठिकाणी पायी चालण्याचा त्यांचा आग्रह असायचा. मरेपर्यंत त्या मला पत्र लिहीत असत आणि त्यात त्या आपल्या अंतःकरणातील भावना ओतत असत.

नवीन परिस्थितीत विदेशी मिशन भारतीय ख्रिश्चनांकरिता वा ख्रिश्चन भारतीयांकरिता (आता त्यांना ज्या कोणत्या नावाने संबोधिलेले आवडेल) काय करू शकतो असे त्या महिलेने विचारले असता गांधीजी म्हणाले की भारतीय ख्रिश्चनांना स्वतःच्या भरवशावर राहू देणे व या भूमीचे पुत्र म्हणून त्यांना स्थिरावू देणे हेच त्यांच्याकरिता सर्वात चांगले राहील."

या नंतर आंधळे लोक आले. ते पाकिस्तानमधून आलेले होते आणि बापूजींनी आपले सांत्वन करावे अशी त्यांची इच्छा होती. शेवटी बन्नूचे लोक आले. त्यांनी तर आपली करुण कहाणी अतिशय दुःखाने भरलेल्या आणि चिडलेल्या सुरात सांगितली. एका वृद्ध बाईने तर बापूजींना 'हिमालयात निघून जा' असे सांगितले. परंतु यावर बापूजी थोड्या जड अंतःकरणाने म्हणाले, "माझा हिमालय इथेच आहे. तुमचे दुःख दूर करता करता, तुमची सेवा करता करता मरणे हे माझ्याकरिता हिमालयात जाण्यासारखेच आहे."

बापूजींना या लोकांच्या गोष्टी इतक्या काही लागल्या की प्रार्थनेतून उठल्यानंतर ते मला म्हणाले, "ही तुझ्याकरिता आणि माझ्याकरिता 'पूर्वसूचना' आहे असे समज." जे लोक माझ्या तोंडातून निघालेले शब्द झेलायला तयार होते तेच आज मला हिमालयात जाण्याकरिता सांगत आहेत. या दुःखी

बंधूंच्या हृदयातून निघालेला हा दुःखी चित्कार हा यज्ञ करत असलेल्या तुझ्या आणि माझ्याकरिता ईश्वरी आवाज आहे असे समज. ही गोष्ट मी तुलाच सांगतो आहे कारण या यज्ञात इथे प्यारेलाल, सुशीला, आभा, चांद, देव, बिसेन हे सगळे असूनही माझ्याबरोबर कोणीच नाही. केवळ तूच एकटी बांधलेली असल्यामुळे माझ्या आत्म्याचा आवाज मी तुझ्यापासून कसा लपवू शकतो? परंतु बापूजी फार व्यथीत होते.

शिवाय यात लाचलुचपतीच्या गोष्टीही सुरू होत्या. आजचा दिवस तर इतका काही भरगच्च होता की श्वास घ्यायलाही सवड मिळत नव्हती. बापूजी काँग्रेसच्या घटनेच्या दृष्टीने लिहीत आहेत. प्रार्थनाप्रवचनात चांदवाणीजींनी चांगलाच घोटाळा केला. यामुळे तो दुरुस्त करण्याकरिता बापूजींना प्रार्थनाप्रवचन परत लिहावे लागले. यामुळे त्यांना परत मेहनत करावी लागली. खूप थकलेले आहेत. म्हणत होते की खूप थकलेलो आहे, परंतु काम तर पूर्ण करावेच लागेल.

(पू. बापूजींचे आजचे प्रार्थनाप्रवचन या धरेवरील शेवटचेच प्रार्थनाप्रवचन झाले आहे. तसेच काँग्रेसच्या घटनेच्या दृष्टीने लिहिलेला लेखही शेवटचाच झालेला आहे. इथे त्यांच्याच शब्दात हे दोन्ही देत आहे)

"बंधूंनो आणि भगिनींनो,

मला ज्या अनेक गोष्टी तुम्हांला सांगायच्या आहेत त्यातून मी केवळ सहा गोष्टी निवडल्या आहेत कारण मला १५ मिनिटात माझे बोलणे संपवायचे आहे.

"माझ्या असे लक्षात आले आहे की आपण थोडा उशीर करतो आहो. हे बरोबर नाही. बहावलपूरमध्ये अजूनही अडकलेल्या निर्वासितांना भेटण्याकरिता सुशीलाबहेन बहावलपूरला गेल्या आहेत. त्यांना दुसरे कोणतेही काम नाही. फ्रेंड्स सर्व्हिसेसच्या लेस्ली क्रॉस यांच्याबरोबर त्या गेल्या आहेत. कुणी तरी मित्रापैकी तिथे जावे आणि तेथील निर्वासितांची परिस्थिती कशी आहे ते पाहून मला सांगावे असा यामागील माझा विचार आहे. सुशीलाने जावे असा कोणताही प्रस्ताव नव्हता. परंतु तिने जेव्हा ही योजना ऐकली तेव्हा मलाही लेस्ली क्रॉसबरोबर जाण्याची परवानगी द्यावी अशी तिने विनंती केली. सुशीला नोआखालीला गेली होती तेव्हापासून ती श्री क्रॉस यांना ओळखते. ती कुशल डॉक्टर आहे आणि ती पंजाबमधील गुजरात जिल्ह्यातील आहे.

तिलासुद्धा बरेच काही सहन करावे लागलेले आहे. तिच्याजवळ तिथे भरपूर मालमत्ता होती. ती सर्व तिने गमावली. परंतु तिच्या अंतःकरणात विष भरलेले नाही. ती म्हणाली की मी तिथे गेले तर मदत होईल कारण मला पंजाबी, हिंदुस्तानी, उर्दू, आणि इंग्रजी येते. श्रीयुत क्रॉसना यामुळे माझी मदत होईल. मला आनंद झाला. त्यात अर्थातच अडचणी होत्या परंतु सुशीला त्या अडचणींना घाबरणारी नाही. ती जर घाबरणारी असती तर ती नोआखालीला काम करणयाकरिता गेलीच नसती. जे अनेक लोक पंजाबमध्ये राहतात त्यांनी सर्व काही गमावले आहे. कमीतकमी तिची खाण्यापिण्याची आणि इतर गोष्टींची सोय आहे. मी श्रीयुत क्रॉसचा सल्ला घेतला आणि त्यांनी या कल्पनेचे स्वागत केले. ते म्हणाले की ती दुभाष्या म्हणून काम करू शकते. ते रेडक्रॉसमधून आहेत. युद्धात जखमी झालेल्या लोकांना मदत करणे हे रेडक्रॉसच्या लोकांचे काम असते. श्रीयुत क्रॉस सुशीलाबरोबर गेले की सुशीला श्रीयुत क्रॉसबरोबर गेली हा गोंधळात टाकणारा प्रश्न आहे, परंतु ते मित्र आहेत व ते परस्परांना पसंत करतात. ते तिथे सेवा करण्याकरिता गेले आहेत, पैसा कमावण्याकरिता नाही. ते तिथे पाहतील व तेथील परिस्थितीचा मला अहवाल देतील. नबाब मला लिहीत असतात. श्रीयुत क्रॉस आणि सुशीला यांचा अहवाल मिळाल्यानंतर यासंबंधी मी तुम्हांला जास्त सांगेन.

"बन्नू येथील काही लोक, बहुधा ते चाळीसेक असावे, माझ्याकडे आले होते. त्यांना फार कष्ट सहन करावे लागले यात काही शंका नाही, परंतु ते चालू शकत होते. काहींची बोटे जखमी झालेली आहेत. इतरांच्या शरीराच्या वेगवेगळ्या भागावर जखमा झालेल्या आहेत. मी त्यांना आताच पाहिले आणि सर्व काही ब्रिजकृष्णला समजावून सांगण्याकरिता सांगितले. परंतु मी त्यांना विसरलेलो नाही हे त्यांनी लक्षात ठेवावे. ती सर्व चांगली माणसे होती. ते संतापलेले नक्कीच असतील, परंतु तरीही त्यांनी माझा सल्ला मान्य केला. त्यांच्यातील एक गृहस्थ - ते निर्वासित आहेत काय असे मी त्यांना विचारले नाही - म्हणाले की तुम्ही आधीच भरपूर नुकसान केले आहे आणि अजून तसे करत राहण्याचा तुमचा विचार आहे काय? यामुळे तुम्ही मोठे महात्मा असला म्हणून काय झाले? तुम्ही इथून निघून जा. मी विचारले कुठे जाऊ? ते म्हणाले हिमालयात निघून जा. मग मी त्यांना रागावलो. ते माझ्यासारखे वयस्कर गृहस्थ नव्हते, ते धट्टेकट्टे आहेत - तसे ते वयस्कर आहेत, तरुण आहेत, माझ्यासारख्या पाचसात माणसांना

ठोकून काढू शकतात, मी तर महात्मा आहे, घाबरलो तर माझे काय हाल होतील? मी त्यांना सांगितले की अनेक लोकांची इच्छा मी इथेच राहावे अशी आहे. अनेक लोक असे आहेत की जे माझी स्तुती करतात आणि काही माझ्यावर टीका करतात. मग मी काय करू? मी तेच करू शकतो जे मला ईश्वर सांगेल. तुम्ही म्हणू शकता की तुमचा ईश्वरावर विश्वास नाही. परंतु असे असले तरी तुम्ही मला माझ्या मार्गाने जाण्याची परवानगी दिली पाहिजे. तुम्ही म्हणू शकता की आम्हीच ईश्वर आहो. पण असे असेल तर ईश्वर कुठे जाईल? ईश्वर एक आहे. हं, हे खरे आहे की पंच परमेश्वर असतात. परंतु हा पंचांचा प्रश्न नाही. दुःखी माणसाला परमेश्वर मदत करत असतो परंतु परमेश्वर स्वतः दुःखी नसतो. मी जेव्हा म्हणतो की प्रत्येक स्त्री माझी सख्खी मुलगी आहे, बहीण आहे, आई आहे तेव्हा तिचे दुःख माझे दुःख होत असते. मला निर्वासितांचे दुःख कळत नाही हे तुम्हांला कसे कळले? मी मुसलमानांचा मित्र आहे म्हणून हिंदू आणि शिखांचा शत्रू आहे असे तुम्ही कसे काय गृहीत धरले? मला तुमचे दुःख जाणवत नाही असे तुम्हांला कसे कळले? कोणाची इच्छा मी निघून जावे अशी असली तरी मी निघून जाऊ शकत नाही. मी कोणाच्या विनंतीवरून हे सेवेचे काम सुरू केलेले नाही. मी जे काही करतो आहे ते ईश्वराच्या आज्ञेप्रमाणे आहे. ईश्वराची जशी इच्छा असेल तसे तो करील. तो मला घेऊन जाऊ शकतो. हिमालयात गेल्याने मला शांतता लाभणार नाही. मला वादळामध्ये शांततेचा शोध घ्यायचा आहे वा त्या वादळात मला मरायचे आहे. माझा हिमालय इथेच आहे.

"माझ्याकडे निर्वासितांच्या तक्रारी येत असतात. त्यांना अन्नवस्त्राची मदत करण्यात येते व त्यांना शक्य असेल तितक्या प्रकारे मदत करण्यात येत असते. परंतु त्यांना काम करण्याची इच्छा नसते. मी सांगितले आहे की निर्वासितांना आपल्या व्यथा संपवायच्या असतील, त्यांना जर व्यथेचे रूपांतर सुखात करायचे असेल आणि भारताची आणि स्वतःची सेवा करायची असेल तर त्यांनी काम करायला कचरू नये. काम केल्याशिवाय कोणत्याही निर्वासिताला सुखासमाधानात जगण्याचा अधिकार नाही. गीता म्हणते, "यज्ञ करा आणि मग खा". यज्ञानंतर जे शिल्लक राहील ते खा. हे केवळ माझ्याकरिताच सांगितलेले नाही तर तुमच्याकरिता आणि इतर सर्वांकरिताही सांगितलेले आहे. हे निर्वासितांनाही लागू आहे. करोडपती जरी काम न करता खात असेल तरी तो धरणीला भार असतो. तुम्ही जर अपंग

असाल वा आंधळे असाल वा अतीशय म्हातारे असाल तर अर्थातच ते कोणीही समजून घेईल. परंतु धडधाकट माणसाला काम न करण्याकरिता कोणतेही कारण नसते. जे ताकदवान असतील त्यांनी शिबिरातील संडास साफ करावे, त्यांनी कताई करावी, जे कोणते काम त्यांच्या वाट्यावर येत असेल ते त्यांनी केले पाहिजे. त्यांनी आपल्या मुलांना शिकवले पाहिजे.

"आज मला कोणी तरी भेटायला आले होते. मी त्यांचे नाव विसरलो. त्यांनी शेतकऱ्यांचा उल्लेख केला. मी म्हणालो की माझे चालले असते तर आपले महाराज्यपाल आणि आपले प्रधानमंत्री शेतकरी असते. माझ्या लहानपणी मी एक कविता शिकलो होतो. तिच्याच म्हटले आहे की "हे शेतकरी राजा तू राजा आहेस, तू संपूर्ण जगाचा पोशिंदा आहेस". शेतकरी जर अन्न पिकवणार नाही तर आम्ही काय खाऊ? परंतु आज आपण त्याला गुलाम केले आहे. शेतकरी काय करू शकतो? त्यांने बी. ए., एम. ए. यासारख्या पदव्या त्याने मिळवल्या पाहिजे काय? त्याने जर तसे केले तर त्याचा विनाश होईल. मग तो कुदळ चालवायच्या कामाचा राहणार नाही. जमिनीतून धान्य पिकवणारा माणूस आपला मुख्यमंत्री, प्रधानमंत्री झाला तर भारताचा चेहरामोहरा बदलून जाईल. मद्रासमध्ये धान्याचा तुटवडा आहे. मद्रास सरकारचा प्रतिनिधी जयरामदास (जयरामदास दौलतराम, १८९१-१९७९; 'हिंदुस्तान टाईम्स'चे संपादक, १९२६-२७; कॉंग्रेसचे महासचिव, १९३१; बिहारचे राज्यपाल, १९४७-८; आसामचे राज्यपाल, १९५०-५६; केंद्रीय सरकारमध्ये अन्न आणि शेती खात्याचे मंत्री, १९४८-५०) यांनी मद्रासकरिता धान्य उपलब्ध करून द्यावे म्हणून समजूत घालण्याकरिता आला होता. मद्रासच्या लोकांच्या या वृत्तीचे मला दुःख होते. तुमच्या स्वतःच्या प्रांतात शेंगदाणे, नारळ, आणि किती तरी गोष्टी खाण्याकरिता उपलब्ध आहेत हे मी त्यांच्या निदर्शनास आणून देऊ इच्छितो. त्यांना भरपूर मासे उपलब्ध आहेत आणि तुमच्यापैकी अनेकांना ते चालतात. मग बाहेर जाऊन भीक मागण्याची काय गरज? तांदूळ मिळावा आणि तोही पॉलीश केलेला तांदूळ मिळावा, ज्यातील सर्व सत्त्व काढून टाकण्यात आलेले असते, आणि नाही तर तांदळाच्याऐवजी गहू मिळावा असा आग्रह त्यांनी धरणे योग्य नाही. ते शेंगदाण्याचा आणि नारळाचा चुरा भाताच्या पीठात मिसळू शकतात व अशा प्रकारे दुष्काळाच्या लांडग्याला दाराबाहेर ठेवू शकतात. याकरिता केवळ आत्मविश्वास आणि श्रद्धा यांची गरज असते. मी मद्रासच्या लोकांना चांगला ओळखतो. दक्षिण आफ्रिकेत माझ्याबरोबर सर्व भाषिक प्रांतांतील लोक होते. सत्याग्रहातील

कूचच्या दरम्यान (त्या कूचची सुरुवात नोव्हेंबर ६, १९१३ला झाली होती.) लोकांना दररोज एक पौन्ड ब्रेड आणि एक औंस साखर देण्यात येत असे. परंतु रात्रीच्या वेळी आमचा जिथेकुठे मुक्काम व्हायचा तिथे ते जंगलातील गवतातून खाण्यासारख्या गोष्टी निवडायचे आणि हसतगात स्वयंपाक करायचे. ते पाहून मला आश्चर्य वाटत असे. अशी समयसूचकता असलेले लोक कधीही लाचार होऊ शकत नाहीत. हे खरे आहे की आम्ही सर्व मजूर होतो आणि प्रामाणिकपणे काम करण्यातच आमची मुक्ती आणि आमच्या मूलभूत आवश्यकतांची पूर्ती आहे हे आम्हांला माहीत होते."

प्रवचन पूर्ण होत नाही तोच बापूजींनी मार्गसूचक लेख लिहिला -

भारताची जरी फाळणी झालेली असली तरी भारतीय राष्ट्रीय काँग्रेसने उपयोजिलेल्या साधनांनी भारताला स्वातंत्र्य मिळालेले असल्यामुळे सध्याच्या स्वरूपातील कॉंग्रेसचे कार्य संपलेले आहे. म्हणजे प्रचार यंत्रणेचे माध्यम आणि वैधानिक यंत्रणेची तिची उपयोगिता संपलेली आहे. लहान मोठी शहरे सोडली तर भारतातील सात लाख खेड्यांच्या दृष्टीने सामाजिक नैतिक आणि आर्थिक स्वातंत्र्य अजून मिळायचेच आहे. लोकशाहीच्या ध्येयाच्या दिशेने भारत पुढे जात असताना सैनिक सत्तेवर नागरीसत्तेचे वर्चस्व स्थापण्याकरिता लढा होणे अपरिहार्य आहे. राजकीय पक्ष आणि सांप्रदायिक संस्था यांच्याशी होणाऱ्या स्पर्धेपासून आपण कॉंग्रेसला वाचवले पाहिजे. या आणि अशाच इतर कारणांमुळे अखिल भारतीय कॉंग्रेस समिती खाली दिलेल्या नियमानुसार आजच्या स्वरूपातील या संस्थेला विसर्जित करून लोक सेवा संघाच्या स्वरूपात स्वतःला पुनर्घटित करण्याचा प्रयत्न करत आहे. परिस्थितीप्रमाणे या नियमांत फेरफार करण्याचा तिला अधिकार असेल.

गावकरी वा ग्रामीण मनोवृत्तीच्या पाच प्रौढ पुरुष वा स्त्रियांची प्रत्येकी एक पंचायत बनलेली असेल. ती तिच्या नेत्याची निवड करील.

अशा प्रकारच्या १०० पंचायती बनतील तेव्हा प्रथम पातळीवरील ५० नेत्यांनी आपल्यामधून वरच्या पातळीवर काम करण्याकरिता एका नेत्याची निवड करावी. अशा रीतीने पहिल्या पातळीवरील नेत्यांनी दुसऱ्या पातळीवरील नेत्याच्या अधिनस्थ काम करावे. दोनशे

पंचायतींचे असे जाळे विणणे तोपर्यंत सुरू ठेवावे जोपर्यंत संपूर्ण भारतात त्यांचा प्रसार होत नाही.

नंतर पंचायतींच्या प्रत्येक समूहातून आधी सांगितल्याप्रमाणे दुसऱ्या पातळीवरील नेत्याची निवड करत जावे. दुसऱ्या पातळीवरील नेत्यांनी संपूर्ण भारताकरिता तसेच त्यांच्या क्षेत्रातही काम करावे. आवश्यकता वाटेल तेव्हा दुसऱ्या पातळीवरील नेत्यांनी (याची जी प्रत अखिल भारतीय कॉंग्रेस कमेटीच्या कार्यालयात आहे तिच्यात इथे प्रश्न चिन्ह आहे.) आपल्यामधून एका नेत्याची निवड करावी आणि त्या नेत्याने समूहाची इच्छा असेल तोपर्यंत समूहाची घडी बसवून त्यांचे मार्गदर्शन करत राहावे.

(प्रांत आणि जिल्ह्यांची अजून अंतिम रचना झालेली नसल्यामुळे सेवकांच्या या समूहाला प्रांत वा जिल्हानिहाय वाटण्याचा प्रयत्न करण्यात आलेला नाही. आणि कोणत्याही वेळी रचण्यात आलेल्या समूहाचे कार्यक्षेत्र संपूर्ण भारत असेल. सेवकांना अधिकार वा सत्ता त्यांच्या मालकांकडून म्हणजे भारतीय जनतेकडून मिळत असते हे लक्षात ठेवण्यात आले पाहिजे. त्या सेवकांची निवड भारतीय जनतेने स्वेच्छेने आणि सुज्ञपणाने केलेली असते हे लक्षात ठेवले पाहिजे.)

१. प्रत्येक सेवक आपल्या हाताने कताई केलेल्या सुतापासून तयार केलेली खादी वापरणारा असावा आणि सर्व प्रकारच्या व्यसनांपासून तो मुक्त असावा. तो जर हिंदू असेल तर त्याने स्वतःमधील आणि स्वतःच्या कुटुंबातील अस्पृश्यता दूर केली पाहिजे आणि जातीय ऐक्यावर, सर्वधर्मसमभावावर आणि जात, धर्म आणि स्त्रीपुरुषात कोणत्याही प्रकारचा भेदभाव न करता सर्वांना समान संधी मिळण्याच्या तत्त्वावर त्याचा विश्वास असला पाहिजे.

२. आपल्या क्षेत्रातील प्रत्येक गावकऱ्याशी त्याचा वैयक्तिक संबंध असला पाहिजे.

३. गावकऱ्यांमधून तो कार्यकर्त्यांची निवड करील व त्यांना प्रशिक्षण देईल. या सर्वांचे तो रजिस्टर ठेवील.

४. तो आपल्या दैनंदिन कामाची नोंद ठेवील.

५. गाव आपल्या शेतीच्या आणि गृहोद्योगाच्या बाबतीत स्वयंपूर्ण होईल अशा रीतीने तो गावाची संघटना करील.

६. गावकऱ्यांना तो स्वच्छतेचे आणि आणि आरोग्याचे शिक्षण देईल व गावातील लोकांची प्रकृती बिघडू नये म्हणून तो सर्व प्रकारे प्रयत्न करील.

७. हिंदुस्तानी तालिमी संघाच्या धोरणानुसार नयी तालीमच्या आधारावर गावकऱ्यांच्या जन्मापासून तर मृत्यूपर्यंतच्या सर्व शिक्षणाची तो व्यवस्था करील.

८. शासनाच्या मतदार सूचीत जी नावे आलेली नसतील ती नावे तो नोंदवील.

९. ज्यांना मतदानाची आवश्यक पात्रता मिळाली नसेल त्यांच्यात ती पात्रता यावी म्हणून तो त्यांना प्रोत्साहित करील.

१०. वर सांगितलेल्या आणि वेळोवेळी वाढवण्यात आलेल्या उद्दिष्टांच्या परिपूर्तीसाठी योग्य त्या कर्तव्यांचे पालन करण्याच्या दृष्टीने संघाने तयार केलेल्या नियमानुसार तो स्वतः प्रशिक्षण घेईल आणि पात्र होईल.

संघ खालील स्वयंचालित संस्थांना मान्यता देईल -

१. अखिल भारतीय चरखा संघ

२. अखिल भारतीय खादी ग्रामोद्योग संघ

३. हिंदुस्तानी तालिमी संघ

४. हरिजन सेवक संघ

५. गोसेवा संघ

अर्थव्यवस्था

संघ आपल्या ध्येयाची परिपूर्ती करण्याकरिता गावकऱ्यांकडून आणि इतरांकडून वर्गणी गोळा करील. गरीब लोकांकडून पैसा घेण्यावर खास भर देण्यात येईल.

नवी दिल्ली, जानेवारी २९, १९४८ मो. क. गांधी

आज मुलाखतीकरिता येणारात मुंशीजी सोहनसिंगजी, हैदराबादचे प्रधानमंत्री वगैरे एकानंतर एक येत होते. मौलानासाहेबांबरोबर खूप गोष्टी झाल्या.

रात्री थकलेले असूनसुद्धा काँग्रेसच्या घटनेचा मसुदा तयार केलाच. ९। वाजता पाय धुतले. नेहमीप्रमाणे उठले. बापूजी सरळ झोपायला चालले होते. आज तर इतके काही थकलेले आहेत की कसरत करायची शक्तीही त्यांच्यात राहिलेली नाही. परंतु आठवण दिल्यानंतर कसरत तर केलीच. बापूजींच्या डोक्याला मी तेल चोळत होते. दोन मिनिट मौन ठेवून म्हणाले, "आज माझ्या डोक्यात चक्कर येत आहेत. . . . च्या मुलांची लाचेची गोष्ट निघाली. आपण काय सांगू शकतो? स्वातंत्र्याकरिता ज्यां लोकांनी त्याग केला आहे, ज्यांच्यावर संपूर्ण राष्ट्राचा भरवसा आहे आणि ज्याचा सर्वांना आधार वाटतो तेच जर अशा प्रकारे सत्तेचा दुरुपयोग करत असतील तर आपण कोणत्या ठिकाणी उभे असू? अशा प्रकारे आपण आपली अब्रू किती काळ वाचवू शकू? यामुळेच मी तर याला स्वातंत्र्य समजतच नाही. परंतु बाह्य दृष्टीने जे स्वातंत्र्य आले आहे त्या स्वातंत्र्यालासुद्धा हे कलंकित करत आहेत. माझ्या मनात विचार येतो की मी कुठे आहे? काय करतो आहे? या अशांततेत शांती कशी मिळेल? 'है बहारे बाग दुनिया चंद रोज, देख लो इसका तमाशा चंद रोज!' बापूजी इतके बोलले आणि मग त्यांना खोकला येऊ लागला. बापूजी हे सांगत होते आणि माझ्या डोळ्यातून धारा लागलेल्या होत्या. बापूजींच्या हृदयीची वेदना किती वाढते आहे? अजूनही ईश्वराशिवाय आपला कोणीही नाही असे बापूंना वाटते आहे. खोकला येत असताना मी हळूच विचारले, "तुम्ही पेनिसिलीनची गोळी घेता काय? सुशीलाबहेन माझ्याजवळ ठेवून गेल्या आहेत. परंतु इन्फ्ल्युएंझा असेल तर?" असे म्हणाले तर ते अतिशय व्यथित आवाजात म्हणाले, "या यज्ञात तू एकटीच माझी भागीदार आहेस. मी कोणालाही शिकवले नाही तितके तुझी आई होऊन तुला शिकवले आहे. याकरिता मी हा इतका झगडलो. मी तुला या यज्ञात समर्पित केले आणि त्यातून तू सुखरूप, जशीच्यातशी बाहेर पडलीस. तुझ्यात मला जे आढळले ते इतर कोणत्याही मुलीत आढळले नाही. यामुळे आज तुला एक गोष्ट सांगायची इच्छा आहे. ती तुला अनेकदा सांगितलेलीसुद्धा आहे. मी तुझी आई झालेलो असल्यामुळे मी जर आजाराने मरण पावलो, एका छोट्याशा फोडामुळे जरी मेलो, तरी तू जगाला ओरडून सांग आणि सिद्ध कर की, हा महात्मा ढोंगी होता! तू असे केलेस, तरच मी जिथे असेन, तिथे माझ्या आत्म्याला शांती मिळेल. यामुळे माझ्याकरिता तुला लोक जरी शिव्या देतील, मारून टाकतील तरी मी जर रोगाने मेलो तर तू मला दांभिक महात्माच

ठरव. परंतु आठवड्यापूर्वी जो स्फोट झाला तशाच प्रकारे जर कोणी मला गोळीने मारेल आणि तसे होत असताना माझ्या तोंडून सुस्काराही बाहेर न पडता जर मी रामनामाचा जप करत असेन तर सांग की हा खरा महात्मा होता. . . . यामुळे हिंदुस्थानच्या प्रजेचे मुळीच भले होणार नाही." मी एकटीच तेल चोळत असताना निरव शांततेत बापूजींच्या हृदयातून बाहेर पडत असलेले हे वेधक शब्द ऐकत होते. त्यानंतर काहीही बोलण्याचा मला धीरच झाला नाही. माझे मन भरून आलेले होते. गळा दाटून आला होता. तोंडातून शब्दही फुटत नव्हता. . . . स्वयंपाकघरात पाणी आणायला गेले होते. तेवढ्यात आश्रमातील . . . भगिनी आल्या. त्यांची प्रकृती चांगली राहत नसते. त्यांना त्यांच्या गावी जायचे आहे. बापूजी म्हणाले, "तुझ्या हृदयात जर रामनाम अंकित असते तर तू आजारी पडलीच नसती. परंतु तुझ्या मनात तितकी श्रद्धा असली पाहिजे ना?" तिच्या मुलालासुद्धा सूचना दिली.

तेवढ्यात चांदबहेनच्या लग्नाचा गुंतागुंतीचा प्रश्न निघाला. मी त्या भगिनीला खुणा करून सांगत होते की बापूजी खूप थकलेले आहेत, त्यांना चक्कर येत आहेत, तरीही बापूजींना सांगू लागल्या. परंतु बापू तर सर्वांचे 'बापू' आहेत ना? त्यांनी माझ्याकडे दुर्लक्ष करून गोष्टी सुरूच ठेवल्या. चांगले झाले की तेवढ्यातच देवदासकाका आणि काकी आल्या आणि रोजप्रमाणे बापूजींना काय सुरू आहे असे विचारले. मग तर काका आणि बापूजी . . . दिल्लीच्या सध्याच्या वातावरणासंबंधी गोष्टी करू लागले. यामुळे मी तिथून निघून आले आणि हे लिहायला बसले आहे. विशेष म्हणजे सुशीलाबहेन वा प्यारेलालजी कोणीही नव्हते. यामुळे काकांना आणि बापूजींना गोष्टी करायला ही चांगली संधी मिळाली होती. काकांची नेहमी तक्रार असते की सर्वच बापूजींना पाहिजे तेव्हा भेटू शकतात. मला असा वेळ मिळत नाही. आणि मलाही तो घ्यावासा वाटत नाही. वर्ध्याला जाण्याच्या गोष्टी वर्तमानपत्रात आल्या आहेत. बापूजी म्हणाले, "कुठे बापू आणि कुठे गांधी असेल कोणाला माहीत? वर्तमानपत्रवाल्यांना विचार. मी वर्ध्याला जाणार आहे काय हे मला तर माहीत नाही." अशा प्रकारे बापूजी जवळपास अकरा वाजता झोपले. मीसुद्धा आज साडेबारा वाजता झोपले. येथील ओझे म्हणावे तितके जरी नसले तरी सागरालाच जर आग लागली तर काय करावे?

बिरला भवन, नवी दिल्ली,

३०-१-'४८

नेहमीप्रमाणे बापूजी प्रार्थनेकरिता उठले. मलाही तशाच प्रकारे उठवले. . . . बहेन उठल्या नाही. सध्या तर सुशीलाबहेन नाहीत. यामुळे गीतापाठ मलाच चालवावा लागत असतो. भाईसाहेब आणि प्यारेलालजी जरी उठलेले असले तरी ते केवळ सोबत असतात. . . . ला गीताजींचे श्लोक म्हणणे जमत नाही. हे उठले नाही म्हणून बापूजी आजसुद्धा असेच म्हणाले, "मला असे दिसते की माझ्याजवळ राहणारांवरसुद्धा माझा प्रभाव राहिलेला नाही. प्रार्थना हा तर आत्मा साफ करणारा झाडू आहे. आणि माझी तर प्रार्थनेवर अढळ श्रद्धा आहे. अशी प्रार्थना करणे ज्याला पसंत नाही त्यांनी तर माझा त्यागच करायला पाहिजे. हे दोघांकरिताही श्रेयस्कर आहे. तुझ्यात जर यांना समजावून सांगण्याची हिंमत असेल तर समजावून सांग. ही सगळी चिन्हे मला चांगली वाटत नाहीत. हे सर्व पाहण्याकरिता ईश्वर मला जिवंत ठेवणार नाही अशी आशा आहे. आज मला सगळ्यात आधी 'थाके न थाके छताए हो मानवी न लेजे विसामो' हे भजन ऐकायचे आहे."

बापूजींनी कधी नाही अशी आज हे भजन ऐकण्याची इच्छा व्यक्त केली. मला स्वतःला बापूजींच्या काही गोष्टी आज वेगळ्याच वाटत होत्या. खोलवर शंका वाटते आहे की बापूजी परत उपवास तर करणार नाहीत? आज दुपारी सरदारदादासुद्धा भेटायला येणार आहेत. आणि ते आणि बापूजी एकांतात चर्चा करणार आहेत. आणि मग उद्या वा परवा कार्यकारिणी बोलावून योग्य तो निर्णय घेणार आहेत. पाहू या, ईश्वर काय करतो ते खरे. उद्या सकाळी भाईसुद्धा (मनुबहेन गांधींचे वडील) येणार आहेत. बापूजींवर पांघरुण टाकले आणि काल त्यांनी काँग्रेससंबंधी जो मसुदा तयार केला होता त्यात दुरुस्त्या करू लागले. ४.४५ वाजता रोजप्रमाणे गरम पाणी, मध आणि लिंबू घेतले. ५.४५ वाजता रोजप्रमाणे १६ अंस सत्र्याचा रस घेतला.

अजूनही उपवासाचा अशक्तपणा आहेच. लिहिता लिहिता थकवा आल्यामुळे बापूजी झोपले. आणि मी पाय चेपले.

काल किशोरीलालकाकांना जे पत्र लिहिले होते त्याची नकल करायची राहून गेल्यामुळे ते पत्र डाकेत टाकले गेले नव्हते. ते बापूजींच्या कागदांमध्ये पडलेले होते. बापूजींना हे आवडले नाही. मी सहज

विचारले, उद्या आपण वर्ध्याला जाणार आहो अशी एक ओळ यात टाकू काय? बापूजी म्हणाले, "उद्याचे कोणी पाहिले आहे? जर जायचे नक्की ठरले तर आजच्या प्रार्थनेत तसे सांगेन आणि रात्री जेव्हा व्याख्यानाचे रेडिओवर प्रसारण होईल तेव्हा त्यात ते येईलच. परंतु अशा प्रकारे पत्र पडून राहू देऊ नये. हे काम जरी बिसेनचे असेल तरी तुझी माझ्या कोणत्याही कामातून सुटका होऊ शकत नाही. दुसऱ्याची जरी चूक असली तरी मी तर ती चूक तुझीच समजेन. अर्थात तू कबूल करशील तर." "मला तर कबूल करावेच लागेल" मी म्हणाले.

फिरत असताना श्रीमती राजेन नेहरू आल्या. मी फिरणार नव्हते, पण फिरण्याकरिता उठवले. आठ वाजता नेहमीप्रमाणे मालीश, आंघोळ. मालीश सुरू असताना वर्तमानपत्रे पाहिली. बंगाली पाठ केला. मालीशच्या खोलीतून न्हाणीघरापर्यंत येत असताना प्यारेलालजींना बापूजी म्हणाले की त्या लेखात जर काही वैचारिक उणीव राहिली असेल तर ती तू पूर्ण करशील. "काल रात्री काँग्रेससंबंधीचा मसुदा हरिजनमध्ये पाठवण्याकरिता मी तयार केला आहे. तो नीट पाहून घेशील." तो तयार केला तेव्हा मी फार थकलेलो होतो.

नेहमीप्रमाणे मी बापूजींना आंघोळ घालत होते. मला म्हणाले, "तू हातांचा व्यायाम करत असतेस की नाही?" मी नाही म्हणाले. बापूजी म्हणाले, "हे मला मुळीच पटत नाही." मी म्हणाले की मी नंतर करीन. बापूजी म्हणाले, "तुझे वजन वाढत नाही. तब्येतीत सुधारणा नाही याचे मला दुःख होते. तू नोआखालीला तुझ्या वडिलांकडून जेव्हा आली होतीस तेव्हा किती धडधाकट होतीस ! तुझी प्रकृती दुरुस्त होत नाही याचे कारण तुझा भावनाप्रधान स्वभाव आहे. कोणाच्याही दुःखाने खूप दुःखी होऊ नये आणि कोणाच्या आनंदाने खूप खूशही व्हायला नको. असा समतोल स्वभाव ठेवला तरच ईश्वराचे सानिध्य मिळवणे सहज होते. हा कायदा माझा नाही. हा अनादी काळापासूनचा आहे आणि सर्वच धर्मग्रंथांत आहे. स्थितप्रज्ञ होण्याकरिता जी जी लक्षणे सांगितली आहेत त्यात हे लक्षणसुद्धा आहे. तू अठरा वर्षांची उमलती मुलगी आहेस. मी तुझे मन किती घडवले आहे याची आज तुला कल्पना येणार नाही परंतु नोआखालीपासून तर आजपर्यंत तुला मी किती कसले आहे, तुला किती नवनवीन अनुभवांनी घडवले आहे याच्या परिणामाचे मूल्य शक्य आहे की तुला आज कळणार नाही परंतु तुझ्या भावी जीवनाकरिता ते खूप उपयोगी ठरतील. मी जिवंत राहो वा न राहो, तू या शब्दांची नोंद करून ठेव. तुला माहीत आहे की आज सकाळी . . . प्रार्थनेकरिता उठली नव्हती. यामुळे माझ्या मनात विचार येत होता

की माझ्यात कोणती उणीव आहे? परंतु या यज्ञात इतर कोणतीही मुलगी नाही. परंतु तुझी ज्याप्रमाणे सेवेतून वा माझ्या इतर कोणत्याही कामांच्या जबाबदारीतून सुटका होऊ शकत नाही त्याचप्रमाणे तू तुझ्या प्रकतीची काळजी घेणे हासुद्धा माझ्या सेवेचा एक भागच आहे आणि ती जबाबदारीही तू पार पाडायला पाहिजे."

आंघोळीच्या वेळी बापूजींनी हे सर्व अतिशय प्रेमाने सांगितले आणि माझ्या पाठीवर थोपटले.

आंघोळ केल्यानंतर वजन केले. १०९.५ पौंड होते. जेवणात वाफाळलेली भाजी, १२ अंस दूध, एखाद मुळा, पिकलेले चार टमाटे आणि चार संत्र्यांचा रस घेतला. जेवत असताना प्यारेलालजींशी नोआखालीशी संबंधित गोष्टी केल्या. वस्तीच्या फेरबदलासंबंधीसुद्धा त्यांनी विचार केला. परंतु बापूजी स्पष्टपणे म्हणाले, "आपण 'करेंगे या मरेंगे' हा मंत्र घेऊन नोआखालीत गेलो होतो. मी जरी इथे बसलेलो असेन तरी नोआखालीच्या कामाकरिताच बसलेलो आहे. अशाच प्रकारे जनतेलासुद्धा आपण तयार केले पाहिजे. तिनेही आपला स्वाभिमान आणि आपली अब्रू यांच्याकरिता धैर्याने तिथेच राहायला पाहिजे. शेवटी शक्य आहे की तिथे फार कमी लोक शिल्लक राहतील पण जर दुर्बलतेतूनच सामर्थ्य निर्माण करायचे असेल, तर दुसरा काय उपाय असू शकतो? सशस्त्र युद्धातही सामान्य सैनिकांच्याच धैर्यावर सर्व काही अवलंबून नसते काय? तर मग अहिंसक युद्धात तर दुसरे काही कसे शक्य आहे?" आणि त्यांनी नोआखालीला जाण्याचाच विचार परत सुचीत केला. यानंतर पायांना तूप चोळवून घेत आराम केला. लहानशी डुलकी घेऊन बापूजी न्हाणीघरात जाण्याकरिता बाहेरील लाकडी फळीवरून उठून आत येत असताना मी म्हणाले, "बापूजी एकटेच येत आहा, कसे वाटते (अशक्तपणामुळे)?" बापूजी म्हणाले,"किती चांगले? एकला चलो."

डॉ. भार्गवच्या परिचर्या गृहाकरिता एक घर पाहिजे होते त्याबद्दल आणि एका अनाथाश्रमाबद्दल १२.३० वाजता बापूजी बोलत होते. इथे जे स्थानिक मुसलमान येत असतात ते आले की या गोष्टीची आठवण करून द्यायला बापूजींनी सांगितले. ते पुढे म्हणाले, "अशा प्रकारे मला घाबरून सरकार किती दिवस चालणार आहे? मला घाबरून नाही तर त्यांनी आपल्या मनाने काम करायला पाहिजे. नियोगी इथे येतील तेव्हा विचारशील बरे." बापूजींकडे मुसलमान आले तेव्हा मी आठवण करून दिली. तर बापूजी म्हणाले, "आताच यांना अडवले नाही तर चांगले होईल." मग त्यांना म्हणाले, "ठीक आहे, मी तर सहज विचारले होते. यात आपण काय वेळ घालवायचा?"

त्यानंतर मौलाना हबिबुर रहमानना सेवाग्रामला जाण्यासंबंधी बापूजींनी विचारले. ते म्हणाले, "तुम्ही जा. परंतु १४ ला मात्र परत या." बापूजी म्हणाले, "हो, हो, १४ ला मी इथेच असेन. परंतु तरीही सर्व काही तर खुदाच्याच हाती आहे. ही तर अस्मानीसुलतानीची गोष्ट आहे."

महादेवकाकांच्या चरित्राचे - त्यांच्या रोजनिश्यांचे संपादन करायचे काम किती दिवसांपासून रेंगाळले होते. त्यासंबंधात बापूजी शांतिकुमार भाईंशी बोलले. शांतिकुमार भाईंची तक्रार होती की चंद्रकुमार भाई आणि नवजीवन ट्रसटमध्ये वाद सुरू आहे. खूप पैसे घेण्याची गोष्ट आहे.

बापूजी म्हणाले, "यादव जसे आपसात कापले गेले होते तशीच जिकडे पाहावे तिकडे आपली परिस्थिती दिसते आहे. आपल्या आपसातील वादांमुळे आपण समाजाचे किती मोठे नुकसान करतो याचा विचार कोणीही करत नाही. आणि हा विचार कोणी का करावा? हा सर्व माझाच दोष आहे. ईश्वराने मला आंधळा केले त्याला कोण काय करील? परंतु माझ्या जिवंतपणी यात जितकी सुधारणा करता येत असेल तितकी तर करतो म्हणजे भावी पिढीच्या शिव्या तरी मला खाव्या लागणार नाहीत. याकरिता तरी ईश्वराचे उपकारच मानायचे."

"मला हे काम करायचे आहे. या रोजनिशा पुस्तकाच्या आकारात तयार करायच्या आहेत. नरहरीची प्रकृती चांगली नाही आणि आता . . . ने तर माझ्या सर्व कामांमधून निवृत्ती घेतली आहे. परंतु प्रत्येक जण आपापल्या विचारात स्वतंत्र असल्यामुळे समजूनउमजून घेतली नाही असे तरी कसे म्हणू शकतो? चंद्रशंकर जर हे ओझे उचलेल तर त्याची कला यामुळे अजून फुलेल. या दोघांच्याही अक्षरात किती साम्य आहे? मी त्याला लिहीन."

मुलाखतीकरिता येणारात लंकेचे प्रतिनिधी डॉ. सिल्वा आणि त्यांची मुलगी प्रमुख होते.

दुपारी बिसेनभाईंच्या मदतीने गोळा झालेल्या टपालाचे काम पूर्ण करायला सांगितले. दोन वाजता माती घेतली, पाय दाबले. बापूजींची माती काढली आणि बापूजींची परवानगी घेऊन मी शहरातील एका नातेवाईकाला भेटायला गेले. तिथून ४.१५ ला परतले. बापूजी आणि सरदारदादाच्या गोष्टी सुरू झाल्या. . . . काठियावाडसंबंधी चर्चा झाली. मध्येच काठियावाडचे पुढारी रसिकभाई परीख आणि ढेबरभाईसुद्धा आले. त्यांना बापूंना भेटायचे होते. परंतु आज एकेक क्षण भरगच्च होता. यामुळे बापूजींना विचारून नक्की वेळ ठरवते आणि मग सांगते असे मी त्यांना म्हणाले. बापूजी आणि

सरदारदादा गोष्टींमध्ये खूपच गुंग होते. मी विचारले तर म्हणाले, "त्यांना सांग की जिवंत असलो तर प्रार्थनेनंतर परतताना तुमच्याशी बोलेन." मी त्यांना प्रार्थनेकरिता थांबायला सांगितले कारण प्रार्थनेतून परतताना जर लगेच भेट झाली नाही आणि मध्येच दुसराच कोणी घुसला तर बोलणे होऊ शकले नसते म्हणून मी त्यांना थांबायला सांगितले होते. त्यांना बाजूच्या खोलीत बसवले.

[यानंतरची रोजनिशी मी एक तारखेला रात्री दोन वाजल्यानंतर लिहिली. कसे आणि काय लिहू? संपूर्ण बिरलाभवनमध्ये रडण्याशिवाय दुसरे काहीही नव्हते. असे वाटते की बापू जणू झोपलेच तर आहेत ! इतक्या उशिरा लिहिते आहे तर मला रागावण्याकरिता तर उठणार नाही ! नाही, नाही बापूजी ! माझी चूक क्षम्य आहे असे तुम्ही क्षणभरसुद्धा मान्य करत नव्हते आणि आज तुम्ही इतके उदार का झाला? की माझ्याबद्दलही तुम्हाला घृणा वाटू लागली आहे ! "या यज्ञान तू आणि मी असे दोघेच आहो. तू मला सोडू शकतेस, मी तुला सोडू शकत नाही" असे तुम्ही म्हणत होता. पण तुम्ही मला सोडून निघून गेला ना? भाई उद्या येणार आहेत. मला सोपवण्यासंबंधी तुम्ही चार दिवसांपूर्वी लिहिले होते ना? काहीही सुचत नाही. . . . पंडितजीचे हृदय फोडणारे आक्रंदन चांगल्या चांग्ल्याचे हृदय चिरून टाकेल. आणि लहानगा गोपू विचारतो आहे, "मनुबहेन, दादा क्यो सोये है?"]

. . . बापूजी सरदारदादांशी बोलण्यात इतके तल्लीन झाले होते की त्यांना दहा मिनिट उशीर झाला. या गंभीर वातावरणात अडथळा आणण्याचा कोणालाही धीर झाला नाही. वेळवर आठवण दिली नाही तर बापूजी आमच्यावरच नाराज होतील हे आम्हा सर्वांना माहीत असल्यामुळे अखेरीस मणिबहेनने हिंमत केली. गोष्टी करता करताच त्यांनी जेवण घेतले. त्यात चौदा अंस बकरीचे दूध, चार अंस भाजीचे सूप आणि तीन संत्री घेतली. आणि गोष्टी करता करता कताईसुद्धा केली. यज्ञ केल्याशिवाय जो खातो तो चोरीचे खात असल्यामुळे यज्ञ केल्याशिवाय कसे चालणार होते? 'थाके न थाके छतांये हो मानवी! न लेजे विसामो!' (हे माणसा तू थकलेला असो वा नसो क्षणाचीही विश्रांती न घेता तू तुझे कर्तव्य करत राहा) हे भजन कधीही ब्राह्ममुहूर्ताच्या प्रार्थनेच्या वेळी बापूजींनी मला म्हणायला लावले नव्हते, ते आज गायला लावले. तर काय हे भजन मूर्तिमंत साकार करायची त्यांची इच्छा होती? ते काहीही असले तरी पळाचाही 'विसामो' न घेता आपल्या कामाकाजाच्या ज्वलंत प्रवृतीप्रमाणे ते आपले काम पुढे रेटतच होते. ते एकदम उठले. मी रोजप्रमाणे माझ्या हातात पेन, बापूजींची माळ, थूकदाणी, चष्म्याचे घर आणि दररोज ज्यात बापूजी प्रवचन लिहितात ती वही घेतली. दहा मिनिट वेळ झाल्यामुळे रस्त्यात असमाधान व्यक्त

केले. म्हणाले, "तुम्ही माझे घड्याळ आहा ना? मग मी का घड्याळ पाहत बसू?" आजकाल बापूजी विशेषेकरून घड्याळ पाहतच नाहीत. प्रसंगोपात आम्हीच ते पाहत असतो. घड्याळाला चाबीसुद्धा आमच्यापैकीच कोणी तरी देत असतो. यामुळे आम्ही म्हणालो, "बापूजी तुमचे बिचारे घड्याळ झुरत असेल." त्यावर बापूजींनी वर सांगितल्याप्रमाणे विनोद तर केलाच, पण त्याचबरोबर मला म्हणाले, "अशा प्रकारे उशीर होणे मला मुळीच आवडत नाही." चांदबहेनने दिल्लीतच थांबण्याविषयी समजावले. आणि आजकाल आहार थोडा वाढवला आहे. असे असले तरी उपवासानंतर अजून धान्य तर सुरू केलेलेच नाही. आणि "आता द्रव पदार्थही कमी करणार आहेत." अशा गोष्टी करत आम्ही प्रार्थनास्थळाच्या पायऱ्या चढू लगलो. "प्रार्थनेकरिता दहा मिनिट वेळ झाला हा तुमचा दोष आहे." सरदारदादा दोनचार दिवसांनी आले होते आणि गंभीर विषयावर चर्चा सुरू असल्यामुळे आमची हिंमत झाली नाही हे कारणसुद्धा बापूंना पटले नाही. "परिचारिकेचे तर कर्तव्य असते की साक्षात ईश्वर जरी बसलेला असेल तरी तिने आपले कर्तव्य बजावले पाहिजे. एखाद्या आजाऱ्याला औषध द्यायची वेळ झाली असेल आणि त्याच्याजवळ कसे जावे असा जर ती विचार करू लागली तर रोगी मरूनच जाईल ना? हेसुद्धा असेच आहे. प्रार्थनेकरिता एक मिनिट जरी वेळ झाला तरी मला खुपते."

प्रार्थनेकरिता जात असताना आम्हीच काठी व्हायचे असा आम्ही नियमच केला होता. काही वेळा आम्हाला राग आला तर आम्ही काठी व्हायचे नाकारत असू. परंतु बापूजी आम्हांला ओढून काठी करून घेऊन जायचे. परतत असताना कोणी वेगळ्याही मुली असू शकत होत्या. चारही पायऱ्या चढलो आणि बापूजी आपल्या नियमाप्रमाणे आमच्या खांद्यावरून हात काढून जनतेला नमस्कार करत चालले होते. मी उजव्या बाजूला होते आणि माझ्या बाजूने एक धष्टपुष्ट तरुण खाकी कपड्यात हात जोडून लोकांना ढकलत एकदम पुढे आला. मला वाटले की याची इच्छा बापूजींच्या पाया पडायची आहे. आणि असे रोजच होत असे. बापूजीना जरी आवडत नव्हते तरी लोक चरणस्पर्श करायला वा प्रणाम करायला यायचेच. तेव्हा बापूजी आपल्या पद्धतीने त्यांना सांगत असत की "मी तर एक सामान्य माणूस आहे. माझ्या पाया पडून काय उपयोग?" यामुळे मीसुद्धा या पुढे येत असलेल्या माणसाला हाताने धक्का मारून म्हणाले, "भाई बापूंना दहा मिनिट उशीर झाला आहे, तुम्ही त्यांना का त्रास देता !" परंतु त्या तरुणाने मला इतक्या जोरात धक्का मारला की माझ्या हातात माळ, थूकदाणी, वही वगैरे जे साहित्य होते ते खाली पडले. इतर वस्तू जरी पडत होत्या तरी मी फारसा प्रतिसाद दिला नाही आणि त्या

बंधूसोबत झुंजत राहिले. पण जशी माळ पडली आणि ती उचलण्यासाठी मी खाली वाकले, तितक्यात धडाधड एकामागे एक अशा तीन गोळ्या सुटल्या. अंधार, धुराचा लोट आणि गगनभेदी आवाजात बापूजी समोरच्या पावलांवर आणि छातीवर खाली कोसळत होते. 'हे रा...म, हे रा...म' असे म्हणत, हात जोडलेल्या स्थितीतच ते जमिनीवर कोसळले. त्या वेळी अनेकांनी बापूजींना पकडण्याचा प्रयत्न केला. आभाबहेनसुद्धा खाली पडल्या होत्या. त्या एकदम उभ्या राहिल्या, पण परत पडल्या. मग त्यांनी बापूजींचे डोके एकदम मांडीवर घेतले. मला तर कळू शकले नव्हते की हे काय होते आहे? बहुतांश जनता तीनचार मिनिट स्तब्ध झालेली होती! आणि इतका धूर आणि माझ्या कानात तर गोळ्यांचा आवाजच घुमत होता. त्या आवाजामुळे माझे कान बधीर होऊन गेले होते. लोक तर एकदम उभे राहिले. माझे आणि आम्हा मुलीचे काय हाल झाले असतील हे भाषेत लिहिणे कठीण आहे. परंतु पांढऱ्या शुभ्र वस्त्रांवरून रक्ताची धार वाहत होती. रक्ताने कपडे भरून गेले ! हात जोडलेल्या बापूजींच्या घड्याळात त्या वेळी ५.१७ मिनिट झाले होते. हात जोडलेल्या अवस्थेत बापूजी हिरव्यागार धरतीमातेच्या धामात, तिच्या मांडीवर चिरंतन निद्रेत लीन झालेले होते. आणि जणू काय आपल्या दुर्बलतेवर राग न करण्याची तसेच माफ करण्याची ते आम्हांला विनंती करत होते ! त्यांना खोलीत न्यायला आम्हांला दहाएक मिनिट तर लागलेच असतील. दुर्दैवाने तिथे कोणीही डॉक्टर उपस्थित नव्हता. सुशीलाबहेनची प्रथमोपचाराची पेटी तपासली, परंतु त्यात विशेष असे कोणतेही औषध मिळाले नाही. ते तर म्हणतच होते की माझा खरा डॉक्टर रामच आहे. हे माहीत असूनही असे वाटते की बापूजींनी स्वतःसाठी स्वीकारलेल्या सिद्धांतांना अपवित्र समजून आम्ही त्यांचे उल्लंघन करू लागलो होतो. आणि आम्ही अल्पात्मा, आमच्या स्वार्थासाठी त्यांना जगवण्याचा प्रयत्न करू लागलो होतो. याशिवाय वेगळे काही सुचतच नव्हते ! सरदारदादा तर अजून घरी पोहोचलेही नव्हते, परत वळले. आम्ही तर टाहो फोडून आक्रंदन करत होतो. परंतु बापूजींना आज काही आमच्याबद्दल दया वाटेल तर ना ! अनेकदा माझ्यासारखी जर उदास झालेली दिसली तर बापूजी लगेच त्याचे कारण विचारायचे आणि ते कळल्यानंतरच सोडायचे. आज मात्र बापूजी सर्व काही सहन करत होते.

सात बार असलेल्या स्वयंचलित पिस्तुलातील पहिली गोळी मध्यरेषेच्या साडेतीन इंच उजव्या बाजूला बेंबीच्या अडीच इंच वर पोटात लागली होती. दुसरी मध्यरेषेपासून एक इंच दूर आणि तिसरी छातीत उजव्या बाजूला मध्यरेषेपासून चार इंच दूर लागली होती. पहिली आणि दुसरी गोळी शरीराच्या

आरापार निघून गेली होती. तिसरी फुप्फुसात फसली होती. तिचे कवच नंतर कपड्यांमध्ये सापडले होते. आणि आरपार गेलेली गोळी तर प्रार्थनास्थळावरच मिळाली होती. खूप रक्तस्त्राव झाल्यामुळे बापूजींचा चेहरा पांढराफटक पडला होता.

भाईसाहेब कठोर होऊन दवाखान्यात फोनवर फोन करत होते. बाहेर हजारो लोकांची गर्दी झालेली होती. आणि मोठ्या मुश्किलीने भाईसाहेब सरदारच्या बंगल्यावरून विलिंग्डन रुग्णालयात पोहोचले. परंतु काहीही आशा न राहिल्यामुळे तसेच माघारी फिरले. दरम्यान कनैयालाल मुंशी आले. सरदारदादा लगेच पोहोचले. मणिबहेनने आम्हांला धीर दिला. मला गीतापाठ सुरू करायला सांगितले. मणिबहेन आल्यामुळे आणि त्याचबरोबर सरदारदादांच्या आश्वासक गोड फुंकरीमुळे मी थोडी भानावर आले आणि गीतापाठ सुरू केला. मुंशींनी यात चांगलीच साथ दिली. तेवढ्यात कर्नल भागवत येऊन पोहोचले. ते बापूंना तपासू लागले. यामुळे बिरला भवनच्या परिसरातील सरदारदादापासून तर आम्हा सगळ्यांना काही चांगली बातमी कळते की काय अशी उत्सुकतेने भरलेली एक आश्वासक लहर आम्हां सर्वांना स्पर्शून गेली. डॉक्टर भागवतांना तर पाहताच कळले की आता काहीही शिल्लक नाही, सगळे संपलेले आहे ! परंतु डॉक्टर अखेरपर्यंत सांगत नाही असा वाक्प्रचार आहे ना? जगातील महान व्यक्तींसंबंधी भयानक बातमी देणे ही गोष्ट डॉक्टरसाठीसुद्धा दुःखद असते! अशाच प्रकारे गोडसेच्या गोळीने वेध घेतल्यानंतरही बापूजींचा गोळी लागून मृत्यू झाल्याची बातमी डॉक्टरांसाठीही अत्यंत वेदनादायक होती. माझी शस्त्रक्रिया तर त्यांनी अतिशय काळजीपूर्वक केली होती. आणि सकाळीच त्यांच्या आणि त्यांच्या परिचर्यागृहासंबंधी गोष्टी झाल्या होत्या. त्यांनी वेळ घालवण्यासाठीच तपासण्याकरिता दहा ते पंधरा मिनिट लावले आणि शेवटी म्हणाले "मनू बेटी, अब बापू नही रहे. . . " या दुःखद बातमीनंतर खोलीतील आम्हा मुलांचा आणि मोठ्या माणसांचा जो भयंकर विलाप सुरू झाला तो तर रात्रीच्या विलापापेक्षाही भयंकर होता. मग तर देवदास काका आणि गोपू हे दोघेही - लहान मुले आणि नातवंडेही बापूंच्या छातीवर डोके ठेवून भयंकर दुःखाने आक्रंदन करत होते. आणि पंडितजी - बापरे! ईश्वराने तर असा दिवस शत्रूलाही दाखवू नये. आणि एखाद्या लहान मुलाप्रमाणे सरदारदादा गुडघ्याला डोके टेकवून हमसून हमसून रडत होते. असे असताना आमच्यासारख्यांबद्दल काय बोलायचे? क्षणात तर लाखोची गर्दी गोळा झाली होती. शेवटच्या तासापर्यंत हे असेच सुरू होते. अखेरीस सरदारदादांनी लोहपुरुषाप्रमाणे या कठीण परीक्षेत उत्तीर्ण होण्याकरिता योग्य ते निर्णय

घेण्यात काहीही कमी ठेवले नाही. सर्वांना धीर देणारे ते एकटेच होते. बापूंच्या चष्म्याचा आणि शेवटच्या चपलांचा पत्ता नव्हता. बापूजींनी तीस तारखेला जाताजाता नखे काढली होती आणि मला ती फेकायला दिली होती. परंतु रसिकभाई आणि ढेबरभाईंशी मी गोष्टी करण्यात गुतल्यामुळे ती नखे कागदावर तशीच पडून राहिली होती. अनमोल रत्नाप्रमाणे मी ती उचलली आणि पेटीत ठेवून दिली. एका आंगठ्याचे, एका बोटाचे आणि एका करंगळीचे नख ! त्यांच्या शरीराची शेवटची स्मृती म्हणून ती नखे आजही माझ्याजवळ आहेत.

माऊंटबॅटनसाहेब सर्वांना शांत करत होते. बाहेरचा जनसमुदाय पू. बापूची माहिती जाणून घेण्याकरिता आतुरलेला होता. यामुळे सरदारदादांनी रेडिओवरून सर्व काही जाहीर केले. पंडितजी तर बोलूच शकत नव्हते. खूपच हिंमत गोळा करून म्हणाले, "हमारे बापू . . . " मग हुंदके देत म्हणाले, "बापू अब हमारे पास नही रहे . . ." या वेळी तर असे वाटत होते की ही भूमीसुद्धा थरथरू लागली आहे. जनतेचा विलाप सुरू होता.

अखेरीस बाहेरील जनतेच्या असामान्य गर्दीला बिरलाभवनच्या गच्चीवरून बापूंचे दर्शन घेता येईल अशी व्यवस्था करण्याचा निर्णय घेण्यात आला. या वेळी मी कामाकरिता बाहेर निघाले. पंडितजींनी मला एकदम धरले आणि क्षणभर विसरूनच गेले, म्हणाले, "मनू आओ, बापूको पुछो अब कैसे करना!" अरे देवा . . . इतका मोठा विद्वान, या देशातीलच नाही तर जागतिक महापुरुष . . . मला तर त्यांना पाहूनच रडू फुटले, आणि तेही तितकेच रडू लागले. आम्हा दोघांचीही या वेळी अशी काही परिस्थिती होती की एवढे मोठे पंडितजी माझ्यासारख्या अडाणी मुलीला आश्वासित करू शकले नाही . . . त्यातही अनेक देशांचे राजदूत येत होते. पंडितजींबरोबर तेही आत आले. गीतापाठ सतत करणारात मीच मुख्य होते. भाईसाहेब, काका या सर्वांचे तर व्यवस्थेकरिता आतबाहेर सुरू होते - सुशीलाबहेन तर नव्हत्याच. आणि बहुतेकांना श्लोकांचा उच्चारच येत नव्हता. प्यारेलालजीसुद्धा व्यवस्थेतच होते. ज्याला शिकण्याची हौस असेल आणि हजर असेल तो तर शिकतोच. शिवाय पंडितजी म्हणाले, "मनू, और जोरसे गीतापाठ करो, शायद बापूजी जग जाय!" विज्ञानातील इतकी मोठी विद्वत्ता, पण तिचे त्यांना भानच नव्हते. क्षणभर विसरच पडला होता. बापूजी आता राहिलेले नाहीत हे जणू काय त्यांच्या लक्षातच नसायचे आणि वारंवार येऊन ते बापूच्या शरीरावर हात फिरवून जायचे.

आणि छायाचित्रकारांचे काय विचारायचे? गच्चीवर ठेवण्याकरिता बापूजींचा देह वर नेण्यात आला. लहानांपासून तर मोठ्यांपर्यंत सर्वांच्या डोळ्यातून पावसाप्रमाणे जलधारा वाहत होत्या. आणि अंजलीबरोबर फुलांचा आणि पैशांचा तर क्षणोक्षणी ढीग गोळा होत होता. सर्वधर्मसमभावाची प्रार्थना होत होती. दोन वाजता बापूजींच्या देहाला आंघोळ घालण्याकरिता न्यायचे होते. चांगले झाले की पू. शांतिलालजी येऊन पोहोचले. पूज्य बाच्या अंत्यविधीच्या वेळीसुद्धा ते हजर होते. आणि बापूसुद्धा त्यांच्याकडून अंत्यविधी करवून घेत असत. इतकेच काय तर मृतासाठी गवताचे अंथरुण तयार करणे, गायीच्या शेणाने सारवणे हे सर्व तयार करायला त्यांना सांगितले कारण आमच्यापैकी कोणालाही यातील काही कळत नव्हते.

ही वेळसुद्धा इतकीच दुःखद होती. बापूंचा देह न्हाणीघरात आणला. बापूंची ऑस्ट्रेलियन लोकरीची शाल बापूजींच्या अंगावर होती. ती गोळीने तीन जागी जळाली होती. धोतर तसेच चादरसुद्धा रक्ताने पूर्णपणे भिजले होते. बापूंचा देह एका फळीवर झोपवला - आणि 'लोही नींगळते चरणे भाई एकलो जाने रे . . . (रक्ताळलेल्या पायांनी तुला एकट्यालाच चालायचे आहे रे . . .)' या ओळीच्या साक्षात्कारासह काका आणि आम्ही सर्व बापूंच्या आरपार क्षतविक्षत झालेल्या देहाचे दर्शन घेत होतो, रडत होतो आणि विधात्याला हे काय सुचले असा विचार करत होतो. आम्ही तर पूर्ण पापी असल्यामुळे आणि विधातादेवीची आम्ही करुणा भाकत असल्यामुळे आमच्या हृदयभेदक आक्रंदनाची कोणाला कशाला दया येणार होती? कडाक्याची थंडी आणि बर्फासारखे थंडगार पाणी, बापूंच्या देहावर टाकण्याची कोण हिंमत करील . . .

बापंना आंघोळ घातल्यानंतर तो पाट खोलीत ठेवण्यात आला. त्यावर पांढरी शुभ्र चादर टाकण्यात आली. त्यावर बापूंचा देह झोपवला.

ज्या माळेने ते रोज रामनामाचा जप करायचे ती माळ आणि सुताचा हार हे दोन्ही भाईसाहेबांनी त्यांच्या गळ्यात घातले. गळ्यावर आणि छातीवर चंदनकेसरचा लेप केला. कपाळावर कुंकूचा टिळा लावला. डोक्याच्या बाजूला फुलांच्या पाकळ्यांनी 'हे राम' आणि पायांच्या बाजूला 'ॐ' लिहिले. खोली गुलाबाच्या आणि इतर सुगंधित फुलांनी इतकी काही भरून गेली होती की जणू खाली फुलांचा गालीचाच अंथरला आहे असे वाटावे. पाहतापाहता घड्याळात ३.३० चे टोले पडले. कान धरून मला उठवणारे बापूजींचे प्रेमळ हात आज नव्हते. आज भाईसाहेबांनी उठवले. आता यापुढे 'ब्रिजकिशन' ही

हाक ऐकू येणार नव्हती ! सर्व म्हणाले की नेहमीप्रमाणे ब्राह्म मुहूर्तावर प्रार्थना करा. आज आम्हांला हुकूम करणारा म्हणणार - नम्यो. बापूजींचा कोणताही प्रतिसाद येणार नाही ! 'दो मिनिटकी शांति' कोण म्हणणार आहे?'

आणि 'ईशावास्यम् सर्वम्' सुरू करून संपूर्ण प्रार्थना आम्ही कशीबशी पूर्ण केली.

'कर ले सिंगार' हे भजन आम्ही म्हणालो आणि 'फिर वहांसे नहीं आना होगा . . .' मधील बापूंच्या पवित्र, तेजस्वी चेहऱ्याचे दर्शन परत कधी होणार आहे? ते प्रेमळ डोळे, उफाळून येणारे वात्सल्य, ते मुक्त हास्य आता कुठे ! आगळ्यावेगळ्या निर्भयतेने भरलेली ती छाती, आणि त्या चमचमणाऱ्या गोऱ्या कातडीच्या बापूंचे आता कधीही दर्शन होणार नाही काय? राग तर आशावरी आहे - परंतु भयंकर निराशा करणारा.

परत लोकांची बेफाम गर्दी झाल्यामुळे बापूजींना परत वर नेण्यात आले. देशविदेशातील राजदूत आणि उच्चायुक्त, सरकारी नोकर, हिंदुस्थानच्या शांततेच्या सम्राटाचे दर्शन घेण्याकरिता पोहोचले होते.

बिरला भवन, नवी दिल्ली,

३१-१-१९४८

शनिवारी ता. ३१ जानेवारीची प्रभात उगवली. उषःकालाचा उल्हास कुठेही नव्हता. मानवहृदयाचे हे आक्रंदन पाहू शकत नसल्यामुळे सूर्यदेवानेसुद्धा आपले तोंड ढगांनी झाकून टाकले होते. बापूंनी निरोप घेतल्यानंतर बाऽऽरा तास कसे लोटले? ते म्हणाले होते "है बहारे बाग दुनिया चंद रोज !" या चंद तासातच सर्व काही आवरून घेण्यात आले आहे. अरे, या संपूर्ण यज्ञाची मी साक्षी आहे, या काही दिवसांची मी साक्षी आहे. "मला अशांततेकडून शांततेकडे जायचे आहे" या शब्दांची मी साक्षी आहे ! "कोणी गोळीने मारील तर सांगशील की हा खरा महात्मा आहे. परंतु रोगाने मेलो - अरे, लहानशा फोडाफुणशीने जर मी मेलो तर सागशील की हा महात्मा ढोंगी होता." याची साक्षी मी होते. माझ्याच बाजूने गोडसे पिस्तुल घेऊन आला होता, आणि या पिस्तुलाच्या गोळ्याही माझ्या समोरच झाडण्यात आल्या होत्या ! कशी मी? आणि जगातील या दोन महात्म्यांच्या - पू. मोटी बा आणि पू. बापू - अंत्यविधीचीही मीच साक्षी ! आणि आज या जगात ज्या पद्धतीने मी जगते आहे तीही प्रभूची अनाकलनीय महिमा आहे !

आजच्या या अंत्ययात्रेत भाग घेण्याकरिता लाखो लोक सकाळीसच बिरला भवनजवळ आणि नवी दिल्ली स्थानकावर येऊन पोहोचले आहेत. देशभरात शोकदिवस पाळला जाणार आहे. संपूर्ण शहरात सर्व ठिकाणी राष्ट्रध्वच अर्ध्या उंचीवर फडकत होता. अल्बुकर्क रोड तर जनतेकरिता बंद करावा लागला होता. लष्करात वापरतात तो रणगाडा बापूंना निरोप देण्याकरिता सजवण्यात आला होता. हे वाहन खूप उंच असल्यामुळे जनता बापूजींचे दर्शन घेऊ शकत होती. या वाहनाला भगव्या वस्त्राचे आच्छादन घालण्यात आले होते. बिरला भवनमध्ये शेवटपर्यंत जी लाकडाची फळी वापरली होती ती त्या रणगाड्यात ठेवण्यात आली होती, आणि तिच्यावर एक बसकी बाज ठेवण्यात आली. त्या बाजेवर बापूंचा देह ठेवण्यात आला. ती खाटच उंच करायची योजना होती. ही सर्व व्यवस्था करण्याच्या दृष्टीने सरसेनापती जनरल बुशर यांच्या घरी बराच विचारविनिमय करण्यात आला होता. बरोबर ११ वाजता त्या फळीसह बापूजींचा देह रणगाड्यावर चढवण्यात आला. दुधासारखी पांढऱ्याशुभ्र चादरीचे पांघरूण त्यांना घालण्यात आले. पू. भाईं रेल्वे स्थानकावर कसे असतील अशी काळजी मी त्याच वेळी करत होते. पण अजून बिरला भवनबाहेरही आम्ही निघालो नव्हतो तर कोणी तरी मला सांगितले की

तुझे पिताजी आले आहेत ! मला वाटले की बापूंना माझ्याबद्दल अंतरिक्षातही काळजी असेल. याचंमुळे त्यांनी मला बिरला भवनबाहेर पडण्याआधीच माझ्या वडिलांना सोपवले ! रामदासकाका नागपूरहून विमानाने आले. पंडितजींना अतिशय प्रिय असलेले गुलाबाचे फूल अंतिम म्हणून बापूंना वाहिले. सुशीलाबहेन बिचाऱ्या आक्रंदन करत भागलपूरहून आल्या. आम्ही तिघी बापूच्या छातीवर डोके ठेवून अश्रूंची अंजली वाहत होतो. तरीही आज काही ते आमच्याशी बोलणार नव्हते. मी तर बापूंची खूप खूप माफी मागितली, आणि एकच मागणी केली की हे बापू ! तुम्ही दिलेले भांडवल मी वाढवू शकते की नाही याची मला काळजी नाही, पण मी ते उधळणार नाही याचे तुम्ही मला सतत भान करून देत जा...

स्मशानयात्रेत लष्कराच्या तिन्ही विभागांचा - खुश्की, नौदल आणि वायुदल - समावेश होता. हवाईदलाची तुकडी येऊन पोहोचली होती. लाल डगलेवाल्या पोलिसांची तुकडीही हजर होती. चार रणगाडे या मिरवणुकीसमोर राहणार आहेत. माणसांच्या गर्दीला तर सुमारच नव्हता. बापूंच्या देहावर फुलांचा वर्षाव सुरू होता. पैशांचा तर ढीग गोळा झाला होता. आमच्या बिरला भवनच्या मुख्य प्रवेशदाराची खूप काळजी घेण्यात आली होती. अंजली अर्पण करायला येणारांकरिता पास काढणे आवश्यक होते. लाखो माणसांचा हा समूह शोकसागरात बुडालेला होता. एकाच्याही डोळ्यातील अश्रू थांबत नव्हते.

आम्ही सर्वांनी बापूंना उचलले. माझ्या खांद्यावर बापूंची तिरडी होती! मी भाग्यवान होते की दुर्दैवी? कोणाच्या मनात तर कल्पनाही येणार नाही की जगद्वंद्य बापूंच्या तिरडीला आज मी खांदा देणार आहे ! एकीकडे भयंकर हुंदक्याचे आवाज, दुसरीकडे रेडिओवर प्रसारण करणाराचे छाती चिरणारे शब्द ! इथे त्याचे काय वर्णन करू? ते शब्द जगभरात पोहोचत होते - "बापूचे कलेवर आता बाहेर आणण्यात आले आहे. इथे लाखो लोक गोळा झालेले आहेत. निःश्वाससुद्धा ऐकता येईल इतक्या शोकपूर्ण शांततेत भारताचे राष्ट्रपिता आज आपल्या अखेरच्या शांतियात्रेकरिता बिरला भवनचे दार ओलांडत आहेत. लाखो लोक इथे आहेत, पण त्यांच्यात जीव कुठे आहे! प्राण तर तो होता जो आता आपल्या अखेरच्या यात्रेकरिता निघाला आहे. जा, महात्माजी, जा! तुमच्या अखेरच्या पवित्र मार्गावर जनहृदयाची अंजली घेत जा . . . करोडोंचा हा जनसमुदाय तुम्हाला, भारताच्या राष्ट्रपित्याला, विश्वाच्या युगपुरुषाला अखेरचे वंदन करतो आहे, जा महात्माजी !"

रेडिओवर प्रसारण करणाराच्या शब्दांनी तर हृदयाचा बांध फुटून जात होता. मी पडितजींचा हात धरून खाली उतरवले. पंडितजींचे डोळे तर इतके सुजलेले होते की ज्यांनी त्यांचा प्रफुल्लित चेहरा पाहिलेला होता त्यांना तर त्यांची अवस्था पाहणेच जड जात होते. जनतेला मार्ग मोकळा करण्याची ते खाणाखुणांनी विनंती करत होते. तसेच एक लाऊडस्पिकरवाली मोटरसुद्धा जनतेला सूचना देत होती. लष्कराच्या तिन्ही विभागांच्या प्रतिनिधींनी दोरी ओढून प्रेतयात्रेला मार्ग मोकळा करून दिला आणि त्यांनी बापूंना - राष्ट्रपित्याला यमुनेच्या तटावर पोहोचवले, परंतु त्यांना तिथे पोहोचवण्याआधी तिथे त्यांच्या पाऊलखुणाचे चित्र काढले. आमच्याकडून जर पाच मैल पायी चालणे होत नसेल तर घरीच थांबा असे पूज्य मणिबहेन म्हणाल्या. परंतु हे कसे शक्य होते? सरदारदादा, रामदासकाका, मौलानासाहेब, कृपलानीजी वगैरे काही वेळा शववाहिनीवर बसत होते तर काही वेळा चालत होते. पंडितजीसुद्धा असेच करत होते. आम्ही पहिल्या तुकडीत रामधून म्हणत चालायला सुरुवात केली. आमच्यापुढे पोलीस होते. सर्वात पुढे चार रणगाडे होते. नंतर लष्करी तुकड्या, पोलीस तुकड्या, सेवादल, आणि शेवटी शववाहिनी. असा क्रम होता.

शववाहिनीमागे हिंदुस्थान सरकारचे मंत्री, महाराज्यपाल माऊंटबॅटन, प्रांतांचे राज्यपाल, प्रांताचे मुख्यमंत्री, उच्च लष्करी अंमलदार, विदेशांचे राजदूत, विभागाचे प्रतिनिधी, मित्र, स्वजन, बिरला कुटुंब, महाराज जामसाहेब तसेच इतर राजे, महासमितीचे तसेच लोकसभेचे सदस्य आणि दिल्लीचे पुढारी हे सर्व चालत होते.

४००० लष्करी सैनिक, १००० हवाई दलाचे सैनिक आणि १००० पोलिसांची तुकडी हे सर्व आपापल्या गणवेशात आले होते. चीनच्या राजदुताच्या आदेशाप्रमाणे दिल्लीत राहणारे सर्व चिनी लोकसुद्धा चिनी भाषेत 'गांधीजी अमर रहे' ही घोषणा आपल्या झेड्यावर विणून हजर झाले होते आणि शवयात्रेच्या मागेमागे चालत होते.

शवयात्रेची सुरुवात ११.३० वाजता झाली आणि पाचेक तासात पाच मैलांचे अंतर कापून ती राजघाटला पोहोचली. लोकांनी शंखनाद केला. कोणाच्या विजयासाठी हा शंखनाद होता? बापूच्या विजयासाठी? वा 'करू वा मरू' हे सूत्र सिद्ध झाल्याचा विजयाप्रित्यर्थ? अंत्ययात्रेचा मार्ग असा होता - अल्बुकर्क रोड, किंग्जवे, मेमोरिअल आर्च, प्रिन्सेस पार्क, शाहजहान रोडवरून दिल्ली गेट. तिथून दर्यागंजजवळ राजघाट. 'महात्मा की जय', 'महात्मा गांधी अमर हो गये' या घोषणा आणि शंखनाद करत

शवयात्रा मेमोरिअल मार्गावर पोहोचली. ती जेव्हा दीडशे फूट उंच युद्धस्मारकाजवळ पोहोचली तेव्हा मेमोरिअल आर्चच्या टोकापासून तर जवळपासच्या शेकडो वृक्षांवर, तारांच्या खांबांवर, घरांचे सज्जे, गच्च्या, जिथेकुठे नजर जाईल तिथे माणसेच माणसे दिसत होती. तिथे सर्व धर्माचे आणि जातिजमातीचे लोक होते. हजारो लोकांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहत होत्या आणि बापूंना हात जोडून श्रद्धांजली वाहण्याकरिता, प्रणाम करण्यकरिता ते आतुरलेले होते. मध्येमध्ये पंडितजी, देवदासकाका आम्हा मुलींना आलटूनपालटून शववाहिननीवर बसवण्याकरिता घेऊन जायचे. मी रामधून संचालित करत असल्यामुळे अधूनमधून जाऊ शकत असे. रस्ता चांगला मोकळा राहावा म्हणून सायकलधारी गुरख्यांची तुकडी आणि स्काऊट रस्त्याच्या काठावरून चालत होते. पंडितजी दोरावरून उडी मारून पलीकडे जायचे. त्यांची पोलिसांना आणि स्वयंसेवकांना फार भीती वाटत असे. त्यांच्या रक्षणाचीही त्यांच्यावर जबाबदारी होती. आणि जर कोणी त्यांना असे करू नका, धावपळ करू नका असे सांगितले तर ते खूप नाराज होऊन म्हणायचे, "अरे! तुम तो बापू को तो न बचा सके."

संपूर्ण पाच मैलांचा रस्ता गुलाबांच्या पाकळ्यांनी आणि पैंशांनी भरगच्च आच्छादलेला होता. हिंदुस्थानी विमानदलाच्या तीन डाकोटा विमानांनी बापूजींच्या शववाहिनीला तीन प्रदक्षिणा घातल्या आणि शववाहिनीवर त्यांनी पुष्पवृष्टी केली. त्यावेळी रामायणातील पुष्पक विमानाचे दृश्य माझ्या दृष्टीसमोर तरळत होते. तीनदा असे झाले. तिन्हीदा अशा प्रकारे चकरा मारत ते विमान जेव्हा गुलाबाच्या अत्तरासह सुगंधित गुलाबपाकळ्यांचा वर्षाव करत होते तेव्हा ते दृश्य अद्भुत वाटत होते.

दिल्ली गेटपुढे पूर्ण शवयात्रा दर्यागंजच्या मार्गाने यमुनातटाकडे वळली. रस्त्यात जिल्हा तुरुंग लागला. तिथे बापूजी कैदी म्हणून राहिलेले होते. या तुरुंगाच्या प्रवेशदारासमोर तुरुंगाच्या चौकीदारांनी आणि वार्डरांनी तुरुंगाधिकाऱ्याच्या नेतृत्वाखाली लष्करी पद्धतीने राष्ट्रपित्याला सलामी दिली. तेव्हा पंडितजी शववाहिनीवरून उतरले होते. राजेंद्रबाबूजी तर सिलोनमध्ये होते. तिथून ते दुपारी दिल्लीला पोहोचले. मुंबईहूनसुद्धा दुपारी अनेक पाहूणे दिल्लीला पोहोचले. यामुळे ते अर्ध्या वाटेवरच शवयात्रेत सामील झाले होते. दिल्लीगेटजवळ तर बेसुमार गर्दी होती. जवळपास तीन ते चार लाख लोक असतील. आजूबाजूच्या गावातूनसुद्धा लोक आले होते.

यमुनेच्या काठावर १२ फूट लांबीरुंदीचा आणि अडीच फूट उंचीचा एक चबुतरा तयार करण्यात आला होता. यमुनेच्या पाण्याने धुऊन तो पवित्र करण्यात आला. रस्ता पल्वलाच्या पानांनी सजवण्यात

आला होता. पंधरा मण चंदनाची लाकडे, चार मण तूप, एक मण श्रीफळ, एक मण समिधा, पंधरा पौंड कापूर, ही सर्व सामुग्री तिथे तयार होती. आणि लोकांनी चितेच्या ठिकाणी प्रवेश करू नये म्हणून चितेच्या ठिकाणापासून शंभर गज अंतरावर एक मजबूत कुंपण घातले होते. लाखो माणसे इथे आधीच पोहोचली होती. हिवाळ्याचा वारा कानात फुंकर घालत होता. आम्ही पोहोचलो तेव्हा तिथे भयंकर गर्दी झालेली होती. काही बेशुद्ध झाले होते, काहींना इजा झाली होती. ऍम्ब्युलन्स, गाड्या हजर होत्या. धावपळ करत होत्या. राष्ट्रपित्याचे दर्शन घेण्याचा प्रत्येक माणसाला सारखाच हक्क असल्याचे स्पष्टपणे जाणवत होते. आम्ही जेव्हा शवखाली उतरवण्याकरिता तयार झालो तेव्हा बापूजींचा संपूर्ण देह फुलांच्या ढिगाखाली झाकला गेलेला होता. दिसत होता केवळ असा एक भव्य चेहरा, की जो कधीही झुकला नव्हता, ज्याने अनुपम विजय मिळवले होते आणि ज्यावर आता चंदनाचा लेप लावलेला होता!

आम्ही सर्वांनी मिळून शववाहिनीवरून शव खाली उतरवला. पंडितजीसुद्धा हिंदू विधिनुसार केवळ धोतरच नेसून आले होते. अंत्यविधी करण्याचा सर्व त्यांना आग्रह करत होते, परंतु त्यानी रामदासकाकांचाच अधिकार मान्य केला. तिरडी खाली घेत असताना न चुकता त्यांनी आम्हा सर्वांना आठवणीने बोलावले. अखेरीस आम्ही आमच्या पापी हातांनी बापूच्या देहाला गंगाजळाने आंघोळ घातली. उत्तर दिशेकडे त्यांचे डोके विधिपूर्वक श्लोक म्हणत चंदनाच्या काष्ठावर ठेवून त्यांना सन्मानपूर्वक निरोप दिला. शास्त्री रामधन शर्मा हा विधी करवून घेत होते. आम्ही सर्वधर्माची प्रार्थना केली. असा कोण निष्ठूर असेल की ज्याच्या हृदयाचा या वेळी थरकाप उडाला नसेल? अहो, बापूंच्या कोमल देहाला लहानसा काटा जरी रुतला तरी आमचे अंतःकरण कळवळत असे - त्या बापूंचा कोमल देह मोठाल्या लाकडांखाली ठेवायचा - अहो . . . हा सर्व दुःखद प्रसंगसुद्धा आम्हाला सहन करावा लागत होता. किती भयंकर ! मी तर सरदारदादांच्या मांडीवर डोके ठेवून खूप खूप रडले. पंडितजींच्या रडण्यालाही पारावार नव्हता. सरदारदादा आणि पंडितजी जणू काय एकाच दिवसात म्हातारे झाले होते. लॉर्ड माऊंटबॅटननी त्यांना शांत करण्याचा खूप प्रयत्न केला. लॉर्ड आणि लेडी माऊंटबॅटन, त्यांच्या दोन्ही मुली, त्यांचे जावई, लॉर्ड ब्रेब्रॉन, मद्रासचे राज्यपाल सर आर्चिबाल्ड नाई, संयुक्त प्रांताच्या राज्यपाल श्रीमती नायडू, पूर्व पंजाबचे राज्यपाल चंदुलाल त्रिवेदी, खेर साहेब, राष्ट्रपती राजेंद्रबाबूजी, राजकुमारीबहेन वगैरे अनेक तिथे होतेच. एखाद्या प्रेमळ बहिणीने सांत्वन करावे तसे लेडी माऊंटबॅटन यांनी पंडितजींचे सांत्वन केले, परंतु त्यांना रडू आवरतच नव्हते.

अखेरीस ज्वाला मोठ्या होऊ लागल्या. वाऱ्यामुळे आगीच्या ठिणग्या उडत होत्या. अग्निदेव जणू काय आमच्या पापांना धिक्कारत होता आणि म्हणूनच की काय जोराचा वारा वाहत होता. आगीत उडणाऱ्या ठिणग्यांचा वेग वाढतच चालला होता. आमची ही अवस्था पाहून जो ट्रक मिळाला तो घेऊन सरदारदादांनी आम्हांला बिरला भवनमध्ये पाठवून दिले. आमची काय हिंमत की आम्ही बापूंच्या खोलीत पाय ठेवू शकत होतो? संपूर्ण बिरला भवनात आमच्या मदतीला धावून येईल असा कोणीही नव्हता. खूप रडलो, खूप आकांत केला. अखेरीस अश्रूसुद्धा वाळून गेले. उशीरा रात्री कडाक्याच्या थंडीत एकदम थंड पाण्याने आंघोळ केली. तीस तारखेचे पाणीसुद्धा आमच्या गळ्याखाली उतरत नव्हते. उशिरा रात्री अशा थंडगार पाण्याने आंघोळ करायला मी स्वतःहोऊनच उठले होते. आम्हांला राजघाटवर शेटपर्यंत थांबायचे होते. परंतु तुफान गर्दी आणि आमची ही अवस्था पाहून सरदारदादांनी आम्हांला परत आणले होते. अखेरीस आमची चौकशी करायला प्रेमळ काकाकाकी आले. काकांकडे तर पाहूण्याची अतोनात गर्दी होती. देवदासकाकांनी माझी अतिशय प्रमाने समजूत घातली. बापूजींच्या सर्व गोष्टींची यादी करायला सांगितले. आणि अशा प्रकारे विषय बदलवला. अखेरीस आमच्या इच्छेखातर काकां आपल्या गाडीतून आम्हांला चितास्थानावर घेऊन गेले. बापूजींचे जुने सहकारी दक्षिण आफ्रिकावाल्या सोराबजीभाईंचा तिथे सतत पहारा होता. आणि रात्रीतून तिथे तारेचे कुंपण घातले. तसेच तिथे सैनिकांचाही पहारा होता.

रात्री दोन वाजता आम्ही परत तिथे गेलो. अरेरे, बापूजींचे नाजूक पाय तेव्हा जळत होते. केवळ हाडे होती! हे पाहून आमचे डोळे फुटले कसे नाही! किती पाषाण हृदय असेल! मला तर हे पाहून तिथे उभे राहणे कठीण झाले. गाडीत बसलो. ईश्वराने असे दृश्य परत कधीही दाखवू नये. माझ्या वयाला अजून दोन दशकेही पूर्ण झालेली नाहीत. आणि या दोन घटना! पू. कस्तुरबा आणि महात्मा गांधीसारख्या जगाच्या इतिहासात अमर झालेल्या व्यक्तींच्या अग्निदाहाची साक्षीदार मला व्हावे लागावे! हा आघात अंतःकरणात कायम राहील. आणि असे असतानाही जग मला भाग्यशाली समजते.

राजघाटावर तर असह्य गर्दी होती. बिरला भवनमध्येही असेच होते. उद्या अस्थिविसर्जन आहे. आता असे वाटते की मला काही कामच नाही. बापू होते तेव्हा दिवस लहान पडत होता. आता तर इतका काही वेळ असतो की तो कसा घालवावा हेच कळत नाही. बिरलाभवनमध्ये सकाळी उठून नेहमीप्रमाणे आम्ही प्रार्थना करत असतो. बापूजी बसत होते त्या गादीजवळच. ती खोली तर इतकी काही सुनी वाटते

की तिचे वर्णन काय करू? माझे वडील इथेच असल्यामुळे देवदासकाका आणि रामदासकाकांनी त्यांना आपल्याजवळ ठेवले आहे आणि त्यांनाही तिथे आवडते. काकांना आणि त्यांना खूप चांगले वाटते. भाईंसुद्धा काकांना, आम्हा सर्वांना येणारी पत्रे, तारा दुरून येणारे थोडेसे फोन काळजीपूर्वक पाठवत असतात. वर्तमानपत्रात जे देण्यासारखे असतात ते देत असतात.

देशविदेशातून आलेल्या संदेशात - अमेरिकेतून अध्यक्ष ट्रुमन, ऍबिसिनिया, अफगाणीस्तान, अर्जेंटिना, आयर्लंड, ऑस्ट्रेलिया, इराक, इराण, इटाली, इंडोनेशिया, इजिप्त, कॅनडा, क्युबा, कोलंबिया. चीन, चिली, जर्मनी, जपान, झेकोस्लाव्हाकिया, झांझीबार, ग्रीस, डेन्मार्क, तुर्कस्तान, तिबेट, दक्षिण आफ्रिका, दक्षिण ऱ्होडेशिया, नेपाळ, नेदरलंड, नार्वे, न्यूझिलंड, पॅलेस्टाईन, पोर्तुगाल, पोलंड, फ्रांस फिलीपाईन्स, फिनलँड, ब्रिटन, बगदाद, मोरक्को, युगांडा, लेबनान, लग्झेंबर्ग, सानमेरीनो, सीसीलीस, सोमालीलँड, सुदान, स्वित्झरलंड, स्वीडन, सिरीया, संयुक्त राष्ट्रसंघ, हवाई, अशा प्रकारे जगातील सगळ्याच देशांमध्ये जे कोणते सरकार सत्तेवर आहे त्याच्यातर्फे तसेच ब्रिटिश राजकारणी लोकांतर्फे आणि जगभरातील बापूजींच्या मित्रांकडून, शुभेच्छुकडून तारा आणि संदेश येत होते. हे पाहून खरोखर असे वाटते की बापू जीवंतही आहेत आणि वारलेही आहेत.

पू. बापूजींचे अस्थिविसर्जन आणि भस्मविसर्जनविधी तर प्रयागमध्ये त्रिवेणी संगमात होणार आहेत. परंतु हिंदुस्थानच्या राष्ट्रपित्याचे अंतिम भस्मदर्शन करोडो देशवासीयांना व्हावे म्हणून प्रत्येक प्रांताला एक भस्मकुंड द्यायचे ठरले आहे.

भावनगरहून बळवंतभाई आले आणि माझ्याकडून भस्म घेऊन गेले. तेव्हा प्रत्येक प्रांताला भस्मकुंड देण्याचे निश्चित ठरले नव्हते. ना. महाराज साहेबांची इच्छा असल्यामुळे माझ्याकडून प्रसाद म्हणून थोडासा भस्म घेऊन गेले होते. मुख्य मुख्य प्रांतात असे ठरले -

अलाहाबाद - त्रिवेणीसंगम

मुंबई प्रांतात - नाशिक, गोदावरीत

आंध्र प्रदेश - कृष्णानदी, विजयवाडा

तामिलनाड - श्रीरंगम, कावेरी नदी

बिहार - गयाजवळ गोमती

मध्यप्रदेश - त्रिपुरीजवळ नर्मदा

पूर्वपंजाब - जलंदर, सतलज

पश्चिम बंगाल - दक्षिणेश्वर, हुगली नदी

इंदोर, राजपुताना - क्षिप्रा नदी

ओरिसा - महानदी

आसाम - ब्रह्मपुत्रा

अमदाबाद - साबरमती

वर्धा - पवनार नदीत

याशिवाय जगन्नाथपुरी, सेतूबंध, रामेश्वर, कन्याकुमारी, आणि पोरबंद या ठिकाणी समुद्रात भस्मविसर्जन करायचे ठरले आहे.

२ - २ - १९४८

आज राजघाटवर लाखो लोकांच्या प्रार्थनेनंतर संपूर्ण भस्म शास्त्रोक्त विधीने गोळा करून तो एका तांब्याच्या घागरीत भरण्यात आला. काय ही मानवदेहाची अखेरची परिस्थिती ! नजरेसमोर बापूजींचे अनेकविध प्रसंग डोळ्यांसमोर तरळतात. आणि हा शेवट . . . आणि माझ्या नशिबी हा भस्म पाहणेच होते !! केवळ पाहण्याकरिताच नाही तर माझ्या उजव्या हाताने मला हा भस्म आणि अस्थी ईश्वराने उचलायला लावल्या . . .

अस्थींचा हा कुंभ बिरला भवनमध्ये घेऊन आलो. सर्वच विधी रामदासकाकांनी केला होता. परंतु देवदासकाकाही अपार वेदनांनी दुःखी होते. असे असूनही ते प्रत्येकाकडे लक्ष असतात. पू. बापूजी ज्या गादीवर नेहमी बसायचे, ज्या गादीवर ते हास्याचा खळखळाट करायचे, केव्हा कोणाच्या सुखदुःखात मार्गदर्शन करता करता गप्प बसायचे त्याच गादीवर मी हे ताम्रपात्र ठेवले आहे. तक्यावर बापूजींचा भव्य फोटो ठेवायला लावला. हे दृश्य किती भयंकर आणि करुण आहे याचे शब्दांत वर्णन करता येणे अशक्य आहे. इथे दररोज सकाळसांध्याकाळी प्रार्थना होत असते. हजारो बहिणी, भाऊ, मुले या अस्थिकुंभाचे दर्शन घण्याकरिता येत असतात. एक चरखा अखंड चालतो आहे आणि गीतापारायण सुरू आहे. फुलांचा आणि पैशांचा तर रात्र होईपर्यंत ढीग लागून जातो.

बारा तारखेला संपूर्ण देशात अस्थिविसर्जन करायचे ठरले आहे. भाई राजकोटला कुंभ घेऊन जाणार होते. शांतिकुमारभाई पोरबंदरला जातील. मुंबईत जुहूतसुद्धा कुंभ दर्शनाकरिता ठेवण्यात येणार आहे. सरदारदादांनी मला राजकोटला जाण्यासंबंधी विचारले. परंतु देवदासकाकांना माझी इथे गरज असल्यामुळे मी नाही म्हणाले. वेगवेगळ्या गावात भस्म पाठवायचे असेल तर पाठवता यावा म्हणून भाईंनी मुंबईहून रामजी कमाणींकडून विशेषेकरून लहान लहान डबे तयार करून आणले आहेत.

दहा तारखेला द्वादशा श्राद्धक्रिया राजघाटावर अखंड कताई, प्रार्थना आणि गीतापाठ करून करणार आहो. खळखळ वाहणाऱ्या या जमुनामातेने अनादी काळापासून किती महापुरुषांच्या अस्थिंना आपल्या उदरात स्थान दिले असेल ! तिथून आल्यानंतर आम्ही उद्या अलाहाबादला जाण्याची तयारी करू.

११ - २ - १९४८

रात्री ३.३० नेहमीप्रमाणे प्रार्थनेकरिता तयार झालो. तसेही रात्रभर जागेच होतो. ईश्वराच्या अपार लीलेचा जेव्हा विचार करू लागते तेव्हा लेच्यापेच्याचे तर डोकेच चालू शकत नाही. उद्या संपूर्ण देशात सुटी दिली जाणार आहे आणि ठीकठिकाणी भस्मविसर्जन करण्यात येणार आहे. देवदासकाकांनी लोकांना इच्छेप्रमाणे कुठेही भस्मविसर्जन करण्याची सूट दिली आहे.

प्रार्थनेनंतर या स्थूल अवशेषांची शंकूच्या आकाराची पालखी आम्ही आमच्या खांद्यावर उचलली. ईश्वराने मला किती पापी हृदय दिले असेल की हे स्थूल अवशेष अजूनही माझ्या खांद्यावर घेऊन मी उभी आहे असा विचार करून ही उचलत असताना मला माझ्याबद्दलच अतिशय घृणा वाटू लागली ! आणि तरीही मला काहीही झाले नाही. ४.३० वाजता ही पालखी घेऊन आम्ही स्थानकावर आलो.

पंडितजी, माऊंटबॅटन वगैरे आमच्या आधीच विमानाने अलाहाबादला आमचे स्वागत करण्याकरिता पोहोचतील. अस्थिट्रेन खास प्लॅटफॉर्मवर उभी होती. खास प्लॅटफॉर्म म्हणजे आधीच्या काळातील असा प्लॅटफॉर्म की ज्यावर शहेनशहाकरिता वा व्हाईसरायकरिता राखून ठेवलेली ट्रेन उभी राहत असे. अस्थिस्पेशल विशेष एंजिन आणि पाच डबे असलेली गाडी होती.

रेल्वेचे मुख्य आयुक्त श्री बखले, तसेच वाहन व्यवहार खात्याचे प्रमुख डॉ. जॉन मथाई स्वतःच अस्थिट्रेनची देखरेख करत होते. इस्टर्न रेल्वेची हिरव्या रंगाची ही स्पेशल होती, आणि तिच्यातील अस्थिकलशाचा डबा हा तर अजूनच विशेष होता. डब्याला चोहोकडून सुंदर रंगिबेरंगी फुलांनी सजवण्यात आले होते. आणि या तिसऱ्या वर्गाच्या डब्यातील बसायचे बाक काढून टाकण्यात येऊन तिथे एक मोठा उंच टेबल चढवण्यात आला होता. यामुळे बाहेरील जनता खिडक्यांमधून अस्थिकलशाचे दर्शन घेऊ शकणार होती. या मेजवर मोठा राष्ट्रध्वज पसरवण्यात आला होता आणि चोहोकडे तर अशोकचक्रांकित ध्वज आणि फुलांचे हार तर होतेच. डब्याच्या छतावरही राष्ट्रध्वज चढवण्यात आला होता आणि अशोकचक्र बरोबर मध्यावर येईल आणि अस्थिकुंभावर बरोबर प्रकाश पडेल अशा प्रकारे तो ठेवण्यात आला होता. तसेच टेबलच्या चोहोकडे खांब उभे करून तिथे एक सुंदर मंडप तयार करण्यात आला होता आणि आत अशा प्रकारे दिवे लावले होते की त्यांचा प्रकाश सरळ कुंभावर पडेल आणि जनतेला कुंभाचे दर्शन घेता येईल. खाली आम्हा सर्वांकरिता जाजम अंथरलेला होता. अलाहाबादपर्यंत अखंड धून, गीतापारायण आणि चरखा सुरू राहील असे ठरवले होते. आम्हा सर्वांची नावे आणि वेळ ठरवून टाकली होती. या डब्यात अडथळा न येताजाता येईल अशी व्यवस्था करण्यात आली होती. या डब्यात लष्कराचे चार चौकीदारसुद्धा होते.

ही रोजनिशी अलाहाबादला पोहोचल्यानंतर लिहीत आहे. (सकाळी) ४.३० ते ६.३० दिल्ली शहरातील जनतेच्या दर्शनार्थ अस्थिकुंभ ठेवण्यात आला होता. खिडकीजवळून लोक ओळीत जातयेत होते. अखंड धूपदीप सुरू होतेच.

अवशेषांचे अंतिम दर्शन करण्याकरिता मध्यरात्रीपासूनच लोक रेल्वेस्थानकावर येऊन पोहोचले होते. अपूर्व शांतता होती. लोकांच्या चेहऱ्यावरून अश्रुप्रवाह वाहत होता. हजारो स्त्रियांच्या, पुरुषांच्या आणि मुलांच्या हुंदक्यांचा आवाज ऐकू येत होता. दुसरीकडे ईश्वरप्रार्थना, गीतापाठ आणि रामधून सुरू होती. भव्य सन्मान करण्यात येत होता. गुलाबाच्या फुलांचे तर अंथरुणच घातलेले होते. आणि बाजूने काठीच्या मध्यभागी फडकत असलेले राष्ट्रधवज होते.

बरोबर सहा वाजता पंडितजी, के. सी. नियोगी, शंकररावजी, जयप्रकाशजी, अरुणाबहेन असफअली, सुचेतादिदी, पंतजी, इंदिराबहेन, माऊंटबॅटनचा कर्मचारी वर्ग, देशविदेशातील राजदूत वगैरे बापूंना दिल्लीतून अंतिम निरोप देण्याकरिता हजर होते. साठ लष्करी अंमलदार आणि दोनशे

लोकही होते. हे सर्व प्रत्येक स्थानकावर कायदा आणि सुव्यवस्थेची काळजी घेण्याकरिता आले होते. देवदासकाका, काकी, तारा, मोहन, गोपू हे सर्व सहा वाजता येऊन पोहोचले होते. पंजितजींनी स्वतःच काळजीपूर्वक या गाडीची व्यवस्था करवून घेतली होती. ते आमच्याकडेसुद्धा आले होते. त्यांच्या डोळ्यांमधून श्रावण-भाद्रपदाचा वर्षाव होत होता. खूप दुःखी होते. कापूर, धूप, दीप यांचा सुवास चोहोकडे पसरलेला होता. आमची ट्रेन चालवणारा आंग्लभारतीय एंजिन ड्रायव्हर सी. जे. बेनेट या अस्थिट्रेनला अलाहाबादला घेऊन जात होता. ही संधी मिळाल्याबद्दल तो स्वतःला धन्य धन्य समजत होता.

ट्रेन निघायच्या पाच मिनिट आधीच लष्कराने स्थानक रिकामे करवून घेतले होते आणि रेल्वे स्थानकाची ते चोहोकडून देखरेख करत होते. परंतु स्थानकावरील लोकांना बाहेरच्या लोकांचा शंखध्वनी, 'महात्माजी अमर हो गये', 'महात्मा गांधी जिंदाबाद', 'राष्ट्रपिता अमर हो गये' या गगनभेदी घोषणा अकरा फेब्रुवारीच्या सुप्रभातीच खूप गंभीरपणे करत होते. बरोबर ६.३० वाजता ट्रेन सुटली. अतिशय दुःखद अंतःकरणाने आगगाडी निघाली आहे असेच वाटत होते. ना एंजिनने शिटी वाजवली ना काही आवाज केला. जनसमूहाच्या अश्रूच्या अर्ध्यात एक दीर्घ निःश्वास घेऊन ट्रेन मंद गतीने निघाली. पंडितजी आणि देवदासकाकांनी दुःखद चेहऱ्याने हात वर करून ट्रेनला निरोप दिला.

दिल्ली बापूंच्या या अस्थीरूपाला निरोप देईल हे कोणाला माहीत होते? बापूंच्या सार्वजनिक जीवनात गत ४० - ५० वर्षात दिल्लीने बापूंचे नवनवीन प्रकारे केलेल्या स्वागतातच ते जातयेत होते. तीच दिल्ली आज बापूच्या अस्थी घेऊन जाणाऱ्या ट्रेनला दुःखद अंतःकरणाने निरोप देत होती. पंडितजींच्या चेहऱ्यावरील दुःख तर अवर्णनीय होते. परंतु बापूजींनी 'करू वा मरू' हा मंत्र सिद्ध केला हा त्यांचा विजयच होता. मी या रात्री चालत्या ट्रेनमध्ये गतकालीन प्रवासात आलेल्या अनुभवांची नोंद करते आहे. आमच्याबरोबर वृत्तप्रतिनिधीही आहेत. काका तर दुःखद चेहऱ्याने केव्हा अस्थींकडे पाहत असतात तर केव्हा आमचा जो गीतापाठ आणि रामायणाचा पाठ सुरू आहे त्यात सामील होत असतात. अधूनमधून ते आमचीही चोकशी करत असतात. लहानसा गोपू तर हा अस्थिकुंभ बापूजीच आहेत असे समजून त्यांना सारखा प्रणाम करत असतो.

दिल्लीहून प्रयागला जात असताना अस्थिस्पेशल दहा महत्त्वाच्या स्थानकांवर थांबणार आहे. पहिले स्थानक गाझियाबाद आहे. बरोबर १०.२० वाजता तिथे आमची ट्रेन पोहोचली. तिथे हजारो लोक

ओळीत उभे होते. सर्वात आधी गाझियाबाद पोलिसांनी सलामी दिली. त्या वेळी आमच्या गाडीचे चौकिदार डब्यासमोर 'सावधान'च्या स्थितीत उभे होते. सरकारी अंमलदार, पुढारी वगैरे आले, नम्र पुष्पांजली समर्पित केली आणि अस्थिकलशासमोर नतमस्तक होत होते. हजारोंचा समुदाय अंजली आणि फुले वाहत होता. काही बंधू अस्थीवर चढवलेली फुले आम्हांला मागायचे आणि ती वाहत असतानाच आपण पवित्र झालो असे समाधान मानायचे, आपले सद्भाग्य समजायचे.

गाझियाबादहून खुरजा, खुरजाहून अलीगढला आमची खास गाडी ९.३० वाजता पोहोचली. अलीगढ विद्यापीठाचे कुलगुरू, अध्यापक, विद्यार्थी आणि लाखो नागरिकांनी बापूंना श्रद्धांजली वाहिली. लखीराम महाविद्यालयाच्या विद्यार्थ्यांनी 'वैष्णवजन' गाईले आणि सरकारी अंमलदारांनी पुष्पांजली वाहिली. ९।।। वाजता आम्ही अलीगढ सोडले. इथे मुसलमान आणि बुरखाधारी भगिनी मोठ्या प्रमाणात गोळा झाल्या होत्या.

अशा प्रकारे अलीगढहून आम्ही हाथरस, टुंडला, फिरोझाबाद, वगैरे ठिकाणी ट्रेन थांबत होती आणि आसपासच्या गावातील लोक तिथे गटागटाने गोळा होत होते. आम्हा सगळ्यांचा उपवास होता. ज्या ठिकाणी गाडी थांबत नव्हती त्या ठिकाणीही गाडीचा वेग एकदम कमी करण्यात येत असे आणि लोक अस्थिकलषाचे दर्शन घेऊन कृतार्थ होऊ शकत होते. अनेक धर्माचे लोक गोळा होऊन आपापल्या धर्माची प्रार्थना करत असत. अशा वेळी 'माझे राजकीय क्षेत्र लहान आहे आणि इंग्रजांप्रमाणे तो माझा गौण व्यवसाय आहे, माझे मुख्य क्षेत्र तर आध्यात्मिक आहे, या आध्यात्मिक ज्ञानाचा विकास करणे माझे कर्तव्य आहे" हे बापूजींचे शब्द आठवतात आणि हे आज सिद्ध झाले आहे.

दीड वाजता आम्ही इटाव्याला पोहोचलो. आता तर फुलांची गादीच तयार झाली होती. आणि प्रत्येक ठिकाणी ही चढवलेली फुलेच आम्ही प्रसाद म्हणून वाटत असू. भजनकीर्तन तर क्षणभराकरितासुद्धा थांबत नव्हते. दिल्लीहून आम्ही निघायच्या वीस मिनिट आधीच एक पायलट इंजिन निघाले होते आणि ते रस्ता मोकळा आहे की नाही हे पाहत होते. ही व्यवस्था थेट अलाहाबाद स्थानकापर्यंत करण्यात आली आहे. पुढील स्थानकावर गोंधळ होणारा नाही हे पाहण्याकरिता या एंजिनमध्ये थोडेसे कार्यकर्ते भाईसुद्धा बसले होते.

इटावाहून जवळपास दोन वाजता फफुंदला आमची गाडी थांबली आणि आम्ही कानपूरला दोन वाजता (स्पष्ट आहे हा मुद्राराक्षसाचा विनोद आहे.) पोहोचलो. कानपूरला तर लाखो माणसांचा महासागर उफाळून आला होता. आणि आगगाडीच्या दोन्ही बाजूला मानव महासागराच्या लाटा येऊन धडकत होत्या. बंधुभगिनी, आबालवृद्ध, भंगी-ब्राम्हण तसेच गरीबश्रीमंत हे सर्व या वेळी आपसातील भेद विसरले होते. दिव्यांच्या खांबावरसुद्धा लोक चढले होते. या गाडीच्या दोन्ही बाजूला फलाट होता. पोलिसांचा गराडा असूनही करड्या गणवेषातील नौदलातील खास तुकडीची चौकी असूनही त्यांनी केलेल्या व्यवस्थेचा सारखा भंग होत होता. लोकांच्या भावना सतत उचंबळून यायच्या. तिचे वर्णन करता येणे अशक्य आहे. या लाखो जनसमूहाच्या चेहऱ्यावरून दुःख आणि व्यथा ओसंडून वाहत होत्या. मी जर इतक्यातच बिहारहून दिल्ली आणि दिल्लीहून बिहार खूप फिरलेले असल्यामुळे स्थानकांवर बापूजींना भेटायला येणारांशी माझीही चांगलीच ओळख झालेली होती. ते सर्व भेटायचे, सांत्वन करायचे, आश्वासित करायचे. म्हणायचे "बहेन ! तू बापूंना कशी वाचवू शकली नाही? काहीच कळले नाही काय?" गोष्ट तर खरी आहे. मीच गुन्हेगार आहे. आणि माझ्या गुन्ह्याची कबुली देत मी सांगायला पाहिजे की मी बापूंना वाचवू शकले नाही. इथे गर्दी तर खूपच जास्त असल्यामुळे गाडी एक तासाऐवजी दीड तास थांबली. कोणाचे मन दुखवले जायला नको याची देवदासकाका फार काळजी घेत होते. आणि कानपूरमध्ये तर जयजयकाराच्या घोषणा इतक्या काही जोरदार होत्या की मानवमहासागराच्या लाटा किनाऱ्यावर येऊन धडक मारत आहेत आहेत की काय असे वाटत होते. आमची आगगाडी जेव्हा कानपूरकडे निघाली तेव्हा लोक जवळपास एक मैल तिच्याबरोबर धावत होते ! अशा प्रकारे बापूंनी जनतेच्या हृदयात आगळेवेगळे स्थान मिळवले आहे ! गोडसेने जरी गोळी मारली तरी जनतेच्या प्रेमासमोर त्याची गोळी तुच्छ होती असे वाटते. बापूंना तर गोळी खाऊन नवजीवन मिळाले. आगगाडीपासून अनेक मैल दूर असलेल्या गावाखेड्यामधील गावकरी येऊन 'आम्हांला प्रसाद द्या', ' गांधीबाबा की जय' अशा घोषणा देत जीव हातात घेऊन ट्रेनबरोबर धावत होते. हे पाहून मूठभर हाडे असलेल्या माणसाच्या कर्मयोगाची सिद्धी झालेली पाहून मी पावन होत होते. याच डोळ्यांनी बापूं जिवंत असताना जनतेने प्रेमाने केलेले त्यांचे स्वागत मी पाहिले होते आणि याच डोळ्यांनी मी मानव देहाचा भस्म झाल्यानंतरही अनेकपट अधिक प्रेमाने आणि भक्तीने जनता बापूचे जे स्वागत करत आहे त्याचे दर्शन घेऊन पावन होते आहे. अशा प्रकारे मार्ग कापता कापता फत्तेहपूरजवळ एक लहानसे स्थानक रसुलाबाद आले. इथे ट्रेन

बाजूला घेण्यात आली. आणि इथेच मी हे लिहिते आहे. समोर एक दुसरी ट्रेन उभी होती. तिच्यात आमची रात्री झोपायची व्यवस्था होती. परंतु रात्रीसुद्धा झोप येण्याचे लक्षण दिसत नव्हते. आता तर ही शेवटचीच रात्र होती की जेव्हा मी बापूबरोबर प्रवास करत होते.

सकाळी बापूंच्या नियमाप्रमाणे सर्वांना उठवून प्रार्थना केली. बापूंच्या सानिध्यात आमची ही शेवटची प्रार्थना आहे.

१३ - २ - १९४८

१३ तारखेला मी हे लिहिते आहे.

पंडितजी, सरदारदादा, मौलाना साहेब, लॉर्ड माऊंटबॅटन, लेडी माऊंटबॅटन विमानाने बुधवारी दुपारी इथे येऊन पोहोचले होते. सरोजिनीदेवी, पंतजी, राजेंद्रबाबूजी आणि संपूर्ण केंद्रीय मंत्रिमंडळ पण होते. संयुक्त प्रांताच्या मंत्रिमंडळाने स्वतःच संपूर्ण व्यवस्थेवर देखरेख करण्याची जबाबदारी घेतली होती. पंडितजींच्या पायांना तर आल्यापासून भिंगरीच लागलेली आहे.

बापू जेव्हा अलाहाबादमध्ये यायचे तेव्हा अलाहाबादमध्ये राहणारे म्हणून पंडितजी स्वतःच प्रेमळ पुत्र म्हणून बापूंचा सत्कार करायचे. जनतेनेसुद्धा तसाच सत्कार केला होता, आणि हेच पंडितजी आज स्वतंत्र हिंदुस्थानचे प्रधानमंत्री म्हणून, अलाहाबादचे निवासी म्हणून हिंदुस्थानला स्वातंत्र्य मिळवून देणाऱ्या राष्ट्रपित्याच्या या अस्थिकुंभाचे जरी ते स्वागत करणार होते, तरी त्यांच्या हृदयात तर अपार वेदना होत होत्याच !

बरोबर नऊचे टोल पडत असताना गाडी अलाहाबाद स्थानकावर पोहोचली. ती पाचेक मैल दूर होती तेव्हापासूनच या स्थानकावरील लोक रामधून गात असल्याचे ऐकू येत होते. इथे लाखो लोक असतील अशी तर कल्पना आधीच होती. असह्य थंडी असूनही स्थानकावर दीडदोन लाख लोक गोळा झाले होते. पंडितजी धोतर नेसलेले होते आणि स्थानकावर संपूर्ण मंत्रिमंडळ तसेच देशविदेशातील लोक ओळीत उभे होते. हजारोंच्या डोळ्यांमधून अश्रुप्रवाह वाहत होता. लाखो लोकांचा समूह गोळा झालेला असून वातावरण खूपच शांत होते. कुठेही विनाकारण आवाज होत नव्हता.

अस्थिकुंभाच्या पालखीला पंडितजी, जीवराजभाई महेता, रफीसाहेब (किडवाई), सरदारदादा, मौलाना साहेब वगैरे लोकांनी आलटूनपालटून खांदा दिला.

या थरथर कापवणाऱ्या मारक थंडीत शोकाने भरलेले मौन अजूनच थरथराट निर्माण करत होते. आणि पंडितजी, ज्यांच्या स्वतःच्या जन्मभूमीत अशा प्रकारे बापूच्या अस्थींचे विसर्जन करण्याची

कल्पना तर कधीही करता येऊ शकत नव्हती. त्यांचे वडील, आई, प्रिय पत्नी अशा अनेकांना त्यांनी चिरंतन निरोप दिला आहे. परंतु त्या वेळी त्यांना जितका शोक झाला नसेल तितका आज त्यांच्या चेहऱ्यावर जाणवतो आहे. आणि लोकांची मानसिक अवस्था लक्षात घेतली तर या दृश्यामुळे होणारा थरकाप निसर्गाने होणाऱ्या थरकापापेक्षा किती तरी जास्त दुःखद होता. आमच्या डब्यापेक्षा अस्थिकलशाचा रथ सतरा फूट उंच होता आणि त्या डब्यापर्यंतचा रस्ता दुधासारख्या शुभ्र खादीच्या ताग्याने झाकण्यात आला होता. आणि अस्थिकलषाच्या या पालखीला खादीने झाकलेल्या मार्गावरून जायचे होते. जणू काय लोकहृदयाच्या सम्राटाचे भव्य स्वागतच होणार होते ! हे दृश्य पाहूनच माणूस पवित्र होऊन जातो. सर्वात पुढे पू. अम्माजान (येथील राज्यपाल, श्रीमती सरोजिनी नायडू) होत्या. या सजवलेल्या रथात पालखी ठेवली आणि तिच्यात सरदारदादा, रामेश्वरदास बिरलांची पत्नी पू. शारदाबहेन, मौलाना साहेब, जनरल राजेंद्रसिंहजी वगैरे लोक होते. आम्ही एकदम पुढे रामधून चालवत निघालो. पंडितजी, देवदासकाका, रामदासकाका, आणि इतर काही लोक रथात उभे राहिले. काही आमच्याकडे आले. ते व्यवस्था करण्याच्या कामात गुंतलेले होते. धूपदीप बरोबर अखंड सुरू होता. स्थानकाच्या कुंपणातून बाहेर पडणार तोच अलाहाबादच्या फ्लाईंग क्लबच्या विमानांनी पालखीवर चकरा मारल्या आणि एक सूर खाली मारून पालखीवर गुलाबाच्या फुलांचा वर्षाव केला.

नंतर क्वीन्स रोडवर मिरवणूक थांबली. सगळ्यात आधी लाऊडस्पिकरवाली मोटार आणि चार लष्करी जीप चालत होत्या. त्यांच्यामागे कुमाउ रेजिमेंट चालत होती. त्यानंतर ओळीत क्रमशः पोलीस तुकडी आणि परत लष्करी तुकडी अशा प्रकारे चालत होती की पुढे बाराबारा लोकांच्या आठ ओळी आणि नंतर अस्थिपालखीच्या दोन्ही बाजूला तीनतीन लोकांच्या पाच ओळी आणि मध्ये मिरवणुकीत आम्ही भगिनी रामधून गात चाललो होतो. नंतर देशातील पुढारी, प्रांतांचे मंत्री, आणि सरकारी अंमलदार, देशातील आणि जगातील प्रतिष्ठित नागरीक वगैरे सहासहाच्या ओळीत चालत होते. आणि पालखीमागे लष्करी तुकडी, विशाल जनसमुदाय, आणि शेवटी शेवटची लष्करी तुकडी होती. आठदहा लोकांच्या मिरवणुकीची ही व्यवस्था नवल वाटावे अशी होती. आणि ४,००० फूट लांब वेळूचे कुंपण बांधण्यात आले होते. इथे बाहेरची जनता प्रसंगाचे गांभीर्य पाहून दर्शन घेऊ शकत होती. अशा प्रकारे यात्रामार्ग खूपच व्यवस्थित होता. ज्या कोणी ही व्यवस्था केली असेल त्याचे खरे म्हणजे आभारच मानायला पाहिजे. आठदहा लाखांच्या मिरवणुकीतून हा अस्थिरथ व्यवस्थित चालला होता.

लोक झाडांवर आणि खांबांवर चढले होते. घरांच्या सज्ज्यातून आणि गच्च्यांवरून पुष्पवृष्टी होत होती. मधूनमधून विमानातून फुलांचा वर्षाव करण्यात येत होता. पाणावलेल्या डोळ्यांनी लाखो लोक या अस्थिकुंभाला वंदन करत होते. मध्येमध्ये ढगाळसुद्धा होत होते. सूर्यदेवाकडूनसुद्धा हे शोकपूर्ण दृश्य पाहवत नव्हते आणि म्हणून तो तोंड लपवत होता. यामुळे वातावरण अजूनच उदास वाटत होते. केवळ घोड्यांचा आणि मोटारींचा आवाज आणि रामधूनचा ध्वनी याशिवाय दुसरे काहीही ऐकू येत नव्हते. कॅनिंग स्ट्रीटच्या नाक्यावर अस्थियात्रा आली तेव्हा ऑल सेंट्स कॅथेड्रलचे शेकडो ख्रिश्चन काळ्या गणवेशात उभे होते आणि याच वेळी त्यांची प्रार्थनेची वेळ असल्यामुळे ही पालखी काही वेळ इथेच उभी ठेवली. आतून जड हृदयाने रडवेल्या आवाजाने चालणारी प्रार्थना 'लीड काईंडली लाईट'चे सूर ऐकले आणि जणू काय बापूजींच्या जीवनातील सेवेचा पथ उजळून बापूजी खरोखरच निघून गेले होते. अलाहाबादच्या किल्ल्यावरून दर दहा मिनिटांनी तोफेचा एकेक गोळा सुटत होता.

एखाद तासानंतर साडेदहा वाजता आम्ही सिव्हिल लाईन्स मार्केटजवळ पोहोचलो. रस्त्याच्या दोन्ही बाजूला लाखो माणसे उभी होती. जिकडे नजर टाकावी तिकडे - गच्चीवर, सज्जावर, झाडांवर, खांबांवर माणसेच माणसे पाणावलेल्या डोळ्यांनी हात जोडून उभी होती आणि 'महात्मा गांधी अमर हो गये' आणि इतर जयघोषणा ऐकू येत होत्या. कमला नेहरू रोड, हॉस्पिटल आणि कॅनिंग रोडपर्यंत पोहोचेपर्यंत तर चार ते पाच लाख लोक गोळा झालेले होते. आजाऱ्यांकरितासुद्धा दर्शनाची व्यवस्था करण्यात आली होती. अशा प्रकारे क्षणाक्षणात लोक वाढत होते आणि त्यांची संख्या आठ ते दहा लाख लोकांपर्यंत पोहोचली होती. विमाने सतत पुष्पवृष्टी करत होते. वातावरण खूप कारुण्याने भरलेले होते. अलाहाबादचा हा रस्ता तर फुलांची चादर टाकावी त्याप्रमाणे झाकला गेला होता.

नंतर न्यायालयाच्या परिसरातून रस्त्यावर बांधकाम सुरू असल्यामुळे रस्त्याच्या खालच्या बाजूने जायचे होते. वर रेल्वेपूल होता आणि त्यावरून रेल्वे चालली होती. आणि खालून आम्हांला जायचे होते. परंतु रेल्वेच्या उतारूंनी रेल्वे थांबवली, दर्शन घेतले आणि मग ट्रेन गेली. खालचा रस्ता ओलांडला तर लाखो साधू भेटले. जिकडे पाहावे तिकडे दाढी, जटावाले आणि डगला घातलेले साधूच साधू दिसत होते. कुंभचा मेळा होता. परंतु या कुंभाने तर लोकहृदयात अनेक प्रकारे आधीच स्थान मिळवलेले होते. धार्मिक पद्धतीनेसुद्धा आजच्या या कुंभमेळ्याच्या पवित्र दिवशी या विश्वविभुतीच्या

अशा अद्भुत अनन्य प्रेमाचे दर्शन निसर्गाने जगाला घडवून दिले होते. हजारो साधू आपल्याच शांततेकरिता वा आपल्या संप्रदायाकरिता या परमपूज्य साधूला प्रणाम करत होते.

कुंभमैदानावर दैवी वातावरण निर्माण झालेले होते. दूरध्वनिक्षेपकाच्या मोटारीतून रघुपती राजारामची धून गाईली आणि दहापंधरा लाखांचा मानवसमूह एका आवाजाने एका सुरात ही रामधून झेलली आणि राम ज्याचा श्वासोच्छ्वास होता त्या आपल्या प्रिय पित्याला अंजली वाहत होता. हे दृश्य तर इतके काही हृदयस्पर्शी होते की ते क्वचितच विसरता येईल.

अखेरीस यमुनेच्या घाटावर अस्थिरथ येऊन उभा राहिला आणि जीप होडी 'डक', जी आधीच सजवून तयार ठेवण्यात आली होती, तिच्यात देवदासकाका, रामदासकाका, सरदारदादा, पंडितजी, पंतजी, पद्मजाबहेन, सरोजिनीदेवी, मौलानासाहेब या सर्वांनी अस्तिकुंभाला निरोप दिला. हा लष्करी 'डक' जमिनीवरून चालून अगदी उतारावरून यमुनानदीत उतरला आणि आमच्यापासून दूर झाला. परंतु नदीतच दुसऱ्या होडीची आमच्यापैकी कोणी तरी व्यवस्था केली होती. जमनाघाट आणि समोर गंगाघाटावरून आम्हांला थेट संगमात जायचे होते. आजूबाजूला तर तीसचाळीस लाखांचा जनसमुदाय उतू चाललेला होता. हजारो लोक या जीवघेऊ थंड पाण्यातही उतरले होते. ज्या थोड्याशा होड्या समोरासमोर फिरत होत्या त्या सर्वांमधून एक रामधून झेलत होती आणि झेलायला लावत होती. दरम्यान आम्ही अस्थिजीपमध्ये नाही या गोष्टीकडे देवदासकाकांचे लक्ष गेले. त्यांनी अस्थिजीप आमच्या होडीजवळ आणली आणि आम्हांला त्या होडीतून घेतले. सर्वांना दर्शन होईल अशा प्रकारे गंगानदीला चक्कर मारली. एवढ्यात पिवळ्या रंगाच्या विमानांनी पुष्पवृष्टी केली. वर आकाश, खाली पवित्र पाणी आणि मध्ये लाखो लोकांच्या डोळ्यात अश्रुधारा आणि अंतःकरणापासून इष्टदेवतेची आराधना ! आमच्या जीपमध्येसुद्धा सतत वेदमंत्रे, रामधून सुरू होती. असे करता करता जिथे गंगा, यमुना आणि सरस्वतीचा पूर्णपणे त्रिवेणी संगम होतो तिथेच यमुनेचे काळसर पाणी, गंगामैयाचे पांढरेशुभ्र पाणी यांचे जिथे मिलन होते तिथे अस्थिजीप येऊन उभी राहिली. रामदासकाकांनी अस्थिपात्र तिथे रिकामे केले. आमच्या हातातसुद्धा एक पवित्र अस्थी दिली. ती हाती घेताच माझ्या हृदयात एक पवित्र वेदना निर्माण झाली. अरे ! जे बापूजी माझी इतकी काळजी घ्यायचे त्या बापूंच्या अस्थी माझ्या हाती घेण्याची माझ्यावर वेळ यावी? असह्य वेदना आणि करुण रुदनासह सर्वांनी प्रार्थना केली आणि अखेरीस आम्ही आमच्या पापी हातांनी त्या अस्थी गंगायमुनेला समर्पित केल्या.

जवाहरलालजी, देवदासकाका हुंदके देऊन देऊन रडत होते. कोण कोणाचे सांत्वन करील? आधार देईल ! गंगा आणि यमुना या दोन बहिणी. परंतु या वेळी एकील दुसरीचा विटाळ होऊन त्या रडत तर नसतील ! हे दृश्य इतके करुण होते की सूर्यदेवसुद्धा आकाशात तोंड लपवून बसला होता. या वेळी तीस तीस लाख मानवसमाजाच्या रुदनाचा आवाज ऐकवत नव्हता.

अनेक राजेमहाराजांच्या, अनेक पवित्र स्त्रीपुरुषांच्या, शेवटी पूज्य मोटी बाच्या अस्थी जिथे वाहवण्यात आल्या होत्या तिथेच आज बापूजींच्या अस्थीसुद्धा गंगाजमनामैय्याच्या उदरात सामावल्या होत्या. नदीच्या प्रवाहसुद्धा शांत झाला. या क्रियेनंतर आम्ही सर्व न्हालो आणि गीतेच्या बाराव्या अध्यायाचा पाठ केला. हृदयात अपार वेदनांनी तुफान माजवले होते, आणि बर्फासारख्या अशा थंडगार पाण्यात आंघोळ करूनही तो शांत होत नव्हता.

परतत असताना अतिशय एकाकीपणा जाणवत होता. आणि तीसचाळीस लाख लोकांसमोर परत व्यासपीठावर उभे राहून जवाहरलालजी गदगद कंठाने कापत म्हणाले, “अखेरीस त्रिवेणीत आपल्या बापूंना मी समर्पित करून आलो आहे ! त्यांच्या वाणीत इतकी काही वेदना होती की जणू काय या घटनेकरिता तेच जबाबदार होते !” या वेळी जनसमुदाय एकदमच आक्रंदन करू लागला. जवाहरलालजींकडे तर पाहवतच नव्हते.

या मानवमहासागरातून आम्हा काही लोकांना आनंदभवनमध्ये जायचे होते. तिथे पंडितजी आमची वाट पाहतच उभे होते. देवदासकाका आणि आम्हा सर्वांना भेटण्याकरिताच पंडितजी थांबले होते. तिथे आमच्या जेवणाची व्यवस्था इंदिराबहेनने करवून घेतली होती. पंडितजी काकांना भेटले तेव्हाचे दृश्यही हृदयस्पर्शी होते. एकीकडे सर्वात लहान आणि लाडका मुलगा तर दुसरीकडे बापूंचा वारसपुत्र अशाप्रकारे हे दोन भाऊ इतकी बुद्धिशक्ती असूनही सामान्य माणसाप्रमाणे अनाथ आणि निराधार वाटत होते.

मलासुद्धा भेटले. आणि कोणतही काम असले तर ते दिल्लीत भेटून मला सांग असे म्हणाले. आम्ही थोडे स्वस्थ झालो. लक्ष्मीकाकींनी आमची काळजी घेण्यात काहीही कमी ठेवले नव्हते. सतत माझ्याकडे लक्ष देत असतात. खाण्यापिण्याची थोडीशीही इच्छा नसताना ताराला आणि मुलांना महाराजांनी केलेली भाजीपुरी आग्रहाने खायला लावली.

आनंदभवन तर मी पहिल्यांदाच पाहत होते. काकींनी सर्व दाखवले. एके काळी या आनंदभुवनचा किती रुबाब होता याची तर या इमारतीवरून कल्पना आल्याशिवाय राहत नाही.

अलाहाबादला येत असताना संपूर्ण ट्रेनमध्ये तिसऱ्या वर्गाचे डबे होते. परंतु परतत असताना रात्र असल्यामुळे रेल्वेवाल्यांनी काही पहिल्या आणि काही दुसऱ्या वर्गाचे डबेही गाडीला जोडले होते. सर्व अधिकाऱ्यांनी आमची खूप चांगली व्यवस्था केली होती.

आम्ही रात्री आठ वाजता अहमदाबादहून दिल्लीला जायला निघालो. स्थानकावर खूप गर्दी होती.

परंतु आम्हांला पाहून सर्वांना वाईट वाटायचे. रात्रीसुद्धा जिथेजिथे आमची ट्रेन थांबायची तिथे लोक आमच्याकडे यायचे आणि म्हणायचे की आता तर अस्थीसुद्धा नाहीत. अशा प्रकारे ट्रेनकडे पाहून निघून जायचे. परतत असताना रस्ता फार लांब वाटला. या दिल्ली स्थानकावर मी बापूंना खाद्याचा आधार देऊन उतरवायची. आणि आता त्यांच्या अस्थीसुद्धा मी नदीत समर्पित करून आले आहे ! हे सर्व नशिबात लिहिलेले होते. जगातील महान आत्म्याचा मृत्यूची साक्षीदार होऊन जिवंत राहण्याकरिता माझा जन्म झाला होता काय? परंतु ज्या प्रकारे इश्वराने मला निर्मिले होते त्याच प्रकारे आज जगासमोर मी जगते आहे.

बिरला भवन तर इतकी मोठी आणि भव्य इमारत असूनही आज निर्जन आणि विराण वाटत होती.

दिवस तर आज असाच गेला. सायंकाळी काकांकडे गेले. तिथून राजघाटवर गेलो. आल्यानंतर आज दोन दिवसांनी ही रोजनिशी पूर्ण करते आहे.

बापूजींच्या सामानाची यादी करण्याबद्दल काका सुचवून गेले होते. ती अशी आहे.

परमपूज्य बापूजींच्या सामानाची यादी

धोतर ३, लहान चादरी ६, चादरी ३, उशीच्या खोळी ५, हातरुमाल १५, तोंड धुवायचा चौकडीचा रुमाल १, मातीला रुमाल १, उशा २, गादीची खोळ १, कागदपत्रे ठेवायची पिशवी १, चरख्याच्या पेटीची खोळ १, टॉवेल १, साधा निळा आणि कोकटी २, शाल ऑस्ट्रेलिअन १, शालजोडी १, शाल १, लहान शाल १, सुशीलाबहेनने दिलेली १, कांबळे १, दुलई १,सतरंजी १, गालीचा (आसन) १

मालीशकरिताचे सामान

मालीशची गादी १, चादर १, गादीचा मोठा रुमाल २, कांबळे १.

३० तारखेला वापरलेल्या सामानाची यादी

चादरी ३, धोतर १, उशीवरील रुमाल १, रुमाल १, रक्ताने भरलेले धोतर १, रक्ताने भरलेली चादर १, काळी झालेली ऑस्ट्रेलियन शाल १, चपलांची जोडी १, कपडे बांधलेली चादर १, मोठ्या वाट्या २, लाकडी चमचा १.

बाकीच्या जास्तीच्या आणि वेळप्रसंगी वापरावयाच्या वस्तु पुढील प्रमाणे - (जिथे एकापेक्षा अधिक वस्तू असतील तिथे तो आकडा कंसात दिला आहे. तसे नसेल तर एक वस्तु समजावी.)

रबराचे कापड, युरिनल, चेंबर पॉट, कमोड, मोजायचा पेला, व्हॅसलीनचे मलम, थूकदाणी, घमेले, टोप (२, एक नोआखालीवाली, एक ब्रह्मदेशातील), चप्पलांचे जोड (२), खडावांच्या जोड्या (२), वानर गुरू, पेंसिल, टाक निफेसह, कानकोरणे, सेफ्टीरेझर, सूपले, ब्लेड घासायची काच, पाय घासायचा दगड, पंखा बेताचा, पिनकुशन, चष्मा जुन्या घरासह, चष्म्याचे रिकामे घर, पोछा बांधायच्या दोऱ्या (३). पेपर कटर, टॉर्च लहान, दात पेटी आणि सोबत एक नवीन जोडी, दातांचा ब्रश, चरख्याची पेटी आणि चरखा, आणि दुपट्ट्यावाला (२), दोऱ्याची गुंडी, कातत असताना ठेवायचे काळे कापड, ओढणी ठेवायचा लहान स्टँड.

भांडी इत्यादी - रवी लावायची दोरी (गुलबहेनने दिलेली), कुकर तीन खणांचा, गडवा, गडव्यावर ठेवायचे झाकण, दगडाचे ताट, पोळपाट, लहान डबा, रस काढायचा पेला, रस काढायचे मशीन,

काशाचा पेला, झाकण, काशाची मोठी वाटी. काशाची लहान वाटी, खमणी, लोढी, लाकडी चमचा, जर्मनीचा चमचा, जर्मनी काटा, गाळणी, चाकू, लहान दातरडू, काचेची वाटी, थरमॉस, पोईंट लहान, मोठी आणि रंगीत, प्याला, झाकण, टिनकटर, तुटलेला हस्तिदंती पेन, हस्तिदंती काठी, घड्याळ. हे सर्व किरकोळ सामान एका मोठ्या डब्यात ठेवायचे डबे (२), टकळ्या ४, त्यातील तीन टकळ्यांवर सूत होते, चरख्याचे सामान, त्याची माळीचे सूत, या सर्व वस्तू ठेवायची टिनाची पेटी, भजनावली, गीताजी, मौन दिवशी लिहायचा पॅड.

सामानाची ही यादी करून देवदासकाकांना सर्व सोपवले. छायाचित्रकार तर इतके यायचे की माझा सगळा वेळ त्यांच्यातच जायचा.

सकाळ-संध्याकाळी नियमितपणे राजघाटावरील प्रार्थनेत हजर असणारात मंत्रिमंडळ आणि इतर हजारो असायचे.

देवदासकाकांनी मला मोटीबाची पुण्यतारीख २२ फेब्रुवारी झाल्यानंतरच दिल्ली सोडायला सांगितले. यामुळे थांबून गेले. परंतु इथे मुळीच करमत नाही. वेळ जाता जात नाही.

मी सुद्धा माझ्या सामानाची बांधाबांध सुरू केली आहे.

२२ - २ - १९४८

आज सकाळी महरौली येथील कस्तुरबा आश्रमात प्रार्थना करायला गेलो. गीतापाठ केला. दृश्य डोळ्यांसमोर तरळते आहे. इतके रडू येत होते की सुशीलाबहेन आणि माझ्याकडून प्रार्थना होतच नव्हती.

सायंकाळी राजघाटावर गेलो. आज रात्री आम्ही जाणार असल्यामुळे आज दुपारी माझ्या नातलगाना आणि भेटायला येणारांच्या भग्न हृदयाचा निरोप घेण्याकरिता थांबले. दिल्लीहून मुंबईला जाण्याकरिता सरकारने आमच्याकरिता एक तिसऱ्या वर्गाचा डबा राखून ठेवला होता. माझ्या नावावर सौराष्ट्रातून एक निनावी पत्र आले, "तू गांधीजींच्या खुनाची साक्षी असल्यामुळे तुलाही गोळी घातली जाईल" असे त्यात लिहिले होते. यामुळे बिरलाजींनी आणि सरकारनेही मला एकेक जमादार सोबत दिला होता.

आमची गाडी दोन तास उशिरा होती. देवदासकाका मला एकीकडे घेऊन गेले आणि गाडी निघेपर्यंत माझ्याशी खूप खूप गोष्टी केल्या. विशेषकरून माझ्या डायरीसंबंधी. शिवाय सध्याच्या

राजकीय परिस्थितीत . . . च्या संबंधात जो बिघाड आला आहे त्यासंबंधी आणि बापूंच्या इतर सहकाऱ्यांसंबंधी गोष्टी केल्या. . . . माझ्याजवळच्या रोजनिश्या कोणालाही देऊ नको असे काकांनी मला सांगितले. इतर महत्त्वाची कागदपत्रेसुद्धा नाही. . . . च्या लाचलुचपतीसंबंधीचे विचार त्यांनी समजून घेतले. स्थानकावर फेऱ्या मारत असताना काकांनी खूप प्रेमाने चांगले मार्गदर्शन केले. "तू लहान आहेस, आणि तुझ्याजवळ फार मुल्यवान साहित्य आहे. शिवाय तू फार साधीभोळी आहेस. परंतु भाई असल्यामुळे मी निश्चिंत आहे." दिल्लीला परत ये असे म्हणाले आणि अधूनमधून काय सुरू आहे ते कळवत जा असेही समजावून सांगितले. गाडीची शिटी झाली आणि आम्हा सर्वांच्या डोळ्यातून अश्रुधारा वाहू लागल्या. बापूंना सोडून मी आज घरी चालले आहे.

* * *

अशा प्रकारे महुआला जायची वेळ येईल अशी कल्पना स्वप्नातही केली नव्हती.

आम्ही पेशावर एक्सप्रेसमधून रवाना झालो. आमच्या डब्यावर 'गांधी कॅम्प' असे लिहिलेले लेबल लावलेले असल्यामुळे स्थानकावर लोकांचा लहानसा घोळका गोळा होत असे.

माझे पिताश्री, कनूभाई, आभाभाभी, मी आणि जमादार इतके लोक होतो.

२३ तारखेचा संपूर्ण दिवस ट्रेनमध्येच गेला.

मुंबई,

२४-२-'४८

आज दहा वाजता आम्ही मुंबईला पोहोचलो. शांतिकुमार भाईंचा आग्रह होता की आपण आधी जुहूलाच जाऊ. शांतिकुमारभाई बापूंचे अनन्य भक्त आहेत. ते पण बापूंच्या मुलासारखेच होते. त्यांनी आपली मोटर आणि स्टेशन वॅगन पाठवली होती. रेल्वे वॅगनमधून माझे सामान वेगळे करून भाई (मनुबहेनचे वडील) माझ्या बहिणीकडे फणसवाडीत गेले. शांतिकुमार भाईंनी खूप आग्रह केल्यामुळे मी जुहूला गेले. आभाभाभी आणि कनूभाई तर तिथे जाणारच होते.

दुपारी बहिणीला आणि तेथील सर्वांना भेटायला गेले. सायंकाळी परत जुहूला गेले. मला भेटायला येणारे सर्व फणसवाडीला येत असल्यामुळे मी फणसवाडीत थांबले.

मला खूप मानसिक थकवा आला होता. शारीरिकसुद्धा. यामुळे माझी प्रकृतीही बिघडली. आतापर्यंत तरी तिने चांगले काम केले होते. यामुळे महुआला लवकर पोहोचण्याची इच्छा असल्यामुळे एक मार्चला विमानाने भावनगरला जायला निघाले. विमानाचे तिकिटसुद्धा शांतिकुमारभाईंनी खूप आग्रहाने काढले. ते मला मुलीप्रमाणेच ठेवत असतात. आणि भाटिया असल्यामुळे बहिणी-मुली लौकिक प्रसंगी तिथे गोळा होत असतात. सकाळी भावनगरला जाण्याकरिता रवाना होणार आहे. जास्तीचे सामान शांतिकुमार भाई आगबोटीने पाठवणार आहेत. मी तर भावनगरात विशेषेकरून वैयक्तिकरित्या कोणालाही ओळखत नव्हते. आणि पहिल्यांदाच भावनगरला जायचे होते. परंतु माझे पिताश्री आणि येथील नायब दिवाण मु. नटवरलालभाई सुरती यांचा खूप जवळचा संबंध होता. यामुळे ते तिथेच विमानतळावर घ्यायला आले होते आणि मी त्यांच्याकडे गेले.

भावनगर,

५-३-'४८

भावनगरला एकच दिवस थांबायचे होते, पण आज त्याऐवजी पाच दिवस झाले. मी तर भावनगर शहरातील लोकांशी अगदीच अपरिचित होते. तसेच भावनगर राज्यातील अंमलदारवर्गाशीसुद्धा मी अपरिचित होते. परंतु इथे सर्वांनी मला खूप प्रेमाने वागवले. आणि सुरती साहेब तर माझ्या नाजूक प्रकृतीकरिता अनेकांची भेट घेऊन येत असत. ते खूप वात्सल्यपूर्वक माझी काळजी घ्यायचे. या शहरात बापूंबद्दल अपार भक्तीभाव आहे. दोन तारखेला मी श्रीमती वीरमतीबहेनबरोबर ना. महराणी साहेबांना भेटायला गेले. ना, सौ. पू. महाराणी साहेबांनी खूप भक्तीभावपूर्वक मला बापूंच्या गोष्टी विचारल्या. वाक्प्रचार आहे की रामनामाने दगडही तरंगतो. माझे तसेच झाले. पू. सौ. ना. महाराणीसाहेब म्हणाल्या, "जबाबदार राज्यपद्धतीच्या वेळी पूज्य बापूच येणार होते, ते येऊ शकले नाही." परंतु मला त्यांना पाहून भक्ती, आनंद आणि समाधान वाटले. ते व्यक्त करून मी त्यांना बापूच्या गोष्टी, त्यांची कार्यपद्धती तसेच अनेक आठवणी सांगितल्या. त्यांनी "अजून बसना" असे म्हणून मला आग्रहपूर्वक बसवले. प्रेमाने मला नाश्ता करायला लावला.

हा प्रसंग मी कधीही विसरू शकत नाही. ना. महाराजांशी माझी ओळख तरी झालेली होती. परंतु ना. महाराणीसाहेबांचे तर पहिल्यांदाच दर्शन घेत होते. बापूंनी जरी त्यांचे राज्य घेतले होते तरी त्यांच्या मनात बापूंना देवासारखे स्थान होते ! बापूंचे प्रेम कुठवर पसरले होते ते या दृश्यातून कळते.

माझ्यासारख्या १७ वर्षाच्या पोरीला थेट मोटारीपर्यंत ते सोडायला आले. मी नम्रपणे त्यांना हा त्रास न घेण्याची विनंती केली. त्यांनी ऐकले नाही. भावनगरमध्ये जबाबदार राज्यपद्धती सुरू होण्याच्या बाजूने मी होते. राज्याच्या कागदपत्रांवरून आणि गोष्टींवरून मला राज्यात काय सुरू आहे हे चांगले माहीत होते आणि त्यासंबंधी मी मतही देत असे. त्यांनासुद्धा हे माहीत होते. आजही हे राजकुटुंब मला मुलीसारखे समजते. हा बापूजींचा प्रसाद आहे आणि त्यांची महानता असे मी समजते.

सामान्यपणे स्त्रिया जो व्यवहार चालवतात त्याचा त्या त्याग करू शकतात की नाही या प्रश्नाचे चर्वितचर्वण होत असते. परंतु मला भव्य दर्शन तर हे झाले की हे इतके मोठे राज्य जनतेला सोपण्यासंबंधात महाराज साहेबांना महाराणीसाहेबांचे हृदयपूर्वक प्रोत्साहन होते, आणि संमतीही होती. त्यांचे प्रत्यक्ष दर्शन इथे झाले. महाराज साहेब मला म्हणाले, जनतेचे होते, जनतेलाच दिले आहे ना? यात उपकार कशाचे? आणि शिवाय पू. बापूंच्या चरणी ते समर्पित करण्याचे मला महान सद्भाग्य लाभले. आणि आमचे जीवन खरोखरच धन्य झाले असे मी समजतो. आमच्यासारखे सद्भाग्य कोणाचे असेल की पू. महात्माजींच्या चरणी राज्य सोपवण्याची संधी आम्हांला मिळाली? आणि पूज्य महात्माजींचीसुद्धा आमच्या अपार कृपा होती. त्यांनी दिलेला सल्ला आम्ही कधीही विसरू शकत नाही. महाराज श्रींच्या वाणीत, माझ्याशी वागण्यात दांभिकतेचा वा अविवेकाचा लवलेशसुद्धा नव्हता.

चार तारखेला धरसाळाच्या विद्यार्थ्यांना मी बापूजींच्या गोष्टी सांगितल्या. सायंकाळी भगिनींची सभा होती. तिच्यात गेले. मी आल्याचे कळताच लोक बापूजींच्या गोष्टी ऐकण्याकरिता खूप उत्सुक असतात. यामुळे त्यातच वेळ जातो.

सुरती साहेबांच्या मुलीने - सुकन्याबहेनने मला वेळ मिळताच बोरतलाव आणि फिल्टर दाखवला.

जिथे जाते तिथे गोळी कशी लागली हा प्रश्न प्रामुख्याने विचारला जातो. मला फार दुःख होते की मी बापूजींच्या एक इंचसुद्धा दूर नसतानाही बापूजींकरिता मी काहीही करू शकले नाही. आणि आज मला लोकांना या गोष्टीचे उत्तर द्यावे लागते आहे. मी खूप मानसिक संयम ठेवून काय झाले ते लोकांना सांगत असते.

मी श्री तापीबाई छात्रालयातही गेले होते. सुरतीसाहेब वृद्ध आहेत. परंतु माझ्या अशा भरगच्च कार्यक्रमामुळे त्यांना खूप काळजी वाटत असते. आणि भावनगरना नायब दिवाणसाहेब दिवाण बहाद्दूर त्रिभुवनदासभाई यांची मुलगी श्रीमती वीरमतीबहेन आणि त्यांचे कुटुंबही माझी फार काळजी घेत असते.

या वेळी मला एका गोष्टीचा अनुभव आला की राज्य घेण्याच्या आणि सोपवण्याच्या प्रक्रियेत जुना अंमलदार वर्ग निवृत्त झाला होता. असे असतानाही राज्यातील लोक बापूजींचे अनन्य भक्त होते आणि ते खूप भक्तिभावपूर्वक बापूजींच्या गोष्टी ऐकून पवित्र होत असतात असे वाटते. उलट दुसरीकडे मला वेगळाच अनुभव आला. तो असा की ज्यांना आज लहानशी सत्ता मिळाली आहे त्यांचे दिल्लीत वेगळेच व्यक्तिमत्व दिसते आणि इथे वेगळे. मी तर पू. पंडितजींना आणि सरदारदादांकडे माझ्या डोळ्यांनी 'मंत्री' म्हणून पाहिले नाही - माझ्या वडिलाप्रमाणे, पूजनीय लोकांप्रमाणे पाहिले. आणि त्यांनीसुद्धा मला असेच ठेवले. या सर्वांचे मिळून एकच कुटुंब आहे अशी भावना माझ्या हृदयात होती आणि त्याच भावनेने कर्तव्य म्हणून मी इथे काही कुटुंबांना भेटायला गेले होते. मी तर प्रणाम करायला जाण्यापुरतीच गेले होते. परंतु पू. बापूंचे शब्द मला कानात गुंजन करत असतात की आपण जागे राहिलो नाही आणि सत्तेचे दोर हाती आलेले लोकांबरोबरचे संबंध विसरून गेलो तर आपला अधःपातच होईल. येथील दोन चार कुटुंबांना जेव्हा मी भेटायला गेले तेव्हा मला हाच अनुभव आला. त्याचबरोबर ना. महाराणी साहेबाच्या वर्तनाचे चित्र माझ्यासमोर उभे राहिले. या अवलोकनानुसार माझ्या भावी जीवनात मी जागी राहिले पाहिजे. बिरला भवनमध्ये जेव्हा आम्ही महिन्यातून अनेकदा भेटत असू तेव्हा मी तर त्यांच्याशी यथाशक्ती पू. बापूंमुळे पाहुणे म्हणून वागत असे आणि माणसाला सत्ता मिळाली की त्याच्यात इतक्या लवकर परिवर्तन कसे होते? सार्वभौम हिंदुस्थानची ज्यांच्या हातात सत्ता आहे त्यांच्या गोड फुंकरीचा नम्रतेचा मला तर कालसुद्धा अनुभव आला होता. यामुळे हा जो अनुभव मला आला होता तो माझ्या जीवनातील पहिलाच असा अनुभव होता की ज्याबद्दल मला नवल वाटते आहे. हाही अनुभव मी पचवू शकेन की नाही असा विचार मनात येतो.

आज शुक्रवार आहे. बापू जाऊन आज बरोबर एक महिना आणि पाच दिवस झाले.

इथे भावनगरमध्ये आले तेव्हापासून भरगच्च कार्यक्रम सुरू आहेत. आज तर उपवास आहे. श्री नाथालालभाई दवेंच्या नई तालीमच्या वर्गात मी गेले होते. प्राध्यापक मोदींकडेसुद्धा गेले. हुन्नरशाळा

आणि महिलाविद्यालयातील बंधुभगिनींबरोबर दोन तास होते. रात्री शिशूविहारात मी प्रार्थना केली. खूप मोठी उपस्थिती होती. प्रश्नोत्तरे झाली. आणि रात्री बारा वाजेपर्यंत दूरनसुद्धा अनेक लोक येत होते, त्यांच्याशी बोलण्यात वेळ गेला.

सहा मार्चला सकाळी 'भावनगर समाचार'च्या संपादकाबरोबरसुद्धा वेळ घालवला. त्यांनी मला पू. बापूच्या आठवणी लिहून पाठवण्याकरिता विशेष आग्रह केला. मी म्हणाले की मी लिहू शकेनच असे नाही. बापूंबद्दल काय लिहू, काय लिहू नये हाच प्रश्न पडतो. आणि मला ज्ञानसुद्धा नाही. असे असूनही त्यांचा आणि सुरतीसाहेबांचा खूप आग्रह होता.

आज सकाळी दहा वाजता भावनगरहून निघाले. साडेपाच वाजता महुआला पोहोचले. किती आशा घेऊन महुआहून नोआखालीला गेले होते? बापू मला म्हणाले होते की "करायचे किंवा मरायचे" असा संकल्प करून येशील. परंतु अखेरीस बापू बापू होते, आजोबा होतो, आई होते . . . मुलीला, नातीला, त्यांच्या पोरीला कसे मरू देणार होते? त्यांनी स्वतःच त्यांचा मंत्र सिद्ध केला आणि नंतर मला महुआला येऊ दिले ! इथे आल्यानंतर आज पहिल्याच दिवशी असा भास होतो आहे की आता या जगात बापू मिळणार नाहीत. सवा वर्षापूर्वी १९४६च्या डिसेंबरमध्ये महुवाहून कलकत्त्याला गेले होते १९४८ च्या मार्चच्या पहिल्या आठवड्यात जगातील एक विश्वंवंद्य विभूतीची जीवनलीला संपल्यानंतर परतते आहे ! कालगती किती अनाकलनीय असते !

* * * * *

दिल्लीत गांधीजी – भाग दुसरा

पुरवणी

अनुवाद, संकलन आणि संपादन

ब्रिजमोहन हेडा

१. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांनी लिहिलेले हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

डिसेंबर १, १९४७

माझ्या वक्तव्यात मी 'जर बरोबर असेन तर' असे जे शब्द मी वापरतो त्याला अनेक मित्रांचा विरोध आहे. मला जे म्हणायचे आहे ते बरोबर आहे की नाही हे मी आधीच ठरवले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. मला असे वाटते की जेव्हाकेव्हा मी 'जर' हा शब्द वापरून काही विधान केले असेल तर त्यामुळे माझी काही हानी झाली नाही. त्यामुळे त्या वेळी मी जे काम करत असतो त्यात माझा लाभच झाला आहे.

या वेळी काठेवाडसंबंधी चर्चा सुरू आहे. मित्रांचे म्हणणे आहे की काठेवाडसंबंधी जे अतिशयोक्त विधान करण्यात आले त्याला मी प्रसिद्धी दिली. यापैकी बहुतेक आरोप पूर्णपणे निराधार आहेत. जी काही थोडी गडबड झाली होती तिच्यावर लगेच नियंत्रण मिळवण्यात आले. परंतु 'जर' हा शब्द वापरून मी जर ते आरोप परत केले असतील तर त्यामुळे सत्याची कोणतीही हानी झाली नाही. काँग्रेसने आणि काठेवाडच्या प्रशासकांनी सत्याच्या बाजूने जितकी भूमिका घेतली असेल तितकाच त्यांचा लाभ होईल. मित्रांचे म्हणणे आहे की ज्या लोकांना सत्य-असत्याशी काहीही देणेघेणे नसते, ते अप्रामाणिकपणे आपल्या स्वार्थाकरिता माझ्या वक्तव्याचा उपयोग करतात व त्यामुळे अंतिमतः जरी सत्य बाहेर येत असले तरी त्याआधीच हानी होऊन गेलेली असते. यामुळे माझ्या वक्तव्याने असत्य पसरू नये म्हणून मी काळजी घेईन. परंतु जेव्हाकेव्हा लोक या युक्त्याप्रयुक्त्यांचा आधार घेतात तेव्हातेव्हा त्यांना अपयश आले आहे आणि त्यांचा अप्रामाणिकपणा आणि खोटेपणा उघड झाला आहे. मी जर 'जर' हा शब्द वापरून आरोप करत असेन तर त्यामुळे कुणीही अस्वस्थ होण्याचे कारण नाही. ज्यांच्याविरुद्ध मी अशा भाषेत आरोप केलेले असतात ते मात्र पूर्णपणे निरपराध असले पाहिजे इतकीच याकरिता आवश्यकता असते.

आता आपण याच्या दुसऱ्या बाजूचा विचार करू. परत आपण काठेवाडचेच उदाहरण घेऊ. मी जर पाकिस्तानमधील प्रमुख वृत्तपत्रांमध्ये आलेल्या आरोपांकडे लक्ष दिले नसते, आणि जे आरोप सत्य

असल्याचे पाकिस्तानच्या प्रधानमत्र्यांनीही सांगितले आहे, ते आरोप तर मुसलमानांना धर्मग्रंथाप्रमाणे सत्य वाटले असते. परंतु आता मुसलमानांना त्यांच्या सत्यत्वाबद्दल शंका येऊ लागली आहे.

यामुळे आपल्या घरात कोणताच गोंधळ नसेल तर टीका कितीही कटू जरी असली तरी टीकेचे स्वागत करायचे, अधिक सत्यवादी व्हायचे आणि जिथेकुठे चूक दिसेल ती दुरुस्त करायची असा धडा यापासून काठेवाड आणि इतर ठिकाणच्या मित्रांनी घेतला पाहिजे असे मी म्हणेन. आपल्या हातून कधीही चूक घडू शकत नाही या भ्रमात आपण राहू नये. कटूहून कटू टीका करणारामध्येही आपल्याविरुद्ध काही ना काही खरा वा काल्पनिक मुद्दा असतोच. आपण जर धीराने वागलो तर आपण विरोधकाची चूक दुरुस्त करू शकतो आणि संधी मिळाली की त्याला त्याची चूक दाखवू शकतो वा आपली चूक आढळली तर आपण ती दुरुस्त करू शकतो. असे करून आपण कधीही चुकीच्या मार्गाने जाणार नाही. परंतु असे करताना तोल सांभाळायला पाहिजे यात काही संशय नाही. विवेकाची नेहमीच आवश्यकता असते. खोडसाळपणाच्या वक्तव्यांची आपण कधीही दखल घेऊ नये. मला वाटते की दीर्घ अनुभवानंतर सारासारविवेक करण्याची कला मी आत्मसात केली आहे.

आज वातावरण विषाक्त झाले आहे. पक्ष परस्परांवर आरोपप्रत्यारोप करत आहेत. अशा वातावरणात आपण चूक करणारच नाही असे समजणे चूक आहे. आज असा दावा करता येण्याइतके आपण सुदैवी नाही. आवश्यक ते प्रयत्न करून आपण जर आपल्यामधील खोडसाळपणा दूर करू शकलो व तो मुळपासून उपटून काढून टाकू शकलो तर तितके पुरे आहे. असे आपण तेव्हाच करू शकतो जेव्हा आपले दोष पाहण्याकरिता आणि ऐकण्याकरिता आपले डोळे आणि कान उघडे असतील. आपल्याला आपले दोष दिसू नये अशा प्रकारे निसर्गाने आपल्याला घडवले आहे. आपण केवळ दुसऱ्याचे दोष पाहू शकतो. यामुळे इतराना आपले जे दोष दिसतात त्याचा लाभ घेणे हाच सुज्ञपणा आहे.

जुनागढहून मला जी लांब तार आली होती तिची काल मी सविस्तर चर्चा करू शकलो नव्हतो कारण त्या वेळी प्रार्थना संपवून जाण्याच्या बेतात असल्यामुळे मी त्या तारेवर केवळ एक दृष्टिक्षेपच टाकू शकलो होतो. आज मी तिचा पूर्ण अभ्यास केला. ती तार पाठवणारांचे म्हणणे आहे की त्या तारेत करण्यात आलेले आरोप सत्यावर आधारित आहेत. हे जर खरे असेल तर काठेवाडकरिता ही गोष्ट फार वाईट आहे. परंतु आमच्या कार्यकर्त्यांनी जे आरोप खरे आहेत म्हणून मान्य केले आहे आणि जे मी

प्रकाशित केले आहेत त्याच आरोपांची जर त्यात अतिशयोक्ती करण्यात आली असेल तर त्या तारेमागे जे लोक असतील त्यांनी पाकिस्तानचे नुकसान केले आहे. त्यांनी मला काठेवाडला येऊन स्वतः परिस्थिती पाहण्याचे निमंत्रण दिले आहे. आज हे करण्याच्या परिस्थितीत मी नाही हे त्यांना माहीत असले पाहिजे. त्यांनी चौकशीआयोगाची मागणी केली आहे परंतु त्याकरिता त्यांनी आपली बाजू तयार केली पाहिजे. जुनागढ आणि काठेवाडच्या नावाची बदनामी करण्याचा त्यांचा उद्देश नाही हे मला माहीत आहे. सत्य बाहेर यावे, अल्पसंख्य समुदायाच्या जिवाला वा संपत्तीला धक्का लागू नये व त्यांना प्रतिष्ठेने जगता यावे अशी त्यांची इच्छा आहे. त्यांना माहीत आहे की वृत्तपत्रातील प्रचार जर असत्यावर आधारित असेल तर त्यामुळे जीवित वा संपत्ती वा अब्रू यापैकी कशाचेही रक्षण होऊ शकत नाही. या तिन्ही गोष्टींच्या रक्षणार्थ ज्यांनी तार पाठवली आहे त्यांनी सत्याला धरून राहावे व त्यांनी आपल्या हिंदू मित्रांकडे जाऊन त्यांची भेट घ्यावी. कोणते हिंदू आपले मित्र आहेत हे त्यांना माहीत आहे. त्यांना हेही माहीत आहे की मी काठेवाडहून जरी दूर असलो तरी इथूनसुद्धा मी त्यांचेच काम करत आहे. मी हे पूर्ण विचार करून बोलतो आहे आणि आता मी तथ्ये गोळा करत आहे. मी सरदार पटेल यांना भेटलो. ते तर इथपर्यंत म्हणतात की एकही सांप्रदायिक दंगल न होऊ देण्याची क्षमता त्यांच्यात आहे आणि कोणीही मुसलमान बंधूभगनींशी दुर्व्यवहार केला तर त्याला कठोर शिक्षा केली जाईल. काठेवाडमधील कार्यकर्ते, जे अगदी निष्पक्ष आहेत, स्वतः सत्य शोधण्याचा प्रयत्न करत आहेत व काठेवाडमधील मुसलमानांना होणारी पीडा कमी करण्याचा प्रयत्न करत आहेत. ते स्वतःइतकेच मुसलमानांवरही प्रेम करतात. मुसलमान त्यांना मदत करतील काय?

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - १', पृष्ठ १५१-३

---

२. वैपसी पावरी यांना पत्र

(भारतातील पारशी लोकांचे सर्वोच्च धर्मगुरू खुर्शदजी एराचजी पावरी यांची मुलगी.
यानंतर त्या विंचेस्टर इंग्लंड येथील प्रमुख धर्मगुरू झाल्या)

भाई लालकाकांबद्दल (चित्रकार) तू जे काही सांगितलेस ते लक्षवेधक आहे. परंतु त्यासंबंधी माझ्याजवळ लिहिण्यासारखे काहीही नाही. मी तुझ्या तीन प्रश्नांचे उत्तर देतो -

(१) जेव्हा एखाद्याचे चित्र काढतो तेव्हा ती व्यक्ती जशी आहे तशी दाखवली पाहिजे. यामुळे मी वा इतर कोणीही रंगाची निवड करू शकत नाही.

कस्तुरबाची साडी पांढरी असायची. कधीकधी तिच्यात रंगीत रेषा असायच्या वा ठिपके असायचे. कोणत्याही रंगाचा तिचा आग्रह नसायचा परंतु साडीचा पदर आणि काठ मात्र रंगीतच असायचे.

(२) चित्रातील व्यक्ती बसलेली दाखवायची की उभी असलेली हे चित्रकारावर अवलंबून आहे. चित्रकाराने त्या व्यक्तीला ज्या अवस्थेत जास्त पाहिले असेल त्या अवस्थेतील चित्र काढले पाहिजे.

(३) माझ्याजवळ एकही फोटो नाही. या बाबतीत नौरोजी भगिनी तुला अधिक माहिती देऊ शकतील. यातून गोसीबेन कॅप्टन जास्तीत जास्त माहिती देऊ शकतील. तुझ्या वडिलांनी काढलेले चित्र चांगले निघेल अशा आशा आहे.

आशीर्वाद,

मो. क. गांधी

कुमारी वैपसी पावरी,

ताजमहाल हॉटेल,

मुंबई

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. १०२२७. सौजन्य - वाप्सी पारवी

---

३. गुलाम रसूल कुरेशी यांना पत्र

डिसेंबर २, १९४७

चि. कुरेशी.

तुमच्या करुणेचे मला कौतुक वाटते. परंतु कुत्र्यांना खच्ची करून आपली उद्दिष्टपूर्ती होऊ शकते असे मला वाटत नाही. आपण कुत्रे पाळायची कला शिकलो पाहिजे. आणि रस्त्यावर भटकणाऱ्या कुत्र्यांना कमीतकमी वेदना होतील अशा प्रकारे त्यांना मारून टाकले पाहिजे. यात हिंसा नाही असे मला म्हणायचे नाही, परंतु हीच अहिंसक पद्धती आहे असे मी म्हणेन.

हिंदू-मुसलमानसंबंधांचा प्रश्न आता ऐरणीवर आला आहे. हा प्रश्न चागंल्यात चांगल्या पद्धतीने कसा सोडवता येईल हे प्रत्येकाने पाहिले पाहिजे.

अमिनाची (गुलाम रसूल कुरेशी यांची पत्नी आणि अब्दुल कादिर बवाझीर यांची मुलगी) प्रकृती एकदम चांगली झाली असे म्हणता येईल काय?

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

४. दिलखुश दिवाणजी यांना पत्र

डिसेंबर २, १९४७

चि. दिलखुश,

या महिन्याच्या २२ तारखेचे तुमचे पत्र मिळाले. विणकरांनी आपल्या हाताने कातलेल्या सुताची खादी मला मिळाली. त्यांना माझे आभार.

हे बंधू मुळात विणकर होते काय? ते जर असतील तर गिरणीतील सुताने कापड तयार करताना आणि हाताने कताई केलेल्या सुताने कापड तयार करताना काय अंतर जाणवते हे ते सांगू शकतील काय? अशा प्रकारे विणणे सुकर असते की कठीण? अशा प्रकारे किती विणकरांना प्रशिक्षित करण्यात आले आहे? किती नवीन विणकरांना सूतकताईचे प्रशिक्षण देण्यात आले आहे? दोघांच्या कामात काही फरक पडला आहे काय?

खारची सर्व पत्रे मिळाली होती. बिसेनने त्यांची पोच दिली होती. तुम्हाला त्यांची पत्रे कशी मिळाली नाही?

गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

५. जयशंकर पंड्या यांना पत्र

डिसेंबर २, १९४७

भाई जयशंकर पंड्या,

जुनागढहून आलेली तार (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर १, १९४७) सोबत आहे. मला त्यासंबंधीचे सत्य काय आहे हे जाणून घ्यायचे आहे. याशिवाय त्यावर सह्या करणारे कोण आहेत तेही कळवा. याशिवाय तुमच्याबरोबर आलेल्या भाई मुसांना काय सांगायचे होते तेही कळवा. माझ्याबरोबर दोन वेगवेगळे अहवाल आहेत. यामुळे मी थोडासा गोंधळलो आहे.

जयशंकर पंड्या,

जुनागढ संस्थान रेल्वेचे विभाग प्रमुख

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

६. जमना गांधी यांना पत्र

डिसेंबर २, १९४७

चि. जमना (नाराणदास गांधी यांची पत्नी),

तुझे पत्र. मी चांगला आहे. माझ्यासमोर कामाचा ढीग पडलेला आहे. कनूची (जमना गांधींचा मुलगा) इच्छा असेल तेव्हा तो येऊ शकतो. त्याचप्रमाणे आभाही (जमना गांधींची सून). मला त्यांना आदेश देण्याची आवश्यकता नाही. मुळीच काळजी करू नकोस. माणसाने आपल्या मुलांना सामाजिक कार्याकरिता वाहून टाकल्यानंतर त्यांनी आपली काळजी घ्यावी आणि सेवा करावी अशी इच्छा टाकून दिली पाहिजे.

तुझा दमा अजून का सुरू आहे? तो जाणार नाही का?

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

७. सत्येन यांना पत्र

डिसेंबर २, १९४७

चि. सत्येन,

तू मनोहर दिवाण (यांनी कुष्ट रोग्यांकरिता दत्तापूर येथे कुष्टआश्रम काढले होते.) यांचा विषय कसा काय काढला?

तू नालवाडीला जे काम करतो आहेस ते विनोबांच्या देखरेखीखाली असेल हे स्पष्ट आहे. परंतु तुला असे काही साहस सेवाग्राममध्ये करायचे असेल तर तू आर्यनायकम आणि आशादेवी यांची परवानगी घेतली पाहिजे. यामुळे तू ही कल्पना सोडून देणे चांगले राहील.

हरिजनांना ब्राह्मण म्हणाल्यामुळे हरिजनांचा कोणताच फायदा होणार नाही परंतु ब्राह्मण जर हरिजन झाले तर बरेच काही साध्य होऊ शकेल.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

८. रैहाना तैय्यबजी यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २, १९४७

बेटी रेहाना,

मला तुझे दीर्घ पत्र मिळाले. मी तुझ्याशी कसा युक्तिवाद करू. तुला माझे शेवटचे पत्र मिळालेच असावे. (पाहा, रेहाना तय्यबजी यांना पत्र, नोव्हेंबर ३०, १९४७)

मला जेव्हा पटेल तेव्हा मी त्याप्रमाणे वागेन. मध्यंतरी आपण आपले मतभेद सहन करू या.

उर्दू लिपीबद्दल तू नानावटींचा सल्ला घेतला काय? या बाबतीत त्यांनी बरेच काही केले आहे.

सामाजिक प्रश्नाला त्याचे स्वतःचे स्थान असते. युरोपमध्ये परस्परांबरोबर जेवू शकणाऱ्या लोकांनी आपसात युद्ध केले आहे. मुसलमानांनी मुसलमानांशी करबला येथे लढाई केली आहे. (इराकमध्ये झालेल्या युद्धाचे ठिकाण. तिथे शिया पुढारी इमाम हुसेन आणि त्यांच्या अनुयायांना सुन्नींनी इ. स. ६८०मध्ये मारले होते); आणि शिया आणि सुन्नी यांच्यामधील संघर्षाबद्दल काय?

उर्दू लिपी ठेवून आपण ऐक्य प्रस्थापित करू शकत नाही.आपल्याला सर्व दिशांनी प्रगती करावी लागेल.

आशीर्वाद

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

९. सार्वजनिक सभेत भाषण

('दिल्लीमां गांधीजी'मधील आवृत्तीशी 'हिंदुस्तान टाईम्स'मधील मजकुराशी यात मेळ घातला आहे.)

पानिपत

डिसेंबर २, १९४७

पश्चिम पंजाबमधील बहुतेक निर्वासित असलेल्या सभेत बोलताना गांधीजी म्हणाले की पानिपतच्या या दुसऱ्या भेटीमुळे माझे फारसे समाधान झाले नाही. गांधीजींच्या आधीच्या भेटीत (नोव्हेंबर १०) तिथे राहणाऱ्या मुसलमानांनी गांधीजींना आश्वासन दिले होते की आम्ही मुसलमानांना पानिपतमधून जाऊ देणार नाही. मुसलमानांना पाकिस्तानमध्ये पाठवण्याची व्यवस्था पूर्ण झाली आहे हे गोपालकृष्ण अय्यंगार (१८८२- १९५३; काश्मीरचे प्रधानमंत्री, १९३७-४३; बिनखात्याचे मंत्री, भारत सरकार, १९४७-४८; संयुक्त राष्ट्र संघाला गेलेल्या प्रतिनिधी मंडळाचे नेते; रेल्वे आणि दळणवळण खात्याचे मंत्री आणि नंतर संरक्षण मंत्री) यांच्याकडून ऐकून ते दुखावले. मुसलमानांनी पाकिस्तानमध्ये जाऊ नये म्हणून हिंदू त्यांना समजावतील अशी त्यांना आशा होती. पानिपतमधील जे मुसलमान पूर्वी पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता उत्सुक नव्हते ते आता जाण्याकरिता का तयार झाले?

येथील शिबिरात असलेल्या सर्व मुसलमानांची जाण्याची इच्छा आहे. तुम्हांला इथे सर्व प्रकारचे संरक्षण मिळेल हे मी त्यांना सांगितले आहे. परंतु माणसाने सैन्याच्या आणि पोलिसांच्या संरक्षणावर विसंबून राहण्यापेक्षा ईश्वराच्या संरक्षणावर अवलंबून राहावे. समजा की तुम्ही जेवत आहा आणि तोंडात घास असताना मृत्यू आला तर कोणत्याही सैन्याचा वा पोलिसाचा वा डॉक्टरचा वा औषधाचा उपयोग होणार नाही. ईश्वराच्या हाती जीवनमृत्यूची सूत्रे कशी आहेत याचा जर आपण विचार केला तर सध्याचा विश्वासाचा आणि अविश्वासाचा संघर्ष संपून जाईल. माझ्या भावाला जर वेड लागले व त्याला मला मारायची इच्छा असेल तर मी वेड्याप्रमाणे का वागावे. वाईटाला वाईटाने उत्तर दिल्याने दोन्ही पक्षांचा अधःपात होतो. दुसऱ्याचा धर्म स्वीकारण्याची कोणावरही सक्ती करता येऊ शकत नाही.

धर्मपरिवर्तनाचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की पाकिस्तानमध्ये हिंदू आणि शीख यांचे धर्मपरिवर्तन करण्यात आले आहे. याच गोष्टीची इथे पुनरावृत्ती केली तर ते संस्कृती नाकारणे होई, मग माणुसकीची तर गोष्टच सोडा. अशा धर्मपरिवर्तनामुळे लोकांनी ना तर त्यांच्या धर्माचे नाव वाढवले ना

स्वतःचे. अशा प्रकारच्या कृत्याने लोक स्वतःचा अधःपात घडवून आणतात आणि ज्या देशाकरिता लोकांनी इतका स्वार्थत्याग केला त्या देशाचाही अधःपात घडवून आणतात.

आलेले स्वातंत्र्य इतके भयानक असेल अशी कोणी कल्पनाही केली नव्हती. परंतु ही ईश्वरी इच्छा होती. आपण जर आजच्या परीक्षेत उत्तीर्ण होऊ शकलो तर आपण फार वर जाऊ. शहरियार विचारतात की भारताला जर अपयश आले तर आमच्या देशाचे काय होईल? संपूर्ण आशियाचे डोळे आज आपल्यावर खिळलेले आहेत. जवाहरलालच्या रूपाने ईश्वराने आपल्या रत्न दिला आहे. संपूर्ण जगाला ते आवडतात. आपल्याजवळ सरदारसारखे पुढारी आहेत. या दोघांची जोडी अतूट आहे. त्यांचे एकमेकांशिवाय भागू शकत नाही. जवाहरलालमुळे जगात भारताचे नाव आहे. नाही तर भारताची कोणी कशाला फिकीर केली असती? परंतु तुमच्या सहकार्याशिवाय पंडित नेहरू आपले काम करू शकणार नाहीत. भारताचे नाव आपण बदनाम करू नये.

पश्चिम पंजाबमधील निर्वासितांना गांधीजी म्हणाले की तुम्हांला अपरिमित दुःख सहन करावे लागले हे मला माहीत आहे. हेसुद्धा खरे असू शकते की इथे राहत असलेल्या मुसलमानांची काही संपत्ती असू शकेल व त्या बळावर ते थोडीबहुत मजा करत असतील. परंतु तुम्हांला दुःख सहन करावे लागले म्हणून तुम्ही त्यांना त्यांच्या संपत्तीपासून वंचित करू नये. सर्व निर्वासित वाईट आहेत यावर माझा विश्वास नाही.

या शिबिरात २८,००० निर्वासित आहेत. ते सर्व चांगले असू शकत नाहीत. त्यांच्यात जर काही गुंड असतील तर तुम्ही तुमच्या प्रेमाने त्यांना चांगले करण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ते सर्व इथे भाऊभाऊ आहेत. यामुळे इथे सैन्याची गरज काय? एखाद्या कुटुंबात दोन भाऊ असतील तर पोलिसांनी त्यांचे रक्षण केले पाहिजे असा त्याचा अर्थ होतो काय? परस्परांचे रक्षण कसे करायचे हे शिकण्यात तुमची मुक्ती आहे. तुम्ही मुसलमान बंधूभगिनींकडे जायला पाहिजे व भारत सोडू नका अशी त्यांना विनंती केली पाहिजे. तुम्ही त्यांच्या घरावर जर लोभी नजर टाकली नाही तर हिंदू धर्म चिरंतन होईल अशी माझी खात्री आहे. जे काही घडले ते आपण विसरायला पाहिजे. केवळ यातच तुमचे कल्याण आहे. या म्हाताऱ्याचे अनुभवी बोल ऐकायचे असतील तर ऐका. आज तर माझा आवाज हा अरण्यरुदनाप्रमाणे झाला आहे. ते काहीही असले तरी जे सांगणे माझे कर्तव्य आहे असे मला वाटते ते मी सांगितले पाहिजे.

आज माझ्यात फार काळ जगण्याचा उत्साह नाही. एक काळ असा होता की रामराज्य आणण्याकरिता मला १२५ वर्ष जगावेसे वाटत होते. परंतु मला तुमचे सहकार्य नसेल तर मी एकटा काय करू शकतो?

गांधीजी पुढे म्हणाले की मुसलमानांजवळ शस्त्रे आहेत. हिंदू आणि शिखांजवळही शस्त्र असू शकतात. ते म्हणाले की हिंदू, शिख वा मुसलमान यांच्यापैकी कोणाजवळही जर शस्त्र असतील तर त्यांचा परवाना घेतलेला असला पाहिजे.

'दिल्लीमां गांधीजी - २', पृष्ठ १०-२ आणि 'द हिंदुस्तान टाईम्स' डिसेंबर ३, १९४७

---

१०. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी तुम्हाला सांगितले होते की मी पानिपतला जाईन. चार वाजता परतण्याचा माझा विचार होता. परंतु मी परतलो तेव्हा साडेपाच वाजून गेले होते. त्यानंतर ५ मिनीटही झाले होते, किमान तीन मिनीट तरी झालेच असतील. तेव्हा मला प्रार्थनेचा आवाज ऐकू आला. मी सांगितले होते की मी असो वा नसो प्रार्थना वेळेवर सुरू झाली पाहिजे. मग मी गेलो आणि हातपाय धुऊन ताजातवाना झालो. यामुळे उशीर झाला. याकरिता मी माफी मागतो.

पानिपतला जाण्यामागील उद्देशाची मी आधीच कल्पना दिली होती. पानिपतधील मुसलमानांना पाकिस्तानमध्ये जाण्यापासून परावृत्त करता येईल अशी मला आशा वाटत होती आणि अजूनही वाटते. असे झाले तर ही गोष्ट आपल्याकरिता चांगली असेल, संपूर्ण भारताकरिता चांगली असेल आणि ही गोष्ट जर भारताकरिता चांगली असेल तर पाकिस्तानकरिताही चांगली असेल.

तिथे असलेले पाकिस्तानमधून आलेले निर्वासित आज दुःखी आहेत, संकटात सापडले आहेत. व जोपर्यंत ते आपापल्या घरी परत जात नाहीत तोपर्यंत त्यांना अशा दुःखी अवस्थेतच इथे राहावे लागेल. याचप्रमाणे ज्या मुसलमानांना पाकिस्तानमध्ये पळून जाणे भाग पडले तर तेही तिथे असमाधानी असतील. याबद्दल तुम्ही शंका घेण्याचे कोणतेही कारण नाही.

मी तिथे गेलो हे चांगले झाले. असे करणे माझे कर्तव्य होते. डॉ. गोपिचंद भार्गव आले आहेत आणि गृहमंत्री सरदार स्वर्णसिंगही आले आहेत. डॉ. गोपिचंद येत आहेत याची मला मुळीच कल्पना नव्हती. माझी गरज असेल तर मी येतो असा निरोप सरदार स्वर्णसिंग यांनी मात्र नक्कीच पाठवला होता. मी त्यांना सांगितले की तुमची येण्याची आवश्यकता नाही, जे काही करायचे असेल ते मलाच करावे लागेल. तरीही ते आले. पूर्व पंजाब अखेरीस त्यांचा भाग आहे आणि यामुळे त्यांना येण्याचा अधिकार होता. देशबंधू गुप्तांनी निरोप पाठवला होता की त्यांची प्रकृती बरी नाही आणि त्यामुळे ते येऊ

शकणार नाहीत. मी कबूल केले, परंतु तेही तेथीलच असल्यामुळे तेसुद्धा आले. यानंतर मौलाना आहेत ज्यांना आपण इथे अनेकदा पाहतो. यानंतर मी लोकांशी बोललो. दोन मंत्री जरी तिथे हजर होते तरी मुसलमानांशी मी वेगळा बोललो. (पाहा मुसलमान प्रतिनिधीमंडळाशी चर्चा, डिसेंबर २, १९४७.) मंत्र्यांनी तिथे राहावे असे त्यांना वाटत होते कारण माझ्या सांगण्यात जे काही चांगले असेल ते मंत्र्यांना माहीत नसेल आणि मग ते करण्याकरिता मी त्यांना भाग पाडू शकणार नाही असे त्यांना वाटले. मुसलमानांनी कबूल केले की चर्चेच्या दरम्यान पाकिस्तानमध्ये न जाण्याचे आम्ही कबूल केले होते परंतु नंतर परिस्थिती अजूनच चिघळली व मी आश्वासिलेल्या दृष्टीने काहीही करण्यात आले नाही व आपल्याला त्रास देण्यात येतो असे त्यांना वाटू लागले, आपल्या अब्रूचे रक्षण होत नाही असेही त्यांना जाणवू लागले. त्यांची अब्रू, त्यांचे जीवन, त्यांची संपत्ती याचे रक्षण केले जाईल असे जर त्यांना वाटत नसेल तर ते कसे राहतील? ते म्हणाले की एकदा आमच्या घरांची तोडफोड झाली तर त्याचा आम्ही विचार करणार नाही, जाळपोळ झाली तर तीसुद्धा सहन करू, इतकेच नाही तर जीवावर बेतले तरी पर्वा करणार नाही परंतु शेवटच्या क्षणापर्यंत आम्ही आमच्या अब्रूचे रक्षण करू. ते जर असे करू शकतील तर ते थांबतील. मी त्यांना सांगितले की जो मानवजातीवर प्रेम करतो तो ईश्वरावर प्रेम करतो. त्याला भिण्यासारखे काहीही नसते.

यानंतर मी तेथील निर्वासितांशी बोललो (पाहा जाहीर सभेत भाषण, डिसेंबर २, १९४७). ते संपले तेव्हा साडेतीन वाजले होते. मी येथून साडेदहा वाजता निघालो होतो व तिथे जवळपास साडे अकरा वाजता पोहोचलो होतो. मुसलमानांशी ३ वाजेपर्यंत माझी चर्चा सुरू होती. तिथे चर्चेकरिता बरेच काही होते. नंतर मी निर्वासितांशी बोललो. माझ्यानंतर डॉ. गोपिचंद भार्गव त्यांच्याशी बोलले. परंतु सरदार स्वर्णसिंग बोलायला उभे राहिले तेव्हा तिथे गोंधळ सुरू झाला. लोकांनी आरडाओरड सुरू केली. असे त्यांनी त्यांचा अपमान करण्याकरिता केले नव्हते तर स्वतःवर नियंत्रण न ठेवल्यामुळे लोकांनी असे केले होते. त्यांनी बोलण्याचे साहस केले हे पाहून ते संतापले होते.

तो फार मोठा जमाव होता. तिथे वीसेक हजार लोक तरी असावे. मैदान पूर्ण भरले होते. रस्त्यांवरही लोकांची गर्दी होती. त्यांनी माझे बोलणे शांतपणे ऐकून घेतले. परंतु इतरांनी सुरुवात केली तेव्हा लोक उभे राहिले. आपल्या रागाला वाट करून देण्याची आपली रीतच आहे. ते उभे राहिले आणि मुसलमानांना काढून टाका अशा घोषणा देऊ लागले. मी त्यांना सांगितले की मुसलमानांना बाहेर काढणे बरोबर नाही. इथे त्यांची घरे आहेत व त्यांना बळजबरीने ती सोडायला लावणे बरोबर नाही.

मुसलमानांना आपण बळजबरीने जायला लावले तर आतापर्यंत आपण जे केले त्यावर पाणी फिरेल. मी माझ्या जागेवर बसायला तयार होतो. परंतु सरदार स्वर्णसिंग अशा प्रकारे दबून जाणारांपैकी गृहस्थ नव्हते. ते गृहमंत्री होते. ते म्हणाले की हे असे चालणार नाही. त्यांनी बोलण्याचा प्रयत्न केला परंतु त्यात त्यांना यश आले नाही. लोकांची आरडाओरड आणि उभे राहणे सुरूच होते. मग त्यांचे प्रतिनिधी, त्यांचे पुढारी पुढे आले. त्यांनी पंजाबीमधील भजनाला सुरुवात केली आणि त्यांना सांगितले की स्वर्णसिंग तुमचे प्रतिनिधी आहेत आणि तुम्ही त्यांचे ऐकायलाच पाहिजे. मग स्वर्णसिंगांनी त्यांची पंजाबीत खरडपट्टी काढली आणि सांगितले की मी तुमचा प्रतिनिधी आहे, तुम्ही माझे ऐकायलाच पाहिजे, तुमच्या आरडाओरडीने काहीही साध्य होणार नाही. सभेत गोंधळ घालून तुम्ही काय साध्य करणार आहा? यामुळे तुमची केवळ हानीच होईल. अखेरीस जमावाला शांत करण्यात आले. परंतु त्याकरिता काही करावे लागले. लोक बसले आणि पंजाबीत सभेचे कामकाज सुरू झाले.

मला पंजाबीत बोलता येत नाही परंतु मला ती समजते. (सरदार स्वरणसिंग) जे म्हणाले ते मला आवडले. मुसलमान पुढाऱ्यांना त्यांनी सांगितले की पाकिस्तानमध्ये काहीही झाले तरी आम्ही अमानवीय होणार नाही. ते म्हणाले की आपले लोकशाहीवादी सरकार आहे व इथे अशा प्रकारच्या घटना घडू देता येऊ शकत नाहीत. जर एकाही मुसलमान मुलीचे अपहरण करण्यात आले असेल तर काहीही करून तिला परत करण्यात येईल. याकरिता मदत निश्चितच लागेल कारण अपहृत मुलगी कुठे आहे हे त्याशिवाय कळणार नाही. परंतु ती कुठे आहे हे कळले तर तिला परत केले जाईल. शिवाय ज्या मुसलमानांचे हिंदू धर्मात वा शीख धर्मात धर्मपरिवर्तन करण्यात आले आहे त्यासंबंधीही काम करायचे आहे. ते अजूनही मुसलमान आहेत. अशा प्रकारचे धर्मपरिवर्तन कायदेशीर म्हणून मान्य केले जाणार नाही कारण ते नैतिकतेविरुद्ध आहे. पाकिस्तानमधील हिंदूंचे संरक्षण होते की नाही याचा विचार न करता इथे असलेल्या मुसलमानांचे काहीही करून रक्षण केले जाईल. अर्थातच जीवित आणि वित्त यांचे रक्षण करणे कठीण असते. इथे पोलीस आहेत, सरकार आहे - त्यांना जे काही शक्य असेल ते ते करतील. परंतु प्रत्येकजण जर लूटमार करू लागला तर प्रत्येकाला गोळी तर मारता येत नाही. सरकार असहाय होते. आपले स्वातंत्र्य पांगळे झाले आहे आणि आम्ही आमची असहायता कबूल केली पाहिजे. लोकांना आम्ही विनंती नक्कीच करू शकतो परंतु आम्हांला आमची असहायता कबूल करावीच लागेल. लोकांची समजूत घालण्याचा ते आटोकाट प्रयत्न करत होते. त्यांची समजूत घालत ते

म्हणाले की भारताची अब्रू आणि प्रतिष्ठा तुमच्या हातात आहे व हे सरकार तुमचे आहे कारण मंत्र्यांना तुम्ही निवडून दिले आहे. आणि हे सरकार तुमचे असल्यामुळे ते आपले कर्तव्य पार पाडील, जे करणे आवश्यक आहे ते ते करील व या सरकारला तुम्ही मदत केली पाहिजे. त्यांनी हे सर्व स्पष्ट करून सांगितले. त्याकरिता बराच वेळ लागला. अखेरीस सभा शांत झाली. नेहमी असेच होत असते. लोक जेव्हा अस्वस्थ होतात, संतापतात तेव्हा मी पाहिले आहे की थोड्या वेळाने शांत झाल्यानंतर ते जेव्हा विचार करू लागतात तेव्हा त्यांना हे सर्व कळू लागते. मी जेव्हा स्वातंत्र्याकरिता लढा देत होतो तेव्हाही असेच होत होते. अशीही वेळ यायची की सभा संपल्याचे घोषित करावे लागेल असे वाटायचे. परंतु नंतर लोकांची समजूत पटायची. नंतर त्यांचे प्रतिनिधी आले. मी म्हणालो की तुम्ही माझ्या मागे या. त्यांना जर गाडीत घेतले नसते आणि मी तिथेच बसलो असतो तर वेळेवर पोहोचू शकलो नसतो. अजून वेळ लागता असता. मी मिनिटामिनिटाचा हिशेब ठेवला नसता तर इथे वेळेवर पोहोचलो नसतो.

मी आराम करणे सोडून दिले आहे. सर्व दुःखी आहेत मग मी काय आराम करू? त्यांच्यापेक्षा तर मी किती तरी आरामात आहे. ते मला सांगत होते की इथे जे निर्वासित आहेत ते फार दुःखी आहेत. काही तर झाले आहे, जसे मी पाहिले तसेच आहे असे नसेलही. काहींची तर सोय झाली आहे. काही छत लावण्यात आले आहेत. आता ते तंबूतच राहतील. खायचे जसे असायला पाहिजे तसे नाही. पूर्व पंजाबच्या राज्यपालांनी (एल. सी. त्रिवेदी) पाहिले आणि कबूल केले की असे तर असायला नको. कपड्यांबद्दल असे होते की जे चांगले कपडे असतात ते आतूनच काढून घेतले जातात. कोण काढून घेतो ते मी काय सांगू? ते मी सोडून देतो. परंतु नंतर निर्वासितांना फाटकेतुटके कपडे मिळतात. असे व्हायला नको. जी गोष्ट त्यांच्याकरिता पाठवण्यात येते ती त्यांनाच मिळाली पाहिजे. तिथे लोक मरतातसुद्धा. मेलेल्या दोन लोकांच्या दहनाकरिता लाकूडच मिळाले नाही. सर्व दिवस गेला. कोणी डॉक्टर महोदय आहेत. त्यांचे नाव विसरलो. त्यांच्या हाती ही व्यवस्था आहे. ते एका ठिकाणी भेटले नाही, दुसऱ्या ठिकाणी गेले तर तिथेही भेटले नाही, तिसऱ्या ठिकाणी गेले तर तिथेही भेटले नाही. अशा प्रकारे पूर्ण दिवस गेला. सात वाजून गेले होते. लाकडाची कोणतीच व्यवस्था न झाल्यामुळे त्यांच्यापैकी काही लोक एकाच्या नातलगांकडे गेले. ते म्हणाले की लाकडाची व्यवस्था झाली नाही म्हणून काय झाले. आठआठ आणे देऊ. असे केल्याने १० ते १५ रुपयांची व्यवस्था होऊन जाईल. परंतु तो नातलगही करारी माणूस होता. त्यांने दान घेण्याला नकार दिला. तो म्हणाला की लाकूड नसेल तर मी

प्रेताचे दफन करीन. हिंदू दफन करत नसातात परंतु त्याने दफन केले. असे व्हायला नको होते. मला वाईट वाटले.

नंतर मला सांगितले की कोणतीही गोष्ट असली तरी ती श्रीमंत निर्वासितांना मिळून जाते परंतु गरिबांना मिळत नाही कारण ही व्यवस्था अधिकाऱ्यांच्या हाती नाही. आणि या कामाकरिता माणसेसुद्धा कसे आणि किती ठेवणार? तिथे जे लोक होते ते त्यांच्यातूनच घेतले होते व प्रत्येक गोष्ट त्यांच्यामार्फत केली जात असे. ते जर चांगले असतील, स्वार्थी नसतील आणि सेवेला वाहून घेणारे असतील तर सर्व काही सुरळीत होते. परंतु त्यांच्यात सेवाभावना नसेल तर हे काम कठीण होते. मला सर्व गोष्ट जाहीरपणे करणे आवडते. आम्ही मारपीट करायला नको कारण यामुळे वातावरण विषारी होते. आपल्याजवळ दुसरा उपाय आहे. स्पष्ट बोलायला पाहिजे. लपवल्याने काही फायदा होत नाही. मी तर म्हणेन की जी गोष्ट जशी आहे तशी सांगितली पाहिजे. जे वाईट करतात त्यांच्यावर आरोप केला तर त्यात वाईट काय आहे? दोष देण्यासारखे काही असेल तर दोष दिलाच पाहिजे. माणसाने वाईटाला वाईट म्हटलेच पाहिजे. असे समजूनच मी सांगतो की ही गोष्ट वाईट आहे. आपण आधीच दुःखी आहो. हजारो हजारो लोक त्यांच्या घरातून विस्थापित झाले आहेत आणि इथे आले आहेत. आणि आपण जर असे करू लागलो तर ती दुःखाची गोष्ट आहे. आज मला एक मुलगा भेटला. त्याने स्वेटर घातलेला होता. ते काढून तो उभा राहिला. माझ्याकडे डोळे वटारून पाहत होता. जणू खाऊन टाकेल. परंतु मुलगा होता, काय करू शकत होता? तो म्हणाला, "तुम्ही म्हणता की तुम्ही आमचे रक्षण करायला आला. परंतु माझे वडील मारले गेले आहेत. माझे वडील परत आणून द्या." परंतु त्याचे वडील मेलेले होते. त्यांना मी परत कसा आणणार? मुलगा संतापला होता. मी त्याच्या वयाचा असतो आणि त्याच्या परिस्थितीत असतो तर त्याला काय वाटते याची मला कल्पना येऊ शकली. त्यावेळी मी कदाचित असेच केले असते. मला राग आला नाही, दया वाटली.

आज अशी दृश्ये पाहायला मिळाली. निर्वासितांचे म्हणणे आहे की आमच्यातील सर्वच वाईट नाहीत. आमच्यापैकीच काही लोकांकडे व्यवस्थापकाचे काम देण्यात यावे. अखेरीस मॅजिस्ट्रेट वगैरे आमच्यावर देखरेख करण्याकरिता आहेतच. इतर लोकांवरही लक्ष ठेवावेच लागत असते. कांबळी वाटायची असतील तर आम्हांला द्या, मुलांना दूध मिळायला पाहिजे परंतु मिळत नाही. ते तर वरच्या अधिकाऱ्यांकरिता आहे. ते अथवा सेवाभावना असलेल्या लोकांची जी समिती तयार करण्यात आली

आहे त्यांनी ते दूध पिण्यापेक्षा आम्ही प्यालो तर काही वाईट नाही. चोरी होत असेल तर काय, जसे करतील तसे भरतील. वरून ते म्हणतात की इतर ठिकाणच्या निर्वासितांनीही आम्हांला चिठ्ठ्या लिहायला सुरुवात केली आहे. चिठ्ठ्यांमध्ये ते म्हणातात की महात्म्याला सांगा की आमचेही काही ऐका. ते सांगत होते की चिठ्ठ्यांमध्ये अशा अशा गोष्टी लिहिल्या आहेत. मी गेलो ते चांगलेच झाले. मी त्यांना सांगितले की तुम्ही शांततेने राहिलात आणि मुसलमानांना सांगा की तुम्ही आमचे भाऊ आहा, तुम्ही इथेच राहा. पानिपतमध्ये अनेक लढाया झाल्या आहेत परंतु तुम्ही इथेच राहिलात तर ही सर्वात चांगली गोष्ट होईल.

या शिबिरात २८,००० निर्वासित राहतात. मी त्यांना सांगितले, "दुसरे येतात म्हणून काय झाले? तुम्हाला जेवायला मिळाले, अंथरुणापांघरुणाकरिता कापड मिळाले आणि घालण्याकरिता कपडे मिळाले, छत किंवा तंबू मिळाले तर पुरे आहे. कुठेही राहिलात तरी अजून चौथी गोष्ट तर मिळणार नाही."

या तीन गोष्टींच्या मदतीने तुम्ही अनेक गोष्टी निर्माण करू शकता. संपूर्ण भारतात काय होत आहे, कोणत्या समस्या निर्माण होत आहेत व त्या कशा सोडवायच्या हे तुम्हांला माहीत असले पाहिजे. सरकार इथे आहे परंतु सरकार काही करण्याकरिता तुमच्यावर बळजबरी तर करू शकत नाही." काल जवाहरलालनी फार सुंदर गोष्ट सांगितली. आज मी ती वृत्तपत्रांमध्ये पाहिली. आज पाहिले. रोज तर वृत्तपत्रांमधून पाहायची संधी मिळत नाही. जवाहरलाल म्हणतात की मला प्रधानमंत्री म्हणतात तेव्हा मला ती गोष्ट बोचते. मी प्रधानमंत्री कधी झालो होतो? हं, मी देशाचा पहिल्या क्रमांकाचा सेवक आहे असे म्हटले तर मला आवडेल. सर्व जर असे पहिल्या क्रमांकाचे सेवक झाले तर ते चोवीस तास जनतेचा विचार करू लागतील. आणि मग त्यांच्या हाताखालील लोकही असा विचार करतील तर आपला देश सुवर्णभूमी होईल. मग या भूमीवरच रामराज्य म्हणजे देवाचे राज्य निर्माण होईल. मग आपले स्वातंत्र्य पूर्ण होईल. स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही आज आपण जसे वागतो तसेच वागत राहिलो तर हे स्वातंत्र्य मला बोचेल. अशा प्रकारचेच स्वातंत्र्य आपल्याला पाहिजे काय? नाही, असे होऊ शकत नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १५४-९

---

११. लीलावती आसर यांना पत्र

डिसेंबर ३, १९४७

चि. लीली,

मला तुझी दोन पत्रे मिळाली. एका पत्रात तू म्हणतेस की द्वारकादासची प्रकृती पूर्णपणे चांगली झाली आणि दमयंतीसुद्धा चांगली आहे. तर दुसऱ्या पत्रात तू म्हणतेस की अजून एका शस्त्रक्रियेची आवश्यकता असू शकते. तुला कुठे तरी खोली मिळेल अशी आशा आहे.

सोबत १०० रुपयांची हुंडीचिठ्ठी आहे. (पाहा पुढील विषय.) तू कुठून तरी १०० रुपये उसने घेऊ शकत नाही काय? धनाकर्ष पाठवतानासुद्धा मी कचरतो. तुझ्या रुग्णालयात तो वटवण्याची सोय नसेल तर त्याकरिता तुला किती दूर जावे लागेल?

तू नियमितपणे मेहनत कर आणि परीक्षेत उत्तीर्ण हो. असे झाले की संघर्ष संपेल. खरे सांगायचे तर एकदा आपण एखादी गोष्ट करायची असे ठरवले की संघर्ष संपून जातो, तो केवळ खेळ राहतो.

जेष्ठमधाच्या गोळ्या मिळाल्या, तू त्याकरिता वेळ वाया घालवला. परंतु आता मी त्याच जास्त वापरेन आणि लवंग क्वचित.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१२. बछराज आणि कंपनीला पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर ३, १९४७

प्रति,

बछराज आणि कंपनी,

औषधी विज्ञानात शिकत असलेल्या लीलावती उदेशी यांना १०० रुपये (शंभर रुपये केवळ) द्या आणि ते माझ्या सार्वजनिक हिशेबात लिहा.

मो. क. गांधी

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१३. राईट लेफ्टनंट जनरल के. एम. करिअप्पा यांच्याशी चर्चा

('महात्मा गांधी - द लास्ट फेज' आणि 'दिल्लीमां गांधीजी' या दोघांचा समन्वय करून हा वृत्तांत तयार केला आहे.)

नवी दिल्ली,

डिसेंबर ३, १९४७

गांधीजी त्यांच्याकडे वळले आणि स्मितहास्य करत म्हणाले -

तुम्ही या वेळीसुद्धा जोडे बाहेर काढले. तुम्ही दोन दिवसांपूर्वी आला होता तेव्हाही असेच केले होते. (पाहा लेफ्टनंट जनरल के. एम. करिअप्पा यांना चिठ्ठी, डिसेंबर १, १९४७)

सेनापतींनी उत्तर दिले *:* "तुमच्यासारख्या ईश्वरसदृश माणसाला भेटायला येत असताना असे करणे उचितच आहे. "

पोलीस आणि सैन्यातील लोकांबद्दल मला अनेक तक्रारी मिळत आहेत. ते लाच घेतात आणि आपल्या जातीच्या वा धर्माच्या लोकाकरिता पक्षपात करतात. जर बियाणे वाईट असेल तर रोपट्याचे आणि आणि त्याच्या पानाफुलांचे काय होईल? मग काटेसुद्धा उगवणार नाहीत. सैन्य आणि पोलीस हे देशाचे शक्तिशाली अवयव आहेत. देशाच्या फळणीनंतर सैन्याचेही सांप्रदायिक तत्त्वावर विभाजन करावे लागले हे दुर्दैव आहे. परंतु जात वा संप्रदाय पाहून पक्षपात न करणे पोलिसांचे कर्तव्य आहे. त्यांनी तर देशाची प्रामाणिकपणे सेवा केली पाहिजे. प्रत्येक अल्पसंख्याकाचे रक्षण करणे हे प्रत्येक सैनिकाचे कर्तव्य आहे. पाकिस्तान माझ्या शब्दांकडे लक्ष देणार नाही, परंतु संघराज्याचे तुम्ही सेनापती माझे ऐकाल आणि मदत कराल तर आम्हांला खरोखरच अहिंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळाले यावर मी विश्वास ठेवीन. अशा स्वातंत्र्याला आपण पात्र ठरू या. देशातील लोकांनी अद्भुत पद्धतीने स्वातंत्र्य मिळवलेले असल्यामुळे पोलिसांनी आणि सैनिकांनी शुद्ध आणि निष्पक्ष राहिले पाहिजे.

भारतीय राष्ट्रीय सैन्याचे जनक नेताजींनी या ऐक्याचे किती सुंदर उदाहरण आपल्यासमोर उभे केले होते; "हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी आणि इतर सर्वांनी भारत आपला देश आहे असे समजावे व त्याच्याकरिता एक होऊन काम करावे." त्यांनी हे ऐक्य आपणा सर्वांना सिद्ध करून दाखवले.

प्रश्न - पाकिसातनला अहिंसेचा उपयोग नाही. मग आपण त्यांचे अंतःकरण कसे जिंकणार? अहिंसेचे सामर्थ्य कसे पटवणार?

हिंसेवर केवळ अहिंसेनेच विजय मिळवता येऊ शकतो. दोन आणि दोन मिळून चार होतात हे समीकरण माझ्याकरिता जितके स्पष्ट आहे तितकीच ही गोष्टही माझ्याकरिता स्पष्ट आहे. परंतु याकरिता माणसामध्ये श्रद्धा असली पाहिजे. इतकेच नाही तर अण्वस्त्रासारखे शस्त्र जरी अहिंसेसमोर आले तरी तेसुद्धा अहिंसेसमोर निरर्थक ठरेल. ही गोष्ट खऱ्या अहिंसेला लागू आहे. परंतु या चिरंतन सत्याचे आकलन फार कमी लोकांना झाले आहे. केवळ श्रद्धा असून उपयोग नाही. त्याला ज्ञानाची जोड पाहिजे. सैनिकी शाळांत वा संस्थांत ज्या प्रकारे शस्त्रांचे प्रशिक्षण दिले जाते त्या प्रकारचे अहिंसेचे प्रशिक्षण नसते. त्याकरिता अंतःकरणाचे पावित्र्य आणि आत्मशक्ती पाहिजे. हिंसेच्या विरोधात अहिंसेला उभी करत असताना आपल्याला जाणवत असलेली अडचण आपल्या अंतःकरणाची दर्शक असते. काही दिवसांपूर्वी जिनासुद्धा म्हणाले होते की राजकीय मतभेदांमध्ये हिंसा टाळली जावी. (पाहा एक संयुक्त आवाहन, एप्रिल १२, १९४७.) जिना जे म्हणतात ते जर खरे असेल तर आपल्या चोहोकडे आज जी हिंसेची आग पेटली आहे ती विझवायला फारसा वेळ लागायचा नाही. आणि पाकिस्तान जर हिंसा थांबवणार नसेल तरी संघराज्यातील हिंदूंचा जर अहिंसेवर विश्वास असेल तर हिंसक हत्या आपण थांबवू शकतो. अहिंसेच्या उपासकाच्या मनात हिंसेचा विचार वा कल्पनासुद्धा यायला नको. मग तो हिंसक वर्तन कसा काय करू शकतो?

सेनापती म्हणाले : "....आपल्याजवळ जर सैन्य असेल तर . . .ते चांगले असले पाहिजे. . . . मी त्यांना . . . माझ्या पद्धतीने अहिंसेची गरज आणि मूल्य समजावून सांगेन. सैनिकांच्या कर्तव्यात हेळसांड होणार नाही अशा प्रकारे अहिंसेची ही भावना सैनिकांसमोर कशी ठेवावी हे कृपा करून मला सांगा. या बाबतीत मी अबोध मुलासारखा आहे. मला तुमचे मार्गदर्शन हवे आहे."

गांधीजी हसले. अजूनही ते चरखा फिरवत होते. ते थांबले, सेनापतींकडे पाहिले आणि म्हणाले:

होय... तुम्ही सर्व मुले आहात, मीसुद्धा मूल आहे. परंतु तुमच्यापेक्षा मी मोठा मुलगा आहे. तुम्हा सर्वांपेक्षा या प्रश्नाचा मी जास्त विचार केला आहे. तुमच्या सैन्यासमोर अहिंसेची आवश्यकता कशा प्रकारे मांडावी हे स्पष्ट व रोखठोक शब्दांत सांगा असे तुमचे म्हणणे आहे.

याचे उत्तर देण्याकरिता अजूनही मी अंधारात चाचपडतो आहे. ते उत्तर मला सापडले की मी ते तुम्हाला सांगेन.

त्यानंतर गांधीजींनी त्यांना सांगितले की लॉर्ड वेव्हेल आणि लॉर्ड माऊंटबॅटन सारख्या कुशल, अनुभवी आणि व्यावसायिक सैनिकांनीसुद्धा अहिंसेच्या उपयोगीतेबद्दलची आपली अतूट श्रद्धा व्यक्त केली होती. ज्या प्रकारे हिंदू-मुसलमानांचा प्रश्न सोडवण्याचा आपण प्रयत्न करतो आहो त्याने लॉर्ड वेव्हेल फार प्रभावित झाले होते. त्यांना आशा आहे की आपला शांतता आणि अहिंसेचा सिद्धांत जगाला नक्कीच कळेल आणि आंतरराष्ट्रीय प्रश्न सोडवण्याकरिता जग त्याचा उपयोग करील.

त्याचबरोबर त्यांचे असेही म्हणणे होते की आपण आत्मरक्षणाकरिता नेहमी तयार राहिलो पाहिजे. निरोप देताना गांधीजी परत म्हणाले -

येत्या काही दिवसांत याचा मी गंभीरपणे विचार करीन आणि तुम्हाला लवकरच कळवीन. आपण यापेक्षा वारंवार भेटू म्हणजे आपल्याला या महत्त्वाच्या प्रश्नावर विचारविनिमय करता येईल.... मला सैन्यातील शिस्तीचे नेहमीच कौतुक वाटत आले आहे तसेच तुम्ही सैनिक साफसफाईआणि आरोग्याची जी काळजी घेता ती गोष्टही मला महत्त्वाची वाटते. या बाबतीत सैन्याचे अनुकरण करण्याकरिता मी माझ्या भाषणातून सांगत असतो.

'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड २, पृष्ठ ५२४-५ आणि 'दिल्लीमां गांधीजी - २', पृष्ठ १३-१५

---

१४. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला अनेक लोक भेटायला येतात. ते सांगत असलेली प्रत्येक गोष्ट मी तुम्हांला सांगत नसतो. एखादी गोष्ट पुरेशा महत्त्वाची असली तर तेवढी मी तुम्हांला सांगत असतो. आजही काही लोक मला भेटायला आले होते. असे वाटते की त्यांना प्रधानमंत्र्यांशी काही काम होते. त्यांचे म्हणणे आहे प्रधानमंत्र्यांनी काही दिवसांपूर्वी वचन दिले होते, परंतु आता ते त्या वचनापासून माघार घेत आहेत. असे कसे म्हणून मी त्यांना विचारले. ते म्हणाले की आमच्याजवळ पत्र आहे. मी त्यांना पत्र दाखवायला सांगितले. अखेरीस त्यांच्यापेक्षा माझ्याजवळ कोणतेही वेगळे अधिकार नाहीत मी काही सरकार नाही. होय मी प्रधानमंत्र्यांचा सेवक, मित्र, सहकारी आहे आणि म्हणून मी त्यांच्याशी बोलू शकतो. परंतु हे मी त्यांना कसे सांगू? मग मी विचार करू लागलो की आम्ही बोलतो एक आणि करतो वेगळे असे का होते? मला हे सर्व सहन करावे लागते. मला असे वाटते की मी समजूनउमजून कधी कोणाची फसवणूक केलेली नाही. हं, असे होऊ शकते की माणसाला माहिती नाही, तो सद्भावनेने म्हणाला असावा, हेतू वाईट नसावा तर अशा गोष्टीला धोका मानायचा काय? दुःख मानायचे तर अशा अनेक दुःखद गोष्टी आहेत. अनेक गोष्टी आपण नकळत करतो आणि त्यामुळेही वचनभंग होतो. परंतु कोणी जाणूनबुजून वचनभंग करत असेल तर ती वाईट गोष्ट आहे. असे व्हायला नको. कधीही एक शब्दसुद्धा बोलू नये आणि जर बोललो तर त्याप्रमाणे काम करायला पाहिजे. आपण असे करू तेव्हाच एकवचनी होऊ शकतो. आणि आता आपण स्वतंत्र झालो व संपूर्ण देशाचा कारभार आपल्याला करायचा आहे तर आपण अतिशय सावधगिरीने काम केले पाहिजे. आपण संयम, विवेक आणि नम्रतापूर्वक काम केले पाहिजे. आपण उद्धटपणा करायला नको. असे केले तर आपले काम यशस्वी होऊन शेवटापर्यंत पोहोचेल. असे झाले तर कोणीही आपल्यावर विश्वासघाताचा आरोप करणार नाही. आपण जर म्हणू की अमूक गोष्ट तुम्हांला फुकट देऊ आणि नतर त्या गोष्टीकरिता आपण नाममात्र किंमत जरी आकारली तरी तो विश्वासघात होईल. आज आपली परिस्थिती अशी झाली आहे की आपल्यालाच आपल्या

शब्दाची किंमत वाटत नाही. एक दिवस आपण वचन देतो आणि दुसऱ्या दिवशी आपण ते मोडतो. मी जर तुम्हांला उद्या दुपारी ४ वाजता भेटायचे कबूल केले परंतु त्यावेळी जर मी नृत्याचा कार्यक्रम पाहायला गेलो तर तो विश्वासघात होईल. म्हणून मी म्हणतो की आपण फार काळजीपूर्वक वागलो पाहिजे. आपण आपल्या शब्दावर ठाम राहिलो पाहिजे, आपल्या शब्दाचा उच्चार करण्यापूर्वी आपण त्यावर विचार केला पाहिजे. आवेगाच्या भरात आपण काहीही बोलू नये. उदाहरणार्थ आपण म्हणू की तिथे दंगल सुरू आहे आणि मग त्यात रंग भरण्याकरिता तिथे खून झाला असे आपण म्हणतो. अशी गोष्ट फार काळ लपत नसते. अखेरीस सत्य बाहेर येतेच. म्हणून आपण काळजीपूर्वक वागलो पाहिजे.

सिंधमधील एक डॉक्टर मला लिहितात की तिथे जितके हरिजन राहिले आहेत त्यांची परिस्थिती अतिशय वाईट आहे. (चोईथराम गिडवाणी यांनी डॉ. भि. रा. आंबेडकर यांना लिहिलेल्या पत्रानुसार सिध आणि बलुचिस्थानमधील हरिजनांना आवश्यक सेवा अध्यादेशानुसार भारतात स्थलांतर करण्यापासून अडवण्यात येत होते.) सवर्ण हिंदू निघून आल्यानंतर केवळ हरिजन तिथे राहिले तर असे म्हणतात की तिथे त्यांना मरावे लागेल वा मरावे लागले नाही तर आयुष्यभर गुलामीत राहावे लागेल. त्याच्यासमोर तिथे जिवंत राहण्याचा एकमेव उपाय संपूर्ण गुलामगिरी स्वीकारणे वा इस्लाम स्वीकारणे हाच असेल. ही वाईट परिस्थिती आहे. आज परिस्थिती अशी आहे की पाकिस्तान सरकार काही म्हणाले तरी त्यांच्या हाताखालील अधिकारी त्या आदेशांचे पालन करत नाहीत. हीच परिस्थिती भारतातसुद्धा आहे. जवाहरलाल आणि सरदार म्हणतात की आम्ही मुसलमानांचे रक्षण करू, एकाही मुसलमानाला पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता भाग पडावे अशी आमची इच्छा नाही. परंतु असे घडत नाही. ते जे म्हणतात त्याचे पालन करवून घेण्याकरिता त्यांच्याजवळ लोक नाहीत. त्यांच्या हाताखालील लोक त्यांच्या इच्छेप्रमाणे चालत नाहीत व लोकांनाही त्याचे काही वाटत नाही. काल मी तुम्हाला सांगितले होते की मी पानिपतला गेलो होतो. तिथे आलेल्या हिंदूंची आणि शिखांची दयनीय अवस्था आहे. त्यांच्याशी पाकिस्तानमध्ये दुर्व्यवहार करण्यात आला होता आणि त्यांना पळून येणे भाग पडले. ते आले कारण त्यांच्यावर अत्याचार होत होता. असे नसते तर त्यांना पळून येण्याची गरज काय होती? अत्याचारामुळे पळून यावे लागलेल्या या लोकांना इतरांचीही तशीच अवस्था व्हावी असे वाटते काय? परंतु असे घडत आहे. मग मी पाकिस्तानविरुद्ध तक्रार कसा काय करू शकतो? परंतु मला असे करावे लागते. पत्रलेखकाने सविस्तर लिहिले आहे. ते म्हणतात की एकाही हरिजनाला सिंधमध्येच राहायचे नाही. त्यांना जरी एका ठिकाणी एकत्र राहायचे

असले तरी त्यांना शांततेत राहू दिले जात नाही. त्यांच्याकडून वेठबिगारी करवून घेतली जाते. त्यांना संडास साफ करणे, झाडझूड करणे आणि इतर काम सांगितले जातात. आज भंग्यांवर संडास सफाईची बळजबरी करण्यात येऊ नये. तो जर बॅरिस्टर होऊ शकत असेल तर त्याला का अडवण्यात यावे? त्यांचे काम संडाससफाई आहे असा आग्रह आपण का धरावा? त्यांना त्यांच्या प्रवृत्तीप्रमाणे काम करण्याची मुभा असली पाहिजे. तुम्ही इस्लामचा स्वीकार कराल तरच इथे राहू शकाल असे जर त्यांना सांगण्यात आले असेल तर ते काय करू शकतील आणि कुठे जाऊ शकतील? जगजीवन राम (एप्रिल ५, १९०८-जुलै ६, १९८६; अखिल भारतीय दलित वर्ग संघाचे अध्यक्ष १९३६-४६; मध्यंतरकालीन सरकारमध्ये मजूरमंत्री; नंतर रेल्वे, अन्न आणि शेती, व संरक्षण अशा महत्त्वाच्या खात्याचे केंद्र सरकारमध्ये मंत्री) यांनी काढलेले लांब वक्तव्य तुम्ही पाहिले असेल. ते म्हणतात की सिंधमधून हरिजनांनी निघून यायलाच पाहिजे. त्यांना जर यायचे असेल तर त्याकरिता त्यांना व्यवस्था उपलब्ध करून दिली पाहिजे. जोपर्यंत ते पाकिस्तानमध्ये आहेत तोपर्यंत त्यांना आपले काम कोणताही अडथळा न आणता करू दिले पाहिजे आणि ते शक्य नसेल तर त्यांना येऊ दिले पाहिजे. तसे जर करू दिले नाही तर हिंदू आणि शिखांच्या मनावर याचा कायम ठसा राहील. भारत आणि पाकिस्तान हे जरी दोन देश असले तरी आपण एकमेकांना विसरू शकत नाही. आपल्याला सौजन्यपूर्वक वागणे शिकायचे आहे. आपण कोणालाही दुखवता कामा नये. आपण कोणालाही मुसलमान होण्याकरिता बाध्य करू नये. कोणाच्या बायकोची वा मुलीची अब्रू घेऊ नये वा त्यांचे अपहरण करू नये. डॉ. गोपिचंद भार्गव आणि सरदार स्वर्णसिंगसुद्धा काल म्हणाले होते की भारत अशा गोष्टी सहन करू शकत नाही. आज परिस्थिती अशी काही झाली आहे की एखाद्या मुसलमानाने मी स्वतःहोऊन हिंदू धर्म स्वीकारला असे म्हटले तरी ते खरे आहे असे मान्य करता येऊ शकत नाही. हरिजन हे मुसलमानेतर आहेत. ते जर म्हणत असतील की आम्ही इस्लामचा स्वीकार केला तरी ते मान्य करता येऊ शकत नाही. ते असे म्हणतात कारण त्यामागे केवळ भीती असते. अशा प्रकारचे सर्व धर्मपरिवर्तन रद्दबातल ठरवण्यात यावे.

काठेवाडमधून परस्परविरोधी वृत्त येत आहे. काही वृत्त सांगतात की वर्णन केल्याप्रमाणेच काठेवाडमधील परिस्थिती वाईट आहे. त्या आशयाची तार आजच आली. इतर अहवाल काँग्रेसच्या सूत्रांकडून आलेले आहेत व ते म्हणतात की परिस्थिती अशी नाही. हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ म्हणतात की आम्ही कोणाचेही घर जाळले नाही. मी कोणाचा अहवाल खरा आहे असे

समजू? मी काँग्रेस व मुसलमानांवर विश्वास ठेवावा की हिंदू महासभा व राष्ट्रीय स्वयंसेवक संघावर? सत्य काय आहे हे कळणे फार कठीण झाले आहे. जर चुका झाल्या असतील तर आपण त्या कबूल केल्या पाहिजे. हिंदूंनी जर चूक केली असेल, त्यांनी जर अत्याचार केले असतील तर ते कबूल केले पाहिजे. परंतु जर परिस्थिती अशी असेल आणि 'आमच्या संपत्तीची जाळपोळ करण्यात आली आहे, हिंदू होण्याकरिता आमच्यावर बळजबरी करण्यात आली आहे व आपच्या मुलींचे अपहरण करण्यात आले आहे' या मुसलमानांच्या म्हणण्यात जर अतिशयोक्ती असेल तर परिस्थिती अशी नाही हे आपण जगाला घोषित करून सांगितले पाहिजे. त्याचप्रमाणे हिंदू महासभा आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने काहीही चूक केली नसेल तर मी त्यांचे अभिनंदन केले पाहिजे. सत्य काय आहे ते मला माहीत नाही, परंतु ते मी शोधण्याचा प्रयत्न करतो आहे. माझ्या ओळखीच्या तेथील लोकांना मी लिहिले आहे. (पाहा जयशंकर पंड्या यांना पत्र, डिसेंबर २, १९४७ आणि श्यामलदास गांधी यांना पत्र, डिसेंबर ३, १९४७) मी मुसलमानांनासुद्धा लिहिले आहे. तिथे काय सुरू आहे हे कळण्याकरिता आणि पुढे काय घडण्याची शक्यता आहे हे कळण्याकरिता मी त्यांना सविस्तर माहिती मागितली आहे.

आता दक्षिण आफ्रिका. विजयालक्ष्मी पंडित काय म्हणतात ते तुम्ही पाहिले असेल. त्या म्हणतात की आपल्याला दोनतृतियांश मते मिळू शकली नाही म्हणून आपण पराभूत झालो. (दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांना मिळणाऱ्या वागणुकीबद्दलच्या ठरावाची चर्चा करण्याकरिता गोलमेज परिषद बोलवावी या संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सभेत भारताने मांडलेल्या ठरावाला दोनतृतियांश मते मिळू शकली नाही. ठरावाच्या बाजूने ३१ मते पडली होती तर विरोधात १९ आणि १ मत अनुपस्थित होते.) असे असले तरी त्यांनी घेतलेल्या भूमिकेला किती तरी लोकांनी पाठिंबा दिला. याशिवाय सत्य आपल्या बाजूला आहे आणि एक प्रकारे आपण विजयी झालो आहो. (विजयालक्ष्मी पंडित म्हणाल्या होत्या की आपला नैतिक विजय झाला आहे आणि तोही काही कमी मोलाचा नाही.) यामुळे दक्षिण आफ्रिकेतील भारतीयांनी नाराज होऊ नये. परंतु याबद्दल मला काही म्हणायचे आहे. विजयालक्ष्मी असे म्हणू शकल्या नसतील कारण त्या भारत सरकारचे प्रतिनिधत्व करत होत्या. तुमच्याजवळ कोणताही उपाय नसेल परंतु माझ्याजवळ आहे आणि मी दक्षिण आफ्रिकेत असताना त्याचा अवलंब केला होता. जयपराजय काय आहे? दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना आणि स्मट्सना (दक्षिण आफ्रिकेचे प्रधानमंत्री, फिल्ड मार्शल जॉन क्रिश्चन स्मट्स) आम्ही तिथे नको आहे, आणि आम्ही दक्षिण आफ्रिका सोडलीच पाहिजे असे ते म्हणत असतीलही. पाकिस्तानमधील मुसलमानेतरांबद्दल व भारतातील मुसलमांनाबद्दल होते त्याप्रमाणे ते आपल्याला अन्नपाणी नाकारत असतील. पाकिस्तानमध्ये धाक

दाखवून हिंदूंना आणि मुसलमानांना घालवून लावण्यात आले आहे. तरीही बन्नूमध्ये मोठ्या संख्येत हिंदू आणि शीख आहेत. त्यांचे काय होईल हे मला माहीत नाही. मेहरचंद खन्ना (वायव्य सरहद्द प्रांतात भूतपूर्व अर्थमंत्री; खुदाई खिदमदगार सांसदीय पक्षाचे सचिव. त्यांना सहा महिन्याची सश्रम कारावासाची शिक्षा नोव्हेंबर २७ला झाली होती आणि जमानतीवर सुटल्यानंतर ते दिल्लीला आले. अजूनही पेशावर, मरदान, बन्नू, डेरा इस्माईल खान आणि परचिनार येथील स्थलांतराची वाट पाहत असलेल्या ४०,००० हिंदूंचे काय होईल याबद्दल त्यांनी आशंका व्यक्त केली होती. वायव्य सरहद्द प्रांतातून निर्वासितांना घेऊन जाणाऱ्या ट्रेनकरिता ऑक्टोबर २८पासून परवानगी देण्यात आलेली नव्हती. ज्या हिंदू आणि मुसलमानांवर खटले भरण्यात आले होते व सरहद्द प्रांतातील तुरुंगात डांबण्यात आले होते त्यांच्या सुरक्षिततेबद्दलही त्यांनी चिंता व्यक्त केली होती.) आज मला ते भेटायला आले होते. ते म्हणतात की इतर ठिकाणच्या लोकांचीही अशीच परिस्थिती आहे आणि ते आपला जीव वाचवू शकतात की नाही हे सांगता येऊ शकत नाही. ते जर वाचले तर त्यांना इस्लाम स्वीकारावा लागेल. परंतु बांटूमधील लोकांची संख्या बरीच जास्त आहे. त्यांनी काय करावे? ते कैद्यासारखे आहेत. ते बाहेर निघून जाऊ शकत नाहीत आणि तिथे राहिले तर खायचे काय? त्यांची अवस्था अतिशय वाईट आहे. सरकार काय करू शकते? त्यांच्यासमोर त्यांच्याच समस्या आहेत. मी जे सांगतो आहे ते दक्षिण आफ्रिकेतील हिंदू, मुसलमान आणि शीख यांनाही लागू होते. विजय आणि पराजय यांना काहीही महत्त्व नाही हे मी त्यांना सांगायलाच पाहिजे. 'तुम्ही सांगायला पाहिजे की दक्षिण आफ्रिकेत आम्ही इज्जतीने राहू आणि आम्ही दक्षिण आफ्रिका सोडणार नाही. तुमची इच्छा होती म्हणून आम्ही इथे आलो होतो. आम्हांला आमंत्रित करण्यात आले होते. आम्ही तिथे गिरमिटे मजूर म्हणून आलो होतो आणि मग तिथेच आम्हांला मुले झाली. हक्कांबद्दलच बोलायचे तर हब्शी लोकांशिवाय तिथे कोणालाही राहण्याचा अधिकार नाही. तिथे राहण्याचा बोअर लोकांना जितका अधिकार आहे त्याहून तुम्हांला कमी अधिकार नाही.' संयक्त राष्ट्र संघात जगभरातील प्रतिनिधी होते. आपल्या देशालासुद्धा प्रतिनिधीमंडळ पाठवावे लागले. आपण योग्य तेच केले. तिथे तर न्याय व्हावा म्हणून गोळा होत असतात, पण ते न्याय करू शकत नाहीत वा त्यांना न्याय करायची इच्छा नाही ही वेगळी गोष्ट आहे. दक्षिण आफ्रिकेतील लढा आपण सुरू ठेवलाच पाहिजे, परंतु तलवारीने नाही तर आत्मशक्तीने. माझ्या बाजूला बसलेल्या या लहानशा मुलीतही आत्मशक्ती आहे, आणि तुम्हा सर्वांमध्येही ती आहे. सैनिकांमध्येही आत्मशक्ती आहे. तलवार आपल्याजवळून हिसकून घेतली जाऊ शकते. मग आपण निःशस्त्र होऊन जातो. आपला हात कापून टाकला जाऊ शकतो परंतु कोणीही आत्मशक्ती हिरावून घेऊ शकत नाही. ती चिरंतन आहे. ती आज आहे, उद्या असेल आणि परवाही असेल. आत्म्याशिवाय देहाला

काहीही किंमत नाही. एक ना एक दिवस या देहाची विल्हेवाट लावली जाईल. माझी पत्नी वारली आणि तिला मी माझ्याबरोबर ठेवू शकलो नाही. मला इतकी मदत करणारा महादेव (महादेव देसाई) वारला. परंतु मी त्याला माझ्यासोबत ठेवू शकलो नाही आणि त्याच्या देहाचे दफन करावे लागले. यामुळे मी म्हणेन की दक्षिण आफ्रिकेमधील भारतीयांत स्वाभिमान असेल, आणि मला वाटते की तो त्यांच्यात आहे, धैर्य असेल तर त्यांनी म्हणायला पहिजे की आम्हांला युनोत दोनतृतियांश मते जरी मिळाली नसतील तरी आम्हांला मोठ्या संख्येत मते मिळाली आहेत. त्यांनी दक्षिण आफ्रिकेतील गोऱ्यांना सांगायला पाहिजे की आम्हाला दक्षिण आफ्रिकेत प्रतिष्ठापूर्वक राहू द्या. आम्हांला आमची इभ्रत राखून काम करायचे आहे. आम्हांला शासकीय नोकऱ्या नको. आम्हांला गोऱ्यांनी मदत करावी अशी अपेक्षा नाही, परंतु आम्हांला श्वासोच्छवास करण्याची, पाणी पिण्याची व या भूमीवर राहण्याची परवानगी असली पाहिजे. अखेरीस इथे येण्याकरिता आम्ही भाडे भरले आहे, जिथे कुठे असलो तरी आजिविका कमावली आहे. आम्हांला मताधिकार मिळावा असा आमचा दावा नाही. आम्हांला जर मताधिकार मिळणार असेल तर तो गोऱ्यांच्या बरोबरीने मिळाला पाहिजे, नाही तर आम्हांला मताधिकार नको. आम्ही मताधिकाराकरिता सत्याग्रह करणार नाही परंतु आमच्या इभ्रतीचे जतन आम्ही केलेच पाहिजे. परंतु आम्हांला भाकरी पाहिजे, पाणी पाहिजे व राहायला जागा पाहिजे. त्याचबरोबर आमच्या मुलांना शिक्षणही पाहिजे. याकरिता कोणतेही अनुदान मिळाले नाही तर ते आम्हांला समजू शकेल परंतु मुलांचे शिक्षण हा आमचा अधिकार आहे आणि या अधिकाराकरिता संघर्ष करण्याचा आम्हांला अधिकार आहे. हा प्रश्न जयपराजयाचा नसून जीवनमरणाचा आहे. याकरिता आम्ही करायला वा मरायला पाहिजे. याशिवाय दुसरा कोणताही मार्ग नाही.आम्हांला या जगात जर इभ्रतीने राहायचे असेल तर आम्ही करायला वा मरायला पाहिजे. आमचे कर्तव्य स्पष्ट आहे आणि त्यात तडजोडीला कोणताही वाव नाही. दक्षण आफ्रिकेतील भारतीयांना मला हेच सांगायचे आहे आणि याहून अधिक मी तुम्हाला काहीही देऊ शकत नाही.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १६०-५

---

१५. कनू गांधी यांना पत्र

नवी दिल्ली,

सकाळी ५ वाजता, डिसेंबर ४, १९४७

आता हिवाळा अगदी ऐन भरात आला आहे. रात्री आम्ही विजेवर चालणारे हिटर लावतो.

मला तुझे पत्र मिळाले आणि तुझ्या सूचनांची सोबत जोडलेली प्रतही मिळाली. जितक्या काळजीपूर्वक त्या वाचणे आवश्यक होते तितक्या काळजीपूर्वक मी त्या वाचल्या. संपूर्ण विभाग स्वावलंबी झाला पाहिजे. हीच त्याच्या खरेपणाची परीक्षा असेल. स्वावलंबी या शब्दाचा खरा अर्थ काय हा प्रश्न आपल्याला पडतो आणि मग तो अर्थ लावताना आपण आत्मवंचना तर करत नाही ना हा प्रश्न शिल्लक राहतोच. तुम्हांला शक्य असेल तर तुमच्यापैकी चारपाच लोक येऊ शकता. मला ते आवडेल. तरीही मी निष्पक्ष निर्णय देऊ शकतो की नाही हा प्रश्न शिल्लक राहीलच. मला स्वतःला वस्तुस्थिती काय आहे ते पाहण्याची इच्छा आहे परंतु त्याकरिता मला स्वतःला नोआखालीला यावे लागेल. माझ्या या जीवनात असा प्रसंग येतो की नाही हे पाहावे लागेल. यामुळे इथे यायचे की नाही हे मी तुम्हा प्रत्येकाच्या इच्छेवर सोडतो. ज्याची इच्छा असेल तो येऊ शकतो.

तू आभाची काळजी करतोच आहेस. शक्य असेल तर या काळजीतून मुक्त हो. तू तिला केव्हाही तुझ्याकडे बोलावू शकतोस. जमनाची मोहामुळे तुम्हा दोघांनाही भेटण्याची इच्छा आहे. परंतु त्याचा माझ्यावर प्रभाव पडत नाही. सोबत जोडलेले अमतुस्सलामला वाचायला दे (पाहा पुढील विषय). जलद लिहिता यावे म्हणून मी गुजरातीत लिहिले आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१६. अमतुस्सलाम यांना पत्र

नवी दिल्ली,

प्रातः प्रार्थनेनंतर, डिसेंबर ४, १९४७

बेटी अ.स.

तू मला पत्र लिहिलेस आणि मला ते देऊ नये म्हणून तू आभाला सांगतेस. आभाने मला हे सांगितले. मी तिला म्हणालो की हे पत्र मला देणे तुझे कर्तव्य आहे. यामुळे रात्री तिने हे पत्र मला दिले. ते आताच मी वाचले. तू मला पत्र लिहिलेस, ते पाठवलेही आणि ते मला देऊ नये म्हणून सूचनाही देतेस - हे सर्व तुझ्या अस्वस्थ मनाचे चित्र उभे करते.

तुला माझे मार्गदर्शन हवे आहे आणि तुझे मन विरुद्ध दिशेने काम करत आहे. हे काही मार्गदर्शन हवे असल्याचे चिन्ह नाही. यासंबंधी मी तुला आधीच लिहिले आहे व तुला ही गोष्ट समजावून सांगितली आहे. (पाहा अमतुस्सलाम यांना पत्र, नोव्हेंबर १, १९४७) मला केवळ यात तुझे आणि माझेही कल्याण दिसते. तीच खरी सेवा आहे. तू तुझ्या इच्छेने बोरकामताला जाऊ शकतेस. मला पैसे मागू नकोस. तू तुझ्या इच्छेने हवे तर तिथे राहा वा पंजाबला जा. मला जर पूर्णपणे निर्णय घेता आला असता तर मी नक्कीच घेतला असता. परंतु मी कुठे परिपूर्ण आहे? सर्वज्ञ आहे? आहे का? यामुळे माझ्या दृष्टिकोनाबद्दल जेव्हा केव्हा मला शंका असते तेव्हा कदाचित मी माझे मत देत नसतो. तुझ्या बाबतीत मी असे करू शकत नाही. तिथून निघता येत असेल आणि तुझी इच्छा असेल तर, इतरांबरोबर वा एकटी, तू येऊ शकतेस. शांत हो !! शांत हो !!!

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१७. अमतुस्सलाम यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर ४, १९४७

बेटी अ.स.

काल मला मिळालेल्या पत्रात हे पत्र देऊ नये असे जे तू म्हणाली होतीस (पाहा याआधीचा विषय) तो पश्चात विचार होता हे त्या वेळी माझ्या लक्षात आले नव्हते. आभाने तुझी जोरदार बाजू घेतली आणि म्हणाली की माझे पत्र बोचरे आहे आणि त्यामुळे तुला वेदना होतील. मी जर तुला मुळीच लिहिले नसते तर तुला निश्चितच वेदना झाल्या असत्या. हे खरे आहे, आहे ना?

आज चारू बाबूंचे पत्र आले. मी तुला पंजाबमध्ये जाण्यापासून अडवत आहे काय? तू माझ्या संमतीशिवाय जाऊ शकत नाहीस इतकेच.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी तुमच्याशी काठेवाडसंबंधी होतो आणि मला श्यामलदास गांधींची तार आली. काल ढेबरभाईंचीही तार आली होती. दोघांचेही म्हणणे आहे की मला मिळालेल्या बातम्या अतिशय अतिरंजित आहेत. तिथे स्त्रियांचे अपहरण मुळीच झालेले नाही आणि जोपर्यंत त्यांची माहिती आहे तिथे एकही खून झालेला नाही. सरदार पटेल गेल्यानंतर तर काहीही झाले नाही. त्याआधी तिथे काही लूटमार आणि दंगे झाले होते. मी जे म्हणालो होतो त्यामुळे श्यामलदास गांधी दुखावले होते, आणि दुखावणे स्वाभाविकही आहे. ते स्वतः मुंबहून काठेवाडला गेलेले आहेत आणि तिथे पोहोचल्यानंतर अजून चौकशी करून ते सविस्तर बातमी देणार आहेत.

अमेरिका, इराण आणि लंडनहून मला तारा आहेत. त्यात लिहिले आहे की काठेवाडमध्ये मुसलमानांवर फार अत्याचार करण्यात आले आहेत. अशा प्रकारचा प्रचार करणे सत्यवादी लोकांचे काम नाही. आणि भारतात काय होते याचे इराणला काय करायचे आहे? श्यामलदास गांधींचे म्हणणे आहे की ते हिंदू आणि मुसलमानांमध्ये कोणताच भेदभाव करत नाही. मला लिहिणाऱ्या मुसलमान बांधवांना मदत करण्याची माझी इच्छा आहे, परंतु त्याकरिता ते सत्याच्या मार्गावर असले पाहिजे अशी माझी इच्छा आहे. परंतु ते सत्याचा अपलाप करत असतील व राईचा पर्वत करत असतील व अशा गोष्टी जगभर पसरवत असतील तर हे फार होईल. भारतातून आलेल्या तारा मी समजू शकतो परंतु विदेशातून आलेल्या तारांनी मी दुखावतो.

हुशंगाबादहून एका मुसलमान गृहस्थांचे मला पत्र आले आहे. त्यांनी लिहिले आहे की गुरू नानक जयंतीवर शिखांनी आम्हांला बोलावले आणि सांगितले की तुम्ही आमचे भाऊ आहा. तुमच्याशी आमचे कोणतेही भांडण नाही. मला हे ऐकून फार आनंद झाला. हुशंगाबाद तेच ठिकाण आहे की जिथे स्टेशनवर एक घटना घडली होती. हुशंगाबादमध्ये गुरू नानक जयंतीवर शिखांनी जे केले तसे सर्व

ठिकाणी जर लोक करतील तर आपल्याला लागलेला काळीमा पुसला जाईल. मला वाटते की वृत्तपत्रांनी अशा घटनांना प्रसिद्धी दिली पाहिजे.

व्यापारी मंडळाबद्दल (चेंबर ऑफ कॉमर्स) बोलणे सुरू आहे. मारवाडी आणि युरोपीय चेंबर ऑफ कॉमर्स जर आहेत तर मुसलमानांचे व्यापार मंडळ का असू नये असा मी प्रश्न तर केला होता. (पाहा प्रार्थना प्रवचन नोव्हेंबर २८, १९४७.) एका मारवाडी बंधूंनी मला लिहिले आहे की आम्ही मारवाडी असलो तरी इतर लोकही आमच्या व्यापारी मंडळात येऊ शकतात. मी त्यांना विचारले की तुमच्या मंडळात मारवाडी नसलेले किती लोक आहेत आणि हिंदू किती आहेत. त्यांच्या इंग्रजी पत्राने मला वाईट वाटले. त्यांचा अहवालही इंग्रजीत आहे. मला काय इंग्रजी जास्त समजते? माझा दावा आहे की मला जितकी मातृभाषा कळते तितकी इंग्रजी भाषा कळत नाही. जी भाषा मी आईचे दूध पिऊ लागल्यापासून शिकलो त्या भाषेइतकी बारा वर्षांचा झाल्यापासून जी भाषा मी शिकू लागलो ती भाषा कशी येईल? मला मातृभाषेपेक्षा इंग्रजी जास्त चांगली येते असे जेव्हा कोणी समजतो तेव्हा मला एक भारतीय म्हणून लाज वाटू लागते.

आपण स्वतःचीच फसवणूक करू नये. युरोपीय व्यापार मंडळही म्हणू शकते की आमच्या मंडळात सर्व लोक येऊ शकतात. जर सर्व येऊ शकतात तर वेगवेळे व्यापार मंडळ ठेवण्याची आवश्यकता काय? युरोपीय लोकांनी भारतीय होऊन राहावे असे माझे त्यांना सांगणे आहे. जर ते भारतीय होऊन राहिले आणि भारताच्या हिताकरिता त्यांनी काम केले तर ते बरेच काही शिकू शकतात. ते फार हुशार व्यापारी आहेत. त्यांनी आपला व्यापार बंदुकीच्या बळावर नाही तर बुद्धीच्या बळावर वाढवला आहे.

ब्रह्मदेशचे प्रधानमंत्री मला भेटण्याकरिता आले होते. (पाहा याआधीचा विषय.) ते अतिशय नम्र आहेत. मी त्यांना सांगितले की तुम्ही भारताला भेट दिली हे फार चांगले केले. आमचा देश मोठा आहे आणि आमची संस्कृती प्राचीन आहे. परंतु आज आम्ही जे करत आहो, हिंदू आणि मुसलमान यांच्यामध्ये जे अविश्वासाचे वातावरण आहे त्यातून तुम्ही शिकण्यासारखे काहीही नाही. आमच्या देशात गुरू नानक झाले, आम्ही सर्वांनी मित्र होऊन राहावे, शिखांनी मुसलमानांना मित्र बनवावे आणि हिंदूंनाही असे त्यांनी शिकवले. हिंदू आणि शीख यांच्यात अंतर तरी काय आहे? आजच मास्टर तारासिंग यांनी वक्तव्य काढले. ते म्हणतात की कातडीपासून नख वेगळे करता येत नाही त्याचप्रमाणे हिंदूंपासून शिखांना

वेगळे करता येऊ शकत नाही. गुरू नानक स्वतः कोण होते? हिंदूच होते ना? गुरुग्रंथसाहेब वेद, पुराण यांच्यातील उपदेशांनी भरलेला आहे. कुराणमध्येही हेच सांगितलेले आहे. गुरू गोविंदसिंह यांच्या शिकवणुकीबद्दलही हेच म्हणता येईल. त्यांनी जी शिकवणूक दिली तीसुद्धा हिंदूंच्या धर्मग्रंथात सापडू शकते. त्यात नवीन काहीच नाही. त्यांनी केवळ काही गोष्टींवर भर दिला आहे. या सर्वांचा जन्म वेदांतूनच झाला आहे असा माझा दावा आहे. शीख धर्म, हिंदू धर्म, बौद्ध धर्म आणि जैन धर्म हे वेगवेगळे धर्म आहेत असे म्हणता येऊ शकत नाही. हे चारही धर्म आणि त्यांच्या उपशाखा या सर्व हिंदू धर्माच्याच उपशाखा आहेत. हिंदू धर्म हा सागर आहे व त्यात सर्व नद्या वाहत येतात. त्याच्यात इस्लाम, ख्रिश्नधर्म आणि इतर धर्मही सामावू शकतात. असे झाले नाही तर तो केवळ असा एक लहानसा प्रवाह राहील की जो आपल्या वक्षावर मोठमोठे जहाज वाहून नेऊ शकणार नाही. परंतु आज हिंदुस्थान आणि हिंदू आपला वारसा विसरून गेले आहेत असे वाटते.

ब्रह्मदेशवाल्यांनी भारताकडून एकमेकांचा गळा कापणे शिकावे अशी माझी इच्छा नाही. आज आपण आपल्या संस्कृतीचे अधःपतन करत आहो. परंतु ब्रह्मदेशातील लोकांनी आमचा हा काळा वर्तमान काळ विसरायला पाहिजे. हिंदुस्थानच्या चाळीस कोटी लोकांनी रक्तपात न करता स्वातंत्र्य मिळवले. इतिहासात असे उदाहरण सापडणार नाही. इतकीच त्यांनी आठवण ठेवायला पाहिजे. तुम्ही म्हणू शकाल की इंग्रज थकलेले असावे.परंतु गोष्ट अशी नाही. परंतु ते म्हणाले होते की भारतीयांचा लढा अपूर्व होता. भारतापासून जर त्यांनी कोणता धडा शिकायला पाहिजे तर तो अहिंसेचा आहे. असे नाही की आम्ही अहिंसेचा धडा पूर्णपणे आत्मसात केला. आम्ही दुबळे आहो. आम्ही अहिंसेचा स्वीकार केला कारण आमच्याजवळ शस्त्र नव्हते. अहिंसा हे सर्वोत्तम आयुध आहे. केवळ पवित्र अंतःकरणाचे लोकच त्याचा वापर करू शकतात. यामुळे ब्रह्मदेशाच्या प्रधानमंत्र्यांना मी सांगितले की तुम्हाला हिंदुस्थानकडून काही शिकायचे असेल तर ही अहिंसा शिका. भारताकडून आपण धर्म घेतला खरा परंतु हा भारतच जर रानटीपणाकडे वळणार असेल तर मग आपली प्रगती कशी होईल त्यांनी असा विचार करू नये. त्यांना मी सांगितले की तुम्हाला जर भारताची नक्कल करायची असेल तर भारतात एके काळी जे सद्गुण होते व अजूनही जे कायम आहेत त्यांची करा. कोणत्याही पाशवी गोष्टीचा त्यांनी स्वीकार करू नये. जे चांगले आहे केवळ त्याचीच आपण निर्यात केली पाहिजे. असे झाले तरच जग आपल्याकडून शिकू शकेल. भारताने जर स्वातंत्र्य मिळवले नसते तर ब्रह्मदेश आणि सिलोनलासुद्धा

स्वातंत्र्य मिळाले नसते. आणि भारत तलवारीच्या बळावर स्वतंत्र झालेला नाही.आणि आपल्याला स्वातंत्र्य मिळवण्याकरिता जर तलवारीची गरज पडली नसेल तर स्वातंत्र्य राखून ठेवण्याकरिताही आपल्याला तलवारीची गरज पडणार नाही. आपण जर तलवारीशिवाय आपल्या स्वातंत्र्याचे रक्षण करू शकणार नाही तर भारताने जगाकरिता काहीही केले नाही असे मी समजेन. आज आपल्याजवळ सैन्य आहे. त्याची ताकद अजून वाढवण्याचा प्रयत्न केला जात आहे. नौदल आणि वायूसेना यांच्यातही वाढ करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अशा प्रकारे आपण आपले सामर्थ्य वाढवू शकत नाही हे मी घोषित करतो. या मार्गाने आपण जगाचे कोणतेही कल्याण करणार नाही. आणि जग जर आपल्याकडून अशा प्रकारची गोष्ट शिकत असेल तर त्यामुळे त्याचा कोणताही फायदा होणार नाही उलट त्याचा विनाश होईल.

हिंदीवरून. आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १६६-८

---

१९. नाराणदास गांधी यांना पत्र

डिसेंबर ५, १९४७

चि. नाराणदास,

काठेवाडमधील मुसलमानांची परिस्थिती पाहण्याकरिता जहांगीर पटेल आणि डॉ. दिनशा मेहता हे स्वतः काठेवाडला जात आहेत. ते माझ्यातर्फे वा मी दिलेल्या अधिकारामुळे जात नसून स्वतंत्र व्यक्ती म्हणून जात आहेत. असे करणे ही सर्वोत्कृष्ट देशसेवा असेल असे त्यांना वाटते. या संबंधात त्यांनी ज्या कुणाला भेटायला पाहिजे असे तुला वाटत असेल त्यांच्याशी त्यांची ओळख करून दे. ते काठेवाडमध्ये फार दिवस राहणार नाहीत. दहा ते बारा दिवसांपेक्षा ते जास्त दिवस राहणार नाहीत. ते जामसाहेबांना ओळखतात. आवश्यकता असली तर ते इतर संस्थानिकांनाही भेटतील. मुसलमानांनी केलेल्या आरोपात किती तथ्य आहे हे आपल्याला जाणून घ्यायचे आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूना पत्रो, भाग २, पृष्ठ ३२०. शिवाय सी. डब्ल्यू. ८६४८. सौजन्य - नाराणदास गांधी

---

२०. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला इथे देण्यात आलेली पत्रे काहीशी जास्त लांब आहेत. मी ती वाचावी आणि त्यांचे उत्तर द्यावे अशी अपेक्षा तुम्ही करू शकत नाही. मी ती इथे वाचू शकत नाही कारण यामुळे माझा आणि तुमचाही वेळ वाया जाईल. मी लियाकत अली खान यांना भेटलो असल्याचा उल्लेख असलेलीही एक चिठ्ठी आहे. काठेवाडमध्ये काहीही झाले नाही याबद्दल तुमचे अजूनही समाधान झाले नाही का असे एक पत्रलेखक विचारतात. चिठ्ठी लिहिणारे गृहस्थ जर हजर असतील तर मी त्यांना सांगेन की आणि हजर नसतील तर आकाशवाणीद्वारे त्यांनी ऐकावे की काठेवाडमध्ये काहीही झाले नाही. मला मिळालेल्या अहवालांचे समर्थन करता येईल असे तिथे काहीही घडलेले नाही असे श्यामलदास गांधी म्हणतात. तिथे काही घटना घडलेल्या आहेत परंतु त्या क्षुल्लक आहेत. त्यांना पाकिस्तान सरकारने प्रसिद्धी दिली व तारा पाठवण्यात आल्या. अहवाल भयानक आहेत परंतु अशा भयानक घटना घडलेल्या नाहीत. आज शयामलदास गांधींकडून अजून एक तार आली. त्यांनी चौकशी केली आणि त्यांचे म्हणणे आहे की असे काहीही घडले नाही. सरदारांच्या भेटीनंतर तर जसे घडायला नको होते तसे काठेवाडमध्ये अगदीच काही घडलेले नाही. मला आधी मिळालेल्या वृत्तांमध्ये असे सूचित करण्यात आले होते की सरदारांनीच लोकांना गुडगिरीकरिता चिथावणी दिली होती. परंतु ते काठेवाडमध्ये गेल्यानंतर काहीही विपरीत घडलेले नाही. यामुळे पाहण्याचा दृष्टिकोनच बदलून जातो. अशा तारा पाठवू नये असे मी मुसलमानांना सांगेन असे श्यामलदास गांधी म्हणतात. ज्या मुसलमानांनी पूर्वी आरोप करणाऱ्या तारा पाठवल्या होत्या त्यांनीच आता परत तारा पाठवल्या आहेत आणि लिहिले आहे की आमच्या तारांमध्ये अतिशयोक्ती होती. आम्ही चूक केली आहे. पाकिस्तानच्या वृत्तपत्रांमध्ये आलेले वृत्त चुकीचे होते, ज्या प्रमाणात नुकसान झाल्याचे त्यांत लिहिले होते तेसुद्धा चूक होते आणि मुसलमान घाबरलेले व निराश झालेले होते हेही बरोबर नाही असेही ते लिहितात. हे ऐकून मला आनंद होतो. आमच्या मुसलमान भावंडांकरिता माझ्याकडून शक्य होईल ते मी करीन असे मी म्हणालो होतो. जो पडलेला आहे त्याला

अजून मारण्यात अर्थ नसतो. त्याला आपण वर उचलले पाहिजे. माणुसकी, प्रेम यांची ही मागणी आहे. यालाच सुसंस्कृत वर्तन म्हणतात. मला कोणी शत्रू नाही हे खरे आहे परंतु माझा कोणी शत्रू जरी असला तरी मी त्याला खाली पाडणार नाही. एकदा का पाकिस्तान अस्तित्वात आला की मुसलमानांना सर्व काही मिळेल हे केवळ एक स्वप्न होते. असे काही नाही की जे पाकिस्तानमध्ये आहेत तेच जिवंत राहतील आणि जे बाहेर आहेत ते मरतील. पाकिस्तान म्हणजे खरोखरी हिंदू-मुसलमानांचा सागर आहे. ते तिथून सर्व हिंदूंना आणि शिखांना बाहेर काढणार आहेत काय? जे बाहेर आले त्यांनाही खरे म्हणजे आपले घर सोडायचे नव्हते. परंतु ते घडले. मला शिखांची पत्रे मिळाली आहेत. ते म्हणतात की जोपर्यंत आम्ही परत आमच्या घरी जाणार नाही तोपर्यंत आम्हांला स्वस्थता नाही. उदाहरणार्थ एखाद्या व्यक्तीची ल्यालपूर येथे हजार एकर शेती असू शकेल. त्यात तो गहू, केळी, कापूस आणि फळांचे पीक घेत असेल. तो ते नेहमीकरिता कसे सोडू शकेल? जोपर्यंत तो परत जात नाही तोपर्यंत तो विश्रांती घेऊ शकणार नाही. आणि भारतात काय घडले? स्थलांतर करावे लागलेले शीखही संतापलेले होते व त्यांना बदला घ्यायचा होता. मी म्हणालो होतो की ही माणूसकी नाही. हा पाशवीपणा आहे. असे करायला नको. वाईटाचा बदला चांगलाच झाला पाहिजे. चांगल्याची नक्कल केली पाहिजे. यामुळे काठेवाडहून तार आली हे मला आवडले. मी तर मुसलमान बांधवांना म्हणेन की एखादी गोष्ट घडून गेली असेल तर तिचे अर्धे सांगा, पाव सांगा.त्याचे दुप्पट, दाहपट काय करायचे होते आणि बाहेर काय पाठवायचे होते. जगभरात पसरवले असे का केले? आता मागे हिंदू, शीख तर राहिले नाहीत, हं, आता थोडे परतले आहेत ही गोष्ट वेगळी. परंतु हिंदू आणि शिखांना जर वेड लागले असते तर काय जग वाचवायला आले असते? होय, ते म्हणू शकले असते की तुम्ही स्वातंत्र्याचा सदुपयोग केला नाही. आम्ही तुमच्याकडून ते परत घेतो अशी ते धमकी देऊ शकले असते. हे सर्व शक्य आहे. परंतु जे मेले ते थोडेच परत येऊ शकतात. म्हणूनच मी म्हणतो की आपण कोणतीही गोष्ट वाढवून सांगू नये. जे दुःख आहे ते दुःखच आहे, ते काही बाहेरचा माणूस दूर करू शकत नाही. ते लहान करून दाखवले तर माणूस जगात काम करू शकतो. आपण जगाला तेव्हाच प्रभावित करतो जेव्हा इतरांच्या कामाची आपण स्तुती करतो, त्याच्या दोषाची निंदा करून नाही. तर तुम्हाला ही बातमी सांगायची होती. ती सांगितली. एका बंधूंनी लिहिले होते तेही आले. त्यात अजून काय लिहिले ते पाहीन. सागण्यासारखे काही असेल तर उद्या सांगेन.

अजून एक गोष्ट तुम्हाला सांगायची आहे. तसा तिच्याशी तुमचा संबंध नाही. पण वाटले तुमच्याद्वारे सांगून टाकावे. मी ब्रिजकिशनजींना सांगून ठेवले आहे की मला जे भेटायला येतात त्यांना ६ पासून १३ तारखेपर्यंत वेळ देऊ नये. याचा अर्थ असा नाही की मी कोणाला भेटू इच्छित नाही वा मी आजारी आहे वा मी एकटाच मजा करू इच्छितो. किती तरी महिन्यांपासून ही गोष्ट सुरू आहे. मी सेवाग्रामला जाऊ शकत नाही. यामुळे सेवाग्रामचे लोक इथे येत आहेत. उद्यापासून कस्तुरबा ट्रस्टची सभा आहे. त्यानंतर चरखा संघ, नयी तालीम, ग्रामोद्योग संघटना यांच्या सभा आहेत. या चार संघटनांच्या या काळात सभा होणार आहेत. सभेचे संचालन चांगल्या प्रकारे झाले तर त्याला काही वेळ लागेलच. मग यांना वेळ देऊ की भेटणारांना? तर मी सांगून टाकले की कृपाकरून या दिवसांत वेळ मागू नका. वाटल्यास आपण नंतर भेटू शकतो. मी इथे माझे काम करणार नाही असे नाही. परंतु बाहेरून आलेले लोक मला केवळ उत्सुकतेमुळे भेटू इच्छितात.

कापड आणि अन्नधान्यावरील नियंत्रण उठवण्याची चर्चा सुरू आहे. असे नाही की हे नियंत्रण उद्याच रद्द होईल. प्रक्रिया सुरू आहे आणि असे सुचवून मी चांगले काम केले आहे असे प्रत्येकजण म्हणतो. नियंत्रण उठवले जात आहेत ही चांगली गोष्ट आहे असे सांगणारी पत्रे चोहोकडून येत आहेत. नियंत्रण उठवले गेले म्हणजे आपण आपल्या जबाबदारीतून मुक्त झालो असे होत नाही. एकदा निर्नियंत्रण अंमलात आले की व्यापाऱ्यांवर काही जबाबदारी येते. घनश्यामलासुद्धा मी जास्त कापड निर्माण करण्याकरिता सांगेन. मी केवळ आदेशाचे पालन करत आहे असे तो म्हणू शकतो. जे कापड तयार करायला त्याला सांगण्यात येते ते तो तयार करतो व त्याची किंमत घेतो. परंतु एकदा कापडावरील नियंत्रण उठले की घनश्याम आणि इतर मित्र काय करतील? मग ते लोकांना लुबाडण्याकरिता स्वतंत्र असतील काय? असे झाले तर माझी हजामत होईल. असे झाले तर लोक म्हणतील की मी नियंत्रण दूर करायला लावले. शासनामध्ये माझी भावंडे आहेत, माझे मित्र आहेत. त्यांना सांगितले की झाले काम असे थोडेच आहे. मी तर शासनाला मदत केली आहे. मी कितीही मोठा असलो, कितीही सांगितले तरी शासनाला पटत नसेल, लोकांना, ज्यांचे शासन आहे त्यांना कितीही सांगितले तरी पटत नसेल तर मग काय? मी जे म्हणतो ते योग्य असायला मी ईश्वर थोडाच आहे. मी तर्क करतो, विचार करतो आणि मग सांगतो की कापड आणि इतर वस्तूंवर जे नियंत्रण आहे ते रद्द करण्यात यावे. याचा अर्थ आहे की आज आमच्याजवळ पाच मण धान्य शिल्लक असेल तर उद्या दहा

मण शिल्लक असायला पाहिजे. याचे कारण लोकांनी धान्य दाबून ठेवले आहे. आज जर शेतकऱ्यांजवळ धान्य नसेल आणि तरीही मी म्हणालो की नियंत्रण काढून टाका तर लोक उपाशी मरणार नाहीत काय? लोकांना उपाशी मरू देण्याइतका मी मूर्ख नाही. माझ्याकरिता तर घमश्याम बकरीच्या दुधाची व्यवस्था करतो, फळादींची व्यवस्था करतो. भाज्या वगैरे देतो. मी काय उपाशी थोडाच मरतो. मला वाटते की शेतकऱ्यांजवळ धान्य पडलेले आहे परंतु त्यांना त्याची इतकी किंमत मिळत नाही की त्यांचे पोट भरावे. सरकार त्यांना जितके देण्याकरिता भाग पाडते तितके देऊन टाकतात, आणि म्हणतात की जेव्हा नियंत्रण उठेल तेव्हा सांगू की आमच्याजवळ किती धान्य आहे. मला वाटते की शेतकऱ्यांना जेव्हा आपल्या मालाची रास्त किंमत मिळेल तेव्हा त्यांची उपासमार होणार नाही. मान्य की आपल्याजवळ आपल्या गरजेइतके अन्नधान्य नाही. याचा अर्थ असा होतो काय की आपले शेजारी उपासमारीने मरत असताना आपल्या हाती जितके धान्य पडेल तितके सर्व आपणच खाल्ले पाहिजे? आपले जर इतके अधःपतन झाले असेल तर मग यावर कोणताही इलाज नाही. तरीही मी म्हणेन की यावरील उपाय नियंत्रण नाही. जर असे घडणार असेल तर आज सरकार चालवणारे जे मंत्रिमंडळ आहे त्याने शासनापासून दूर झाले पाहिजे. लोक हुशारी करतात, सत्याला धरून राहत नाहीत, ज्या व्यापाऱ्यांनी लोकांकरिता व्यापार केला पाहिजे ते आपलीच घरे भरत असतील व आपल्या मुलाबाळांकरिता संपत्ती गोळा करत असतील तर सरकारने काय करावे? त्यांनी बळाचा वापर करावा की लोकांवर गोळ्या झाडाव्या? आपल्याजवळ असे अधिकार नाहीत आणि ते आपल्याला नकोतसुद्धा. आपल्याजवळ पोलीसदल असले पाहिजे परंतु ते लोकांना गोळ्या घालण्याकरिता नाही. आपण जर लोकांना गोळ्या घालायला सुरुवात केली तर शिल्लक कोण राहील. आपले तीस वर्षांचे प्रशिक्षण कुठे गेले? आपली माणुसकी कुठे गेली? हे असे चालू शकत नाही. अशा प्रकारे आपण आपले नवजात स्वातंत्र्य गमावू. यामुळे मी म्हणतो की नियंत्रण (कंट्रोल) गेलेच पाहिजे. सरकार जर म्हणत असेल की नियंत्रण काढून टाकले तर लोक उपाशी मरतील. असे झाले तर पंचायत राजची स्थापना झाली नाही असे मी म्हणेन. म्हणजे अजून आपल्या देशात लोकशाही आली नाही. म्हणजे ज्या रामराज्याकरिता मी जगतो आहे त्या रामराज्याची अजून स्थापना झालेली नाही. मी म्हणेन की ज्या लोकांना नियंत्रणापासून मुक्त करण्यात आले आहे त्यांनी स्वतःवर नियंत्रण लावले पाहिजे आणि इतरांना सुखी केले पाहिजे. सरकारी सेवेतील नागरी सेवेचे लोक कदाचित मला नावे ठेवतील. हस्तक्षेप करण्याचा मला कोणताही

अधिकार नाही, मला सरकार चालवण्याचा अनुभव नाही, एकदा नियंत्रण काढले की नंतर ते परत लावणे व लोकांना खाऊ घालणे कठीण होईल असेही ते म्हणतील. मी म्हणतो की ते बरोबर आहेत. मी कधीही नागरी सेवेत नव्हतो, परंतु मी करोडो लोकांमध्ये फिरलो आहे. मला लोकांच्या अतःकरणाची माहिती आहे. मी त्यांना ओळखतो.

आता कापडाबद्दल. धान्याबद्दल तुम्ही म्हणू शकता की आमच्याजवळ पुरेसा साठा नाही. परंतु आपल्याजवळ पुरेसा कापूस नाही असे कोणीही म्हणालेले नाही. आपल्याजवळ इतका कापूस आहे की आपण त्याची निर्यात करतो. तुम्ही म्हणाल की आपल्याजवळ पुरेश्या गिरण्या नाहीत. मी म्हणेन की गिरण्या आपल्या घरात आहेत. इथे बसलेल्या सर्व स्त्रियांच्या घरात त्या गिरण्या आहेत. तुम्हापैकी प्रत्येकाला ईश्वराने कृपावंत होऊन दोन हात दिले आहेत. तुम्हाला जर तुमच्या पाठीवर कापड हवे असेल तर तुम्ही कताई केली पाहिजे. तुम्ही जर तसे करू शकत नसाल तर तुम्ही नागडे फिरा. आपल्याकडे किती तरी गिरण्या आहेत परंतु तरीही गरजेइतके उत्पादन होत नसेल तर आपण हातकताई आणि हातविणाईचा आधार घेतला पाहिजे. विणाई इतकी कठीण नाही. आपल्या देशात किती तरी विणकर आहेत. त्यांच्याकडून आपण किती तरी कापड विणून घेऊ शकतो. परंतु काही लोक अतिशय शौकीन आहेत गिरणीतील सूत मिळाले तर ते विणू शकतात, हातकताईच्या सुताने विणणार नाही. असे दडपण कोणी आणत असेल तर नागडे राहा. त्यांनी जर हातकताईच्या सुताने कापड विणायला सुरुवात केली तर कोणालाही नागडे राहावे लागणार नाही. तर आपला सुंदर देश - करोडो लोक राहत असलेला देश, ज्यांना आपला व्यवसाय माहीत आहे, ज्यांना कापड कसे तयार करावे हे माहीत आहे त्या देशातील लोकांना नग्न राहण्याची आवश्यकता पडू शकत नाही. दोन वार कापड मिळेल, चार वार कापड मिळेल असे बंधन ठेवणे चांगले वाटत नाही. यामुळे कापडावरील नियंत्रण ही आपल्या अज्ञानाची परिसीमा आहे. ते जितके लवकर उठवले जाईल तितके बरे. जोपर्यंत अन्नधान्याचा प्रश्न आहे शेतकऱ्यांनी आणि व्यापाऱ्यांनी म्हटले पाहिजे की आम्ही जनतेकरिता पिकवतो. आम्हाला कोणताही अप्रामाणिकपणा करायचा नाही. शेतकऱ्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की धान्य पेरायचे आहे ते केवळ पोट भरण्याकरिता नाही तर सर्वांकरिता. मी म्हणेन की आपल्या जमिनीतून अर्धा शेर निर्माण होत असेल तर एक शेर निर्माण करण्याचा प्रयत्न का करू नये? याकरिता लोकांना मार्गदर्शन करू या. त्यांना आपण उत्तेजन दिले पाहिजे. भारतात कोणीही उपाशी वा नग्न राहण्याचे कारण नाही. आम्ही आमच्या अज्ञानामुळे नग्न

राहतो. जितके धान्य पाहिजे तितके उत्पन्न करत नाही, जितके दूध पाहिजे तितके उत्पन्न करत नाही. आपल्याकडे इतक्या गायीम्हशी आहेत तरी आपली अशी अवस्था आहे. यापेक्षा अधिक मोठा मूर्खपणा कोणता हे मला कळत नाही.

'हिंदू'वरून. आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १६९-७४

---

२१. देवाण-घेवाण

(याचा गुजराती अनुवाद डिसेंबर १४, १९४७च्या 'हरिजनबंधू'मध्ये प्रकाशित झाला होता.)

एक पीडित सिंधी निर्वासित बांधव लिहितात -

या संकटाच्या वेळी सिंध, पंजाब आणि वायव्य सरहद्द प्रांतातून आपले हजारो देशबांधव वडिलोपार्जित घरदार सोडून येत असताना काही हिंदूंमध्ये प्रांतीय भावना प्रबळ असल्याचे मला दिसते. जे इथे आले आहेत त्यांना भयानक त्रास सहन करावा लागला आहे आणि भारतीय संघराज्यातील हिंदू त्यांना जितकी अधिक प्रेमाची ऊब देऊ शकतील तितक्याची त्यांना गरज आहे. सामान्यपणे त्यांना शरणार्थी म्हणण्यात येत असले तरी तुम्ही त्यांना दुःखी म्हणून संबोधले हे योग्यच केले (पाहा, 'प्रार्थना प्रवचन', नोव्हेंबर २५, १९४७). ही समस्या इतकी प्रचंड आहे की कोणतेही सरकार जनतेच्या संपूर्ण सहकार्याशिवाय हिला तोंड देऊ शकत नाही. मला सांगताना दुःख होते की काही घरमालकांनी घरभाड्यात खूप वाढ केली आहे आणि काही तर पगडी मागू लागले आहेत. हे दुखी लोक कमालीची पीडा सहन करत असताना तुम्ही तुमचा आवाज या प्रांतवादाविरुद्ध व पगडीप्रथेविरुद्ध उठवाल काय?

मला लेखकाच्या म्हणण्याबद्दल सहानुभूती वाटत असली तरी मी त्याच्या विश्लेषणाशी सहमत होऊ शकत नाही. तरीही मी मान्य करतो की असे काही घरमालक आहेत की ज्यांना दुःखी लोकांचे शोषण करतानाही लाज वाटत नाही. परंतु त्याचबरोबर मला असेही लोक माहीत आहेत की जे या दुःखी लोकांचा त्रास कमी करता यावा म्हणून स्वतः त्रास सहन करून, अडचणी सोसून या दुखी लोकांकरिता सोयीसवलती पुरवत असतात, मग त्या सोयीसवलती या दुःखी लोकांच्या अपेक्षानुरूप नसूही शकतील. या अनपेक्षित आघातापासूनही कसा लाभ घ्यावा हे शिकणे हाच या दुःखी लोकांकरिता सर्वोत्तम मार्ग आहे. त्यांनी नम्रतेचे कौशल्य शिकायला पाहिजे - अशी नम्रता की ज्यात इतरांचे दोष शोधणे आणि त्यांच्यावर कठोरतम टीका करण्याऐवजी स्वतः कठोर आत्मनिरीक्षण करून आपले दोष पाहण्याची आवश्यकता असते. त्यांची टीका कधीकधी अतिशय कठोर असते आणि केव्हाकेव्हा तर ती योग्यही नसते, आणि क्वचितच योग्य असू शकते. आत्मनिरीक्षणामुळे माणूस वर उठतो आणि इतरांचे दोष काढल्यामुळे त्याचा अधःपात होतो. पीडित लोकांनी सामूहिक सहकारी जीवनाची ही कला आणि तिचे महत्त्व समजून घेतले पाहिजे. या प्रक्रियेत सहकार्याचा परीघ सतत वाढत जातो व अखेरीस संपूर्ण

मानवजातीचा तिच्यात समावेश होतो. पीडित लोक जर ही गोष्ट शिकले तर त्यांच्यात कोणीही एकटा पडणार नाही. मग ते सर्व, कोणत्याही प्रांताचे असले तरी, मिळूनमिसळून राहतील आणि आपल्या स्वार्थाचा विचार करणार नाहीत. याचा अर्थ असा नाही की लाखो आणि लाखो लोकांना आपल्या घरदारापासून आज वंचित व्हावे लागत असताना व आपल्याला कुठे जायचे आहे याचीही कल्पना नसताना ते सर्व एका ठिकाणी राहतील वा एका ठिकाणी राहण्याचा आग्रह धरतील. ही गोष्ट आजच काय कोणत्याही काळात अशक्य आहे. परंतु सहकार्याच्या या नम्र भावनेचा अर्थ असा होतो की त्यांना कुठेही ठेवण्यात आले तरी ते इतर पीडितांशी तादात्म्य पावतील मग ते कोणत्या प्रकारच्या सामाजिक परिस्थितीतून वा कोणत्या ठिकाणाहून आले आहेत याला काहीही महत्त्व राहणार नाही. आपल्याला आवडते त्याच ठिकाणी आपल्याला ठेवण्यात यावे असा आग्रह कोणीही धरू शकणार नाही. पीडित लोक कधीही कुरकुर करणार नाहीत. मग मुसलमानांच्या मालकीचे वा ते मुसलमान राहत असलेले भाड्याचे घर रिकामे असले तरी कोणीही ते ताब्यात घेण्याचा प्रयत्न करणार नाही. अशा प्रकारच्या असामान्य परिस्थितीत मुसलमानांना भारतात आपली जी संपत्ती टाकून जावे लागले तिचे काय करायचे हे ठरवणे सरकारचे काम आहे. पीडित लोकांनी एकच गोष्ट लक्षात ठेवली पाहिजे आणि ती ही की आपण सर्वांनी बरोबर राहायचे आहे आणि एक होऊन काम करायचे आहे. वर सांगितलेल्या विचारांची जर अमलबजावणी करण्यात आली तर व ती विकसित करण्यात आली तर पीडित वा निर्वासित लोकांना ठेवण्याचा प्रश्न अगदी सोपा होईल व त्यांची कोणालाही भीती वाटणार नाही व कोणालाही त्यांचा त्रास वाटणार नाही.

याशिवाय कोणत्याही पीडीत माणसाने, जर तो अपंग नसेल तर, आपल्या खाणेपिणे आणि कपडेलत्ते वगैरेची परतफेड करण्याकरिता योग्य अशा शारीरिक श्रमाच्या कामात सहभागी होऊन कामाला हातभार लावला पाहिजे. अशा प्रकारे शारीरिक श्रम करणे ही गोष्ट ते प्रतिष्ठेची समजतील व स्वावलंबी होतील. स्त्री-पुरुषांना समान लेखले जाईल. संडास सफाई वा कचरा साफ करणे इत्यादी सर्व कामे तर ते करतीलच. कोणतेही श्रम फार कमी प्रतीचे वा फार उच्च दर्जाचे समजण्यात येणार नाही. अशा प्रकारचे शिबीरातील जीवन शहरी जीवनापेक्षा किती तरी श्रेष्ठ असेल. अशा प्रकारच्या समाजात गुंड, आळशी आणि उडाणटप्पू लोकांना कोणतेही स्थान राहणार नाही. शिबिरातील असे

जीवन विलासी शहरी जीवनापेक्षा किती तरी चांगले असेल जिथे महाल आणि झोपड्या एकाच ठिकाणी दिसतात व या दोघातून कोणते जीवन अधिक दुःखद आहे हे ठरवणे कठीण होते.

नवी दिल्ली, डिसेंबर ६, १९४७

'हरिजन', डिसेंबर १४, १९४७

---

२२. वालजी गो. देसाई यांना पत्र

डिसेंबर ६, १९४७

सिनेमावरील तुझा लेख मी आताच वाचला. (रिकॉन्स्टिट्यूट फिल्म सेंसॉर बोर्ड हा लेख डिसेंबर १४, १९४७च्या 'हरिजन'मध्ये प्रकाशित झाला होता.) त्यातील मला माहीत नसलेले इंग्रजी शब्द समजून घेण्याकरिता मला वेळ लागला. तू जर एखाद्या पुस्तकातून उद्धरण देऊ शकत असशील तर ते पुस्तक सोबत पाठवलेस तर अधिक सोयीचे होईल. याशिवाय तू लेख स्पष्ट अक्षरात लिहायला पाहिजे वा तो टंकमुद्रित करून घेतला पाहिजे. या लेखाचा मी गुजरातीत अनुवाद करू शकणार नाही. मला स्वतःलाच त्यातील इंग्रजी शब्दांचा पूर्ण अर्थ कळत नाही. तू गुजराती आणि हिंदी अनुवादही पाठवण्याचे कबूल केले होते. तू हिंदी जरी पाठवू शकत नसशील तरी गुजराती पाठव. तुझी इच्छा असेल तर तू लेख सरळही पाठवू शकतोस. या लेखाचा गुजरातीत अनुवाद करू नये म्हणून मी अहमदाबादच्या लोकांना कळवत आहे. तुझ्या मागील लेखांची मी चौकशी करत आहे.

तू ठीक आहेस ना?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ७५०६. सौजन्य - वालजी गो. देसाई

---

२३. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ६, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

तुम्ही सुब्बालक्ष्मींचे (माधुरी शण्मुखवादिवू सुब्बूलक्ष्मी, सप्तेंबर १९१६-डिसेंबर ११, २००४, कर्नाटक संगिताच्या प्रसिद्ध गायिका) भजन ऐकले आणि रामधूनही ऐकली. या तर इथे नवीन आहेत, संगिताच्या कार्यक्रमाला जात असतात. रामधून अशी गोष्ट आहे की ज्यात लीन व्हावे लागत असते. भजनही अशीच गोष्ट आहे. त्यांचे गाणे ऐकण्याकरिता लोक का उत्सुक असतात हे आज तुम्हाला कळले असेल. त्यांचा गळा अतिशय गोड आहे. इथे येऊन गाणे म्हणण्याची त्यांची इच्छा होती. मी त्याचे स्वागत केले.

आज मी तुमचा १५ मिनिटांपेक्षा जास्त वेळ घेणार नाही. काल मी तुमची २५ मिनिटे घेतली. मला त्याची लाज वाटते. मी माझे बोलणे १५ मिनिटातच संपवले पाहिजे. आज तुमचे १५ मिनीट घेण्याचाच माझा विचार आहे व त्यात जे येऊ शकणार नाही ते सोडून देईन.

काल मला एका बंधूंचे पत्र आले. मी त्यातील काही भागच वाचू शकलो. मला दुसरे एक पत्र मिळाले आहे परंतु ते मी अजून वाचू शकलेलो आहे. त्याकरिता माफी मागतो. पत्रांचा एक ढीग पडला आहे, त्यात ते कुठे तरी पडले असेल. जे पत्र मी वाचून आलो आहे त्यात लिहिले आहे की मी भोळासांब माणूस आहे. माझ्यामागे जग कसे चालते ते मला माहीत नसते आणि त्यामुळे माझी फसवणूक होऊ शकते. याचे उत्तर कसे द्यावे हेही मला माहीत नाही. मला कशा प्रकारे धोका दिला जाऊ शकतो तेही पत्रलेखक सांगतो आणि मला सावध राहण्याकरिता सांगतो. तो म्हणतो की पाकिस्तानमध्ये काय होते आहे ते पाहा आणि आपणही तसेच केले पाहिजे आणि त्याचा बदला घेतला पाहिजे. मी याच्याशी सहमत नाही. आपण मुसलमानांची घरे जाळू शकत नाही. ती घरे कितीही साधी असली तरी त्यांच्या मालकांना ती तितकीच प्रिय आहेत जितका एखाद्या करोडपतीला आपला प्रासाद प्रिय असतो. ते अशाच घरात राहत असतात. मुसलमान जेव्हा पाकिस्तानमध्ये जातो तेव्हा त्यालाही पीडा सहन करावी लागत असते.

पाकिस्तानमध्ये सर्व काही सोडून आलेल्या हिंदूंना आणि शिखांना ते सर्व परत कधी मिळेल व त्यांना आपल्या घरी कधी परतता येईल असे पत्रलेखक विचारतो. मी त्याला सांगेन की ते जोपर्यंत

परतत नाहीत, जे मेले त्यांची गोष्ट वेगळी आहे, जोपर्यंत एकाही हिंदूला वा शिखाला त्याचे घर परत मिळत नाही तोपर्यंत मी शांत बसणार नाही. हं, जे घर जळाले आहे ते जसेच्यातसे परत बांधून द्या असे कोणतेही सरकार करू शकत नाही, तुमचे सरकारही करू शकत नाही. शासनाकडून अशी अपेक्षाही करायला नको. मी तर म्हणेन की हिंदूंनी आणि शिखांनी नमुन्यादाखल वसवलेल्या शहरात जाऊन राहावे. तितके झाले तरी पुरे आहे. लाहोरच्या हिंदूंनी आणि शिखांनी आमची घरे जशी आहेत तशीच आम्हांला परत द्या, आमची जमीन जशी आहे तशीच आम्हांला परत द्या असे पाकिस्तान सरकारला सांगितले पाहिजे. अशा प्रकारे सर्व आपापल्या घरी जाऊन राहू शकले तर माझ्याकरिता ते पुरे आहे. इतके करता येऊ शकते की ज्या मुसलमानांनी त्या घरांचा ताबा घेतला आहे तिथून त्यांना हटवले पाहिजे आणि ज्या अवस्थेत ते घर आहे त्या अवस्थेत ते परत केले पाहिजे. त्यांनी प्रासाद बांधून द्यावा असे थोडेच आहे. आता जे लोक भारतीय संघराज्यात आहेत त्यांनी सत्याचरणी व्हावे, सज्जन व्हावे. याहून वेगळे काही होऊ शकत नाही याबद्दल मला शंका नाही. आपण पाकिस्तानचे अनुकरण करायला नको. ते जरी त्यांचे नाक कापत असले तरी आपण आपले नाक कापू नये.

यापढे जाऊन मी पत्रलेखकाला सांगेन की आपण जर काही चूक केली असेल तर आपण ती दुरुस्त केली पाहिजे. प्रत्येकजण चुका करत असतो. माणसाने त्या परत परत करू नये इतकेच. माणसात जरी चांगले करण्याची क्षमता आहे तरी तो चूक करणारा प्राणी आहे. एकदा त्याने चूक दुरुस्त केली की नंतर तो केवळ चांगलेच करू शकतो. आपण जर आपल्या धर्मानुसार वागलो तर जगासमोर त्याची जाहीरात करायची आवश्यकता नसते.

काठेवाडच्या मुसलमानांचे जे नुकसान झाले त्याबद्दल मला लिहावे लागले आणि ते योग्यच आहे आणि तेथील हिंदूंना त्यांच्याबद्दल सांगणेही उचितच होते. तेथील सरकारलाही सांगणे योग्यच होते. तो आपला हक्क आहे. आपण जेव्हा पाकिस्तानच्या निर्मितीला मान्यता दिली होती तेव्हा तेथील हिंदूंची आणि शिखांची घरे जाळून टाकली जावी व त्यांना देशातून बाहेर हाकलून देण्यात यावे असे आपण थोडेच मान्य केले होते. जर चुका झाल्या असतील तर त्या दुरुस्त केल्या पाहिजे. तेसुद्धा असे म्हणू शकतात की आपणसुद्धा आपल्या चुका दुरुस्त केल्या पाहिजे. ते म्हणू शकतील की भारतातून हुसकावून लावण्यात आल्यामुळे ज्या मुसलमानांना पाकिस्तानमध्ये यावे लागले त्यांनासुद्धा परत घेतले पाहिजे. अशाच प्रकारे पाकिस्तामधून ज्या हिंदूंना आणि शिखांना इथे यावे लागले ते जर परत

गेले तर आपणा दोघांकरिताही ही गोष्ट चांगली होईल. आपण पाक होऊ. असे झाले नाही तर जगात आपले तोंड काळे होईल. आपले तोंड नेहमीच उजळ राहिले आहे. हं, आपण गुंड असतो आणि गुंडगिरीने आपण स्वातंत्र्य मिळवले असते तर गोष्ट वेगळी होती. बाहेरचे जग म्हणते की आपण जे स्वातंत्र्य मिळवले आहे ते सौजन्यशीलतेने मिळवले आहे. मी म्हणालो असतो तर वेगळी गोष्ट आहे, हिंदू-मुसलमान म्हणाले असते तर वेगळी गोष्ट असती परंतु बाहेरचे जगही म्हणते की आम्ही सौजन्याने स्वातंत्र्य मिळवले आहे, सौजन्याने घेतले आहे. तर ते सौजन्यानेच टिकवले पाहिजे, गुंडगिरीने नाही. गुंडगिरीने आपण ते घालवणार आहो. अशाच प्रकारे आपण आपले आचरण ठेवले, वागणे ठेवले तर जग म्हणेल की आपण आपली चूक दुरुस्त केली आहे. मग जग पाकिस्तानचे काय करील असे तुम्ही विचारू शकाल. मी तर म्हणेन की जगाला काहीही म्हणण्याची वा सांगण्याची गरज नाही. पाकिस्तानला स्वतःलाच स्वच्छ व्हावे लागेल.

अखिल भारतीय काँग्रेसने जो ठराव मंजूर केला (पाहा परिशिष्ट 'अखिल भारतीय काँग्रेस कमेटीचे ठराव, ठराव क्रमांक २, विस्थापित निर्वासितांचे पुनःस्थापन', नोव्हेंबर १५, १९४७) त्यात माझा हात होता व तो मंजूर करवून घेण्याकरिता मी जबाबदार आहे या गोष्टीची मला आठवण करून देण्यात येते, आणि ते पुढे सांगतात की लोकांना तो ठराव पसंत नव्हता. पाकिस्तानमधून जे हिंदू आणि शीख आले आहेत त्यांची परतण्याची इच्छा नाही. त्यांनी भिकाऱ्याप्रमाणे जावे असे मला म्हणायचे नाही. ते पाकिस्तानमधून आले कारण ते असहाय होते हे खरे आहे. परंतु त्यांनी प्रतिष्ठापूर्वक जायला पाहिजे. पाकिस्तानच्या मुसलमानांनी त्यांना सांगितले पाहिजे की आता आम्ही सर्व मुसलमान चांगले झालो आहो व तुम्ही परत या. अशाच प्रकारे मुसलमानांना आपण सांगितले पाहिजे की आता तुम्ही परत या, तुमची घरे, तुमची जमीन जशीच्या तशी कायम आहे, ती ताब्यात घ्या. आमचे वेड निघाले आहे आणि आम्ही सभ्य गृहस्थाप्रमाणे वागत आहो. यात कोणती फसवणूक आहे? मी कोणालाही फसवत नाही. जगाने यात फसवणूक पाहू नये. आम्ही सभ्य गृहस्थाप्रमाणे वागलो तर आपला आज चांगला होईल. फसवणूक कशी असते व ती कशी करतात हे तर मला माहीत नाही. अखिल भारतीय काँग्रेस समितीचा ठराव म्हणतो की विस्थापित होऊन इथे जितके हिंदू आणि शिख परत आले आहेत त्या सर्वांनी आदराने, प्रेमाने आपल्या घरी, जमिनीवर जावे. ल्यालपूरला जावे. आमचे शीख बांधव तिथे शेती करत होते. त्यांनी तर जायलाच पाहिजे असे माझे स्वप्न आहे. या स्वप्नाची परिपूर्ती पाहण्याकरिताच मी जिवंत आहे. ईश्वराला माझे हे

स्वप्न पूर्ण करायचे नसेल तर त्याने मला घेऊन जावे. म्हणूनच मी दिल्लीत राहतो आहे. इथे जर मी हे करू शकणार नसेन तर अजून कुठे मी काय करू शकेन? आपण सज्जन झालो तर असे होऊ शकते याबद्दल मला मुळीच शंका नाही. पाकिस्तानींनीही म्हणावे की आम्ही चांगले झालो. त्यांनी अंतःकरणपूर्वक म्हणावे की आमची चूक झाली, आम्ही तुमच्याशी सौजन्यपूर्वक वागू, तुम्ही या. अशा प्रकारे झाले तर सर्व चांगले होऊ शकते. असे झाले तरच आपण चांगले शेजारी होऊन राहू शकतो.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १७५-८

---

२४. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी तुमच्याशी फार गहन विषयावर बोलू इच्छितो आणि तो संवेदनशीलसुद्धा आहे. तो वृत्तपत्रांमध्ये आलेला आहे. काल तुम्ही वृत्तपत्रांमध्ये पाहिलेच असेल की काही हिंदू स्त्रिया लाहोरला गेल्या आणि तेथील मुसलमान स्त्रियांना भेटल्या. (लाहोरमध्ये अपहृत स्त्रियांच्या पुनर्वसनाकरिता एका आंतरराज्यीय संमेलनाचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनात आलेल्या प्रतिनिधींनी पाकिस्तान आणि भारतातील लोकांना सर्व अपहृत स्त्रियांना त्याच्या घरी परत करण्याची विनंती केली. या आवाहनावर सह्या करणारांमध्ये प्रमुख होते - गजनफर अली, इफ्तखार हुसेन खॉं मामदोत वाले, बेगम लियाकत अली खॉं, बेगम शाहनवाझ, बेगम बशीर अहमद, इफ्तिखारुद्दिन, के. सी. नियोगी, स्वर्णसिंह, रामेश्वरी नेहरू, मृदुला साराभाई आणि कमलादेवी चटोपाध्याय.) पाकिस्तानमध्ये मुसलमानांनी अपहरण केलेल्या स्त्रियांचे आणि पूर्व पंजाबमध्ये हिंदू आणि शिखांनी अपहरण केलेल्या मुसलमान स्त्रियाचे काय करावे या प्रश्नाची त्यांनी चर्चा केली. फार मोठ्या संख्येत मुसलमानांनी भारत सोडला आहे आणि अजूनही काही सोडण्याच्या बेतात आहेत. यापुढे एकाही मुसलमानाला भारत सोडण्याकरिता बाध्य केले जाणार नाही असा आपण निर्धार केला पाहिजे. परंतु स्वतःहोऊन जाण्याची कोणाचीच इच्छा नसते. आपले घरदार सोडून कोणी का जावे? तिथे पाकिस्तानमध्ये त्यांच्याकरिता घरदार तयार आहे अशी तर काही गोष्ट नाही. त्यांनी स्वतःहोऊन तिथे जायचे ठरवले असेल वा नोकरी करणारे जात असतील तर गोष्ट वेगळी. परंतु असे फार कमी आहेत. इतरांनी तिथे जाण्याचे काय कारण? तिथे पाकिस्तानमध्ये काम त्यांची वाट पाहत आहे अशी तर काही गोष्ट नाही. भारतातील त्यांच्या व्यवसायावर प्रतिकुल परिणाम होत नसेल तर ते कशाला जातील?

हे तर झाले, परंतु स्त्रियांचे काय? ही समस्या क्लिष्ट आहे. काही म्हणतात की हिंदूंनी आणि शिखांनी काही १२,००० स्त्रियांचे अपहरण केले आहे व त्यापेक्षा दुप्पट स्त्रियांचे पाकिस्तानमधील मुसलमानांनी अपहरण केले आहे. इतर काहींचे म्हणणे आहे की हा अंदाज अगदीच कमी आहे, वास्तवात ही संख्या बरीच जास्त आहे. मी म्हणेन की १२,००० ही संख्या काही कमी नाही. माझ्या दृष्टीने एक हजार कमी नाही आणि एकही कमी नाही. असे का व्हावे? कोणी एखाद्या स्त्रीला का उचलून न्यावे?

कोणी मुसलमान स्त्री आहे तिला हिंदूंनी वा शिखांनी उचलून न्यावे वा हिंदू वा शीख स्त्रीला मुसलमानांनी उचलून न्यावे असे का व्हावे? हा तर फार मोठा अत्याचार आहे. काही लोक म्हणतात की १२,००० स्त्रियांचे अपहरण करण्यात आले असे जे सांगण्यात येते ती कमीतकमी संख्या आहे. मी तर कमीत कमी संख्या घेऊ इच्छितो, परंतु माझ्याकरिता ही संख्या फार मोठी आहे. बारा हजार हिंदू स्त्रियांना मुसलमान उचलून घेऊन गेले आणि बारा हजार मुसलमान स्त्रियांना हिंदू आणि शीख उचलून घेऊन गेले. त्यांना कसे परत आणायचे हा कठीण प्रश्न आहे. या प्रश्नावरील उपाय शोधण्याकरिता या भगिनी गेल्या होत्या. मुसलमान भगिनी होत्या. त्या सर्वांनी विचार केला. जितक्या काही हिंदू आणि शीख भगिनींना उचलून घेऊन गेले आहेत त्यांना परत आणले पाहिजे म्हणून या भगिनी गेल्या होत्या. अशाच प्रकारे जितक्या मुसलमान भगिनी आहेत त्याही त्यांच्या घरी पोहोचल्या पाहिजे. असे नाही की त्यांनी येऊन घेऊन जावे. आपणच पोहोचवून दिले पाहिजे. त्या तिथे गझनफर अली (पाकिस्तानमध्ये मदत आणि पुनर्वसन खात्याचे मंत्री; अपहरण करण्यात आलेल्या स्त्रिया आणि मुले यांना परत त्यांच्या घरी पोहोचवण्याकरिता भारत आणि पाकिस्तान या उपनिवेशांची संयुक्त समिती गठित करावी असे त्यांनी या परिषदेत सुचवले होते.) यांना व एका पोलीस अधिकाऱ्यालाही त्या भेटल्या, परंतु त्या पोलीस अधिकाऱ्याचे नाव मी विसरलो. मृदुलाबेन (अंबालाल साराभाई यांची मुलगी; उपाध्यक्ष कस्तुरबा गांधी स्मृती राष्ट्रीय न्यास) आणि रामेश्वरीबेन (रामेश्वरी नेहरू; उपाध्यक्ष हरिजन सेवक संघाची केंद्रीय समिती; अध्यक्ष, मदत आणि पुनर्वसन खाते, स्त्रीविभाग) या दोघीही लाहोरला गेल्या होत्या आणि या दोघींनीही मला स्वतंत्र अहवाल दिले व अपहृत स्त्रियांना त्यांच्या मूळ घरी परत कसे पोहोचवता येईल यासंबंधी त्यांनी चर्चा केली असल्याचेही त्यांनी मला सांगितले. या स्त्रियांच्या संरक्षणाकरिता पोलिसांना वा सैन्यातील लोकांना पाठवावे लागले तर त्याला काहीही अर्थ नाही. काही हिंदू आणि शीख स्त्री कार्यकर्त्या पूर्व पंजाबमधील पोलिसांबरोबर पाकिस्तानमध्ये जाऊन त्या अपहृत स्त्रियांना सोबत घेऊन अर्थातच येऊ शकतात. परंतु दोनपैकी एकाही ठिकाणी असे झालेले नाही. असे म्हणतात की अपहृत हिंदू आणि शीख स्त्रियांनी इस्लामचा स्वीकार केला आहे व त्यांची परतण्याची इच्छा नाही. हीच गोष्ट भारतातील मुसलमान स्त्रियांचीही आहे.

आपले वर्तन रानटीपणाचे झाले आहे. ही गोष्ट पूर्व पंजाबमधील लोकांकरिता जितकी खरी आहे तितकीच पश्चिम पंजाबमधील लोकांकरिताही खरी आहे. यापैकी कोण अधिक रानटी आहे असे विचारण्यात काहीही अर्थ नाही. रानटीपणाचे मोजमाप नसते. राजा गझनफर अली म्हणतात की दोन्ही

पक्षांनी अत्याचारी वर्तन केले होते. कोण अधिक अपराधी आहे हे विचारण्यात अर्थ नाही. सामूहिक स्तरावर अत्याचार झाले आणि पहिले पाऊल कोणी टाकले हे विचारून काय उपयोग? अपहृत स्त्रियांना मदतीची गरज आहे. त्यांचा छळ करण्यात आला आहे. त्यांना परत आपल्या घरी पोहोचवले पाहिजे. पोलीस हे करू शकत नाही हा माझा विश्वास आहे. सैन्य हे करू शकत नाही. काही भगिनींना पूर्व पंजाबमध्ये पाठवा आणि काही भगिनींना पश्चिम पंजाबमध्ये पाठवा. मग काम होऊ शकते, नाही तर नाही होऊ शकत असे काही नाही. एक अनुभवी माणूस म्हणून मी सांगतो की ही पद्धत नाही. हा गुंता सरकारने सोडवायचा आहे. मला असे म्हणायचे नाही की या अपहरणामागे सरकार होते. पूर्व पंजाब सरकारने काही या अपहरणाचे आयोजन केले नव्हते. पूर्व पंजाबमध्ये हिंदू आणि शीख या अपहरणांकरिता जबाबदार होते आणि पश्चिम पंजाबमध्ये मुसलमान जबाबदार होते. अजून आपण कोणती चौकशी करणार आहो? अपहृत स्त्रियांची जी काही संख्या असेल - मी ती कमीतकमी बारा हजार समजतो - पूर्व पंजाब आणि पश्चिम पंजाबच्या लोकांनी त्या सर्वांना परत केले पाहिजे.

असे म्हणतात की आता अपहृत स्त्रियांना त्यांच्या घरातील लोक परत घ्यायला तयार नाहीत. जे लोक आपल्या अपहृत बायकोला वा मुलीला आता आम्ही परत घेणार नाही असे म्हणत असतील ते रानटी आहेत असे म्हणावे लागेल. अपहृत स्त्रियांनी काही चूक केली असे मला वाटत नाही. त्यांच्यावर हिंसक अत्याचार करण्यात आले होते. त्यांना दोष देणे, कलंकित समजणे आणि आता त्या घरात वा समाजात घेण्याच्या पात्रतेच्या नाहीत असे म्हणणे अन्याय आहे. कमीतकमी मुसलमानांमध्ये असे होत नाही. कमीतकमी इस्लाम याबाबतीत उदार आहे. यामुळे ही गोष्ट सरकारने आपल्या हातात घेतली पाहिजे. या सर्व स्त्रियांचा शोध सरकारने घेतला पाहिजे. त्यांचा शोध घेऊन त्यांना आपापल्या घरी पुनःस्थापित केले पाहिजे. पोलीस आणि स्त्री सामाजिक कार्यकर्त्या यावर प्रभावी उपाययोजना करू शकत नाही. ही समस्या किचकट आहे याचा अर्थ जनमत या बाजूने नाही. बारा हजारच्या बार हजार स्त्रियांचे गुंडांनी अपहरण केले होते असे तुम्ही म्हणू शकत नाही. चांगले लोकच गुंड झाले होते. कोणाचाही जन्म गुंड म्हणून झालेला नसतो, काही विशिष्ट परिस्थितीत ते तसे बनतात. दोन्ही सरकारांनी याबाबतीत दुबळेपणा दाखवला. अपहृत स्त्रियांचा शोध घेण्याचा एकाही सरकारने प्रयत्न केलेला नाही. अपहृत स्त्रियांना परत आणण्याकरिता दोन्ही सरकारांनी आपल्या अधिकाराचा उपयोग केला नाही. दोन्ही सरकारांनी आपल्या अधिकाराचा उपयोग केला असता तर पूर्व पंजाब आणि पश्चिम

पंजाबमध्ये जे घडले ते घडले नसते. परंतु आपल्या स्वातंत्र्याचा जन्म केवळ तीन महिन्यांपूर्वी झाला आहे. अजून ते बाल्यावस्थेत आहे.

माझ्या दृष्टिकोनातून हे विष पसरवण्याकरिता पाकिस्तान जबाबदार आहे. परंतु जबाबदार धरल्यामुळे काय लाभ होणार आहे? या अपहृत भगिनींना वाचवण्याचा एकच मार्ग आहे, तो मार्ग म्हणजे शासनाने आता तरी जागे व्हावे, आपल्या जबाबदारीची जाणीव ठेवावी, या कामाला सर्वाधिक प्राधान्य देऊन सर्व वेळ द्यावा व या कामाकरिता मरण्याचीसुद्धा तयारी ठेवावी. असे केले तरच या स्त्रियांना वाचवता येऊ शकते. असे न करता कितीही भगिनींना पूर्व पंजाब वा पश्चिम पंजाबमध्ये पाठवा काहीही होणार नाही. या बाबतीत सरकारला जर मदतीची गरज असेल तर अर्थातच आपण मदत करू शकतो.

मी काल सांगितल्याप्रमाणे मी पंधरा मिनिटांपेक्षा जास्त बोलायला नको. यामुळे मी इथे संपवतो. दोन वा तीन गोष्टी अजून राहिलेल्या आहेत व अजूनही दोन वा तीन मिनिट राहले आहेत. परंतु मी त्यांचा उपयोग करणार नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १७८-८२

---

२५. एक प्रास्ताविक

चार्ली ऍन्ड्रूज (चार्ल्स फ्रीअर ऍन्ड्रूयज, १८७१-१९४०, इंग्रज मिशनरी, लेखक आणि शिक्षणशास्त्रज्ञ. गांधीजी आणि रविंद्रनाथ टागोर यांचे जवळचे सहकारी.) ते एखाद्या मुलाप्रमाणे निष्कपट, साधेसरळ होते आणि अतिशय संकोची होते. चरित्र लेखकांनी (बनारसीदास चतुर्वेदी आणि मार्जोरी साईक्स) हे काम केवळ प्रेमापोटी केले आहे. ऍन्ड्रूज सारख्या व्यक्तीच्या जीवनाला प्रास्ताविकाची गरज नाही. ते जीवनच त्याचे प्रास्ताविक आहे.

नवी दिल्ली, डिसेंबर ८, १९४७

चार्ल्स फ्रीअर ऍन्ड्रूज, पृष्ठ १५

---

२६. अहिंसेच्या उपयोगितेला सीमा नाही

(डिसेंबर १४, १९४७च्या 'हरिजनबंधू'मध्ये याचा गुजराती अनुवाद प्रकाशित झाला होता.)

एक पत्रलेखक लिहितो -

वैयक्तिक अहिंसा मी समजू शकतो. मित्रांमधील संपूर्ण अहिंसेचीही कल्पना करता येऊ शकते. परंतु स्पष्टपणे शत्रू असलेल्या व्यक्तीशीही अहिंसक आचरण करण्यासंबंधी तुम्ही बोलता. हे मृगजळाप्रमाणे आहे. तुम्ही तुमचा हा दुराग्रह सोडाल तर फार कृपा होईल. जर तुम्ही तसे केले नाही तर तुमच्याबद्दल लोकांना जो आदर वाटतो तो वाटणार नाही. लोक तुम्हाला महात्मा मानत असल्यामुळे अनेक साध्याभोळ्या लोकांना तुम्ही गैरमार्गाला नेले आहे व त्यामुळे त्यांच्या समाजाची हानी झाली आहे ही तर त्याहूनही वाईट गोष्ट आहे.

ज्या अहिंसेचे पालन केवळ व्यक्तीच करू शकते त्या अहिंसेचा समाजाच्या दृष्टीने विचार केला तर काहीही उपयोग नसतो. माणूस समाजशील प्राणी आहे. त्याने प्राप्त केलेल्या सिद्धीचा तेव्हाच उपयोग असतो जेव्हा माणूस थोड्याशा प्रयत्नाने त्यांचा उपयोग करू शकतो. ज्या अहिंसेचा उपयोग केवळ मित्रांमध्येच करता येऊ शकतो ती अहिंसा केवळ अहिसेच्या एखाद्या ठिणगीप्रमाणे असते. तिला अहिंसेची संज्ञा देता येत नाही. "अहिंसेसमोर शत्रुत्व संपते" हे फार मोठे सुभाषित आहे. याचा अर्थ आहे शत्रुत्व जितके मोठे तितकेच ते मिटवण्याकरिता मोठी अहिंसा पाहिजे. हा गुण संपादित करण्याकरिता दीर्घ काळाचा सराव लागू शकतो, इतका की काहीच्या बाबतीत त्याकरिता अनेक जन्मही लागू शकतात. यामुळे ती निरुपयोगी ठरत नाही. तीर्थयात्रेकरिता निघालेल्या यात्रेकरूला प्रवासात दररोज संपन्न करणारे अनुभव येऊ शकतात. तो जेव्हा अंतिम टप्प्यावर पोहोचतो तेव्हा त्यामुळेच शिखरावरील अप्रतीम सौंदर्याचे तो दर्शन घेऊ शकतो. यामुळे त्याचा उत्साह वाढेल. यावरून कोणीही अशी कल्पना करू नये की अहिंसेचा मार्ग काटेकुटे नसलेल्या गुलाब फुलाच्या पाकळ्यांनी आच्छादिलेला आहे. कवी (प्रितम) म्हणतो की ईश्वराकडे जाण्याचा मार्ग केवळ शूरांकरिताच असतो. दुबळ्या अंतःकरणाच्या लोकांचे ते काम नाही. आज वातावरण इतके विषाक्त झाले आहे की प्राचिनांनी आपल्याकरिता जो बुद्धिमत्तापूर्ण वारसा सोडला आहे त्याकडे आपण दुर्लक्ष करतो व अहिसेद्वारे जे विविध प्रकारचे लहानसहान अनुभव येतात ते नाकारतो. "वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर दिल्याने वाईटपण संपते" याचा दैनंदिन जीवनात आपल्याला अनुभव येत असतो. जग केवळ विध्वंसक कृत्यांनी जर भरलेले

असते तर ते कधीचेच नष्ट झाले असते हे आपण का पाहू शकत नाही? प्रेमामुळेच म्हणजे अहिंसेमुळेच आपले हे जग टिकलेले आहे.

हे इतके आपल्याला मान्य झालेच पाहिजे. जीवनाच्या या उत्कृष्ट गोष्टींना आपल्याला प्रयत्नपूर्वक पुढे न्यावे लागेल. असे होणे स्वाभाविक आहे कारण हा आपल्या उन्नतीचा मार्ग आहे. अधःपतन सोपे असते, उर्ध्वगमन कठीण. आपल्यापैकी बहुतेक लोक अनुशासनहीन आहेत आणि लहानसहान गोष्टीवरून भांडण करण्यात आणि शिवीगाळीत आपले जीवन व्यतीत होत असते. संपूर्णपणे अनुशाषित जीवन जगणारा अहिंसेकडे सहजपणे पोहोचू शकतो.

नवी दिल्ली, डिसेंबर ८, १९४७.

'हरिजन', डिसेंबर १४, १९४७

---

२७. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांचे लेखी भाषण सभेत वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

मौनवार, डिसेंबर ८, १९४७

एका मुस्लिम सोसायटीने मला सुचीत करत लिहिले आहे की हिंदू आणि मुसलमानांच्या गोष्टी ऐकून मी वादात पडू नये. आधी चौकशी करून नंतरच मला जे काही करायचे असेल ते मी करावे. यापुढे जाऊन सोसायटीचा मला सल्ला आहे की काठेवाडमध्ये मी स्वतः जाऊनच सर्व काही पाहिले पाहिजे. मी सांगितले आहे की आज मी हे करू शकत नाही. दिल्ली आणि आजूबाजूच्या भागातच मी माझ्या धर्माचे पालन केले पाहिजे. हे सल्लागार विसरतात की माझ्या गोडीगोडीच्या पद्धतीनेच आवश्यक होते तितक्या प्रमाणात मी आरोप मागे घ्यायला लावले आहेत. माणूस जेव्हा सत्याकरिता सत्याचा शोध घेतो तेव्हा परिणाम नेहमीच चांगले होत असतात. याकरिता वारंवार प्रयत्न करण्यात आले आहेत. अशा बाबतीत धीर आणि चिकाटीला सर्वाधिक महत्त्व असते.

सिंधमधून मला पत्र येणे सुरूच आहे. कराचीत एक बंधू आहेत. त्यांचे दुःखद पत्र आले आहे. ते म्हणतात की, "इथे खून तर होत नाहीत परंतु हिंदू आणि शीख इथे सन्मानाने व प्रतिष्ठापूर्वक जगू शकत नाहीत. भारतातून तिथे गेलेले मुसलमान हिंदूंच्या घरांत शिरू शकतात आणि आम्ही इथेच राहू असे म्हणतात. त्यांना तसा अधिकार नाही, परंतु आम्ही त्यांच्यासमोर बोलण्याचे साहस करू शकत नाही. अशा प्रकारच्या किती तरी घटना घडल्या आहेत. असे वाटते की काही महिन्यांपूर्वीची कराची स्वप्नात पाहिलेली गोष्ट असावी". त्यांच्या लांबलचक पत्राचा हा सारांश आहे. पत्रात जे लिहिलेले आहे ते विश्वसनीय असावे असे मला वाटते. याचा अर्थ तिथे संपूर्ण अराजक पसरले आहे. ही तर रक्त शोषून माणसाला मारण्याची गोष्ट झाली. त्याचबरोबर यात आत्म्याचेही हनन होते. पाकिस्तानने या अराजकाला आळा घालावा अशी माझी विनंती आहे. हा रोग आहे आणि हे अराजक जितक्या लवकर संपेल तितके बरे होईल.

साखरेवरील नियंत्रण उठले आहे. धान्य, डाळी आणि कापड यांच्यावरील नियंत्रणही लवकरच उठेल. नियंत्रण काढून घेण्याचा हेतू एकदम किंमती उतराव्या असा नाही. जीवन स्वाभाविक व्हावे हा

त्यामागील हेतू आहे. वरून लादलेले निर्णय नेहमीच वाईट असतात. आपल्या देशात विशेषत्वाने असे आहे कारण आपला देश १९०० मैल लांब व १५०० मैल रुंद असा विशाल देश आहे व त्यात प्रचंड लोकसंख्या राहते. इथे देशाची फाळणी समोर ठेवण्याची आवश्यकता नाही. आम्ही सैनिकी राष्ट्र नाही. आपण आपले अन्नधान्य निर्माण करत होतो आणि कोणत्याही परिस्थितीत निर्माण करू शकतो. आपल्या गरजेपुरते कापडही आपण निर्माण करू शकतो. नियंत्रण उठल्यानंतर लोकांना मोकळेपणाने श्वास घेता येईल व त्यांना चुका करण्याचाही अधिकार राहील. चुका करत करत आणि त्या दुरुस्त करत करत पुढे जाणे हाच पूर्वापार चालत आलेला प्रगतीचा मार्ग आहे. तुम्ही जर मुलाला रुईमध्ये गुंडाळून ठेवाल तर ते गुदमरेल वा मरून जाईल. त्याचा सुदृढ माणसात विकास व्हायचा असेल तर तुम्हांला त्याला प्रत्येक प्रकारच्या अडचणींना तोंड देणे शिकवावे लागेल. याचप्रमाणे शासनाला शासन म्हणून राहायचे असेल तर तुटवड्याच्या परिस्थितीला कसे तोंड द्यावे हे त्याने जनतेला शिकवले पाहिजे. सामूहिक प्रयत्नाने कठीण काळातूनही मार्ग काढणे त्यांनी शिकायला पाहिजे. जगण्याकरिता धडपड न करता कसे तरी करून जनतेला जिवंत ठेवण्याचा प्रयत्न करणे ही काही चांगली गोष्ट नाही.

अशा प्रकारे पाहिले असता निर्नियंत्रणाचा अर्थ होतो सरकारमधील काही लोकांनीच नाही तर संपूर्ण जनतेने दूरदृष्टीचे होणे. ही गोष्ट जनतेने शिकायला पाहिजे. जनतेबद्दलच्या आपल्या कर्तव्याची परिपूर्ती करण्याकरिता शासनाला नवीन जबाबदारी उचलावी लागेल. गाड्यांची व्यवस्था सुधारावी लागेल, उत्पादन वाढवण्याच्या पद्धती लोकांना सांगाव्या लागतील. याकरिता अन्नधान्य विभागाला मोठ्या जमीनदारांऐवजी लहानलहान शेतकऱ्यांकडे अधिक लक्ष द्यावे लागेल. शासनाला एकीकडे सर्व लोकांवर विश्वास ठेवावा लागेल तर दुसरीकडे त्यांच्या कामकाजावर लक्ष ठेवून लहानलहान शेतकऱ्यांच्या हिताकडे लक्ष द्यावे लागेल. आजपर्यंत त्यांच्या हिताकडे लक्ष देण्यात आले नाही परंतु करोडो लोकांमध्ये बहुसंख्य लोक हेच आहेत. आपल्या पिकाचा उपयोग स्वतः शेतकरीच करत असतो. पिकाचा लहानसा भाग तो विकतो आणि त्याने तो आपल्या गरजेच्या इतर वस्तू विकत घेतो. नियंत्रणामुळे शेतकऱ्याला बाजारात कमी किंमत मिळते. यामुळे नियंत्रण काढल्यानंतर शेतकऱ्यांना जितके जास्त पैसे मिळतील तितक्या प्रमाणात अन्नधान्याची किंमत वाढेल. ग्राहकाची याबद्दल तक्रार असू नये. या नवीन व्यवस्थेमुळे जो नफा होईल तो सर्वच्यासर्व शेतकऱ्याच्या खिशात जाईल हे शासनाने पाहिजे. जनतेला ही गोष्ट दररोज वा दर आठवड्याला समजावून सांगितली पाहिजे. मोठमोठ्या गिरणी

मालकांनी आणि मध्यस्थांनी याबाबतीत शासनाशी सहकार्य केले पाहिजे व शासनाच्या निदेशानुसार काम केले पाहिजे.

मला असे वाटते की आज असे होत आहे. या काही लोकांमध्ये आणि संघटनांमध्ये सहकार्य असले पाहिजे. आतापर्यंत त्यांनी गरिबांचे शोषण केले आहे. त्यांच्यामध्ये जी स्पर्धा सुरू आहे ती थांबवली पाहिजे. विशेषतः अन्नधान्य आणि कापड यांच्या व्यापारात पैसे कमावण्याचा हेतू नसावा. निर्नियंत्रणामुळे व्यापारी जर भरघोस नफा घेणार असतील तर निर्नियंत्रणाचा हेतू विफल होईल. भाडवलदार आणि व्यापारी संपूर्ण सहकार्य करतील अशी आपण आशा करू या.

सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १८२-८३

---

२८. इस्मत इफ्तिखारुद्दिन यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर ९, १९४७

प्रिय इस्मत (मिया इफ्तिखारुद्दिनची पत्नी),

तुम्ही इतक्या आजारी होत्या याचा मला खेद होतो आणि आता तुम्ही चांगल्या आहा हे ऐकून मला आनंद होतो. पंजाबच्या दोन्ही भागातील गरीब बिचाऱ्या अपहृत स्त्रियांना परत आणण्याचे आवश्यक काम करण्याकरिता तुम्ही लवकरच पूर्णपणे दुरुस्त व्हायला पाहिजे. इफ्तखार (अध्यक्ष पंजाब प्रांतीय काँग्रेस कमेटीचे अध्यक्ष. १९४६साली काँग्रेस सोडली व मुस्लिम लीगमध्ये सामील. नोव्हेंबर १९४७पर्यंत पाकिस्तानमध्ये पुनर्वसन मंत्री. अध्यक्ष पंजाब मुस्लिम लीग, १९५०. त्यातून निष्काषित करण्यात आल्यानंतर आझाद काश्मीर पक्षाची स्थापना केली.) यांना सांगा की निष्ठा बदलल्यानंतर मला लिहिणे बंद करणे हा खोडकरपणा आहे.

बापू

बेगम इफ्तखारुद्दिन

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

२९. जीवनजी देसाई यांना पत्र

डिसेंबर ९, १९४७

चि. जीवनजी,

या वेळी मी फारसे लिहू शकलो नाही. तरीही भरपूर पाठवले आहे. त्या प्रत्येकाच्या दोन प्रती आहेत.

आज संध्याकाळी हिंदुस्तानीचा लेख सुशीला पूर्ण करील व त्यामुळे तो उद्या सकाळी पाठवला जाईल. मागील आठवड्यात हे इतकेच करता आले.

काही लेख का राहिले आहेत हे मला माहीत आहे. त्याकरिता कोणालाही दोष देता येत नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ६९६२. सौजन्य - जीवनजी देसाई

---

३०. एका मौलानांना पत्र

बिर्ला भवन, नवी दिल्ली,

डिसेंबर ९, १९४७

मौलाना साहेब,

दिल्लीमध्ये वास्तव्य करू इच्छिणाऱ्या मुसलमानांबद्दल मी सरदार पटेल यांच्याशी बोललो. राष्ट्रवादी मुसलमान कितीही असले आणि त्यांना हजरत निजामुद्दीनमध्ये राहण्याची इच्छा असेल तर त्याची तिथे राहण्याची व्यवस्था करण्यावर माझा कोणताही आक्षेप नाही असे ते म्हणाले. परंतु दिल्लीतील जी घरे आता रिकामी पडलेली आहेत तिथे बाहेरच्या मुसलमानांना आणून वसवण्याला मात्र त्यांचा विरोध आहे. असे केले तर जे मुसलमान ही घरे सोडून गेले आहेत ते जर परत आले तर त्यांना कुठे वसवायचे हा प्रश्न यामुळे निर्माण होईल. दुसरी गोष्ट अशी की बाहेरच्या मुसलमानांना या घरांमध्ये वसवण्यात आले तर ज्या हिंदूंना आणि शिखांना राहण्याकरिता घर मिळू शकत नाही ते यावर आक्षेप घेणे अपरिहार्य आहे. ते म्हणू शकतील की एकीकडे आम्हाला वास्तव्य करण्याकरिता जाग उपलब्ध करून देण्यात आलेली नाही आणि दुसरीकडे बाहेरून मुसलमानांना आणून या घरांमध्ये वसवले जात आहे.

मला सरदारांचा दृष्टिकोन अगदी योग्य वाटतो. यामुळे राष्ट्रवादी मुसलमानांना आणून त्यांना हजरत निजामुद्दिनमध्ये वास्तव्य करण्याकरिता तुम्ही मदत करू शकता. परंतु बाहेरच्या लोकांना शहरात वसू देता येऊ शकत नाही.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

३१. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ९, १९४७

आज मी चरखा संघाच्या सभेला हजर राहिलो आणि स्वाभाविकपणे मला तेथील स्त्रियांशी अर्धा तास बोलावे लागले. मला जर वेळ मिळाला - कारण मला १५ मिनिटात भाषण संपवायचे असते - तर त्यासंबंधी मी तुम्हाला आज सांगेन. नाही तर उद्या सांगेन.

वृत्तपत्रांमध्ये तुम्ही पाहिलेच असेल की सरदार पटेल आणि मी पिलाणीला जात आहो. का? हवामानबदलाकरिता? ती केवळ अफवा आहे. सरदारांच्या मनात काय आहे ते मला माहीत नाही परंतु मला हे निश्चित माहीत आहे की हवामानबदलाची ही वेळ नाही. सरदार दिवसभर काम करतात आणि रात्री विश्रांती घेतात, त्यांच्याकरिता हाच हवामानबदल आहे. हीच गोष्ट मलाही लागू आहे. हे खरे आहे की मला इतके आंगभर काम नाही कारण मला सरकार चालवावे लागत नाही. परंतु मला अनेक लोक भेटायला येतात आणि मी थकून जातो. यामुळे मला स्वतःला विश्रांती द्यावी लागते. सध्या दिल्लीतील हवामान अनुकूल आहे व त्यामुळे हवामानबदलाकरिता बाहेर जाण्याचे कारण नाही. पिलाणी काय देऊ शकते? माझा जोपर्यंत संबंध आहे मी करा वा मराची शपथ घेतलेली आहे. अजून माझी ती शपथ पूर्ण झालेली नाही. वर्तमानपत्रे अशा अफवा का छापतात हे मला कळत नाही. यावरून मी इतकाच निष्कर्ष काढू शकतो की वृत्तपत्रात येणारा बराचसा भाग सत्यावर आधारित नसतो. नंतर मला कळले की - वृत्तपत्रांद्वारे नाही - आम्ही तिथे जाणार असल्यामुळे आम्हाला साखर, गहू आणि इतर साहित्य किती लागेल यासंबंधीचे जयपूरहून निदेश देण्यात आले होते. जरी केवळ आम्हा दोन माणसांकरिता व्यवस्था करायची होती तरी तेवढ्याने बाजारात तुटवडा निर्माण झाल्याचे दिसते. अर्थातच ही सगळी वदंता होती. हे जर खरे असेल तर आमच्या हालचालीने बाजारात खळबळ माजावी ही धक्कादायक बाब होती. आम्ही केवळ खाण्याकरिता जगतो वा आमच्यामागे प्रचंड ताफा असतो असाच याचा अर्थ होतो. असे होऊ नये. सरदार गरीब माणूस आहे आणि मीसुद्धा. हे खरे आहे की ते प्रासादतुल्य घरात राहतात; आणि मीसुद्धा तशात घरात राहतो. खरे म्हणजे आम्ही मातीच्या झोपडीत राहावे हीच माझ्याकरिता आणि त्यांच्याकरिता उत्तम गोष्ट आहे. असो, तर अफवा कशा पसरतात हे मला तुम्हाला सांगायचे होते.

अखेरीस मी इथे उपलब्ध आहे. मी पिलाणीला जात आहे काय हे ते मला विचारू शकले असते. या बाबतीतत मला असोसिएटेड प्रेसची तारही आली आणि त्यामुळे तर मी अजूनच दुखावलो. सरदार सतत कामात असतात परंतु आम्ही जात आहो काय असे तर ते मला विचारूच शकले असते.

सिंधमधील एका मित्राचे मला पत्र आले आहे. त्याने आपले नाव दिले आहे, परंतु मी त्यांचे नाव उघड करणार नाही. मी असे केले तर त्यांना काही वाटणार नाही हे मला माहीत आहे. सिंधमधील हरिजनांना भोगाव्या लागणाऱ्या त्रासासंबंधी एका डॉक्टरचे जे पत्र आले होते त्यासंबंधी मी तुम्हाला सांगितलेच आहे. (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर ३, १९४७) त्या डॉक्टरला अटक झाली. त्या डॉक्टरने मला लिहिले म्हणून अटक झाली की इतर कोणत्या कारणाने हे मला माहीत नाही. हरिजनांची सेवा करणाऱ्या अनेकांना अटक झाली आहे. सिंधमध्ये हे असे घडत आहे. मला मान्य आहे की लोकांचा खून होत नाही, परंतु मी तुम्हाला सांगितल्याप्रमाणे कालची गोष्ट खुनापेक्षाही वाईट आहे. तुम्ही जेव्हा एखाद्याचा खून करता तेव्हा तो मरतो आणि लोक त्या तथ्याशी जुळवून घेतात. परंतु लोकांचा छळ करणे आणि कणाकणाने त्यांना मारणे ही गोष्ट खुनापेक्षाही वाईट आहे. एका माणसाला अटक करण्यात आली होती आणि नंतर सोडण्यात आले होते - शक्य आहे की ते इतरांनाही सोडतील. परंतु अशा प्रकारे लोकांना अटक करणे वाईट आहे. पाकिस्तान सरकारवर दोषारोपण करण्याची माझी इच्छा नाही, परंतु मी त्यांना सूचीत करू इच्छितो की हरिजन कार्यकर्त्यांना जर ते अशा प्रकारे अटक करत राहतील तर त्या कार्यकर्त्यांना सिंधमध्ये राहणे अशक्य होईल. हीच गोष्ट हरिजनांकरिताही खरी आहे. अशा प्रकारच्या गोष्टी ब्रिटिशांच्या काळात सतत घडत असत. आजही आपण असेच सुरू ठेवले पाहिजे काय?

अजून माझ्याकरिता काही मिनीट आहेत. यामुळे मी तुम्हाला दुसऱ्या विषयासंबंधी म्हणजे स्त्रियांसबंधी सांगेन. कस्तुरबा विश्वस्त संस्था स्थापन करण्यात आली कारण भारतात सात लाख खेडी आहेत व तिथे राहणाऱ्या स्त्री-पुरुषांची सेवा करणे आवश्यक आहे. परंतु आज आपल्याला याहून मोठे विषय भेडसावत आहेत. मुसलमानांनी मोठ्या संख्येत हिंदू आणि शीख स्त्रियांचे अपहरण केले आहे आणि तितक्याच मोठ्या संख्येत हिंदूंनी आणि शिखांनी मुसलमान स्त्रियांचे अपहरण केले आहे. कोणत्या समाजाच्या लोकांनी जास्त स्त्रियांचे अपहरण केले आहे हा विषय बाजूला ठेवा. ते काहीही असले तरी प्रत्येक सरकारच्या अंतर्गत बारा हजारपेक्षा कमी स्त्रियांचे अपहरण झालेले नाही. अशा

परिस्थितीत कस्तुरबा विश्वस्त संस्थेने काय केले पाहिजे? मला जे काही करता येणे शक्य आहे ते मी करीन. एक गोष्ट स्पष्ट आहे की आपली स्वतःची जाहीरात करण्याकरिता आपण हे काम करू शकत नाही. जनसेवक असलेल्या लोकांनी सेवेचे काम केले पाहिजे. एकदा काम संपले की संपले. वृत्तपत्रांमध्ये ती बाब आली की नाही याला काहीही महत्त्व नसते. याशिवाय स्त्रियांकरिता आपल्याला ज्या अनेक गोष्टी करायच्या आहेत त्यांचा विचार करावा लागतो. मी काही गोष्टी सुचवू शकतो. आपल्यामधील पुष्कळशा स्त्री कार्यकर्त्या शहरातील आहेत. त्यातील काही खेड्यांमधीलही असू शकतील परंतु त्यांचाही शहरांशी संबंध असतो. मला असे म्हणायचे नाही की ही गोष्ट वाईट आहे वा शहराशी कोणत्याही प्रकारचा संबंध असणे चूक आहे. परंतु गत १५० वर्षांचा इतिहास पाहता खेड्यांमधील संपत्तीचे शोषण करण्याकडे शहरांचा कल राहिला आहे. ते खेड्यातून कच्चा माल घेतात, परदेशांशी त्यांचा व्यापार करतात व करोडो रुपये कमावतात. हा पैसा खेड्यात जात नाही वा गेलाच तर त्यातील अगदी अल्पांश जातो. त्यातील बहुतेक पैसा कोट्याधीशांकडे वा गिरणीमालकांकडे जातो. शहरे खेड्यांच्या शोषणाकरिता अस्तित्वात आहेत. यामुळे खेड्यांच्या चौकटीत शहरांची संस्कृती नीट बसत नाही. शहरातील स्त्री कार्यकर्तीने खेड्यात शहराचे वातावरण आणि शहरी मार्ग नेऊ नये. तिच्याजवळ भरपूर पैसा आणि विलासाची किती तरी साधने असू शकतील. तिच्याजवळ मोटारगाडी, सौंदर्य प्रसाधने, रेशमी पोषाख, स्वदेशी वा विदेशी टूथपेस्ट, टूथब्रश, नाजूक जोडे आणि चपला अशा किती तरी गोष्टी असू शकतील. या सर्व गोष्टी घेऊन जर ती खेड्यात जाईल तर ती खेड्यांची सेवा कशी करू शकेल? आपल्याकरिता या आदर्श गोष्टी आहेत असे ग्रामीणांना वाटले तर या गोष्टी ग्रामीणांना खाऊन टाकतील. शहरांचे अस्तित्व खेड्यांची समृद्धी वाढवण्याकरिता असले पाहिजे, ग्रामीण भागातील संस्कृतीच्या विकासाकरिता पैसा उपलब्ध करून देण्याकरिता असले पाहिजे. परंतु आज जे काही घडते आहे ते अगदी याविरुद्ध आहे. मी तुम्हाला सर्व गोष्टी स्पष्ट करून सांगू शकत नाही. परंतु इतके सांगतो की ज्या भगिनींना खरी सेवा करायची असेल, शोषण करायचे नसेल, त्यांनी विवेकबुद्धी ठेवली पाहिजे. आणि विवेक ठेवून ज्या गोष्टी खेड्यात जाऊ शकतात केवळ त्याच गोष्टी खेड्यात नेल्या पाहिजे. ज्या सुधारणा करायच्या असतील त्याही गावांच्या साच्यात राहून केल्या पाहिजे. असे केले तरच आपली जी सात लाख खेडी आज अवनतावस्थेत आहेत त्यांचा उद्धार होऊ शकेल. असे काही नाही की खेड्यात जंगली लोक राहतात, तिथे कला नाही, तेथील जीवनात कोणतीच चांगली गोष्ट नाही.

ग्रामीण जीवनात किती तरी सौंदर्य भरलेले आहे असे माझे मत आहे. तिथे किती तरी कला भरलेली आहे, किती तरी उद्योग आहेत. सर्व जगाला त्यांची माहिती आहे. येथील उद्योगाचे उदाहरण म्हणूनच पश्चिमेत गेले. तर आज मी इतकेच सागू इच्छितो की ज्या भगिनींना सेवा करायची आहे त्यांनी लक्षात ठेवले पाहिजे की शहरातील गोष्टी शहरातच ठेवून दिल्या पाहिजे. असे केले तरच कोट्यवधी भगिनींना आणि मुलांना त्या मदत करू शकतील. इतके तर आम्ही करूच शकतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १८५-८

---

३२. प्रश्नपेटी

प्रश्न - जेव्हा केव्हा गांधीजींसमोर कठीण समस्या निर्माण होते तेव्हा ते उपोषणाचा आधार का घेतात? भारतीयांच्या जीवनावर याचा कसा प्रभाव पडेल?

उत्तर - अशा प्रकारचा प्रश्न मला आधीही विचारण्यात आला आहे परंतु कदाचित याच शब्दांत नाही. याचे उत्तर साधेसरळ आहे. अहिंसेच्या पुजाऱ्याजवळ हेच अंतिम शस्त्र असते. माणसाची बुद्धी जेव्हा काम करत नाही तेव्हा तो उपोषणाचा आधार घेतो. उपवासात प्रार्थनेची भावना प्रबळ असते. उपोषण हे एक आध्यात्मिक कार्य आहे. यामुळे ते ईश्वराला समर्पित असते. अशा प्रकारच्या कामाचा जनतेच्या मनावर पुढीलप्रमाणे परिणाम होऊ शकतो. उपोषण करणाराला तुम्ही ओळखत असाल तर त्याच्या उपोषणामुळे तुमचा सुप्त आत्मा जागा होतो. परंतु त्यात एक धोका असतो. आपल्या प्रिय व्यक्तीचा जीव वाचवण्याकरिता लोक खोटी सहानुभूती दाखवून आपल्या इच्छेविरुद्ध काम करण्याची शक्यता असते. परंतु अशा धोक्यांना तोंड द्यावेच लागत असते. विशिष्ट गोष्ट योग्य आहे अशी जर माणसाची खात्री पटली असेल तर त्याने ते काम करणे थांबवू नये. अशा प्रकारचे काम आपल्या अंतरात्म्याच्या आवाजाप्रमाणे केले जाते. यामुळे त्यात घाईगडबडीची शक्यता कमी असते.

नवी दिल्ली, डिसेंबर १०, १९४७

'हरिजन', डिसेंबर २१, १९४७

---

३३. खोलवर रुजलेली मुळे

एक पत्रलेखक पुढीलप्रमाणे लिहितो - स्वातंत्र्य मिळाल्यानंतरही शहरी लोकांच्या मनावरील इंग्रजीचा पगडा कोणत्याही प्रकारे कमी झालेला दिसत नाही. आपल्या म्हणण्याच्या पुष्ट्यर्थ तो मुंबईमध्ये भरलेल्या औद्योगिक आणि कृषिविषयक प्रदर्शनांचा उल्लेख करतो. त्या प्रदर्शनात उद्‌घाटनपर भाषण इंग्रजीत झाले होते, फलक इंग्रजीत रंगवण्यात आले होते व पुषकळसा पत्रव्यवहार इंग्रजीत होत होता. रेशनकार्ड इंग्रजीत होते. यामुळे इंग्रजी न येणाऱ्या सर्वसामान्य लोकांना फार त्रास झाला. बिचाऱ्या गरीब जनतेचा विचार न करणाऱ्या आमच्या पुढाऱ्यांना आपल्या महत्त्वाच्या घोषणा इंग्रजीतच असल्या पाहिजे असे वाटत असते.

ही तक्रार योग्य आहे आणि ही त्वरित दूर केली पाहिजे. या महत्त्वपूर्ण सुधारेणेत तोपर्यंत प्रगती होणार नाही जोपर्यंत आमचे दुर्दैवी औदासिन्य दूर होत नाही.

नवी दिल्ली, डिसेंबर १०, १९४७

'हरिजन', डिसेंबर २१, १९४७

---

३४. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल मी तुम्हाला सांगितले होते की मी अखिल भारतीय चरखा संघाच्या सभेकरिता गेलो होतो व तेथील स्त्रियांशी काही वेळ बोललो होतो. आजही मला तालिमी संघाच्या सभेला जायचे आहे. हेही शक्य आहे की आज कदाचित मी त्या सभेकरिता जाणार नाही. आज मी चरखा संघाच्या सभेविषयी सांगायला पाहिजे. चरखा संघ काय आहे हे तुम्हाला माहीत आहे. त्यात खादी आणि पर्यायाने चरख्याशी संबंधित कार्य होते. आधी कापसातून सरकी काढावी लागते, त्याची धुनाई करावी लागते, रुईचे पेळू तयार करावे लागतात मग सूतकताई आणि विणाई या गोष्टी येतात. भारतातील करोडो लोक जर हे काम करू लागतील - हे काम सोपे आहे, आपण ते मुलांनासुद्ध शिकवू शकतो - तर कापडावर होणारा सर्व खर्च वाचू शकेल. अशा प्रकारे खेड्यांमध्ये जर कापड तयार करण्यात आले तर ते जवळपास फुकट होते. आणि कापसाचे पीक जर खेड्यात घेण्यात आले तर ही बचत दुप्पट होते कारण कापडावर आपल्याला काहीही खर्च करावा लागणार नाही व हस्तोद्योगाचा लाभ मिळून आपली समृद्धीही वाढू शकते. यामुळे आपण जर मूर्खपणाने वागलो नाही तर आपल्या देशात कापडाची तूट निर्माण होण्याचे कारण नाही असे मला वाटते. भारतात एकही कापडगिरणी राहिली नाही तरी कापडाची तूट होणार नाही. आज आपल्याला गिरण्यांच्या तोंडाकडे पाहावे लागते. आपण चरखा आणि खादी यांना विसरलो आहो. लोक निश्चितच खादी टोपी घालतात कारण त्यांना तिची सवय झाली आहे. तिच्या मदतीने आपण स्वातंत्र्याचा लढा लढलो होतो,. परंतु आज तिच्यात तो जिवंतपणा नाही. आपल्या जीवनात खादीला ते जिवंत स्थान नाही. चरखा संघ अनेक वर्षांपासून काम करत आहे. त्याने कोट्यवधी रुपये वाटले आहेत. आणि तरीही आपण जिथे होतो तिथेच आहो. ही गोष्ट विचार करण्यासारखी आहे. चरखा आपल्याला अहिंसा शिकवतो. प्रत्येकाने चरखा घेतला तर गावातील लोकांची संपन्नता वाढेल आणि गावात आज जे निराशाजनक चित्र दिसते ते दिसणार नाही. चरखा आणि खादीमुळे कापडाची तूट कशी भरून निघू शकेल व गिरणी कापड विकत घेण्याची गरज न राहिल्यामुळे रोख जरी नाही तरी बचतीच्या स्वरूपात

गावखेड्यातील लोकांना करोडो रुपये कसे देता येतील हे या सभेतील चर्चेच्या दरम्यान दाखवण्यात आले. खादी तयार करण्याकरिता आपल्याला कापूस विकत घ्यावा लागेल असे कदाचित सांगितले जाईल. परंतु कापसाची किंमत फार अल्प असेल. आज जितका कापूस निर्माण होतो तितक्याचा जर आपण उपयोग केला तर तितके पुरेसे असेल. परंतु सरकार गिरण्यांना सर्व सोयीसवलती देते, त्यांना शेतकऱ्यांपेक्षा भांडवलदारांची जास्त फिकीर आहे. हे दुर्दैवी सत्य आहे. मी भांडवलदारांच्या विरोधात नाही. मी स्वतः भांडवलदाराच्या घरात राहतो आहे. परंतु भाडवलदारांनी धारण केलेल्या वृत्तीची मला माहिती आहे. आम्ही गरिबांकरिता सर्व काही करत आहो असे सरकार म्हणू शकेल. परंतु ब्रिटिशसुद्धा असेच म्हणत होते. परंतु गरिबांच्या हिताचा विचार केला जात नाही हेच सत्य आहे. सरकारने ही गोष्ट नम्रपणे मान्य केली पाहिजे. गरिबांना मदत केली पाहिजे असे म्हणणे सोपे आहे. मंत्र्यांनी खेड्यात राहायला जायचा निर्णय घ्यावा. ते जर खरे समाजवादी असतील - आणि माझे चालले तर मी त्यांना तसे व्हायला लावीन - ते जर गरिबांचे, केवळ कामगारांचेच नाही तर किती तरी जास्त गरीब असलेल्या शेतकऱ्यांचे खरे सेवक असतील, जर त्यांना जनतेचा उद्धार करायचा असेल तर तुम्ही केवळ खादी वापरा असे मी त्यांना सांगेन. आपल्याला लागणारी खादी आपल्या स्वतःच्या घरी निर्माण करण्याला मनाई करील असे काहीही नाही. ते काय करत आहेत हे मी लोकांना सांगेन. मी जेव्हापासून इथे आलो तेव्हापासून मी हे लोकांना सांगतो आहे परंतु मी काहीही साध्य करू शकलो नाही. खेड्यांकरिता कोट्यवधी रुपये गोळा करण्याशिवाय मी अधिक काहीही करू शकलो नाही. परंतु प्रत्येक घरात चरख्याचे संगीत ऐकू यावे आणि खादीशिवाय कोणतेच कापड दिसू नये अशी माझी इच्छा आहे. असे जर झाले तर आज गावांमध्ये जी गरिबी दिसते ती दिसेनाशी होईल. असे अजून घडले नाही हे आपले दुर्दैव आहे.

इतर बाबतीतही सर्व काही ठीक सुरू आहे, काही गडबड नाही असे आपण म्हणू शकत नाही. “इथे काही मुसलमान राहिलेले आहेत, त्यांनाही राहू देणार नाही. ज्या मशिदी शिल्लक आहेत त्या ताब्यात घेऊ आणि त्यांच्यात हिंदू राहतील.” अशी भाषणे सुरू आहेत. मी वक्त्याचे नाव घेणार नाही, कारण सगळी नावे अजून आलेली नाहीत पण हिंदू मुसलमानांसंबंधी अशी व्याख्याने सुरू आहेत म्हणून मी ऐकतो. मग हे काय करतील हे केवळ देवालाच माहीत, मला माहीत नाही. जर मशिदीत हिंदू राहू लागतील तर मग तो हिंदू धर्माचा अंत होईल. इतके दिल्लीकरिता पुरे.

आता अजमेरचीही गोष्ट निदर्शनास आली आहे. अजमेरमध्येही असेच होत आहे. तिथे तर मी अनेकदा गेलो आहे. तिथे मुसलमान राहतात, हिंदू राहतात. तिथे फार मोठा मुसलमानांचा दर्गा आहे (हजरत मोइनुद्दिन चिश्ती यांचा). तिथे हिंदूही जातात आणि तिथे जाऊन हिंदू नवसही बोलतात. अशाच प्रकारे मुसलमानही जातात. मग सर्व एक झाले. असे चालत असते. धर्माने नाही, कर्माने. हिंदू-मुसलमानांचे तिथे कधीच भांडण झाले नाही अशी गोष्ट नाही. होत असते परंतु आज जास्तच झाले आहे. वर्तमानपत्रात असे काहीसे आले आहे आणि त्यावरून कळते की तिथे अनेक मुसलमान मारले गेले आहेत. आधी तर ते घाबरले आणि घाबरून पळून गेले. मग दंगल झाली. असे ऐकतो की आजूबाजूच्या खेड्यापाड्यातही असेच होत आहे. संपूर्ण बातमी मिळेल तेव्हा सर्व काही सांगेन. इतके तर सांगेनच की ही लाजिरवाणी गोष्ट आहे. ईश्वराला आपण प्रार्थना करू या आणि त्याला विनंती करू या की असे काही न करण्याची त्याने आम्हाला सद्बुद्धी द्यावी. आपले इतके अधःपतन होऊ नये की त्यामुळे हिंदू धर्माचाच नाश होईल. मुसलमानांचा नाश करण्याच्या निमित्ताने हिंदू धर्माचाच नाश व्हावा ही तर काही चांगली गोष्ट नाही. आपल्याला जर जिवंत राहायचे असेल तर आम्हाला सर्वांना जिवंत ठेवावे लागेल. असे करू तेव्हाच आपण जिवंत राहू. ईश्वराने असे काही सांगितले नाही की एकाला मारू तेव्हाच दुसरा जिवंत राहू शकेल. पाकिस्तानमध्ये सर्व हिंदू आणि शिखांना मारून टाकावे आणि भारतात सर्व मुसलमानांना मारून टाकावे व जे शिल्लक राहतील त्यांना गुलाम करावे असे तर होऊ शकत नाही. मी तर म्हणेन की आम्ही विनाशाचे काम करत आहो. संस्कृतमध्ये एक सुभाषित आहे - विनाशकाले विपरीत बुद्धी. आपची बुद्धी विपरीत झाली आहे. मुसलमानांना मारा, कापा, बाहेर हाकलून द्या ही पागलपणाची भाषा आहे. अशा बऱ्याचशा गोष्टी झाल्या आहेत परंतु त्या सर्व सांगू शकत नाही कारण १५ मिनिटांपेक्षा जास्त बोलायचे नाही असे मी ठरवले आहे आणि त्याकरिता मी घड्याळ बाहेर काढून ठेवतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १८९-९२

---

३५. प्रांतांचा राज्यपाल कोणी व्हावे?

(याचा हिंदी अनुवाद डिसेंबर २१, १९४७च्या हरिजनसेवकमध्ये प्रकाशित झाला होता.)

प्राचार्य श्रीमन नारायण अग्रवाल यांनी हिंदुस्तानीत लिहिलेल्या लेखाचा हा मुक्त अनुवाद आहे.

"घटनासमितीद्वारे तयार करण्यात येत असलेल्या घटनेत राज्याच्या राज्यपालाची निवड राज्यातील प्रौढ लोकांद्वारे बहुमताने करण्याचा प्रस्ताव आहे. यावरून कोणी असा निष्कर्ष काढू शकेल की काँग्रेस सांसदीय पक्षाने नामित केलेली व्यक्तीच राज्यपाल म्हणून निवडून येईल. राज्याचा मुख्यमंत्रीसुद्धा काँग्रेस पक्षाचाच असेल. परंतु राज्याचा राज्यपाल संबंधित राज्याच्या पक्षीय राजकारणापासून दूर असला पाहिजे. तसेच राज्याच्या मुख्यमंत्र्याच्या अवाजवी प्रभावाखाली तो यायला नको आणि त्याच्यात आणि मुख्यंमंत्र्यात संघर्षही निर्माण व्हायला नको असे सर्वसामान्य व्यवहारज्ञान सांगते.

"माझ्या मते राज्यपालाची गरजच नसावी. मुख्यमंत्र्याला राज्यपालाचे स्थान घेता आले पाहिजे आणि असे केले तर राज्यपालाच्या व्यवस्थेकरिता खर्च होणारे जनतेचे ५५०० रुपयेही वाचतील. शिवाय कोणत्याही परिस्थितीत राज्याचा राज्यपाल होणारी व्यक्ती त्याच प्रांताची नसावी.

"याशिवाय अशा प्रकारे बहुसंख्य प्रौढ मतदारांद्वारे राज्यपालाच्या निवडणुकीचा खर्च आणि त्रासही वाचेल. संघराज्याच्या अध्यक्षांने वर सुचवलेल्या कसोटीप्रमाणे राज्यपालाची निवड करणे उचित होणार नाही काय? अशा प्रकारचे राज्यपाल आपल्या राज्यातील सार्वजनिक जीवनाचे स्वरूपही बदलवून टाकतील. सध्याच्या राज्यपालाची नियुक्ती वरील तत्त्वावर केंद्रीय मंत्रिमंडळाद्वारे केली जाते. यामुळे याचा त्यांच्या राज्यावर हितकर प्रभाव पडला आहे. परंतु तयार करण्यात येत असलेल्या घटनेमध्ये राज्यपाल पदाकरिता जर निवडणूक झाली तर तिचा परिणाम हितकर होणार नाही अशी मला भीती वाटते.

"याशिवाय केंद्रीकरणाची वाढती भूक शमवण्याऐवजी वाढत्या विकेंद्रीकरणाचा आधार ग्रामपंचायतींना मानले जाईल या मुद्द्याचा भावी घटनेत कुठेही उल्लेख नाही. होऊ घातलेल्या घटनेत कोणालाही जाणवू शकतील असे अनेक दोष असू शकतील. परंतु आपल्या अनुभवी नेत्यांवर टीका

करण्याचा ना तर मला अधिकार आहे ना इच्छा. घटनेत मला जाणवलेले दोष तुमच्या निदर्शनास आणून द्यावे व त्याबद्दल मार्गदर्शन मिळावे एवढ्याचकरिता मी हे साहस केले आहे."

राज्याच्या राज्यपालाच्या निवडणुकीसंबंधी प्राचार्य अग्रवाल यांच्या युक्तिवादाच्या बाजूने अजूनही बरेचसे काही सांगता येण्यासारखे आहे. घटनासमितीच्या कामकाजासंबंधी मी फारशी माहिती मिळवू शकलेलो नाही ही गोष्ट मी कबूल केली पाहिजे. चर्चाधीन प्रस्ताव कोणत्या परिस्थितीत मांडण्यात आला हेही मला माहीत नाही. परंतु केवळ त्या प्रस्तावाचा विचार केला तर त्याच्यावर टीका होणे अपरिहार्य आहे असे मला वाटते. सार्वजनिक महसुलातील पैनपै वाचवली पाहिजे हे खरे असले तरी राज्यपालपद काढून टाकून मुख्यमंत्र्यांना त्याचे स्थान देणे ही गोष्ट वाईट अर्थशास्त्राची द्योतक होईल. राज्यापालाला फार जास्त अधिकार देण्याला जरी मी विरोध करीन तरी राज्यपाल केवळ नामधारी प्रमुख असावा अशी कल्पनाही मी करू शकत नाही. मंत्रिमंडळाच्या धोरणाला अजून चांगले वळण लावता येण्याइतके अधिकार त्याला असले पाहिजे. आपल्या तटस्थ दृष्टिकोनामुळे त्याला परिस्थितीचे योग्य आकलन करून घेता येऊ शकेल आणि मंत्रिमंडळाकडून होणारी चूक तो टाळू शकेल. त्याचा त्याच्या राज्यात नैतिक प्रभाव असला पाहिजे.

प्रस्तावित घटनेत ग्रामपंचायत आणि विकेंद्रीकरण यांच्यासंबंधी कोणताही उल्लेख नाही असे प्राचार्य अग्रवाल यांचे म्हणणे आहे. असे असेल तर ही नक्कीच चूक आहे. आपल्या स्वातंत्र्यातून जनतेचा आवाज जर प्रतिध्वनित व्हावयाचा असेल तर या चुकीकडे ताबडतोब लक्ष दिले पाहिजे. पंचायतीला जितके अधिकार जास्त तितकेच ते लोकांकरिता बरे होईल. शिवाय पंचायती कार्यक्षम आणि प्रभावी होण्याकरिता लोकांच्या शिक्षणाची पातळी भरपूर प्रमाणात वाढली पाहिजे. सैन्यशक्तीत वाढ करून लोकशक्ती वाढते असे मला वाटत नाही. उलट लोकांच्या नैतिक शक्तीत वाढ झाल्यामुळेच लोकांची शक्ती वाढत असते. नयी तालीमचा मी याच दृष्टीने विचार करतो आहे.

नवी दिल्ली, डिसेंबर ११, १९४७

'हरिजन', डिसेंबर २१, १९४७

---

३६. मणिलाल बी. देसाई यांना पत्र

डिसेंबर ११, १९४७

चि. मणिलाल,

मला आजच तुझे पत्र मिळाले. दिनशाबरोबर पाठवलेले एक पत्रही मिळाले. आता मी पहिल्या पत्राचे उत्तर देत आहे. गंगाबेन (पुरुषोत्तम भट्ट यांची पत्नी) तिथे गेल्या ही खरोखरच स्वागतार्ह बातमी आहे.

त्या जर तिथे नेहमीकरिता राहू शकत असतील तर त्याहून अधिक चांगले काहीही असू शकत नाही. परंतु हे पुरुषोत्तमच्या (पुरुषोत्तम भट्ट) प्रकृतीवर अवलंबून असेल.

प्राथमिक शिक्षकांचे शिबिर तिथे होणार असेल तर मला आनंदच होईल. शिबिरामुळे कोणतीही आर्थिक जबाबदारी येऊ नये ही अट रास्तच आहे.

बाळकोबाचा निधी पूर्ण होईल अशी आशा आहे. धीरू चिकाटीपूर्वक प्रयत्न करत आहे ही आश्चर्याची गोष्ट नाही कारण तो त्याचा स्वभाव आहे.

हरिभाऊ फाटक यांनी पाठवलेले गृहस्थ तिथे राहू शकत असतील व त्यांची तुम्हांला मदत होऊ शकत असेल तर ते चांगले होईल. परंतु त्यांची काम करण्याची शक्यता त्यांना मूर्च्छा येण्यावर अवलंबून आहे.

रामनाम जमीन विकत न घेता अजून कोणती तरी जमीन विकत घेण्याचा निर्णय चांगला आहे. तुला त्याकरिता पैसा कुठून मिळेल?

उरुळीचे काम कितीही हळू चालले तरी ते योग्य पद्धतीने चालत असेल तर माझे समाधान होईल.

तुमच्या आजीवन सेवेचा प्रतिध्वनी इतर लोकांमध्ये निश्चितच उमटेल. त्यांच्यावर पडणारा प्रभाव अहिंसेचे फळ असेल. अहिंसेशिवाय ग्रामोद्धार मला अशक्यप्राय वाटतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. २७२४. सौजन्य - मणिभाई बी. देसाई

३७. विजयालक्ष्मी पंडित यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर ११, १९४७

चि. विजयालक्ष्मी बेन,

तुला हे पत्र उरुळी कांचनचे श्री दातार देतील. त्यांचा मुलगा माधवराव आंधळा आहे. रशियात आंधळ्यांना नवीन डोळे देतात असे त्यांनी कुठे तरी वाचले आहे. हे खरे असेल तर दातार आपल्या मुलाला रशियात घेऊन जातील. हे जर शक्य असेल तर शक्य ते कर. दातारांची आर्थिक परिस्थिती चांगली आहे व ते आपला खर्च करू शकतील.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

३८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ११, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका बंधूची इच्छा आहे की कुराण शरीफमधील ज्या आयती आपण म्हणतो त्यांचा अर्थ समजून सागितला तर बरे होईल. या आयती प्राचीन आहेत. कुराणची रचना महम्मद साहेबांनी केली होती. तेराशे वर्षांपूर्वी ते त्यांना सांगण्यात आले होते. त्यातील जो भाग आपण प्रार्थनेत म्हणतो तो आपल्या मंत्रांप्रमाणे पूज्य आहे. ते वाचल्याने जसे माणसाला पुण्य मिळते तसेच कुराण शरीफमधील या आयतींबद्दलही समजा. अर्थ कळो वा न कळो शुद्ध उच्चारणामुळेच पुण्य मिळून जाते. मी केवळ त्याचा अर्थ सांगू शकतो, सार सांगू शकतो कारण मला अरबी वा फारसी येत नाही. माझ्याजवळ त्याचे भाषांतर आहे, परंतु ते इथे नाही. आता तर ते माझ्याजवळ नाही, परंतु उद्या सांगेन. याचा अर्थ आहे आम्ही ईश्वराची प्रार्थना करतो. ईश्वर एकच आहे. मग त्याला कोणत्याही नावाने संबोधा. त्याचे एक नाव अल्ला आहे. तो कसा आहे, त्याची विशेषणे दिली आहेत. तो रहीम आहे, रेहमान आहे, दयावान आहे, दयेचा भांडार आहे. ईश्वर एक आहे, अनेक नाही हेच त्यात येते. त्यात असेही आहे की तो आम्हांला सैतानापासून वाचवू शकतो, सैतान तर आम्हांला अधःपतीत करतो व आम्हांला पापकृत्ये करायला लावतो. तर तो ईश्वर त्या सैतानापासून आपल्याला वाचवू शकतो. माणूस आपण होऊन सत्कृत्ये करत नसतो तर ईश्वर त्याला तसे करण्याची प्रेरणा देतो. माणूस सागरातील एखाद्या थेंबासारखा असतो. ईश्वर माणसाला वाचवणार नसेल तर सैतान त्याला खाऊन टाकील. ईश्वर महान आहे. तो सर्व काही आहे. त्याची कृपा असेल तर आपण वाचू शकतो. तर मी म्हणेन की आपण त्याचा जितका जप करू, त्याचे मनन चिंतन करू, त्याने सांगितलेल्या मार्गाने चालू तितके कमीच आहे. यामुळेच जग चालते. मग तुम्ही विचाराल की मुसलमान असे मिथ्याचरण का करतात? त्याचे उत्तर हेच असू शकते की ज्या ख्रिश्चनांनी इतकी प्रगती केली, जे विद्वान आहेत, ते बायबलमधील शिकवणुकीनुसार आचरण करतात काय? गायत्रीमंत्रानुसार आचरण करणारे हिंदू कुठे आहेत? तो किती मोठा मंत्र आहे? आपण उपनिषदातील मंत्र म्हणतो, ईशावास्यमिदंम् सर्वम्. याचा अर्थ होतो सर्व जग ईश्वराने भरलेले आहे,

व्याप्त आहे. सर्व काही तोच देतो. तर माणूस म्हणतो की माझ्याजवळ जे काही आहे ते सर्व त्याचेच आहे. आपण सर्व गोष्टींचा त्याग केला पाहिजे आणि केवळ आवश्यक असेल तितक्याचा उपभोग घेतला पाहिजे. आपले स्वतःचे काहीही नाही. घरदार सर्व ईश्वरार्पण केले. ही तर फार मोठी गोष्ट आहे. नंतर असे आहे की दुसऱ्याची जी संपत्ती असेल तिचा द्वेष करू नका. तिची इच्छासुद्धा करू नका. त्या मंत्रात हे सर्व काही आहे. या एकाच मंत्राप्रमाणे सर्व हिंदू आचरण करतील तर सगळे जग चालेल - कारण हा मंत्र केवळ हिंदूंकरिताच थोडा आहे, त्यात हिंदू हा शब्दसुद्धा नाही - शीख चालतील, शीख हा मंत्र मानत नाहीत असे थोडेच आहे, याप्रमाणे आपण वागलो असतो तर आज जगात जे कारुण्यपूर्ण दृश्य दिसते ते थोडेच दिसले असते. मग तुम्ही म्हणाल की याप्रमाणे चालत नाही तर मग जग कसे चालते? तर मी म्हणेन की सर्वच्या सर्व बदमाष आहेत असे कुठे आहे. सर्व हिंदू देवदूत थोडेच आहेत. सर्व शीख बदमाष आहेत असे थोडेच आहे. सर्व शीख देवदूत आहेत, हिंदू देवदूत आहेत पण मुसलमान वाईट आहेत असे काही नाही.

दुसरा मंत्र पारसी लोकांचा आहे. पहिल्या मंत्रात गुरूला नमस्कार आहे. त्यानंतर संस्कृतमधील कडवे येतात. नंतर भजन म्हणतात. आणि इतके होऊनही आपण आपले अंतःकरण स्वच्छ करत नाही. ही दुःखद गोष्ट आहे.

हरिजन कॉलनीमध्ये काय घडत आहे त्यातील एक गोष्ट समजावून सांगू इच्छितो. परंतु आता मला तो प्रश्न सोडून द्यावा लागत आहे, कारण मला इतर विषयांवर बोलायचे आहे आणि माझ्याजवळ केवळ १५ मिनिटे आहेत. काही मुसलमान मला भेटायला आले होते. याआधीही ते भेटायला आले होते. आज दुसऱ्यांदा आले. त्यांनी मला सांगितले की आम्ही पाकिस्तानमध्ये - पंजाबमध्ये गेलो होतो. हेच काम करण्याकरिता संयुक्त प्रांतातील मुसलमान तिथे गेले होते. नंतर तिथे भारतातील इतर मुसलमानांची भेट झाली. तेथील मुसलमानांशी काही तडजोड घडवून आणावी म्हणजे तेथील वातावरण निवळेल व मागे काही राहणार नाही असे त्यांना वाटले. ते मला विचारून गेले होते. मी जा म्हणून सांगितले होते. मनापासून जात असाल तर चांगले आहे. ते आज तिथून परतले. ते माझ्याकडे आले आणि म्हणाले की आम्हाला तुमच्याकडून एक गोष्ट हवी आहे. हिंदूंना सांगा, शीखांना सांगा की तुम्ही लाहोरला जा, - आधी हिंदूंना सांगा की तुम्ही लाहोरला जा, आम्ही त्यांच्याबरोबर जाऊ. आधी आम्ही मरू मग दुसरा कोणी मरेल. परंतु असे तर होणार नाही. आम्ही तेथील सरकारशी चर्चा केली आहे. ते

मुसलमानेतरांना वसवण्याकरिता तयार आहेत. तेव्हा मी म्हणालो की हे सर्व लिहून तर द्या. आजच्या आज तर असे होणार नाही. ही फार मोठी गोष्ट आहे. जर असे झाले तर माझे फार मोठे ओझे उतरेल. ते म्हणाले की निदान आमच्या शब्दांची परीक्षा तरी घ्या. नंतर ते म्हणाले की करा तर खरे. आम्ही जे म्हणतो त्याची हवी तितकी परीक्षा घ्या. तर त्या लोकांनी लिहून दिले. त्यात लिहिले आहे -

संयुक्त प्रांताच्या शांतता समितीने पश्चिम पंजाबचा दोन वेळा दौरा केला. पहिल्या वेळी एक महिना आणि दुसऱ्या वेळी एक आठवडा आम्ही फिरलो. आता तेथील परिस्थिती चांगली आहे. पहिल्या वेळेच्या तुलनेत जनता आणि सरकार दोघेही शांततेकरिता प्रयत्न करत आहेत. पश्चिम पंजाब सरकारची इच्छा आहे की तिथे जे मुसलमानेतर राहत होते त्यांनी तिथेच राहावे आणि स्थलांतरित मुसलमानेतरांनी पश्चिम पंजाबमध्ये परत यावे आणि ते परतले तर त्यांना त्यांच्या संपत्तीवरील हक्क परत मिळतील, त्यांना संपूर्ण संरक्षण मिळेल व ज्या काही सोयीसवलती त्यांना हव्या असतील त्याही त्यांना मिळतील असे निदेश सरकारने काढले आहेत. आणि या सर्व विनंतीनंतरही काही मुसलमानेतरांना परतायची इच्छा नसेल तर त्यांना त्यांची संपत्ती आपल्या इच्छेप्रमाणे विकण्याचा संपूर्ण अधिकार असेल. जे लोक दंगलींकरिता लोकांना चिथावणी देतील त्यांच्याविरुद्ध सरकार कठोर पावले उचलेल आणि परतलेल्या लोकांच्या संरक्षणाकरिता सर्व प्रकारची उपाययोजना करील. मुसलमानेतरांचा मानसन्मान आणि अब्रू सुरक्षित राहिल याकरिता जबाबदारी स्वीकारण्याकरिता शांतता पथकाने तेथील जनतेला आणि पाकिस्तान सरकारला तयार करण्यात यश मिळवले आहे. आम्ही, संयुक्त प्रांतातील शांतता पथकाचे सदस्य परतलेल्या मुसलमानेतर बंधूंना विनंती करतो की त्यांनी पश्चिम पंजाबमध्ये परतावे व तिथे कायम वास्तव्य करावे. आम्ही त्यांच्याबरोबर तिथे जायला तयार आहो आणि आमचा जीव गेला तरी आम्ही त्यांचे रक्षण करू. या मुसलमानेतरांना पुर्ण सुरक्षित असल्याचे जाणवल्यानंतरच आम्ही परतू.

यावर चार लोकांनी सह्या केल्या आहेत. हे बरोबर असेल तर ही चांगली बातमी आहे असे मी समजतो. ते सभ्य गृहस्थ आहेत असे वाटल्यामुळे मी त्यांना म्हणालो की लिहून द्या, मग यावर मी कार्यवाही करेन, सगळ्या जगाला दाखवेन. आणि जर असे नसेल तर फार वाईट गोष्ट आहे. मागे मी म्हणालो होतो की मॉडेल टाऊनमध्ये बरेच हिंदू आणि शीख आले आहेत. लाहोरमध्येही हिंदूंच्या मोठमोठ्या इमारती आहेत. शिखांच्याही इमारती आहेत. तिथे त्यांचा गुरुद्वाराही आहे. शीख तिथे जाऊ

शकतात काय असे संयुक्त प्रांतातील पथकातील लोकांना मी विचारले. तेव्हा ते म्हणाले की सर्वसामान्य लोकांमध्ये मैत्रीभाव निर्माण झाला आहे असे काही नाही. अजूनही वातावरण विषाक्त आहे. हे विष एकाएकी काढता येत नाही. परंतु यापुढे हत्त्या होणार नाही याची दक्षता घेतली जाईल असे सरकारने सांगितले.

खरोखर असे घडले असेल तर ही फार मोठी गोष्ट आहे. इतक्या लवकर काम होईल अशी अपेक्षा नव्हती. हे कितपत खरे आहे हे मला माहीत नाही. परंतु असे करणारेही मुसलमान आहेत हे तर आपण समजून घेतले पाहिजे. सर्व मुसलमान बदमाश आहेत असे समजणे माणुसकी नाही. त्यांच्यातही सज्जन लोक आहेत. नंतर त्यांच्याबरोबर एक हिंदूसुद्धा आला. त्यानेही पत्र आणले होते. आता अधिक वेळ नाही म्हणून मी ते वाचणार नाही. परंतु त्यातही हीच गोष्ट आहे. ते तिथे हॉटेल, विश्रामगृह चालवतात. तिथे दररोज जवळपास एक हजार माणसे नेहमी येतात. मुसलमान जास्त येत असतील परंतु काही हिंदूही येत असतात. त्यांच्या येण्यात कोणताही अडथळा नसतो. त्या पत्रात त्यांनी लिहिले आहे आणि ते म्हणतात की मुसलमानेतर बांधवांना तिथे परतण्याकरिता कोणतीही अडचण नाही. इतके मी आजच्या अनुभवावरून सांगतो. परंतु उद्याच जा असे मला म्हणायचे नाही. जाऊ नका असेही मी म्हणणार नाही. जाल तर चांगले होईल.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ १९२-६

---

३९. दक्षिणेतील संस्थानिकांना

नवी दिल्ली,

डिसेंबर ११, १९४७

आपल्या जनतेशी पूर्णपणे ऐक्य ठेवायचा सल्ला गांधीजींनी दिला. ते म्हणाले की तुम्ही तुमच्या जनतेचे विश्वस्त सेवक आहा.

'द बॉम्बे क्रॉनिकल', डिसेंबर १२, १९४७

---

४०. हिंदुस्तानी तालिमी संघाच्या सभेतील चर्चा

(या दोन दिवसाच्या अधिवेशनाचे अध्यक्ष डॉ. झाकिर हुसेन होते.)

डिसेंबर ११/१२, १९४७

(डिसेंबर १३, १९४७च्या 'हिंदुस्तान टाईम्स'मधून)

गांधीजी म्हणाले की स्वतंत्र भारत सरकारने निर्माण केलेल्या विरोधाभासामुळे काही लोकांना चिंता वाटू लागली आहे. ते म्हणतात की काँग्रेस जेव्हा सत्तेत नव्हती तेव्हा अनेक वर्षांपासून रचनात्मक कार्यक्रमाबद्दल आग्रह धरत होती. परंतु आता सत्तेत आल्यानंतर काँग्रेसचे धोरण तिला अडगळीत टाकण्याचे दिसते. ज्या लोकांचा रचनात्मक कार्यावर विश्वास आहे त्यांनी सरकारमध्ये सामील होऊन सरकारचा उपयोग अहिंसक समाजरचनेकरिता करणे हा यावरील उपाय नाही काय? गांधीजींचा याला विरोध होता. मी जरी या गोष्टीशी सहमत नसलो तरी मला वाटते की रचनात्मक कार्य करण्याकरिता ज्या विविध संस्था मी निर्माण केल्या आहेत त्या जर मी ठरवलेल्या पातळीवर काम करू शकतील तर या संस्थांची उद्दिष्टपूर्ती होऊ शकते. याकरिता त्या संस्थांना एक करून त्यांच्यात समन्वय निर्माण करणे आवश्यक आहे अशी शिफारस गांधीजींनी केली. या परिवर्तनाची जबाबदारी हिंदुस्तानी तालिमी संघावर सोपवत ते म्हणाले की शिक्षणासंबंधी माझे जे विचार आहेत तसेच विचार जर नयी तालीममधील लोकांचे असतील तर काम करणे सोपे होईल. मी केलेली सूचना हा प्रौढ शिक्षणाचा भाग आहे.

आज नयी तालीमची परीक्षा सुरू आहे. तिने एक तर सध्याच्या वातावरणात बदल घडवून आणला पाहिजे वा त्या प्रयत्नात नष्ट व्हायला पाहिजे.

आपल्या देशात असा एक वर्ग आहे की ज्याला हिंदू आणि मुसलमान कधीही एकत्र राहू शकणार नाही असे वाटते. मुसलमानांनी एक तर हा देश सोडून जायला पाहिजे वा हिंदूंचे गुलाम होऊन त्यांनी या देशात राहायला पाहिजे असे त्याला वाटते. तसेच पाकिस्तानमध्ये केवळ मुसलमानांनी राहायला पाहिजे. हे विषारी तत्त्वज्ञान आहे आणि यातच पाकिस्तानचे मूळ आहे. पाकिस्तान अस्तित्वात आला आहे, त्यांची स्वप्नपूर्ती झाली आहे परंतु हे विषाणू अजून कायम आहेत. या तत्त्वज्ञानाला विरोध

करण्याकरिता मी माझे आयुष्य वाहिलेले आहे व त्या प्रयत्नात मी करायचे वा मरायचे ठरवले आहे. परंतु लोकांची ही चुकीची मानसिकता बदलवण्याचे हे काम नयी तालीमचे आहे.

डॉ. झाकीर हुसेन म्हणाले की तत्त्वतः श्री गांधीजी जे म्हणतात ते निरपवाद आहे. परंतु तरीही त्यात घाई करण्याची आवश्यकता नाही. स्वातंत्र्यानंतर परिस्थितीत बराच बदल झालेला आहे. प्रत्येक माणूस नवनवीन प्रयोग करण्याकरिता उत्सुक आणि अधीर आहे व हे प्रयोग करण्याकरिता आपल्याला पूर्ण मोकळीक मिळावी असेही त्यांना वाटते. या संस्थांच्या विलयाने त्यांच्यात संपूर्ण सामंजस्य निर्माण झाले नाही तर त्यात प्रगती होण्याऐवजी परागतीच होऊ शकेल.

यानंतर सूचना करण्यात आली की या संस्थांनी एकाच झाडाच्या वेगवेगळ्या शाखांप्रमाणे स्वतंत्रपणे काम करावे. या संदर्भात गांधी सेवा संघाचा उल्लेख करण्यात आला. एके काळी तो मूळ शाखा म्हणून काम करत होता. परंतु गांधीजींना यात धोक्याची जाणीव झाली. रचनात्मक कार्य करणाऱ्या संस्थांनी राजकारणात पडावे आणि राजकारणात पडून राजकीय सत्ता मिळवण्याकरिता तिने काँग्रेस वा शासनाशी प्रतिस्पर्धा करावी असे त्यांना वाटत नव्हते.

आता गांधी सेवा संघ अस्तित्वात नाही. आणि त्याने सर्व रचनात्मक कार्यकर्त्यांना एका संघटनेत आणण्याचा प्रयत्नही केला नव्हता. एकदा त्याने राजकारणात शिरून देशातील राजकारण शुद्ध करण्याचा अल्पकाळ प्रयत्न केला होता परंतु त्यात त्याला पराभव पत्करावा लागला होता.

डॉ. झाकिर हुसेन - काही विशेष कार्य करण्याकरिता वेगवेगळ्या संस्था तदर्थ समिती म्हणून बनवण्यात आल्या होत्या. आता या संस्था जर एक करण्यात आल्या तर त्यांना सत्तेच्या राजकारणापासून वेगळे ठेवणे कठीण होईल.

संयुक्त रचनात्मक कार्यकर्ता संघ जर राजकारणात जाईल तर त्याचा सर्वनाश होईल. असे नसते तर मी स्वतः सरकारमध्ये जाऊन माझ्या पद्धतीने सरकार चालवण्याचा प्रयत्न केला नसता काय? ज्या लोकांच्या हातात आज सत्तेचे लगाम आहेत ते सहजपणे बाजूला झाले असते व त्यांनी माझ्याकरिता जागा करून दिली असती. परंतु जोपर्यंत त्यांच्या हातात सत्ता आहे तोपर्यंत त्यांनी त्यांना जे योग्य वाटते त्याप्रमाणेच राज्यकारभार केला पाहिजे. परंतु मला माझ्या हातात सत्ता घेण्याची इच्छा नाही. सत्तेचा त्याग करून आणि मतदारांच्या शुद्ध आणि निःस्वार्थ सेवेला वाहून घेऊन त्यांच्यावर

आपला प्रभाव पडू शकतो आणि आपण त्यांना मार्गदर्शनही करू शकतो. सरकारमध्ये जाण्यापेक्षाही यामुळे आपल्याला खरी सत्ता मिळेल. परंतु अशी एक अवस्था येऊ शकते की जनतेला केवळ आपणच सरकार चालवावे, आणि इतर कोणीही नाही, असे वाटू शकते. परंतु या प्रश्नाचा विचार करता येऊ शकत नाही. त्या वेळेपर्यंत मी बहुधा जिवंत नसेन. परंतु ती वेळ जेव्हा येईल तेव्हा आपले संघच अशी कोणती तरी व्यक्ती निर्माण करतील की जी प्रशासन आपल्या हातात घेईल. त्या वेळी भारत आदर्श राज्य झालेला असेल.

डॉ. झाकीर हुसेन - आदर्श राज्याची सुरुवात करण्याकरिता आणि ते चालवण्याकरिता आपल्याला आदर्श माणूस लागणार नाही काय?

आपण स्वतः सरकारमध्ये न जाता आपल्याला हवे तसे लोक पाठवू शकतो. आज काँग्रेसमधील प्रत्येकजण सत्तेमागे धावत आहे. हे फार मोठ्या धोक्याचे सूचक आहे. सत्ताकांक्षी लोकांच्या धावपळीत आपण सहभागी होऊ नये. आज अनेक कॉंग्रेसी म्हणतात की "पंडितजींना इतका पगार मिळतो, आम्हाला का मिळू नये?" परंतु ते हे विसरतात की जवाहरलाल सारख्या प्रतिभाशाली व्यक्तीला आज जो पगार मिळतो त्यापेक्षा त्याला किती तरी जास्त पगार मिळाला असता. माझ्यासारखा सामान्य कार्यकर्ता, ज्याला स्वतंत्रपणे पैसा मिळवण्याची ना तर आवश्यकता आहे, ना आकांक्षा आहे, ३००० पगार मिळत असेल तर ती शोचनीय गोष्ट होईल. माझे दृढ मत आहे की आपण स्वतः सत्तेच्या राजकारणापासून दूर राहिलो पाहिजे व सत्तेचा स्पर्श टाळला पाहिजे. (यानंतर ६-९ मार्चपर्यंत अखिल भारतीय बुनियाची शिक्षण संघाची सभा बिहारमध्ये बोलवावी असे ठरले. मध्यंतरीच्या काळात सेवाग्राममध्ये पुनर्गठन योजनेबद्दल विचार करण्याकरिता एक संमेलन भरवावे असे ठरवण्यात आले.)

'महात्मा' खंड ८, पृष्ठ २२७-९

---

४१. कानजी यांना पत्र

(याचे मूळ गुजराती सापडत नाही.)

नवी दिल्ली,

डिसेंबर १२, १९४७

भाई कानजी,

मला तुमचे पत्र मिळाले. तुम्हाला काळजी वाटू नये म्हणून हे उत्तर लिहीत आहे.

इतर नियंत्रण जाऊ शकतात आणि ते जात असल्यामुळे काही हानीही होऊ शकते. नुकसान झाले तरी हरकत नाही. परंतु तुम्ही तुमच्या इंग्रजीवरील नियंत्रणाचा त्याग का करत नाही. तुमची मातृभाषा तर गुजराती आहे. तुम्ही तिला पूर्णपणे कसे विसरला?

इतर कोणी म्हणतो म्हणून तेवढ्याकरिता मी बिर्ला बंधूंचे घर सोडू शकतो काय? जर कोणी म्हणत असेल की बिर्ला बंधू नियंत्रण हटवण्याच्या विरोधात आहेत तर ते चूक आहे हे मी माझ्या अनुभवावरून सांगू शकतो. नियंत्रण दूर करण्यासंबंधीची माझी कारणे आणि त्यांची कारणे वेगवेगळी आहेत आणि नियंत्रण हटवले पाहिजे हे माझे मत किती तरी दिवसांपासूनचे म्हणजे मी त्यांच्या घरात राहत नव्हतो तेव्हापासूनचे आहे. प्रत्येकाने आपल्या विवेकबुद्धीप्रमाणे वागायला पाहिजे, तुम्ही तुमच्या, मी माझ्या, इतरांनी त्यांच्या. आणि त्यातूनच सत्य बाहेर येईल.

तुमचा,

मो. क. गांधी

इंग्रजी प्रतीवरून. बी. जी. खेर पेपर्स. सौजन्य - नेहरू मेमोरिअल म्युझियम आणि ग्रंथालय

---

४२. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका बंधूंनी पत्र लिहिले आहे. त्यात लिहिले आहे की पाकिस्तानमध्ये जाणे सुरू करावे असा सल्ला मी दिला आहे. मी तर म्हणालो होतो की मी या गोष्टीची चौकशी करीन आणि खात्री पटली तर मग सांगेन. ज्या बंधूंनी हे सांगितले ते बरोबर आहे की नाही हे मी पाहीन. मग सांगेन की जायचे की नाही. ते बंधू तर म्हणतात की आताच जावे अशी त्यांची इच्छा आहे. इथे सर्व अराजक माजले आहे, कोणी विचारपूस करणारे नाही, खायला प्यायला नाही, कपडेलत्ते नाहीत आणि निर्वासितांकरिता काहीही केले जात नाही. हे सर्व खरे आहे हे मला माहीत आहे. गोष्टी अशा स्तरापर्यंत पोहोचल्या आहेत की प्रत्येकाची काळजी घेतली जाऊ शकत नाही व प्रत्येक गोष्ट उपलब्ध करून देता येऊ शकत नाही. मला वाटते की जे शक्य होते ते करण्यात आले आहे. परंतु जरी तसे करण्यात आले नसेल तरी मी कोणालाही परत जाण्याचा सल्ला देऊ शकत नाही. ते जर मुळात आलेच नसते तर ती वेगळी गोष्ट असती. परंतु आता ते आलेले असल्यामुळे परिस्थिती सामान्य झाल्यानंतरच त्यांनी परत जायला पाहिजे. जितक्या लवकर परत जाण्याची संधी मिळेल तितक्या लवकर परतण्याची त्यांनी तयारी ठेवली तर ते अधिक चांगले होईल.

काल मी तुम्हांला सांगितले होते की इथे कुराणमधील ज्या आयती म्हणण्यात येतात त्यांचे भाषांतर मी तुम्हांला वाचून दाखवीन. मी तुम्हांला आधीच सार समजावून सांगितला होता. भाषांतर असे आहे - “दुष्ट सैतानापासून रक्षण व्हावे म्हणून मी अल्लाला शरण जातो. मी ईश्वराच्या नावापासून सुरुवात करतो. मी जे काही करतो ते ईश्वराच्या नावावर करतो कारण तोच मला सर्व काही देणारा आहे. तो रहीम आहे, रेहमान आहे, दयाळू आहे, सर्व काही आहे.” नंतर सांगितले आहे की “अल्ला एक आहे, तो जन्म घेत नाही आणि जन्म देत नाही. जे काही जन्म घेते ते त्याने निर्मिलेले असते. त्याच्या समान कोणीही नाही. तो स्वतःच पूर्ण आहे. म्हणूनच तो निर्दोष आणि निराकार आहे असे आपण म्हणतो. सर्व गुणांचा जन्म त्याच्यापासून झाला आहे. त्याच्या गुणांचा थाक लागू शकत नाही.”

आज मला मला चार वा पाच पत्रे आली आहेत. काठेवाडमधील एका मुसलमानाच्या पत्राचा मी उल्लेख केला आहे (पाहा "प्रार्थना प्रवचन", डिसेंबर ५, १९४७), परंतु काही मुसलमानांचा त्यालाही आक्षेप आहे. का ते मला माहीत नाही. ज्या लोकांनी आरोप केले होते त्यांनीच मला लिहिले आहे की विशेष असे काही घडलेले नाही आणि जर कुठे थोडेसे काही घडलेही असेल तरी काँग्रेसच्या लोकांनी शांततानिर्मितीकरिता शक्य तितका प्रयत्न केला आहे आणि आम्ही आमच्या घरात सुखात राहत आहो.

दुसरे एक पत्र ब्रह्मदेशातून आले आहे आणि अजून एक मुंबईहून आले आहे. त्याच्यावर सही नाही आणि त्याचे उत्तर कुठे पाठवावे हे मला माहीत नाही. मुंबईहून आलेले पत्र मला सांगते की गोंधळ निर्माण करण्याशिवाय मी वेगळे काहीही करत नाही. मी गोंधळ निर्माण करतो की नाही हे मला माहीत आहे, आणि माझे ऐकत असलेल्या तुम्हा लोकांनाही माहीत आहे. ते म्हणते की काठेवाडमध्ये काय घडले याची मी चौकशी केली पाहिजे, परंतु मला सर्व माहिती मिळाल्याशिवाय मी कसा चौकशी करू शकतो? एखादी चौकशी सुरू करण्याचा मला अधिकार नाही. असे करण्यासंबंधी मी सरकारला केवळ सांगू शकतो. दुसरे पत्र अजमेरसंबंधी आहे. ते हिंदूंनी लिहिले आहे. ते म्हणतात की मी जे म्हणालो ते खरे नाही (पाहा "प्रार्थना प्रवचन", डिसेंबर १०, १९४७). दंगल झाली होती हे खरे आहे परंतु दंगलीची सुरुवात हिंदूंनी केली नव्हती. ती मुसलमानांनी केली होती. नेहमी तसेच घडत असते. मग माझ्या लक्षात आले की ही चित्राची दुसरी बाजू आहे. काय खरे आणि काय खोटे हे केवळ ईश्वरालाच माहीत. वृत्तपत्रांमध्ये मी जे पाहिले त्यावर माझे वक्तव्य आधारलेले होते. अनेक लोकांकडूनसुद्धा मी बरेच काही ऐकले होते. आपण अशा प्रकारचे वर्तन करणार असू तर सरकार काम करू शकणार नाही.

सोमनाथ मंदिराच्या जिर्णोद्धाराकरिता पैसा उपलब्ध व्हावा असे एका पत्रलेखकाचे म्हणणे आहे. सरदारना सोमनाथ मंदिराचा जिर्णोद्धार व्हावा हे मान्य आहे परंतु त्याकरिता जुनागढच्या खजिन्यातून वा भारत सरकारच्या तिजोरीतून पैसा घ्यावा हे त्यांना मान्य नाही. अशा प्रकारे पैसा का उपलब्ध होऊ नये असे पत्रलेखक विचारतो. या प्रश्नाचे सविस्तर उत्तर देण्याच्या भानगडीत मी पडू इच्छित नाही. मी इतकेच म्हणू शकतो की या कामाकरिता जर सरकारकडून पैसा घेतला तर हाच नियम सर्वांना लागू करावा लागेल. त्याचे दूरगामी परिणाम होतील.

वृत्तपत्रांच्या वृत्तानुसार कलकत्त्यात गुंडगिरीचे काही प्रकार झाले. (विधान परिषदेत सादर करण्यात आलेल्या विधेयकाच्या विरोधात डिसेंबर ११ला कलकत्ता येथे निदर्शने झाली होती व त्यात काही हुल्लडबाजीचे प्रकार झाले होते.

निदर्शक आणि पोलीसांच्या झटापटीत एक माणूस मरण पावला होता आणि अनेक जखमी झाले होते.) असे दिसते की हुल्लडबाजी करून आपल्याला हवे ते मिळू शकते असा आपला समज झाला आहे. ही घातक प्रवृत्ती आहे. ही गोष्ट मी कधीही शिकवली नाही. ब्रिटिशांविरुद्ध आपण तीस वर्षे झगडलो. परंतु तो अहिंसक संघर्ष होता. कोणाला मारहाण करण्याचा तो संघर्ष नव्हता. कोणाकडून काही बळजबरीने हिसकून घेण्याचा तो संघर्ष नव्हता. बंगालमध्ये जे सरकार आहे ते आपले आहे, त्यात काँग्रेसची माणसे आहेत. त्यांच्याबरोबर काय असे वागायचे होते? समजा की चूक केली, मला तर माहीत नाही की काय चूक केली, परंतु समजा की चूक केली तर हुल्लडबाजी काय करायची? आपण पाशवी पद्धतीने का वागायचे? वर्तमानपत्रांमध्ये जेव्हा अशी बातमी येते तेव्हा मी ती वाचतो आणि तिचा सार तुम्हाला सांगतो. तेथील हुल्लडीत विद्यार्थीसुद्धा होते. ते चांगले शिकलेले आहेत, मग विधानसभेत जे लोक जात होते त्यांना अडवायचे, विधानसभेच्या सर्व दारांवर अडथळे निर्माण करायचे, आणि इतकेच नाही तर आतही घुसायचे हा तर त्याचा मार्ग असू शकत नाही. या लोकांनी जेव्हा असे केले तेव्हा मला वाटले की अशा प्रकारे तर आपण सरकार चालवू शकत नाही. आम्हाला जे नको आहे त्यासंबंधी आम्ही कायदा करू देणार नाही याकरिता बळजबरी करण्याकरिता ही हुल्लडबाजी होती. लोकांनी हिंसक कृत्यात भाग घेण्यास प्रवृत्त होऊ नये म्हणून हे विधेयक होते. निदर्शकाना हे विधेयक जरी आवडत नसेल तरी त्यांनी आपला विरोध शांततामय मार्गाने करायला पाहिजे होता. त्यांनी हुल्लडबाजी करायला नको होती. आपण असे ब्रिटिशांविरुद्धही केले नाही, आणि त्या वेळी जर कोणी असे केले असेल तर मी त्यांची कानउघाडणी करत असे. आम्ही नेहमी सौजन्यपूर्वक वागत होतो - मी तर केव्हा केव्हा उपोषणही करत असे.

आपल्या सरकारसमोर आज किती तरी महत्त्वाच्या समस्या आहेत. त्या समस्यांकडे लक्ष देणे आवश्यक आहे. तिकडे लक्ष देण्याच्या कामात अडथळे आणणे व मग पोलिसांना जर लाठीमार करावा लागत असेल तर त्याचीच तक्रार करायची, अश्रुधूर सोडावा लागत असेल तर त्याची तक्रार करायची, गोळीबार करावा लागत असेल तर त्याची तक्रार करायची या दोन्ही गोष्टी होऊ शकत नाही. शांततेचा भंग करणारांना शिक्षा करू नये असा स्वातंत्र्याचा अर्थ होत नाही. गोंधळ केला तर त्याच्यावर लाठीमार केला व त्याची कोणी तक्रार केली तर ते चालू शकत नाही. विरोध व्यक्त करण्याचे किती तरी सनदशीर मार्ग आहेत. तुम्ही लोकांशी बोलू शकता, संसदेकडे वा केंद्र सरकारकडे तक्रार करू शकता.

आपल्याजवळ सर्व आवश्यक साधने आहेत. सरकार कार्यक्षम नाही असे तुम्ही म्हणू शकत नाही. ते केवळ तीन महिन्याचे आहे. आपण तीन महिन्यांच्या मुलाप्रमाणे आहो. या तीन महिन्यात आपण परिपूर्ण झालो असे मी म्हणू शकत नाही. यामुळे हुल्लडबाजी करणाऱ्या लोकांना मी विनंती करतो की त्यांनी या मार्गाचे अनुसरण करू नये.

असे काही नाही की हुल्लडपणा करणारे हे सर्व लोक गुंड वा अडाणी आहेत. त्याच्यात चांगले शिकलेले लोकही आहेत. ते जर अशा प्रकारचे वर्तन करत असतील तर आजपर्यंत आपण केलेले सर्व काम पाण्यात वाहून जाईल. आपल्याला लोकांपर्यंत अन्न पोहोचवायचे आहे. इतर अनेक बाबतीतही आपल्याला त्यांना मदत करायची आहे. असे दिसते की सुरू असलेल्या चांगल्या कामात अडथळा आणणे हेच काही लोकांचे काम झाले आहे. असे व्हायला नको. कलकत्त्यातील सगळे लोक यात सामील झाले नव्हते हे भाग्य. परंतु ते जरी सामील झाले असते तरी ते योग्य झाले नसते. अशा प्रकारच्या गोष्टी थांबल्या पाहिजे. सरकार त्यांचे आहे आणि ते जर मदत करत नसेल तर सनदशीर मार्गाने आपण विरोध केला पाहिजे.

(हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी). शिवाय "प्रार्थना प्रवचन - २", पृष्ठ १९६-९

---

४३. कधीही धोकादायक नाही

(याची गुजराती आवृत्ती डिसेंबर २१, १९४७च्या 'हरिजनबंधू'मध्ये प्रकाशित झाली होती.)

संबंधित गोष्ट जर प्रसंगोचित असेल तर ती कितीही कटू असली तरी सत्य सांगितलेच पाहिजे. असंबंद्ध गोष्ट नेहमीच असत्य असते व तिचा उच्चार कधीही करू नये. पाकिस्तानमधील मुसलमानांनी केलेले अत्याचार थांबवायचे असतील तर हिंदूंनी केलेल्या अत्याचाराचा हिंदूंनी डंक्याच्या चोटीवर उच्चार केला पाहिजे. आपल्या चुकांची कबुली दिल्यामुळे माणूस शुद्ध होतो व तो उच्च पातळीवर जातो. चुका दाबून ठेवल्यामुळे अवनती होते व ती गोष्ट नेहमीच टाळली पाहिजे.

नवी दिल्ली, डिसेंबर १३, १९४७

'हरिजन', डिसेंबर २१, १९४७

---

४४. विलयाचा सिद्धांत

(याची हिंदी आवृत्ती डिसेंबर २१च्या 'हरिजन सेवक'मध्ये प्रकाशित झाली होती.)

'विलय' या शब्दाला इथे ज्या प्रकारे उपयोग झाला आहे त्याला कोणतेही कायदेशीर महत्त्व नाही. असे म्हणतात की दक्षिणेकडील संस्थानांच्या संघातील (दक्षिणेकडील संस्थानांच्या संघामध्ये औंध, भोर, मिरज कनिष्ठ, सांगली, फलटण, कुरुंदवाड मोठे, आणि कुरुंदवाड लहान यांचा समावेश होता.) काही लोकांनी आपल्या संस्थानातील राजघराणे रद्द करून ती संस्थाने भारतीय संघराज्यात विलीन करण्याची तीव्र इच्छा व्यक्त केली आहे. याला ब्रिटिश भारतात (ब्रिटिशांचे शासन असे ताना भारताला ब्रिटिश भारत संबोधण्यात येत असे.) संस्थानांचा विलय असे संबोण्यात आले आहे. ब्रिटिश भारत संस्थानापेक्षा वेगळा मानला जात असे.

जो समाज अहिंसेवर आधारित असतो त्यात कोणत्याही माणसाने धीर सोडून दुसऱ्याचा नाश करायचा नसतो. कारण वाईट वागणारा माणूस आपल्या वागणुकीत जर सुधारणा करत नसेल तर तो स्वतःच स्वतःच्या विनाशाला निमंत्रण देईल. वाईटपण कधीही आपल्या पायांवर उभे राहू शकत नसते. यामुळे काँग्रेसचे धोरण नेहमीच देशी संस्थानांना नष्ट करण्याचे नव्हते तर संस्थानिकांनी आपल्या प्रजेचे विश्वस्त आणि सेवक व्हावे असे समजावण्याचे होते. या धोरणानुसार काँग्रेस सरकारने संस्थाने खालसा करून त्यांना निकटच्या प्रांतांचा अभिन्न भाग बनवण्याऐवजी संस्थानिकांनी भारतीय संघराज्याशी आपले संबंध जोडावे हेच समजावण्याचा प्रयत्न केला होता. यात भारत सरकारला बरेच यश मिळाले. यामुळे कोणत्याही संस्थानाचा भारतात केवळ दोनच परिस्थितीत विलय होऊ शकतो. एखाद्या संस्थानिकाच्या संस्थानात कुशासन स्पष्टपणे दिसत असेल व तो कोणत्याही प्रकारे दूर करता येत नसेल तर जनतेला ते संस्थान आपल्या प्रांतात विलीन करण्याचा अधिकारही आहे व तसे करणे जनतेचे कर्तव्यही आहे. अथवा संस्थानिक व जनता या दोघांचीही विलिनीकरण व्हावे अशी जर इच्छा असेल तर असे विलिनीकरण होऊ शकते. कोणी तरी असेही सुचवले आहे की जोपर्यंत सर्व संस्थाने वा बहुताश संस्थाने विलीन होण्याचे ठरवत नाही तोपर्यंत कोणत्याही संस्थानाने वा त्या संस्थानातील जनतेने, मग ते कितीही सामर्थ्यशाली असो वा नगण्य असो, विलीनीकरणाची इच्छा ठेवू नये. मला असे वाटत नाही. सर्व संस्थानांमध्ये कुशासन सुरू होत नाही तोपर्यंत एखाद्या संस्थानातील कुशासन संपवण्याची वाट पाहता येत नसते. अथवा एखाद्या संस्थानिकाला संस्थानिकाचे अधिकार नको

असतील तर इतरांनाही जोपर्यंत तशी इच्छा होत नाही तोपर्यंत तो आपले अधिकार सोडण्याकरिता वाट पाहू शकत नाही. केंद्र सरकारला प्रत्येक प्रकरणाचा निर्णय त्याच्या त्याच्या गुणवत्तेनुसार घ्यावा लागेल.

नवी दिल्ली, डिसेंबर १३, १९४७

'हरिजन', डिसेंबर २१, १९४७

---

४५. अजूनही कताई!

(याची गुजराती आवृत्ती डिसेंबर २१, १९४७च्या 'हरिजनबंधू'मध्ये प्रकाशित झाली होती)

एक पत्रलेखक लिहितो -

मी आणि माझ्या कुटुंबातील सदस्य असे आम्ही सर्व नियमितपणे कताई आणि विणाई करणारे झालो आहोत. आता आपल्याला स्वातंत्र्य मिळाले आहे. आम्ही अजूनही कताई आणि विणाई करावी असे तुम्हाला वाटते काय?

हा विचित्र प्रश्न आहे. असे असले तरीही अनेकांना असा प्रश्न पडतो. असे लोक चरखा आणि खादी यांचा यांत्रिकपणे स्वीकार करत असतात व स्वातंत्र्य मिळवण्याचे हे एक साधन आहे असे त्यांना वाटत असते. हे लोक विसरतात की विदेशी जोखडातून मुक्त होणे ही जरी स्वातंत्र्याची पहिली अट असली तरी ते काही खरे स्वातंत्र्य नाही. अहिंसेवर आधारित जीवनपद्धतीचे खादी प्रतिनिधित्व करत होती आणि करत आहे. चूक असो वा बरोबर माझे मत आहे की व्यवहारातून खादी आणि अहिंसा यांचा लोप होण्याचे कारण या सगळ्या वर्षात लोकांना खादीच्या गुढार्थाचे आकलनच झाले नाही हे आहे. यामुळेच आपणा सर्वांना भावाभावांच्या भांडणांची आणि अराजकाच्या दृश्यांची शोकांतिका पाहावी लागत आहे. भारतीय जनतेला आपल्या स्वातंत्र्याची सहजपणे जाणीव व्हावी असे जर आपल्याला वाटत असेल तर कताई आणि विणाई यांना कधीही नव्हते तितके आज महत्त्व आहे याबद्दल मला किंचितही संशय नाही. यालाच इश्वरी राज्य म्हणतात. शक्तिद्वारे संचालित यंत्रांपेक्षा माणसाचे सर्वोच्चत्व खादीच्या माध्यमातून आपल्याला प्रस्थापित करायचे होते. आज जी प्रचंड विषमता दिसते आहे तिच्या ठिकाणी खादीच्या माध्यमातून आपण सर्व स्त्री-पुरुषांच्या समतेकरिता प्रयत्न करत असतो आणि श्रमावर भांडवलाने जे वर्चस्व स्थापित झाले आहे त्या ठिकाणी श्रमाचे भांडवलदारांवर प्रभुत्व निर्माण करण्याकरिता आपण खादीद्वारे प्रयत्न करत होतो. गत तीस वर्षांपासून आपण जो प्रयत्न करत होतो तो व्यर्थ जाऊ नये असे वाटत असेल तर हातकताई आणि तिच्याशी संबंधित प्रक्रियांना पूर्वीपेक्षाही अधिक गतीने वाढवावे लागेल.

नवी दिल्ली, डिसेंबर १३, १९४७

'हरिजन', डिसेंबर २१, १९४७

४६. टी. एस. अविनाशलिंगम चेट्टीयार यांना पत्र

बिर्ला भवन, नवी दिल्ली,

डिसेंबर १३, १९४७

प्रिय अविनाशलिंगम,

सोबत जोडलेले वाचा (सापडत नाही) आणि त्यात तुमच्यासंबंधी जे लिहिले आहे ते खरे आहे काय हे सांगा. जोपर्यंत याबाबतीतील सत्य कळत नाही तोपर्यंत यासंबंधीची जाहीर चर्चा करण्याची माझी इच्छा नाही.

तुमचा,

बापू

श्री टी. एस. अविनाशलिंगम चेट्टीयार, शिक्षणमंत्री,

मूळ इंग्रजीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशिला नाय्यर

---

४७. नरहरी पारीख यांना पत्र

डिसेंबर १३, १९४७

चि. नरहरी,

मी हे पत्र तुला लिहीत आहे कारण केवळ तूच हे वाचू शकशील असे मला वाटते. दादा उद्या तिथे येणार असल्यामुळे मी तुला काही ओळी लिहिणे आवश्यक होते. तुला हृदयविकाराचा झटका आला हे मला आवडले नाही. काही अंतर्गत कारण नसेल तर तू लवकरच बरा होशील. परंतु अशा झटक्यानंतर आजारी माणसाने काही काळ संपूर्ण विश्रांती घेतली पाहिजे हा नियम आहे. बहुधा समुद्रकिनारा चांगला राहील. तू असा प्रवास करू शकतोस की नाही हे तेथील डॉक्टर ठरवू शकतील. मी जर तिथे असतो तर ईश्वर आपणा सर्वांचा पाठीराखा आहे असे मी म्हणालो असतो.

आशा आहे की मणी (नरहरी पारेख यांची पत्नी) घाबरली नसेल आणि वनमाला (नरहरी पारेख यांची मुलगी) तर कोणत्याही परिस्थितीत घाबरणार नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. ए. एन. ९१४७

---

४८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी जेव्हा हरिजन निवासात जात होतो तेव्हा त्यासंबंधी दररोज थोडेथोडे तुम्हाला सांगायची मला इच्छा असायची. परंतु मी असे करू शकलो नाही. आज तुम्हाला परत चरख्यासंबंधी सांगण्याची इच्छा आहे. चरख्याचे काय महत्त्व, त्यावर मी इतका भर का देतो यासंबंधी तिथे वाद सुरू होता.

मी जेव्हा सुरुवातीला चरख्यासंबंधी बोलू लागलो होतो तेव्हा मला माहीत नव्हते की पंजाबमध्ये चरख्याचे इतके प्रचलन आहे. परंतु मी तिथे गेलो तेव्हा तेथील भगिनींनी माझ्यासमोर चरख्याचे ढीग ठेवले. नंतर कळले की गुजरात, काठेवाडमध्येही एखाददुसऱ्या ठिकाणी चरखा चालतो. गायकवाडांच्या संस्थानात बीजापूर म्हणून एक गाव आहे. तिथे हिंडता हिंडता गंगाबेन जाऊन पोहोचल्या होत्या. चरख्याचे मला वेड लागले आहे हे त्यांना माहीत होते. तिथे पडदा ठेवणाऱ्या रजपूत स्त्रिया चरखा चालवायच्या. गंगाबेनने त्यांना पेळू देऊन त्यांच्याकडून सूतखरेदी सुरू केली. त्या वेळी फार कमी किंमत दिली जायची. त्यानंतर आम्ही बरीच प्रगती केली. खादीद्वारे आपण आपल्या भगिनींचे पोट भरू शकतो इतकेच तेव्हा आम्हाला वाटत होते. त्यांचे पोट कुठे मोठे असते? दोन पैशांच्या ठिकाणी तीन पैसे मिळाले की त्यांचे समाधान होत असे. त्या खुष होत असत.

नंतर माझ्या लक्षात आले की चरख्यात तर फार मोठी ताकद भरलेली आहे. ती ताकद अहिंसेची होती. एकीकडे हिंसेची, सैन्याची शक्ती आणि दुसरीकडे भगिनींच्या पवित्र हाताने चरखा चालवल्यामुळे निर्माण होणारी अहिंसेची शक्ती. म्हणूनच मी चरख्याला अहिंसेचे प्रतीक म्हणतो. सर्व लोकांना ही गोष्ट कळली असती तर त्यांनी चरखा जाळून टाकला नसता.

एक काळ असा होता की जगभर चरखा चालायचा. कापसापासून जितके काही कापड तयार होत असे ते सर्व चरख्याने कातलेल्या सूतापासून. भारतातील ढाक्याची मलमल आणि शबनम (शब्दशः अर्थ दव) चोहोकडे प्रसिद्ध झाली होती. सर्वांचे डोळे तिच्याकडे लागले होते. कापसापासून इतके चांगले

कापड तयार होते याचे सर्वांना आश्चर्य वाटायचे. हा रंजक इतिहास मी सोडून देतो. परंतु त्या वेळी चरखा गुलामगिरीचे प्रतीक होता. इतके सूत द्यावेच लागेल अशी स्त्रियांवर सक्ती केली जात असे आणि इतक्या कमी मजुरीवर आम्ही कताई करू शकत नाही असे आपल्या मालकाला त्या म्हणू शकत नव्हत्या. मोठ्या मुश्किलीने पोट भरावे इतकेही पैसे त्या स्त्रियांना मिळत नसत. स्त्रियांना लुबाडले जात असे. तो करुण इतिहासही मी सोडून देतो. परंतु जो चरखा गुलामगिरीचे प्रतीक होता तोच आता स्वातंत्र्याचे प्रतीक झाला आहे. असे हिंसेच्या बळावर झाले नाही तर अहिंसेच्या बळावर झाले आहे. अली बंधू चरख्याच्या चातीला बॉम्ब म्हणत असत. ते आपल्या हाताने सूत कातायचे, कापड तयार करायचे आणि चरख्याने शक्ती निर्माण करायची हे चरख्याचे रहस्य आहे. ही गोष्ट मी जाहीरपणे सांगत आलो आहे.

१९१६ साली चरखा सुरू झाला. १९१९मध्ये माझा पंजाबचा दौरा सुरू झाला (गांधीजींनी १९१८-१९मध्ये पंजाबचा दौरा सुरू केला होता). स्वातंत्र्य तर आम्ही मिळवले परंतु आज देशात जे वादळ सुरू आहे त्याचे काय? आपण चरखा चालवला परंतु तो स्वीकारला नाही. भगिनींनी माझ्यावर कृपाकरून चरखा चालवला परंतु मला ती मेहरबानी नको आहे. त्याची ताकद काय आहे हे त्यांना कळले असते तर आज ही अवस्था झाली नसती. आपल्याला जर अहिंसक शक्ती वढवायची असेल तर परत चरखा स्वीकारावा लागेल आणि चरख्याचा पूर्ण अर्थ समजावून घ्यावा लागेल. असे झाले तरच आपण तिरंगा झेंड्याचे गीत गाऊ शकू. आज आपल्या तिरंगा झेंड्यात चरख्याचे केवळ चक्र राहिले आहे. त्यात दुसऱ्या अर्थाचाही समावेश करण्यात आला आहे. (प्रा. राधकुमुद मुखर्जी यांनी चक्राचे महात्म्य सांगताना त्याची उत्पत्ती विष्णूच्या सुदर्शन चक्रातून झाली असल्याचे सांगितले. सुदर्शन चक्रात व्यक्त आणि अव्यक्त संपूर्ण ब्रह्मांडाचा समावेश आहे. गौतम बुद्धाने याला धर्मचक्र म्हणून संबोधले होते. नंतर सम्राट अशोकाने त्याला आपल्या राज्याचे चिन्ह बनवले.) हा अर्थ चांगला आहे. परंतु आधी जेव्हा तिरंगा झेंडा तयार झाला होता तेव्हा हा अर्थ नव्हता. हिंदुस्थानातील सर्व जमातींनी मिळून मिसळून काम करावे आणि चरख्याच्या माध्यमातून अहिंसक शक्ती निर्माण करावी असा त्याचा अर्थ होता. आजही चरख्यात अनंत शक्ती भरलेली आहे. इंग्रज गेले परंतु आमचा लष्करावरील खर्च वाढतो आहे ही लाजिरवाणी गोष्ट आहे. इतकी वर्षे अहिंसेकडून काम घेतले आणि आता आपली नजर लष्करावर खिळलेली आहे. आपण चरखा विसरलो म्हणून आपण आपसात भांडत आहो. सर्व स्त्री-

पुरुष चरख्याची खरी शक्ती ओळखून त्याचा समजूनउमजून स्वीकार करतील तर बरेच काही करता येऊ शकते.

मी जेव्हा पंजाबमध्ये गेलो होतो तेव्हा तेथील मुसलमान आणि शीख बांधव मला म्हणाले होते की चरखा चालवणे तर स्त्रियांचे काम आहे, पुरुषाच्या हातात तर तलवार असते. नंतर काही पुरुषांनी चरखा चालवला होता परंतु तो आपलासा केला नव्हता. आज जर सर्व लोकांनी चरखा जाळून टाकला, खादी फेकून दिली तर मला त्याची पर्वा नाही. परंतु जर चरखा ठेवायचा असेल तर समजूनउमजून ठेवा. चरखा अहिंसेचे प्रतीक असल्यामुळे आणि प्रचंड शक्तीचे कोठार असल्यामुळे ते धैर्याचे प्रतीक आहे. आपल्याला जर असे शौर्य दाखवायचे असेल तर आपण समजूनउमजून मनबुद्धीने चरख्याचा स्वीकार केला पाहिजे. ४० कोटी लोकसंख्येतील लहान मुले सोडून दिली तर पाचसात वर्षाच्या वरील मुलांनी आणि धडधाकट असलेल्या सर्व मोठ्या माणसांनी दररोज अर्धा तास कताई केली तर भारतात कापड कमी पडू शकत नाही आणि कोट्यवधी रुपये वाचू शकतात. परंतु हे सर्व विसरा. सर्वात मोठी गोष्ट ही आहे की कोट्यवधी लोक जेव्हा एकाच वेळी एखादे काम करतात तेव्हा त्यातून जी शक्ती निर्माण होते तिला शत्रूची कोणतीही शक्ती पराभूत करू शकत नाही. मी हे सिद्ध करू शकत नसेन तर तो दोष अहिंसेता नाही, माझा आहे. माझी तपश्चर्या अपूर्ण आहे, अहिंसेची शक्ती कधीही कमी पडू शकत नाही. त्या शक्तीचे प्रदर्शन चरख्याच्या माध्यमातून होऊ शकते कारण चरखा करोडो लोकांच्या हाती ठेवला जाऊ शकतो आणि त्यामुळे कोणाचेही नुकसान होऊ शकत नाही. करोडो माणसे गिरणी चालवू शकत नाही, दुसरा कोणताही व्यवसाय करू शकत नाही. चरख्यात नीतीशास्त्र भरलेले आहे, अर्थशास्त्र भरलेले आहे आणि अहिंसा भरलेली आहे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २०० - २

---

४९. रिचर्ड बी. ग्रेग यांच्या पत्राला उत्तर

एक पत्रलेखक लिहितो (हे पत्र इथे उद्धृत केलेले नाही. भारतात सुरू असलेल्या हिंसेसंबंधी श्री रिचर्ड ग्रेग यांनी दिलेले स्पष्टीकरण पत्रलेखकाने फेटाळले होते. पाहा एक मानसशास्त्रीय स्पष्टीकरण, नोव्हेंबर ११, १९४७) - श्री ग्रेग यांच्या पत्राचा गुढार्थ पत्रलेखकाला पूर्णपणे कळला नाही असे मला वाटते. श्री ग्रेगना याचे उत्तर द्यायचे असेल तर ते देऊ शकतील.

'हरिजन', डिसेंबर १४, १९४७

५०. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

प्रार्थनेकरिता येत असताना मला एक चिठ्ठी मिळाली. तिच्यात लिहिले आहे आहे की एका मुसलमान बांधवाला पाकिस्तानमध्ये जाण्याकरिता भाग पाडण्यात आले आहे. त्यांनी आपल्या मेहनतीच्या कमाईतून घेतलेले काही सोनेचांदी माझ्याजवळ ठेवले आहे. हे सोनेचांदी मूळ मालकाकडे कसे पाठवावे हे तुम्ही सांगू शकाल काय असे ती चिठ्ठी लिहिणाऱ्या मित्रांने मला विचारले आहे. त्यांनी लिहून पाठवले तर मूळ मालकाकडे हे सोनेचांदी पाठवण्याची व्यवस्था करण्याविषयी मी सरकारला सांगू शकतो. जोपर्यंत त्या व्यक्तीचा शोध लागत नाही तोपर्यंत त्यांची संपत्ती सरकारजवळ राहील. अशाही परिस्थितीत आमच्यामध्ये असे सज्जन लोक आहेत हे सांगण्याकरिता या गोष्टीची चर्चा मी केली. चला मित्र तर गेला, आता त्याचा माल हडप करून टाकू या असे या गृहस्थांच्या मनातही आले नाही. त्याला त्याच्याकडील ठेव परत करण्याची काळजी आहे. आपण सर्व जर चांगले झालो तर सर्व काही चांगलेच होईल.

मी तुमच्याजवळ कबूल केले होते की हरिजननिवासात मी जेव्हा जातो तेव्हा तिथे विविध संघांसबंधी जी चर्चा होते त्यासंबंधी मी तुम्हांला थोडेथोडे सांगेन. चरखा संघ आणि कताई विणाईसंबंधी सुरू असलेल्या कामासंबंधी काल मी तुम्हाला सांगितले होते. आज मला तुम्हाला ग्रामोद्योग संघ आणि नयी तालीमबद्दल सांगायचे आहे. नयी तालीम अशी गोष्ट नाही की जिचा प्रत्येकाला परिचय आहे. तालीम सुरू होऊन सातआठ वर्ष झाले. या संस्थेचा उद्देश राष्ट्राला नवीन आधारावर सेवा देणे हा आहे. या दृष्टीने हा काळ काही दीर्घ नाही. बुनियादी शिक्षणाचा अर्थ हस्तोद्योगाद्वारे शिक्षण असा सामान्यपणे करण्यात येतो. तो काही प्रमाणातच बरोबर आहे. नयी तालीमची मुळे याहून जास्त खोलवर रुजलेली आहेत. तिचा आधार आहे सत्य आणि अहिंसा. व्यक्तिगत जीवन आणि सामाजिक जीवन या दोघांमध्येही तिला आधार आहे. विद्या ती असते जी मुक्त करत असते - सा विद्या या विमुक्तये. असत्य आणि हिंसा तर बंधनकारक आहे. त्यांचे शिक्षणात कोणतेही स्थान असू शकत नाही. मुक्ती अर्थातच अनेक प्रकारची असते. कृतीच्या बंधनापासून मुक्ती असते, अत्याचारी माणसाच्या कचाट्यातून

सुटण्याची मुक्ती असते, वेडपटाच्या हातून एखाद्या मुलीला सोडवण्यामुळे तिची मुक्ती होत असते आणि परकीय शासनाच्या जोखडातून देशाची सुटका झाल्यामुळे मुक्ती होत असते. मुलांना असत्य आणि हिंसेचे शिक्षण द्या असे कोणताही धर्म सांगत नाही. उच्चशिक्षित लोकही सैतानी मार्गाचा अवलंब करतात अशी किती तरी उदाहरणे आहेत. याचे प्रसिद्ध उदाहरण रावणाचे आहे. रावण अतिशय विद्वान होता आणि त्याने कठोर तपश्चर्यासुद्धा केली होती. परंतु त्याचे वर्तन सैतानी असल्यामुळे त्याचा नाश झाला. उलटपक्षी राम आजही आहे. आपण रामाला ईश्वराचा अवतार मानतो. यामुळे ज्ञानाची संपत्ती मिळवण्याकरिता आपण आपल्यामध्ये सत्य आणि अहिसा रुजवली पाहिजे. अशा प्रकारचे शिक्षण कसे देता येईल यासंबंधी सभेत चर्चा सुरू होती. स्पष्ट आहे की असे शिक्षण पुस्तकांमधून देता येऊ शकत नाही. मग आपण काय केले पाहिजे? देशातील करोडो लोक काही ना काही हस्तोद्योग शिकत असतात. ते सर्व श्रीमंत असू शकत नाहीत. अमेरिकेतसुद्धा सर्व लोक श्रीमंत नाहीत. हे खरे आहे की गरिबी विविध स्तरावरील असते. परंतु गरिबीमुळे सहन करावा लागलेला त्रास एकसारखाच असतो. अशाच प्रकारे भारतातसुद्धा अनेक प्रकारचे दोष भरलेले आहेत. अमेरिकेजवळ इतकी संपत्ती आणि ज्ञान असूनही तिला त्या दोषांवर विजय मिळवता आलेला नाही. करोडो लोकांना जर शिक्षण द्यायचे असेल तर ते केवळ हस्तोद्योगाद्वारेच देता येऊ शकेल असा मी विचार केला. करोडो लोकांमधून केवळ काही लाख लोकांनाच आपण आज ज्याला शिक्षण म्हणतो ते मिळू शकत असेल तर त्याचा कितपत फायदा होऊ शकेल? आणि प्रत्येकजण ते शिक्षण घेण्याचा प्रयत्न करू लागला तर आपले दिवाळे निघेल. जे शिक्षण गरिबांना आणि श्रीमंतांना, राजाला आणि प्रजेला हस्तोद्योगातून मिळते ते खरे शिक्षण असेल. आणि जोपर्यंत आपण सत्य आणि अहिंसेला धरून राहत नाही तोपर्यंत असे शिक्षण देता येऊ शकत नाही. इथे हा प्रश्न धर्माचा होतो - संप्रदायांच्या स्वरूपाच्या अर्थाने नाही तर वैश्विक अर्थाने. असा धर्म चिरंतन असतो. त्यात बदल होत नसतो. तो सर्वांकरिता सारखा असतो. तो जितका हिंदूंकरिता असतो तितकाच मुसलमानांकरिताही असतो. हिंदूंनी खरे बोलायला पाहिजे आणि मुसलमानांनी खोटे असे कोणीही म्हणू शकत नाही. खरे बोलणे हे सर्वांच्या हिताकरिता असते. हिंसा करणे हे कोणाचेही धार्मिक कर्तव्य असू शकत नाही. मला जर कोणी विचारले की शीख आणि मुसलमानांना नयी तालीममध्ये शिक्षण मिळाले पाहिजे की नाही तर मी म्हणेन की आम्ही हिंसेचे भक्त आहो असे शीख आणि मुसलमान जर म्हणत असतील तर निश्चितच त्यांच्याकरिता नयी तालीम नाही. नयी तालीम ही काही खास एखाद्या पंथाकरिता

राखीव गोष्ट नाही. मी सर्व धर्मांचा अभ्यास केला आहे आणि त्यांचा सार पचवला आहे. शीख आणि मुसलमान दोघेही माझ्या बाजूला येऊन बसतात. जेव्हा इतर सर्व उपाय अपयशी होतात तेव्हाच ते हिंसेचा पुरस्कार करतात. परंतु आपण जेव्हा मुलाला शिकवायला सुरुवात करतो तेव्हा कसे मारावे यापेक्षा कसे मरावे हे त्याला शिकवले पाहिजे. यामुळे नयी तालीम द्यायची असेल तर ती याच पद्धतीने दिली पाहिजे असे आम्ही ठरवले. हे काम जे करतात त्यांनी सत्य आणि अहिंसेचे काटेकोरपणे पालन केले पाहिजे. असे केले तरच त्यात यश येईल. परंतु आज तसे होत असल्याचे मला दिसत नाही. तुम्ही जर विचाराल की नयी तालीम देणारे सर्व सत्य आणि अहिंसेचे पुजारी झाले आहेत काय तर मी काही कोणाच्या अंतःकरणात शिरून पाहू शकत नाही. मी प्रेषितसुद्धा नाही. नयी तालीमची सूत्रे माझ्या हातात नाहीत. मला विचारले तर मी सल्ला तेवढा देत असतो. हे खरे आहे की नयी तालीमची कल्पना माझी होती. परंतु ही संघटना काँग्रेसने निर्माण केली. झाकिर हुसेन तिचे अध्यक्ष आहेत. ते जर सत्य आणि अहिंसेचे पालन करत नसतील तर त्यांनी राजीनामा दिला पाहिजे. परंतु त्यांनी असत्याचरण वा हिंसा केल्याचे मला माहीत नाही. ते माझ्याबरोबर आहेत कारण त्यांचा हिंसेवर विश्वास नाही. हिंदुस्तानी तालिमी संघाचे सचिव आर्यनायकम आणि त्यांची पत्नी आहे. तेसुद्धा सत्य आणि अहिंसंचे भक्त आहेत. मी इतर कामात व्यग्र असतो आणि ते योजना राबवतात. नयी तालीममागील प्रेरणास्रोत तेच आहेत. झाकिरसाहेबसुद्धा हे काम करत नाहीत. ते केवळ अध्यक्ष आहेत. आर्यनायकम आणि आशादेवींनी जर या योजनेतून अंग काढून घेतले तर ही योजना कोसळून पडेल. ही अशी संघटना नाही की जी स्वतःच्या बळावर चालू शकेल. काँग्रेसचेच उदाहरण घ्या. मी अर्थातच तिच्याबाहेर आहे. परंतु जवाहरलाल, सरदार आणि राजेंद्रबाबू जरी संघटनेबाहेर गेले तरी संघटना सुरू राहील. वा चरखासंघ घ्या. मी त्याचा अध्यक्ष आहे. चरखासंघ अशी संघटना आहे की जी अनेक वर्षांपासून सुरू आहे. मी जरी ती सोडली तरी तिचे काम चालेल. परंतु नयी तालीमसंबंधी अशी गोष्ट नाही. अजून ती आपल्या पायांवर घट्टपणे उभी राहिलेली नाही. ती चालवणारांमध्ये गीतेत सांगितलेले स्थितप्रज्ञाचे गुण (गीता अध्याय २, श्लोक ५५-७२) जेव्हा येतील तेव्हाच तिचे पाय घट्ट रोवले जातील. आपण अशा कामाचा शोध घेतला पाहिजे की ज्यात प्रत्येकजण भाग घेऊ शकेल. हस्तोद्योगच अशी गोष्ट आहे की ज्यात असे होऊ शकते हे मी तुम्हाला खात्रीपूर्वक सांगतो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २०२-४

---

५१. वालजी गो देसाई यांना पत्र

डिसेंबर १५, १९४७

चि. वालजी,

(पत्राच्या) मागील बाजूला लिहिलेले पत्र मला काल मिळाले. सुधारणाकरून मी रेल्वेबद्दलचा लेख पाठवत आहे (हा लेख 'आमच्या रेल्वेंचे लोकशाहीकरण करा' या शीर्षकाखाली डिसेंबर २१, १९४७च्या 'हरिजन'मध्ये प्रकाशित झाला होता.).

तू जी सूचना केली आहे त्यात मला हिंसेचा वास येतो. सेंट पॉल गरिबांना मदत करण्याविषयी काय म्हणतात (कॉरेन्थियन्स प्रकरण १३) ते वाच. ते मी माझ्या पद्धतीने करत आहे. मी जरी मंत्र्यांचा मित्र असलो तरी मी मंत्री नाही. सरकारबाहेरील लोकांना सरकारच्या अडचणी कळू शकत नाहीत. आणि मीसुद्धा बाहेरचा आहे. सुज्ञ माणसाला अजून काही सांगण्याची आवश्यकता आहे काय?

थडानींचे मी त्यांनाच पाठवत आहे. प्रेमपंथचे खंड (वालजी देसाईंनी गांधीजींच्या लेखनाचे गुजरातीत संपादित केलेले १० खंड. गांधीजींनी त्याकरिता लिहिलेल्या प्रस्तावनेकरिता पाहा प्रास्ताविक, जुलै ७, १९४६.) अजून मला मिळालेले नाहीत. परंतु मला वाटते की ते यथावकाश मिळतील. त्यांची पोच देण्याकरिता मी वेगळे पत्र लिहिणार नाही.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून, सी. डब्ल्यू. ७५०७. सौजन्य - वालजी देसाई

---

५२. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे सभेत त्यांचे हे भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

डिसेंबर १५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

नगरपालिकेच्या शाळांच्या सहा इमारतीत निर्वासित घुसले व त्यांनी ताब्यात घेतलेल्या त्या सर्व इमारती रिकाम्या करून लावण्याचे सर्व प्रयत्न आतापर्यंत विफल झाले हे वर्तमानपत्रात वाचताना मला दुःख झाले. नगरपालिका आता पोलिसांची मदत घेत आहे हे मी समजू शकतो.

ही घटना निर्लज्ज हुल्लडबाजीची आहे. भारताच्या राजधानीत अशा प्रकारच्या घटना होणे ही अतिशय लाजिरवाणी गोष्ट आहे. जे लोक या घटनेकरिता जबाबदार आहेत त्यांना पश्चात्ताप होईल व ते शाळेची इमारत रिकामी करतील अशी मी आशा करतो. ते जर असे करणार नसतील तर त्यांच्या मित्रांनी ही गोष्ट योग्य नाही हे त्यांना समजून सांगावे. सरकारला आपल्या धमकीप्रमाणे वर्तन करावे लागणार नाही अशी आशा आहे. निर्वासितांबद्दल सर्वसामान्यपणे अशी तक्रार आहे की त्यांना इतके दुःख सहन करावे लागले असतानाही ते समंजस, गंभीर आणि मेहनती झालेले नाहीत. सर्व निर्वासित आणि शाळेमध्ये शिरलेले निर्वासित बंधू प्रायश्चित्त घेऊन ही तक्रार चुकीची असल्याचे सिद्ध करतील अशी आशा आहे.

शनिवारी (डिसेंबर १२) मी कलकत्त्यातील हुल्लडबाजीचा अल्लेख केला होता. तिथे हुल्लडबाजी करणारे लोक निर्वासित नव्हते. या घटनेची पार्श्वभूमी वेगळी होती. भारताच्या प्रतिष्ठेचे जतन करणे पुढारी लोकांचे कर्तव्य आहे. भारतात जर गोंधळ आणि भ्रष्टाचार माजणार असेल तर भारताच्या अब्रूचे जतन होऊ शकत नाही. मी भ्रष्टाचाराचा उल्लेख केला कारण गोंधळ आणि भ्रष्टाचार हातात हात घालून चालत असतात. देशात भ्रष्टाचार वाढत असल्याचे मला विश्वसनीय सुत्रांकडून कळले आहे. देशाचा विचार न करता प्रत्येकजण जर केवळ स्वतःचा विचार करेल तर काय होईल? एक पत्रलेखक लिहितात-

नुकताच मी रेडिओवर तुमचे कालचे प्रार्थना प्रवचन ऐकत होतो. त्यात तुम्ही म्हणाला की जे मुसलमान बंधू लाहोरला जाऊन आले आहेत त्यांनी पाकिस्तान सरकारतर्फे तुम्हाला आश्वस्त केले आहे की मुसलमानेतर, विशेषेकरून हिंदू तिथे जाऊन परत आपले कामकाज सुरू करू शकतात. पहिली गोष्ट तर ही आहे की हिंदूंनाच बोलवायचे आणि शिखांना नाही ही चलाखी आहे. शीख आणि हिंदू यांच्यात फूट टाकणारी ही चाल आहे. अशा प्रकारचे आश्वासन धोकेबाजी आहे, चीड आणणारे आहे. बहुधा तुमच्यासारखेच मुसलमानांच्या अशा प्रकारच्या भूलथापांना बळी पडू शकतात. मी तुम्हाला ११ डिसेंबरच्या 'हिंदुस्तान टाईम्स'चे एक कात्रण पाठवत आहे. त्यावरून पाकिस्तान सरकारच्या खरेपणा आणि प्रामाणिकपणाविषयी तुम्हाला कळेल. तुमच्याकडे आलेले मुसलमान प्रामाणिक लोक आहेत असे तुम्ही तरीही म्हणाल काय? त्यांना इतकेच दाखवायचे आहे की पाकिस्तान सरकार अल्पसंख्याकांबद्दल न्याय करू इच्छिते आणि तिथे सर्व काही ठीक आहे. परंतु परिस्थिती याच्या अगदी उलट आहे. ते मुसलमान जर परत तुमच्याकडे आले तर त्यांना वृत्तपत्राचे हे कात्रण दाखवा. गेल्या २० नोव्हेंबरला जे लोक हिंदू बॅन्केतील आपली ठेव काढण्याकरिता गेले होते त्यांची काय परिस्थिती झाली होती हे तुम्ही विसरला नसाल अशी मला आशा आहे. त्यांच्या रक्षणासाठी गेलेल्या सशस्त्र दलावर पाकिस्तानच्या जबाबदार सरकारी अधिकाऱ्यांसमोर हल्ला करण्यात आला व हल्ला करणारांना थांबवण्याचा त्यांनी कोणताही प्रयत्न केला नव्हता.

त्या कात्रणात लिहिले आहे -

इतक्यातच प्रकाशित झालेल्या लाहोर नागरी आणि सैनिकी राजपत्रात पुढील वृत्त प्रकाशित करण्यात आले होते. दंगलीच्या दरम्यान जे मुसलमानेतर व्यापारी व दुकानदार पाकिस्तानमधून पळून गेले होते ते आपला व्यापार परत सुरू करण्याच्या आशेने हळूहळू काही महिन्यांनंतर परत येत आहेत. परंतु त्यांची दुकाने वगैरे परत करण्याआधी त्यांना अशा दस्तावेजावर सही करायला लावण्यात येते की त्यामुळे किती तरी मुसलमानेतर निराश होऊन परतले आहेत. पुनर्वसन आयुक्त पुढील अटींवर त्यांना त्यांचे दुकाने उघडून देतो.

१, दुकानदाराला वा हिशेबनिसाला आपल्या विक्रीचा पूर्ण हिशेब ठेवावा लागेल.

२. सरकारच्या पूर्वपरवानगीशिवाय त्याला पैसे वा माल एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी हलवता येणार नाही.

३. आपले दुकान वा व्यवसाय चालू ठेवण्याचे त्याने आश्वासन दिले पाहिजे.

४. विक्रीपासून आलेली रक्केम त्याला रोजच्या रोज बँकेत जमा करावी लागेल.

५. त्याला नेहमीकरिता लाहोरमध्ये राहावे लागेल.

मुसलमानांवर अशा कोणत्याही अटी लादण्यात आलेल्या नाहीत. मग हिंदूंकरिता या अटी का? हिंदूंचे म्हणणे आहे की आम्ही या अटींचे पालन करू शकत नाही. यामुळे निराश होऊन ते परत येत आहेत.

या निराशेबद्दल तर मी आधीच बोललो आहे. ही बातमी जरी खरी नसू शकेल तरी या मुसलमानेतर बांधवांनी जे सांगितले ते सर्व चुकीचे ठरत नाही. संबंधित लोकांनी केवळ स्वतःचा विचार करायचा नसतो तर भारताचा विचार करायचा असतो. ते भारताचे प्रतिनिधी आहेत आणि पाकिस्तानने त्यांना आश्वासन दिले आहे. संबंधित मुसलमान मित्रांनी माझ्या संपर्कात राहावे असे मी म्हणू शकतो. आज ते मला भेटायला आले होते. परंतु माझे मौन सुरू होते आणि मी प्रार्थनेचा संदेश लिहत होतो त्यामुळे मी त्यांना भेटू शकलो नाही. आम्ही शांत बसलेलो नाही आणि आमचे काम सुरूच आहे असा निरोप त्यांनी मला दिला होता. पत्रलेखकाने अशा प्रकारे संशयग्रस्त आणि संवेदनशून्य होऊ नये असा माझा त्याला सल्ला आहे. विश्वास ठेवून आपण काहीही गमावणार नाही. संशय माणसाला खात असतो. त्याने विवेकाने वागायला पाहिजे. माझ्याबद्दल बोलायचे तर मी जे केले त्याचा मला पश्चात्ताप होत नाही. आयुष्यभर डोळे उघडे ठेवून मी लोकांवर विश्वास ठेवत आलो आहे. या मुसलमान मित्रांवर मी तोपर्यंत विश्वास ठेवीन जोपर्यंत त्यांच्यावर विश्वास ठेवणे योग्य नाही असे सिद्ध होत नाही. विश्वासाने विश्वास वाढतो. यामुळे माणसाला विश्वासघाताला तोंड देण्याची शक्ती मिळते. दोन्ही बाजूच्या निर्वासितांनी जर आपल्या घरी परतायचे असेल तर त्याकरिता मी जो मार्ग अनुसरत होतो आणि अजूनही अनुसरत आहे तोच मार्ग आहे. हिंदू आणि शिखांमध्ये फूट पाडण्याची ही युक्ती आहे हा पत्रलेखकाचा संशय चुकीचा आहे. मी मुसलमान बांधवांना सांगितले होते की पूर्वग्रह असणारा माणूस तुमच्या बोलण्याचा असाही अर्थ काढू शकतो. यात काही चलाखी आहे. हे त्यांनी सपशेलपणे नाकारले. जे लोक परतू इच्छितात त्यांच्याकरिता हा जो मार्ग काढण्यात येत आहे त्यात मला काहीही चूक दिसत नाही. पाकिस्तानमध्ये शिखांच्या विरोधात जितके विषाक्त वातावरण आहे तितके भारतात नाही हे अमान्य करता येऊ शकत नाही. परंतु हिंदूंनी आणि शिखांनी सोबत पोहायला पाहिजे आणि वेळ आली तर सोबत बुडायला पाहिजे. त्यांनी मनात कोणताही दुजाभाव ठेवू नये. कटकारस्थान करणारांमध्ये कधीही भ्रातृभाव निर्माण होऊ शकत नाही.

पूर्व पाकिस्तानमधील एक पत्रलेखक लिहितो -

हिंदुस्तानची आता फाळणी झाल्यानंतरही तुम्ही स्वतःला संपूर्ण हिंदुस्तानचे नागरिक कसे म्हणवू शकता? जो एका उपनिवेशाशी संबंधित आहे तो आता दुसऱ्या उपनिवेशाशी संबंधित असू शकत नाही.

कायदेपंडित काहीही म्हणत असले तरी माणसाच्या अंतःकरणावर ते राज्य करू शकत नाहीत. पत्रलेखक जर म्हणाला की मी जागतिक नागरिक आहे तर त्याला कोण अडवू शकतो? कायदेशीरपणे तसे नसते आणि काही देशांत त्याला प्रवेश नाकारला जाऊ शकतो. परंतु आपल्यापैकी काही लोक ज्याप्रमाणे यांत्रिकपणे वागत नाहीत त्याचप्रमाणे जर माणूस यांत्रिकपणे वागणार नसेल तर आपले कायद्याप्रमाणे काय अधिकार आहेत याची तो फिकीर करणार नाही. जोपर्यंत आपण नैतिक मार्गावर आहो तोपर्यंत आपण काळजी करण्याचे कारण नाही. कोणत्याही व्यक्तीबद्दल वा देशाबद्दल आपल्यामध्ये शत्रुत्वाची भावना नसली पाहिजे इतकी मात्र आपण काळजी घेतली पाहिजे. उदाहरणार्थ ज्याच्या मनात मुलमानांबद्दल वा पाकिस्तानबद्दल शत्रुत्वाची भावना आहे तो भारत आणि पाकिस्तान या दोन्ही देशांचा नागरीक असल्याचा दावा करू शकत नाही. अशा प्रकारच्या शत्रुत्वाची भावना पसरली तर तिची परिणती भारत आणि पाकिस्तानच्या युद्धात होईल. जो कोणी आपल्या स्वतःच्या देशाबद्दल दुर्भावना ठेवील आणि दुसऱ्या देशाला मदत करील त्याला तो देश देशद्रोही समजेल. निष्ठा अविभाज्य असते.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २०४-८

---

५३. जीवनजी डा. देसाई यांना पत्र

डिसेंबर १६, १९४७

चि. जीवनजी,

या वेळी मी भरपूर (साहित्य) पाठवत आहे. नोंदी कल्याणम वा सुशीला पाठवील. त्यांतील तीनचार लेख आणि सुंदरलालचे काही लेख नमुन्यादाखल हिंदुस्तानीत आहेत. (लेखांमध्ये हिंदी की हिंदुस्तानी, सोमनाथ मंदिर आणि नोंदी हे डिसेंबर २१, १९४७ आणि डिसेंबर २८, १९४७ च्या 'हरिजन सेवक'मध्ये प्रकाशित झाले होते.) या वेळी त्या सर्वांचा समावेश करता येत नसेल तर तू शक्य तितक्यांचा समावेश कर. तेथील खिळे जुळवणारांना या लेखांचे हस्ताक्षर कळू शकेल असे तुला वाटते काय? तुला जर एखाद्या भागाचे पुनर्लेखन करावे असे वाटत असेल तर मला तसे कळव. देवचा लेख (हा जानेवारी ४च्या 'हरिजन सेवक'मध्ये 'प्रायश्चित्त की यात्रा' या शीर्षकाखाली प्रकाशित झाला होता.) लांब आहे. तू तो दोन वा तीन भागात प्रकाशित करू शकतो. त्याचे इंग्रजी भाषांतरसुद्धा तिथे आहे. (हे जानेवारी ४ आणि ११, १९४८च्या 'हरिजन'मध्ये 'पिलिग्रिमेज ऑफ पेनॅन्स' या शीर्षकाखाली प्रकाशित झाले होते.) तेसुद्धा तू तितक्याच भागात प्रकाशित करू शकतोस. असे मी दरवेळी करू शकेन असे समजू नकोस. काल प्यारेलाल इथे आला. तोसुद्धा आता काही तरी लिहील. वितरणावर काही परिणाम झाला काय ते कळव.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ६९६३. सौजन्य - जीवनजी देसाई

---

५४. नाराणदास गांधी यांना पत्र

डिसेंबर १७, १९४७

चि. नाराणदास,

तू सविस्तर वर्णन केले आहे. आपण कठीण काळात राहत आहो. सावध राहा. खादी केवळ खादी नाही, तिच्यात इतरही अनेक गोष्टी समाविष्ट आहेत. या इतर गोष्टींशिवाय खादी केवळ शेतकऱ्यांचा शोभेचा पोषाख मात्र होईल. ते म्हणतात की तू आता म्हातारा झाला आहेस. हे खरे आहे काय?

आशीर्वाद,

बापू

गुजरातीवरून. बापूनो पत्रो - ९: श्री नाराणदास गांधीने, भाग २, पृष्ठ ३२०. शिवाय सी. डब्ल्यू. ८६४९. सौजन्य : नाराणदास गांधी

---

५५. जमना गांधी यांना पत्र

डिसेंबर १७, १९४७

चि. जमना,

मला तुझे पत्र मिळाले. तुझी इच्छा असेल तेव्हा कनू आणि आभा तिथे जाऊ शकतात. केवळ आपल्या आईवडिलांची काळजी घेण्याच्या परिस्थितीत ते राहिलेले नाहीत हे मला मान्य आहे. एकाच वेळी दोन घोड्यांवर कोण बसू शकतो? सेवा करणे आणि सर्व दुःखांचे निरास करणाऱ्या रामनामाचा जप करणे आणि तो ठेवील तसे राहणे हाच सर्वात चांगला मार्ग आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

५६. शंकरलाल यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर १७, १९४७

चि. शंकरलाल,

मला तुझी दोन पत्रे मिळाली. त्यानंतर एकही नाही. तुझ्याकडे अनेक मित्र येतात हे मी समजू शकतो. परंतु ज्यांची तिथे आवश्यकता नसेल त्यांना तू परत त्यांच्या कामावर पाठव आणि वेळोवेळी त्यांना तुझी माहिती कळवत राहा. यामुळे तुझ्याजवळची गर्दी कमी होईल व रुग्णांना आणि त्यांची सेवा करणारांना काही शांतता मिळेल. आशा आहे नरहरी हळूहळू बरा होईल. परंतु त्याला बराच काळ विश्रांती घ्यावी लागेल. गारपिटीमुळे फार नुकसान झाले काय?

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य – प्यारेलाल

---

५७. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

होशियारपूरमध्ये राहणाऱ्या एका बंधूने, कदाचित ते तेथीलच असावे, मला किती तरी प्रश्न विचारले. त्यांनी त्यांचे नावही सांगितले आहे, परंतु मी ते उघड करू इच्छित नाही. मी त्यांचा प्रश्नसुद्धा सोडून देईन. ते म्हणतात की विभाजनापूर्वी पंजाब एक होता. यामुळे अनेकांचा व्यवसाय एका भागात तर घरदार दुसऱ्या भागात असे असू शकत होते. या मित्राचा व्यवसाय पश्चिम पंजाबमध्ये होता तर घरदार आणि पैसाअडका पूर्व पंजाबमध्ये होते. हजारो लोकांप्रमाणे त्यांना पश्चिम पंजाबमधून पळून यावे लागले. आपला व्यवसाय पूर्व पंजाबमध्ये आहे म्हणून तिथेच आपला व्यवसाय करता येईल असे त्यांना वाटत होते. परंतु तिथे गेल्यानंतर त्यांच्या घरात सरकारी अधिकारी राहत असल्याचे त्यांना आढळले. त्यांना केवळ दोन खोल्या देण्यात आल्या आणि इतर खोल्या त्या अधिकाऱ्याने ठेवल्या. असे दिसते की ते मोठे घर असावे. मला माझे घर मिळू शकत नाही काय असा त्यांचा प्रश्न आहे. त्यांना जर त्याचे घर मिळाले नाही तर सरकार त्यांना मदत करील काय की त्यांना न्यायालयातच जावे लागेल? मला वाटते की घरमालकाला त्याचे घर परत दिले पाहिजे.

मी आधीही सांगितले होते की निर्वासित लोक वाटेल तिथे जाऊन घराचा ताबा घेतात व तिथे राहू लागतात. एखादे घर कडीकुलपाने बंद असेल तर त्याचे कडीकुलूप तोडून टाकतात आणि तिथे मुक्काम ठोकतात. तिथे जो अधिकारी राहतो तो भाडे देऊन राहतो हे तर योग्य आहे परंतु घरमालक जेव्हा येतो तेव्हा तो तिथे कसा राहू शकतो? जर त्याला राहायचेही असेल तर घरमालकाशी बोलूनच त्याने घराचा एखादा भाग आपल्याजवळ ठेवावा. परंतु घराचा मोठा भाग आपल्याजवळ ठेवायचा आणि मालकच स्वतःच्या घरात पाहुणा व्हावा असे तर होऊ शकत नाही. परंतु निर्वासित भाडेकरूच्या भूमिकेत नसतात. ते जास्तीतजास्त इतकेच म्हणू शकतात की "आम्हाला आमच्या घरातून हुसकावून लावण्यात आले आहे." म्हणून काय त्यांनी कोणाच्याही घरात घुसून घराचा ताबा घ्यावा? आणि असे घर मुसलमानाचे असले तर सर्व काही संपलेच. निर्वासितांना वाटते की त्या घरावर आपला हक्कच

आहे. परंतु अशा प्रकारे वागून ना तर आपण भारताचे भले करू शकतो ना स्वतःचे. माझी तर खात्री आहे की अशा वर्तनाने कधीही कोणाचेही भले होऊ शकत नाही. चोऱ्यामाऱ्या करून वा संपत्ती लुटून वा कोणाचे घर वगैरे जाळून माणूस काय कधी स्वतःचे भले करू शकतो? मग हे लोक स्वतःचे भले कसे करू शकतील? अशा प्रकारे जर गोष्टी सुरू राहिल्या आणि पाकिस्तानमध्ये मुसलमानांशिवाय अजून कोणीही राहू शकत नसेल तर कसे होईल? "मुसलमानांच्या गोड बोलण्याला मी भुलून जाऊ नये आणि स्वतःची फसवणूक करून घेऊ नये अशी पत्रे तर माझ्याकडे दररोज काही ना काही येत असतात." इतके खरे की जर कोणी मुसलमान नसेल तर तो पाकिस्तानमध्ये आरामात राहू शकत नाही. परंतु अखेरीस पाकिस्तानमध्ये केवळ मुसलमान राहिले तर ते आपसात भांडू लागतील. पाकिस्तान वा भारतात असे काही घडत असेल तर ते चांगले नाही. आणि भारतात जर असे घडणार असेल तर ते अजूनच वाईट आहे कारण भारतात केवळ हिंदूच राहू शकतात असे आपण कधीही म्हणालो नव्हतो. जो कोणी भारतात जन्मला असेल व स्वतःला भारतीय समजत असेल त्याला भारतात राहण्याचा अधिकार आहे. असे जर होते आणि आजही आहे तर आमच्याजवळ तक्रार करण्यासारखे काहीही राहत नाही. पाकिस्तानबद्दल तर अनेक वर्षांपासून ते म्हणत असत की मुसलमानांना राहण्याकरिता एखादी जागा असली पाहिजे. याचा तर अर्थ असाच झाला की तिथे अजून कोणी राहो वा न राहो मुसलमान तिथे राहतीलच. परंतु १४ ऑगस्टला जेव्हा पाकिस्तान वास्तवात आले तेव्हा प्रत्येकाला पाकिस्तानमध्ये राहण्याचा अधिकार आहे असे ते म्हणाले होते. यामुळे मला ही गोष्ट फार आवडली. परंतु खुपणारी गोष्ट ही आहे की जे काही सांगितले जाते त्याची अंमलबजावणी होत नाही. इथे जर हिंदू आणि शीख असे करतील तर त्यात मला या दोघांचाही संहार आणि विनाश दिसेल. त्यात मला वेगळे काही दिसत नाही हे मी सांगून ठेवतो.

लाहोरमधील एक बंधू लिहितात की "मला माझ्या इच्छेविरुद्ध घर आणि जमीनजुमला सोडावा लागला". आता ते लाहोरमध्ये नाहीत. ते म्हणतात की "मला तिथून निघावे लागले, निघून येण्याची इच्छा होती असे काही नाही. परंतु निघालो आणि पश्चिम पंजाब सोडून इथे आलो. तुम्ही मला परतण्याचा सल्ला दिल्यामुळे मी परत गेलो. तिथे गेल्यानंतर मी पाहिले की माझ्या जमिनीचे व घराचे काहीच होत नाही. मला मोठ्यामोठ्या गोष्टी सांगण्यात आल्या परंतु माझे घर आणि जमीनजुमला काही परत मिळाले नाही. असे असताना परत तिथेच जा असे तुम्ही कसे म्हणू शकता?"

मी या प्रश्नाचे अनेकदा उत्तर दिले आहे. आणि आताही कोणी काही लिहिले असल्यामुळे काही तरी लिहावेच लागेल. मी स्पष्टपणे म्हणालो होतो की जाण्यासारखी परिस्थिती होईल तेव्हा मी सागेन. मी तर तेव्हा तयारीबद्दल म्हणालो होतो. ज्यांची मनातून परतायची इच्छा आहे त्यांनी परतण्याकरिता तयार राहावे. आधी तर ज्या मुसलमान बांधवांनी या गोष्टीत पुढाकार घेतला होता त्यांनी परत जायचे आहे. परंतु अजून तर या केवळ गोष्टी आहेत, परंतु या गोष्टी केवळ गोष्टी राहतील असे नाही. पाकिस्तान सरकारचे नाव घेऊन ते बोलले होते. एक तर आम्ही अपयशी झालो व ज्या हिंदूंना परतायचे असेल ते परतू शकतात असे पाकिस्तान सरकारच्या वतीने सांगण्यात आम्ही चूक केली असे अखेरीस त्यांना मान्य करावे लागेल. पत्रलेखकाचे म्हणणे आहे की घोषणा ही एक गोष्ट आहे आणि प्रत्यक्षातील वागणे अगदी वेगळी. मी परत जायला पाहिजे काय असे पत्रलेखकाने विचारले आहे. त्याला तसे विचारण्याचा निश्चितच अधिकार आहे. सध्या कोणत्याही निर्वासिताने परतण्याचा प्रश्नच उद्भवत नाही हे मी स्पष्टपणे सांगितले पाहिजे. अनेक लोकांना परतायची इच्छा आहे. मी त्यांना सांगतले की जेव्हा परतायची वेळ येईल तेव्हा मी तुम्हाला तारीख सांगेन. सध्या मी कोणालाच जाण्याकरिता सांगणार नाही. इतक्या लवकर यासंबंधी कोणीही काहीही सांगू शकत नाही. परंतु हे मुसलमान बंधू जेव्हा आश्वासन देतात तेव्हा फार बरे वाटते. त्यांना जर यश आले तर वातावरणात सध्या जे विष भरले आहे ते ताबडतोब नष्ट होईल याची मला खात्री आहे. जे करण्याची आवश्यकता आहे ते केले जाईल हे पाहण्याची गरज आहे. परंतु सध्या तरी पत्रलेखकाने आणि त्यांच्यासारख्या लोकांनी शांत राहावे. वेळ येईल तेव्हा मी सांगेन. अखेरीस पाकिस्तानमध्ये गुप्तपणे जाण्याची कोणालाही इच्छा नाही. ५००० लोकांना परत नेता येऊ शकेल अशा आगगाडीची व्यवस्था पाकिस्तान सरकार करील अशी मी अपेक्षा करतो. तसे झाले तर ते स्वतःहोऊन आणि अधिकारवाणीने जातील. ते पाकिस्तानमध्ये परत जातील कारण त्यांना निमंत्रित करण्यात आलेले असेल.

अजून एका तिसऱ्या गोष्टीसंबंधी मला बोलायचे आहे. ती आहे पूर्व आफ्रिकेसंबंधी. तुम्हाला माहीतच असेल की नैरोबी हा पूर्व आफ्रिकेतील सर्वात चांगला भाग आहे. तो भारतातील सिमल्यासारखा आहे. आपल्या भारतात ४ वा ५ महिने सुंदर हवामानाचे असतात आणि बाकीच्या महिन्यात भयंकर उकाडा असतो. विशेषतः सपाटीच्या प्रदेशात असे जास्त होते. मग लोकांना थंड हवा हवी असते आणि ते त्याकरिता सिमल्याला वा दार्जिलिंगला जातात. भारत मोठा देश आहे. पूर्व

आफ्रिका इतका मोठा नाही. याशिवाय नैरोबीला घडवणारेही शीखच होते. शीख लोक काही असे तसे थोडेच आहेत, अतिशय कार्यक्षम लोक आहेत ते आणि फार मेहनत करणारे व मजबूत लोकही आहेत ते. अतिशय मेहनत करून त्यांनी तिथे रेल्वे तयार केली. परंतु खास गोष्ट अशी आहे की रेल्वे बनवली त्यांनी आणि आता ते तिथे जाऊसुद्धा शकत नाही. जाऊ शकतात, परंतु केवळ मजुरी करण्याकरिता, राहण्याकरिता वा व्यापार करण्याकरिता नाही. नैरोबीबद्दल इतके पुरे. परंतु गोष्टी इथेच थांबत नाहीत. एकदा पहिले पाऊल चुकीचे पडले तर सर्व काही भरकटत जाते. यामुळे आता ते पूर्व आफ्रिकेत भारतीयांच्या येण्यावर प्रतिबंध घालणारे विधेयक मंजूर करू इच्छितात. दक्षिण आफ्रिकेत केले होते त्याचप्रमाणे इथेही करण्याची त्यांची इच्छा आहे. भारतीयांचे हक्क हिरावून घेण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. अजून हा कायदा झालेला नाही परंतु त्यासंबंधीचे विधेयक त्यांच्या विधिमंडळात आले आहे. यामुळे तिथे राहणारे आपले भारतीय बांधव आपल्याकडून अपेक्षा तर करतीलच. पंडित नेहरूंनाही त्यांनी लिहिले आहे कारण ते आपले विदेशमंत्री आहेत. बाहेर जे काही होते ते सर्व त्यांच्या हाती असते. याशिवाय ते आपले प्रधानमंत्रीही आहेत. यामुळे त्यांनी पंडित नेहरूंना एक तार पाठवली आणि त्याची प्रत मला पाठवली. याबाबतीत काही तरी म्हणावे अशी त्यांची इच्छा आहे आणि मी आफ्रिकेत राहिलेलो असल्यामुळे माझ्यावर त्यांचा जास्त हक्क आहे. यामुळे यासंबंधी बोलण्याची मी संधी घेतो. माझा आवाज तिथे पोहोचेल याबद्दल मला शंका नाही. भारत आता स्वतंत्र देश आहे. स्वतंत्र भारताला अशी वागणूक मिळणार आहे काय? मोंबासा आणि पूर्व आफ्रिका हे ब्रिटिशांचे प्रदेश आहेत. ब्रिटिश प्रदेशात गेलेल्या भारतीयांचे अशी अवस्था होणार आहे काय? तिथे मोठ्या संख्येत भारतीय व्यापारी आहेत हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. त्यातील बरेच खोजा आहेत आणि काही मुसलमान. तिथे अनेक हिंदूही आहेत. ते भारताच्या सर्व भागांमधून गेलेले आहेत. तेथील हब्शी लोकांशी व्यापार करून त्यांनी बराच पैसा मिळवला आहे. ब्रिटिशांनी त्या भागात प्रवेश करण्याच्या पूर्वीपासून ते तिथे गेलेले होते. इतकेच नाही तर युरोपीय लोकांनीसुद्धा त्या वेळी त्या भागात प्रवेश केलेला नव्हता, आणि केलाच असेल तरी त्यांची संख्या नगण्य होती. भारतीयांनी तिथे मोठमोठे महाल बांधले आहेत कारण तसे करण्याची त्यांच्यात क्षमता होती. इतकेच नाही तर त्या काळात आपली जहाजेसुद्धा तिथे होती. परंतु आपली जेव्हा अवनती झाली तेव्हा आपली जहाजेही गेली.

यानंतर ब्रिटिश आणि इतर युरोपीय लोक तिथे गेले. ही लांब कहाणी आहे आणि त्यात शिरण्याची माझी इच्छा नाही. हब्शी लोकांमध्ये भारतीय शांतपणे राहत होते व त्यांच्याशी व्यापार करत होते. ते प्रामाणिकपणे व्यापार करत होते असे मी म्हणणार नाही परंतु त्यांनी बळजबरीने कुणाकडूनही काहीही घेतले नाही. मुसलमानही तिथे गेले होते आणि असे काही नाही की मुसलमानांना तिथे काही जास्त मिळाले होते आणि हिंदूंना कमी. तेथील हिंदू आणि मुसलमानांमध्ये आजही सांप्रदायिक वाद नाही. यामुळेच ते सगळे एक होऊन लिहितात की हे विधेयक तुम्ही काही ना काही करून अडवा. असे झाले नाही तर आमचे फार मोठे नुकसान होईल. माझे तर म्हणणे आहे की हे विधेयक थांबवले पाहिजे.

भारत एक स्वतंत्र राष्ट्र आहे आणि यासंबंधी जे करणे आवश्यक असेल ते जवाहरलाल करील याची मला खात्री आहे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २१३-८

---

५८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एका बंधूंचे एक पत्र आले आहे. त्यात त्यांनी विचारले की तुमचा जर इंग्रजीच्या वापराला आक्षेप आहे तर मग उर्दूच्या वापराला का नाही. तुम्ही म्हणता त्याप्रमाणे भारत जर सर्वांचा मित्र आहे तर इंग्रज आणि मुसलमान आपल्याकरिता सारखेच असले पाहिजे.

या बंधूंना जे दुःख झाले आहे ते अज्ञानामुळे झाले आहे. अज्ञानाशिवाय याचे काही वेगळे कारण असू शकते असे मला तरी वाटत नाही. उर्दूला माझा आक्षेप नाही, मी तर तिचे समर्थन करतो. प्रांतिक भाषांच्या पातळीवर तर उर्दू आहे, पंजाबी आहे, मराठी, गुजराती, बंगाली उडिया वगैरे सर्व भाषा आहेत. जितके भाषावार प्रांत आहेत तितक्याच भाषा आहेत. अशा तर भारतात अनेक भाषा आहेत, परंतु सर्व विद्वानांनी मिळून ठरवले त्या प्रमाणे १४ वा १५ भाषा बऱ्याच भव्य आहेत. त्यांचे स्वतःचे साहित्य आहे आणि त्यांच्यापासून आपण काही ना काही शिकतो. परंतु या चौदा वा पंधरा भाषा सर्व प्रांतांत तर चालू शकत नाहीत. परस्परांशी व्यवहार करण्याकरिता सर्व प्रांतांची कोणती भाषा असली पाहिजे हा प्रश्न आहे. जेव्हापासून मी दक्षिण आफ्रिकेतून परतलो तेव्हापासून मी हेच सांगतो आहे की आपली राष्ट्रभाषा तीच असू शकते जी बहुसंख्याक हिंदू आणि मुसलमान बोलू शकतात. अशी भाषा देवनागरी आणि उर्दू लिपीत लिहिली जाणारी हिंदुस्तानीच असू शकते. मी तर सांगितले आहे की मी उर्दूचे समर्थन करतो परंतु सगळ्या जगाचा मित्र असूनही मी इग्रजीचे समर्थन का करत नाही ही समजून घेण्यासारखी गोष्ट आहे. इंग्रजीला या देशात स्थान नाही. इंग्रजांनी इथे राज्य केलेले असल्यामुळे इंग्रजीला महत्त्व आले. परंतु इंग्रज गेल्यानंतर इथे जे राज्य चालवायचे आहे ते आपल्या भाषेत चालवायचे आहे. इंग्रजी विदेशी भाषा आहे स्वदेशी भाषा नाही. यामुळे मी लाजेने नाही तर अभिमानाने सांगत असतो की उर्दू ही भारतीय भाषा आहे, तिची घडण भारतात झाली आहे. तुलसीदासचे तर आपण भक्त आहो, आणि असायलाही पाहिजे. तुम्हाला हे पाहून आश्चर्य वाटेल की त्यांच्या रामायणात किती तरी अरबी आणि फारसी शब्द घेतलेले आहेत. बाजारात जे शब्द बोलले जात होते तेच शब्द त्यांनी घेतले. अखेरीस त्यांनी जे लिहिले

आहे ते तुमच्याकरिता व माझ्याकरिता लिहिले आहे. जे थोडेसे लोक संस्कृत बोलणारे आहेत त्यांच्याकरिता तुलसीदासजींनी थोडेच लिहिले आहे. यामुळेच जी तुलसीदासजींची भाषा आहे तीच आमची भाषा आहे. आपली राष्ट्रभाषा कोणती आहे याचा जर तुम्हाला निर्णय घ्यायचा असेल तर मी दाव्याने सांगू शकतो की आमची राष्ट्रभाषा तीच असू शकते जी उर्दू आणि देवनागरी लिपीत लिहिली जाते. याकरिता मला लोकांनी मारले, कापले वा अजून काही केले तरी मी असेच म्हणेन.

लाला लजपतराय (जानेवारी २८, १८६५ - नोव्हेंबर १७, १९२८; पंजाबमधील राष्ट्रवादी पुढारी, शिक्षाविद आणि पत्रकार; १९०७ साली पंजाबमध्ये कृषक आंदोलन सघटित केले. ब्रह्मदेशात तडीपार केले; भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष, १९२०; सायमन आयोगाच्या विरोधात निदर्शने करत असताना झालेल्या जखमांमुळे मृत्यू.) यांना पंजाब केसरी म्हणून ओळखत असत. ते आता नाहीत. ते माझे मित्र होते. तुम्ही हिंदी कधी शिकणार असे मी त्यांना थट्टा करत विचारत असे. ते म्हणत की कधीही नाही. ते आर्यसमाजी होते हे तुम्हाला माहीत असले पाहिजे. (आर्यसमाजाचे सदस्य, दयानंद सरस्वतींनी स्थापन केलेला हिंदू धर्माचा सुधारणावादी पंथ) ते होमहवन व इतर अनेक धार्मिक परंपरांचे पालन करत असत. त्यांच्याबरोबर राहत असताना मी हे सर्व पाहत असे. हवनात केवळ संस्कृत भाषेचा उपयोग होत असे आणि विचित्र गोष्ट तर ही होती की हे सर्व असतानाही ते थोडेथोडे वाचू शकायचे. परंतु त्यांची मातृभाषा उर्दूच होती. ते म्हणायचे की उर्दूत कोणी मला बोलायला सांगितले तर मी तासंतास बोलू शकतो, आणि बोलायचेही. आणि काय सांगू उर्दूचे तर ते फार मोठे विद्वान होते व उर्दूत फार जलदगतीने लिहू शकायचे. ते इंग्रजीतही तासंतास बोलू शकायचे. परंतु संस्कृतप्रचूर हिंदी तर त्यांना कळतसुद्धा नसे. जेव्हा मी निवडूननिवडून अरबी, फारसी शब्द वापरत असे तेव्हा कुठे त्यांना मी काय बोलतो ते कळत असे. आता जेव्हा मी त्यांची गोष्ट सांगितली तर असे समजा की सर्वांची सांगितली. आता हे बंधू विचारतात की उर्दूवर आक्षेप का नाही? मी तर म्हणेन की कोणाचाही आक्षेप असू नये. परंतु इंग्रजीवर माझा आक्षेप आहे. अखेरीस हिंदी साहित्य संमेलनाचाही मी दोनदा अध्यक्ष राहिलो आहे (मार्च १९१८ आणि एप्रिल १९३५) आणि अध्यक्ष म्हणून मी ही गोष्ट दोनदा सांगितली होती आणि कोणीही आक्षेप घेतला नव्हता. कोणी तक्रार केलीही असेल तर एकदोन लोकांनी केली असेल. खरे म्हणजे त्यांनी त्याचे टाळ्या वाजवून स्वागत केले व मी जे काही म्हणतो आहे ते योग्य आहे असेही ते म्हणाले. आजही मी तोच माणूस आहे. मग मी हिंदीची बाजू कमी घेतो म्हणून मी कमी भारतीय आहे असे कसे म्हणता येईल?

आज आपण गोंधळात सापडलो आहो आणि आपण आपल्याकरिताच विष निर्माण केले आहे. हीच गोष्ट अजमेरमध्ये घडली. तुम्हांला जर हिंदू धर्म वाचवायचा असेल तर भारतात राहत असलेल्या मुसलमानांना शत्रूप्रमाणे वागवून तुम्ही असे करू शकणार नाही. या जगातील माझे थोडेच दिवस राहिलेले आहेत. थोड्याच दिवसात मी निघून जाणार आहे. मी जे काही म्हणतो ते बरोबर होते हे तेव्हा तुम्हाला कळेल. हीच गोष्ट मुसलमानांनाही लागू होते. मुसलमान जर केवळ मुसलमानांनाच ओळखतील आणि इतर सर्व आमचे शत्रू आहे असे म्हणतील तर इस्लाम मृतप्राय होईल. हीच गोष्ट ख्रिश्चनांना आणि ख्रिश्चनधर्मालाही लागू आहे. जे बायबलला मानतात तेच खरे अहले किताब आहेत वा जे कुरण शरीफला मानतात तेच खरे अहले किताब आहेत असे जर ते म्हणतील तर ते चुकीच्या मार्गावर आहेत असे मी म्हणेन. जगातील सर्व धर्म चांगले आहेत कारण ते नैतिकता आणि मैत्री शिकवत असतात. जे धर्म माणसामाणसात शत्रूत्व शिकवतात त्यांना मी धर्म समजत नाही.

इंग्रजांच्या काळातही मी म्हणत असे की भारताची भाषा इंग्रजी असू शकत नाही. मला ती लिहिता वाचता येते. मी इंग्रजांचा वा त्यांच्या भाषेचा शत्रू नाही हे प्रत्येकाला माहीत आहे. प्रत्येकाची एक जागा असते. इंग्रजी आंतरराष्ट्रीय भाषा आहे. आपल्याला जर विदेशांशी व्यवहार करायचा असेल तर आपण तो इंग्रजीतूनच करू शकतो. इंग्रजी विश्वभाषा आहे. हिंदुस्तानीला ती सार्वत्रिक मान्यता मिळालेली नाही. आपण इंग्रजांच्या राज्यातून मुक्त झालेलो असलो तरी इंग्रजी संस्कृतीच्या प्रभावापासून आणि इंग्रजी भाषेपासून आपण मुक्त झालेलो नाही ही खेदाची गोष्ट आहे.

लक्षात ठेवा की गंगा आणि यमुनेचा ज्याप्रमाणे प्रयागमध्ये संगम झाला आहे त्याप्रमाणे हिंदी आणि उर्दूचा हिंदुस्तानीत संगम झाला आहे. हिंदी आणि उर्दू या दोन्ही भाषांचे व्याकरण सारखे आहे व तेच हिंदुस्तानीचेही व्याकरण आहे. तिच्यात संस्कृत, फारसी, इंग्रजी आणि इतर अनेक भाषांमधील शब्द आहेत. 'कोर्ट' हा शब्द जितका विदेशी आहे तितकाच 'कचहरी' हा शब्दही विदेशी आहे. यामुळे पहिला शब्द नाकारून दुसरा स्वीकारण्यात काहीही अर्थ नाही. याचप्रमाणे 'बायसिकल' आणि 'रेल' हे शब्द आहेत. तुम्ही 'रेल' या शब्दाकरिता दुसरा कोणता शब्द वापराल? सत्य हे आहे की किती तरी इंग्रजी शब्दांनी आपल्या भाषेत प्रवेश केला आहे आणि आपण त्यांचा दुस्वास करत नाही. परंतु पत्रलेखक जर कोणी मला इंग्रजीत पत्र लिहित असेल तर त्याला हिंदुस्तानी येत नाही असे म्हणून मी त्याचे पत्र बाजूला फेकून देईन. याचप्रमाणे मी जर त्याला इंग्रजीत पत्र पाठवले तर त्यालाही ते पत्र

फेकून देण्याचा अधिकार असेल. वास्तवात ही गोष्ट फार साधी आहे परंतु काय योग्य आणि काय अयोग्य हेच आपण विसरलो आहो. आपल्यामध्ये एक प्रकारची विकृती निर्माण झाली आहे. ईश्वर आपले रक्षण करो.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन -२', पृष्ठ २१८ - २२

---

५९. रेव्हरंड कार्डेस यांना पत्र

[डिसेंबर १९, १९४७]

(हे पत्र या तारखेच्या पत्रात ठेवलेले आहे.)

प्रिय कार्डेस,

तुमचे पत्र. तुम्ही तिथे आहा आणि मला दिलेली खोली तुम्हाला मिळाली हे पाहून मला किती तरी आनंद होतो. तिथे आरामात राहा व जे काम तुम्हाला करायचे असेल ते करा.

तुम्ही दिल्लीमार्गे जाल असे मला वाटत होते. नाही का? मला सविस्तर लिहा.

स्नेह,

बापू

रेव्हरंड कार्डेस (पत्ता देवनागरी लिपीत लिहिलेला आहे.)

सेवाग्राम

---

६०. भोपाळच्या नबाबांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर १९, १९४७

प्रिय नबाब साहेब,

तुम्ही कृपापूर्वक पाठवलेली तार मला काल मिळाली. रुग्ण (चांदराणी आणि त्यांच्या आईवर काही गुंडांनी हल्ला केला होता व चांदराणीला रेल्वेबाहेर फेकून दिले होते.) सुरक्षित हातात आहेत हे मला माहीत आहे. चांदराणी ही होतकरू जनसेविका आहे. तिच्यावर कोणी हल्ला करू शकतात यावरच माझा विश्वास बसत नाही. एक आश्रमवासी तुमच्याकरिता ही चिठ्ठी घेऊन त्यांना भेटायला येत आहे. एक पत्र शोएबलाही (शोएब कुरेशी) पाठवत आहे.

तुमचा विश्वासू,

मो. क. गांधी

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

६१. चांदराणी यांना पत्र

डिसेंबर १९, १९४७

चि. चांद,

तू कशी मुलगी आहेस! तुला घ्यायला तीन वेळा माणसे स्टेशनवर गेली परंतु तू आली नव्हती. अखेरीस उपहाराच्या डब्यातील एका नोकराने सांगितले की दोन स्त्रिया जेवणाकरिता आल्या होत्या. त्यांनी अजून त्याचे पैसे दिलेले नाहीत. परंतु त्यानंतर काय झाले हे कोणालाही माहीत नाही. जे झाले त्याचीच आशंका मला वाटत होती. (चांदराणी आणि त्यांची आई जेव्हा ठरल्याप्रमाणे १७ तारखेला आल्या नाही तेव्हा गांधीजी उद्गारले होते : "त्यांना पंजाबी समजून कोणी डब्याबाहेर फेकून तर दिले नाही?) मला त्याबद्दल काल कळले. आता मला सविस्तर माहिती कळली. नबाब साहेबांनी तार करून कळवले की तू आणि तुझी आई दोघेही धोक्याबाहेर आहा. ही ईश्वरी कृपा आहे. तुम्ही दोघीही आनंदी असाल अशी आहे. तुम्ही दोघीही इथे लवकरच येणार आहा, नाही का? डॉक्टर म्हणतात तितकी विश्रांती घ्या. तुमच्यावर हल्ला कसा झाला? हल्ला करणारे कोण होते? ओमप्रकाशबरोबर हे येईल. तू स्वतः लिहू शकत नसशील तर त्याला सर्व सविस्तर सांग. त्याला त्वरित परत पाठव. तुझा भाऊ येण्याच्या तयारीत आहे. त्याने यावे असे तुला वाटते काय? तू जसे म्हणशील तसे होईल. प्यारेलाल इथे आहे.

तुम्हा दोघींनाही आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

६२. चिमणलाल शाह यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर १९, १९४७

चि. चिमणलाल,

माझी आर्यनायकमशी सविस्तर चर्चा झाली. मी त्यांना सुचवले की कायदेशीरपणे जरी तू प्रबंधक असलास तरी त्यांनी स्वतःलाच वास्तवातील प्रबंधक समजून त्याप्रमाणे निर्णय घ्यावे. याचा अर्थ आश्रमातील ज्या भागाचा उपयोग तालिमी संघाकरिता होतो त्या भागावर इतर कोणीही दावा करू नये. त्यांचा विश्वास आहे की आश्रमवासी आणि तालिमी संघाचे सदस्य यांच्यात वा आश्रम आणि तालिमी संघात कोणतेही अंतर नाही. आश्रमाला हानी पोहोचवून तालिमी संघाचा कोणताही लाभ होऊ शकत नाही असे त्यांना वाटते. मी जे काही करतो ते असेच समजून करत असतो, आणि इतरांनीही तसेच करावे. त्यांचे असेही म्हणणे आहे की पूर्वीप्रमाणे आता ना तर जाजूंचा वा कृष्णदासचा माझ्याबद्दल किंचितही गैरसमज आहे ना माझ्यावर त्यांचा अविश्वास आहे. हे सर्व तुला कळवण्याकरिता मी त्यांना सांगितले. तसेच हे सर्व तुला कळवणारे पत्र तुला लिहावे म्हणूनही मी त्यांना सांगितले. ते म्हणाले की पत्राची आवश्यकता नाही. यात काही बदल आवश्यक आहे काय ते मला सांग.

चांदबद्दल वृत्तपत्रांमधून तू काही तरी वाचले असशीलच. ती दुःखद घटना आहे. याहून अधिक मजकूर मी सांगू शकत नाही.

आशीर्वाद,

बापू

---

६३. देव प्रकाश नाय्यर यांना पत्र

डिसेंबर १९, १९४७

चि. देव,

हुनरचे हे पत्र वाच. हे कशासंबंधी आहे? हुनरशी बोलायचे असेल तर बोल. माझे पत्र (पुढील विषय पाहा) त्याला दे. मला तुझे पत्र मिळाले. तुझे अनेक लेख आहेत परंतु त्यांतील तुला कोणता परत हवा आहे हे मला माहीत नाही. मी प्यारेलालला विचारीन. वर्तमानपत्रात तू चांदसंबंधीचे पत्र वाचले असशील. येथून जे काही करणे आवश्यक होते ते करण्यात आले आहे. काळजीचे कोणतेही कारण नाही अशी तार नबाब साहेबांकडून आली आहे. ओम प्रकाश आला आहे. तो आज जात आहे. तू मुळीच काळजी करू नकोस.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

६४. हुनर यांना पत्र

डिसेंबर १९, १९४७

चि. हुनर,

मला तुझे पत्र मिळाले. महेशने जेव्हा तुला थांबवले तेव्हा तिथे थांबणे हे कदाचित तुझे कर्तव्य झाले असावे. पंडित सुंदरलाल इथे आहेत. त्यांनी मला काहीही सांगितले नाही. निदान ऐकण्याची संधी तरी मला मिळाली पाहिजे.

देवसंबंधी कुठे तरी काही तरी गैरसमज झाला असावा असे मला वाटते. देववर कलीयुगाचा प्रभाव पडू शकत नाही असा माझा आधीपासून विश्वास आहे. मी तुझे पत्र त्याला पाठवत आहे. तू त्याच्याशी स्पष्टपणे आणि मोकळेपणाने बोलायला पाहिजे.

जनरल शाह नवाझ यांना थोडा वेळ होईल.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

६५. मेयोंच्या सभेत भाषण

जसरा,

डिसेंबर, १९, १९४७

बहुसंख्य मेय़ो असलेल्या एका सभेत भाषण देताना गांधीजी म्हणाले की आज माझ्या शब्दांमध्ये ती शक्ती राहिलेली नाही जी आधी होती. एक काळ असा होता की मी म्हणेन त्याप्रमाणे लोक वागायचे. माझ्या शब्दांमध्ये आज जर ती शक्ती असती तर एकाही मुसलमानाला भारतातून पाकिस्तानमध्ये स्थलांतर करावे लागले नसते तसेच पाकिस्तानमधून एकाही हिंदूला वा शिखाला आपले घरदार सोडून भारतीय संघराज्यात येऊन आश्रय मागणे भाग पडले नसते. इथे काही भयानक घटना घडल्या. कत्तली, जाळपोळ, लूटमार, अपहरण, बळजबरीने धर्मांतर आणि याहूनही ज्या भयानक घटना आम्ही पाहिल्या त्यांची माझ्या मते पाशवीपणाच्या इतर घटनांशी क्वचितच तुलना होऊ शकते. हे खरे आहे की यापूर्वी अशा घटनांचा आपल्याला परिचय नव्हता असे नाही. परंतु त्यात अशी नागडीउघडी सांप्रदायिकता नव्हती. अशा प्रकारच्या घटनांमुळे मला दुःखही होत आहे आणि लाजही वाटते. याहूनही जास्त लाजिरवाणी गोष्ट मशिदी, देवळे आणि गुरुद्वारा यांची तोडफोड आणि विध्वंस आहे. अशा प्रकारच्या वेडेपणाला प्रतिबंधित करण्यात आले नाही तर दोन्ही संप्रदायांच्या लोकांचा विनाश होईल. जोपर्यंत हे वेडेपणाचे राज्य असेल तोपर्यंत आपल्याला स्वातंत्र्याचे दर्शन होऊ शकत नाही.

गांधीजी आपले भाषण पुढे सुरू ठेवत म्हणाले की यावर कोणता उपाय आहे? माझा बंदुकीच्या शक्तीवर विश्वास नाही. मी केवळ तुम्हाला अहिंसेचे शस्त्र देऊ शकतो. याद्वारे तुम्हाला कोणत्याही आपत्कालीन परिस्थितीवरील उत्तर सापडू शकेल आणि त्याला कोणताही पर्याय नसेल. ती सर्व प्रकारच्या संकटांचा सामना करू शकते आणि ती अजेय आहे. हिंदू धर्म, ख्रिश्चन धर्म, इस्लाम, शीख धर्म इत्यादी सर्व धर्मांची अहिंसेची शिकवण एकच आहे. परंतु आज धर्माच्या पुजाऱ्यांनी तिला जड सिद्धांताचे केवळ पुस्तकी रूप दिले आहे व व्यवहारात ते जंगलाच्या कायद्याचे पालन करतात. आज माझा आवाज कदाचित अरण्यरुदनासारखा असेल, परंतु मी तुम्हाला अहिंसेच्या या संदेशाशिवाय

दुसरा कोणताही संदेश देऊ शकत नाही. मी तर म्हणेन की या पाशवी शक्तीला आत्मिक शक्तीशिवाय इतर कोणत्याही शक्तीने तोंड देता येऊ शकत नाही.

यानंतर गांधीजींनी मेवो लोकांच्या प्रतिनिधींनी वाचून दाखवलेल्या निवेदनाचा उल्लेख केला. त्या निवेदनात त्यांच्या तक्रारी क्रमवार नमूद करण्यात आल्या होत्या व त्यावरील उपाययोजना व्हावी अशी त्यांची मागणी होती. गांधीजींनी श्रोत्यांना सांगितले की मी तुमचे निवेदन तुमचे मुख्यमंत्री डॉ. गोपिचंद भार्गव यांच्याजवळ दिले आहे व त्यांतील विविध समस्यांवर कोणती उपाययोजना केली जाईल हे डॉ. गोपिचंद भार्गव तुम्हाला सांगतील. मी तुम्हाला सांगतो की जर एखादा सरकारी अधिकारी गैरव्यवहार करताना आढळला तर सरकार त्याच्याविरुद्ध योग्य आणि आवश्यक कारवाई करताना मागेपुढे पाहणार नाही याची मला खात्री आहे. कोणत्याही एका व्यक्तीला सत्ता बळकावण्याचा अधिकार दिला जाऊ शकत नाही व त्याच्या म्हणण्याप्रमाणे कोणत्याही अधिकाऱ्याची एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी बदलीही करता येऊ शकत नाही. मी स्पष्टपणे सांगतो की कोणत्याही व्यक्तीच्या सहमतीने वा तिच्या इच्छेने केलेल्या धर्मरिवर्तनाला वा दुसऱ्या धर्मातील व्यक्तीशी केलेल्या विवाहाला मान्यता दिली जाऊ शकत नाही. अशा धर्मांतराला वा विवाहाला वैध म्हणून मान्य करता येऊ शकत नाही. चोहोकडे आतंकवादाचे राज्य असताना सहमती वा स्वेच्छा या शब्दांना अर्थ उरत नसतो.

गांधीजी पुढे म्हणाले की तुमच्या वेदनांवर माझ्या शब्दांची फुंकर मारली जाऊन जर त्या कमी होत असतील व तुम्हाला धीर येईल तर मला आनंद होईल. अलवर आणि भरतपूर संस्थानांमधून हुसकावून लावण्यात आलेल्या मेवो निर्वासितांचा उल्लेख करत गांधीजी म्हणाले की सर्व प्रकारचे शत्रुत्व ज्या दिवशी संपेल व सर्व प्रकारची द्वेषभावना जमिनीखाली दफन करण्यात येईल व ज्या कोणाला घरदार सोडून निघून जाण्याकरिता बाध्य करण्यात आले आहे त्या सर्वांना परत आपल्या घरी परतता येईल व संपूर्ण शांतता आणि सुरक्षिततेच्या वातावरणात परत आपले कामकाज करता येईल त्या दिवसाची मी वाट पाहतो आहे. जेव्हा असे होईल तेव्हा मी आनंदाने नाचू लागेन. जोपर्यंत मी जिवंत आहे तोपर्यंत मी ही आशा सोडणार नाही. परंतु मी मोकळेपणाने मान्य करतो की आजच्या परिस्थितीत हे शक्य नाही. मला विश्वास आहे की संघराज्याचे सरकार याबाबतीतील आपले कर्तव्य पार पाडण्यात चालढकल करणार नाही आणि संस्थानांनाही संघ सरकारचा सल्ला मान्य करावा लागेल. भारतीय संघराज्यात विलीन झाल्यामुळे संस्थानिकांना आपल्या प्रजेवर दडपशाही करण्याचा अधिकार

राहिलेला नाही. संस्थानिकांना जर आपली प्रतिष्ठा राखून ठेवायची असेल तर त्यांनी आपल्या प्रजेचे विश्वस्त आणि सेवक व्हायला पाहिजे.

मेयोंना उपदेशाचे दोन शब्द सांगत गांधीजींनी आपल्या भाषणाचा समारोप केला. ते म्हणाले की मला असे सांगण्यात आले आहे की मेवो जवळपास गुन्हेगार जमातींप्रमाणेच आहेत. हे म्हणणे जर खरे असेल तर तुम्ही स्वतःमध्ये सुधारणा करण्याचा जास्तीत जास्त प्रयत्न केला पाहिजे. स्वतःमध्ये सुधारणा घडवून आणण्याचे काम दुसऱ्यावर सोडता येत नाही. माझ्या या सल्ल्यामुळे तुम्ही नाराज होणार नाही अशी मला आशा आहे. ज्या सद्भावनेने मी तुम्हाला हा सल्ला दिला आहे त्याच सद्भावनेने तुम्ही हा सल्ला घ्याल अशी माझी अपेक्षा आहे. मेवोंबद्दलची ही तक्रार जरी खरी असेल तरी या आधारावर त्यांना भारतातून काढून पाकिस्तानमध्ये पाठवता येऊ शकत नाही हेच मी संघ सरकारला सांगेन. मेवो लोक हे भारताची प्रजा आहेत व शिक्षणाच्या सोयीसवलती पुरवून आणि त्यांच्या वस्त्या उभारून त्यांना मदत करणे आपले कर्तव्य आहे. (यानंतर डॉ. गोपिचंद भार्गव हे सभेला उद्देशून बोलले. दिल्लीला परतत असताना मेवो लोकांच्या उघड्यावर असलेल्या छावणीला गांधीजींनी भेट दिली व तेथील लोकांशी चर्चा केली.)

'हरिजन', डिसेंबर २८, १९४७ आणि 'द हिंदुस्तान टाईम्स', डिसेंबर २०, १९४७

---

६६. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर १९, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

"आज दुपारी मेवोंना भेट देण्याकरिता मी गुडगावला गेलो होतो. तिथे तीन प्रकारचे मेवो होते. एक तर अलवरहून पळून आले होते, दुसरे भरतपूरहून आणि तिसरे तेथीलच. पूर्व पंजाबचे प्रधानमंत्री गोपिचंद भार्गवही सोबत होते. त्यांनी मेवोंना सांगितले की ज्यांची राहण्याची इच्छा आहे त्यांना कोणीही हटवू शकत नाही. सरकार त्यांचे रक्षण करील. लाखो लोकांना आपले घरदार आणि जमीनजुमला सोडून जावे लागले. कोणी जास्त पाशवीपणा केला या प्रश्नाचा विचार करण्यात अर्थ नाही कारण जे शत्रुत्व निर्माण झाले आहे ते अशा चर्चेने संपवता येऊ शकत नाही आणि कोणी आरामात बसू शकत नाही. या दोन संप्रदायांतील कायम शत्रुत्व आपल्या नशिबात असू नये. असे झाले तर त्याचा शेवट आपल्या विनाशात होईल. मी तर सांगितलेच आहे की हे मी सहन करू शकत नाही. हं, ज्यांनी जायचे ठरवले आहे वा जे घाबरल्यामुळे जाऊ इच्छितात त्यांना कोणीही अडवू शकत नाही, परंतु जाण्याकरिता कोणावरही बळजबरी केली जाणार नाही. जे काही होईल ते त्या लोकांच्या इच्छेप्रमाणे होईल. परंतु कोणालाही बळजबरीने जाण्याकरिता भाग पाडण्यात येऊ नये. सरकारने असे करू नये, सरकरी अधिकाऱ्यांनी असे करू नये आणि जनतेनेही असे करू नये. आणि कोणी असे करत असेल तर तो वेडेपणा होईल. तिथे सर्व भगिनीही होत्या आणि पुरुषही होते. सर्व दुःखी आहेत. अनेकांकरिता निवाऱ्यापुरते तंबूसुद्धा नाहीत, आणि थंडीचे हे असे दिवस आहेत. ही सर्व एक अतिशय दुःखद कहाणी आहे. अलवर संस्थानाने त्यांना परत बोलावून आपली चूक कबूल केली पाहिजे. अशीच गोष्ट भरतपूरची आहे. मेवो गुन्हेगार जमात आहे असे आपण म्हणू शकत नाही. कोण गुन्हेगार आहे आणि कोण नाही हे कोण सांगू शकतो? तुम्ही त्यांना मारून टाकणार काय? असे कधीही चालणार नाही. तुम्ही त्यांच्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे आणि शिक्षण दिले पाहिजे व त्यांना सुसंस्कृत जीवनाचा मार्ग दाखवला पाहिजे.

"माझा दुसरा विषय साखरेसंबंधी आहे. साखर प्रत्येक ठिकाणी तयार होत नाही. ती जिथे तयार होते तिथून ती दुसरीकडे न्यावी लागत असते. आपल्या इथे जर साखर नसेल तर आपल्याला ती संयुक्त प्रांतातून वा कोईम्बतूरहून बोलवावी लागते. परंतु हे कसे करावे? ती केवळ रेल्वेमार्गानेच येऊ शकते. परंतु आपल्याजवळ तर गाड्या नाहीत. जॉन मथाई यांच्या हातात हा विभाग आहे. ते याबाबतीत असहाय आहेत. ते म्हणतात की सर्व रेल्वे वाघिणी आधीच कामात आहेत व त्यांचा पूर्ण उपयोग करण्यात येत आहे. याशिवाय, लोखंड, कोळसा आणि कर्मचारी या सर्वांचीही उणीव आहे. याशिवाय साखर उत्पादक सारख्या किमती वाढवत आहेत आणि डोक्यावरून तिची वाहतूक करता येत नाही. परंतु रेल्वेच्या वाघिणीचा जरी तुटवडा असला तरी ट्रकने ही वाहतूक करता येऊ शकते. ट्रक रेल्वेइतकेच वेगात धावू शकतात व त्यांच्या वाहतुकीकरिता लोखंडी रूळही लागत नाहीत. परंतु ट्रक वा लॉरींकरिता पेट्रोल पाहिजे व अजूनही पेट्रोलवर नियंत्रण आहे. पेट्रोलवरील नियंत्रण निघाले तर ट्रक आणि लॉरी अधिक सहजपणाने धावू लागतील व एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी माल नेऊ शकतील. मिठाची वाहतूकसुद्धा त्यामुळे अधिक सोपी होईल. आपण इतके सगळे मीठ तयार करतो आणि आता त्याच्यावर करसुद्धा नाही आणि तरीही ते महाग आहे ही विचित्र गोष्ट आहे. याचे कारण पुरवठा होत नाही. मीठ तयार करण्याकरता व त्याचा पुरवठा करण्याकरिता ठेकेदारांची जी नेमणूक केली जाते ती चूक आहे असे मला वाटते. सर्वांना मीठ आणण्याची परवानगी असली पाहिजे. पेट्रोलवरीन नियंत्रण निघाले तर ट्रकचा उपयोग मीठ आणि इतर गोष्टींच्या वाहतुकीकरिता करता येईल. एका वस्तूवरील नियंत्रण काढायचे आणि दुसऱ्या वस्तूवरील तसेच राहू द्यायचे हे बरोबर नाही. एकदा का नियंत्रण हटवायचा निर्णय घेतला तर ते सर्व गोष्टींवरून काढून टाकले पाहिजे आणि लोक काय करतात हे पाहिले पाहिजे. बाजारात पेट्रोल नाही असे आपण म्हणू शकत नाही. पेट्रोलचा काळा बाजार चालू आहे व जोपर्यंत पेट्रोलवर नियंत्रण राहील तोपर्यंत काळा बाजार सुरू राहील. चोरबाजार तर अंधारात चालला पाहिजे, परंतु तो तर दिवसाढवळ्या चालू आहे. मग त्याला काळा बाजार म्हणायचे की पांढरा वा अजून कोणते नाव द्यायचे? यामागे काय होते? ऐकले आहे की यामागे खूप लाचलुचपत चालते. जो पेट्रोलचा अधिकारी असतो त्याच्या हातात थोडा पैसा ठेवलाच पाहिजे. थोडा म्हणजे

रुपया दोन रुपये नाही, शेकडोने गोष्टी चालतात. जेव्हा एक गोष्ट वाईट होते तेव्हा तिच्याबरोबर इतरही अनेक वाईट गोष्टी सुरू असतात. ज्या गोष्टींवरून नियंत्रण निघाले आहे त्यांच्या बाबतीत आपल्याला थोडी सवलत मिळाली असेच समाधान लोकांना वाटत आहे. आणि पेट्रोल तर काही खाण्याची गोष्ट नाही आणि ना ती प्रत्येकाच्या गरजेची गोष्ट आहे. जे लोक मोटारीची वाहतूक करतात त्यांना पेट्रोल पाहिजे. सरकारला जितके पेट्रोल पाहिजे तितके त्यांनी आपल्याकरिता ठेवून घ्यावे आणि बाकीचे खुल्या बाजारात मोकळे करावे. समजा की पेट्रोल बाजारात अगदीच मिळत नाही आणि रेल्वेही सर्वच्या सर्व बंद झाल्या तरी भारताचा कारभार पेट्रोल नसल्यामुळे बंद पडणार नाही. केवळ माल वाहतुकीची आज जी पद्धत आहे ती बदलून जाईल. मग आपण पूर्वीच्या काळाप्रमाणे मालवाहतूक करू. पेट्रोलवरील नियंत्रण निघाले तर मला त्याची मुळीच भीती वाटत नाही.

"अजून एक गोष्ट ही आहे की आपल्याकडे पुरेसे अन्नधान्य निर्माण होत नाही. मग लोकांना सांगा की जमिनीत पेरणी करा म्हणजे तिच्यातून अन्नधान्य निर्माण होईल. गोष्ट तर खरी आहे परंतु त्याकरिता जी तयार रासायनिक खते येतात त्याकरिता आम्ही काही कोटी रुपये फुकट देतो, वा असे म्हणा की जमीन खराब करण्याकरिता ते पैसे देतो. हे माझे म्हणणे नाही, मला तर हे कळतसुद्धा नाही. परंतु ज्या लोकांना याची माहिती ते हे सांगतात. मीराबेननेच हे सर्व केले आहे आणि तिनेच या गोष्टीतील तज्ज्ञांना बोलावले आहे. तिला हौस आहे आणि ती खरोखरच शेतकरी झाली आहे.

"अजूनही मोठमोठे लोक तिच्याबरोबर आहेत. राजेंद्र बाबू तर आहेतच शिवाय सर दातार सिंगही आहेत. याशिवाय शेतीची कमीअधिक माहिती ठेवणारे जे चांगले चांगले लोक आहेत तेही आले होते. ते भेटले आणि त्यांनी जे केले ते वर्तमानपत्रांमध्ये आलेले आहे. खत कसे बनवावे हे त्यांनी सांगितले आहे. त्याला जिवंत खत म्हणतात. आपल्याकडे शेण तर भरपूर होते आणि जिथे माणूस असतो तिथे विष्टा ही असतेच. यांनी चांगले खत तयार होते. ते मिसळल्यानंतर ते खत कसे झाले हे कोणीही सांगू शकत नाही. ते बनल्यानंतर हातात घेतले तर त्यातून सुगंध बाहेर पडतो, दुर्गंध नाही. अशा प्रकारे त्याच्यात परिवर्तन होते. जे काही गवत असते, काडीकचरा असतो तो सर्व मिसळला जातो व फुकटात खत तयार होते. कचऱ्यातून

कोट्यवधी रुपये कसे निर्माण करता येऊ शकतात याचा विचार करण्याकरिता हे काही लोक दोनतीन दिवस बसले होते. या परिषदेत अनेक ठराव मंजूर करण्यात आले. त्या सर्वांचा आशय हाच होता की आपण सर्वांनी शेतीत मेहनत केली पाहिजे व जिथे एक मण धान्य पिकते तिथे चार मण धान्य पिकवले पाहिजे. आज मीराबेन गेल्या. त्या हरिद्वारजवळील हृषिकेष इथे राहतात. हे काम तिथे सुरू ठेवण्याचा त्यांचा विचार आहे. हे सर्व तुम्हाला सांगावे आणि त्याचा तुम्हाला जो काही उपयोग करायचा असेल तो तुम्ही करावा असे मला वाटले.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २२२-६

---

६७. देव प्रकाश नाय्यर यांना पत्र

सकाळी ५ वाजता, डिसेंबर २०, १९४७

चि. देव,

काल मी तुला पत्र लिहिले होते ते तुला मिळालेच असेल.

चांदची काळजी करू नकोस. काल तिचे मामा मला भेटले होते.

प्यारेलालने "द कॉल ऑफ द अवर" काल वाचले. मी ते आताच वाचले. कल्पना चांगली आहे. शेवटच्या भागाबद्दल अधिक विचार करण्याची गरज आहे. त्याच्यात दुरुस्ती करण्याचा मी प्रयत्न केला नाही. त्याकरिता अधिक वेळ लागेल आणि तो माझ्याजवळ कुठे आहे? संघटना उभी करणे सोपे नसते. आधी थोड्याशा लोकांशी चर्चा कर व नंतर पुढे जा. ते काहीही असले तरी तेथील (बिहारमधील) वातावरण कसे आहे व तिथे काय केले पाहिजे याचा विचार तू करायचा आहे. तू अर्थातच महेशशी चर्चा केली पाहिजे. त्याला पसंत नसेल तर तू तो विचार सोडून दिला पाहिजे. त्यात काटछाट केल्यानंतर तो प्रकाशित करायला हरकत नाही.

काल तुला पाठवलेल्या पत्राबरोबर हुनरचे पत्र आणि मी त्याला पाठवलेले पत्र जोडलेले होते.

सुशीलाला पाठवलेल्या पत्रात तू काय लिहिले हे मला माहीत नाही. माझ्या नावाने सुरू असलेले काम थांबवण्याची मी कल्पना करू शकत नाही. मी नोआखाली वा कलकत्ता वा बिहारला टाकून दिलेले नाही. इथल्या प्रमाणेच यापैकी कोणत्याही ठिकाणी मला करावे वा मरावे लागेल.

आशीर्वाद,

बापू

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

६८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

अतिशय दुःखाची गोष्ट आहे की दिल्लीत परत दंगली सुरू झाल्या आहेत. त्या क्षुल्लक प्रमाणात आहेत परंतु तरीही ही खेदाची गोष्ट आहे. सर्व मुसलमानांनी येथून जायला पाहिजे असे आपल्याला वाटत असेल तर आपण त्यांना तसे स्पष्टपणे सांगितले पाहिजे. हीच सभ्यपणाची गोष्ट होईल. अथवा मुसलमानांना आम्ही सुरक्षितपणे ठेवू शकत नाही असे सरकारने त्यांना सांगणे योग्य होणार नाही काय? वा हळूहळू दंगलींमध्ये मारले जाण्याऐवजी तुम्ही निघून जाणे उत्तम असे आपण सर्वांनी मिळून त्यांना सांगितले पाहिजे. परंतु आपण जर त्यांना असे सागितले तर त्यात मला हिंदू धर्म आणि शीख धर्म या दोन्ही धर्मांचा विनाश दिसतो. त्याचप्रमाणे आपल्या देशात मुसलमानांशिवाय इतर कोणीही राहू शकणार नाही असा निर्णय पाकिस्तान घेणार असेल तर त्यात मला पाकिस्तानमधील इस्लामचाही अंत दिसतो. भारतात तर फार जास्त मुसलमान राहिलेले नाहीत. आपण आधीच मोठ्या संख्येत मुसलमानांना घालवून लावले आहे. ते काही स्वतःहोऊन गेले नव्हते. त्यांना जाण्याकरिता आपण भाग पाडले होते. आपण शूर, सज्जन आणि धैर्यशाली झालो पाहिजे. मुसलमानांनी भारतात राहू नये असे केवळ भ्याड माणूसच म्हणेल. मुसलमान भारतात का राहू शकत नाही? ते जर वाईट असतील तर त्यांच्यात सुधारणा घडवून आणली पाहिजे. हिंसेने नाही तर समजावून. हिंदूंनी आणि शिखांनी पाकिस्तानमध्ये भीतीच्या दडपणाखाली राहावे आणि मुसलमानांनी भारतात तशाच मानसिकतेत राहावे आणि इथे सगळे लोक आरामात राहू शकतात, तिथे आरामात राहू शकतात अशा मोठमोठ्या गप्पा आम्ही मारायच्या ही गोष्ट तर मला फार खुपते. मी तर आपल्या सरकारलाही सांगत असतो की तुम्ही तुमचे वचन पार पाडले पाहिजे. सैन्य, पोलीस आणि अधिकारी या सर्वांनी चांगले व्हायला पाहिजे. आपण जर चागुलपणाने वागू तर आपण प्रगती करू शकू. असे केले नाही तर सत्तेचे जे लगाम आपल्या हातात आले आहेत ते निसटून जातील.

चरखा संघाची जी सभा झाली होती त्यातील ग्रामोद्योग संघाची गोष्ट मी तुम्हाला अजून सांगितली नव्हती. थोडेसे सूचीत केले होते हे खरे आहे. चरखा संघ तर ग्रामोद्योग संघाच्या केंद्रस्थानी आहे. सात लाख गावात चरखा चालला नाही तर इतर गृहोद्योगही चालू शकणार नाहीत. चरखा सूर्य आहे आणि इतर जे उद्योग आहेत ते त्याचे ग्रह आहेत. ते सूर्याच्या अवतीभवती फिरत असतात. परंतु सूर्यच नाहीसा झाला तर इतर ग्रह फिरू शकणार नाही. त्यांची रचनाच अशी झालेली आहे. परंतु खेड्यांचा सूर्य कोणाला म्हणावे? भारताचा सूर्य तर तो आहे जो आपल्या ध्वजातील चक्राप्रमाणे सुशोभित होत आहे. तुम्ही त्याला सुदर्शन चक्र म्हणू शकता, अशोकाचे राजचिन्ह म्हणू शकता. माझ्या दृष्टीत तर ते चरख्याचे चिन्ह आहे. तो चरखा जर भारताच्या सात लाख खेड्यात गेला तर इतर उद्योगही जातील. परंतु ते जातील याकडे आपल्याला लक्ष तर द्यावे लागेल. त्यांचा जर आपण सांभाळ केला नाही व त्यांनी सूर्याच्या आजूबाजूला फिरणे सोडून दिले तर हा जो सूर्य आहे त्यालासुद्धा कोणीही विचारणार नाही. त्यांचा जर अस्त होईल तर सूर्याचाही अस्त होईल. ही गोष्ट तर मी शास्त्रीय पद्धतीने सिद्ध करू शकणार नाही पंरतु हे मात्र सिद्ध करू शकतो की चरख्याच्या आजूबाजूचे उद्योग चालले नाही तर बिचारा एकटा चरखा काहीही करू शकणार नाही. दिल्लीच्या आजूबाजूला काय कमी खेडी आहेत? ते सर्व जर दिल्लीला आधार देतील आणि त्यांना दिल्लीचा आधार घ्यावा लागेल तर किती चांगली गोष्ट होईल? असे झाले तर आपसातील भांडणाचे सर्व कारणच मिटून जाईल. ही खेडी दिल्लीला किती तरी गोष्टी पुरवत असत. आज तर त्या सर्व गोष्ट येऊ शकत नाहीत. तुम्हाला माहीत असायला पाहिजे होते, परंतु बहुधा तुम्हाला माहीत नसेल की दिल्ली मुसलमान कारागिरांनी भरलेली होती. ते सर्व निघून गेले आहेत. पानिपतकडे पाहा. तिथे किती तरी मुसलमान राहत होते. ते कांबळी विणत असत आणि अजून किती तरी काम करत असत. आज त्यांचा व्यापार नष्ट झाला आहे. मुसलमान कारागीर जर भारत सोडून जाणार असतील तर ती भारताची हानी होईल. अशा दृष्टीने पाहिले तर भारत आणि पाकिस्तान या दोघांचेही नुकसान होत आहे. काश्मीरकरिता आपण जे भांडत आहो त्याचे कारण काय? टोळीवाल्यांनी काश्मीरवर हल्ला करणे व काश्मीरच्या रक्षणाकरिता आपल्याला सैन्य पाठवावे लागणे हा रानटीपणा आहे असे मला वाटते.

ग्रामोद्योगाची एक गोष्ट तर फार मोठी गोष्ट आहे. काल मी तुम्हाला सांगितले होते की मीराबेन ते काम करत आहे व त्याला आपल्या सरकारमधील लोकही हातभार लावत आहेत. आपण सर्व हे काम

आपल्या घरात करू शकतो.आपण मानवी विष्टा, शेण व काडीकचरा गोळा करू शकतो. त्याच्या मिश्रणापासून सुंदर खत तयार होते व त्याचा सुंदर वास येतो.

यामुळे ग्रामोद्योग आणि चरखा संघाचे काम तेव्हाच चालू शकेल जेव्हा करोडो लोक या कामात मदत करतील. जर ते मदत करणार नाही तर हे काम चालणार नाही. मला जोपर्यंत आठवते चरखा संघ, हरिजनसेवक संघ, ग्रामोद्योग संघ आणि तालिमी संघ या ज्या चार गोष्टी निर्माण करण्यात आल्या त्या श्रीमंतांकरिता नाही तर गरिबांकरिता निर्माण करण्यात आल्या होत्या. यांच्या कामात सर्वांनी हातभार लावायचा आहे. सर्वांनी हातभार लावला नाही तर हे काम चालू शकत नाही. भारतात जर आपल्याला पंचायत राज्य वा लोकांचे राज्य हवे असेल तर सर्व लोकांनी या कामात मदत केली पाहिजे. असे राज्य ना तर हवेतून निर्माण करता येते ना हिमालयातून चालत येते. ही गोष्ट तर येथील जनताच करू शकते. जनता एक प्रकारचा पाया आहे आणि तिच्या आधारावर आपण फार उंच इमारत उभारू शकतो. त्यात कोणी मदत करत असेल तर चांगले आणि करत नसेल तर बरेच बरे आहे. आपण एकमेकांशी भांडत आहो आणि त्याचा परिणाम तोच होईल जो कौरवपांडवांच्या भांडणाने झाला होता. कृष्णही यदुवंशी होते परंतु नंतर सर्व भांडायचे आणि एकमेकांना धाक दाखवायचे. दारू पिणे, व्यभिचार करणे आपसात झगडणे इतकेच त्यांचे काम राहिले होते. अखेरीस त्यांचा शोकांत झाला. भारताच्या नशिबी असे काही येऊ नये अशी जर तुमची इच्छा असेल तर तुम्ही मी सांगितलेल्या या चार संघटनांद्वारे सुरू असलेले काम तुमच्या हाती घ्यावे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन -२', पृष्ठ २२६-९

---

६९. आरोग्याचे नियम

माझ्याप्रमाणेच सनकी असलेल्या श्री ब्रिजलाल नेहरूंनी वर्तमानपत्रात एक पत्र लिहिले आहे. त्यात त्यांनी आरोग्य मंत्र्यांच्या पुढील वक्तव्याची प्रशंसा केली आहे. त्यात ते लिहितात की "आमच्या अस्वास्थ्याचे फार मोठे कारण आमचा स्वतःचा दोष आहे" आणि हा दोष दूर करण्याची जबाबदारी कोणत्याही शासकीय संस्थेवर नाही. ते पुढे लिहितात -

आतापर्यंत रुग्णालयांची स्थापना करणे, आरोग्यभवन, औषधोपचार केंद्र, रुग्णालये काढणे आणि रुग्णांवर औषधोपचार करणे यावरच प्रामुख्याने आपल्या आरोग्यमंत्र्यांचे लक्ष केंद्रित झालेले आहे, लोकांनी योग्य पद्धतीने योग्य जीवन कसे जगावे हे शिकवून रोगप्रतिबंध कसा करवा हे शिकवण्याकरिता कोणतीही संस्था तयार करण्यात आलेली नाही.

ते पुढे सुचवतात की आरोग्य संवर्धनाकरिता एक नवीन विभाग उघडला पाहिजे व हा विभाग आजारावरील उपचारापेक्षा वेगळा असला पाहिजे. या विभागाला विशेषज्ञ आणि जनतेच्या प्रतिनिधी असे मिळून एका सल्लागार समितीची मदत या विभागाला उपलब्ध करून दिली पाहिजे. यामुळे तज्ज्ञ लोक जनतेच्या गरजा आणि त्यांच्या सीमा लक्षात ठेवून त्या मर्यादेत काम करतील.

माझ्या या सनकी बंधूंना या कामाकरिता वेगळा आरोग्य विभाग का हवा? खर्चावर खर्च वाढवत जायचा आणि जितका खर्च वाढेल तितक्या सोयी सवलती वाढतील अशी स्वतःची आणि साध्यासुध्या जनतेची फसवणूक करायची ही फॅशन तर इंग्रजी शासनांतर्गत होती. मला तर वाटते की आरोग्यमंत्र्यांच्या अधिनस्थ असलेल्या डॉक्टरांचे आणि कर्मचाऱ्यांचे पहिले काम त्या जनतेची सेवा करणे आहे ज्याकरिता त्यांना पैसा दिला जातो हे समजावून सांगितले पाहिजे.

पत्रलेखक प्राथमिक सूचना देतो की -

भारतातील परिस्थितीला अनुसरून योग्य पद्धतीच्या जीवनाबद्दल एक पुस्तक लिहिण्यात यावे. जनतेवर प्रभाव पडावा म्हणून हे पुस्तक आरोग्य मंत्र्यांच्या प्राधिकारात तयार करण्यात यावे. ... (मूळ स्रोतात इथे रिकामी जागा आहे.) हे पुस्तक लिहिण्याची जबाबदारी 'इंडियन मेडिकल असोसिएशन'वर सोपवण्यात यावी व त्यांनी हे पुस्तक ठराविक वेळेत पूर्ण केले पाहिजे. आपल्या वैद्यकीय

महाविद्यालयांमध्ये आजारावरील उपचारावर भर देण्याऐवजी आरोग्य कसे राखावे यावर भर देणे ही गोष्ट सर्वाधिक वाछनीय असेल.

वास्तवात सर्व शाळा महाविद्यालयात स्वास्थ्यासंबंधीचे शिक्षण देणे सक्तीचे केले पाहिजे. ब्रिजलाल नेहरूंनी जसे पुस्तक प्रकाशित करण्याची सूचना दिली आहे तसे पुस्तक प्रकाशित झाले तर लेखकांनी आरोग्यरक्षणाच्या नावाखाली वेगवेगळ्या आजारावरील लसी टोचण्याची शिफारस करणार नाहीत अशी आशा आहे.

नवी दिल्ली, डिसेंबर २१, १९४७

'हरिजन', डिसेंबर २८, १९४७

---

७०. सेंद्रीय खते

(याच विषयावरील गुजराती लेखाकरिता पाहा पुढील लेख)

मिश्र खतांचा शक्य तितका जास्तीतजास्त मोठ्या प्रमाणात प्रसार व्हावा म्हणून या विषयावर विचार करण्याकरिता नवी दिल्लीत एका अखिल भारतीय मिश्र खत परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. संमेलनाची कल्पना मीराबेनची होती आणि डॉ. राजेंद्र प्रसाद यांनी या परिषदेचे अध्यक्षपद भूषवले होते. सरदार दातार सिंग, डॉ. आचार्य आणि या विषयाच्या इतर विद्वानांनी या समेलनात भाग घेतला होता. संमेलनात गाव आणि शहराशी संबंधित किती तरी महत्त्वाचे ठराव मंजूर करण्यात आले. प्रांतांकरिता योजनेचा आराखडा तयार करण्याकरिता श्रीमती मीराबेन, श्री शिवशंकर शर्मा, डॉ. बी. एन. लाल आणि डॉ. के. जी. जोशी यांची एक उपसमिती तयार करण्यात आली होती. बी. एन. लाल हे या उपसमितीचे निमंत्रक होते. "शहरातील घाणरडे पाणी, काडीकचरा आणि चिखल यांचा शेतीत उपयोग करण्यासंबंधी, कसाईखान्यातील उपोत्पादन आणि इतर व्यवसायातील वाया जाणाऱ्या वस्तूंचा (उदाहरणार्थ लोकर उद्योगातील वाया जाणाऱ्या गोष्टी, गिरणी उद्योग आणि चामडे उद्योगातील वाया जाणाऱ्या गोष्टी) उपयोग करण्यावर आणि पाण्यात उगवणारे शेवाळ, ऊसाचा चोथा, खाणीतून निघालेले घाणरडे पाणी, जंगलातील पालापाचोळा इत्यादींचा खताकरिता उपयोग करण्याच्या आवश्यकतेवर भर देण्यात आला."

हे ठराव जर केवळ कागदावर राहिले नाही तर चांगले आणि उपयोगी आहेत. संपूर्ण भारतात त्यांचा प्रत्यक्षात उपयोग केला जाईल काय ही महत्त्वाची गोष्ट आहे. याकरिता अनेक मीराबेनच्या शक्तीची आवश्यकता आहे. भारतातील जनसामान्याने याला उत्स्फूर्त सहकार्य दिले तर आज जो अन्नधान्याचा तुटवडा आहे तोच केवळ निघून जाणार नाही तर भारतात आवश्यकतेपेक्षा अधिक धान्य निर्माण होईल. सेंद्रीय खतानी जमीनीचा कस वाढत असतो, कमी कधीही होत नसतो. दररोज गोळा होणारा काडीकचरा एखाद्या खड्ड्यात गोळा केला तर त्याचे सुंदर खत तयार होऊ शकते व ते शेतात मिसळले तर धान्य आणि डाळींचे उत्पादन किती तरी पटीने वाढू शकते. यामुळे करोडो रुपयांची बचत होऊ शकते. या शिवाय या काडीकचऱ्याचा योग्य पद्धतीने उपयोग केला तर आपला परिसरही स्वच्छ राहील. स्वच्छता केवळ एक सद्गुणच नाही, ती तर आरोग्याकरिताही पोषक आहे.

नवी दिल्ली, डिसेंबर २१, १९४७

'हरिजन', डिसेंबर २८, १९४७

७१. सेंद्रीय खते

खत दोन प्रकारचे असते. रासायनिक आणि सेंद्रीय. खत सेंद्रीय कसे असू शकते असा प्रश्न एखादा विचारू शकेल. सेंद्रीय हा शब्द इंग्रजीच्या ऑर्ग्यानिक पासून आला आहे. सेंद्रीय खत मानवी विष्टेपासून वा/व जनावरांची विष्टा यांच्यापासून केले जाते व त्यात गवत, पालापाचोळा व अशाच इतर गोष्टी मिसळल्या जातात. आपण वनस्पतीला निर्जीव समजत नाही परंतु लोखंड इत्यादींना समजतो. अशा प्रकारच्या गोष्टींच्या मिश्रणापासून तयार केलेल्या खताला इंग्रजीत कंपोस्ट म्हणजे मिश्र खत म्हणतात. अशा प्रकारचे खत सोन्यासारखे मूल्यवान असते असे मी समजतो. ते जमीनीचा कस नेहमीकरिता टिकवून ठेवते. त्यामुळे जमीनीची धूप होत नाही व ती निकस होत नाही. असे म्हणतात की रासायनिक खतांमुळे जमीनीची सुपीकता निघून जाते व काही काळानंतर जमीन पडीत ठेवावी लागते. याशिवाय सेंद्रीय खतांमुळे हानिकारक जीवजंतूंच्या निर्मितीतही प्रतिबंध होतो.

अशा प्रकारच्या खताची लोकप्रियता वाढावी म्हणून मीराबेनच्या प्रेरणेने आणि प्रयत्नांनी या महिन्यात एक परिषद भरवण्यात आली होती. तिच्या अध्यक्षस्थानी डॉ. राजेंद्रप्रसाद होते. या परिषदेत सरदार दातार सिंग, डॉ. आचार्य आणि या क्षेत्रात तज्ज्ञ असलेले इतर लोकही हजर होते. तीन दिवस विचारविनिमय केल्यानंतर त्यांनी अनेक महत्त्वाचे ठराव मंजूर केले. या ठरावांमध्ये शहरात आणि सात लाख खेड्यात काय केले पाहिजे हे सांगितले आहे. परिषदेने मानवी विष्टा, शेण, काडीकचरा, फाटके कपडे आणि कारखान्यातून निघणारा कचरा यांचे मिश्रण शहरी आणि ग्रामीण भागात कसे करावे याची पद्धत सांगितली आहे. याकरिता एक लहानशी उपसमिती तयार करण्यात आली आहे.

हे ठराव केवळ वर्तमानपत्रातील प्रसिद्धीवरच थांबली नाही व करोडो लोकांनी व्यवहारात तिचा उपयोग केला तर भारताचा चेहरामोहरा बदलून जाईल. असे केले तर आपण या सोनेरी खताद्वारे करोडो रुपये वाचवू शकू. आपल्या अज्ञानामुळे आज ते वाया जात आहेत. यांच्या मदतीने जमीन कसदार होईल आणि आजपेक्षा आपण अधिक चांगले पीक घेऊ. परिणामी दुष्काळांपासून आपण मुक्त होऊ, कोरोडो लोकांना पुरेसे खायला मिळेल व अतिरिक्त धान्याची निर्यातही करता येईल.

आज आपल्या माणसांची आणि जनावरांची जी दैन्यावस्था आहे तशीच आपल्या पीकांचीही आहे. हा दोष जमिनीचा नाही तर लोकांचा आहे. आळशीपणा आणि अडाणीपणाचे जंतू आपल्याला खात आहेत.

मीराबेनने सुरू केलेले हे काम फार मोठे आहे. त्याकरिता हजारो मीराबेन लागतील. लोकांनी उत्साहाने हे काम केले पाहिजे व सरकारने जागे व्हायला पाहिजे. काही थोड्याश्या स्वयंसेवकांनी हे काम होणारे नाही. त्याकरिता करोडो लोकांच्या प्रयत्नांची गरज आहे. आपल्याजवळ स्वयंसेवकांचा ताफा असला पाहिजे.

हिंदुस्थान इतका भाग्यशाली आहे काय? इथे हिंदुस्थानमध्ये दोन्ही भागांचा समावेश आहे. दक्षिणेकडील भागाने जर या कामाची सुरुवात केली तर उत्तरेकडील भागही त्यांच्या पावलावर पाऊल टाकील.

नवी दिल्ली, डिसेंबर २१, १९४७

गुजरातीवरून. 'हरिजनबंधू', डिसेंबर २८, १९४७

---

७२. लीलावती आसर यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २१, १९४७

चि. लीली,

मला तुझे पोस्टकार्ड मिळाले. तुला जागा मिळाली ही तर आनंदाची गोष्ट आहे. तू अभिनंदनाला पात्र आहेस. डॉ. मंगलदास शाह यांच्यासारख्या माणसाच्या हाती तुला शिकायला मिळते हे तुझे भाग्य आहे. त्यांच्या कठोरपणाला घाबरू नकोस. तू त्याचे स्वागत केले पाहिजे आणि त्याचा लाभ घेतला पाहिजे. कोणी जर आपल्यात सुधारणा घडवून आणत असेल व तसे करताना आपल्या चुका दुरुस्त करण्याकरिता इतरांच्या उपस्थितीत आपली कानउघाडणी करत असेल तर त्यामुळे आपल्याला दुःख होण्याऐवजी आनंद व्हायला पाहिजे. आणि अशी व्यक्ती आपली शिक्षक असेल तर आपल्याला अधिकच आनंद झाला पाहिजे. डॉक्टरने चूक केली तर रुग्णाला त्याचा भूर्दंड भरावा लागतो - आणि केव्हा केव्हा तर जीवाचे मोल देऊन. यामुळे चुका माफ न करणाऱ्या शिक्षकाच्या शोधात आपण असलो पाहिजे.

काळजी करण्याचा स्वभाव तू सोडून दिला पाहिजे. तुझ्या पायातील वेदना अजूनही कायम असाव्या ही गोष्ट मला आवडत नाही. डॉक्टरकडे जाऊन त्यावरील उपचार तू करून घेतला पाहिजे. याबाबतीत आळशीपणा करणे वा काळजी न घेणे गुन्हा आहे. अस्वस्थ न होता तू अभ्यासात मग्न हो.

सध्या तू इतर कशाचाही अभ्यास करायला नको. तू जे काही वाचशील त्याचे चिंतन कर आणि ते समजून घे. जो विद्यार्थी पाठांतर करतो तो मूर्खांचा सरदार असतो.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सौजन्य - प्यारेलाल

---

७३. नोंदी

एक चांगले उदाहरण

काम करत असताना आपल्या एका उत्तम कार्यकर्त्याचा जो मृत्यू झाला त्याची गौरवशाली बातमी कराडीतील प्रसिद्ध दिलखुष दिवाणजींनी दिली आहे. दिवंगत वालजीभाई हे कराडीतील प्रसिद्ध शेतकरी पॉचाकाका यांचे पुतणे होते. त्यांनी बार्डोलीतील कर न देण्याच्या आंदोलनात (फेब्रुवारी ते ऑगस्ट १९२८) भाग घेतला होता. त्यांनी कधीही धरसोडीची भूमिका घेतली नाही. आजही शेतीच्या लागवडीला व कर देण्याला त्यांचा विरोध आहे. आपल्या घरांच्या देखरेखीकरिता पोलीस हवे आणि आपल्या रक्षणाकरिता सैन्य पाहिजे तोपर्यंत माझ्या स्वप्नातील स्वराज्य मिळाले असे मी समजत नाही असे जे त्यांचे म्हणणे होते ते योग्यच होते. दिवंगत वालजीभाईंनी आपली चांगल्या पगाराची नोकरी सोडली होती व शुद्ध देशभक्तीच्या भावनेने ते विणकराचे काम करू लागले होते. वालजीभाई त्यांच्या काकांना शोभतील असेच पुतणे होते व काम करताकरताच त्यांचा मृत्यू झाला होता. वालजीभाईच्या मृत्यूपेक्षा अधिक चांगल्या मृत्यूची कामना करता येऊ शकत नाही. त्यांनी प्रशिक्षित केलेल्या विणकरांची संख्या द्विगुणीत होत जाईल अशी अपेक्षा आहे. भारताला जर आपल्या पायावर उभे राहायचे असेल तर केवळ हाताने कताई केलेल्या सुतापासून कापड तयार करणाऱ्या हजारो विणकरांची भारताला आवश्यकता आहे व याकरिता भारतातील सहा वर्षांवरील प्रत्येक स्त्री-पुरुषांकडून निदान अर्धा तास चांगले सूत कातण्याची अपेक्षा केली जात आहे. दिवाणजींचे हे स्वप्न होते व ते वास्तवात येण्याच्या प्रयत्नातच वालजीभाईंचा मृत्यू झाला होता.

खेड्यांमधील धान्याचा साठा

श्री वैकुंठलाल लल्लूभाई मेहता लिहितात की जर नियंत्रण रद्द करण्यात येत असतील तर नफ्यांकरिता नाही तर इतर कोणत्याही कारणाने अन्नधान्याचा तुटवडा निर्माण झाला तर अडीअडचणीला उपयोगी पडावा म्हणून गावांजवळ आणि शक्य असेल तर ग्रामपंचायतींजवळ अन्नधान्याचा पुरेसा साठा असला पाहिजे. त्यांचे मूळ पत्र गुजरातीत आहे. त्यासंबंधी मी गुजराती स्तंभात चर्चा करत आहे. (पाहा पुढील विषय) इथे त्यांच्या युक्तिवादाचा सारांश दिला आहे. माझी आधीपासून

मान्यता होती की रोखीने कर भरण्याच्या बाजूने कितीही युक्तीवाद करण्यात आला तरी ही प्रथा देशाकरिता घातक आहे. यामुळे खेड्यापाड्यातून अन्नधान्य ठेवण्याची व्यवस्थाच विस्कळित झाली आहे. वरील कारणांकरिता गावांमध्ये सुरक्षितपणे अन्नधान्य ठेवता येईल अशा आवश्यकतेची फार आवश्यकता आहे. परंतु याकरिता उत्पादक आणि व्यापारी हे दोघेही लोभी आणि अप्रामाणिक नसणे आवश्यक आहे. हे दोघेही जर पूर्णपणे प्रामाणिक असतील तर उपभोक्त्याची कोणीही फसवणूक करणार नाही. देशाची अर्थव्यवस्था जेव्हा एका मजबूत पायावर उभी राहील व सर्व लोकांचे उत्पन्न जीवन निर्वाहाकरिता पुरेसे असेल तेव्हा महाग स्वस्त असा प्रश्नच निर्माण होणार नाही.

सोमनाथची दारे?

'हरिजन'च्या हिंदुस्तानीच्या स्तंभात पंडित सुंदरलाल यांनी सोमनाथच्या प्रसिद्ध दारांबद्दल एक मनोरंजक लेख (हा लेख डिसेंबर २८, १९४७च्या हरिजनच्या अंकात सोमनाथ मंदिर या शीर्षकाखाली प्रकाशित झाला होता.) लिहिला आहे. जिज्ञासू वाचकांनी मूळ लेख वाचला पाहिजे. त्यांचे म्हणणे आहे एकदा सांगण्यात आले होते त्याप्रमाणे गझनीचे दरवाजे भारतात कधीही परत आले नाही. ती दारे नकली होती आणि जेव्हा फसवणूक लक्षात आली तेव्हा ती दारे आग्र्याहून पुढे गेली नाही. लक्ष दिले नाही तर ही नकली दारे सोमनाथच्या प्रसिद्ध मंदिराच्या दुरुस्तीच्या कामात न पोहोचो अशी पंडित सुंदरलालना काळजी वाटते.

नवी दिल्ली, डिसेंबर २२, १९४७

'हरिजन', डिसेंबर २८, १९४७

---

७४. खेड्यांमध्ये धान्यसंग्रहाची व्यवस्था

श्री वैकुंठभाई लिहितात,

सध्याच्या व्यापारपद्धतीत गावांमध्ये निर्माण झालेले धान्य विकण्याकरिता बाहेर पाठवण्यात आले होते. यामुळे देशाच्या कोणत्याही भागात खेड्यांमध्ये धान्याचा साठा राहत नाही. परिणामी गरिबांचे फार हाल होतात आणि पावसाळ्याच्या दिवसात धान्याचे भाव फार वाढतात. अशा हालअपेष्टांपासून गरिबांना वाचवण्याकरिता काही धान्य पंचांच्या देखरेखीखाली खेड्यात साठवता येण्याची व्यवस्था असली पाहिजे व केवळ अतिरिक्त धान्य शहरात पाठवले पाहिजे. या दृष्टीने श्री अच्युत पटवर्धन आणि मी मिळून चार वर्षांपूर्वी एक योजना तयार केली होती. श्री कुमारप्पांनीसुद्धा आपल्या योजनेत अशा प्रकारच्या व्यवस्थेचे महत्त्व मान्य केले आहे.

या योजनेला जर तुमची संमती असेल तर आजच्या बदललेल्या परिस्थितीत तुम्ही या योजनेची शिफारस प्रांतिक सरकार आणि ग्रामिणाकडे करावी.

मला वाटते की या योजनेतला काही अर्थ आहे. देशाच्या आर्थिक परिस्थितीत खेड्यांमध्ये अशा प्रकारचा धान्याचा साठा असला पाहिजे. जेव्हापासून रोखीने कर घेण्याला जेव्हापासून सुरुवात झाली तेव्हापासून खेड्यांमधील धान्याचा साठा कमी झाला आहे. मी रोखीने कर घेण्याच्या पद्धतीच्या गुणावगुणात मी शिरणार नाही. परंतु वैकुंठभाईंनी सुचवल्याप्रमाणे खेड्यांमध्ये आपण धान्य साठा करून ठेवला असता तर आजच्या कठीण परिस्थितीत आपण देशाला वाचवू शकलो असतो असा माझा विश्वास आहे. शेतकऱ्यांना आणि व्यापाऱ्यांना योग्य प्रमाणात नफा मिळाला तर कामगार वर्गाकरिता व शहरातील इतर लोकांकरिता किंमती वाढणार नाहीत. प्रत्येक माणसाच्या गरजा पूर्ण होऊ शकतील इतक्या मर्यादेपर्यंतच माणसाच्या गरजा असल्या पाहिजे. असे झाले तरच जास्त वा कमी किमतीचा प्रश्नच उपस्थित होणार नाही.

नवी दिल्ली, डिसेंबर २२, १९४७

गुजरातीवरून. 'हरिजनबंधू', डिसेंबर २२, १९४७

---

७५. वालजीभाई यांना श्रद्धांजली

(हे डिसेंबर २८च्या 'हरिजनबंधू'मध्येसुद्धा प्रकाशित झाले होते.)

नवी दिल्ली,

डिसेंबर २२, १९४७

स्वर्गीय वालजीभाई सारखे देशसेवक भारतातच काय कदाचित जगातही फार कमी असतील. त्यांनी "जसे झाड तसे फळ" वा "जसा बाप तसा मुलगा ही" म्हण सार्थ करून दाखवली आहे. पॉंचाकाकाची प्रतिज्ञा अद्वितीय होती. आपल्याला अजून खरे स्वराज्य मिळालेले नाही. सध्या तरी ते फार दूर असल्याचे दिसते आहे. आपल्यामध्ये वालजीभाईंसारखे केवळ पाच वा सहा चांगले विणकर आहेत असे का? कराडीच्या जोरावर आपण स्वातंत्र्य मिळवले असा दावा आपण करू शकतो काय?

मो. क. गांधी

गुजराती मायक्रोफिल्मवरून. एम. एम. यू. २३

---

७६. जवाहरलाल नेहरू यांना पत्र

बिर्ला भवन, नवी दिल्ली,

डिसेंबर २२, १९४७

प्रिय पंडितजी,

काल मौलाना शहीद आणि इतर काही मौलांना बापूंकडे आले होते आणि त्यांनी दिल्लीमध्ये इतक्यात घडलेल्या घटना सांगितल्या. त्यामुळे स्थानिक मुसलमान फार हताश झाले आहेत. त्यांनी खरोखरच भारतात राहिले पाहिजे की त्यांनी येथून निघून जाणे भारत सरकारला आवडेल हे भारत सरकारने त्यांना स्पष्टपणे सांगावे अशी त्यांची इच्छा आहे. सरकारची इच्छा त्यांनी इथे राहावे अशी असेल तर सरकारने तशी घोषणा करून त्यानुसार योग्य कारवाई केली पाहिजे. त्यांची सूचना आहे की बापूजींच्या उपस्थितीत तुम्ही, सरदार पटेल आणि मौलाना साहेबांची एक स्वतंत्र बैठक व्हावी (वल्लभभाई पटेलबरोबर पंडित नेहरू २६ डिसेंबरला सायंकाळी गांधीजींना भेटले होते.) तुम्हाला जेव्हा केव्हा वेळ असेल तेव्हा बापूजी या कामाकरिता उपलब्ध आहेत ही गोष्ट तुम्हाला कळवण्याकरिता बापूजींनी मला सांगितले आहे.

तुमचा विश्वासू,

प्यारेलाल

'सरदार पटेल्स कॉरस्पॉडन्स' खंड ४, पृष्ठ ४१०

---

७७. यशवंत कुवरबा यांना पत्र

(किशनगंजच्या राजमाता. या कर्करोगाने आजारी होत्या.)

डिसेंबर २२, १९४७

आदरणीय भगिनी,

महामहीम महाराजासाहेबा (भावनगरचे. यशवंत कुवरबा यांचा पुतण्या. हे पत्र त्यांनी तुम्ही यशवंत कुवरबांना नेऊन दिले होते.) आजारी असल्याचे आणि अंथरुणाला खिळून असल्याचे कळले. हे ऐकून मला दुःख झाले. ईश्वर तुम्हाला मनःशांती देवो. रामनामाचा जप करा. तोच रामबाण उपाय आहे असा माझा विश्वास आहे.

आशीर्वाद

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून.जी. एन. ७७४५

---

७८. कनू गांधी यांना पत्र

डिसेंबर २२, १९४७

चि. कानम (रामदास गांधी यांचा मुलगा),

तुझ्या पत्रावरून केवळ तुझे हस्ताक्षर सुधारत असल्याचेच दिसत नाही तर तुझे विचारही परिपक्व होत असल्याचे दिसते. ज्याप्रमाणे वयाने तू वाढतो आहेस त्याचप्रमाणे तुझ्या विचारातही प्रगल्भता येऊ दे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ९५२४. सौजन्य - कनू गांधी

---

७९. बच्चू यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २२, १९४७

चि. बच्चू,

मला अर्थातच वेळ नाही परंतु हा सोमवार (गांधीजी सामान्यपणे सोमवारी मौन पाळत असत) असल्यामुळे मी इतके लिहीत आहे. तुला जर आंत्रपुच्छाचा त्रास असेल तर काळजीचे कारण नाही. शस्त्रक्रिया झाल्यानंतर तू लवकरच चांगला होशील. घाबरू नकोस. शिश्याच्या पेन्सिलने लिहिणे बंद कर, कारण तिने लिहिलेले पुसले जाते. कुमी (कुमी अडाळजा, हरिलाल गांधी यांची मेहुणी) चांगली असेल अशी आशा आहे. मनू जर आली असेल तर तिला सांग की तिचे पत्र मिळाले. त्याच्या उत्तराची आवश्यकता नव्हती. ती दुरुस्त होऊन परतली असेल अशी आशा आहे. बेबी मजेत असेल अशी आशा आहे. तिने वाचण्यात काही प्रगती केली आहे काय?

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

८०. रामदास गांधी यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २२, १९४७

चि. रामदास,

तुझे पत्र. तू येणार आहेस हे कोणी तरी मला सांगितले होते. तो कोण होता हे मी विसरलो. आपली भेट होणार याचा मला आनंद होत होता. परंतु तू तिथेच थांबला हे अगदी योग्य केले. तिथे असताना तुला आराम मिळू शकतो की नाही याचा मात्र विचार केला पाहिजे.

हे खरे आहे की माझे बोट चेंगरले. वेदनामुळे तेव्हा मला जवळपास चक्कर आल्यासारखे झाले होते. याची काळजी करण्याचे काहीही कारण नाही. खरे म्हणजे मी सभेकरिताही (११ डिसेंबरला रचनात्मक कायसमितीच्या बैठकीला.) गेलो होतो. एक वा दोन मिनिटातच माझ्या वेदना थांबल्या आणि मी सभेत भाषणही केले. मी जेव्हा गाडीतून उतरलो तेव्हा ब्रिजकिशनने आजूबाजूला न पाहता गाडीचे दार बंद केले. त्यामुळे तिथे असलेले माझे बोट चेंगरले. मी काळजीपूर्वक वागत होतो परंतु काळजी घेणाऱ्या माणसाचेसुद्धा असे अपघात होऊ शकतात.

सुमी (रामदास गांधींची मुलगी) एक मुली आणि मुलाबरोबर राधाकृष्णच्या संबंधात इथे आलेली आहे. तुम्ही सर्व चांगले असाल अशी आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

८१. शारदा कोटक यांना पत्र

डिसेंबर २२, १९४७

चि. शारदा,

मला तुझी दोन पत्रे मिळाली. त्यांतील एक पेन्सिलने लिहिलेले आहे. माणसाने पेन्सिलीने लिहू नये. योगायोगाने दादा (लक्ष्मिदास आसर) इथे आहेत व ते हे पत्र आणतील. ते म्हणतील तसे कर. मी त्यांच्याशी सविस्तर चर्चा करीन. तुझी प्रत्येक गोष्ट तिथे आहे. वेळोवेळी मला लिहीत जा. कोणाचाही सल्ला घेण्याची आवश्यकता नाही.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

८२. कुंदनलाल फिरोदिया यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २२, १९४७

भाई फिरोदिया,

तुम्ही मला इंग्रजीत का लिहिता? विसापूरबद्दल मला कळले. मुलींचे नाव आणि पत्ते कळले तर ते चांगले होईल. तुम्ही मला कळवले हे चांगले केले.

आशीर्वाद,

बापू

श्री कुंदनलाल फिरोदिया,

डोडकोकेर, सिकर, अहमदनगर,

मुंबई प्रांत

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ७९१७

८३. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे त्यांचे लेखी भाषण वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

डिसेंबर २२, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

येथून आठदहा मैलांवर महरौली येथे कुतुबुद्दिन बख्तियार चिश्ती यांचा दर्गा आहे. पावित्र्याच्या दृष्टीने अजमेरच्या खालोखाल याचे महत्त्व आहे. या ठिकाणी केवळ मुसलमानच जात नाहीत तर हजारो हिंदू आणि मुसलमानांव्यतिरिक्त इतरही लोक दरवर्षी दर्शनाकरिता जात असतात. मागील वर्षी हा दर्गा हिंदू जमावाच्या रागाला बळी पडला. जवळपास राहणाऱ्या मुसलमानांना अंदाजे आठशे वर्षांपासूनची घरे सोडून जाणे भाग पडले. मुसलमानांच्या मनात या दर्ग्याबद्दल प्रेम आणि भक्तिभाव असूनही आज तिथे एकही मुसलमान नाही म्हणून या प्रसंगाची आज चर्चा करावी लागली. तो दर्गा लवकरात लवकर परत उघडून आपल्यावरील कलंक धुऊन काढणे हे हिंदू, शीख, तेथील सरकारी अधिकारी आणि आपले सरकार या सर्वांचे कर्तव्य आहे. हीच गोष्ट दिल्ली आणि तिच्या आजूबाजूच्या भागांतील दर्ग्यांना आणि मुसलमानांच्या इतर पवित्र ठिकाणांनाही लागू होते. धार्मिक स्थळ मोठे असो की लहान, त्याची तोडफोड सहन केली जाणार नाही हे दोन्ही देशातील सरकारांनी आपापल्या देशातील बहुसंख्याकांसमोर स्पष्ट शब्दांत घोषित करण्याची वेळ आता आलेली आहे. दंगलीच्या दरम्यान या पवित्र ठिकाणांची जी तोडफोड करण्यात आली तिची दुरुस्ती केली पाहिजे.

मुस्लिम लीगच्या सभेने कराचीत जो निर्णय घेतला (कराचीत १५ डिसेंबरवा ऑल इंडिया मुस्लिम लीगच्या सभेने एक प्रस्ताव मंजूर करून मुस्लिम लीगचे दोन भागात विभाजन केले होते. एक पाकिस्तानकरिता आणि दुसरा भारताकरिता.) तो पाहता मुस्लिम लीगचे सदस्य मला विचारतात की "मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली लखनौमध्ये जी परिषद बोलावण्यात आली आहे तिला आम्ही उपस्थित राहावे की राहू नये? (लखनौमध्ये २७ आणि २८ ला मौलाना अबुल कलाम आझाद यांच्या अध्यक्षतेखाली भारतीय संघराज्यातील मुसलमानांची सभा होणार होती. प्रांतिक विधानसभेचे सदस्य, घटना समितीचे सदस्य, मुसलमानांच्या विविध संघटना इत्यादींना त्या परिषदेकरिता निमंत्रित करण्यात आले होते.) वा भारतीय मुस्लिम लीगची मद्रास येथे जी सभा होणार होती तिला

मुसलमानांनी जावे की जाऊ नये? भारतीय संघराज्यात राहणाऱ्या मुस्लिम लीगच्या सदस्यांनी अशा परिस्थितीत कोणते धोरण अवलंबिले पाहिजे?" मुसलमानांना जर वैयक्तिक वा जाहीर निमंत्रण मिळत असेल तर त्यांनी लखनौ येथील सभेत जायला पाहिजे आणि मद्रास येथील सभेतही जायला पाहिजे याबद्दल मला मुळीच संशय नाही. दोन्ही ठिकाणी त्यांनी आपले विचार न घाबरता मोकळेपणाने मांडले पाहिजे. त्यांनी जर भारताच्या अहिंसक लढ्याच्या गत तीस वर्षांच्या इतिहासाचा अभ्यास केला असेल तर भारतात आपण अल्पसंख्य आहो आणि पाकिस्तानमधील बहुसंख्या त्यांना कोणतीही मदत करू शकत नाही याचा विचार करू नये. भारतात अल्पसंख्याकांचे प्रमाण कितीही कमी असले तरी आपली अब्रू आणि प्रिय असलेल्या गोष्टींचे रक्षण करण्याकरिता घाबरण्याचे कोणतेही कारण नाही ही गोष्ट समजून घेण्याकरिता अहिंसेवर विश्वास ठेवण्याची आवश्यकता नाही. माणसाची घडणच अशी झाली आहे की तो जर आपल्या निर्मात्याला समजून घेईल आणि आपण त्याच इश्वराचे प्रतिबिंब आहो हे लक्षात घेईल तर जगातील कोणतीही शक्ती त्याची अब्रू हिरावून घेऊ शकणार नाही. माझा आत्मसन्मान कोणीही हिरावून घेऊ शकत नाही, मीच तो गमावू शकतो. शक्तिशाली ट्रान्सवाल सरकारशी जेव्हा माझा संघर्ष सुरू होता तेव्हा जोहानिसबर्गमधील माझा एक जवळचा मित्र मला सांगत असे की "मला अल्पसंख्य लोकांच्या बाजूने राहणे आवडते कारण अल्पसंख्य कधीही चूक करू शकत नाहीत व त्यांनी चूक जरी केली तरी ती दुरुस्त करता येऊ शकते. परंतु बहुसंख्याकांच्या अंगात सत्ता शिरलेली असते व त्यामुळे त्यांच्यात सुधारणा घडवून आणणे कठीण असते." बहुसंख्याकांचा अर्थ एकतर्फी शस्त्रशक्ती असा असेल तर तो मित्र बरोबर होता असे म्हणावे लागेल. काही थोड्याशा इंग्रजांनी सस्त्रशक्तीच्या बळावर स्वतःच्या अल्पसंख्यत्वाचे रूपातर बहुसंख्यत्वात कसे केले व संपूर्ण हिंदुस्तानवर वर्चस्व कसे गाजवले याचा आपल्याला कटू अनुभव आलेला आहे. भारताजवळ शस्त्रे नव्हती आणि ती असती तरी ती कशी चालवावी याचे त्याला ज्ञान नव्हते. आपल्या देशातील ब्रिटिशांच्या राज्यापासून हिंदू आणि शीख कोणताही धडा शिकले नाही ही खेदाची गोष्ट आहे. पूर्व आणि पश्चिम भागांतील बहुसंख्येमुळे संघराज्यातील मुसलमानांना बरेच काही सहन करावे लागले. आज त्यांच्या डोक्यावरील ते ओझे उतरले आहे. आता त्यांना अल्पसंख्य असण्यातील लाभ कळत असतील तर ते इस्लामचे सौंदर्य आपल्या पद्धतीने दाखवू शकतील. इस्लामचे सर्वोत्तम दिवस ते दिवस होते जेव्हा महंमद पैगंबर मक्केत अल्पसंख्य होते. ख्रिश्चन धर्माच्या ऱ्हासाला कॉन्स्टंटाईननंतर (रोमची राणी, इसवीसन

३०६ ते ३३७, तिने ख्रिश्चन धर्माला राज्याचा धर्म घोषित केले होते.) सुरुवात झाली. इथे मला हा युक्तिवाद लांबवायचा नाही. माझा सल्ला माझ्या श्रद्धेतून निर्माण झाला आहे आणि मुसलमान मित्रांचा त्या श्रद्धेवर विश्वास नसेल तर ते ती श्रद्धा फेटाळून लावू शकतात.

माझ्या मते त्यांनी काँग्रेसमध्ये येण्याकरिता तयार असायला पाहिजे. परंतु जोपर्यंत काँग्रेसमध्ये त्यांचे मनापासून स्वागत होत नाही आणि समान वागणूक मिळण्याची त्यांना शाश्वती वाटत नाही तोपर्यंत त्यांनी काँग्रेसमधील प्रवेशाकरिता अर्ज करू नये. जोपर्यंत काँग्रेसचा संबंध आहे तात्त्विक दृष्टीने पाहिले तर अल्पसंख्य आणि बहुसंख्य हा प्रश्न उपस्थित होत नाही. मानवधर्म सोडून काँग्रेस इतर कोणताही धर्म पाळत नाही. ती स्त्री-पुरुषांना समान लेखते. ती शुद्ध राजकीय संस्था आहे आणि तिच्यात हिंदू, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी आणि ज्यू हे सर्व समान गणले जातात. काँग्रेसला आपल्या शिकवणुकीप्रमाणे अनेकदा वागणे शक्य झालेले नाही. यामुळे काँग्रेस हिंदू संघटना आहे असा मुसलमानांमध्ये भ्रम निर्माण झाला आहे. जोपर्यंत ही ओढाताण सुरू आहे तोपर्यंत मुसलमानांनी आपली आब राखून या वादापासून दूरच राहावे. काँग्रेसला जेव्हा त्यांच्या सेवेची गरज असेल तेव्हा त्यांनी काँग्रेसमध्ये प्रवेश करावा. मी जसा काँग्रेसचा सेवक आहे तसेच तेही तोपर्यंत काँग्रेसचे सेवक असू शकतात. मी जरी काँग्रेसचा चार आण्याचा सभासद नसलो तरी संघटनेमध्ये माझे ऐकले जाते. आणि याचे कारण दक्षिण आफ्रिकेतून १९१५ साली मी परतलो तेव्हापासून मी निष्ठेने काँग्रेसची सेवा करत आहे. प्रत्येक मुसलमान अशाच प्रकारे जर काँग्रेसची सेवा करील तर त्यांच्या सेवेचेही कौतुक झाल्याचे त्यांना आढळून येईल.

आज प्रत्येक मुसलमान लीगला पाठिंबा देणारा आहे असे समजले जाते व त्यामुळे तो काँग्रेसचा शत्रू आहे असे समजण्यात येते. लीगच्या शिकवणुकीचा हा दुष्परिणाम आहे. आज शत्रुत्वाकरिता कोणतेही कारण उरलेले नाही. सांप्रदायिकतेचे विष निपटून काढण्याकरिता चार महिन्यांचा काळ फार कमी आहे. हिंदू आणि शिखांनी हे विष अमृताप्रमाणे घेतले व ते मुस्लिम लीगचे शत्रू झाले ही दुर्दैवाची गोष्ट आहे. आणि विटेला विटेने उत्तर देण्याच्या प्रयत्नात त्यांनी आपल्या नावाला बट्टा लावून घेतला व ते स्वतःही मुसलमानांच्या श्रेणीतच सामील झाले. अल्पसंख्य मुसलमानांना माझी विनंती आहे की त्यांच्याबद्दल जो संशय निर्माण करण्यात आला आहे तो दूर करण्याकरिता त्यांनी स्वतःला या विषारी

वातावरणापासून वर ठेवावे व कोणत्याही प्रकारचा अप्रामाणिकपणा वा प्रतारणा न करता भारताचे सन्माननीय नागरिक म्हणून आपण राहू शकतो हे दाखवून द्यावे.

यापुढे लीग एक राजकीय संघटना म्हणून काम करू शकत नाही हा फाळणीचा एक परिणाम झाला आहे. त्याचप्रमाणे हिंदू महासभा, शीख सभा आणि पारसी सभा या संघटनाही राजकीय संघटना म्हणून काम करू शकत नाहीत. त्या धार्मिक संघटना म्हणून राहू शकतात. तसे झाले तर आपापल्या समाजात सुधारणा घडवून आणणे, धार्मिक महत्त्वाच्या बाबी कोणत्या आहेत याचा शोध घेऊन त्यानुसार कृती करणे हे त्यांचे काम असेल. असे झाले तर वातावरणातील विष निघून जाईल व या संघटना परस्परांशी चांगुलपणाच्या कामात स्पर्धा करू लागतील. त्यांच्यात एकोपा आणि मैत्रीभाव असेल व त्या सरकारला मदत करतील. मुसलमान काँग्रेसमध्ये असो वा नसो त्यांच्या राजकीय आकांक्षांची परिपूर्ती काँग्रेसच्या माध्यमातूनच होऊ शकेल. जे लोक काँग्रेसमध्ये आहेत त्यांचाच जर काँग्रेस विचार करणार असेल तर तिच्या सेवेचे क्षेत्र फार लहान होईल. आजसुद्धा काँग्रेसमध्ये फार कमी लोक आहेत. आज इतर कोणतीही संघटना काँग्रेसशी स्पर्धा करू शकत नाही कारण काँग्रेसने स्वतःला गरिबांच्या आणि तळागाळाच्या लोकांच्या सेवेला वाहून घेतले आहे आणि ती संपूर्ण भारताचे प्रतिनिधित्व करण्याचा प्रयत्न करत आहे.

हिंदीवरून. 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २२९-३२

---

८४. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

डिसेंबर २३, १९४७

चि. बबुडी,

मी तुझे पोस्टकार्ड वाचले. पंचवीस दिवसांनंतर जे घडणार आहे त्याची आपण आजच चर्चा का करायची? मी तुझा उतावीळपणा समजू शकतो. या दिवसात काहीही घडणार नसेल तर मी तुझ्या दृष्टिकोनाशी सहमत होईन. तू जर मरणार असशील तर माझ्या मांडीवर डोके ठेवून तू मेलेली मला आवडेल. असे काही घडण्याची शक्यता सध्या तरी मला वाटत नाही. परंतु तू माझ्या आधी कशी मरू शकतेस? हा विचारच मला असह्य होतो. यामुळे जू जगण्याचा निर्धार केला पाहिजे आणि अंथरुणातून उठल्यानंतर देशसेवेकरिता स्वतःचे जीवन वाहून घेण्याची मनाची तयारी केली पाहिजे. असे झाले आणि ईश्वराला तुझी सेवा पाहिजे असेल तर तो तुला जिवंत ठेवील. एरव्ही तो तुला घेऊन जाईल. यात काळजी करण्यासारखे काय आहे? तू इतके करणार नाही काय?

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १००८१. सौजन्य - शारदा गो चोखावाला

---

८५. नरहरी द्वा. पारीख यांना पत्र

डिसेंबर २३, १९४७

चि. नरहरी,

तुझे हस्ताक्षर पाहून मला फार आनंद झाला. तू अंथरुणाला खिळून राहण्याची कल्पनाही मी सहन करू शकत नव्हतो (पाहा नरहरी द्वा. पारीख यांना पत्र, डिसेंबर २३, १९४७). परंतु आता तू आजारी पडलाच आहेस तर अंथरुणातून बाहेर पडण्याची घाई करू नकोस. 'संकटातून पार पडणाऱ्या माणसाच्याच इच्छा पूर्ण होत असतात' ही म्हण लक्षात ठेव. इथे तू 'जो माणूस संकटातून पार पडतो' च्या ठिकाणी 'निरोगी माणूस' असे शब्द वाच.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ९१४८

---

८६. वनमाला पारीख यांना पत्र

डिसेंबर २३, १९४७

चि. वंदू,

मला तुझे पत्र मिळाले. हृदयविकाराच्या झटक्यात या सर्व लक्षणांची काळजी घ्यावी लागत असते. योग्य काळजी आणि योग्य आहार घेतला तर रुग्ण बरा होतो. तुझ्या मालीशमध्ये प्रेम आणि मेहनत असल्यामुळे तुझ्या मालीशचा मालीश करणाराच्या मालीशपेक्षा जास्त फायदा होईल असे मला वाटते. तुझ्यात ताकद आहे, नाही काय? अशा मालीशकरिता शारीरिक शक्तीची जास्त आवश्यकता नसते. त्याकरिता काही कौशल्य हवे असते. दिनशाच्या मालीशची पद्धत तुला माहीत नाही काय?

संडासला जाण्याकरिता जेव्हा आतडे काम करू लागेल तेव्हा पूर्ण बस्ती देण्याला काहीही हरकत नाही हे माझे मत तू डॉक्टरांना सांग. मणी आनंदात असेल अशी मला आशा आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ३०२२. सौजन्य - डिसेंबर २३, १९४७

---

८७. अमृतलाल नानावटी यांना पत्र

डिसेंबर २३, १९४७

चि. अमृतलाल (सचिव, हिंदुस्तानी प्रचार सभा वर्धा),

मी आशीर्वाद देतो की नाही याची तू काळजी का करतोस? तुला जो अनुभव आहे तो मला आहे काय? मला जरी पसंत नसेल तरी तुला जे चांगले आहे असा विश्वास वाटतो त्याप्रमाणे तू वागायला पाहिजे आणि मला एखादी गोष्ट पसंत असली तरी तुला जर ती गोष्ट चुकीची वाटत असेल तर ती तू करायला नको असे मला वाटते. यामुळे माझ्या आशीर्वादाचा प्रश्न उपस्थित होत नाही. तुला जे योग्य वाटते ते तू निःसंकोचपणे करायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. १०८१७

---

८८. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २३, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

एक बंधू म्हणतात वा सूचना करतात की थंडी बरीच पडत असल्यामुळे उद्यापासून प्रार्थना अर्धा तास आधी म्हणजे पाच वाजता सुरू करावी. सध्या बरीच थंडी पडते आहे हे मला मान्य आहे. आजच २३ डिसेंबर आहे. आता यापुढे मिनिटामिनिटाने दिवस मोठा होत जाणार असला तरी तुम्हा सर्वांची इच्छा असेल तर आपण उद्यापासून पाच वाजता प्रार्थना सुरू करू शकतो. (ज्यांना प्रार्थना लवकर हवी असेल त्यांनी हात वर करावे असे गांधीजी म्हणाले. अनेकांनी हात वर केले. यामुळे प्रार्थना पाच वाजता सुरू करावी असे ठरले.)

आज मी तीन मुद्द्यांवर बोलायचा विचार केला आहे. पहिली गोष्ट म्हणजे काल इथे बहावलपूरचे लोक आलेले तुम्ही पाहिले असेल. (बहावलपूरच्या ७०,००० हिंदूंना वाचवा असे फलक त्यांच्या हातात होते.) ते अतिशय दुःखी होते. (बहावलपूर संस्थान ८ नोव्हेंबरला पाकिस्तानमध्ये सामील झाले होते. तेथील ७०,००० हिंदू संस्थानातून बाहेर पडण्याची वाट पाहत होते. पाकिस्तान सरकार सैन्याच्या देखरेखीखाली त्यांना हलवण्याशी सहमत नव्हते. तेथील छावणीत गोळा झालेल्या हिंदू आणि शिखांना पुरेसे खायला आणि कपडे मिळत नव्हते.) तेथील सर्व हिंदू आणि शिखांचे जीवन धोक्यात असल्यामुळे त्यांना इथे आणण्यात यावे असे त्यांचे म्हणणे होते. आज बहावलपूरचे दोन बंधू मला भेटण्याकरिता आले होते. त्यांनीही मला हेच सांगितले. ते म्हणाले की या बाबतीत कोणतेही पाऊल उचलण्यात आले नाही तर आम्ही महाराज्यपालभवनासमोर उपोषण करू. यावर मी त्यांना सांगितले की तुमच्या उपोषणामुळे तेथील हिंदू आणि शीख परतही येऊ शकणार नाहीत आणि त्यांचे रक्षणही होणार नाही. याशिवाय मंत्रिमंडळाने दिलेल्या अधिकारांशिवाय महाराज्यपालांना कोणतेही अतिरिक्त अधिकार नाहीत. त्यांना केवळ सही करण्याचा अधिकार आहे. पंडित नेहरू वा सरदार पटेल यांच्या निवासस्थानासमोर उपवास केल्याने काही फायदा होईल असे जर तुम्हाला वाटत असेल तर तेसुद्धा तितकेच चूक आहे. त्यांना माझा मुद्दा पटला आणि त्यांनी उपोषणाचा विचार सोडून दिला. काल माझे मौन होते आणि त्यामुळे मी काहीही सांगू शकलो नाही. बहावलपूरच्या नबाबांनी हिंदूंना आणि शिखांना जिथे जायचे असेल तिथे जाऊ दिले पाहिजे. ते जर असे करणार नाहीत तर ते आपल्या

कर्तव्याला चुकतील. तिथे नबाबांच्या अगदी नाकाखाली कायकाय घटना घडल्या ते मी तुम्हाला सांगू शकत नाही. हिंदू आणि शिखांचा मोठ्या प्रमाणात छळ करण्यात आला आणि त्यांना मारण्यात आले. बहावलपूरला घडवणारे शीख होते. ते शूर लोक आहेत. ते लढूही शकतात आणि शेतीही करू शकतात. हिंदूंनीसुद्धा असेच केले आहे. त्यांनी कोणताही अपराध केलेला नाही. ते हिंदू आणि शीख आहेत केवळ हाच त्यांचा अपराध आहे. यांतील मोठ्या संख्येतील लोकांची कत्तल झाली आहे आणि काही पळून गेले आहेत. हिंदू आणि शीख जर तिथे शांततेत राहू शकत नसतील तर नबाब साहेबांनी काहीही सांगितले तरी त्याला काय अर्थ आहे? नबाब साहेबांनी आपले कर्तव्य पार पाडावे अशी माझी त्यांना विनंती आहे. हिंदू आणि शिख तिथे आपल्या अब्रूनिशी सुरक्षितपणे राहू शकत नसतील तर त्यांनी त्यांच्या निघून जाण्याची व्यवस्था केली पाहिजे अथवा अजूनही बहावलपूरमध्ये जे हिंदू आणि शीख राहतात त्यांना कोणी स्पर्शही करू शकणार नाही व ते बहावलपूरमध्ये शांततापूर्वक राहू शकतात असे त्यांनी घोषित केले पाहिजे. त्यांची जर उपासमार होत असेल त्यांना अन्नधान्य पुरवले पाहिजे.

मला जी दुसरी गोष्ट तुम्हाला सांगायची आहे ती आजच्या 'स्टेट्समन'मध्ये आहे. लाहोर येथे जी छावणी आहे तिच्यात तर दुःखी लोक राहतात, तिथे तर मुसलमान राहतात. ती छावणी अतिशय घाणेरडी आहे. तेथील लोकांना कॉलरा झाला आहे, देवी निघत आहेत आणि बरेच लोक असे आहेत की अजून त्यांना काहीही झाले नाही परंतु ते उघड्या आकाशाखाली थंडीत तसेच कुडकुडत पडले आहेत. बाहेर तर राहावे लागतेच, पण उघड्या आकाशाखाली कसे राहतील? पावसापासून वाचण्याकरिता काही पाहिजे, शरीर झाकण्याकरिता काही पाहिजे आणि खायलाही काही पाहिजे. हे सर्व नसेल तर मेल्याशिवाय मार्ग कोणता? बाकी तिथे काय काय होत आहे ते मला माहीत नाही. हं, सियालकोटमधून शिबिरांची साफसफाई करण्याकरिता भंगी बोलावण्यात आले आहेत. ते घाण उचलतील. तेथील अधिकारी म्हणतात की ते सगळे काम करत नाहीत - कोणकोणते ते मला माहीत नाही, परंतु मी इतके सांगेन की ते तिथे अडचणीच्या परिस्थितीत राहत आहेत. ते लोक पाकिस्तानमध्ये आहेत म्हणून काय झाले? मुसलमान आहेत म्हणून काय झाले? माणूस इतका अधःपतीत का व्हावा? मला याच्या वेदना होतात. आपल्या अत्याचारापासून सुटका करून घेण्याकरिता त्या लोकांना आपले घरदार टाकून येथून पळून जावे लागले. त्यांचे तिथे घरदार तर नाही. मग त्यांना त्रास तर होणारच. परंतु स्वतःची सफाईही ते करू शकत नाहीत हे काय आहे? पाकिस्तानमधील असो वा भारतातील, माझा

तर सगळ्या निर्वासितांना सल्ला आहे की त्यांनी प्रत्येक गोष्टीकरिता इतरांवर अवलंबून राहू नये. मी तर म्हणेन की आम्हाला कोणी स्वयंपाक करणारा द्या, विष्टा साफ करणारा द्या, झाडझूड करणारा द्या असे म्हणू नये. जर घरदार गमावून पळ काढावा लागला तर अशी मागणी का करावी? करोडपतींकरिता अशी सोय असते. एकाचे काम असताना ते दहा नोकर ठेवू शकतात, आपण नाही. हे आपल्या अधःपाताचे चिन्ह आहे. लाहोरमधील निर्वासितांनी दृढपणे आणि हिंमत ठेवून सांगायला पाहिजे की सियालकोटहून आमच्याकरिता भंगी बोलावण्याची गरज नाही. आम्हीच आमचे शिबिर स्वच्छ ठेवू. पाकिस्तानच्या अधिकाऱ्यांनी आणि तेथील सरकारनेही त्यांना सांगावे की आम्ही तुमच्याकरिता भंगी बोलावणार नाही. माणसाकडून जितके होत असेल तितके तर करा. आणि इतके करूनही तिथे मृत्यू झाले तर ती वेगळी गोष्ट असेल. परंतु तुम्ही हे करणार नसाल तर तो माणसाचा गुन्हा असेल आणि माणसावर त्या खुनाचे ओझे असेल. मी आधीही म्हणालो होतो आणि आताही सांगतो की निर्वासितांनी सौजन्यपूर्वक राहिले पाहिजे. त्यांनी स्वतःकडून जितके काम होत असेल तितके केले पाहिजे. इतरांवर ओझे होऊ नये.

एक गोष्ट अजून सांगेन. ती चांगली गोष्ट आहे. मला असे वाटते की प्यारेलाल इथे आले असल्याचे एकदा मी तुम्हाला सांगितले आहे. ते कोण आहेत हे तर तुम्हाला माहीतच आहे. ते माझे सचिव आहेत. किती तरी दिवसांपासून ते नोआखालीत काम करत आहेत. त्यांच्याबरोबर इतरही लोक काम करत होते. असुरक्षितता जाणवत असलेल्या तेथील हिंदूंना आपल्या जिवाची पर्वा न कराता त्यांनी आधार दिला. मुसलमानांनीही लवकरच कळले की ते त्यांचे मित्र आहेत, सेवक आहेत, मारहाण करण्याकरिता ते तिथे आलेले नाहीत. शक्य झाले तर ते दोन्ही संप्रदायांच्या लोकांमध्ये समेट घडवून आणायला आले आहेत. ते म्हणतात की तेथील एक गोष्ट माहीत करून घेण्यासारखी आहे. तशी तर ती गोष्ट लहान आहे परंतु महत्त्वाची आहे. तेथील एक मंदीर तोडण्यात आले होते आणि मुसलमानांनी त्याचा ताबा घेतला होता. तो दोन संप्रदायांमधील संघर्षाचा विषय झाला होता. नंतर मुसलमानांनी हिंदूंबरोबर एकोप्याने राहण्याची जेव्हा इच्छा व्यक्त केली तेव्हा हिंदूंना पूजा-अर्चा करता येईल असे अेकही ठिकाण नसल्याचे प्यारेलालनी त्यांच्या निदर्शनास आणून दिले. यामुळे मुसलमानांनी आपल्या श्रमाने ते मंदिर परत बांधले आणि तुम्ही मंदिरात जाऊन पूजाअर्चा करण्याकरिता मोकळे आहा, रामधून करू शकता असे सांगितले. तिथे मूर्तीची प्राणप्रतिष्ठा झाली. आता ते सर्व आरामात राहतात. अधिकाऱ्यांनीही भाग

घेतला. ही चांगली गोष्ट आहे. संपूर्ण हिंदुस्थानात म्हणजे भारतात आणि पाकिस्तानमध्ये असे झाले तर सर्व परिस्थितीच बदलून जाईल. आपण जर आपल्या धर्माला चिकटून राहिलो आणि इतरांच्या धर्मात हस्तक्षेप केला नाही तर ही फार चांगली गोष्ट होईल.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २३६-८

---

८९. आनंद तो. हिंगोराणी यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २४, १९४७

चि. आनंद,

मला तुझे पत्र मिळाले. गरम पाणी पितापिता मी हे लिहीत आहे. आता सकाळचे पाच वाजले आहेत. तुला कानाचा बराच त्रास होतो आहे असे दिसते. असे असेल तर अमेरिकेत जा आणि तिथे काय करता येऊ शकते ते पाहा. ऐकू येत नसण्याचे अभूतपूर्व लाभ कळू शकत असतील तर मग कुठेही जाण्याची आवश्यकता राहत नाही. तुला जे काही कळून घ्यायचे असेल ते तू गंगीकडून (आनंद हिंगोराणी यांची पत्नी) कळून घेऊ शकतोस.

आशीर्वाद,

बापू

हिंदी मायक्रोफिल्मवरून. सौजन्य - भारतीय अभिलेखागार आणि आनंद तो. हिंगोराणी

---

९०. गंगी आ. हिंगोराणी यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २४, १९४७

चि. गंगी,

मला तुझे पत्र मिळाले. मोठ्या अडचणीतून लिहितो आहे. नाही तर उत्तर देता आले नसते.

दिल्लीत माझ्याबरोबर राहता येईल अशी इथे सोय नाही. मी स्वतःच इथे एका श्रीमंत माणसाच्या घरात राहतो आहे. माझ्याबरोबर इथे कोणालाही ठेवता येणे कठीण आहे. मी जर कुठे आश्रमाची स्थापना केली आणि तिथे राहिलो तर तू येऊ शकशील. परंतु या जीवनात ही संधी मिळणे अशक्य आहे. आनंदला सोडून अजून कुठे जाणे हे तुझे कर्तव्य नाही याचाही विचार कर. जोपर्यंत आनंदला बहिरेपणा दुःखाची गोष्ट वाटते तोपर्यंत तू त्याला सोडू शकत नाही. आनंदसुद्धा एकटा कुठे जाऊ शकत नाही. माझ्याजवळ राहून तू काय शिकणार आहेस? माझ्याबरोबर राहून काही लाभ होऊ शकतो असा लोकांनी विचार करणे चुकीचे आहे असे मला वाटते.

आशीर्वाद,

बापू

हिंदी मायक्रोफिल्मवरून. सौजन्य - भारतीय अभिलेखागार आणि आनंद तो. हिंगोराणी

---

९१. दिलखुष दिवाणजी यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २४, १९४७

चि. दिवाणजी,

माझ्या प्रश्नाच्या उत्तरात तुम्ही पाठवलेले पत्र मिळाले. मला आनंद झाला. सुसज्जीकरण सुरू असले तरी त्यात बराच वेळ जात असेल. मला वाटते की दुहेरीकरण केल्यामुळे वेळ कमी लागेल व विणण्याची प्रक्रियाही सोपी होईल. यावर विचार करा.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

९२. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २४, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मला भेटण्याकरिता अनेकदा शीख बांधव येत असतात. वर्तमानपत्रेही मी थोडी वाचतो. भेटण्याकरिता येणारेही मला काही सांगतात. त्यांचे म्हणणे आहे की मी शिखांचा शत्रू झालो आहे. माझ्या शब्दांना भारताबाहेर काही किंमत राहिली नसती तर त्यांना त्याचे काही वाटले नसते. भारताने अहिंसक मार्गाने स्वातंत्र्य मिळवले असा बाहेरच्या लोकांचा विश्वास आहे. खरोखर असे असते तर मला वाईट वाटले नसते. यापूर्वी जगात असे कुठेही झाले नाही. झाडाची ओळख त्याच्या फळावरून होत असते, इतर कोणत्याही मार्गाने नाही. आज हिंदू, मुसलमान आणि शीख परस्परांचे शत्रू झाले आहेत.

मी आधीच सांगितल्याप्रमाणे आपला संघर्ष अहिंसक संघर्ष आहे या भ्रमात मी होतो. ईश्वराने मला आंधळे केले होते व मी चुकीच्या मार्गाने भरकटलो होतो. परंतु पंगू आणि नामर्द लोक अहिंसेचे पालन करू शकत नाहीत. हा पांगळेपण आणि मुकेपणा शारीरिक नाही. शरीराने पांगळे लोक तर ईश्वराच्या मदतीने अहिंसेचे पालन करू शकतात. प्रह्लादासारखा एखादा मुलगाही अहिंसेचे पालन करू शकतो. प्रह्लाद ऐतिहासिक व्यक्ती आहे की नाही हे मला माहीत नाही, खरोखर असे झाले होते की नाही हे मला माहीत नाही परंतु माझ्या लेखणीतून रामशिवाय इतर कोणताही शब्द निघू शकत नाही असे प्रह्लादने आपल्या वडलांना (हिरण्यकश्यपला, राक्षस राजा.) स्पष्टपणे सांगितले होते असे म्हणतात. माझ्यासमोर बारा वर्षाचा प्रह्लाद आजही उभा आहे. परंतु जो माणूस आत्म्याने आंधळा आहे, लुळापांगळा आहे तो अहिंसेचे पालन कधीही करू शकत नाही. जोपर्यंत अंतःकरणातून प्रकाश येत नाही तोपर्यंत माणसाला अहिंसेचे सौंदर्य कळू शकत नाही. स्वातंत्र्याकरिता केलेल्या संघर्षात आम्ही अहिसेचे पालन करत नव्हतो तर शांततामय प्रतिकाराचे पालन करत होतो. त्याचा अर्थ आम्हाला जरी ब्रिटिशांना मारावे असे जरी वाटत होते तरी ब्रिटिशांना आम्ही मारणार नाही असा होता. कारण आमच्याजवळ तितकी शक्ती नव्हती. करोडो लोकांनी अहिंसक प्रतिकाराचा मार्ग अनुसरल्यामुळे आम्हाला स्वातंत्र्य मिळाले. आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य पांगळे होते. ते आंशिक होते. चुकून माझा समज झाला होता की

भारताचा स्वातंत्र्यसंघर्ष अहिंसक होता. परंतु नंतरच्या घटनांनी माझे डोळे उघडले. आमची अहिंसा ही दुर्बलांच्या दुबळ्या विरोधासारखी होती. हिंदुस्थानचे लोक जर खरोखर शूराप्रमाणे अहिंसेचे पालन करणारे असते तर त्यांनी इतकी हिंसा कधीही केली नसती.

शीख बांधवांच्या रागाचे मला हसू येते. शीख आणि हिंदू यांच्यात फरक आहे असे मी समजत नाही. मी गुरु ग्रंथसाहेब वाचला आहे. ग्रंथसाहेबमधील मला काहीही कळत नाही असे मित्र मला चिडवत असतात. याबाबतीत मला जर खरोखर काही कळले नसते तर मी गुरू गोविंदसिंहबद्दल जे लिहिले ते लिहिले नसते. मी काही कोणाचा शत्रू नाही. मी जेव्हा शिखांच्या मद्यपानाबद्दल व जुगारीपणाबद्दल बोलतो तेव्हा सर्व शिखांना ते लागू होते असा त्याचा अर्थ नसतो. हिंदूंमध्येही असे अनेक लोक आहेत. परंतु शिखांमध्ये जी ताकद आहे ती हिंदूंमध्ये नाही. परंतु जिथे शिखांची तलवार चालायला नको तिथे ती चालते हे पाहून दुःख होते. वाईट वर्तन करणारा कोणीही असला तरी तो ईश्वरासमोर गुन्हेगार असतो, तो आपल्या धर्माला बट्टा लावतो असे जेव्हा मी म्हणतो तेव्हा मी शिखांचा खरा मित्र असतो.

आज २४ तारीख आहे. उद्या ख्रिसमस आहे. हा सण ख्रिश्चनांकरिता तसाच आहे जशी आपल्याकरिता दिवाळी. ना तर दिवाळी नाचगाण्याकरिता असू शकते ना ख्रिसमस. ख्रिसमस हा येशू ख्रिस्ताचे स्मरण करून देणारा सण आहे. या निमित्ताने मी भारतातील आणि बाहेरील सगळ्या ख्रिश्चन बांधवांचे अभिनंदन करतो. नूतन वर्ष त्याच्याकरिता सुख आणि समृद्धी घेऊन येवो आणि ते येशू ख्रिस्ताच्या उपदेशाचे आपल्या स्वतःच्या जीवनात पालन करतील अशी आशा करतो. भारताचे स्वातंत्र्य म्हणजे येथील ख्रिश्चनांचा विनाश अथवा त्यांनी ख्रिश्चन धर्म सोडून हिंदू वा मुसलमान वा शीख व्हावे असा होत नाही आणि अशी इच्छा मी कधीही केली नाही. ख्रिश्चनाकरिता हिंदू वा मुसलमान होणे ही गोष्ट मृत्यूपेक्षाही भयानक आहे. माझ्या दृष्टिकोनानुसार ख्रिश्चनांनी अधिक चांगले ख्रिश्चन व्हावे, मुलमानांनी अधिक चांगले मुसलमान व्हावे आणि शिखांनी अधिक चांगले शीख व्हावे.

भारतातील आणि भारताबाहेरी ख्रिश्चनांनी खऱ्या अर्थाने मुक्त व्हावे अशी माझी इच्छा आहे. येशू ख्रिस्ताने दाखवलेला आत्मसंयमाचा, त्यागाचा आणि हौतात्म्याचा मार्ग त्यांनी अनुसरावा. त्यांनी स्वतंत्र व्हावे आणि जगातील स्वातंत्र्याचा प्रदेश वाढत राहावा. वृत्तपत्रांमधून मला कळले आहे की सरकार त्यांना जे अनुदान देते ते बंद करण्याचा विचार करत आहे. त्यांना अमेरिका आणि इंग्लंडमधून जो पैसा

येतो तोही येणे बंद होईल. असे ऐकतो की भारतातील ७५ टक्के चर्च बंद होतील. परंतु धर्माचा विकास पैशाच्या सहाय्याने होत नसतो. भारतातील बहुतेक ख्रिश्चन गरीब आहेत. सरकारने अनुदान देणे थांबवले तर त्यामुळे काय फरक पडतो? पैशाचे हे संकट टळले म्हणून ख्रिश्चनांनी खुष व्हायला पाहिजे. हजरत उमरच्या घरी एकदा भरपूर पैसे आणि इनाम वगैरे आले. यामुळे उमर काळजीत पडला आणि आपल्या बायकोला म्हणाला की इतकी मोठी संपत्ती घरात असली तर मी संयम ठेवू शकेन की नाही आणि मला सुखाची चटक लागेल की काय अशी भीती वाटते. चर्चकरिता इमारतीची गरज नसते. मानवी शरीर हेच खरे चर्च आहे. तिथेच ईश्वर राहत असतो. असे झाले की आकाश आपल्याकरिता छप्पर होते आणि भूमी आंगण. ईश्वराचे नाव आपण कुठेही घेऊ शकतो. यामुळे ख्रिश्चनांनी मुळीच काळजी करू नये असे मी म्हणेन. त्यांना सरकारी वा इतर कोणाच्या मदतीची मुळीच गरज नाही. त्यांनी आपल्या धर्माच्या शिकवणुकीप्रमाणे वागावे. येशूने दाखवलेल्या त्यागाच्या मार्गाचे जर ते अनुसरण करतील तर त्यांचा धर्म कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २३६ - ८

---

९३. हमिदुद्दिन यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २५, १९४७

भाई हमिदुद्दिन,

बरवाणीसंबंधी तुम्ही लिहिलेले पत्र मला मिळाले. पहिली तार आल्यापसूनच मला जे काही करता यणे शक्य आहे ते मी करतो आहे. तेथील मुसलमानांचे काही कट्टर हिंदू मित्र आहेत. त्यांच्याशीही मी संपर्कात आहे. तेसुद्धा या कामाला कसून लागले आहेत. तुम्ही जे लिहिले त्यात अतिशयोक्ती नाही काय? जुनागढच्या प्रकरणी असे घडले होते. मला सूचना देणारे प्रभावशाली मुसलमान बांधव आहेत. त्यांनी इतकी अतिशयोक्तीपूर्ण माहिती लिहिली होती की नंतर त्यांना सार्वजनिक माफी मागून आपली चूक दुरुस्त करावी लागली. मला याची काळजी नाही परंतु अशा प्रकारच्या अतिशयोक्तीमुळे सर्व मुसलमानांबद्दल चुकीचे मत तयार होते. आणि त्यामुळे मी फार दुखावतो. यामुळे मी तुम्हाला सावधगिरीची सूचना देतो आहे. अखेरीस सरकारी अधिकाऱ्यांनीही काही पावले उचलली आहेत.

तुम्हाला खात्रीपूर्वक जर काही कळले तर ते कृपाकरून मला कळवा.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

९४. कृष्णदास यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २५, १९४७

चि. कृष्णदास,

मला तुझे २० डिसेंबरचे पत्र मिळाले. खादी प्रतिष्ठान तर प्रमाणित होऊनच जाईल. ताबडतोब पैसे मागणे उचित होणार नाही. लेखी करारात जी अट नाही तिचा अशा प्रकारे समावेश करणे योग्य आहे असे मला वाटत नाही. मी काही म्हणालो होतो हे मला आठवत नाही. मी जर काही म्हणालो असेन तर माझी सही तिथे असलीच पाहिजे.

खादी प्रतिष्ठानचे विक्रेते आणि प्रमाणित नसलेल्या खादीचे विक्रेते यांच्यांत फार मोठे अंतर आहे असे मला आढळून आले आहे. खादी प्रतिष्ठानचा जन्म खादीकरिता झाला होता व खादीकरिता ते मरणही पत्करील. इतर व्यापारी आपला व्यवसाय केवळ व्यवसायाकरिता करत असतात. ते अप्रामाणिकपणासुद्धा करतात. असे असले तरी मी तुझे पत्र खादी प्रतिष्ठानला पाठवीन व त्यांना विचारीन.

तुझ्याजवळ जे हिंदुस्तानी लिहिणारे आहेत त्यांना हिंदुस्तानी चांगली येते काय? तू 'लिखा पढी' हा शब्द वापरला आहे. माझ्या माहितीप्रमाणे 'लिखापढी' हा एक शब्द आहे..

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. २७३९

---

९५. हेमप्रभा दास गुप्ता यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २५, १९४७

चि. हेमप्रभा (सतीश चंद्र दास गुप्ता यांची पत्नी),

सोबत कृष्णदासचे पत्र आहे. या विषयासंबंधी मला कळव. संघाच्या नियमाप्रमाणे खादी प्रतिष्ठान प्रमाणित संस्था नाही. कृष्णदासला लिहिलेल्या पत्राची प्रत मी सोबत जोडत आहे. बबुआ आणि दीदीमोनी हे दोघेही चांगले असतील अशी आशा आहे. अरुणची प्रकृती एकदम चांगली झाली पाहिजे. त्याचा जर निसर्गोपचारावर विश्वास असेल तर त्याने कुलरंजनचा सल्ला घ्यावा.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. २७४०

---

९६. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २५, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काश्मीरमध्ये काय सुरू आहे ते तुम्हा सर्वांना माहीत आहे. परंतु तुमचे लक्ष काश्मीरच्या प्रस्तावाकडे वेधण्याची माझी इच्छा आहे. भारतीय संघराज्य आणि पाकिस्तानमध्ये एखादा लवाद नेमण्यात यावा अशी सूचना करण्यात आली आहे आणि ही गोष्ट वर्तमानपत्रांमध्येही आली आहे. ही लवाद नेमण्याची गोष्ट झाली. भारत आणि पाकिस्तान बसून आपसात निर्णय करूच शकणार नाही असे किती दिवस चालेल? किती काळ आपण आपसात भांडत राहू? काश्मीर आणि जम्मू हे दोन्ही एक आहेत. तिथे मुसलमानांचे बहुमत आहे. काश्मीरचे दोन तुकडे केले तर अशा प्रकारे तुकडे करण्याची गोष्ट कुठपर्यंत जाऊन थांबेल? हिंदुस्थानचे दोन तुकडे झाले इतके पुरे नाही काय? हेच सहनशीलतेच्या पलीकडे आहे. भारताला ईश्वराने घडवले आहे. माणूस त्याचे तुकडे कसे करू शकतो. परंतु तसे झाले. लीगने आणि काँग्रेसने वेगवेगळ्या कारणांनी हे मान्य केले. आज काश्मीरचे तुकडे करायचे तर इतर संस्थानांचे का नाही?

काश्मीरसंबंधी भांडण का झाले? असे म्हणतात की हल्ला करणारे डाकू आहेत. लुटारू आहेत. ते बाहेरून येतात. ते घूसखोर आहेत. परंतु जसजसा वेळ जातो आहे तसतसे कळते आहे की तसे नाही. उर्दूची अनेक नियतकालिके इथे येतात. मी स्वतः थोडेफार उर्दू वाचू शकतो. आजूबाजूचे लोक मला थोडीफार सूचनाही देत असतत. आज 'जमीनदार' नावाच्या वृत्तपत्रातून माझी कानउघाडणी करण्यात आली. 'जमीनदार'च्या संपादकांना मी ओळखतो. त्यांच्या जिभेवर कधीही नियंत्रण नसते. काश्मीरवर हल्ला करण्याकरिता सर्व मुसलमानांनी दाखल व्हावे असा आता तर त्यांनी उघडउघड सल्ला दिला आहे. डोगरा, शीख या सर्वांना त्यांनी शिव्या घातल्या आहेत. काश्मीरमधील लढाईला ते जिहाद म्हणतात. परंतु जिहादमध्ये तर संयम असतो, सीमा असतात. परंतु इथे तर काहीही नाही. तिथे जे काही सुरू आहे ते व्हायला नको. हिंदू, शीख आणि मुसलमानांनी नेहमीकरिता वेगवेगळेच राहिले पाहिजे

अशी त्यांची इच्छा आहे काय? मुसलमानांनी जर हिंदूंची कत्तल करायला सुरुवात केली तर हिंदूंचा धर्म काय असेल? तो मी तुम्हाला दररोज सांगत असतो. हिंदूंनी आणि शिखांनी कधीही बदला घेऊ नये.

सरळ गोष्ट ही आहे की काश्मीरमध्ये पाकिस्ताननेच घूसखोरी केली आहे. भारतीय सैन्य तिथे गेले आहे परंतु आक्रमण करण्याकरिता नाही. महाराज आणि शेख अब्दुल्ला यांनी बोलावल्यामुळे ते तिथे गेले आहे. काश्मीरचे खरे महाराज शेख अब्दुल्ला आहेत. हजारो मुसलमान त्यांचे भक्त आहेत. त्यांना 'काश्मीरकेसरी' म्हणतात.

माणसाने आपली चूक केव्हाही कबूल केली पाहिजे. जम्मूमधील हिंदूंनी आणि शिखांनी व बाहेरून तिथे गेलेल्या लोकांनी तेथील मुसलमानांना मारले आहे. काश्मीरचे महाराज इंग्लंडच्या महाराजांप्रमाणे नाहीत. त्यांच्या संस्थानात जे काही कमीजास्त होते त्याकरिता ते जबाबदार असतात. तिथे अनेक मुसलमांनाची कत्तल झाली, अनेक मुलींचे अपहरण झाले. शेख अब्दुल्ला साहेबांनी त्यांना वाचवण्याचा प्रयत्न केला. जम्मूत जाऊन त्यांनी चर्चा केली. लोकांची समजूत घातली. काश्मीरचे महाराज डोगरा राजपूत आहेत. त्यांच्या अनेक दोषांचा पाढा वाचला जातो. काश्मीरच्या राजाने गुन्हा केला असेल वा अजून कोणी गुन्हा केला असेल तर त्याला हटवण्याची गोष्ट मी समजू शकतो. परंतु काश्मीरच्या मुसलमानांवर हल्ला करण्यात यावा असा कोणता अपराध त्यांनी केला? पाकिस्तान सरकारचे म्हणणे आहे की इस्लामची सगळ्यात मोठी शक्ती पाकिस्तान आहे. परंतु पाकिस्तान सरकारला मी नम्रपणाने सांगू इच्छितो की ते याचा अभिमान तेव्हाच बाळगू शकतील जेव्हा पाकिस्तानमधील प्रत्येक हिंदूला आणि शिखालाना न्याय मिळू शकेल. पाकिस्तान आणि भारत सरकारने एकत्र बसून आपसात तडजोड केली पाहिजे. परंतु तिसऱ्या शक्तीच्या माध्यमातून नाही. दोन्हीकडील प्रधानांनी बसून चर्चा करावी, महाराजांनी समंजसपणा दाखवून बाजूला बसावे आणि लोकांना निर्णय घेऊ द्यावा. शेख अब्दुल्ला तर त्यात असतीलच. परंतु महाराजांनी समंजसपणा दाखवून म्हणावे की सत्ता माझी नाही, काश्मीरच्या जनतेची आहे. लोकांना जे ठरवायचे असेल ते त्यांनी ठरवावे. त्यांनी म्हणायला पाहिजे की काश्मीर काश्मीरच्या मुसलमानांचा, हिंदूंचा, शिखांचा आहे, माझा नाही. महाराज आणि त्यांचे प्रधान वेगळे झाले तर शेख साहेब राहतील. ते अंतरिम सरकारची स्थापना करू शकतील. सर्वांनी बसून आपसात तोडगा काढावा. त्यातच सर्वांचे भले आहे. संघराज्य सरकारने काश्मीरला मदत केली ती तेथील प्रजेकरिता केली होती, महाराजांकरिता नाही. प्रजेच्या विरोधात

काँग्रेस कोणत्याही राजाचा पक्ष घेऊ शकत नाही. राजे लोक प्रजेचे विश्वस्त होऊन राहतील तरच ते राहू शकतील.

एका उर्दू मासिकात आज मी एक शेर पाहिला. त्याने मी दुखावलो. त्यात लिहिले आहे की "आज सर्वांच्या तोंडी सोमनाथ आहे. जुनागढचा बदला घेण्याकरिता एखाद्या नवीन गझनीला गझनीहून यावे लागेल." एखाद्या मुसलमानाच्या तोंडून असे उद्गार निघतात हे पाहूनच फार वाईट वाटते. एकीकडे मैत्रीभाव व निष्ठेबद्दलच्या गोष्टी आणि दुसरीकडे या अशा गोष्टी. संघराज्यातील मुसलमानांचा जीव वाचावा म्हणून तर मी माझे जीवन पणाला लावले आहेत. मी वाईटपणाला वाईटपणाने उत्तर देणार नाही. मी तर जे ठरवले आहे तेच करीन कारण मला वाईटपणाला चांगुलपणाने उत्तर द्यायचे आहे. आज मी हे सर्व सांगितले कारण लोकांच्या संतापाचा भडका उडू नये असे मला वाटते. गझनीने जे केले ते फार वाईट केले. इस्लाममध्ये ज्या वाईट गोष्टी घडल्या त्या मुसलमानांनी समजून घेतल्या पाहिजे आणि त्या कबूल केल्या पाहिजे. तसे करण्यात लाज वाटण्याचे काही कारण नाही. अपराध कबूल केल्याने त्याचे ओझे कमी होते. गझनीने यायला पाहिजे असे जर संघराज्यात बसून मुसलमान आपल्या मुलांना शिकवणार असतील तर त्याचा अर्थ होतो भारताला आणि हिंदूंना खाऊन टाका. हे कोणी सहन करणार नाही. दोघे आपसात बसून काहीही करू शकतात. हा खोडसाळपणाचा शेर एका प्रतिष्ठित मासिकात छापला गेला नसता तर मी याची चर्चासुद्धा केली नसती. (हा शेर अलीगढ येथून प्रकाशित होणाऱ्या 'अलीगढ' उर्दू मासिकात प्रकाशित झाला होता. या गोष्टीकडे जेव्हा अलीगढच्या कुलगुरूंचे लक्ष वेधण्यात आले तेव्हा नजरचुकीने असे घडले असे खेद व्यक्त करत त्यांनी सांगितले.)

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २३९-४१

---

९७. निरंजन सिंग गिल यांना पत्र

[डिसेंबर २५, १९४७नंतर] (हे पत्र निरंजन सिंग गिल यांच्या डिसेंबर २५, १९४७च्या चिठ्ठीमागे लिहिलेले आहे.)

मला तुमची दोन पत्रे मिळाली. हरिजनांबद्दल तुम्ही मला लिहिले हे फार चांगले केले. अशा प्रकारे सेवेचे काम करत राहा. सेना पूर्णपणे अहिंसक राहून देशसेवा शिकली तर फार बरे होईल.

हिंदी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. नेहरू स्मृती संग्रहालय आणि ग्रंथालय. सौजन्य बेलादेवी नाय्यर आणि डॉ. सुशीला नाय्यर

---

९८. ग. वि. मावळणकर यांना पत्र

डिसेंबर २६, १९४७

तुमचे पत्र आणि आपल्या संभाषणाचा अहवाल (गुजरातमध्ये प्रादेशिक विद्यापीठ स्थापन करण्यासंबंधीचा प्रयत्न वादाचा विषय झाला होता. गांधीजींनी 'नवीन विद्यापीठे' हा जो लेख लिहिला होता तो गुजरातमधील या प्रस्तावित विद्यापीठाच्या स्थापनेच्या विरोधात आहे असा अर्थ लावला जाऊ शकत होता. व तशा प्रकारे तो उद्धृतही केला जात होता. यामुळे ग. वि. मावळणकरांनी डिसेंबर ११ला गांधीजींबरोबर या विषयावर मनमोकळी चर्चा केली. गांधीजींच्या लेखाकरिता पाहा नवीन विद्यापीठांसंबंधी, डिसेंबर २५, १९४७) दोन्ही मला मिळाले. ते मला आताच वाचून दाखवण्यात आले. (सकाळी पाउणेपाच वाजता) अहवाल तयार करण्यात तुम्ही फार मेहनत घेतली आहे. मला वाटते की या विषयावर इतकी मेहनत घेण्याची गरज नव्हती. तुम्ही अर्थातच माझ्या दृष्टिकोनाचा आशय अगदी चांगल्या प्रकारे सांगितला आहे. (प्रादेशिक भाषांच्या आधारावर विद्यापीठांची स्थापना केली पाहिजे हे मत जरी गांधीजींना मान्य होते तरी त्याआधी भाषावार प्रांतरचना झाली पाहिजे असे गांधीजींचे मत होते.) तुम्ही तयार केलेल्या आशयातून काही वगळण्याचा वा त्यात काही टाकण्याचा प्रश्नच उपस्थित होत नाही. केवळ गुजरातच असा भाषिक प्रदेश आहे की जिथे एकही प्रादेशिक विद्यापीठ नाही ही तुमच्या लेखनावरून एक नवीन गोष्ट लक्षात आली. यामुळे मी मांडलेल्या विचारांचा आधार कच्चा होतो असे असले तरी हे शेवटचे प्रादेशिक विद्यापीठ प्रस्थापित झाले तर ते भारतीय संस्कृतीच्या विकासाला म्हणजे देशातील खेड्यांमध्ये जी संस्कृती आहे त्यांच्या विकासाला मदत करील अशी मला आशा आहे. परंतु माझा लोभ म्हणा की अडाणीपणा म्हणा तुमची इच्छा असेल तर माझ्या या इच्छेचा तुम्ही तुमच्या अहवालात समावेश करू शकता.

अजूनही माझे मत आहे की आपापल्या प्रदेशावर प्रेम करण्याऐवजी आपल्या संपूर्ण देशावर जर लोक प्रेम करत असतील तर आपण काहीच महिन्यात भाषावार प्रांतरचना करू शकू. यामुळे तुम्ही आणि मी असे दोघांनीही ही भीती (भाषावार प्रांतरचना करण्याकरिता अनेक वर्ष लागतील) निराधार असल्याचे सिद्ध केले पाहिजे व भाषावार प्रांतरचनेचे माझे स्वप्न अस्तित्वात आणले पाहिजे. आपण त्या उद्दिष्टाच्या परिपूर्तीकरिता प्रयत्न केले पाहिजे. यामुळे या विषयावर अधूनमधून लेख लिहिण्यावर वा तुम्हाला अशी पत्रे लिहिण्यावर मी समाधान मानणार आहे. तुमची प्रकृती चांगली असेल असा माझा विश्वास आहे.

गुजरातीवरून. 'संस्मरणो', पृष्ठ २०५-५

---

९९. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २६, १९४७

बंधूनो आणि भगिनींनो,

उद्या आपली प्रार्थना होणार नाही हे घोषित करताना मला आनंदही होतो आणि दुःखही होते. उद्या मी संबळ येथे जाणार आहे. तिथे ग्रामपंचायतची स्थापना करण्यात आली आहे. मी गेल्यामुळे तिथे मोठ्या संख्येत लोक गोळा होतील असे तेथील लोकांना वाटते. तिथे आम्ही प्रार्थना करू. यापूर्वी मी त्या गावात कधीही गेलो नव्हतो. ते गाव ११ मैलांवर आहे असे ते लोक सांगतात. कदाचित एखाद मैल इकडेतिकडे. परवा मात्र आपली प्रार्थना होईल.

आज मला तुम्हाला तिब्बिया कॉलेजबद्दल सांगायचे आहे. या महाविद्यालयाची स्थापना हकीम अजमलखॉं यांनी केली. दुर्दैवाने आज आपण सर्व मुसलमानांना शत्रू मानून बसलो आहो. परंतु तिब्बिया कॉलेजची स्थापना झाली होती तेव्हा असे नव्हते. हिंदू राजांनी, मुसलमान नबाबांनी आणि हिंदू आणि मुसलमान जनतेने त्या कॉलेजकरिता पैसे दिले होते. हकीम साहेब फार हुशार डॉक्टर होते. ते हे कॉलेज चालवत असत. आयुर्वेदाचे शिक्षण तिथे सुरू करण्यात आल्यामुळे त्या कॉलेजमध्ये हिंदू आणि मुसलमान विद्यार्थीही शिकत असत. या कॉलेजचा एक विश्वस्त मीसुद्धा झालो होतो. आज काही सज्जन हिंदू माझ्याकडे आले आणि तिब्बिया कॉलेजचे काय होईल असे त्यांनी मला विचारले. सध्याच्या परिस्थितीत ते कॉलेज चालवणे फार कठीण आहे असे त्यांनी मला सांगितले. पैसा येणे बंद झाले आहे. तिब्बिया कॉलेजसारखे मोठे कॉलेज बंद पडले तर ती फार दुःखाची आणि लाजेची गोष्ट होईल. हे संकट टळावे म्हणून माझ्याकडून मी सर्व काही करतो आहे. ते कॉलेज करोलबागेत आहे. परंतु मुसलमान मुलांना त्या कॉलेजजवळ जाण्याची भीती वाटते. अनेक मुसलमानांना आपण आपल्या वाह्यातपणामुळे पळवून लावले आहे. पानिपतमधूनही अनेक मुसलमानांना पळवून लावण्यात आले आहे. परंतु दिल्लीत आज मुसलमान कुठे राहू शकतात आणि कुठे राहू शकत नाहीत हा मोठा प्रश्न आहे. ही लाजिरवाणी गोष्ट आहे. जे दुसऱ्याला नष्ट करण्याचा प्रयत्न करतात ते स्वतःचाच विनाश घडवून आणत असतात. हा जीवनाचा नियम आहे. ही आपल्या स्वतःला आणि आपल्या धर्माला मिटवणारी गोष्ट आहे.

दुसरी गोष्ट जी तुम्हांला मला सांगण्याची इच्छा आहे ती मी आधीही तुम्हाला सांगितली आहे. (पाहा, 'प्रार्थना प्रवचन', डिसेंबर ७, १९४७) परंतु ती वारंवार सांगायला काही हरकत नाही. तसे केले तरच लोकांना ही गोष्ट कळेल. आमच्या हिंदू आणि शीख मुलींना मुसलमानांनी पळवून नेले आहे. त्या सर्व कुठे आहेत? ही गोष्ट काही दहावीस मुलींची नाही. ही संख्या शेकडोत वा हजारोतही असू शकेल. किती ते कोणालाही माहीत नाही. या सर्व मुली कुठे आहेत? आपल्याला त्यांना परत आणायचे आहे. लाहोरमधील काही हिंदू, मुसलमान आणि शीख स्त्रिया भेटल्या आणि या अपहृत मुलींना परत आणायचे व त्यांना त्यांच्या घरी पुनःस्थापित करायचे असे त्यांनी ठरवले. हिंदू आणि शिखांनी ज्या मुसलमान मुलींचे अपहरण केले त्यांनासुद्धा परत त्याच्या घरी पाठवायचे असे त्यांनी ठरवले. पतियाळाहून अपहरण झालेल्या मुलींची मला लांब यादी मिळाली आहे. त्यातील काही अतिशय संपन्न मुसलमानांच्या घरातील आहेत. त्या सापडतील तेव्हा त्यांना त्यांच्या पालकांकडे परत पाठवणे कठीण होणार नाही. परंतु हिंदू मुलींचे कुटुंबीय त्यांचे स्वागत करतील की नाही ही अजूनही शंका आहे. ही फार वाईट गोष्ट आहे. यात मुलीची काहीही चूक नसते. आपलीही चूक नसते. त्यांच्याशी कोणी लग्न जरी लावले, त्यांनी इस्लाम जरी कबूल केला तरी माझ्या मते त्या मुसलमान झाल्या नाहीत. त्यांना मी आदरपूर्वक माझ्याजवळ ठेवीन. एखाद्या मुलीचे मुसलमानाने अपहरण केले तर ती मुलगी परत आपल्या घरात वा समाजात घेण्यायोग्य राहत नाही असा विचार एकाही हिंदूने वा शिखाने करावा असे मला वाटत नाही. आपण तिचा तिरस्कार करू नये. आपल्याला तिच्याबद्दल सहानुभूती वाटली पाहिजे व तिच्याबद्दल आपल्याला कीव आली पाहिजे. ती मुलगी जर शीख असेल तर ती माझ्या दृष्टीतून शीखच राहते आणि ती हिंदू असेल तर माझ्या दृष्टीतून हिंदूच राहते. माझ्या मुलीची एखाद्या गुंडाने अब्रू घेतली व त्यामुळे तिला गर्भ राहिला तर मी तिला आणि तिच्या अपत्याला टाकून दिले पाहिजे काय? आणि जन्माला आलेले मूल धर्माने मुसलमान आहे अशी भूमिकाही मी घेऊ शकत नाही. त्याचा धर्म केवळ त्याला जन्म देणाऱ्या आईचा धर्म असू शकतो. मूल मोठे झाल्यानंतर त्या मुलाला कोणताही धर्म स्वीकारण्याचा अधिकार राहील. आज आपली अशी दुर्दैवी अवस्था आहे की घरी परतल्यानंतर आपल्याला अपमानित जीवनच जगावे लागेल हे माहीत असल्यामुळे काही मुली घरी परत यायला नकार देतात. आईवडीलच काय नवरासुद्धा तिला निघून जायला सांगेल. अशा मुलींकरिता आश्रयगृहाची स्थापना करण्यात यावी असे मी सुचवले आहे. त्यांनी त्या मुलींच्या अन्न, वस्त्र आणि

निवाऱ्याची जबाबदारी घ्यावी व त्यांना असे शिक्षण द्यावे की ज्यामुळे त्या मुली आपल्या पायावर उभ्या राहू शकतील. या मुली निष्पाप आहेत. मुसलमान मुलींचे अपहरण करणारे हिंदू वा शीख असो की हिंदू वा शीख मुलींचे अपहरण करणारे मुसलमान असो ते सगळे अपराधी आहेत. ज्या मुसलमानांनी हिंदू वा शीख मुलींचे अपहरण केले असेल त्यांनी त्यांना परत करावे व आम्ही अपराध केला अशी जाहीर कबुली देऊन त्यांनी माफी मागावी. मला मिळालेली यादी पाहून माझा थरकाप उडतो. काश्मीरमध्ये काय घडले? मोठ्या संख्येत मुसलमानांची कत्तल करण्यात आली आहे. स्त्रियांची कत्तल करण्यात आली आणि तरुण मुलींचे अपहरण करण्यात आले. अशा अत्याचार करणारांपर्यंत माझा आवाज पोहोचत असेल तर त्यांनी त्या मुलींना परत करावे असे मी त्यांना सांगेन. तसेच शेकडो हिंदू मुलींचेही अपहरण करण्यात आले असल्याचेही मला सांगण्यात आले आहे. असे सांगतात की एका पीराने मोठ्या संख्येत हिंदू आणि शीख मुलींना आपल्या घरी ठेवले आहे. ज्यांनी त्यांचे अपहरण केले ते सांगतात की आम्ही या मुलींचे अपहरण कोणत्याही प्रकारे त्यांची अब्रू घेण्याकरिता वा त्यांना अपमानित करण्याकरिता केलेले नाही, परंतु जोपर्यंत अपहृत मुसलमान मुलींना परत केले जात नाही तोपर्यंत आम्ही या मुलींना परत करणार नाही. हा अतिशय हलकटपणाचा सौदा आहे. अशा प्रकारे आपण वागू नये. आपण सज्जन माणसाप्रमाणे वागलो पाहिजे. कोणत्याही पूर्वअटीशिवाय आपण सर्व अपहृत मुलींना परत केले पाहिजे. आपल्याला जर आपले स्वातंत्र्य टिकवून ठेवायचे असेल तर आपण शिष्टाचारपूर्वक वागणे शिकलो पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २४१ - ४३

---

१००. रतिंद्रनाथ टागोर यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २७, १९४७

प्रिय रतिंद्रनाथ,

सकाळच्या प्रार्थनेनंतर लगेचच मला तुमचे पत्र दिसले. 'वंदेमातरम' ('वंदेमातरम' हे गीत बंकिमचंद्र चटर्जी यांच्या आनंदमठे कादंबरीत आले आहे. या गीताला स्वातंत्र्यसंग्रामात फार महत्त्व आले होते.) आणि 'जन गण मन'च्या (हे गीत रविंद्रनाथ टागोर यांनी लिहिले व त्याला भारताच्या राष्ट्रगीताचे स्थान मिळाले.) स्वरलिपीबद्दल मला आनंद झाला. तुम्हाला माहीतच असेल की स्वरलिपीबद्दल जरी मी बोलत असलो तरी त्याबद्दल माझे ज्ञान खेदजनक आहे. अडाणी माणूस प्रामाणिक असेल तर इतरांच्या आनंदात आनंद घेऊ शकतो.

मी कुठेही जरी असलो तर शांतिनिकेतन माझ्या अंतःकरणात असेल.

तुझा,

बापू

इंग्रजी फोटोप्रतीवरून. जी. एन. २२९३

---

१०१. बाळ गंगाधर खेर यांना पत्र

डिसेंबर २७, १९४७

भाई खेर (१८८१- १९५७; मुख्यमंत्री, मुंबई प्रांत, १९३७-३९ आणि १९४६-५२; घटनासमितीचे सदस्य; ब्रिटनमध्ये भारताचे उच्चायुक्त, १९५२-४; अधिकृत भाषा समितीचे सदस्य, १९५५; अध्यक्ष गांधी स्मारक निधी१९५६-७),

ही चिठ्ठी घेऊन येणारे सेवकराम सिंधमध्ये मूकपणे काम करत असतात. (ते नंतर भारत सेवक समाजाचे अध्यक्ष झाले होते.) त्यांच्यात त्यांच्या नावाप्रमाणेच गुण आहेत. ते हरिजनांची सेवा करतात. सिंधमधील सर्व हरिजनांना आपल्याला मुंबई प्रांतात सामावून घ्यायचे आहे. शक्य असेल ते करा.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१०२. मणिबेन पटेल यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर [२७], (प्यारेलाल पेपर्समध्ये हे २७च्या पत्रांमध्ये आहे, परंतु पुस्तकात याची २९ तारीख दिली आहे. पाहा याआधीचा आणि नंतरचा विषय) १९४७

चि. मणी,

ही चिठ्ठी घेऊन येणाऱ्या सेवकरामने स्वतःला हरिजनांच्या सेवेकरिता वाहून घेतले आहे. सिंधमधील सर्व हरिजनांना भारतात आणून मुंबई प्रांत, सौराष्ट्र, गुजरात, उदयपूर, जोधपूर आणि इतर ठिकाणी वसवण्यात यावे. या प्रकरणी जे काही करणे शक्य असेल ते सरदारनी करावे.

श्री मणिबेन पटेल,
द्वारा सरदार पटेल,
नवी दिल्ली

गुजरातीवरून. 'बापूना पत्रो - ४: मणिबेन पटेलने', पृष्ठ १४५

---

१०३. खंडूभाई देसाई यांना पत्र

डिसेंबर २७, १९४७

भाई खंडूभाई,

ही चिठ्ठी घेऊन येणारे सेवकराम सिंधमधील हरिजनांची हकिगत सांगतील. त्यांच्यापैकी शक्य होतील तितक्यांचा गिरणीमध्ये समावेश करून घेण्याचा प्रयत्न करा. सेवकराम प्रथम श्रेणीचे कार्यकर्ते आहेत असा माझा विश्वास आहे. या चिठ्ठीचा जो काही उपयोग करायचा असेल तो तुम्ही करा.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१०४. सूर्यकांत यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर २७, १९४७

चि. सूर्यकांत,

मला तुझे पत्र मिळाले. तू सत्य सोडून दे असे मी तुला कधीही सांगू शकत नाही, आईवडिलांची अवज्ञा कधीही करू नकोस. जनसेवा करत राहा.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१०५. प्रार्थना प्रवचन

संबल,

डिसेंबर २७, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

मी आज या गावात प्रार्थना करत असल्यामुळे मला फार आनंद होत आहे. परंतु तुम्ही माझे आभार मानता, हार घालता वा मानपत्र देता असे व्हायला नको. प्रार्थना तर आपला धर्म आहे. आपण जेव्हा सकाळी उठतो तेव्हाच प्रार्थना करतो. आपण दररोज सकाळी आणि सायंकाळी प्रार्थना केली पाहिजे. सायंकाळी वा पाच वाजता वा थंडी असली तर लवकर. आपण सामूहिक प्रार्थना करू शकतो. आपण उभे राहतो, बसतो वा झोपतो तेव्हा आपण ईश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. काम करतानाही आपण ईश्वराचे नामस्मरण केले पाहिजे. प्रार्थनेत काय भरलेले आहे ते आज मी तुम्हाला समजावून सांगू शकत नाही. मला तितका वेळ नाही.

मला स्वागतपर भाषण नको आणि हारतुरे नको असे मी जरी सांगितले होते तरीही ते तुम्ही दिले. याकरिता आणि तुम्ही केलेल्या माझ्या सन्मानाकरिता मी तुमचे आभार मानतो. तुम्ही तुमच्या भाषणात सत्य आणि अहिंसेची महत्ता सांगितली. तुम्ही उल्लेखिलेली सत्य आणि अहिंसा ही फार मोठी गोष्ट आहे. परंतु आपले आचारविचार तसे नसतील तर आपण दांभिक होऊ. मी तर अशी फसवणूक करू शकत नाही. दक्षिण आफ्रिकेतून भारतात आल्यापासून मी देशभर हिंडतो आहे. एकदाच नाही तर अनेकदा संपूर्ण देशात मी फिरलो आहे. हजारो गाव पाहिले आहेत. ते सत्य आणि अहिसेची महत्ता सांगतात परंतु करत काहीच नाही. ते एका पद्धतीने विचार करतात, वेगळ्या पद्धतीने बोलतात आणि अजूनच वेगळ्या पद्धतीचे आचरण करतात. भारतात हिंदू, मुसलमान आणि शीख यांनी परस्परांची कत्तल करावी ही आपल्याकरिता लाजेची गोष्ट आहे. भाग्य की तुमच्या गावात आणि आजूबाजूला दंगली झाल्या नाहीत. इथे फार कमी मुसलमान राहतात आणि ते तुमचे कोणतेही नुकसान करू शकत नाहीत हे त्याचे कारण असावे. आपण जर परस्परांशी शत्रूप्रमाणे वागणार असू तर आपण अहिंसेसंबंधी बोलणे बंद केले पाहिजे. किमान इतके तरी सत्याचरण आपण केले पाहिजे. एकमेकांची कत्तल करण्याकरिता आपण स्वतंत्र झालेलो नाही. स्वातंत्र्य म्हणजे जे काही चांगले असेल त्याप्रमाणे आपण

स्वतःहोऊन आचरण करणे. चांगले होण्याकरिता आपण स्वतंत्र झालो आहो, वाईट होण्याकरिता नाही. खोटे बोलण्याकरिता आपण कधीही ईश्वराची प्रार्थना करत नसतो. आपण तसे तरू तर ते सैतानाला शरण गेल्यासारखे होईल.

आपण पंचायतची स्थापना केली हे चांगले केले. परंतु ती योग्य पद्धतीने काम करणार नसेल व केवळ नावाकरिता पंचायत असेल तर तिच्यापासून काहीही लाभ होणार नाही. पूर्वीच्या काळी भारतात खऱ्या पंचायती असायच्या. मीसुद्धा त्या पाहिल्या नाही. परंतु चीन आणि ग्रीसमधून आलेल्या प्रवाश्यांनी त्यांचा उल्लेख केला आहे. त्या प्रवाश्यांना कोणी काही पैसा दिला नव्हता. त्यांना कोणी बोलावलेसुद्धा नव्हते. अनेक हालअपेष्टा सहन करून ते स्वतःहोऊन आले होते. ज्ञान मिळवण्याकरिता ते आले होते. ते लिहितात की त्या वेळी हिंदुस्थानमध्ये कुठेही चोऱ्या होत नव्हत्या, दारांना कुलुपे नव्हती. हे सर्व काही हजारो वर्षांपूर्वी घडले नव्हते. आपला इतिहास हजारो वर्षांइतका मागे जात नाही.

पूर्वी चार वर्ण होते. (ब्राह्मण, क्षत्रीय, वैश्य आणि शुद्र.) आज त्यांची संख्या किती तरी झाली आहे. त्यांना वर्ण म्हणण्याला काहीही अर्थ उरला नाही. पंचायतची स्थापना करून तुम्ही फार मोठी जबाबदारी पत्करली आहे. गायी इतके कमी दूध देतात की त्यांची कत्तल केली पाहिजे असे अनेक लोक म्हणतात. मुसलमान गायीची कत्तल करतात यात काही संशय नाही. परंतु हिंदू जितक्या गायींची कत्तल करतात तितकी कत्तल जगात कोणीही करत नाही. हिंदू गायीला चांगल्या प्रकारे पाळत नाहीत. त्यांची कशी काळजी घ्यावी हेही त्यांना माहीत नसते. याचा परिणाम गाईचा हळूहळू मृत्यू होण्यात होतो. यापेक्षा त्यांना एकदम मारणे बरे. आपण गायीची पूजा करतो आणि तरीही त्यांच्याशी अतिशय क्रूरपणाचे वर्तन करतो. तुमच्या गायी जर आज तीन शेर दूध देत असतील व उद्या त्यांनी सहा शेर दूध दिले तर मी म्हणेन की तुमच्या पंचायतने काही काम केले.

याचप्रमाणे आतापेक्षा तुम्ही दुप्पट धान्य पिकवले पाहिजे. जमिनीचा कस वाढण्याकरिता जे खत पाहिजे ते देऊन तुम्ही असे करू शकता. मीराबेनने एक परिषद बोलावली होती व मोठ्या संख्येत तिला लोक हजर राहिले होते. शेण, विष्टा, भाज्यांमधून निघालेला कचरा इत्यादी ज्या गोष्टी खेड्यांमध्ये उपलब्ध असतात त्यांचे सुंदर खतात रूपांतर करता येते. त्याकरिता खर्च येत नसतो, केवळ थोडीशी मेहनत पाहिजे असते. तसे केले तर जमिनीचा कस वाढतो.

तुम्ही तुमचे गाव स्वच्छ ठेवता की ठेवत नाही ते मला माहीत नाही. परंतु तुम्ही सशक्त होणे हे तुमचे आद्य कर्तव्य आहे. तुम्ही बाहेरून आणि आतून स्वच्छ असायला पाहिजे. तुमचे गाव धूळ आणि मलमुत्रापासून पूर्णपणे मुक्त असले पाहिजे. आणि घाणेरड्या वासापासूनही ते मुक्त असले पाहिजे. तुम्ही आरोग्याचे नियम पाळले पाहिजे.

तुम्हाला इथे सिनेमा का हवा? यापेक्षा आपल्याला माहीत असलेले किती तरी नाटक तुम्ही करू शकता. सिनेमांमुळे तुम्ही केवळ पैसे खर्च कराल. मग तुम्ही जुगार खेळणे व इतर दुर्व्यसनही शिकता. ज्या लोकांना दारू, गांजा आणि भांग यांचे व्यसन लागलेले असेल त्यांनी ते व्यसन सोडावे. असे झाले तर पंचायतने काही चांगले काम केले असे मी म्हणेन. मग तुमचे गाव पाहण्याकरिता दिल्लीहून लोक येतील. तुम्ही अस्पृश्यता विसरायला पाहिजे. हिंदू, मुसलमान, शीख, पारसी हे सर्व भाऊ आहेत हे तुम्हाला कळले तर स्वतंत्र भारताचा काय अर्थ आहे ते तुम्हाला कळेल. ईश्वर तुम्हाला हे सर्व साध्य करण्याची शक्ती देवो.

कृपाकरून टाळ्या वाजवू नका. मी जे काही म्हणालो तो तुमच्या प्रार्थनेचा भाग आहे. मला तुमचे आशीर्वाद हवे आहेत आणि मी जे सांगितले ते सर्व तुम्ही केले तर मला सर्व काही मिळाले असे मी समजेन.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २४३ -४६

---

१०६. इंडोनेशियाला संदेश

(हा संदेश बटाव्हिया येथील दैनिक 'मरडेका'च्या वार्ताहराजवळ दिला होता.व तो बटाव्हिया, डिसेंबर २८ या तारखेखाली प्रकाशित झाला होता.)

[डिसेंबर २८, १९४७पूर्वी] (वरील टिपेप्रमाणे)

सध्या परिस्थिती फारशी चांगली दिसत नसली तरी यश तुमच्या दाराशी उभे आहे. बाहेरून कोणाचीही सहानुभूती मिळत नसतानाही भारत तीस वर्षे संघर्ष करत होता.

आशियातील इतर लोकांशी जवळचे संबंध प्रस्थापित करण्याकरिता इंडोनेशियाने विशेष प्रयत्न केले पाहिजे असा सल्ला महात्मा गांधींनी दिला.

मद्रासमध्ये होणाऱ्या महिला परिषदेकरिता आलेल्या इंडोनेशियातील महिला प्रतिनिधींना गांधीजी म्हणाले -

अस्वस्थ होऊ नका. विजय दृष्टिपथात आहे.

'द हिंदू', डिसेंबर २९, १९४७

---

१०७. वालजी गो. देसाई यांना पत्र

डिसेंबर २८, १९४७

चि. वालजी,

अगदी सकाळीसकाळीच मी तुझे लेख वाचले. त्यांतील एकही लेख मला प्रकाशित करण्यासारखा वाटला नाही हे वाचून तुला आश्चर्य वाटेल. खेड्यावरील तुझा लेख आपल्याकडील खेड्यांच्या परिस्थितीला लागू होत नाही. त्यातील काही निवडक परिच्छेद प्रकाशित करता येतील. कोल्हा आणि ससा या गोष्टीत विशेष काही नाही. असे दिसते की तू ढाका पाहिलेले नाही. तिथे घोड्यांच्या शर्यती थांबवल्या तरी त्याचा कलकत्त्यावर काहीही परिणाम होणार नाही. हिरोशिमा आणि आपल्याकडे नवीन घरे बांधण्याची तुलना होऊ शकत नाही. तू ज्या विषयावर लिहितोस त्यात खोलवर शिरायला पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. ७५०९. सौजन्य - वालजी गो. देसाई

---

१०८. शांतिकुमार मोरारजी यांना पत्र

नवी दिल्ली

डिसेंबर २८, १९४७

चि. शांतिकुमार,

कुमारप्पांनी उत्तर दिल्यानंतर (जे. सी. कुमारप्पा यांनी "अ रडरलेस शिपिंग प्रोग्रॅम" म्हणजे तत्त्वविहीन जहाजराणी योजना या आपल्या लेखात सरकारच्या जहाज उद्योगाच्या नीतीची समीक्षा करत लिहिले की तिच्यात योजनेचा आणि संघटनेसंबंधी योग्य विचार करण्यात आलेला नाही. या प्रश्नावर सावधगिरीने खोलवर विचार करून कार्यवाही करण्याची आवश्यकता आहे. योजना तयार करताना त्या क्षेत्रातील वेगवेगळ्या हितांचा सरकारने विचार केला पाहिजे.) तुमचे पत्र प्रकाशित करण्याची आवश्यकता आहे असे मला वाटत नाही.

मला तुमचे महादेवसंबंधीचे (महादेव देसाई स्मारक ट्रस्ट. महात्मा गांधीनी नामित केलेल्या तीन विश्वस्तांमध्ये वालजी गो. देसाई एक होते.) पत्र मिळाले.तुम्ही सुचवल्याप्रमाणे ते हरिजनमध्ये प्रकाशित होईल. (हा लेख महादेव देसाई मेमोरिअल ट्रस्ट या शीर्षकाखाली मे ९, १९४७च्या हरिजनच्या अंकात प्रकाशित झाला होता.) तुम्ही ज्या दोन भागांबद्दल मत मागितले ते "होय". आहे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. सी. डब्ल्यू. ४७४१. सौजन्य - शांतिकुमार न. मोरारजी

---

१०९. कापड व्यापाऱ्यांच्या सभेत भाषण

दिल्ली,

डिसेंबर २८, १९४७

बंधूंनो,

तुम्ही जर शांत राहाल तर तुम्ही माझे भाषण ऐकू शकाल. मी इथे केवळ एका गोष्टीकरिता आलो आहे आणि ती म्हणजे नियंत्रणावर दोन शब्द बोलण्याकरिता. धान्यावर लावलेले नियंत्रण चुकीचे आहे असे मला वाटते. त्यामुळे भारताचे कोणतेही कल्याण होऊ शकत नाही. कापडावरील नियंत्रणही गेले पाहिजे. आपला देश जर स्वतंत्र देश असेल तर नियंत्रणांची आवश्यकता काय? जवाहरलाल, सरदार आणि इतर जनतेचे सेवक आहेत. जनतेच्या इच्छेविरुद्ध ते काहीही करू शकत नाहीत. आपण जर त्यांना पदावरून पायउतार व्हायला सांगितले तर ते पदावर राहू शकत नाहीत. त्यांनासुद्धा पदावर राहण्याची उत्कंठा नाही. आम्ही जनतेचे सेवक आहो आणि जनतेकरिता आम्ही काम करतो असे ते नेहमी म्हणत असतात. हे खरेसुद्धा आहे. आपण ब्रिटिशांशी ३२ वर्ष संघर्ष केला आणि खरी लोकशाही कसे काम करते हे त्यात आपण दाखवून दिले. आपली शक्ती ब्रिटिशांसारखी नाही. ते इंग्लंडहून सैन्य बोलावू शकत होते. आपल्याजवळ तसे काही नाही. परंतु सैनिकीशक्तीपेक्षाही आपल्या मंत्र्यांजवळ जास्त शक्ती आहे. जवाहरलाल, सरदार पटेल आणि इतरांच्या पाठीशी जनमताची शक्ती आहे आणि ती सैन्याच्या वा पोलिसांच्या शक्तीपेक्षा मोठी आहे.

नियंत्रण आणण्याची आवश्यकता का असते? व्यापारी नफाखोरी आणि खोटेपणा करतील या भीतीमुळे नियंत्रण आणावे लागतात. मजुराला आपल्या श्रमाची जितकी मजुरी मिळेते त्यापेक्षा जास्त व्यापाऱ्याला का मिळावी? व्यापाऱ्यांनी जास्त घेऊ नये. व्यापाऱ्यांना जर हे कळले तर आज आपल्याला अन्नधान्य आणि कापड यांच्याबाबतीत ज्या समस्या भेडसावतात त्या भेडसावणार नाही. आपणा सर्वांना जर नियंत्रण नको असतील तर त्यांना जावेच लागेल. तुम्ही आणि मी जर प्रामाणिक असू तर हे नियंत्रण राहू शकत नाही. आपण जर प्रामाणिक नसू आणि तरीही नियंत्रण काढून टाकले तर त्यामुळे भारत मरून जाईल. व्यापारी आणि गिरणी मालकांनी भेटावे आणि त्यांनी लोकांच्या मनातील संशय दूर करून परस्परांचे हात बळकट करावे. गीता म्हणते, "देवान भावयतानेन ते देवा भावयन्तु वः" (अध्याय ३,

श्लोक ११). ईश्वर आकाशात आढळणार नाही. ज्याप्रमाणे आपण आपल्या मुलींना देवी मानतो त्याचप्रमाणे आपणही इश्वर असतो. परंतु कोणीही स्वतःला भगवान न म्हणणे चांगले. ही माणसाची नम्रता होईल. आपण ईश्वराप्रमाणे पवित्र झालो पाहिजे आणि सुखासमाधानात राहिलो पाहिजे. असे झाले की आपली गरिबी, उपासमार आणि नग्नावस्था नाहीशी होईल.

जोपर्यंत कापडाचा संबंध आहे खेड्यातील लोक स्वतःला आवश्यक तितके कापड स्वतः निर्माण करू शकतात, नाही, निर्माण केले पाहिजे. आपल्या स्त्रिया जेव्हा आपल्या पवित्र हातांनी सूतकताई सुरू करतील तेव्हा करोडो रुपये गावातील लोकांच्या खिशात जातील. आपण अशा प्रकारचा व्यवसाय केला पाहिजे. मी स्वतःला शेतकरी, भंगी आणि व्यापारी समजतो. प्रामाणिकपणे व्यापार कसा करावा हे तुम्ही माझ्याकडून शिकायला पाहिजे. व्यापार कसा करावा हे मला माहीत आहे. अखेरीस मी वकील होतो. वकिली व्यवसाय एक प्रकारचा व्यापारच नाही काय? आज मी जेव्हा इतरांची सेवा करतो तेव्हा एक प्रकारचा व्यवसायच करतो. कसेही करून पैसा मिळवणे म्हणजेच काही व्यापार नाही. स्वतःकरिता नाही तर जनतेच्या हिताकरिता नियंत्रण दूर व्हावे असे जर तुम्हाला वाटत असेल तर ते निश्चितच जातील. नियंत्रण दूर करण्यातच भारताची प्रगती आणि स्वातंत्र्य आहे असे तुम्ही तुमच्या फलकावर लिहिले आहे. हे जर खरे असेल तर तुम्ही तुमच्या व्यवहारात प्रामाणिक आणि शूर असायला पाहिजे.

आजकाल पैसा मिळवण्याकरिता व्यापारी विदेशी कापड आयात करतात. परंतु आपण स्वदेशी कापडाची निर्यात करून विदेशी कापडाची आयात का केली पाहिजे? जे काही कापड आपण निर्माण करतो त्यावर आपण भागवले पाहिजे. आपल्या गरजा पूर्ण झाल्यानंतर जे काही शिल्लक राहील त्याचीच निर्यात केली पाहिजे. तुम्ही गिरणीत तयार झालेल्या कापडाचीही निर्यात करू शकता परंतु आपल्या देशात गरजेपुरती खादी तयार झाल्यानंतरच तुम्ही तसे करू शकता. कापडावरील नियंत्रण जायलाच पाहिजे परंतु त्याचबरोबर पेट्रोल, कोळसा, आणि इतर गोष्टींवरील नियंत्रणही गेले पाहिजे.

इथे तुम्ही लिहिले आहे की "गिरणी मालकांच्या चलाखीपासून सावध राहा". असे असेल तर तुम्हाला व्यापाऱ्यांच्या चलाखीपासून व माझ्याही चलाखीपासून सावध असायला पाहिजे. मी जर तुमची फसवणूक करत असेन तर वा जनसेवेच्या नावाखाली माझ्या स्वतःच्या हिताचे मी जतन करत असेन

तर तुम्ही माझा गळा कापला पाहिजे. गिरणीमालक आणि व्यवसायी जर स्वतःचा स्वार्थच साधत असतील तर तुम्ही त्यांच्यावर बहिष्कार टाकला पाहिजे.

हिंदीवरून. 'हरिजन सेवक', जानेवारी ४, १९४८

---

११०. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर २८, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आज मी कापड व्यापाऱ्यांच्या सभेकरिता गेलो होतो (पाहा याआधीचा विषय). इतर अनेक गोष्टींप्रमाणेच कापडसुद्धा निर्नियंत्रित झाले पाहिजे असे त्यांचे म्हणणे आहे. कापडावरील नियंत्रण उठवण्यात आले पाहिजे याबद्दल मला मुळीच संशय नाही. सभेत काय झाले ते वृत्तपत्रातून तुम्ही पाहिले असेल. नियंत्रण असतानासुद्धा कापडाचे भाव उतरू लागले आहेत. याचे कारण लोकांचे असे मत झाले आहे की गांधी लोकांचा आवाज सरकारपर्यंत पोहोचवतो व त्यामुळे कापडावरील नियंत्रण लवकरच उठेल. यामुळे चोरबाजारातील कापड उघड्या बाजारात आले व कापडाचे भाव उतरू लागले आहेत असे व्यापारी मला सांगत होते.

असेच साखरेबद्दलही घडत आहे. असे सांगतात की जिकडे जावे तिकडे साखरेचे ढीग लागलेले आहेत. तिथून सर्व लोक साखर घेऊन जातात. एक रुपया भावाने घेतात. काही लोक म्हणतात की या भावाने आम्ही घेऊ शकत नाही. मग १५ आणे ठीक आहे, चौदा आणे ठीक आहे असे म्हणतात. निर्नियंत्रामुळे भाव उतरले व त्यामुळे लोक थोडे आरामात राहू शकतात अशा आशयाच्या तारा मला येत आहेत. परंतु याकरिता मला नाही तर करोडो लोकांना धन्यवाद दिले पाहिजे कारण मी त्यांचाच आवाज उठवत होतो. आणि म्हणूनच माझा आवाज ऐकला जातो. असे नसते तर माझे कोणी ऐकले असते? माझ्या एकट्याच्या आवाजाला काहीही महत्त्व नाही.

जेव्हा मी म्हणतो की मुसलमानांना शत्रू समजू नका. तेव्हा लोक माझ्याकडे पाहायला तयार नसतात. ते मला वेड्यात काढतात. जनता जर माझे ऐकणार नसेल तर ते त्यांच्या धर्माची हानी करतील हे मी तुम्हाला सांगायलाच पाहिजे. मी काहीही चुकीचे सांगत नाही. मी जर तुम्हाला नेहमी हितकारक सांगत असेन तर आताच मी तुम्हाला चुकीचे का सांगेन याचा तुम्ही विचार केला पाहिजे. मी कधीही चुकीचे सांगत नसतो. यात चुकीचे सांगण्यासारखे काय होते? दया धर्माचे मूळ आहे असे जे मी सांगतो ते तुलसीदासांनीच सांगितलेले आहे. तुलसीदास म्हणतात की दया धर्म का सार है. करुणा धर्माचे सार

आहे. तुलसीदासला म्हणा की तू वेडा आहेस. परंतु तुलसी रामयणाइतके दुसरे कोणतेही पुस्तक लोकप्रिय नाही. ते केवळ बिहार आणि दिल्लीतच लोकप्रिय नाही तर ते सर्वत्र वाचले जाते. तुलसीदास जे म्हणाले होते त्याचा मी केवळ पुनरुच्चार केला होता. मी केवळ त्यांचे काम करत होतो. त्यांनी सांगितलेलेच मी सांगत होतो. यात मला पागल म्हणण्यासारखे काय आहे? ते असे का म्हणतात?

इंधनावर काय नियंत्रण ठेवायचे? ती काही खायची गोष्ट तर नाही की मिळाली तर लोक खाऊन टाकतील म्हणजे लाकूड जाळून टाकतील. मग त्याच्यावर नियंत्रण का? ते तितकेच इंधन जाळतील जितक्याची त्यांना गरज आहे. जोपर्यंत लाकडावरील नियंत्रण हटत नाही तोपर्यंत माझे समाधान होणार नाही. आज लाकूड मिळणे इतके कठीण झाले आहे की लोकांना त्याचा त्रास होऊ लागला आहे.

लोक वरून मला सांगतात की तुम्ही इतके केले आहे तर पेट्रोलवरील नियंत्रण उठवायला सांगा. मी तर म्हणेन की पेट्रोलवरील नियंत्रणही दूर झाले पाहिजे आणि उद्यापासूनच दूर झाले पाहिजे. असे झाले तरच आपले हित होईल. पेट्रोलवरील नियंत्रण दूर झाले तर जास्त मोटारी चालतील. यामुळे गरिबांचे नुकसान होणार नाही, फायदा होईल. रेल्वेगाड्या जास्त चालल्या तर अर्थातच पेट्रोल तितके लागणार नाही. परंतु रेल्वेचे रूळ टाकण्याकरिता करोडोंचा खर्च येतो. जास्त रेलवेगाड्या धावायच्या तर जास्त खर्च येतो. परंतु जितक्या आहेत तितक्यांचा तर चांगला उपयोग होऊ द्या. जास्तीच्या गाड्यांचे काय कराल? जे काही आपल्याजवळ आहे त्याचा आपण जास्तीत जास्त चांगला उपयोग केला पाहिजे. आज आपल्याजवळ पुरेशा रेल्वे आहेत. एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी जाण्याकरिता पुरेसे रस्ते आहेत. आपल्याजवळ केवळ पेट्रोल नाही. आज आपल्याला रेल्वेच्या दळणवळणाची गरज नाही, सडकेने होणाऱ्या वाहतुकीची गरज आहे. मला खात्री आहे की पेट्रोलवरील नियंत्रण उठले तर सडकेवरील वाहतूक वाढेल. नियंत्रण काढले तर चोहोकडील किंमती उतरतील. नियंत्रण काढून घेण्यात आलेल्या एकाही वस्तूची किंमत वाढलेली दिसत नाही. असे नसते तर मला इतक्या सगळ्या तारा मिळाल्या नसत्या. पेट्रोलच्या निर्नियंत्रणामुळे आणि रस्त्याची वाहतूक वाढल्यामुळे कापड आणि धान्य एका ठिकाणावरून दुसऱ्या ठिकाणी पाठवणे सोपे होईल. मीठसुद्धा सहजपणे उपलब्ध होऊ शकेल. मिठाची किंमत सर्वात आधी कमी होणे गरजेचे आहे. मिठावरील कर रद्द करण्यात आला आहे, परंतु मिठाची किंमत वाढली आहे. हे चूक आहे. आपण मीठ तयार करणे शिकलो नाही. आपल्याजवळ फार मोठा समुद्र किनारा आहे. त्यामुळे आपल्याला मिठाचा तुडवडा पडायला नको. समुद्राच्या

पाण्यापासून लहान मूलसुद्धा मीठ तयार करू शकते. मी जर बंगालच्या उपसागरातून थोडेसे पाणी आणले तर त्याच्यापासून मी सहजपणे मीठ तयार करू शकेन. मिठाकरिता इतकी किंमत द्यावी लागावी आणि इतका त्रास घ्यावा लागावा हे दुर्दैव आहे. याचे कारण एकच आहे. मीठ जिथे तयार होते तिथून दुसरीकडे सहजपणे त्याची वाहतूक करता येत नाही. हेच मीठ महाग असण्याचे कारण आहे. मिठाच्या वाहतूकीकरिता ठेकेदार नेमण्यात चूक झाली हे मला माहीत आहे. ते अप्रामाणिकपणा करतात आणि भरपूर पैसा कमावतात. इतरांना मिठाची वाहतूक करता येत नाही. ही ठेकेदारीची पद्धत बदलली पाहिजे व मिठावरील नियंत्रण उठवले पाहिजे. दोन गोष्टी आवश्यक आहेत - एक ठेकेदारी पद्धतीत बदल आणि दुसरी सडकेद्वारे दळणवळणाची व्यवस्था दुरुस्त करणे. आजकरिता इतके पुरे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २४७-९

---

१११. वस्तूंचा योग्य उपयोग

सेंद्रीय खतात काडीकचरा आणि मलमूत्र यांचा योग्य उपयोग होतो. या गोष्टी घन वा द्रव स्वरूपात जनतेकरिता गैरसोयीच्या असतात आणि आरोग्याकरिता हानिकारक. असे असूनही त्या इकडेतिकडे टाकून देण्यात येत असतात. अशा प्रकारे त्यांचा उपयोग चुकीच्या ठिकाणी होतो. भूमातेला तिच्या मूल्यवान आहारापासून वंचित ठेवणे हा अपराधपूर्ण व्यय आहे. नोव्हेंबर २३, १९४७च्या हरिजनच्या अंकातील पृष्ठ ४२८-९वर संपूर्ण परिपत्रक दिले आहे. (पाहा "हाऊ टू ग्रो मोर फुड", हरिजन, नोव्हेबर २३, १९४७) मीराबेनने यासंबंधी लिहिले आहे की -

आपण भूमातेची योग्य काळजी घेत नाही. आपणा सर्वांचे पोट भरावे म्हणून ती आपल्याकडून सर्व काही करते, परंतु त्याच्या मोबदल्यात आपण मात्र तिची परतभेड करत नाही. कर्तव्यदक्ष मुलांनी आपल्या आदरणीय आईची ज्याप्रमाणे सेवा केली पाहिजे त्याचप्रमाणे आपण भूमातेची सेवा करणार नाही तर ती आपल्या मुलांना म्हणजे आपल्याला खायला कसे देऊ शकेल? दर वर्षी आपण शेतीची लागवड करून तिच्यात बी पेरतो आणि पीक घेतो, परंतु जमिनीला क्वचितच खत देतो. आणि खत म्हणून जे काही देतो तेसुद्धा बहुधा अर्धवट काडीकचराच असतो. ज्याप्रमाणे आपल्याला चांगल्या प्रकारे शिजवलेल्या अन्नाची गरज असते त्याचप्रमाणे जमिनीला चांगल्या प्रकारे तयार केलेल्या खताची गरज असते.

जिज्ञासूंना त्याच्या पत्रकाची प्रत किसान आश्रम, हृषिकेश, हरिद्वार जवळ येथून मिळू शकेल (डिसेंबर ८, १९४७ हरिजनमधील नोंदीनुसार त्यांचा बरोबर पत्ता आश्रम पशुलोक, हृषिकेश, डेहराडून, संयुक्त प्रांत असा होता.)

नवी दिल्ली, डिसेंबर २९, १९४७

'हरिजन' जानेवारी ४, १९४८

---

११२. उर्दू हरिजन

वाचकांना माहीतच आहे की नागरी लिपी आणि उर्दू लिपीत 'हरिजन'च्या दोन आवृत्त्या निघत असतात. उर्दू लिपीत निघणारे उर्दू 'हरिजन' आहे. त्याच्या ढासळत्या परिस्थितीबद्दल जीवनजी लिहितात - (हे पत्र इथे उद्धृत करण्यात आलेले नाही. जीवनजींनी लिहिले होते की उर्दू 'हरिजन'चा खप १८०० प्रतींवरून अडीचशे प्रतींवर आला आहे आणि दरवर्षी वीस हजारांचा तोटा होतो.)

तोटा सहन करून कोणतेही वृत्तपत्र चालवू नये असे नेहमीकरिता माझे मत राहिले आहे. लोकांना ते वृत्तपत्र हवे असेल तर त्यांनी त्याकरिता वर्गणी भरली पाहिजे. ज्या नियतकालिकाचा तोटा जाहिरातींच्या मदतीने भरून निघतो त्या नियतकालिकांना मी स्वावलंबी समजत नाही. मी उर्दू 'हरिजन' तोट्यातही सुरू ठेवले कारण सर्व भाषांमधील हरिजन नियतकालिकांचा एकत्र खर्च वर्गणीपेक्षा जास्त येत नव्हता. परंतु त्यालासुद्धा एक सीमा असते. हिंदुस्तानी आणि दोन लिप्यांसंबंधीच्या माझ्या दृष्टिकोनात बदल झालेला नाही. उर्दू 'हरिजन' जसे निघत आहे तसेच अजून काही दिवस निघत राहील. मध्यंतरीच्या काळात 'हरिजन'च्या गुजराती वाचकांनी आणि इतरांनी उर्दू 'हरिजन' सुरू ठेवावे की नाही याचा विचार करावा. हे नियतकालिक सुरू ठेवावे असे त्यांचे मत असेल तर त्यांनी त्यांचे ग्राहक वाढवण्याकरिता तोपर्यंत मदत करावी जोपर्यंत त्याची ग्राहकसंख्या कमीतकमी २,०००पर्यंत पोहोचत नाही. याचबरोबर त्यांनी अजून एका मुद्द्याकडे लक्ष द्यावे. लोकांना जर उर्दू 'हरिजन' नको असेल व उर्दू आवृत्ती थांबवावी लागणार असेल तर देवनागरी 'हरिजन'ही (हरिजन सेवक) बंद करणे माझे कर्तव्य ठरेल. केवळ देवनागरी लिपीतील 'हरिजन' काढणे मला योग्य वाटत नाही. एक सुधारक म्हणून एक तर मी 'हरिजन' दोन्ही लिप्यांमध्ये काढले पाहिजे वा पूर्णपणे बंद केले पाहिजे.

या भाषेला हिंदुस्तानी का म्हणावे आणि हिंदी का म्हणू नये याबद्दल बरेच काही लिहिले गेले आहे. मला अजून कोणताही नवीन युक्तिवाद सुचत नाही. उर्दू 'हरिजन'चे प्रकाशन कसे सरू ठेवता येईल याची चर्चा करण्याकरिता मी हे लिहिले आहे. माझी आशा व्यर्थ ठरणार नाही असा मला विश्वास आहे.

नवी दिल्ली, डिसेंबर २९, १९४७

गुजरातीवरून. हरिजनबंधू, जानेवारी, ४, १९४८

---

११३. प्यारेलाल यांना पत्र

(दोन उपनिवेशात युद्ध झाले तर नोआखालीत कार्य करणाऱ्या कार्यकर्त्यांनी काय करावे आणि तेथील स्त्रियांना योजनाबद्ध पद्धतीने काढून आणण्याची व्यवस्था करावी काय असा प्रश्न प्यारेलाल यांनी गांधीजींना विचारला होता.)

डिसेंबर २९, १९४७

चि. प्यारेलाल,

प्रयत्न करत राहा. याची आठवण ठेव - तू जर माझा संदेश पचवला असशील तर जोपर्यंत तू मोकळा आहेस तोपर्यंत लोकांना आत्मरक्षण करायला शिकवत राहा. अहिंसेचे हे काम करत असताना तुला जर मृत्यू आला तर त्याला आलिंगन दे. ते जर तुला तुरुंगात टाकत असतील तर तू आमरण उपोषण करू शकतोस. ज्यांच्यात अशी शक्ती असेल ते स्त्रियांचे काय होईल याचा विचार न करता नोआखालीत राहू शकतात. कोणीही घाबरून पळून जाऊ नये. तुझी इच्छा असल्यास मला परत विचार.

गुजरातीवरून. 'महात्मा गांधी - द लास्ट फेज', खंड २, पृष्ठ ४९६-९७च्या मध्ये.

---

११४. प्रार्थना प्रवचन

(गांधीजींचे मौन असल्यामुळे हे प्रवचन वाचून दाखवण्यात आले.)

नवी दिल्ली,

डिसेंबर २९,१९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

काल हकीम अजमल खां यांच्या मृत्यूचा दिवस होता. हिंदुस्थानातील हिंदू, शीख, मुसलमान, ख्रिश्चन, पारसी, ज्यू इत्यादी सर्वांना ते प्रिय होते. ते कट्टर मुसलमान होते. परंतु या सुंदर देशात राहणाऱ्या प्रत्येकाची सेवा ते सारख्याच भक्तिभावाने करायचे. दिल्लीत काढण्यात आलेले तिब्बिया कॉलेज आणि रुग्णालय हे त्यांच्या श्रमाचे सर्वात सुंदर स्मारक आहे. तिथे सर्व प्रकारचे विद्यार्थी शिकायचे आणि तिथे युनानी, आयुर्वेद, आणि पश्चिमेतील चिकित्सा विज्ञानाचे शिक्षण दिले जात असे. या संस्थेत कोणत्याही प्रकारची सांप्रदायिकता नसूनही सांप्रदायिकतेच्या विषामुळे ही संस्था बंद पडली आहे. हे कॉलेज बनवणारे हकीम साहेब कितीही सज्जन व चांगले गृहस्थ असले व त्यांनी कितीही मानसन्मान मिळवलेला असला तरी ते मुसलमान असल्यामुळे हे कॉलेज बंद पडले असेच मला वाटते. हे कॉलेज बंद पडण्याकरिता याहून वेगळे कारण मला तरी दिसत नाही. या स्वर्गावासी देशभक्ताची आठवणसुद्धा हिंदू-मुसलमानांमधील वैमनस्य जरी दूर करणार नसेल तरी निदान आपण या महाविद्यालयाला नवजीवन तरी देऊ शकतो.

आपल्या सभा उघड्या आकाशाच्या मंडपाखाली व्हाव्या असे मी काल सुचवले होते. ही फार चांगली गोष्ट होईल. आपल्यामध्ये जर ही सवय रुजली तर या कामाकरिता विचारपूर्वक जागा वगैरेची व्यवस्था करावी लागेल. याकरिता लहानमोठ्या शहरांमध्ये पटांगणे लागतील. आपल्याला आपल्या सवयी बदलाव्या लागतील. गोंगाट करण्याऐवजी शांततेने पद्धतशीरपणे बसणे शिकावे लागेल. आवश्यक असेल तेव्हाच आपण बोललो पहिजे आणि तेही प्रसंगानुरूप. फार हळू नाही, फार जोरात नाही. आपण आपल्या शेजाऱ्यांच्या अधिकाराचा आदर केला पाहिजे व व्यक्तिगत पातळीवर वा सामूहिक पातळीवर आपण इतरांच्या मार्गात यायला नको. इतरांच्या कामात आपण हस्तक्षेप करू नये. या सर्व गोष्टींकरिता अनेकदा फार मोठा आत्मसंयम लागेल. अशी सामाजिक व्यवस्था झाली तर

दिल्लीच्या या सर्वात जास्त घाईगर्दीच्या रस्त्यात आज जी धूळ व गोंगाट दिसतो तो दिसणार नाही व कितीही जास्त गर्दी असली तरी ढकलाढकल वा बाचाबाची वा गोंधळ आढळणार नाही. अशी परिस्थिती कधीही निर्माण होऊ शकणार नाही असा विचार आपण कधीही करायला नको. कोणत्या तरी एखाद्या गटाने या कामाची जबाबदारी घेतली पाहिजे व त्याकरिता प्रामाणिकपणे काम केले पाहिजे. असे केले तर किती शक्ती आणि पैसा वाचेल याचा विचार करा.

काश्मीर व तेथील महाराज यांच्याबद्दल मी जे काही म्हणालो (पाहा "प्रार्थना प्रवचन" डिसेंबर २५, १९४७) त्याबद्दल माझी फार जोरदार खरडपट्टी काढण्यात आली आहे. माझ्यावर टीका करणारांनी मी जे काही म्हणालो ते नीटपणे वाचले नाही असे दिसते. एखादा अतिशय नम्र माणूस देईल तसा माझा सल्ला होता. प्रसंगोपात असा सल्ला देणे हे माणसाचे कर्तव्य होत असते. महाराज जर माझ्या सल्ल्याप्रमाणे वागले असते तर त्यांच्या स्वतःच्या आणि जगाच्या दृष्टीत त्यांचा मानसन्मान वाढला असता. आजची त्यांची आणि त्यांच्या संस्थानाची अवस्था फारशी स्पृहणीय नाही. काश्मीरमध्ये बहुसंख्य मुसलमान असूनही काश्मीर हिंदू संस्थान आहे. घूसघोर त्यांच्या घूसखोरीला जिहाद म्हणतात. ते म्हणतात की काश्मीरच्या हिंदू राजाच्या अत्याचाराखाली तेथील मुसलमान पायदळी तुडवले जात आहेत व त्यांच्या रक्षणाकरिता आम्ही आलो आहो.

महाराजांनी शेख अब्दुल्लांना अगदी योग्य वेळी आमंत्रित केले. शेख अब्दुल्लांकरिता हे काम नवीन आहे. ते या कामाकरिता योग्य आहेत असे जर महाराज समजत असतील तर त्यांना प्रत्येक बाबतीत प्रोत्साहन मिळाले पाहिजे. शेख अब्दुल्ला अल्पसंख्याकांना आणि बहुसंख्याकांना जर आपल्याबरोबर ठेवू शकणार नसतील तर ते काश्मीरला केवळ सैनिकी शक्तीने वाचवू शकणार नाहीत हे मला आणि बाहेरच्या जगालाही स्पष्टपणे दिसते. महाराज आणि शेख अब्दुल्ला या दोघांनीही भारताची सशस्त्र मदत मागितली आहे.

इंग्लंडच्या राजाप्रमाणे काश्मीरच्या महाराजांनी केवळ घटनात्मक प्रमुख व्हावे असा माझा त्यांना सल्ला आहे व त्यांनी आपले सरकार व डोगरा सैन्य (जम्मू आणि कास्मीर संस्थानाचे सैन्य) यांना शेख साहेब व त्यांचे मंत्रिमंडळ यांच्या सल्ल्याप्रमाणे चालवावे. यात विचित्र असे काय आहे? काश्मीरच्या संघराज्यातील विलीनीकरणाच्या अटी तशाच राहतील. त्या अटींनी महाराजांना काही अधिकार दिले

आहेत. महाराजांनी त्या अधिकारांचा स्वतःहोऊन त्याग करावा, हिंदु संस्थानिक म्हणून घटनात्मक प्रमुखाची भूमिक घ्यावी असा त्यांना सल्ला देण्याचे साहस मी केले आहे.

मला मिळालेले वृत्त चुकीचे असेल तर माझी चूक दुरुस्त करण्यात यावी. हिंदू धर्म आणि त्यानुसार राजाचे कर्तव्य याबद्दलच्या माझ्या कल्पना जर चुकीच्या असतील तर माझ्या म्हणण्याला काहीही अर्थ नाही. आणीबाणीतील प्रशासक म्हणून अथवा एक चांगला मुसलमान म्हणून जर शेख अब्दुल्ला आपल्या कर्तव्यात कमी पडत असतील तर त्यांनी स्वतःहोऊन बाजूला व्हावे आणि जो कोणी अधिक चांगला प्रशासक असेल त्याच्या हाती त्यांनी सत्तेची सूत्रे द्यावी. आज काश्मीरच्या भूमीवर हिंदूधर्म आणि इस्लामची परीक्षा होत आहे. जर दोघेही योग्य पद्धतीने काम करतील तर सर्व मुख्य कार्यकर्त्यांना यश मिळेल आणि त्यांचे यश, नाव आणि प्रतिष्ठा कोणीही हिरावून घेऊ शकणार नाही. देशातील आजच्या काळोखाच्या अवस्थेत काश्मीर प्रकाश देणारा तारा व्हावा हीच माझी प्रार्थना आहे.

महाराज आणि शेख साहेब यांच्याबद्दल इतके पुरे. पाकिस्तान सरकार आणि संघराज्य एकत्र येऊन हिंदुस्थानातील काही निष्पक्ष लोकांच्या मदतीने याबाबतीत तोडगा काढू शकणार नाही काय? हिंदुस्थानात एकही निष्पक्ष माणूस नाही काय? इतक्या मोठ्या प्रमाणत आपण दिवाळखोर झालो नाही अशी माझी खात्री आहे.

मथुरेतील एका भगिनीने कांबळी विकत घेण्याकरिता मला ५० रुपये पाठवले आहेत. मलासुद्धा आपले नाव सांगण्याची त्या भगिनीची इच्छा नाही. या रकमेची पोच मी प्रार्थना सभेत द्यावी अशी त्यांची इच्छा आहे. त्याप्रमाणे मी त्यांच्या रकेमीची साभार पोच देतो.

आश्चर्याची गोष्ट ही आहे की ज्या संस्थानिकांनी भारतात सामील होण्याची इच्छा व्यक्त होती ते आता तारा पाठवून तक्रारी करत आहेत. जर एखाद्या राजाला वा जमीनदाराला आपण एकट्याने आपला कारभार चालवू शकत नाही असे वाटत असेल तर त्याला वेगळे राहण्याकरिता कोण भाग पाडत आहे? जे लोक अशा तारांवर पैसा खर्च करतात त्यांनी आपला पैसा व्यर्थ खर्च करू नये असा सल्ला मी त्यांना देईन. असे दिसते की या तारांमागे जे कोणी आहेत त्यांना आपली पोळी भाजायची आहे. त्यांनी गृहविभागाच्या सचिवांकडे जाऊन सल्ला घ्यावा. विशेषेकरून डाक आणि तार विभागातील अनेक मुसलमान कर्मचारी म्हणतात की प्रचाराकरिता आधी आम्ही भारतीय संघराज्यात

राहण्याचा विकल्प मान्य केला होता. परंतु आता आम्हाला तो विकल्प बदलायचा आहे. अनेक मुसलमानांना नोकरीवरून बरखास्त करण्यात आले आहे. मला असे वाटते की ते हिंदूविरोधी असल्याच्या संशयामुळे असे करण्यात आले असावे. मला त्यांच्याबद्दल सहानुभूती वाटते. परंतु मला वाटते की त्यांना कामावरून काढणे वैयक्तिक पातळीवर कितीही अन्याकारक असले तरी तरी ते क्षम्य समजण्यात आले पाहिजे व त्यांनी आपल्या रागावर नियंत्रण ठेवावे. मी तर यावर माझा नेहमीचाच उपाय सांगू शकतो. फार कमी लोकांना सरकारी नोकरी मिळू शकते. सरकारी नोकरी मिळवणे हा माणसाच्या जीवनाचा उद्देश कधीही असू शकत नाही. माणसाच्या जीवनाचे उद्दिष्ट प्रामाणिकपणे जीवन जगणे आहे. माणसाची जर हातपाय हलवण्याची म्हणजे मेहनत करण्याची इच्छा असेल तर प्रामाणिकपणे जगण्याचा मार्ग त्याला केव्हाही सापडेल. मला वाटते की मुसलमानांना जर आपला स्वाभिमान टिकवायचा असेल तर त्यांनी सरकारी नोकरी मिळाली नाही तर ती मिळवण्याकरिता पाकिस्तानमध्ये जाण्याची इच्छा ठेवण्याच्या सीमेपर्यंत धावपळ करू नये. मनोभावे सेवा केल्याने सत्ता मिळते. बहुधा सत्ता मिळाल्यामुळे माणसाचा अधःपात सुरू होतो. तिच्याकरिता भांडण्यात शोभा नाही. त्याचबरोबर मोठ्या संख्येतील बेकार लोकांकरिता काम निर्माण करणे सरकारचे काम आहे. हे काम कौशल्याने पार पाडले तर सरकारकरिता ते ओझ्यासारखे तर होणारच नाही उलट त्यामुळे सरकारचा लाभच होईल. मी असे गृहीत धरतो आहे की ज्या लोकांकरिता काम पाहायचे आहे त्याची शरीरप्रकृती चांगली आहे व ते कामाची टाळाटाळ करणारे नसून त्यांना काम करण्याची इच्छा आहे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन -२', पृष्ठ २४९-५३

---

११५. होशा रशीद यांना पत्र

(अमतुलसलाम यांचे भाऊ अबदुल रशीद खान यांची पत्नी)

डिसेंबर ३०, १९४७

प्रिय बेटी (हे संबोधन हिंदीत आहे.),

तू मूर्ख आहेस. तुझी हिंदुस्तानी कितीही अपूर्ण असती तरी मी तिचे स्वागत केले असते. यातील तर तुझी अक्षरेसुद्धा मला वाचायला त्रास होतो आहे. आपण भेटू तेव्हा यासंबंधी अधिक. तुझ्या मित्रांबरोबर ये आणि तुझी त्रास सहन करण्याची इच्छा असेल तर माझ्याबरोबर राहा.

अमतुल सलाम मला बरेचदा लिहीत असते. मी तुला तिचे पत्र पाठवतो. तिला आनंद होईल.

स्नेह,

बापू

बेगम रशीद,

१७, यशवंत निवास रोड,

इंदोर

इंग्रजी प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

११६. जीवनजी डा. देसाई यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

चि. जीवनजी,

या वेळी मी फार कमी इंग्रजी साहित्य पाठवत आहे. मला वाटते की गुजराती साहित्य पुरेसे आहे. सुंदरलाल यांचे हिंदी आणि इंग्रजी लेख मी पाठवत आहे. तुझी इच्छा असेल तर तू त्यांचे भाग करू शकतो. मला वाटले तर उद्या मी काही तरी पाठवीन. उर्दूच्या ('हरिजन') संबंधात मी काय केले ते तू पाहशील. (पाहा उर्दू 'हरिजन', डिसेंबर २९, १९४७)

आशीर्वाद,

बापू

गुजराती फोटोप्रतीवरून. जी. एन. ९९९०. शिवाय सी. डब्ल्यू. ६९६४. सौजन्य - जीवनजी डा. देसाई

---

११७. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

चि. बबुडी,

तू धीर सोडू नकोस. सुशीलाच्या (डॉ. सुशीला नाय्यर) सूचनांप्रमाणे वाग. एकदा का आपण आपल्याला डॉक्टरच्या हाती सोपवले की तो म्हणतो तसे केले पाहिजे. कोणीही भविष्य सांगू शकत नाही. कोणीही अंदाज करण्यापेक्षा जास्त काही करत नसतो. असे असल्यामुळे एका मार्गाने प्रयत्न करत राहणे हाच उत्तम उपाय राहतो. इच्छा नसताना दडपणाखाली काहीही करू नको. सर्व काळजी सोडून दे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. १००८२. सौजन्य - शारदा गो. चोखावाला

---

११८. चिमणलाल न. शाह यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

चि. चिमणलाल,

हिंदुस्तानी प्रचाराकरिता (सभा) ५०,००० रुपये ठरवले आहेत. ही रक्कम नानावटीला (अमृतलाल टी. नानावटी) दे. त्यांना सचिव नियुक्त करण्यात आले असल्याचे तुला माहीतच असेल.

शारदाच्या प्रकरणी काय होते ते पाहू. सुशीला तिथे पोहोचत आहे. ती निर्णय घेईल.

चंपाच्या (चंपा र. मेहता) प्रकरणासंबंधीचा निर्णय मी तुझ्यावर सोडतो. तिने आश्रम सोडणे योग्य राहील असे मला वाटते. परंतु जबाबदारी मात्र तुला घ्यावी लागेल. तुला जर ही जबाबदारी मोठी वाटत असेल तर तुझे हृदय कठोर कर आणि तिला स्पष्टपणे 'नाही' सांग. मी निर्णय न घेणे हे सर्वांकरिता हितकारक राहील.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

११९. मोरारजी देसाई यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

भाई मोरारजी,

सोबत बाळूभाईंचे पत्र आणि कात्रण आहे. कृपाकरून आवश्यक ते करा आणि तुम्हाला काही सांगायचे असेल तर मला लिहा. पत्रात लिहिलेली माहिती बरोबर असेल तर तक्रार करण्याला काही अर्थ आहे.

शहरी भागातून धान्यावरील नियंत्रण उठले तर ते योग्य होईल काय? यासंबंधात दुसरे पत्र श्रीलाल यांनी पाठवले आहे आणि तेही सोबत जोडले आहे. तिसरे पत्र बोरिवलीहून आहे. ते दुधासंबंधी आहे. त्याकडेही लक्ष द्या. पत्राचा उपयोग केल्यानंतर माझ्याकडे परत पाठवा.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

---

१२०. रामदास गांधी यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

चि. रामदास,

हे पत्र तर असेच लिहिले आहे. ईश्वर कृपेने सेवाभावनेत तुम्हा सर्वांची प्रगती होवो. यात सर्व काही येते. आणि याकरितासुद्धा तुझी प्रकृती एकदम चांगली असली पाहिजे.

आशीर्वाद,

बापू

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य प्यारेलाल

---

१२१. हर्षदराम यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

भाई हर्षदराम,

२४ तारखेला मला पाठवलेले आणि २१ तारखेला डॉक्टर मेहतांना पाठवलेले अशी दोन्ही पत्रे मला मिळाली. तुम्ही जे म्हणता ते बलसारियासुद्धा लिहितात. मला जे जे पत्र लिहितात त्यातून बच्छराजचे काम कोण सांभाळते हे मला कळत नाही. तुम्ही सर्व एक संघ म्हणून काम करता की वेगवेगळे? तुम्ही लोकांनी वेगवेगळे काम करायला नको. सेवेच्या कामात सर्वांनी एक होऊन काम केले पाहिजे. वल्लभरामकडून तुम्ही किती भाडे घेतले पाहिजे हे मला इथून सांगता येऊ शकत नाही. यामुळेच मला 'योग्य ते' वा त्या अर्थाचे शब्द वापरावे लागतात.

आधी काही पत्र आल्याचे मला आठवत नाही.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१२२. अमतुलस्सलाम यांना पत्र

डिसेंबर ३०, १९४७

बेटी अमतुल सलाम,

तुला हे पत्र वाचून आनंद होईल. मी तुला येण्याकरिता परवानगी देतो. पतियाळाचे महाराज मला भेटले. मी त्यांना तुझ्या कुटुंबाबद्दल सांगितले. काय होते ते आपण पाहू या.

आशीर्वाद,

बापू

हिंदी फोटोप्रतीवरून. जी. एन. ५९३

---

१२३. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ३०, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

आपण किती सुसंस्कृत झालो पाहिजे हे मी तुम्हाला काल सांगितले होते. मी तुम्हाला काल सांगितले होते की कोट्यवधी माणसे असली तरी पूर्ण शांतता राहील अशा प्रकारे आपण बोललो पाहिजे, चाललो पाहिजे. आणि आपली वागणूक अशी असली पाहिजे की लाखो लोक जरी असले तरी गोंधळ निर्माण व्हायला नको आणि गर्दी जाणवायला नको. असे सैन्यात होत असते. ते बाह्यतः शिस्तीचे पालन करत असतात. आत काय होते हा वेगळा प्रश्न आहे. आपल्याला अशा प्रकारचे प्रशिक्षण मिळालेले नाही. अनेकदा माझ्या लक्षात आले आहे की मी जेव्हा प्रार्थना संपवून जाऊ लागतो मला पाहण्याकरिता माझ्या बाजूला लोक गर्दी करतात. प्रार्थनासभा संपल्यानंतर प्रत्येकाने शांतपणे जायला पाहिजे. मी जे काही म्हणतो त्यात जे चांगले असेल त्याच्यावर घरी जाताना तुम्ही चिंतन केले पाहिजे.

मला बहावलपूरहून एक पत्र मिळाले आहे. याआधीही बहावलपूरबद्दल मी तुमच्याशी बोललो होतो. (पाहा प्रार्थना प्रवचन, डिसेंबर २३, १९४७) मी जे काही म्हणालो होतो ते तेथील लोकांना आवडले होते. एका बंधूंनी मला लिहिले की मी परत एकदा बहावलपूरबद्दल बोलावे. तेथील अनेक हिंदू आणि शिखांमध्ये इथे येण्याची शक्ती नाही. अजूनही तिथे भरपूर हिंदू आणि शीख आहेत. कोणत्याही अडथळ्याशिवाय त्यांना शांततापूर्वक इथे येऊ दिले पाहिजे. परततांना आपल्यावर हल्ला होऊ नये अशी त्यांची इच्छा आहे. माझ्या म्हणण्याचा काही परिणाम होतो की नाही ईश्वरालाच माहीत. तेथील नबाब साहेब तर म्हणतात की मला तर माझी सर्व प्रजा सारखी आहे. असे असूनही ते हिंदू आणि शिखांचा सांभाळ करू शकत नसतील तर ज्या कोणाला इथे यायची इच्छा असेल त्याला त्यांनी गाडीत बसवावे आणि इथे पाठवून द्यावे. सीमेपर्यंत त्यांना संरक्षण द्यावे. जोपर्यंत त्यांना आणण्याची व्यवस्था होत नाही तोपर्यंत त्यांच्या खाण्याची, कपड्याची व पांघरुणाची नीट व्यवस्था करावी. ते असे करतील अशी मला आशा आहे. आणि ते म्हणतात की त्यांना त्यांच्या सर्व प्रजेच्या कल्याणात सारखाच रस आहे. ते जेव्हा असे म्हणतात तेव्हा त्यांच्या हेतूवर संशय घेणारा मी कोण? तरीही मी त्यांना आणि त्यांच्या

अधिकाऱ्यांना विनंती करीन की ज्या हिंदूंना आणि शिखांना तिथे राहायचे नाही त्यांना परतायची परवानगी देण्यात यावी. त्यांना स्वतःबरोबर जितका काही पैसा अडका सोबत घेता येईल तितका घेऊ द्यावा आणि व भारतात येण्याची परवानगी द्यावी. त्यांनी इतके केले तरी पुरेसे होईल.

परंतु मी केवळ नबाब साहेबांनाच विनंती करून थांबणार नाही. मी कायदे आझम जिना आणि त्यांच्या सरकारलाही सांगेन की आजकाल हिंदू आणि शीख यांना सिंधमध्ये शांततापूर्वक राहणे कठीण झाले आहे. ज्या हिंदूंना अस्पृश्य म्हणतात त्यांचा विशेषेकरून छळ करण्यात येतो व त्यांच्याजवळ उपजीविकेचे कोणतेही साधन नाही. कमीतकमी त्यांना अपमानास्पद वागणूक देण्यात येऊ नये. तिथे राहण्यात ज्यांना समाधान वाटत नाही त्यांना निदान निघून जाण्याची परवानगी देण्यात यावी. सिंधमधील परिस्थिती पूर्ववत झाली आणि तिथे राहणारांचे जीवन सुखावह झाले तर जे सिंधमधून निघून गेले आहेत तेसुद्धा परततील. परंतु सध्या तशी परिस्थिती नाही. इतकेच नाही तर काठेवाडमधून गेलेल्या निर्वासितांकरिता त्यांच्या शाळासुद्धा ताब्यात घेण्यात आल्या आहेत. तेथील सरकारचे म्हणणे आहे की निर्वासितांच्या गरजेला सर्वाधिक प्राधान्य आहे. अशा परिस्थितीत तिथे हिंदू कसे राहू शकतील? याचा अर्थ असा होईल की पाकिस्तान इस्लामिस्तान झाले आहे आणि तिथे एकही मुसलमानेतर राहू शकत नाही वा केवळ गुलाम म्हणूनच मुसलमानेतर राहू शकतात. मला वाटते की कोणालाही गुलाम होऊन राहणे आवडत नाही. ही गोष्ट कोणाच्याही हिताची नाही. मला अजूनही बऱ्याच गोष्टी सांगायच्या आहेत आणि माझ्याजवळ केवळ पंधरा मिनिटेच आहेत.

मी तुमच्याशी पंढरपूरबद्दल बोललो होतो (पाहा प्रार्थना प्रवचन, नोव्हेंबर ५, १९४७). तिथे विठ्ठलाचे मंदिर आहे. महाराष्ट्रातील ते सर्वात मोठे मंदिर आहे. मी तिथे गेलो आहे. ते हरिजनांकरिता उघडावे अशी मी सूचना केली होती. यानंतर मंदिराच्या विश्वस्तांनीसुद्धा माझ्या मागणीला पाठिंबा दिला होता. हरिजनांकरिता मंदिर उघडण्यात आले ही बातमी जेव्हा मला कळली तेव्हा मी ती तुम्हाला सांगितली. सर्वांचे समाधान झाले असे दिसत होते आणि कोणाचाही विरोधी आवाज ऐकू येत नव्हता. आता ते सांगतात की दररोज अनेक हरिजन मंदिरात दर्शनासाठी येत असल्यामुळे ब्राह्मण पुजारी फार नाराज आहेत. काही पुजारी उपोषणावर गेले आहेत असे दिसते. हे ऐकून मला फार वाईट वाटले. मला आजच ही तार मिळाली आणि तिथे पोहोचण्याचा माझ्याजवळ इतर कोणताही मार्ग नसल्यामुळे या प्रकरणाचा इथे उल्लेख केला तर माझा आवाज पंढरपूरपर्यंत पोहोचेल असे मला वाटले. ज्या लोकांनी उपोषण

सूरू केले आहे व तरीही जे स्वतःला पुजारी म्हणवतात ते खरे पुजारीच नाहीत असे मी नम्रपणे आणि दृढतापूर्वक सागतो. आज तर ते लोकांना लुटत आहेत. ते ना तर स्वतःचे हित करतात ना धर्माचे. मंदिरातील मुर्ती विठ्ठलाची म्हणजे कृष्णाची म्हणजे विष्णूची आहे. काहींनी आपले दर्शन घ्यावे आणि इतर काहींनी नाही अशी विष्णूची इच्छा कधीही असू शकत नाही. देवाकरिता सर्व एक आहेत. जोपर्यंत हरिजनांना मंदिरात प्रवेश नव्हता तोपर्यंत माझ्या दृष्टिकोनातून ते मंदिर पवित्रच झालेले नव्हते. हे लोक आता का उपोषण करत आहेत? मंदिर प्रवेशासंबंधीचे विधेयक मंजूर झालेले आहे. हा कायदा करणारेसुद्धा हिंदूच होते. हे मंदिर हरिजनांकरिता उघडले पाहिजे असे करोडो लोक म्हणत असूनही हे मंदिर हरिजनांकरिता बंद राहिले पाहिजे असे हे लोक कसे काय म्हणू शकतात? यामुळे त्या पुजाऱ्यांनी आता माघार घेतली पाहिजे आणि आम्ही चुकलो होतो आणि आता आमचे डोळे उघडले असे म्हणून त्यांनी उपवास सोडला पाहिजे. ईश्वराच्या देवळात एकाला प्रवेश आहे आणि दुसऱ्याला नाही असे होऊ शकत नाही. ज्याप्रमाणे गंगेत आंघोळ केल्याने पापी माणसाचे पाप धुऊन निघतात त्याचप्रमाणे असे म्हणतात की या देवळात दर्शन घेतल्याने पापी माणसाचे पाप धऊन निघतात. गंगेच्या पाण्यात आंघोळ केल्याने माणसाचे पाप धुऊन निघतात यावर माझा व्यक्तीशः विश्वास नाही परंतु बरेच लोक असे मानतात. आणि गंगेत आंघोळ केल्याने आपले पाप धुऊन निघतील या श्रद्धेने जो गंगेत आंघोळ करतो कदाचित त्याचे त्यामुळे काही हित होतही असेल. आणि हरिजन पापी आहेत असे कोण म्हणू शकतो? हरिजनांमध्येही काही अतिशय गुणी लोक आहेत तसेच काही पापीही आहेत.

मुंबईबद्दल माझ्याकडे एक तक्रार आली आहे. ही गोष्ट इतर ठिकाणांबद्दलही खरी असू शकते. मुंबईतील कार्डधारकांना फार कमी तांदुळ पुरवला जातो, बहुधा दर आठवड्याला अर्धा शेर अशी तक्रार आहे. हे अगदीच कमी आहे आणि यामुळे काळाबाजार फोफावेल. माझे तर म्हणणे आहे की नियंत्रण गेले पाहिजे. काही लोक म्हणतात की नियंत्रणामुळे शहरातील लोकांना बरीच मदत झाली आहे. परंतु नियंत्रणामुळे शहरातील समस्याही पूर्णपणे सुटली नाही असे काही सांगतात. शहरातील लोक जर प्रामाणिक होतील तर हा त्रास नाहीसा होईल. लोकांचे पोट भरले तर लोक काळ्याबाजारात कशाला जातील? माझे तर मत आहे की शहरातूनसुद्धा नियंत्रण काढून टाकले पाहिजे.

हिंदीवरून. सौजन्य - आकाशवाणी. शिवाय - 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २५४-५

---

१२४. तात्यासाहेब केळकर

मित्रांनी मला अनेकदा विचारले की मी तात्यासाहेबांसारख्या (नरसिंह चिंतामण केळकर. यांचा मृत्यू ऑक्टोबर ४, १९४७ला झाला होता.) महान देशभक्ताच्या मृत्यूचा उल्लेख का केला नाही. ते माझे राजकीय विरोधक होते म्हणून की महाराष्ट्रातील एका गटाचा माझ्याबद्दल गैरसमज असल्यामुळे मी असे केले काय असा त्यांचा प्रश्न होता. या कारणांमुळे मी असे करण्याकरिता प्रेरित झालो नव्हतो. उलट माझ्या टीकाकारांना ज्या कारणामुळे मी त्यांच्या मृत्यूचा उल्लेख केला नाही असे वाटते त्याच कारणाकरिता तो उल्लेख करण्याला मला प्रेरणा मिळायला पाहिजे होती.

मृत्यसारख्या गंभीर घटनेचे सर्वसामान्य घटनेप्रमाणे उल्लेख करणे मला अनुचित वाटते. परंतु उशीर होऊनही माझे फार जुने मित्र हरिभाऊ फाटक यांच्या आग्रहाकरिता मला असे करावे लागत आहे.

जन्म आणि मृत्यूचा उल्लेख करण्याची जर 'हरिजन'ची प्रथा असती तर तात्यासाहेबांच्या मृत्यूचा मी सर्वात आधी उल्लेख केला असता हे मी एकदम कबूल करतो. परंतु 'हरिजन' वृत्तपत्रे काळजीपूर्वक वाचणाऱ्या वाचकांच्या लक्षात आले असेल की हरिजनने अशा कोणत्याही परंपरेचा स्वीकार केलेला नाही. असे उल्लेख माझी इच्छा व उपलब्ध वेळ यावर अवलंबून असते. गेल्या काही दिवसांपासून नियमितपणे वर्तमानपत्रे वाचणे मला शक्य होत नाही.

तात्यासाहेब जरी माझे राजकीय विरोधक होते तरी मी त्यांना मित्र मानत होतो व त्यांच्या टीकेचा मला लाभ होत होता हे मी कोणी काहीही म्हणाले तरी सांगेन. तात्यासाहेब केळकर दिवंगत लोकमान्यांचे (बाळ गंगाधर टिळक, १८५६-१९२०, राष्ट्रवादी नेते, विद्वान आणि लेखक, डेक्कन एज्युकेशन सोसायटीच्या संस्थापकांमधील एक, केसरी आणि मराठा या नियतकालिकांचे संपादक, १९०८ साली सहा वर्षे ब्रह्मदेशात हद्दपारीची शिक्षा, १९१६ साली ॲनी बेझंट बरोबर स्वराज्याकरिता आंदोलन सुरू केले, १९२० साली लोकशाहीवादी काँग्रेस पक्षाची स्थापना केली, ओरियन, आर्क्टिक होम ऑफ द वेदाज आणि गीतारहस्य या ग्रंथांचे लेखक.) एक मान्यवर अनुयायी म्हणून मी त्यांना ओळखत होतो व त्यांच्याबद्दल मला आदर वाटत होता. मला असे वाटते की १९१९ साली अखिल भारतीय काँग्रेस समितीच्या एका सभेत (अमृतसर येथील सभेत डिसेंबर १९१९मध्ये काँग्रेसने गांधीजी, न. चिं. केळकर आय. बी. सेन, ए. रंगास्वामी अय्यंगार यांची काँग्रेसच्या घटनेचा विचार करण्याकरिता एक उपसमिती नेमली. पाहा काँग्रेसची घटना, जानेवारी ७, १९२० आणि द काँग्रेस जानेवारी ७, १९२०) मी असे सुचवले होते की लोकमान्य जर मला

तात्यासाहेब, देशबंधू (देशबंधू चित्तरंजन दास, १९२२ साली भारतीय राष्ट्रीय काँग्रेसचे अध्यक्ष निवडले गेले होते, परंतु राजीनामा देऊन स्वराज्य पक्षाची स्थापना केली होती. कलकत्ताचे महापौर, १९२४, आणि १९२५) आणि श्री (आय. बी). सेन (मुळात निशीथ आहे जी स्पष्टपणे चूक आहे.) यांना मला मदतीकरिता देतील तर मी काँग्रेसची घटना तयार करण्याची जबाबदारी घेऊ शकतो. मी घटनेचा मसुदा वेळेवर सादर केला. घटना तयार करण्याकरिता समितीत तात्यासाहेबांनी नेहमीच रचनात्मक सूचना केल्या. या दोन्ही सहकाऱ्यांच्या मोठेपणाबद्दल मी सांगेन की त्यांनी घटना तयार करण्याच्या माझ्या कामात कधीही हस्तक्षेप केला नाही. माझ्याच सूचनेवरून तात्यासाहेबांना कार्यकारिणीत घेण्यात आले होते. तात्यासाहेबांची टीका कधीकधी कठोर असली तरी ती नेहमीच रचनात्मक असायची. ते निर्भय होते परंतु सौजन्यशील होते व मित्रत्वाच्या नात्याने वागायचे.

मला फार आधीच कळले होते की ते मराठीचे फार मोठे विद्वान लेखक आहेत. तात्यासाहेब आणि दिवंगत हरी नारायण आपटे यांच्यासारख्या आधुनिक मराठी लेखकांच्या लेखनाचा आस्वाद घेता येईल इतकी मराठी शिकायची संधी मला कधी मिळाली नाही हे माझे दुर्दैव आहे. भारताच्या आकाशातील नरसोपंतांसाख्या देदिप्यमान ताऱ्याच्या अस्ताकडे दुर्लक्ष करणे ही माझ्याकरिता असभ्यपणाची आणि अशोभनीय गोष्ट होईल.

नवी दिल्ली, डिसेंबर ३१, १९४७

हरिजन, जानेवारी ४, १९४७

---

१२५. वल्लभराम वैद्य यांना पत्र

डिसेंबर ३१, १९४७

भाई वल्लभराम,

मला तुमचे पत्र मिळाले. तुम्हाला शक्य होईल तेव्हा परत पाचगणीला जा.

तुरुंगातून सुटल्यानंतर पुण्यातील जोशी या वैद्याच्या देखरेखीखाली मी भीलाव्याचा प्रयोग केला आहे. त्याचा योग्य पद्धतीने उपयोग केला तरच त्यापासून लाभ होऊ शकतो असे त्यांचे म्हणणे होते. मी हे तुम्हाला सांगण्याची आवश्यकता आहे काय? तुमचे शरीर आणि मन आदर्श व्हावे हीच माझी इच्छा आहे.

पाचगणीत जो गोंधळ सुरू आहे त्याची मला माहिती नाही असे नाही. परंतु मी असहाय आहे. वच्छराज होते तेव्हा सर्व काही चांगले होते. त्यांच्या भावामध्ये ती क्षमता नाही. असे असले तरी तुम्ही याकडे माझे लक्ष वेधले हे चांगले केले. तुम्ही परत जाल तेव्हा तुमच्या प्रेमळ प्रभावाने आवश्यक सुधारणांची सुरुवात करा.

भारतीय वैद्यांना आपला धर्म कळणार नसेल व त्यानुसार ते वागणार नसतील तर त्यांना कोणतेही भवितव्य नसेल या तुमच्या विचारासंबंधी माझी कधीचीच खात्री पटली आहे.

आशीर्वाद,

बापू

मूळ गुजरातीवरून. सी. डब्ल्यू. २९२२. सौजन्य - वल्लभराम

---

१२६. शारदा गो. चोखावाला यांना पत्र

[डिसेंबर ३१, १९४७]

(हे पत्र या तारखेच्या स्रोतांमध्ये ठेवलेले आहे)

चि. बबुडी,

काल मला तुझे पत्र मिळाले. सुशीलाबरोबर आधीच मी एक पत्र पाठवले आहे. तू प्रकृतीची वा इतर कशाचीही काळजी करणार नाहीस अशी अपेक्षा आहे. ईश्वर आपल्याला जसा ठेवील तसे राहू अशी श्रद्धा माणसाने विकसित केली पाहिजे. असे झाले तर कोणाला न कळत वा उघड-उघड रडण्याचे कोणतेही कारण राहणार नाही.

याच्याकडून वा त्याच्याकडून मला तुझ्या प्रकृतीची माहिती कळत असते. तिथे तुझी काळजी घेणारी डॉक्टर फार चांगली स्त्री आहे. तिच्यात चिकाटी आहे व ती हुशारही आहे. तिच्या उपचाराने तू चांगली होतेस की तुला मरण येते ही वेगळी गोष्ट आहे. यामुळे जोपर्यंत डॉक्टर आशा सोडत नाही तोपर्यंत तू जिथे आहेस तिथेच राहायला पाहिजे.

गुजराती प्रतीवरून. प्यारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१२७. एक पत्र

डिसेंबर ३१, १९४७

भाई शहीद,

वर्तमानपत्रातून कळले की तुम्ही आजारी आहा आणि त्यामुळे लखनौला जाऊ शकला नाही. (भारतीय मुसलमानपरिषदेकरिता) असे का? आता तुम्ही कसे आहा? दिनशा आणि जहांगीर पटेल इथे आले होते आणि परत गेले.

हिंदी प्रतीवरून. प्रारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१२८. होशियारी यांना पत्र

[डिसेंबर ३१, १९४७]

(या तारखेच्या स्रोतांमध्ये हे पत्र ठेवलेले आहे.)

चि. होशियारी,

मी तुला एक पत्र लिहिले होते. ते तुला मिळाले असावे. तुझी प्रकृती चांगली राहत नाही याचे मला दुःख होते. कोणत्याही परिस्थितीला तोंड देता येणे आपले कर्तव्य असते. आपली वाढ जर अशा प्रकारे होईल तर काळजी करण्याचे कोणतेही कारण राहणार नाही. आवश्यकता असेल तर इथे ये. गजराजला तू तिथेच ठेवले पाहिजे, त्याला त्याच्या स्वतःच्या पायावर उभे राहता आले पाहिजे. बहुधा आधी मी हेच लिहिले असावे.

हिंदी प्रतीवरून. प्रारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१२९. बलवंतसिंह यांना पत्र

नवी दिल्ली,

डिसेंबर ३१, १९४७

चि. बलवंतसिंह,

मला तुझे पत्र मिळाले. मी याआधीच तुला आणि होशियारीला पत्र लिहिले आहे. एव्हाना ते तुम्हाला मिळाले असेल. होशियारीने इथे येणे तिच्याकरिता चांगले राहील. यामुळे ती येऊ शकते. गजराजने तिथेच राहिले पाहिजे व त्याला एकट्याने राहण्याची सवय झाली असेल असे मला वाटते. शारदाबद्दल तू जे म्हणतोस ते मी समजू शकतो. मी तटस्थ आहे. ती वारली तरी चांगले आहे आणि जगली तरी चांगले आहे. ती जर वारली तर तिची वेदनांपासून मुक्ती होईल आणि तिला नवीन देह मिळेल. ही काही लहान गोष्ट नाही. आणि ती दुरुस्त झाली आणि जगली तर ती सेवा करील. सुशीला आता तिथे काही दिवस आहे आणि ती चर्चा करील.

हिंदी प्रतीवरून. प्रारेलाल पेपर्स. सौजन्य - प्यारेलाल

---

१३०. एक संदेश

(निर्वासितांना दिलेला हा संदेश मदत आणि पुनर्वास खात्याच्या मंत्रालयाद्वारे प्रकाशित करण्यात आला होता)

नवी दिल्ली,

डिसेंबर ३१, १९४७

ज्या हिंदू आणि शीख भगिनींचे अपहरण करण्यात आले होते, ज्याच्यावर बलात्कार करण्यात आला होता वा ज्यांचे मुसलमानांनी बळजबरीने धर्मांतर केले त्यांनी कोणतेही पाप वा अपराध केलेला नाही याबद्दल माझी खात्री आहे. समाजात त्यांचे मुक्त हस्ताने स्वागत करण्यात यावे आणि असे काही प्रकार होण्याआधी त्यांचे जे समाजात स्थान होते ते अक्षुण्ण राहावे. संत कवी तुलसीदास एकदा म्हणाले होते की दया धर्म का मूल है. म्हणजे दया, करुणा हे धर्माचे मूळ आहे. आपल्या त्या भगिनींना आपण जर आदराने वागवणार नाही तर आपला कोणताही धर्म शिल्लक राहणार नाही.

'द हिंदू', जानेवारी १, १९४८

---

१३१. प्रार्थना प्रवचन

नवी दिल्ली,

डिसेंबर ३१, १९४७

बंधूंनो आणि भगिनींनो,

माझ्याजवळ किती तरी पत्रे आली आहेत. सर्वांचे उत्तर देऊ शकणार नाही, परंतु किती पत्रांचे उत्तर देता येईल ते पाहतो.

एक बंधू लिहितात की सिंधमध्ये हिंदू आणि शिख जर शांतपणे राहू शकणार नसतील तर पंजाब वा पाकिस्तानच्या इतर भागात परत जाऊन ते कसे राहू शकतील? लक्षात येईल असे काही हृदयपरिवर्तन तिथे झाले आहे काय? मुसलमान मित्रांशी चर्चा झाल्यानंतर मी पंजाबमधील हिंदूंना काय म्हणालो (पाहा प्रार्थना प्रवचन डिसेंबर ११, १९४७) हे जर पत्रलेखकाला पूर्णपणे माहीत असते तर त्यांने हा प्रश्न मला विचारला नसता असे मला वाटते. पंजाबी निर्वासितांना अजूनही मी परत जाण्याचा सल्ला निश्चितच देऊ शकत नाही. जोपर्यंत सिंधमध्ये हिंदू आणि शीख सुखासमाधानात राहू शकत नाहीत तोपर्यंत मला पंजाबबद्दलही आशा करता येत नाही. आता तर सिंधमध्येसुद्धा हिंदू राहू शकत नाहीत असे मी ऐकतो आहे. सिंधमध्ये किती तरी हिंदू आणि शीख अडकलेले आहेत. कदाचित हजारो असतील ज्यांना निघून यायचे आहे.

चित्रळहून एक बंधू माझ्याकडे आले होते. त्यांनी सांगितले की तिथे अजूनही २५१ हिंदू अडकलेले आहेत. मी म्हणालो की ही काही फार मोठी संख्या नाही. सिंधमध्ये तर यापेक्षाही कितीतरी जास्त लोक अडकलेले आहेत आणि त्यांना जर येण्याची परवानगी नाही तर चित्रळ आणि स्वातमधील थोड्याशा लोकांना तशी परवानगी मिळेल अशी अपेक्षा तुम्ही कसे काय करू शकता? जोपर्यंत ते सर्व परतणार नाहीत तोपर्यंत भारत सरकार गप्प बसणार नाही. त्यांचा प्रयत्न सुरू आहे. यामुळे निर्वासितांनी पाकिस्तानमध्ये परतावे असे मी तोपर्यंत सांगणार नाही जोपर्यंत त्यांचे (पाकिस्तान सरकारचे आणि जनतेचे) हृदयपरिवर्तन झाल्याचे मला आढळत नाही. मला माहीत आहे की एका ठिकाणी जर हृदयपरिवर्तन झाले तर ते दुसऱ्या ठिकाणीही झाल्याशिवाय राहणार नाही. आपल्याकडे जर हृदयपरिवर्तन झाले तर पाकिस्तानचेही हृदयपरिवर्तन होईल. याकरिता काही प्रयत्न करावे लागतील यात काही संशय नाही,

परंतु तसे घडल्याशिवाय राहणार नाही. अखेरीस या वेडाने आपल्याला तेव्हा झपाटले जेव्हा त्याने पाकिस्तानमधील लोकांना झपाटले होते. आपल्यात जर सुज्ञपणा येणार नसेल तर आपण भारत आणि पाकिस्तान दोन्हीही गमावू.. युद्ध होईल. सध्याची परिस्थिती कायम राहू शकत नाही. काही लोक म्हणतात की परिस्थितीत जो बदल आवश्यक होता तो आधीच झालेला आहे. हिंदू आणि शीख भारतात आलेले आहेत आणि भारतातून मुसलमान पाकिस्तानमध्ये गेलेले आहेत. इतक्या मोठ्या प्रमाणात लोकसंख्येची जी अदलाबदल झालेली आहे ती बदलता येऊ शकत नाही. माझा असा दृष्टिकोन नाही. असे सांगणारा मी जरी एकटा असलो तरी मी सांगत राहीन की जोपर्यंत लोक आपापल्या घरी परत जात नाहीत तोपर्यंत या दोन देशांत शांतता निर्माण होणार नाही. पाकिस्तानमधून आलेल्या हिंदूंना तुम्ही कितीही सोयीसवलती पुरवल्या तरी त्यांना झालेल्या जखमा दुरुस्त होणार नाहीत. आपली घरेदारे गमावल्याची गोष्ट त्यांना सतत खुपत राहील आणि ५० वा १०० वर्षांनंतरही युद्ध झाले तरी त्यांना ही गोष्ट आठवत राहील. अशा गोष्टी विसरल्या जात नसतात.

निर्वासित शिबिरांना हस्तोद्योगाच्या प्रशिक्षणाचे केंद्र बनवता येणार नाही काय असे एक मित्र विचारतो. एका जरी निर्वासिताची अशी इच्छा असेल तरी असे करता येईल. हे करण्याकरिता सरकारवर दडपण आणण्याची माझी इच्छा नाही. या छावण्या सुरू ठेवण्याकरिता सध्या जो प्रचंड खर्च येत आहे तो कमी करण्याला ते आनंदाने संमती देतील. यामुळे स्वाभिमान न गमावता निर्वासितांना आपली आजिविकाही मिळवता येईल. माझी सूचना आहे की या मित्राने प्रचार मोहीम उघडून याकरिता असे वातावरण निर्माण करावे की स्वतः शरणार्थ्यांनीच हस्तोद्योगाच्या प्रशिक्षणाची मागणी केली पाहिजे. यामुळे त्यांचा मानसन्मानही वाढेल आणि भारतही वर जाईल व आज जी भारताची अधोगती होत आहे तीही थांबेल.

आता एक भगिनी माझ्याकडे येऊन सांगत होती की मी घराला कुलूप लावून थोड्या वेळाकरिता बाहेर गेले तर माघारी चारपाच शीख आले आणि कुलूप तोडून घरात राहू लागले. त्या भगिनीने पाहिले तर पोलिसांमध्ये तक्रार नोंदवली. असे ऐकतो की काही शीख पकडले गेले आणि एक पळून गेला. हिंदूंनी आणि इतरांनीही अशा घाणेरड्या गोष्टी केल्या आहेत. यामुळे आपल्या धर्माला कलंक लागतो. अशा गोष्टी बंद झाल्या पाहिजे. मी घर सोडून देऊ काय असे त्या बहिणीने मला विचारले. मी म्हणालो नाही, कदापीही नाही. तुम्ही तुमचे घर सोडू नका असे पाकिस्तानमधून

येणारांनासुद्धा मी सांगत असतो. परंतु माझ्या सल्ल्याला काय किंमत आहे? मी म्हणेन म्हणून काही लोक जीव द्यायला तयार होणार नाहीत. शीख मित्र बळजबरीने घरात का घुसले? आम्ही स्वतःला कोणावरही लादणार नाही, कोणाच्या घरात परवानगीशिवाय घुसणार नाही असे निर्वासितांनी घोषित केले पाहिजे. जो काही पैसा त्यांच्याजवळ असेल त्यात त्यांनी भागवले पाहिजे. शीख बांधवांनी मर्यादेत राहिले पाहिजे. आपण सर्व आपल्या मर्यादेत राहिलो पाहिजे. असे झाले तरच सर्व भाडणे मिटतील.

एका भगिनीने मला सुंदर पत्र लिहिले आहे. तिने मला आपले नाव व पत्ता दिलेला नाही. ती म्हणते की मी रेडिओवर दररोज तुमची भाषणे ऐकते. परंतु प्रार्थनेत जे भजन आणि स्तोत्र म्हणण्यात येतात त्यांचे प्रसारण होत नाही. तिचे म्हणणे आहे की दररोज जरी नाही तरी दर तिसऱ्या वा चौथ्या दिवशी संपूर्ण प्रर्थना प्रसारित करण्यात यावी. त्या भगिनीचे म्हणणे आहे की माझी भाषणे भौतिक विषयावर असतात तर प्रार्थना आध्यात्मिक विषयावर असते. माझ्या भाषणांची रेकॉर्ड आकाशवाणीचे लोक करतात व नंतर तिचे प्रसारण होते. यात माझा काहीही हात नसतो. मी जे काही म्हणतो त्यामुळे जनतेचा लाभ होईल असे कदाचित त्यांना वाटत असेल. रेडिओच्या लोकांना काय करणे शक्य आहे हे मला माहीत नाही. परंतु मला वाटते की इथे म्हणण्यात येणारे भजन कितीही वाईट पद्धतीने म्हणण्यात येत असतील तरी त्यांचे प्रसारण झाले पाहिजे. या भगिनीने जे काही लिहिले त्याचा मी आदर करतो. परंतु ती जेव्हा प्रार्थना आणि प्रार्थना प्रवचन यांना वेगळे करते तेव्हा मी त्याच्याशी सहमत होऊ शकत नाही. मी तुम्हाला सांगितलेच आहे की मी जे प्रार्थनेत सांगतो त्याचाच भाग प्रार्थनोत्तर प्रवचनात असतो. मी ते भजन म्हणू शकत नाही आणि माझ्या आवाजात तितकासा गोडवाही नाही. याशिवाय मी आता इतका म्हातारा झालो आहे की माझी इच्छा असली तरी मी गाऊ शकणार नाही. यामुळे मुली गातात आणि त्या चांगल्या गातात. जे काही म्हटले जाते वा गायीले जाते ते सर्व ईश्वरालाच उद्देशून असते. लोकांनी ही गोष्ट समजून घ्यावी असा माझा सल्ला आहे.

आता जुनागढ आणि अजमेरसंबंधी. मी तुमच्याशी जुनागढसंबंधीच्या तारांविषयी बोललो होतो. आता मला अजमेरहून तार आली आहे. अजमेरसंबंधीची गोष्ट मला माहीत आहे. तिथे जे काही घडले ते बरेच गंभीर होते. परंतु तारेत अतिशयोक्ती करण्यात आली आहे. अशा अतिशयोक्तीमुळे लोक संतापतात आणि उद्दिपित होतात. दिल्लीत आधीच भरपूर विष भरलेले आहे. परंतु मुसलमानांच्या संपत्तीची लूट करण्यात आली आहे, त्यांच्या घरांची जाळपोळ करण्यात आली आहे व तेथील दर्गा

धोक्यात आहे असे म्हणणे बरोबर नाही. सत्य हे आहे की दर्ग्याला कोणीही स्पर्श केलेला नाही. मग ते मला अशा तारा का पाठवतात? तिथे लूटमारीच्या घटना निश्चितच झाल्या आहेत. तिथे जाळपोळ आणि खूनही झाले आहेत. या गोष्टी नाकारता येत नाहीत. परंतु त्यात अतिशयोक्ती केल्यामुळे या घटना लहान वाटू लागतात. अजमेरचा दर्गा शरीफ सुरक्षित आहे. जितके आहे तितके सांगा. घटना आणि प्रत्यक्ष बातमीची तुलना करा अशी माझी प्रत्येकाला विनंती आहे. असे केले तरच आपल्याला न्याय मिळू शकेल. आपण तथ्याला धरून राहिलो नाही तर आपला सर्वनाश होईल. सरकार शांतता प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करत आहे. आम्ही शासनावर विश्वास ठेवला पाहिजे, ईश्वरावर विश्वास ठेवावा. आपण सर्व आपापल्या चुका दुरुस्त करणार नसू तर भारत आणि पाकिस्तान दोघांचाही अंत होईल.

हिंदीवरून. सौजन्य आकाशवाणी. शिवाय 'प्रार्थना प्रवचन - २', पृष्ठ २५५-८

* * * * *